म. ग्रं सं. ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. ४२६

४२६

REFBK-0000782





प्रकाशकाचे दोन शब्द

सदरहु खंडांत चिंतो विठ्ठल रायरीकर यांच्या दप्तरांतील कागदपत्रांचा संग्रह केला आहे.

श्री. रघुनाथ बाजीराव व बाजीराव रघुनाथ यांचीं या खंडांत छापिलेलीं अस्सल पत्रें इतिहासाच्या वाचकांस विशेष चिंतनीय वाटतील. श्री. रघुनाथ बाजीराव यांचीं मानसिक व सांपत्तिक स्थित्यंतरें कसकशीं होत गेलीं याचा उलगडा हीं पत्रें करतील. या वेळच्या स्थितीचें मि. फॉरेस्ट वगैरेनीं काढलेलें चित्र या पत्रांशीं ताडून पाहगें विशेष फायदेशीर होईल हें सांगणें नको. भाऊबंदकीच्या काळांतील अद्याप पुष्कळसा पत्रव्यवहार प्रसिद्ध व्हावयाचा आहे; व तो प्रसिद्ध झाल्यावर त्याचा विचार एका विस्तृत निबंधांत करण्याचा रा० राजवाडे यांचा मानस आहे.

या खंडांतील पृष्ठें १–१३६ एवढा मजकूर दैनिक ज्ञानप्रकाशांत दोन वर्षांपूर्वीं क्रमशः प्रसिद्ध झाला होता; त्या पुढील मजकूर या मंडळाचे एक उत्साही सभासद श्री. गंगाधर नारायण ऊर्फ आबासाहेब मुजूमदार यांच्या मदतीनें आतां प्रसिद्ध होत आहे. या मदतीबद्दल ज्ञानप्रकाशकर्ते व श्री. मुजूमदार यांचे मंडळ आभारी आहे.

फाल्गुन व. ५ शके १८३४
आप्पा बळवंत वाडा ५८
शनवार पेठ पुणें शहर

सन १९१२



इतिहास
५२६
रु. ६ नं. १२९

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड १२ वा.

श्री.

लेखांक १.

१६९२ माघ शुद्ध १२.

चिरंजीव राजमान्य राजश्री नारायणराव बल्लाळ यांसीः—

माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. बिचूमिया वगैरे कारवान हैदर नाईक याजकडे घोडीं वगैरे बैल मिळोन अडतीस सुमारीं घेऊन जात होते. त्यास, ताा सावनूर येथें तुह्मांस आढळलें तें जप्त करून सरकारांत हुजूर रवाना केलेंत. त्यास, ईा छ ६ रजब ताा छ २६ रमजान-पावेतों गुा नरसो बल्लाळ कारकून तालुके धारवाड चंदी वगैरेबरोबर खर्च जाला तो ताा कारवान माा यांजकडे रुपये ४९५। च्यारशें सवा पंच्याण्णव रुपये खर्च लेहून देविले असत. तरी कारवान मजकूर याज-पासून सदरहू ऐवज हुजूर घेतला जाईल. तुह्मीं तालुके माापेंा कारवान याचे तसल-मातीस खर्च लिहिणें. तुह्मांस मजुरा पड-तील. जाणिजे. छ २९ रमजान, सुा ईहिदे सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ?

आशीर्वाद.

पौा छ ११ सवाल,
मंगळवार,
सु॥ ईहिदे सबैन,
माघ शु॥ १२,
दोन प्रहर दिवस.

श्रीवरद.

लेखांक २.

१७०२ वैशाख शु॥ २.

सेवेसी विनंति. राजश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यासी लिहितां व कार-कुनाचे मुशारे देतां थकलों. परंतु पत्रोत्तर सहा सहा महिने न पाठवीत. मग बाकीचे रुा वसुलीजमेचे गांव लाऊन देणें कळ-तच आहे ! कदाचित् पत्रोत्तर आलें तर आपला वोढा लिहून उमेदवारी लिहितात. याचा विस्तार पूर्वीं वरचेवर सोा विनंति लिहिली व उत्तरें त्यास ताकीदपत्रासहित आलीं ते त्यांजकडे पाठविलीं. उत्तरें येतील ते सोा पाठऊं. तूर्त सेवकास हजूर पात-शाहीची ठिमा घेऊन यावयाची त्वरा व वर्षाकाळ समीप आलियामुळें फैसाव होईल. बहुत दिवस दर्शनलाभ न जाला, या उत्कंठेंत अत्यंत चिंताग्रस्तता. दुसरें, स्वा-मीस शत्रूचें पारपत्य करावयाचें अहिर्णिसीं उदेगाकरितां चित्त उद्विग्न. यांत सेवकानें आपली अवस्था लिहिणें परम संकट जाणून, विनंति लिहिली कीं, बुंदेल्याचे मातबर तेथें असतील त्याजपासून कर्ज रुपये दहा हजार स्वामीनीं घेऊन पाठवावे. तरच जी-वनोपाय होऊन दर्शनलाभ घडेल व स्वामींचा शब्द लागणार नाहीं व उर्जित होईल तो सुदिन करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. हजूर येणें व तेथें रहाणें खर्चाचे तंगीमुळें दुस्तर जालें. याकरितां दर पत्रीं विनंति लिा. याचा

अपराध क्षमा केला पाहिजे. केतकीचे फुलाचा अर्क एक सिसा सोा पावलें. प्रातःकालीं पूजनोत्तर अथवा जेव्हां सरबत घेणें मर्जीस येईल त्या समईं एक तोळाभर पाणियांत घालून घेतल्यास सुगंध येईल. घरीं तयार ब्राह्मणाकडून करऊन सेवेसीं रवाना केला असे. सुरक्षित पावल्याचें उत्तरीं कृतार्थ केलें पा. दर्शनलाभ घडेल ते सुघडी. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक ३.

पौ छै २५ रमजान

१७०२ ज्येष्ठ वद्य ३.

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसी:—

विज्ञप्ति ऐसीजे:—पत्रीं आज्ञा कीः पातशहास अर्जी व नबाब नजबखान जुनफुकार द्दौलेबहादूर यांस सरकारांतून पत्रें इंग्रजांचे तेंबीविशईं रवाना केलीं आहेत, व द्दौलेबहादूर यांस राजश्री बाळाजी जनार्दन यांनीं विस्तारें लिहिलें आहे, हा मजकूर तुह्मांस समजावा सबब मसोदे पाठविले आहेत, त्याजवरून कळेल त्याप्रों बोलून इंग्रजांची मसलत लिहिल्याप्रों विष्कलित होऊन सरकारकाम अमलांत येईल तें कर्णें. सविस्तर बाळाजी जनार्दन लिहितील त्याजवरून कळेल. म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास, स्वामींचे आज्ञेप्रों पादशहास वरचेवर उत्तेजन देऊन इंग्रजांचा यांचा स्नेह संपन्न होता तो तोडिला. सेवकासी पातशहानीं व नबाब नजबखानानीं शफत वाहून सांगितलें कीं जें नानानीं लिहिलें आहे हेंच आमचे चित्तांत आहे. याप्रोंच करूं, ह्मणोन वचन दिधलें. वजीराकडील च्यार हजार फौजेनिसीं पातशहाचे तैनातीस लताफत आहे, त्याचा आमचा जोड आहे, आपले सरकारची फौज दोन हजार सेवकापासीं आसिल्यास पातशहाचे मनास आल्हाद होईल, अतःपर पुढें श्रीमंतांस लेहून आपले सरकारची फौज हुकुमांत राहीसी जलदीनें हजुरांत येते करणें, ह्मणून सो लिहावयासी सांगितलें तें लिहिलें असे. व आपला मातबर माणूस सेवकाचे समागमें देऊन सों रवाना करितों ह्मणतात. अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. त्याची जागा या स्थलीं सरकारची फौज असिल्यास यांजवर दाब राहून शत्रूचे पारपत्याची तजवीज वरचेवर होईल तें सेवक करितील. प्रथम पातशहापासीं खर्चाची तंगी. त्यांत एक उमराव त्याजला दुसरियाचें बल नाहीं. त्यांत मोगल लोक काबूची. यास्तव सेवेसी विनंति लिहिली आहे. तर सलाह असालियासी एक दोन पथकें धोंडो दत्ताश्रेय व पवार तैसी सेवकाचे तेनातीसीं पाा कीं, सरकारचे फौजांची आमदनी कळून, याजला नवा प्रांत घेऊन खर्चाची तंगी दूर करावयाची उमेद दाखऊन, कंबर बांधऊन, डौल दाखल करऊन, होईल ते चाकरी करूं. इंग्रज तूर्त खर्चास रु॥ देऊं ह्मणतात. आह्मीं फारसी गोष्ट फौजेविना सांगून, नफे भारी दाखऊन, स्वामीचे आशेप्रों आजवर इंग्रजाचा रुपया पातशहास घेऊं दिधला नाहीं व वचनींही गुंतूं देत नाहीं. पातशाह स्वामीस रुा मागत नाहींत, फौज आणा ह्मणतात. यास्तव सेवेसीं लिहिलें असे. गोहदप्रांतीं पथकें आहेत त्यांपों एखाद दोन पथकें सेवकापासीं राहिल्यास सरकार उपयोगी आहे. श्रुत होय. उत्तम असेल तें करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

श्रीवरद.

लेखांक ४.

१७०२ ज्येष्ठ वद्य ३.

पो छ २५ रमजान.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

पो पुरुषोत्तम महादेव कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ॥ १६ माहे जमादिलावर मुक्काम दिल्ली जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. छ २६ रविलावरचीं पत्रें पाठविलीं ते छ २३ जमादिलावलीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं:—अलीकडे तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास, सविस्तर वरचेवर लिहीत असावें. सरकारांतून पातशहास अर्जी व नबाब नजबखानास पत्रें व आह्मांकडून खानमजकुरास पत्रें पाठविलीं आहेत तीं त्यांस देऊन लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून येत तें करावें. फारसी पत्रांतील मजकूर तुह्मांस कळावे याकरितां मसुदे पाठविले आहेत त्यावरून कळेल. कितेक मा॥ अलाहिदा पु॥—पत्रीं लिहा॥ आहे त्याप्रों अमलांत आणणें,ह्मणोन लि॥. त्यास, पैदरपै विनंतिपत्र सुों पाठवितों, त्याचीं उत्तरेंही सेवकास येतात. व आज्ञेप्रों पत्रें आपलीं व सरकारचीं पातशहास व नजबखानास देऊन त्यांस इंग्रजाचे शाक करावेंसें वारंवार बोध करून ठेविला आहे. त्याचा त॥ सरकारांत विनंतिपत्रें लिहा॥ आहेत त्याजवरून ध्यानास येईल. सेवकाचेनें यथाज्ञानेंकरून जे चाकरी घडून येईल तीस अंतर करणार नाहीं. परंतु लोकांचें येथील देणें वारून स्वामिदर्शन घडे तें करणार आपण आहेत. खर्चाची आबाळ विशेष. यास्तव विनंति मान्य करणार स्वामी समर्थ आहेत. सविस्तर पुर्वीपत्रावरून श्रुत होईल. नजबखानानीं स्वामीस पत्र बहुत स्नेहवृद्धीनें सरकार—उपयोगी लिहा॥ आहे. याचे उत्तरीं विशेष लोभानें व पातशहास इंग्रजाचे मोहिमेस घेऊन निघता ह्मणोन सेवकानें तुमचे जवानीं लिहा॥ त्यावरून बहुत संतोष जालियाचें ल्याहावयासी आज्ञा करावी. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक ५.

१७०२ ज्येष्ठ वद्य ३.

पो छ २५ रमजान.

विनंति कीं:—स्वामीचे आज्ञापत्राप्रमाणें नजबखानासहित पातशहा॥ यांसीं इंग्रजांचे पारपत्याची तहबीर करावयाची शफत घेतली. व श्रीमंत स्वामींनीं सामील व्हावयासी निजाम अलीखानास त्यांचे वकिलाकडोन नजबखानानीं लिहिलें. त्याचीं पत्रें स्वामींस व श्रीमंतांस घेऊन पाठविलीं आहेत. त्याजवरून पातशहाचा शुका पाऊन वृत्तांत श्रुत होईल. तात्पर्य, अंतःकर्णांतून इंग्रजाची नड पातशाहींतून काढावी व सरकारचे फौजेस सामील व्हावें. परंतु कदाचित आपण तिकडे सलूख केला तर इकडे इंग्रज यांसी समीप आहेत, हे त्यांचें पारपत्य करितिलसें दिसत नाहीं, पेंचांत येऊं, यांत शंकित. तेच सेवकांनीं खातरजमा केली. फिरोन सेवेसीं विनंति लिहावयासी बहुत ममतेनें नजबखानास सांगितलें. ते श्रीमंत स्वामींचे सेवेसी विनंति लिहिली आहे. त्याजवरून श्रुत होईल. मुख्याचे मनांतील भाव, इंग्रजासीं आपण सलुख न करावा, ते जेर जालियावर यांनीं त्यांचे प्रांतासी खलष करावयाचे समईं सरकारचा एक सरदार मातबर फौजेचा, निःकपट, पातशहापासीं असल्यास नजबखान चाकरी करील, यांत संदेह नाहीं. इंग्रजाची ताबे-

दारी न करावी, स्वामीची फत्ते व्हावी, हें अंतःकरणापासून शफत वाहून वारंवार बोलतात. इंग्रजासीं स्वामींनीं एकोपा केलियास सरदार फौजेसहित येऊन जाटाचा प्रांत व जयपूर प्रांत नजबखानापासून सोडवितील या धाकांत शंकितही आहेत. यास्तव स्वामीशीं निःकपटता करून, सरकारची फौज सामील करून घेऊन, इंग्रजासीं बिघाड करून, आपले प्रांतास उपद्रव न लागावा या मनोदयास्तव सरकारच्या फौजेची इच्छा करितात उभयतां सरदार एकाचित्त होऊन, हिंदुस्थानांत येऊन, यांचें संरक्षण करून, पुढें यांजला दाढी देतील हा यांजला भरवंसा पुरतां पुरत नाहीं. सेवकानें सरदारांकडोनही खतरजमा केली व पत्रोपत्रीं स्नेहवृद्धि सरदारांची यांची केली. परंतु मनांतून शंकित होऊनही म्हणतात कीं, इंग्रजासीं तुम्ही सलुख कराल तर इंग्रजही दिल्लीस येतील, तेव्हां आम्हांस कुमक कोणाची येणार ? यास्तव वारंवार सलूख न करावा एविषईं नजबखानानीं सेवकास सांगितलें व सेवेसीं पत्रांतही याच प्रकारें लि॥ आहे, तें श्रुत होईल. पातशहाचे मनांत नजबखान नसावा व याचे कबजांत न रहावें, स्वामीचे काबूंत रहावें. दिल्ली—अगारियांत स्वामींचा बंदोबस्त असलियासी पातशहास सुख आहे. परंतु नजबखान नसावा हें अंतःकर्ण पातशहाचें आहे. यास्तव सेवेसी वि॥ रा॥ हरिपंत अथवा रा॥ महादजी सिंदे एकानें दिल्लीस राहून दोन लक्ष रु॥ दरमहा पातशहास खर्चास देऊन हे स्थलीं करोडोंची हस्तगत करावी. व पातशाही हुकूम आपले ताबे ठेवणार स्वामी समर्थ आहेत. नजबखानानीं पत्रें बहुत स्नेहवृद्धीनें लिहिलीं आहेत. यांचीं उत्तरें पाठवावीं. निजामअल्लीखानास व खंडोजी भोंसा यांसीं शुकें स्वामीचे आज्ञेप्रमाणें लिहिविलीं आहेत, तीं तयार करून सेवेसी मागाहून पाठवितों. नजबखानानीं करार केला आहे कीं, पातशहास अंतर्वेदींत डेरेदाखल करतों, व इंग्रजाचे कलकत्त्याकडे भोंसले याणीं तान बसवावा, व सरदारांनीं त्यांचा पिच्छा न सोडावा. हें कर्णे स्वामीचे स्वाधीन आहे. एविषईं हुजूर विनंति लिहावयासी सेवकास सांगितात कीं, सलूख कदाचित् केला तरी पुढें जड जाईल. इंग्रजीच जाली तर हिंदुस्थान गेलें, कोणाचें घरें नाहीं, म्हणतात. तें सेवेसी लि॥ असे. आपण समयोचित उत्तम असेल तें करावें. स्वामीप्रतापें ईश्वर फत्ते करील तो सुदिन. पूर्वी ही एक दोनदां सेवेसी विनंति लि॥ कीं, नजबखानांस श्रीमंतांचे पत्रांत अलकाब केवल हलका पूर्वस्थितीप्रों मुनसी लिहितात. त्यासी, वजीरप्रमाणें पत्रांत श्रीमंत स्वामीकडोन लिहावयास आज्ञा केली पाहिजे. वाढऊन लिहिणियानें मनास उछाह होऊन कामास तत्पर विशेष होतील तें करावें. हलके फारसींत लिहावें, यास्तव विषम मानतील. आह्मीं श्रुत केलें कीं, आमचीं पत्रें श्रीमंतांपासीं पावलीं. याजवर वजिराप्रोंच लिहितील. याप्रमाणें सांगोन समाधान केलें. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. येथील बाह्य अंतस्थ सविस्तर ध्यानारूढ असावें, याजकरितां लिों. अधिक विस्तारें करितां रागास न यावें. श्रीमंत स्वामीस पातशाई इनात—टिका वगैरे घेऊन यावें यास्तव उत्कंठा. व कर्जदारीमुळें एकादसी, सिवराज मोडावयास्तव बाळाजी व गंगाधर गोविंदास सरकारचीं सनदापत्रें पाठविलीं, त्यांचें उत्तरही न देत. मग नेमणुकेप्रों बाकीचें पाठवणें व वसुलीजमेचे गांव लाऊन देणें कळतच आहे. तुह्मांस हुजूर लिहावें त्याचें उत्तर

याजवरच ताकिदीनें आज्ञापत्रें येतात. ते उत्तरही न देत. पांच-साला एक-साला कमाल-जमेचे गांव लाऊन दिल्हे आहेत, त्याच गांवावर दुसाला कर्ज दहा हजार कालपी प्रांतीचे साहुकारांकडून आणविलें तेथें एकही कर्ज, मागील देणें गांवावरील आलें आहे याजमुळें न मिळे. दुसरें कारण खंडेराऊ, हरि पवार वैगरे फौज ग्वालेर प्रांत सोडून झांसी प्रांत व काचेकालपी लूटमार करावयासी पोट भरावयासी गेले आहेत. कछ व घरांत गोहदकराचा अंमल जाला. इंग्रजसहित गोहदकरानें रात्रौ छापा घातला. पांच सहासें घोडें, माणूस जमविलें. आतां सुरक्षित भोडरीस आहेत. हेंही कारण जालें. या दिवसांत सेवकाचे हुजूर येणें व येथें ठरवणें दुस्तर जालें जाणून विनंति मान्य करून, बाळाजी गोविंदाचे कारकुनास सत्वरच जाऊन एकसाला रुपये येथें खर्चास पाा कीं येथील देणें वारून सेवेसी येऊन बुंधीलखंडाचे व झांसीचे रुा साल-च-साल कांहीं स्वामीस पावत तो विच्यार श्रुत करूं. बाळाजीपंत कायम राहून सरकारकाम होई तें करावेंसी मर्जी असल्यास विनंति करूं. सेवकाची नेमणूक दिली यास्तव लिहीत नाहीं. त्याचे अस्ताव्यस्तपणें सरकार-काम होत नाहीं, म्हणोन तात्पर्य लि॥ असे. तरी हरएक साहुकारापासून कर्ज घेऊन सेवकास दहा हजार रु॥ जरूर पाठविणार स्वामी समर्थ आहेत. व या रुपयांची तनखा साहुकारांची बाळाजी गोविंदाचे कारकुनावर करावी कीं त्यास तिडीक लावून रु॥ हुजूर आणोन देईल तें केलें पाहिजे. निराश्रित सेवकास दर्शनलाभ देऊन सनाथ करावयासी आपण समर्थ आहां. स्वस्थ चित्तें बुध्धी यः संभवती कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होई तो सुदिन. श्रीचे कृपेकरून स्वामीचा प्रताप अधिकोत्तर होय ते सुघडी. बहुत काय लिहूं ? हे विनंति.

श्री.

लेखांक ६.

१७१२ ज्येष्ठ वद्य ३.

पौ। छ २५ रमजान

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:-

विज्ञापना ऐसीजे:-पत्रीं आज्ञा कीं: इंग्रजाचे तंबीस सरकारांतून सिंदे-होळकर फौजेसह गुजराथेंत करनेल गाडर याजवर गेले. तोफखाना तीन कोसांचा आहे. दररोज लढाई सुरू आहे, दोन च्यार लढाया जाहल्या. त्यांत बहुत नरम इंग्रज केले मैदानांत येऊं शकत नाहींत. अडचणीची जागा धरून आहेत. नित्यानीं घरोघर येऊन कही वैगरे लुटून आणतात. बहुत तंग केले आहेत. मैदानांत यावें ही इछा. ईश्वर-इछेनें थोडेच दिवसांत फैसल होईल. भोंसले फौजेसहित बंगाल्यांत रवाना जाले. कटकचे मैदानांत गेले. हें वृत्त तेथेंही आलें असेल. हैदर नाईक यानीं चेनापट्टणाकडे जाण्यास डेरे दाखल जाले. चेनापट्टणानजीक गेले असतील. नबाब निज्याम-अल्लीखानही सिकाकोलाकडे सत्वरच जातील. चहूंकडून ताण बसला. त्यांत बंगाला ऐन पैकेयाची इंग्रजाची नड मोडते. ऐशांत पादशहा यांनीं बाहीर निघोन, नबाब नजबखानबहादूर, सीख वैगरे यांस कळेल तसें समेटून घेऊन, इंग्रजास सजा करून, असफुद्दौला यांचे दौलतीचा बंदोबस्त केल्यास नफे बहुत होऊन खिसारा वारेल. टोपीवाल्यांनीं बेअदब केली ते हालखुद्द राहून, सबदागिरीचे मार्गे वर्तणूक करितील. समेट हाच आहे. सविस्तर नबाब नजबखानबहादर यांचे पत्रीं तपशिलें

लिहिलें आहे. मसवद्यावरून कळेल त्या-अन्वयें बोलून, लिहिल्याप्रों अमलांत यावें. सरकारकाम करून दाखवावयाचा समय आहे. तुह्मी कराल, हे खातरजमा; तथापि सूचना लिहिली आहे. इंग्रजाचें पारपत्य होऊन, नक्षा मोठा व्हावा, ऐसा समय आहे. असें पुढें करूं गेलियास होणार नाहीं. ईश्वरें ज्यांस मोठेपण दिल्हें त्याणीं मोठें कार्य केलियास नक्षा व कितेक दिवस कीर्ति राहावी, ऐसेंच करावें हें उत्तम. या गोष्टीस गई गुजरल्यास टोपीवाले कांहीं दिवसांत पातशहात घेतील. मग पश्चात्ताप होऊन फळ नाहीं. असें आहे म्हणून पत्रीं आज्ञा. त्याजवरून आज्ञेप्रों पातशहास व नवाब नजबखानास सविस्तर अक्षरशाह मा एक दोनदां समजाऊन, यथामतीनें दूरअंदेसीचे प्रकार खचित करून, इंग्रजाचे रुपयावर नजर न देतां त्यासीं बिघाड करावा हे गोष्ट शपतपूर्वक ठराऊन, डेरे-दाहीर करावें हा निश्चय केला आहे. फरा-सखाना व तोफखाना वगैरे स्वारींच्या तयारीस पातशहानीं आज्ञा केली. डेरे-दाखल होतील तेसमईं सेवेसी लिहूं. कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

श्रीवरद.

लेखांक ७.

१७०२ भाद्रपद वद्य १४.

पौ. छ २३ सवाल इहिदे
समानीन, बा॥ अजूरदार.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कुताने-क सां॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ. २७ माहे रमजान मुक्काम दिल्ली स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशे॥. सरकारचें आज्ञापत्र छ १७ जमादिलावलचें आलें तें छ १६ रजबीं पावलें. त्यीं आज्ञा कीं इंग्रज फार वदमामली आहेत. प्रथम गरीबीनें गोष्ट बोलून आपला कबजा करावा हे चाल त्यांची आहे. मागें चिनापट्टण व चंद्रगिरी दावर वगैरे मुलूक त्याणीं हस्तगत केला. व बंगाल पातशाही मुलूक घेऊन असफद्दौला यासीं कोणें प्रकारें सलूख राहिला, हें सर्व पातशहाचे ध्यानांत असेलच. या गोष्टी सर्व मनन करून, दक्षणचे सर्व रयासतदार एकविचयारें होऊन, जागोजागा टोपीकरांस ताण बसविल्या. शिक्षा चांगलीच होईल. याप्रों तुह्मीं मिर्जा नजबखानबहादुर यासीं बोलून पातशहास विनंति करून, टोपीकरांचे पारपत्याचा निश्चय करावा. पातशहानीं खेमेदाखल व्हावें. व नजब-खानानीं शीख वगैरे सर्व जमाव करून इंग्रजास तंबी करावी. समय हाच आहे. असफद्दौलाची दौलत हस्तगत जालियास नफे फार आहेत. सरकारतर्फेनें गोहद प्रांतीं इंग्रजाचे तंबीस पंचवीस हजार फौज आहे व आणखी मातबर सरदार फौज-सुद्धां रवाना करायाची तरतुदींत आहे. जलदीनेंच येऊन पावतील. व नजबखाना-सारिखे दूर-अंदेश हजूरमुख्त्यार व नवाब निजामअल्ली सारिखे व आह्मांसारिखे फि-दवी एकनिष्ठ हुजूरचे एकविचयारें अस-ल्यास फिरंगी यांनीं काय कर्णें आहे ? राजे-रजवाडे व निजामअल्लीखान व भोंसले यांस फरमान पाठवावा. व उभयतां सरदार गुजराथ प्रांतीं पन्नास साठ हजार फौजेनि-सी व तोफखाना जंगी सरंजामसुद्धां इंग्र-जांचे पारपत्यास जाऊन, त्यांची रसद बंद करावी. त्यांचे लष्करांत दोन सेर धान्य आहे. इंग्रज मोठे संकटांत येऊन पडले आहेत. ज्या दिवसीं सरदार निकड

करतील त्या दिवसीं इंग्रज जीवें वांचून जाणें कठिण पडेलसें आहे. व नवाब–निजामअल्लीखान–बहादूर याणीं सिकाकोळ राजबंदराकडे आपला पुत्र फौजसुद्धां रवाना केला आहे. व रा॥ रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा याणीं आपले बंधु रा॥ खंडोजी भोंसले सेनासुभा यांस बंगालियांत रवाना केलें. व हैदरखान चेनापट्टणाकडे जाणियास डेरेदाखल जाले. फौज पुढें रवाना केली. यामुळें चहूंकडून इंग्रजास ताण बसून पेंचांत येत, या गोष्टीनें बहुत नफे आहेत, म्हणून पातशहांस व नजबखानांस समजाऊन अमलांत यें तें कर्णें. म्हणून विस्तारें पत्रीं आज्ञा. त्यास, विस्तारवत् आज्ञेप्रों व यथामतीनें समर्पक सुचलें तें पातशहांस व नजबखानांस श्रुत केलें. बहुत संतोषी होऊन बोलिले कीं, आमचे मनोदयानरूपच श्रीमंताचाही इरादा आहे. परंतु तूर्त तथातथ करून इंग्रज सुरतेस गेले व सरदार उजनीस इंदुरास आले. व गोहदेकडील सरदार आपलाले ठिकाणीं गेले. आह्मीं आपली फौज पाठवावी तर वर्षाकाळ, नदीनाले चहडले आहेत. या दिवसांत फौज व तोफखाना कैसा जातो ? यास्तव वर्षाकाळानंतर श्रीमंतांचे सरकारची फौज आल्यास आह्मीही फौज रवाना करितों. आमचा व सरदारांचा इमानप्रमाण करून देणें कीं, पुढें अन्तर न पडे. व इंग्रजासीं आह्मीं इकडे बिघाड केलियावर तुम्हांकडील आश्रा पक्का न राहिला तर आम्ही एकले पडून त्यांचे काबूंत सांपडूं, तें न करावें. तेव्हां आह्मीं पुरती खातर जमा केली व आपली कैसी खातरजमा होईल हें पुसिलें. तेव्हां बोलिले कीं, त्यांचा आमचा कौलकरार जाहला म्हणजे खातरजमाच आहे. याप्रमाणें बोलणें जाहलें आहे. हाल्लीं इंग्रजांची मोहीम अपुरी सोडून सरदार उज्जनी इंदुरास आले. यास्तव यांस संवशय–वाढ होऊन पातशहाकडून कमर नामें खोजा व नजबखानानें आपलेकडील इसमास नामें खोजा वजिरास नालकी व इंग्रजास वस्त्रें, जवाहीर व पत्रें व आसफद्दौल्याचे मातुश्रीस व आजीसें वस्त्रें देऊन अयोध्येस रवाना केलें. तेसमईं आम्हीं पृछा केली कीं, हा सिष्टाच्यार करावयाचें कारण काय ? तेव्हां बोलिले कीं, वजिराची आबरू वाढावी आणि इंग्रजांनीं वजिरास ग्रासिलें आहे तें तूर्त आमचे खातीर–दास्त केवळ ग्रासून चुकणार नाहींत तोंवर सरकारची फौज या प्रांतीं आलियावर त्यांचे आमचे विच्यारें जें कर्णें तें करूं, एविशीं तुम्हीं आपले चित्तांत संदेह न मानावा. याप्रमाणें आमची खातरजमा केली व पूर्वी पातशहानीं डेरेदाखल व्हावें व अंतर्वेदींत उतरावें हें ठरलें होतें. याचें कारण हेंच कीं, सरदारांनीं इंग्रजास सुरत प्रांतीं सरकारचे फौजेनें घेरलें होतें या प्रतापावर हे बहुत उछाहयुक्त होते. आतां सरदार फौज घरोघर गेले व एक दोन स्थलीं फौज इंग्रजांनीं मोडली व या प्रांतीं गोहदेकडील फौजेवर शहखून पडला. सरदार वीस हजार फौज असतां आपसांत फुटून गेले. अंबाजी इंगळे यांनीं ग्वाल्हेरसारखा किल्ला गमाविला. इंग्रजांनीं घेतला. आपले फौजेचें बळ नाहींसें जाणून हे शशांकित होऊन बाहीर निघणें राहिलें. वर्षाकाळानंतर सरदार मातबर फौजेनें आलियावर त्यांचे आमचे सला हें जें उत्तम असेल तें करूं, ह्मणतात. जें वर्तमान आह्मांस कळत नाहीं ते बातनी पुणियाहून कुवरसेन नामें कोणी आहे तो तेथून दिल्लीस नजबखानास वगैरे चहूंकडे

बातनी लिहितो. व उज्जनची हीं बातनी कच्ची पक्की वरचेवर अनुपगीर गोसाव्याकडे येते. तो यांस श्रुत करितो. तें वर्तमान आह्मांस नजबखानानीं सांगितलें. तेव्हां आमचे कर्ण सिथळ जाहले. परस्परें पातशहांस व नजबखानांस याप्रमाणें बातमी येते ते वेळेस हे ह्मणतात कीं, हे आपले सरकारच्या गोष्टी उजमाच्या सांगतात. परंतु तेथील लिहिणार लिहितात ह्या गोष्टी सत्य आहेत. याप्रमाणें इकडील जालेलें वृत्त श्रवण व्हावें ह्मणून विनंति लिहिली असे. व सेवटीं आह्मी यांसी बोलिलों कीं, इंग्रजाची नड कायम ठेवलियास आमचे सरकारचें नुकसान नाहीं, परंतु पातशाहीस ठीक नाहीं. तेव्हां बोलिले कीं, श्रीमंतही त्यांचे पारपत्यास सिद्ध होत आहेत व आम्हांस तेंच आपले मकदुराप्रमाणें कर्णें प्राप्तच आहे. वर्षाकाळानंतर श्रीकृपेनें सरकारचे फौजेसहित सरदार आलियास त्यांचेच विच्यारें जें कर्णें तें करूं याप्रमाणें यांसी पक्कें केलें आहे. पुढें इंग्रजांची यांची तुटातूट होऊन, त्यांचे प्रांतावर मोहीम करीत, तें करावयासी सरदारांस सेवकानें लिहिलें व पातशहा नजबखानाकडूनही लिहिलें व वचनीं गोविलें आहे. इंग्रजास चहूंकडून ताण बसल्यास जेर होतील. यास्तव एक सरदार मातबर एप्रांतीं पाठविणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

श्रीवरद.

लेखांक ८.

१७०२ भाद्रपद वद्य ३०.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विज्ञापना ऐसीजे:—ग्वालेरचे किल्यास्तव नजबखान बहुत कष्टी जाले व म्हणाले कीं, आमचे स्वाधीन करता तरी किल्ला तुमचा कायम राखिला जाता. आतां तेथें कोठी करून गोहद व झांसी उज्जनपावेतों प्रांत घेतील. वैजापूरकर रजपुतांनीं इंग्रजांकडून पैगाम केला आहे कीं, एक कंपू जैपुरास पोो, आह्मी पुढें प्रां घेऊं. टोंक वगैरे ठाणीं रजपुतांनीं सरदारांचीं घेतलीं. आमचें नांव केलें. शेवटीं आह्मांकडील महसुद अल्लीखान यांनीं तार्कीद करून रजपुतांकडून ठाणीं सोडविलीं असतां .... ठाणीं सोडून गेले.जागा खालीं पडल्या आहेत ह्मणून नजबखानानीं मजकूर हाही सांगितला कीं, हेदरनाईकाची फौज कांहीं इंग्रजाचे जिल्यास गेली होती, त्याची शिकस्त जाली, यास्तव आणिक फौजेस पाठविणार, भोंसले कटकाकडे गेले आहेत, परंतु कांहीं त्याजला जरब पोंहचली नाहीं, पुढें काय करतील व बातमी येईल ते सेवेसी विनंति लेहूं. याप्रमाणें उत्तर विनंति लिहावयास सांगितलें. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

श्रीवरद.

लेखांक ९.

१७०२ आश्विन वद्य ९.

पुा श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विज्ञापना ऐसीजे:—छ १९ साबानीं इंग्रजाकडील वकील फाजलअल्लीखान नामें कांहीं जाबसाल घेऊन आला आहे. तात्पर्य हेंच कीं, आमचे कोठीस दिल्लीस आगरियास जागा द्यावी व खर्चास दोन लक्ष रुा दरमहा घेत जावे. पूर्वील बंगालियाचें वर्षासनाचे बाकीचे शनि:शनि देऊं व कोठीस जागा द्यावी. याचे नजरेचें ठरावयासी वकील खानमा आला आहे.

पुढें जो अंतस्थ ठरेल तो शोध घेऊन सो पाठवितों. मुख्य गोष्ट पूर्वीपासून इंग्रज जागा कोठीस जैपूर दिल्ली आगरे वगैरे स्थलीं इच्छितात. आतां ग्वाल्हेर त्यांचे हातास गेली. याकरितां इंग्रज सर्वां स्थलीं अमल जाहालासें जाणतात. श्रीइच्छा प्रमाण ! यास्तव फौज या प्रांतीं जलदीनें आल्यास प्रिथ्वीपतीस खातरजमा होऊन इंग्रजासीं बिघाड करीत. हें स्थल सरकारचे व पातशाहाचे काबूंत राहतें, श्री स्वामीचे प्रतापें करो (न). कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ती.

श्रीगणराज.

लेखांक १०.

१७०२ कार्तिक शु॥ १२ पौ छ १९ जिल्काद.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

पो देवराव माहादेव कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ १२ जिल्काद स्वामीचे कृपेकरून यथास्थित असो. विशेष. कृपा करून पत्र छ १९ रमजानचें पाठविलें तें पावोन परम संतोष जाला. पत्रीं आज्ञा कीं, सरकारचा जाबसाल होणें यास्तव राजश्री पाटीलबाबाचा निरोप घेऊन पुण्यास येणें, ह्मणून पेशजी तुम्हांस लिहिलें होतें. परंतु त्याचें उत्तर न आलें. त्यांस, तुह्मीं कोठें आहां ? काय करतां, ? वर्तमान काय, ? तें सविस्तर लिहून पाठवावें, ह्मणून आज्ञा. त्यास, पुण्याहून स्वामीपासून आज्ञा घेऊन जांबगांवीं आलों, तेथून राजश्री पाटीलबाबाची स्वारी गुजराथ प्रांतीं जावयाची आली, ते साकल्य विनंति लिहिली. त्याचीं उत्तरें आलीं. आज्ञा येण्याविसीं जाली. त्याजवरून यावें. परंतु पांच वर्षें यांचे संग्रहीं राहिलों. त्यांणीं सरकारचे सनदेप्रमाणें दरमाह व आपले तर्फेनें विशेष करून वरात संवस्थान कोटें येथें करून दिधली. त्यास, पांच वर्षें जाली. पैशास ठिकाण नाहीं. पदरचे सुखीं आह्मीं कोणे प्रकारें व काय अवस्थेनें दिवस काढितों. ते अवस्था स्वामीचरणापासीं लोपली नाहीं. चार दिवस येथें काळ—हरणार्थ आलों तों येथील नेमणूक दरमाहाचा दरमाहा द्यावीसी केली. त्यास पांच वर्षें समूळ ठिकाण नाहीं. तेव्हां येथें लोकांचें देणें पोटामुळें जालें. कुटुंबसहित येथें फसावा जाला. निघणें संकट यास्तव कोंडाईबारीपर्यंत समागमें आलों. वरातीची ताकीद होऊन कार्य होईल. नित्य विनंति केल्यास उत्तर हेंच कीं, देवितों. ज्यांचें देणें तेंही लस्करांतच. त्यांचा आग्रह वरातीस ठिकाण लाऊन आमचा निकाल पाडून जावें. तेव्हां निरोपाय होऊन बारी उतरणें प्राप्त जाली. वरातीचें उत्तर निस्तोप होत नाहीं. हेंही होईना. वर्कड कोणी अनकूल होऊन, ममता धरून, हटकून कार्य करून निकाल पाडून द्यावा व साहुकाराचे संबंधानें च्यार गोष्टी बोलून करावें, तर अनुकूल होते ते देखील प्रतिकूल जाले. त्याचें कारण जालें तें जांबगांवाहून साकल्य विनंति सेवेसीं लिहिलीच होती. निरोपाय होऊन, गुजराथ प्रांत पाहून, संपूर्ण मुलुखगिरी, महर्घता, शरीरास समाधान नाहीं, हे सोसून मधें सोबत पाहून, हरएक ही प्रकारें च्यरणापासीं यावेंसें योजिलें. परंतु निर्फळ होऊन उज्जनपर्यंत येणें प्राप्त जालें. येथें ये तों दीड दोन महिने शरीरास पीडा प्राप्त प्राणांतिक झाली. स्वामीचे कृपें—करून

उलगडलों. संवस्थान कोटें येथील कमाविसदार येथें आले. नित्य ताकीदीनें हटाकितां, आज उद्यां करितां, आजपर्यंत झालें. शेवट प्रतिकूळ होते ते अनुकूळ करून वेण्यास, यांची मर्जी कायम करून देण्याविषईं जाण्यास प्रयत्न करितां, सांप्रत जाबसाल सोईस येऊन कमाविसदारास ताकीद मागील बाकी देण्याविषईं व पुढें चालविण्याविषईं जाली आहे. आतां कमाविसदाराकडून तजविजेनें साहुकारासीं गांठ घालून त्याची खातरजमा करून यावें, हें बाकी आहे, त्या उद्योगास लागलों आहों. स्वामीकडील सिफारस आणून कार्य करून द्यावें, तर तोही प्रकार येथें उपयोगी पडणार नाहीं. हें जाणून सेवेसी विनंति लिहिली. आपली हलाकीचें वारंवार वर्तमान लिहावें तर मर्जी दिक होईल कीं, वारंवार रड लिहितात. सेवकाचें लक्ष तों च्यरणापासीं, कीं कोणेही प्रकारें उलगडून यावें. आमचे भय—व्राता ईश्वरस्थानीं आपण. इह—लोकीं संवसार सर्व आज वीस वर्षें सेवकाचा स्वामिच्यरणाचे आधारावर. स्वामींनीं कृपा करून शरीर—संरक्षण व आबरू—संवरक्षण केलें व करितात. दैवदशा बलवत्तर आहे ! इतःपर मासपक्षांत सर्व कुटुंबसुद्धां देशास यावें, चिरंजीव आठा नवा वर्षांचा आहे, त्यास स्वामीचे शागीर्दीस म्हणून हातीं द्यावें, च्यार कामें अस्तील त्याचा मार्ग स्वामीचे मर्जीस येईल तैसा करतील, जमल्यास श्रीइछा म्हणून स्वामीची आज्ञा घेऊन एकाकी श्री कासीवास अथवा तीर्थवास करून जन्म सफल करावा, हाच निजध्यास. एविषईं विनंति समक्ष केलीच आहे. येणें करून * * * * * * यथास्थित स्वामिच्यरणाचें कृपेनें जालासा होईल, हा निजध्यास अहर्निशीं लागला आहे. येथील उलगडा पाडावा, परंतु स्वामीचे कृपेनें सांप्रत कांहीं सोईस आला आहे. मासपक्षांत निकाल पाडून, स्वार होऊन, यांची स्वारी जलदीनें जाल्यास यांजसमागमेंच येतों. कदाचित् दिवसगती खाले असल्यास विनंति लिहिल्याप्रमाणें येथील गुंता उरकून येतों. साकल्य च्यरणदर्शनाअंतीं निवेदन करीन. पत्रीं लिहितां विस्तार आहे तीर्थस्वरूप राजश्री पुरुषोत्तमपंतनानाकडील पत्रें व मुजरद कासद आला, त्याची रवानगी उदैक सेवेसी करितों. त्याजवरून साकल्य कळेल. त्यांचें संवंरक्षण व आमचें करणार स्वामी समर्थ आहेत. इतःपर सत्वर येतों. येथें एक एक वटका युगवत् जाते त्याचा विस्तार काय लि॥ ? विशेष काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हें विनंति. वेदमूर्त राजश्री गोविंदभट तात्या स्वामीस सा॥ नमस्कार विनंति. लिखितार्थ परिसोन कृपा करावी. येथून उलगडून निघावें व पत्राचें उत्तर पाठवावें, यास्तव उत्तर न लिहिलें. परंतु ग्रहदशा बलवंत. तरी आणखी मासपक्षाचा अवकाश पाहून उत्तर लिहिलें. अहर्णीसीं निजध्यास हाच आहे. हें अगर सत्वर कोणेही प्रकारें येतों, कळावें लोभ कीजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक ११.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:—

पो पुरुषोत्तम महादेव कृतानेक सा॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ ५ माहे जमादिलाखर मु॥ दिल्ली जाणून स्वानंद लिहिला पाहिजे. विशेष. छ १५ रा-

वलचीं पत्रें सरकारचे जोडीसमागमें पाठविलीं ते ॐ ५ आहे मजकुरीं पावलीं. त्यास,इकडील वर्तमान पैदरपै विनंतिपत्रें हजूर पाठविलीं ते पावून वृत्त श्रुत जालेंच असेल. हालीं वर्तमान तरीः पातशाहा व नजबखान दिल्लींतच आहेत. व राजश्री महादजी शिंदे शिपरीकोलारसेस आहेत. इंग्रजांचीं सा पलटणें ग्वालेरीचे व शिपरीचे दरमियान मुक्काम करून आहेत. इंग्रजांचे व यांचे लष्करांत महागाई आहे. पाटिलबावापाशीं इकडील रांगडी व देशची भारी फौज आहे. पुढें होईल ते विनंति लिहूं. वरकड वृत्त पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. नबाब नजबखान यांनीं स्वामीस पत्र लिहिलें आहे व पातशाचा शुका सो॥ पाठविला आहे त्यावरून वृत्त कळेल, उत्तरीं कृपा करून लिहावयास आज्ञा करावी कीं, लिहिलेप्रमाणें सत्वर अमलांत आणावें. म्हणजे लिहिल्याचें व सेवकाकडून वारंवार फौजेचा बोझ लिहिल्याचें सार्थक होईल. विशेष मर्जीस येईल तें ल्याहावें. सेवाश्रम केलियाचें सार्थक होईल तो ईश्वरकृपेनें सुदिन. विलायती आनारें या दिवसांत तेथवर गर्मीमुळें न पावतील, यास्तव रस काढून रुबा करून पा॥ आहे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक १२.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचें सेवेसीः—

विनंति ऐसीजेः पातशहा व नजबखान दिल्लींत आहेत. याजकडील सरदार मिरजा सफीखा नामें कुंजपुऱ्याकडे पाठविले होते. त्यांणीं गणपतसिंग जाटाचा मामला सहा लक्षांचा करून, त्याप्रों तीन लक्ष रुो वसूल घेऊन, त्याचे पुत्रास वोलीस ठेवून, त्यास वस्त्रें देऊन मार्गस्थ केलें. तीन लक्ष रुो राहिले ते किस्तीप्रों. येथील कलकत्त्याकडील बातमी आली कीं, मिस्तर इष्टीन यांस कांहीं नक्र होवून वेडा जाला. +++++++++++ याप्रों लेखन लिहून वर्तमान आलें कीं, इंग्रजांनीं वजिरास सांगितलें जे आमच्यानें तुमचा मुलूक राखवत नाहीं, तुह्मीं आपली फौज ठेवून मुलुकाचें संरक्षण करणें. त्याणीं उत्तर दिल्हें कीं, आमची फौज होती ते तुम्हीं खराब केली, आतां आह्मीं नवी फौज ठेवावी तरी आम्हांपासीं पैका नाहीं. याप्रों उत्तर देऊन, स्वार होऊन, सिकारीस गेले व कारभारी यास आज्ञा केली कीं, फौज मिळेल ते ठेवणें. याप्रों वजिराकडील वृत्त आलें तें श्रुत व्हावयास लिहों असे. इंग्रजाकडील जहाज कलकत्त्यास इष्टीनचे बदलीचा सरदार येत होता तें जहाज आंग्रे यांणीं मारिलें बुडविलें, हें वृत्त कलकत्तेकरानें श्रवण करून संतोषी जाले. पुढें येईल ते विनंति लिहूं. दर्शनलाभ होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद

लेखांक १३.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

विनतिपत्रीं आज्ञा कीं: नवाब नजबखान यांचें जाणें शिंद्याकडे न होय तरी कोण्ही उमदा सरदार त्याजबरोबर फौज पोत्ख सामान देऊन जरूर रवाना करावा, ह्मणजे तिकडील फौज मिळोन दुहिरी शहानें इंग्रेजी पलटणें शिकस्त होतील.

ह्मणून लिहिलें. त्यास, याअन्वयें लिहिल्याप्रमाणेंच बोलून, महमद बेगदानी ढवळपुरीं आहे त्यास पत्र व अनुपगीर गोसावी जैयपुरीं नजबखानाकडून मामल्याचे ऐवजास वसूल करावयास गेला आहे त्यास पत्रें नजबखानाचीं कीं, तुह्मीं आपले फौजेनसी सरंजामसुद्धां जाऊन राजश्री पाटीलबावास सामील होणें, व पाटीलबावाचे नांवें पत्र कीं, तूर्त दोन्हीं पथकें तुह्मांकडे रवाना केलींच आहेत ते येऊन सामील होतील. बादजबरसात शिखाकडील फौज रिकामी झाली ह्मणजे आह्मीही पातशहासहित बाहेर निघतों. याप्रमाणें तीन पत्रें तयार केलीं. इतक्यांत कलकत्त्याहून हालसाहेब इंग्रेज आला होता, त्याजकरितां ते पत्रें आह्मांपाशीं न देतां आपलेपाशींच ठेवून घेतलीं. आतां तो गेलियावर फिरोन हाटकिलें. त्यावरून पुन्हां पत्रें द्यावींसें ठरविलें आहे. पत्रें हातास आलियावर पाटीलबावाबरोबर रवाना करितों. परंतु हे इंग्रजास भितात. फार खुलून बोलत नाहींत. पुढें अमलांत येईल ते मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. भेट होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद

लेखांक १४.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पु॥ श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसी:—

विनंति कीं: पूर्वीं सरकारासी इंग्रजांनीं इमानप्रमाण देऊन किल्ले व प्रांत त्याणीं घेतला आहे तो सोडवणें मान्य केलें. व दोघे गोरे सरदार वोलीस देऊन चंदरका स्वामीपासोन घेऊन सुरतेस गेले व तेथें जाऊन करणेल गाडर इकडून गेला त्याचे विच्यारें फिरोन बेमानी केली. त्या वेळेस सोडिले यास्तव व त्यांचे बेमानीस्तव आजवर झुंज लांबले. तेच समईं मारून ताराज केले असते तरी जेरबंदी होती. या दिवसांत नजबखान पुसत होता कीं, पूर्वी श्रीमंतांचा त्यांचा कौल-करार कसला ठरला ? त्याचें उत्तर आह्मीं दिधलें कीं, त्याणीं इमान सोडल्याचा तपसील काय, त्यांचे दोघे गोरे सरदार आजपावेतों वोलीस आहेत, इतकें श्रवणांत आलें आहे. वरकड तपशील श्रीमंतांस लेहून पाठवायास आपले मर्जीप्रों लिहितों. इतकें बोलोन सेवकानें यांजला सांगितलें कीं, त्याची भानगड आपण करावया योग्य ते नाहींत. तेव्हां बोलिले कीं, त्यांजला शरमिंदें करावयास्तव व बेमानी त्यांची त्यांचे अंगीं लावावयास्तव तुह्मांस वर्तमान पुसिलें, तें तुह्मीं लेहून उत्तर आणावें. सलाह यास मारण्याची आहे; फौजेचे जोरानेंही मारावें व याजपासून रुो घेऊनही यास मारणें प्राप्त, हस्तगत करावा, तपसील कसकसा करारमदाराचा जाहला होता तो जरूर लेहून आणवणें कीं, असफद्दोला त्याचे इमानप्रमाणावर सर्वस्व गेलें असतां गाफील आहेत त्यांस फोडून आपले करून घेऊं, व पठाण रोहिले सिद्धच आहेत. याप्रों बोलोन सेवेसी ल्याहावयास सांगितलें, त्याप्रों लिों असें. उत्तरीं तपसील लिहिणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाो. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक १५.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पुं॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं:—गाडर वसईहून मगरूरीनें दहा बारा पलटणें, कवाइती, हजार गोरा, वीस पस्तीस तोफा, या सरंजामानिसी घाट चढून वर आला. त्याचे मुकाबिल्यास राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर व परशरामपंत वगैरे फौज व सरंजामानिसी होते. त्यास, इंग्रजांस मयदानांत काढून सजा करावी ही तजवीज होती. परंतु सरकारी फौजेचे लढाईचे मुकाबिल्यामुळें मैदानांत यावयाची जुरत न करतां घाटमाथां अडचणीच्या जागा पाहून राहिला. तेव्हां राजश्री परशरामपंत यांस फौजेसुद्धां घाटाखालीं इंग्रजांची रसद बंद करून महासरा द्यावयाकरितां पाठविलें. त्यास, परशरामपंत याणीं इंग्रजी रसद येत होती त्यास महासरा करून, सातआठ हजार बैल गल्याचें कुल लुटून आणिलें व कित्येक इंग्रेजी लोक यांस तंबी करून गारत केलें. याजउपरी पनवेलीहून पांच सहा पलटणें, आठ दहा तोफा, ऐसे सरंजामसुद्धां घाटरुखें गाडर याचे कुमकेस येतात, ही बातमी सरकारची आली. त्यावरून राजश्री हरिपंत यास बमय हुजुरात फौज, तोफा व गारदी घाटावर गाडराचे मुकाबिल्यास येऊन तुकोजी होळकर यांस बमय फौज सरंजाम घाटाखाले पाठविलें. त्यास तुकोजी होळकर व परशरामपंत याणीं पनवेलहून पलटणें येत होतीं त्यांस महासरा देऊन लढाई दिल्ही. होळकर याणीं शुतरनाळांची व करोलची गारगिरी दिल्ही व लढाई चांगली जाहली. इंग्रजांकडील कवायती लोक व गोरे पांच सहासें ठार, सिवाय जखमी जाहले. सरकारचे लोकही फार कामास आले. सेवटीं पलटणें झाडीचा आश्रय करून बहुत मुशकिलेनें गाडर याजपासीं जाऊन पोहोंचलीं. त्या दोहों दिवसांत हरिपंत याणींही घाटावरून निकड करून गाडरासी मुकाबिला केला. दुतर्फा लढाईची निकड बहुत जाली. रसद बिलकुल पोहोंचेना. तेव्हां बेताबा होऊन छ २३ रबिलाखर रात्रौ घाट उतरून × × × × × × × फौजसुद्धां घाटाखालीं गेले. येकीकडून हरिपंत याप्रमाणें व येकीकडून होळकर व परशरामपंत याप्रमाणें इंग्रजांसी दुतर्फा घेरून, दोन तीन लढाया निकडीच्या जाहाल्या. तोफा व बाणाची मारगिरी जाली. लोकांनींही घोडे घालून लगट फार केली. याजमुळें इंग्रज बहुत घाबरा जाहला. येक तोफ व बंदुका व दारूगोळ्याचे संदुक व छकडे, रथ वगैरे सरंजाम बेशुकर पाडाऊ आला. मिस्तर पारकल नामें गाडराचे बराबरीचा सरदार लढाऊ व तरतूदकार होता तो गोळीची जखम लागून जायां जाला. गोरे व कवायती लोक मिळोन सात आठसें पडले. सिवाय जखमीही बहुताद आहेत. सरकारचींही घोडीं व लोक बहुत कामास आले. शेवटीं गाडर ज्यान बच्याऊन पळाला. थोडका आसबाब पनवेलीदृच्यानें आसरियास जाऊन पोहोंचला. सरकारच्या फौजाही पनवेलीजवळ मुक्काम करून आहेत. तुह्मास कळावें ह्मणून लिहिलें असे. बादशहा व नबाब नजबखान यांसही कळवावें. इंग्रजांची शिकस्त श्रीमंताचे प्रतापेंकरून मोठी जाली व त्याचा नाशही फार जाला, ह्मणोन लि॥. त्यास आज्ञेप्रमाणें

या पत्राची फारसी करून पातशहास व नबाब नजबखानास सविस्तर मार समजाविला. वाचून बहुत संतोष पाऊन उत्तर केलें कीं, ईश्वर हमेश त्याप्रांेच श्रीमंताची फत्ते करो व इंग्रजांचा कदम पादशाहींतून निवून लयातें पावो. ह्मणून आशीर्वाद ममतापूर्वक देऊन नजबखानास आज्ञा केली कीं, तुह्मीही कांहीं उद्योग कराल किंवा नाहीं ? नजबखान यार्णी अर्ज केला कीं, तोफखाना वगैरे सर्व तयारी आहे, कुंजपुरीयाकडील फौज रिकामी जाली ह्मणजे सर्व गोष्टी मर्जीनुरूप घडण्यांत येतील. याप्रमाणें बोलिले. पुढें आमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. इंग्रजांचा निःपात करणियाची तदबीज नबाब बहादूर विशेषच सांगतात. परंतु स्वामीचे प्रत्ययास येऊन आह्माकडून लिहविलें व यांनीं सेवेसी लिहिलें तें खरें होय तो सुदिन ! कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक १६.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध १०.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति आमचें वर्तमान तरः—ज्येष्ठ शु॥ १० दशमीस यमुनास्नानास निंगबोधास गेलों होतों. त्यास, यमुनातीरीं, लतापत—अल्ली—खान ह्मणून खोजा वजीराकडील चों पलटणांनिसी पातशहाचे तैनातीस आहे त्यास, परस्परें कजिया माणसामाणसी जाला. त्याजकडील जमाव भारी. दोन माणसें मारलीं गेलीं. आह्माकडील एक खिसमतगार मारला गेला व प्यादा एक जखमी जाला व हत्तीस सात जखमा जाल्या व आह्मास च्यार जखमा जाल्या. भुंवईवर एक व हातावर एक व पोटावर एक व पाठीवर एक, ऐशा चार जखमा जाल्या त्यांत पोटावरील जखम भारी होती. परंतु आपले प्रतापें व पुण्येंकडून वांचलों. जखमा बऱ्या जाल्या. एक महिना मानसिक स्नान जालें. आतां स्नान करीत असतों. तात्पर्य, आज आठ दहा वर्षें जालीं, सरकारची फौज इकडे आली नाहीं आणि नजबखान बळावला. याजकरितां व इंग्रजी पलटणें पुण्यासमीप आलीं त्यांचें पारपत्य खातरखा न जालें व ग्वालेरीपासीं पलटणें आहेत त्यांचें पारपत्य अद्यापि खातरखा होत नाहीं, हा रंग रांगडे पाहून आपलाले ठिकाणीं बदमस्त जाले आहेत. कोण्हास खातरेस आणीत नाहींत. व आह्मापासीं जमाव तों तैनाती बाळाजी गोविंदाकडील सरकारांतून देविला तो त्यांनीं न दिधला. जुजबी माणसें व दक्षणी कोण कोठें आहेत, हाही मजकूर कोणाचे ध्यानांत राहिला नाहीं. परंतु या काळांत आपले प्रतापेंकडून पूर्वील पारटीवर भ्रम व सर्वांसी स्नेह आहे त्यावर जीव आबरू आहे. कपार्दिकेची प्राप्त याजकडून नाहीं इतकेंही असोन सरकारकामास्तव जडाव राखून आपली अब्रु रक्षून स्वामीचे नांवयशाप्रमाणें आजपावेतों श्रीनें रक्षिलें. पुढें पोख्तसर काम होऊन शत्रूचें पारिपत्य सेवकाचे हातें करविणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय. तो सुदिन. हे वि.

श्रीवरद.

लेखांक १७.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशी:—

विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ ५ जमादिलाखर मुक्काम दिल्ली स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असो. विशेष. कृपा करून छ १५ रबिलावलचें पत्र पाठविलें तें छ ५ माहे जमादलावली सरकारचे कासिदा—समागमें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, तुह्मीं पातशहासी व नबाब नजबखानासी बोलून इंग्रजांचे तंबीचा आहद—पैमान घेऊन पाठवणें, वरकड सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन यांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल ह्मणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें याजपासून आहद—पैमान सरकारचे नांवें लिहून घेतला आहे. त्याप्रमाणें राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें मागतों. पाटीलबावा यांनीं ग्वाल्हेर प्रांतीं इंग्रजाची लढाई मारली ह्मणजे याजवर दाब बसून पूर्वी कौलनामा लेहून दिधला आहे त्याप्रमाणेंच वर्तणूक करतील व सरकारचे सरदाराचे सामीलही होतील. वरकड सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन यांचे पत्रीं लिहिलें आहे त्यावरून श्रुत होईल. सदैव कृपा करून हस्ताक्षर—पत्रामृतीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत, दर्शनलाभ होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे. हे वि.

पैा छ १६ रजब सन

समानीन बा। सरकारची जोडी.

श्रीवरद.

लेखांक १८.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं, इंग्रजांचा सहवास नजबखानास बहुत. पादशाहींत त्यांचा कदम न सीरावा हें आहेच. श्रीमंत राव पंतप्रधान हजूरचे फिदवीयाची फते असावी हेंच रात्रंदिवस चित्तांत आहेच; यांत संवषय नाहीं. टोपीकराचे वकिलास रुकसत दिल्ही, हे फार नेक सलाह केली. तुह्मीं लिहिल्यावरून मूळीची व हजूरची इनायत याजवरून इकडील खातरजमा आहेच. सरकारचे सरदार आजपों पोंहचले असते. गुंता नव्हता. परंतु दरम्यान इंग्रजी पलटणें आलीं, तो शह पडला, ह्मणून दिक्कत पडली. याची तर्तूद अलाहिदा लिहिली, त्याप्रमाणें अमलांत यावें. ह्मणजे सर्व गोष्टींत उभयपक्षीं खातरजमा होवून, योजिली मसलत सिद्ध झाली. गाडर कोंकणांतून घाट चढून आला होता, त्यास सरकारचे सरदारांनीं शिकस्त दिल्ही. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे त्यावरून कळेल. ह्मणून लिहों. त्यास, आज्ञेप्रमाणें हा मार सविस्तर नजबखानास समजावून प्रसंग पाहून, संतोषातें पावले. तेव्हां बहुतेक मम तेनें पूर्वी वचनें दिधलीं आहेत तीं दुहराहून बोलोन त्याणीं उत्तर दिलें कीं, श्रीकृपेनें बादजबरसात काय घडून येतें तें प्रत्ययास येईल, इंग्रजांची व आमची बरोबरीची लढाई आहे, त्यास आमचा तोफखाना व पलटणें सन्मुख व तुह्मांकडील फौज करोलीस उपराल्यास असलिया सहा महिन्याचें काम आठ दिवसांत

फडशा करूं, इंग्रज काय वस्तु आहेत ? याप्रमाणें बोलून आपल्यास व श्रीमंत स्वामीस खलिता पत्रें दिल्हीं. त्याजवरून ध्यानारूढ होईल. पुढें अमलांत येईल तें मागाहून विनंती लिहूं. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक १९.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः--

विनंतिपत्रीं आज्ञा कीं, इंग्रजासीं बिघाड करून मसलत कर्णें. तेव्हां शिखासी बिघाड करावयाचा नव्हता. जाला असो. हालीं हरवजेनें शिखास सामील करून घ्यावें, ही मसलत फार चांगली. जरूर लिंहिल्याप्रमाणें अमलांत यावें. इंग्रजांचें पारपत्य केल्याखेरीज पातशाहींत कोणास चैन पडणार नाहीं, हें पुर्तें समजावें. याप्रमाणें बोलावें, म्हणून लिहिलें. त्यास, आपले आज्ञेप्रमाणें यांशीं भाषणें केलीं व लिखित केलें. याणींही पूर्वी गजपतसिंग जाट यास सर्जा-सफीखान याची फौज कुंजपुरियाकडे आहे, येथें धरून कैद केलें, याचा तपसील पूर्वीच विनंतिपत्रीं पाठविला होता. त्यास हालीं नजबखान याणीं गजपतसिंगास दिल्लीस बोलावून आणून, सा लक्षाचा मागला फडशा करून त्यास वस्त्रें व शिरपेंच, झालरदार पालखी याप्रों बहुत सन्मान करून, पुत्रास व त्याचे कारभारी यांस व भावाबंदास यथायोग्य वस्त्रें देऊन बोळवण्यांत आणिलें कीं शिखाचा मुलूक आहे तो शिखाकडे असावा आणि त्याणीं व तुह्मीं आपले फौजेनिशीं सामील असावें. ह्मणन पक्केपणें बोलून त्यास छ १५ रजबीं रुकसत करून कुंजपुरियाकडे मार्गस्त केलें. व यापूर्वी जाबेत-खानासही छ ५ माहे मारीं याच कार्यानिमित्त रुकत केलें. ते गासगडास गेले आहेत. त्यास जाबेत-खान व गजपतसिंग एकत्र होवून, शिखाशीं सलूख करून, तिकडील फौज मिर्जा सफीखान सुा रिकामी करून अंतर्वेदींत मेरट प्रांतीं छावणी करावी हा विचार ठरला आहे व तोफखान्याचीही तयारी आहे. बादज बरसात पातशहा सुा बाहेर निघतों, ह्मणोन आह्मांसी बोलतात; परंतु काबूचा रंग पाहून आहेत. अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होई तो सुदीन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २०.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः-

विनंतिपत्रीं आज्ञा कीः राजश्री बाळाजी गोविंद झांसीकर याणीं तुमचे गांवाविशईं ऐवजाविसीं जाबसाल केले त्याचा तपसील लिहिला तो सविस्तर समजला. ऐसियासी, येविसीं त्यांचे कारकुनास येथून निश्चून ताकीद केली, ह्मणोन पत्रीं लिहिलें. त्यास, सरकारांत हमेशा विनंतिपत्रें लिहितों. त्यांत एक पुरवणी नाइलाजास्तव आपले नादारीची लिहितच आहे, त्याचीं उत्तरें याप्रों त्यास ताकीद केल्याचीं येतात. परंतु कांहींही कमाविसदारांस ताकीद प्रत्ययास येत नाहीं. आणि आह्मीं येथें परदरचारीं पूर्वीपासून सरकारचा नांव-लौकिकनक्ष त्याप्रमाणें राहिलें पाहिजे. खांद्यावर धोत्र घालून राहिल्यास रूप नाहीं व वावगा

खर्चही नाहीं. परंतु बाह्य मात्र नीट राखणें प्राप्त, नेमणुकीप्रों खर्च ठेविला यास्तव कर्जदारी जाली. स्वामीनीं जहागीर बुंदेलखंडांत लावून दिधली. ते बाळाजी गोविंद याणीं उरई परगणा कालपीसमीप दहा कोस आहे तेथें विसा हजारांची कमाल-जमेची चाळीस वर्षें जालीं. जे गांव उज्याड पडले होते ते लावून दिल्हे. त्याची, आज पांच वर्षें जालीं, लावणी-जुगणीकरितां पांच सात हजार काचे बनारसचे जमेवर आले ते रो। दिल्लीचे बारा आणे होतात. या प्रकारें वसूल होत होता. त्यास, हालीं कालपींत इंग्रजांचा अंमल जाला. त्याजमुळें आमचेही गांवची बद-अमली होवून कपार्दिक यंदां पदरीं पडली नाहीं. व झांसीकरांनीं नगदी पांच हजार दो वर्षांपासून बंद करून गांव लावून दिल्हे होते तेही त्याणीं जप्त केले. स्वामीनीं फाजलापों उभयतां सरदारांवर निमे वरात दिल्ही कीं हरएक ऐवजीं रुपये देणें. त्यास, सरदारांनीं जेपुरावर पुढें वरात दिल्ही व निमे सरकारांतून जाटावर वरात दिल्ही. दोन जागा कमपेश तीस तीस हजारांच्वा वराता फाजलाप्रों व तलबाप्रों वीस हजार रुपये जाटावर वरात दिल्ही. येकूण कमपेश ऐशीं हजार रुपये वराता. ते दोनीं स्थलें नजबखानाकडे गेलीं. याप्रों अमदानीचा प्रकार आहे. तेव्हां आम्हीं काय करावें ? कर्ज कोठपावेतों द्यावें ? कर्जही कोणी देत नाहीं. बाळाजी गोविंद याजकडोन, झांसीकरांकडोन व बुंदेलखंडचे जहागिरीकडोन व फाजलाचे वरातीप्रों कोठूनही रुपये आल्यास येथें मागील देणें लोकांचें भारी जालें त्याप्रों वीस हजार तूर्त देणें जरूर आहे तें वारून सेवेसी येऊं. पुढें नित्यानीं पोटास पाहिजे व कर्जदाराचे तगादे सरवत याचा तपशील पत्रीं कोठवर लिहावा ? स्वामीधणी जर या समयासी आपणास खबर घेत नाहीं, तर प्राणासी गांठ पडली. येथून निघोन स्वामीपासीं येणें व येथेंही रहाणें कठिण जालें. या प्रकारची अवस्था येऊन लागली. तारणार स्वामीच आहेत. दुसरा आश्रय परमेश्वराचा किंवा स्वामीचा आहे. यास्तव निखालस फडणिसी दप्तरची वसुली जमेचे गांव देणें ह्मणून सनद पा। किंवा गांववसुली जमेचे हातास आले तर कर्ज तर्ही मिळेल व स्वामीस लिहिणें न पडे. सरकारांतून ऐवज बाकीचा येणें. त्याची वरात हरकसी जागा करून द्यावी कीं, रो। हातास येऊन कर्जदारापासून सुटका होय ते करणार स्वामी समर्थ आहेत. याद अलाहिदा पा। आहे. त्याजवरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होई तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २१.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पु।। श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी :—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं, हैदर-अलीखान-बहादूर याजकडील मार पेशजी लिहिण्यांत आलाच आहे. इंग्रजांस जरब त्यांनीं फार दिली. हालीं गंटूर देवाणापटण ह्मणोन बंदर-किनारा जागा अडचणीची आहे, तेथें जमीयतसुद्धां करनेल कोट आहे. हैदरखान यांनीं सभोंवता माहसरा दिल्हा आहे. बंदी केली. फरासीसही संजाम पोख्त जलद येणार. फरासिसाचें राजकारण खानाशीं पक्कें जालें आहे.

सरकारांतही फरासिसांचा शिलशिला अ-व्वलीपासून आहे. यामों तिकडील वर्त-मान आहे तुह्मीं हुजुरांत अर्ज करावा व नजबखान यांसही सांगावें. त्याचेही परभारें अखबारेवरून वर्तमान येतच असेल, म्हणून लिहिलें. त्यास आज्ञेप्रों पातशहास व नजबखानास हें वृत्त श्रवण केलें. ऐकून बोलिले कीं, या दिवसांत हैदरअल्लीखान याजपाशीं फौजेचा व पैक्याचा सरंजाम पोख्त आहे, त्यावरून सर्व गोष्टी अमलांत येत्यात. आह्मी बोलिलों कीं, सर्व गोष्टी मेहनतीच्या व जुरतीच्या आहेत, पूर्वी-पासून जो कोण्ही जुरत मेहनत करीत आला आहे त्यास मुलुकास व खजान्यास व फौजेस कमी नाहीं. म्हणून बोलिलों. त्यांचें उत्तर हेंच केलें कीं, सत्य आहे. याप्रों हरयेक समईं उत्तेजन देतों. आतां बादबरसात पातशहासुद्धां बाहेर निघतों, म्हणून आ-म्हासी करार करितात, व तोफखाना वगैरे सरंजामही तयार करितात, व कुंजपुरिया-कडील फौजही रिकामी करावया तरतूद केली आहे. परंतु अमलांत येऊन सरकारचे मसलतीस उपयोगी पडत, याच विचारांत रात्रंदिवस आहेत. अनुभवास येईल तें मागाहून विनंति लिहा. कृपा केली पाहिजे. दर्शन होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २२.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पुरुषोत्तम महादेव यांचें पत्र नानांस:-

विनंति कीं, महबुबअल्लीखान नामें खोजा वाजला जैपूर-प्रांतीं नजबखानांनीं पाठविले. प्रांत हस्तगत केलियावर यांची सरदारी मोडून अनुपगीर गोसावी यास ते प्रांतीं पाठविलें. यास्तव ते अजुर्दा होऊन मकाणास गेले. ५-७ लाख रुपये आपले पदरींचे खर्चून फौज जमा केली प्रांत हस्तगत केलेला गेला. पुढें याजपासून नाउमेद होऊन ते प्रांतीं आले आहेत. नजबखानांनीं बहुत मित्रता केली; परंतु न मानिलें. येथून चलते समईं स्वामीस विनंति लिहावयास सांगून पत्रें दिधलीं ते पाठविलीं आहेत. मर्जीस आल्यास उत्तरीं सनाथ करावें. वजिराकडील प्रांतास वाकी-फकार, व सिपाई, व सरदारीचा ठसा त्याच्याकडे कुरेप्रांतीं चाललाच आहे. यास्तव ममतेंत घेऊन स्वामीचे कृपेचे उमेदवार केले. त्यासी करार केला आहे कीं, मला पाहून स्वामीपासीं जाणें, तुमचे योग्यतेप्रमाणें मातबर सरदारी तुम्हांस पुढें पाठवून घेऊन जातील, व कांहीं फौजेची सरदारी देऊन अंतर्वेदीचे अथवा हरयेक जुजाचे कामास तुह्मांस पुढें करितील. याप्रों बोलून रवाना केलें. ते कदाचित् आपलेपासीं आले तर ममतापूर्वक आद-रसत्कार करून संग्रहीं ठेवावे. या प्रांतीं त्याचे सलुकानें शत्रूचें मातबर फुटून स-रकारचे अंकित होतील. पत्रोत्तरें पाठवावीं. त्याचे बंधू येथें आहेत त्याचेपासीं पावते करतील. म्हणजे खातरजमेनें सेवेसी येतील. श्रुत होय. या दिवसांत यशवंतराव वाघळे यांनीं जैपूर-प्रांतीं येऊन प्रांतांत दंगा केला. तेव्हां महाराज जैपूरकरांनीं फौज पाठवून जुंजांत धरून घेतले. त्यांचा पुत्र ठार जाला. दोनतीनशें घोडीं लूट राजे याचे घरीं पावली, व अंबरेचे किल्ल्या-वर राजे खुशाली-राम कैद आहे तेथेंच त्यासही ठेविलें आहे छ २ साबानीं कुवर-सेन नामें खत्री पूर्वीपासून पुणियांत आहे

त्यार्ची पत्रें नजबखान वगैरेस आलीं ते बजिनस धरून पाठविलीं आहेत तेथें शहरांत असतां इंग्रजांची वरिष्ठता लिहितो. याकरितां पूर्वीही पत्रें धरून घेऊन सेवेशीं पाठविलीं व हालीं पाठविलीं आहेत. नजबखानास अर्जी लिहिलीं आहेत त्यावरून वृत्तव्यंग लिहिलें तें श्रुत होईल. वरकडाचीं पत्रें आहेत त्यांचा विस्तार त्यांचेच पत्रांवरून विदित होईल. गरीब पोटार्थी आहे. यास्तव हरकोठें पांच सात रुो दरमा करून तेथून दूर ठेवावें. तेथें राहिल्यास स्वामीचें राज्य श्रीमहादेवाचें आहे, उत्कर्ष अधिक, गुह्य गोष्टही प्रकट होते, यास्तव लिहिलें असे. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. दर्शन-लाभ होय तो सुदिन. छ ११ साबानीं वर्तमान आलें कीं, राजश्री महादजी शिंदे यांनीं इंग्रजांची फौज मारून ताराज केली, हजार बारासें माणूस राहिलें तें दो ठिकाणीं कोंडिलें आहे. वरकड गोहदकर व भदावरकर वगैरे व त्यांचे लोक गछ करून गेले तें वृत्त शेवेसी पावलेंच असेल. ईश्वर स्वामीचा प्रताप अधिकोत्तर करो. दर्शन-लाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २३.

१७०३ ज्येष्ठ शुद्ध ६.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति कीं: इंग्रजांकडील वकील पेशजी आला होता व हालीं इंग्रज एक आला होता व हमेशा पत्रें चकत्या त्याजकडील येत्यात. त्यांचें परिमार्जन करून आपले सरकारचा स्नेह व ममता पातशहासी व नबाब नजबखानासी धरितां आजपावेतों ठेविली व पुढेंही स्नेहवृद्धीची पैबंदी करीतच आहों. हें वृत्त इंग्रजांनीं लखनऊस श्रवण करून, लताफत—अलीखान खोजा जो पलटणानसी पातशहाचे तैनातीस बजिराकडून येथें आहे त्यास सांगून पाठविलें कीं, फलाणे वकील दिल्लींत श्रीमंतांकडून आहेत ते पातशहाची व नबाब नजबखानाची मर्जी इंग्रजांकडे ठीक राहूं देत नाहींत, त्या अर्थी हरयेक बहाणा करून त्यांचें पारपत्य करणें, म्हणून खोज्यास पत्र आलें. त्यावरून माणसा माणशीं ज्येष्ठमासीं खटपट करून आह्मांवर हात घातला. हें वृत्त लखनऊस आपले सरकारचे परम स्नेही व त्याचे मु-साहेब आहेत यांनीं लिहिलें त्यावरून श्रुत व्हावयास लिहिलें असे. त्याचा तपसील पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. तात्पर्य, इंग्रेज ऐसे मात्रागमनी कीं, जीव द्यावयास देखील चुकले नाहींत. परंतु आयुष्य होतें व स्वामींचे प्रतापेंच वांचलों व पुढेंही रक्षणार स्वामींचें पुण्य समर्थ आहे! कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २४.

१७०३ श्रावण वद्य ११.

पु। श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं, नबाब नजबखान बहादूर याचा खलिता व पातशाही शुके नबाब निजामअलीखानबहादुर व खंडोजी भोंसले यांचे नांवें पाठविले ते

पावले. नबाब मौसूफ याचे खलित्याचा जबाब व सरकारांतून खात्रजमेची अर्जी पातशहाचे हुजुरांत व नबाब नजबखान बहादूर यांसी वजिरापों अलकाब तुमचे लिहिल्यावरून वाढवून खातरजमेचीं पत्रें मुजरद कासीद जोडीबरोबर तुह्मांकडे रवाना केलीं ते पावलींच असतील. त्याचीं उत्तरें पातशहाकडोन व नबाब मौसूफ याजकडोन सरकारची खातरजमा होयसी घेऊन पाठवावीं, ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रों पेशजींच पत्रांचीं उत्तरें खलिता व शुका पातशाही घेऊन पाठविलीं आहेत. ते हुजुरांत पावून वृत्त श्रुत झालें असेल. व रा॥ खंडोजी भोंसले व निजामअल्लीखान यास शुके पातशहाचे पाठविले. त्यांचीं उत्तरें पातशहास न पाठविलीं ह्मणोन पातशहा व नबाब नजबखान विस्मय करीत होते. त्यास, कृपा करून उत्तरें आणवून पाठवावयास आज्ञा करावी. प्रश्नोत्तरीं आज्ञा कीं, वरचेवर शुके व फर्मान भोंसले व निजामअल्ली यांस परभाराही पाठवणें. ह्मणोन आज्ञा. त्यास, उभयतांपासीं आपले सरकारचे मातबर कोण कोण आहेत त्यास पत्रें लिहूं. येथून शुके पत्रें फर्मान जें हस्तगत होईल तें पाठवूं. राजश्री देवाजीपंत भोंसल्याकडील दिवाण राजश्री खंडोजी भोंसले याजपासीं असेल तर त्याजपासीं पत्रें फर्मान पाठवूं. पूर्वीं शुके पाठविले त्याचीं उत्तरें आणवून पाठविणार व सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. तात्पर्य, पातशहास व नजबखानास इंग्रजांशीं मिळूं देत नाहीं. त्याजकडील पैगम लालूच दाखवून वरचेवर लिहितात. माणसें येतात. श्रुत होय. हे विज्ञापना.

श्रीवरद.

लेखांक २५.

१७०२ श्रावण वद्य ११.

पुा॥ श्रीमंत राजश्री नानां स्वामीचे सेवेसीः—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं: पेशजी कर्णेल गाडर कलकत्त्याहून आला तो सुरतेस होता. तेथून पाण्याचे मार्गे अडचणींतून आपले जमावानिसीं ममईस आला. ममईकरासी व त्यासी कोशल जालें. तेव्हां कोंकणांत वसईवर हंगामा शुरु करितील असे समजून, वसईत सरंजाम पाहिला होताच, आणखीही सरंजाम पोख्त करून मजबुदी केली होती. त्यास, इंग्रेज येऊन वसईस नमूद जाले. त्याजवरून सरकारांतून रामचंद्र गणेश बेहेरे फौज व सरंजाम किल्ल्याचे कुमकेस पाठविले कीं, एकीकडून किल्ल्याचा मार व दुसरीकडून फौजेचा महासरा, येणेंकडून मुखालिफ यानें आयास येऊन अंदेशांत यावें. त्याप्रों माघारनिल्हे फौजसुद्धां जाऊन पोहोंचले. इतकियांत हरामखोरांनीं वसईचा किल्ला इंग्रेजांचे हवालीं केला. या उपरांत रामचंद्र गणेश यांची वं इंग्रजांची लढाई चांगली जाली. ते लढाईंत खासा रामचंद्र गणेश कांहीं लोक कामास आले व इंग्रजांकडील कांहीं लोक व सरदार ठार व जायां जाले. त्यानंतर सरकारचे फौजेंत त्यांचे पुत्र माधवराव रामचंद्र होते ते फौजसुद्धां इंग्रेजांस महासरा देऊन राहिले होते. मागाहून राजश्री हरिपंत यांस बमय फौज हुजुरांत व तोफखाना व पायदळ बोरघाटाचे खालीं गाडराचे मुकाबिल्यास पाठविले. राजश्री तुकोजी होळकर इंदुरास होते त्यांस पत्रें

सरकारांतून पाठविलीं होतीं कीं, तुह्मीं आपले फौज– सरंजामसुद्धां निघोन, खानदेशांतील सुलतानपूर, नंदुरबार येथें केशवपंत दातार व रामचंद्रराव पवार दोन चार हजार फौज व दोन पलटणें इंग्रजी व तोफा असा जमाव करून हंगामा केला आहे. त्यांना गणेशपंत बेहेरे सरकारांतून फौजसुद्धां आहेत तेथें तुह्मींही येऊन, केशवपंतास तंबी पोंचून, दरमजल हुजूर यावें. त्यावरून होळकर बमय फौज व सरंजाम निघोन, नंदुरबारेस येऊन गणेशपंत बेहेरे व आपण मिळोन, केशवपंत याची तंबी करोन, दोन पलटणें गारद केलीं. च्यार तोफा व दोन हत्ती व दोन हजार बंदुका, घोडीं वगैरे सरंजाम पाडाव आला व चंद्रराव पवार ठार जाले. केशवपंत एकलाच पळून झाडींत गेला. उपरांत गणेशपंत यासी सुरत–प्रांतांत ताख्तोताराजी करावयास रवाना केलें. तुकोजी होळकर दरमजल हुजूर आले. श्रीमंतांची भेटी जालियावर राजश्री हरिपंत यांजकडे रा॥ केलें. ते बोरघाटावर जाऊन पोहोंचले. इतकियांत गाडर वसईहून निघोन बोरघाटाचे रोखें अडचणींतून येऊं लागला. तेव्हां राजश्री हरिपंत व पुढील फौज मिळोन, दोन टोळ्या करून, उर्फास महासरा देऊन तोफाचा मारा होत होता. परंतु तेथें मैदान नाहीं, अडचणीची जागा, फौजेनें निकड केल्यानें काम होणार नाहीं, सबब मैदानांत आणावयाचे तजावेजींत होते. इतकियांत इंग्रेज मगरूरीनें बोरघाट चढून घाटमाथां आला. त्यानंतर राजश्री परशरामपंत मिरजकर यांणीं, दहा हजार फौजेनिसी कोंकणांत इंग्रेजांचे पिछाडीस रसद बंद करून पायबंद द्यावयाकरितां पाठविले आहेत, त्यांनीं दोन हजार बैल गलुचाचे व किराण–बाबेचे छकडे वगैरे रसद जात होती ते माघन आणिली. घाटावरते इंग्रेजांचे मुकाबल्यास राजश्री हरिपंत व होळकर तीस हजार फौज व तोफखाना व पंधरा हजार पायदळ समेत आहेत. रोज लढाई सुरू आहेत. इंग्रजांकडील दोन तीन सरदार व कांहीं लोक गोळ्यांनीं व बाणांनीं ठार जाले. त्यांचे लष्करांत रसद पोंहचंत नाहीं. याजमुळें महागाई फार आहे. दहा अकरा पलटणें व तीस पस्तीस तोफा व एक हजार तुरुकस्वार याप्रमाणें त्यांचा सरंजाम आहे. घाटाखालीं व घाटावर सरकारी फौजा आहेत. सबब इंग्रेज बहुत फिकिरींत व अंदेशांत आहे. घाटावर ज्या अडचणींत राहिला आहे तेथेंच आहे. कुच करून पुढें येत नाहीं. राजश्री हरिपंताचे पुस्तगर्मीवर आह्मीही दहा हजार फौजेनिसी आठा दहा कोसांचे फासल्यानें आहों. ह्मणून लिहिलें तें सविस्तर अक्षरशहा फारसी करून पातशहास व नबाब नजबखानास येथें वर्तमान आगाऊ आलें नवतें तें समजाविलें. त्यास, हें वर्तमान ऐकोन आपली स्तुत तर्तुदीची बहुत केली कीं, आज आठ वर्षें जालीं, घरच्या धण्याचा फितूर व मुख्य धनी तो लहान नादान असें असोन, इंग्रेजांचें जुंज आजपावेतों मोडिलें व पुढें लढाईस मुस्तेद आहेत, हें काम दक्षणचे सरदारांचें कीं इतके दिवस ठरून राहिलें, ईश्वर कारभारी व सरदार मुत्सद्दी मौलतीस द्यावें तर यापों द्यावें ! ह्मणून बहुतप्रकारें स्तव करून बोलिले कीं, श्रीमंत माधवराव यांचे ताले सिकंदर कीं, हैदरनाईक जुंजास षरीक जाला, राजश्री नानानीं इतकी मेहनत करून दौलत राखली आहे त्यापों पुढेंही मजबूद असावें, व इंग्रेजांचे फंद फरेबांद येऊन त्यांसी सलूख किमपि न

करावा, कदाचित् इंग्रेजांनीं बदलून सलूक केला तरी पुढें सरंजाम करून प्रांत व्यावयासी चुकणार नाहीं, याजकरितां सलाहच आहे कीं इंग्रेजांस मारून त्यास नेस्त-नाबूद करावें, यांतच सर्वांचें रूप आबरू आहे, नाहीं तर जळचर पृथ्वीचे धणी जाले तर घोडयास पागोटयाची आबरू रहात नाहीं ! याप्रमाणें बोलून आपले ईश्वराचें नांव घेऊन श्रीमंतास आशीर्वाद दिधला कीं, ईश्वर त्यांस यश दे आणि इंग्रज नेस्तनाबूद होत, यांतच सर्वांचें कल्याण आहे ! याप्रमाणें भाषणें जालीं. व हेही बोलिले कीं, माधवराव जाधवराई कोण आहे त्यास इंग्रेजांचे बोलाविल्याप्रमाणें सलुकास पाा, त्यास काय ठरलें ? तेव्हां आह्मीं उत्तर दिल्हें कीं, सलुकास पाठविलें नसेल, यांनीं बोलाविलें असेल; तर त्याचा मनोदय व लांचीरुंदी पहावयासीं पाठविलें असेल. हें वृत्त आह्मास आलें नाहीं, लिहून उत्तर येईल ते अर्ज करूं ह्मणून बोलून सेवेसी श्रुत व्हावयासी विनंति लिा आहे. तरी कृपा करून जाबसाल काय लागला आहे ते लिहावयासी आज्ञा करण्यार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे, दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २६.

१७०३ श्रावण वद्य ११.

पु।। श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः--

विनंतिपत्रीं आज्ञा कीं:-इंग्रेजांचा कदम पातशाही मुलुकांत बहुत नादुरुस्त व त्यांची तंबी होवून खारीज करावें यांतच खैरीयत. सबब त्याचे तंबीचा नक्षा सरकारांतून ठरवात आला. व चहूंकडून इंग्रजांस तान बेवजे बसेल, तेव्हां हे शकल सलतनतीचे बेहबुदीची व पातशाहीचे दाब-रोबाची सरकारांतून अमलांत आली. त्याचा संतोष पातशहास व नवाब मौसूफ यांस चित्तापासून आहे. त्यापक्षीं सरकारची खातरजमा होय ऐसें आहदपैमान व्यावयास पशेपेश करणार नाहींत. या मसलतीविसीची खातरजमेचीं पत्रें इकडून पेशजी पाठविलींच आहेत. त्या बमोजी तुम्हीं त्यांची खातरजमा केलीच असेल. त्याजकडूनही पोख्तगीचे आहदपैमान घेऊन सरकारांत पाठवावें ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रों या पत्राचा मजकूर नवाब नजबखानासी बोलिलों. त्यांनीं उत्तर दिधलें कीं, याद कौलनाम्याची ठरवून दिधली आहे, ते तुम्हीं श्रीमंताकडे पाठवून त्याप्रो। कौलनामा लिहून आणवणें, म्हणजे आम्हीही लिहून देऊं. त्यांजवरून आह्मी उत्तर केलें कीं, पेशजी कौलनामा आपले मोहरेनसी लिहून दिधला आहे, तो असतां आतां दुसरी याद कौलनाम्याची लिहून दिधली त्याप्रों कैसा कौलनामा होतो, कदाचित् आह्मीं ती याद श्रीमंताकडे पाठविली तर श्रीमंत म्हणतील कीं तेव्हां नवाब दुसरे होते आणि आतां आणिक कोन्ही आहेत कीं काय, थोराचीं बोलणीं कांहीं दोन नसतात, जें जालें तें जालें, आतां आपण दुहराऊन गोष्ट बोलतां याजवरून श्रीमंताचे ध्यानांत आपलें काबुचीपण येईल, याजकरितां आह्मीं ती याद श्रीमंताकडे पाठविली नाहीं, त्यास ज्याप्रों पेशजीचा कौलनामा श्रीमंताचे नांवें दिल्हा आहे त्याप्रों। हलीं राजश्री पाटीलबावाचे नांवें लिहून द्यावा. म्हणून यांसी यथामतीनें बोलून, लाजवाब केलें. मग

उत्तर केलें कीं, दुसरी याद लिहून देतों. त्याप्रों लिहून आणवणें, तोंवर आम्ही आपली फौज लौकरच शिखाकडील मसलत आटोपून रिकामी करितों व तुम्हांस कौलनामा लिहून देतों, आणि पाटीलबावाचे शामिल फौज व आम्ही लौकरच होतों. ह्मणून धातुपोषणाच्या गोष्टी बोलून आम्हांस धंदरीं लाविलें आहे. परंतु यांचा भाव हाच आहे कीं, रा। पाटीलबावा यांनीं इंग्रेजांचें पारपत्य करून अंतर्वेदींत उतरले म्हणजे कौलनामाही लिहून द्यावा आणि आपण व फौजही शामिल व्हावें, ऐसा याचा मनोदय दिसतो. जोंपावेतों इंग्रेजांचें पारपत्य होत नाहीं, तोंपावेतों इंग्रेजांसी सिखली दुशमनी करावयास भितात. पुढें अंमलांत येईल ते मागाहून विनंती लिहूं. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २७.

१७०३ श्रावण वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:--

विनंतिपत्रीं आज्ञा कीं: रा। बाळाजी गोविंद यांस सरकारचीं ताकीदपत्रें परभारां पाठविलीं आहेत. त्यास, मारनिल्हे तुह्मांस ऐवज सत्वर क्षेप-निक्षेप देतील. म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास, पेशजी ताकीदपत्र सरकारचे मारनिल्हेचे नांवें आलें कीं, दाहजार रुो जागिरीचे कमतीचे ऐवजीं देणें. त्यास ताकीदपत्र व दोन कारकून व माणसें पाठविलीं. त्यास च्यार महिने पदरचे खाऊन त्याजपाशीं राहिले. पत्राचें उत्तर मिळणें दूर. संभूत जाबदेखील न देत. निदानीं उत्तर दिल्हें कीं, आह्माणासी खर्च भारी, मुलुकांत गढेमंडळेकराचा दंगा, याजकरितां पैका नाहीं. म्हणून उत्तर देऊन मार्गस्थ कारकून व माणसें रिकामीं आह्मांकडे पाठविलीं. त्यांस फौजेचा खर्च म्हणावा तर रा। बाळाजीपंत श्रीनगरी तीनसें पागेचे रावतानिसीं आहेत व गंगाधरपंत दोनशें स्वार पागेचे व दोनशें शिलेदार मिळून चौशा रावतांनिसीं कोचकनारग्रांतीं आहेत. आपले आपले ठिकाणीं स्वस्थ आहेत. या दिवसांत आपले ठिकाणीं हे आपल्यास चवव्या राज्यारजवाडयाप्रमाणें जाणतात. सरकारची आज्ञा यांचे ध्यानांत नाहीं. कोण्ही सरकारचे तर्फेनें जबरदस्त होवून येईल त्यासी बनेल त्या रीतीनें रजावंदी पैका देऊन करूं, ह्मणून विलग बोलणीं नानाप्रकारें बोलून झांसीकर व हे एक विच्यारें आहेत. या उभययतांपासीं फौज नाहीं. उगेच कमाविसदारी बहागे मात्र करून आपले ठिकाणीं आहेत. रा। महादजी शिंदे यांचे भेटीस देखील न गेले. पुढें जाणार आहेत. स्वामीनीं कृपा करून विसा हजारांची जागीर बुंदेलखंडांत देविली, ते मारनिल्हेना कमाल निम्मेची लावून दिधली. त्याप्रों आतां पांच हजार रुपये दिल्लीचे पदरीं पडतात. आणि येथें परदरबारीं राहणें खर्च भारी. रुपया खर्चास पुरत नाहीं. याजकरितां येथें पंधरावीस हजार कर्ज लोकांचें देणें जाहलें आहे. नित्यानीं पोटाचें संकट येऊन पडतें. कर्जदाराचे तगादे. या गोष्टीचा तपशील पत्रीं कोठवर लिहावा ? स्वामीचे प्रतापें व पुण्येंकरून आबरु व प्राण वांचले. नाहीं तर, ईश्वरें नेमिलें असेल तें घडेल. या समयांत सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. पूर्वी सेवेसी विनंति वैद्यरुे लिहिली कीं, बाळाजी

गोविंद रुो आह्मांस देत नाहीं, हुजूर घेऊन सेवकांस पाठवाल तर जीव आबरु राहील, स्वामीनीं त्यास ताकीद केली ते न मानीत, यास उपाय तेवेंत विनंति लिहितो. इतके आयास येऊन लिहावयास कारण, अवस्था परम कठिण जाली आहे. बाह्य आजपावेतों आपले कृपेनें जतन केला. पुढें कृपा करून संरक्षण करणार श्रीकृपेनें स्वामी समर्थ आहेत. लाइलाजास्तव विनंति लिहिली मान्य केली पाहिजे. येथून राजश्री महादजी शिंदे यांजपावेतोंही जावयास कर्जदाराचे ताडातोडीमुळें न बने. नित्याची संभूत चालवणें व ठरणें. उत्तरीं सनाथ कराल तोंवर ईश्वरें काय नेमिलें असेल तें होईल. श्रुत होय. स्वामीसेवेंत जीव शरीर अर्पिलें. अबरु रक्षणार मायबाप आपण दया केली पाहिजे. दर्शनलाभ घडेल तो सुदिन. हे विनंति. वरकड वृत्त वेदमूर्ति राजश्री गोविंद भटजीचे पत्रावरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २८.

१७०३ श्रावण वद्य ११.

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे: पूर्वी याजपासून कौलनामा लिहून घेतला आहे त्याची नक्कल व हालीं याणीं याद लिहून काढली आहे त्याची नकल, ऐशा दोनी नकला हिंदवी करून पेा आहेत, त्याजवरून ध्यानांत येईल. तात्पर्य, पहिले याजपासून लिहून घेतलें आहे त्या कौलनाम्यावरून अंतर्वेद सरकाराचे पदरीं पूर्ववत्प्रमाणें पडती. याजकरितां यांचा जीव इच्छित नाहीं कीं, याप्रोंच दुसरा कौलनामा राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें लिहून घ्यावा. प्रथम कौलनामा लिहून दिल्हा आहे, त्यांत शफत लिहून दिली आहे, तीस अंतर पडोन बेइमानी पदरीं पडते. याजकरितां इंग्रजांसी मिळूं सकत नाहीं. आणि आम्ही नि- त्यानीं तगादा करितों कीं, पाटीलबावा समीप आले होते, तुह्मींच चालून सामील ह्यावें किंवा आपली फौज त्यांचे सामील पाा. त्यास, ह्या गोष्टी ऐकोन टाळाटाळ करितात. त्याचें कारण हेंच कीं इंग्रेजांसी भितात. खोळून त्यासी विवाड करूं सकत नाहींत. अंतस्थ आह्मासी बोलणीं मात्र बोलून आजपावेतों बोलत गेले. व सरकारांतही लिहीत गेले. त्याप्रोंच आतां इकडून ठेविलें आहे. याचें मानस कीं, इंग्रजांचीं पलटणें पाटीलबावांनीं मारून अंतर्वेदींत उतरलेस व सरकाराची फौज व सरदार जबरदस्त पडलेस जाणतील तेव्हां सामील होतील आणि पेशजी कौलनामा लिहून दिला आहे त्याजवरच कायम रहातील. जोंपावेतों ग्वालेरप्रांतीं इंग्रेज आहेत त्याचें पारपत्य जहालियाखेरीज हे दिल्लीबाहेर निघत नाहींसें दिसतें. पहिलें वचन गुंतलें आहे, याजकरिता इंग्रजांसही सामील होत नाहींत, दोहींकडे स्नेह ठेवितात. परंतु अंत:कर्णपूर्वक इंग्रेजाचें पारपत्य व्हावें, म्हणोन कायावाचामनेंकरून याचें बोलणें शफतपूर्वक आहे. व पूर्वी कौलनाम्याप्रमाणें अंतर्वेदींतील माहाल मुलूक दिल्लीसमीप आहे तो जातो, ह्मणून आतां आशा उत्पन्न जाली आहे. धतूर्त यांची फौज शिखाकडेही अटकली आहे. याजकरितां दुसरेकडे खास करूं सकत नाहींत. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक २९.

१७०३ श्रावण वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:— विनंति ऐसीजे. येथून कासीद पत्रें देऊन रवाना करितो. त्यास तीन महिने होतात. परंतु अजुरा मिळून पत्राचे जाब सत्वर येत नाहींत. याजकरितां सेवकाचें चित्त बहुत साशंकित असतें. तरी कृपा करून अजुरा सत्वर कासिदास द्यावा. व उत्तर समर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ३०.

१७०३ श्रावण वद्य ११.

नवाब नजबखान बाहादूर याजकडून पूर्वी कौलनामा लिहून घेतला आहे, त्याची नकल.

श्रीमंत पंतप्रधानसाहेबासी व आम्हासी दोस्ती व इत्बात कदीम आहे, त्यांत किमपि अंतर नाहीं, ह्मणोन दुहराऊन कौलकरार दिनइमानची शपतपूर्वक लिहितों कीं, तुमचा मित्र तो आमचा मित्र, तुमचा शत्रू तो आमचा शत्रू. व आजपर्यंत जो मुलूक आमचे व आपल्या कबज्यांत आहे, त्यांत खलश रतीभर न व्हावा *

श्री.

लेखांक ३१.

१७०३ श्रावण वद्य ११.

नवाब नजबखान बाहादूर हे हालीं याप्रमाणें कौल लिहून देऊं ह्मणतात, त्याची नकल:—

१ मेरट वगैरे महाल व इटावा वगैरे माहाल व कड्याकुरा कदीम पातशाही भोजनखर्च व तोफखाना वगैरेचा तनखा आहे तें बदस्तूर आम्हांकडे असावें.

१ बंगाला वगैरे मुलूक कदीम पातशाही आहेत. दुशमनाकडून काढून बदस्तूर आम्हाकडे असावा.

१ सहारणपूर वगैरे मुलूक बदस्तूर आम्हाकडे असावा.

१ सिपारस जाटाची न करावी.

१ सुबे इलाहाबाद आमचा आहे तो बदस्तूर आम्हाकडे असावा.

१ नबाब वजिरांनीं मुलूक हालीं घेतला आहे. व कदीम आहे तो नबाब वजिराकडे असावा.

१ अहमदखान बंगश याचा मुलूक वजिरांनीं घेतला आहे. बंगश माराचा पुत्र चाकरीस हजर जहालियासी पातशाही बंदा आहे. वजिराची खातरदास्त त्याचा प्रांत सोडावा.

१ शिखांकडील मुलूख आमचा व तुमचा फौजेचे इतफाकानें हस्तगत होईल त्यांत निम्मे हिस्सा वांटून घेऊं.

१ ग्वालेरचा मुलूक इंग्रजांनीं घेतला आहे. त्यास, ग्वालेर किल्ला पातशाही आहे. तो बदस्तूर पेषकेष हजूरची करावी.

१ राजे जैपूर व राजे मारवाड कदीम बंदे पातशाही आहेत. हाली हजूर चाकरीस हजीर जाहालियासी आपले कदीम मुलकावर सरफराज रहातील. जर बागी होतील तर त्यांची तंबी करूं. जैयपूरचा मामला आह्मांकडे असावा व मारवाडचा मामला आपणांकडे असावा.

१ इंग्रजांनीं दक्षणचा मुलूक हालीं घेतला आहे व कदीम आहे त्यांत निम्मे वांटून द्यावा. श्रीमंत राजश्री पंतप्रधान.

---

* येथून पुढें मजकूर गहाळ जहाला आहे.

साहेबांचे खातरदास्त सुभेदारी श्रीमंत पंत-प्रधानसाहेबाची असावी.

१ सुभे अजमेर आपणांकडे असावा.

१ जो तुमचा मित्र तो आमचा मित्र, तुमचा शत्रू तो आमचा शत्रू, त्याची तंबी करावयासी अंतर करूं तर शफत असे.

१ राजे गोहदकडील व आणिक तिकडील मुलूक तरवारेचे जोरानें हस्तगत होईल. जर तिकडील राजे हजर जहालियासी मामला आह्मांकडे असावा. बागी जहालियास तंबी करून निम्मे मुलूक वांटून घेऊं. उमराव राजे तालुक्यांत शाहाचे बंदगींत हजर होतील, त्यांसी न बोलावें व अमुल हुकमी केलियास त्यांचे तंबीस शामील राहूं.

१ मुलूक कालपी व झांसी आपणाकडे असावे.

१ कोणी आमचा चाकर उठोन तुह्मांकडे जाईल त्यास तुह्मी चाकर न ठेवावा व तुमचा चाकर आह्मांकडे येईल तरी आह्मी चाकर ठेवणार नाहीं.

१ तूर्त तुह्मांस मोहीम रुबकर आहे. त्यास, हुजूरचे फौजा व खर्चास तुह्मीं द्यावें. पुढें हे करार असे कीं, आमची फौज तुमचे कुमकेस जाईल तरी तुह्मीं खर्चास द्यावें. तुमची फौज आमचे कुमकेस आली तर आह्मी खर्चास द्यावें.

छ २३ जमादिलाखर संवत् १८३८ सन २२ पातशाही.

श्रीवरद.

लेखांक ३२.

१७०३ श्रावण वद्य ११.

पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे. राजश्री बाळाजी गोविंद यांजकडून विसा हजारांचे जागिरीचे कमतिचें ऐवजीं रुपये दहा हजार देविले. त्यास लिहितां व कारकून पाठवितां थकलों. परंतु कवडी खर्च न पाठवीत. यास्तव येथून उलगडा पाडून स्वामीपासीं येणें दुस्तर जालें आहे. आपण कृपा करून त्यांचे वकिलास तेथेंच ताकीद होऊन रुो घेऊन पाठवाल तर जीवनोपाय. होईल तें करणार स्वामी समर्थ आहेत. व राजश्री रघुनाथ हरि यांजकडून सालाबाद पांचा हजारांचे नेमणुकीचे रुो ×××××. यांनीं या ऐवजास गांव लावून दिल्हे होते त्या ××× नें वसूल होत होते. ते घेऊन आजपावेतों सरकारांत विनंती न केली. हालीं माारनिलेनीं गांव जप्त केले. त्यावरून सरकारांत विनंति लिहिली. सरकारांतून माारनिलेचे नांवें ताकीदपत्र आलें तें त्यांजकडे पाठविलें. त्यांनीं साफ उत्तर दिल्हे कीं, झांसी तालुक्यापैकीं परगणे रा। पाटीलबावाकडे गेले, आतां राहिला मुलूक तो आह्मास किल्ल्याचे खर्चासच पुरत नाहीं तेव्हां सरकारच्या नेमणुका आह्मीं कोठून द्याव्या? याविषईंचीं पत्रें हजुरांतून पाठविलीं आहेत. तेथें ×××× नेमणूक करार होऊन येईल त्याप्रों ×××× धातुपोषणाची बोलणीं बोलून आमचे कारकुनास व माणसास बिदा करून दिधले. त्यास, या दिवसांत बुंदेले व झांसीकर आपणास जसे अवघे राजेरजवाडे तैसे आपण आपल्यास मोजितात व नानाप्रकारें वगना करितात. त्याचा तपसील पत्रीं काय ल्याहावा? तर कृपा करून बुंदेल्याकडील व झांसीकराकडील हजूरचे बंदोबस्त करून ऐवज घेऊन शेवकास पाठवितील तर येथील गुंता उरकोन. चरणदर्शन-लाभ घडेल ते करणार आना-

थाचे नाथ आपण आहेत. कृपा करून उत्तरीं पालन करावयास स्वामी समर्थ आहेत. दर्शन–लाभ होय तो सुदिन. हे विनंति.

श्रीवरद.

लेखांक ३३.

१७०३ श्रावण वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:–

विनंतिपत्रीं आज्ञा कीं: सरकारांतून उमदा सरदार बमय फौज पातशहाचे हुजूरांत येऊन पातशहांनीं व सरकारचे फौजेनें मिळून अंतर्वेद, बंगाला वगैरे मोहीम मातबर करावी, ऐसें होतें. परंतु प्रस्तुत बरसात दोन चार महिने राहिली आणि इंग्रजी पलटण जमा होवून शिकरीवर आली, त्याची तंबी करणें प्राप्त आहे, याकरितां राजश्री महादजी शिंदे व शिवाजी विठल मातबर फौजेनसी इंग्रजी पलटणाचे पारपत्यास गेले आहेत. या समयांत पातशहाची हुजूर फौज दहा बारा हजार बमय सरंजाम जंगी व एक सरदार बावकुफ याजपों रा॥ महादजी शिंदे यांजकडे येऊन मा॥निले यांनीं व त्यांनीं मिळून शिकरीवर पलटणें आलीं आहेत त्यांचें पारपत्य करावें. बरसातीस चार महिने अवकाश आहे, याजसंबंधें या पलटणाचें पारपत्य करून गारत करावें, हें नेकसलाह. याजकरितां तुह्मी पातशहास व नजबखानास मसलतीचे मार्ग बोलोन, फौज इंग्रजाचे पारपत्यास लवकर ये, ऐसें करावें. बरसात जालियावर मातबर मसलत करावी. तूर्त बरसातीस थोडे दिवस राहिलिया हें काम करावें. येणेंकरून फार चांगलें आहे. म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रों पातशहास व नवाब नजबखानास समजावून उत्तेजन बहुत प्रकारें दिल्हें कीं, तुह्मी श्रीमंतास पत्रें लिहीत गेला व आह्माकडून लिहवीत गेला, आतां तुमचे लिहिलेप्रों रा॥ पाटीलबावा आले आहेत; त्यांचे शामील आपली फौज पाठवावी. यांनीं उत्तर केलें कीं, उगेंच आह्मास कशास लाजवितां, आह्मांपासी फौज आहे ती शिखाकडे अटकली आहे तिकडून रिकामी जालियावर श्रीमंताचे मनोदयानरूप अमलांत येईल. म्हणून बोलतात. अनुभवास येईल ते मागाहून विनंति लिहूं. इंग्रेजाकडील रुो घेऊन त्यास शामील न जाले ते एक पातशहाचे भयानें व स्वामीचे सेवेंत वचनीं गुंतले आहेत, त्या शरमेनें आजवर राखिले आहेत. पुढें सेवकाचा पाय येथें ठरणें कठिण जालें व याजला त्याचें आश्वासन वरचेवर येतच आहे. ते बातनी ठेवून वारंवार यासी अर्ज करितों कीं पागोटियाची आबरू सोडून टोपी घालाल तर पुर्ती टोपी बसेल. तुमचे नसीबानें जुंज लागलें, नाहीं तर आजपावेतों दिल्लींत अंमल करते, आतां आपला नक्षा राखणें तर राजश्री महादजी शिंदे यांस शामील होणें, नाहीं तर आतां कळीच दाखवून पुढें ग्रास करतील तेव्हां पस्ताव कराल व आमचें बोलणें स्मराल, तें न करणें. असें प्रातःकाळ सायंकाल नित्यानित्य तऱ्हेतऱ्हेची ममता दृढ करून उत्तेजन देत आहों. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. ईश्वर सत्वर शत्रूचा नाश करो व स्वामीचा प्रताप अधिकोत्तर होई ते सुघडी. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ३४.

१७०६ वैशाख वद्य ११.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:–

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २४ माहे जमादिलाखर मुक्काम श्रीमथुरा जाणोन स्वानंदें लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष, पूर्वी छ० १७ जमादिलावलीं इकडील सविस्तर वृत्त विज्ञापना लिहिली होती. त्यावरून श्रुत जालेंच असेल. हालीं इकडील वर्तमान सविस्तर राजश्री नानाचे पत्रीं विनंति लि॥ आहे त्यावरून ध्यानास होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ती.

पै॥ छ २८ रजब सन खमस समानीन ज्येष्ठ मास.

श्री.

लेखांक ३५.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:— पातशहास मिरज्या सफीखान यांणीं विनंति केली कीं, आपण खासा स्वारी अगरियाकडे चालावें. त्यास पातशहांनीं उत्तर केलें कीं, तुह्मी एकांत एक नाहींत, या तुमचे भरवशावर निघोन येखादी मसलत करून फजीत व्हावें कीं काय ? त्याजवरून रदबदली होता सिलेमासको पातशाजाद्यासमाममें द्यावें, असें ठरलें. तेव्हां पातशाहा ह्मणू लागले कीं, मर्सी तुह्मी अंतर करूं नये. त्यांस मर्जा-सफीखान व अफरा—शाहाखान व अबदूल अमदखान व जेनुल—अब्दीखान व मेहेदी—कुलीखान कुराणावर मोहोरा करून दिधल्या कीं, आम्ही हजरतीशीं अंतर करणार नाहीं. त्याचे कुराणावर पातशांनीं मोहर केली कीं, आह्मी अंतर करणार नाहीं. यामों परस्परें शफत प्रमाण होवून शाहाजाद्यास समागमें घेऊन गेले. याचें कारण कीं, पातशहा सोडून दूर गेल्यावर पातशहानें दक्षण्यांसी किंवा इंग्रजासी किंवा शिखासी जाबसाल लावूं नये. कोणाकडून आमचें पारपत्य करील ह्मणोन् त्यांचे मनांत शंवशय येऊन, पातशाहाजादा आपले हातीं असावा व महंमदबेग हमदानी व राव राजा प्रतापसिंग जैपुरकर वगैरे किरकोळी राजेरजवाडे कोणी मानितात नाहींत, याजकरितां तारा समागमें असलियास सर्व आदब करून ताबेदारी करतील, हे जाणोन पातशाहाजाद्यास समागमें घेऊन गेले आहेत. त्यास आग्रियास गेलियावर महमद—बेगानें ताबेदारी केली तरी उत्तम, नाहीं तरी त्याचे पारपात्य करावें, हा एक विच्यार. व तो ताबेदारी होवून यांचे आज्ञेनरूप असल्यास, राजश्री पाटीलबावाची फौज हलकी असलियास, राव याजकडील जाबसाल लागलाच आहे. त्यामों राव यास सामील होवून पाटिलासी बिघाड करावा, हा एक विचार. जर पाटीलबावाची फौज भारी असली व न तोले, तरी त्याचे व पाटील याचे मध्यस्तींत पडून त्याचा यांचा सलोख करून देऊन ग्वालेरीचा किला व पहिला करार आहे त्यामों मुलुक पंचमहाल वगैरे राजश्री पाटीलबावास देऊन, त्यासुधां अंतर्वेदींत उतरून, पूर्वेस लखणऊकडे चाल करावी. हा एक विचार. व कोणासीही बिघाड न करितां यंदाचे साल अग्रियाचे किल्याचा व मुलुकाचा बंदोबस्त व सर्व सेवक आज्ञेंत येऊन व आपले घर रक्षून असावें. हाही येक विचार. असे च्यार विचार आपलें घरांत हामसिरा बेगम व घरचे कारभारी शिवराम वगैरेही ठरावून, येथून कूच करून, तोफखाना व फौजेसुद्धां

गेले आहेत. त्यास, अग्रियास गेलियावर कोणती गोष्टींतून दरपेश येईल व काय मसलत करतील तें प्रत्ययास आल्यावर विनंती लिहूं. व श्रीमंतसाहेबास व आपल्यास खलिते पत्रें स्नेहवृद्धीचे नजाब अफराशाबखान यांणीं लिहो आहेत. याचीं उत्तरें आपणही कृपा करून स्नेह-वृद्धीचीं पाठवावीं. बहुत काय लिहो ? कृपा केली पाहो. हे विनंति.

श्री.

लेखांक ३६.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंति ऐसिजे:- वाट-साहेब इंग्रजांनें हैदरनाइकाचे पुत्राकडील मामला तीन क्रोडीवर फैसल करून मदराजचे किल्याची लढाई महकुच करविली. व मुलूक हैदरनायकाचे पुत्रानें घेतला आहे तो याजकडे बदस्तूर बाहाल असावा याप्रमाणें फैसला करून, मदराज किल्यांतून कलकत्त्यास आला. मेघफाससाहेब यास फोडून वर्तमान सांगितलें. त्यांणीं उत्तर दिल्हें कीं, जे सर्वांचे मनास कबसलियांचे मनास आली ते गोष्ट आह्मांस मान्य आहे. हैदरनाइकाचे पुत्रासी सलूक कर्णेंच योग्य आहे, ह्मणोन बोलण्यांत आलें आहे. व महमद अलीखान, आरकाटचा सुभा, याचें पत्र कलकत्त्यास मेघफाससाहेबास आलें कीं, फौजेची व खर्चाची खबर घेता तरी हा सलूक रहातो, नाहीं तरी हैदरनाइकाचे पुत्र आल्यावर गालबा आहे, या दिवसांत खबर घेणें योग्य आहे. ह्मणोन लि॥ आहे. याप्रमाणें वर्तमान लेख लिहून आले त्याजवरून विनंति लि। आहे. बहुत काय लिहो ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

सेवेसी विनंति शेवक शंकराजी सखदेव कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना. लिहिलें परिसोन कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञप्ती.

श्री.

लेखांक ३७.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचें सेवेसी:-

विनंति ऐसीजे:- राजश्री पाटीलबावानीं आपलेकडून खिलत वस्त्रें रवाना केलीं बितपशील:-

१ मंजूर- अल्लीखान नाजर यासी छिल्लीस पाठविली साता पारच्यांची खिलत, वस्त्रें, मोत्याची कंठी, व जगा शिरपेंच, व हत्ती, व घोडा, व तरवार येणेप्रमाणें.

१ सीतलदास माारानिलेचा पेषकार. त्यासी पाचा पारच्यांची खिलत व जगा व शिरपेंच येणेंप्रमाणें.

१ हसन-रजाखान वजिराचा कारभारी. यासी पाचा पारचांची खिलत, वस्त्रें, व जगा, व शिरपेंच, येणेंप्रमाणें.

१ हैदर-मेगखान वजिराचा मुत्सिद्दियार. यासी साता पारच्यांची खिलत व जगा, शिरपेंच, येणेंप्रमाणें.

१ राजश्री सदाशिवपंत बक्षी पाटीलबावाकडील वकील. यासी पाचा पारच्यांची खिलत, वस्त्रें, व जगा शिरपेंच, येणेंप्रमाणें.

५

एकूण पाच खिलत रवाना केले आहेत. व या दिवसांत हापडसाहेब इंग्रेज, पारमरसाहेबाचा बदली, होवून मेघफासन-सा-

हेंच याजकडून कलकत्त्याहून लखनऊस आला आहे म्हणून वर्तमान आहे. पुढें विशेष वर्तमान ऐकिल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ३८.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:—महाराव निंबाळकर याची स्त्री आनंदीबाई राजश्री पाटीलबावाची बहीण याजसमागमें नवाब निजाम—अल्ली-खान यांजला खिलत, वस्त्रें सात, पारचे, व हत्ती—घोडा, व मोत्याची माळ व शिरपेंच व झगा बमय परगीरी व तरवार व ढाल येणेंप्रमाणें पातशाकडून राजश्री पाटीलबावांनीं रवाना केलें आहे. स्वामीस श्रुत होय. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ३९.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:—येथील प्रकार तरी: हिंदुस्थान नि:क्षत्री जालें. शीख आहेत त्यांत फूट आहे. कोणी कोणाचे स्वाधीन नाहीं. दबाव पडल्यास जमीदारी करावयासही लागतील. जेर—जबरदस्तीनें पे॥ तरी लुटीत फिरत आहेत. हें शिखाचें वर्तमान आहे. वजिराचा प्रकार म्हणावा तर इंग्रजांवर त्याची दौलत आहे. त्यास साप्रत्य इंग्रजांचा प्रकार हलका दिसतो. विष्टिन विलाइतीस गेला. त्याचे बदली बडे साहेब झणोन आले आहेत. याचा बंदोबस्त विष्टिनाप्रों नाहीं. वख्त नेकही पूर्ववत्प्रो। नाहीं. परंतु पहिली फरपट चालत आली आहे त्याजप्रों कारभार चालतो. व पातशहाचा प्रकार झणावा तरी, येक लाख तीस हजार रुो दरमहाचा चाकर आहे. तितका पैका अक्षत मरीद मिळाला झणजे त्यास एका गांवासीं व विघाभर जमिनीसीं गरज नाहीं. याप्रों हिंदुस्थानची अवस्था आहे. त्यास, अवघे हिंदुस्थानचे बंदोबस्ताचा वोझ येकल्या राजश्री पाटीलबावावर आहे. जितका बंदोबस्त यांचे जिवेंकरून नीतीनें कर्णे तो केला आहे व कराव्याचा तो करितात. परंतु यांचे पदरीं कोणी मनुष्य नाहीं कीं, यांचे सरदारीचा सरदारांतून मुलकी बंदोबस्त करून, पैका उत्पन्न करून, दौलत सांभाळी ऐसा मनुष्य नाहीं. याजकरितां स्वामीस सूचनार्थ विनंति लि॥ आहे. जो प्रकार दृष्टीनें पाहिला आणि प्रतियास आला, तो जाणोन विनंति लिहिली आहे. पुढें उत्तम जाणतील ते करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिों ? कृपा केली पो. हे विनंति.

श्री.

लेखांक ४०.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:—राजश्री कृष्णराव गोविंद याचे पुत्राकडे उदेपूरचा कारभार होता. तो त्याजकडून काढून राजश्री बाळाजी बल्लाळ काटेकर याजपासून पाऊण लक्ष रुपये घेऊन त्याजकडे उदेपूरचा कारभार सांगितला. त्यास हत्ती, घोडा, शिर-

पेंच, गांव, वस्त्रें, येणेंप्रों देऊन सन्मान करून, बिदा केलें आहे. परंतु कागदापत्राचा बंदोबस्त होणें म्हणून राहिले आहेत. आठा पंधरा रोजांनीं जाणार. बुंदी, कोटे, उदेपूर, ऐशा तीही संस्थानच्या मामलती व चवथाईचे अमलाचा मामला माारनिलेकडेस करार जाली. मागील हिशेबाचे कांहीं फडशे जाले. कांहीं शेष बाकी फडशा होणें आहे तो करून जाणार. व रामगडाकडे रायाजी पा।। फौजसुद्धां गेले आहेत, त्यांनीं कोळेचे शहरांत ठाणें बसविलें. तेथें दोन पलटणें, चाळीस तोफा होत्या त्यापों एक पलटणवाला फुटून याजकडे जाबसाल लाविला. त्याची खातरजमा रायाजी पा। याणीं केली. त्यानें कोळेचे दोन दरवाजे उघडून दिल्हे. त्या मार्गे याजकडील फौज व पलटणें आंत शिरून, एका पलटणासी लढाई होवून, याजकडील जखमी व जाया च्यारसें माणूस जालें. पलटण पळून गेलें. चाळीस तोफा वगैरे सरंजाम सरकारांत आला. मौजे कोळे येथील ठाण्याचा बंदोबस्त करून, रामगडास वेरा घालून, रायाजी पा।। आहेत. कांहीं कांहीं दिवसा रामगडही खालीं होईल. आंत जमादार व पलटणवाले आहेत, त्यांत फूट आहे. त्याजकडीलही बोलणीं लागलीं आहेत. प्रत्ययास येऊन गड खालीं जालियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४१.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु।। श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः मोहरसिंग शीख यांस रावराजा प्रतापसिंग याजवर तनखा करून पत्रें दिधलीं आहेत कीं, पावणे तीन लक्ष रुपयांचे प्रगणे जैपूरपैकीं लावून देणें. म्हणून पत्रें लिहून देऊन करारमदार जाला कीं, पातशाही खालशाचा मुलूक आहे त्यांत धामधूम करूं नये. व राखी घेऊन ठेवलेंप्रों वर्तणूक करून जैपूरचे महालीं रावराजाकडील देईल तो ऐवज घेऊन स्वस्थ असावें. सरकारचा अंमल सरहिंदेकडे जाईल त्या समई पांचा हजारा स्वारांनसीं समागमें असावें. तिकडील मुलूक सुटेल त्याप्रों दहा लक्षांची जागा आणिक लावून देऊं. म्हणून करारमदार होवून, त्यास वस्त्रें देऊन, बिदा केलें. त्यास मोहोरसिंग व कुज्यासिंग हे दोघेजण लष्करास असतां, याप्रों बोलणें बोलत असतां, व सरंजाम लावूं देणें व दिल्हा ऐसें असोन, यांचें निसबतीचे शीख अंतर्वेदींत मेरटेकडे जाऊन दर रुपयास दोन आणे येणेंप्रों तमाम अंतर्वेदींत तहशील केली व करितात. याप्रों वर्तमान आहे. मुलूक मोठा. कारभार मोठा. परंतु अद्यापि खातरखा बंदोबस्त नाहीं. प्रत्ययास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४२.

१७०६ आषाढ वद्य ११.

पु।। श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः बाबाराव नामें गृहस्थ नवाब निजाम अल्लीखान यांजकडून राजश्री पाटीलबावाकडे वकिलातीस आले आहेत. यांचें कारण कीं, हैदराबादे-

पलीकडे सरहदेस कांहीं नवाबाचे प्रगणे आहेत ते इंग्रजांनीं पूर्वी इजारा करून घेतले होते. त्याचा पैका प्रथम दिल्हा, आतां देत नाहींत. हिसेब करितां येक करोड सत्रा लक्ष रो इंग्रजांकडून नवाबाचे निघतात. त्यास, इंग्रजाचा सलूक श्रीमंतासी राजश्री पाटील यांचे विद्यमानें जाहला आहे, यांचा इंग्रजाचा स्नेह आहे. ह्मणून याजकडे आपला गृहस्थ जाबसालास पाठविला आहे कीं, याचे हातून कांहीं सामदामानें इंग्रजाकडून ऐवज पदरीं पडला तर उगवून द्यावा. म्हणून याजकडेस पाठविला आहे. त्यास, राजश्री पाटीलबावानीं इंद्रसेनासी बोलून आपलीं पत्रें व इंद्रसेनाचीं पत्रें कलकत्यास पाठविलीं आहेत. तेथून अद्यापि जाबसाल आला नाहीं. म्हणून बाबाराव रा पाटीलबावापासींच आहेत. त्यास, यासी व नवाब निजाम अलीखान यासी स्नेहवृद्धि व्हावी म्हणून हत्ती एक व घोडा एक व मोत्याची माल व झगा, सिरपेंच, किनखाप साहा व शालजोडया ६ व तरदाम बंगाली थान ६ व फुलचरी बदामी थान ६ व तीन हजार रो नख्त दिल्हे कीं, बऱ्हाणपुरीहून शेला पागोटीं कच्च्या रंगाचीं बऱ्हाणपुरीं घेऊन जावीं. म्हणून कारकुनास आज्ञा. नवाबाकडील मुखत्यार कारभारी यास घोडा येक व किनखाप ४ व शालजोडया ४ व तरदाम ४ व फुलचरी ४ व मोत्याची कंठी व झगा, शिरपेंच येणेंप्रों सरंजाम आपला कारकून समागमें देऊन रवाना केला. व याची बहीण आनंदीबाई महाराव निंबाळकर यांस दिल्ही होती, ते याचे भेटीस आली होती. तीस या प्रांतीं पन्नास हजार रो कर्ज जालें. त्यास ते याची आज्ञा घेऊन माघारा जाऊं लागली. ते समईं पन्नास हजार रुपये सावकाराचे वारून, पंचवीस हजार रुपये मार्गीं खर्चास देऊन बिदा केली. ते ग्वालेरीसमीप जाऊन मृत्य पावली. तिच्या नाती दोघी मुली समागमें होत्या व सरंजाम सुखरूप देशी कल्याणराव कवडे याजपाशीं जाऊन पोहचावा ह्मणून येथून कारकून बिदा केला आहे. तो पावता करील. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

लेखांक ४३.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक शंकराजी सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ ९ माहे मोहरम जाणून स्वानंदलेखन-आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीनीं कृपा करून छ २६ जिलकादचें पत्र पाठविलें तें पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. इकडील वृत्त पेशजी छ १९ व छे २१ जिल्हेजचीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत ते पावून सविस्तर श्रुत जालेंच असेल. हालीं वर्तमान बारीक गोठ आमचे यजमानाही विनंति लिहिली आहे त्याजवरून ध्यानारूढ होईल. येथील देणें राजश्री पुरुषोत्तमपंत नाना यांचे हातचें याचा प्रकार पूर्वी दोन च्यार वेळां विनंति लिहिली होतीच. राजश्री देवराव—तात्यास राजश्री गोविंदरावानीं लिहिलेंच आहे. त्यास तेंच पत्र बजिन्नस आपणास दाखवितील किंवा विनंति करितील, त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना.

श्री.

लेखांक ४४.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:— पो गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक सां॥ नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ ९ माहे मोहरम जाणोन स्वानंद—लेखनाज्ञा केली पो. विशेष.आपण छ २६ जिलकाद-चें आज्ञापत्र पाठविलें तें छ ३० जिल्हेजीं पावोन सनाथ जहालों. पत्रीं आज्ञा कीं, पातशहा अग्रियास दाखल जहालेच आहेत, तेथून पुढें गेले किंवा तेथेंच आहेत तें ल्याहावें, व राजश्री महादजी शिंदे यांच्या व पातशहाच्या भेटी कधीं होणार, शिंद्यास येथून वरचेवर लिहीत जात असतात, तुह्मींही होईल ते मजकूर माारनिल्हेस वरचेवर सुचवीत जावें, ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास,आज्ञेप्रों विशेष वृत्त आढळल्यास पा॥ बावास लिहितों व श्रुत करीत असतों. इकडील बारीक—मोठें वृत्त छ १९ व छ २१ माहे जिल्हेजीं पै दरपै विनंतिपत्रें पा॥ तीं पावलीं असतील. त्यावरून श्रुत जालेंच असेल. हालीं वर्तमान तर महमद बेग हामदानी यास आणून कैद केलें आहे. त्याचा असबाब तोफा पंचावन्न व हत्ती बारा १२ वगैरे सरंजाम होता त्याप्रों कांहीं राजश्री पा॥बावानीं आपले सरकारांत घेतला. कांहीं हिंमतबहादुर याजकडील तोफा महमदबेगानें पेशजीं लुटून नेल्या होत्या त्या त्यास दिधल्या. राहिला सरंजाम . अफराशाहाबखान याचा घरचा आहे. त्याजपासून कांहीं पैका घेणें. त्याणीं राजश्री पा॥ बावाशीं करारमदार केला आहे कीं, आमची सरदारी आह्माकडे असावी. त्यावरून करारमदार करून त्याचे पुत्रास सरदारी करार केली आहे. त्याचें नांव हुसेनुद्दोला बाहादूर. महमद-हुसेनखान गालबज्यंग ह्मणून किताब देऊन वस्त्रें मातम पुरसीचीं व पैका आणावयास अलिगडास माणसें पा॥ आहेत. व तो मूल तीन वर्षांचा आहे, त्यासही लस्करांत बोलाविलें आहे. व मोगली वगैरे सरदार यास हिंमतबहादर आणि नारायणदास यांणीं जाबसाल लाविला आहे कीं, तुह्मी बहुता दिवसांपासून सरंजाम खातां, आतां कांहीं पैक्याची तुह्मीही कुमक करावी, म्हणून महमदबेगसुद्धां जितके सरदार मोगली वगैरे आहेत त्यांस तगादा आहे. त्यांचे लष्करचे असल्यास रा॥ पाटीलबावांचीं पलटणें व फौजेचा चौका आहे, तेही पासीं आहेत. हिंदुस्थानचे यवनाच्यासिवाय पातशाहात शांत जहाली ! कांहीं त्यांत जीव राहिला नाहीं ! पातशहाची मर्जी सर्व प्रकारें राजश्री पाटीलबावाकडे मुतवजे आहे. छ ४ तारखेस पातशहासी व राजश्री पाटीलबावासी खलबत जालें. पातशहानीं आज्ञा केली कीं, तुह्मी आमचे घरची मुख्त्यारी कबूल करा. याणीं उत्तर दिल्हे कीं, ताजियाचे दिवस आहेत, गेलियावर विनंति करीन. म्हणून बोलून आपले डेरियास आले. पुढें अंमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४५.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:— नबाब अफराशाहाबखान मारला गेला त्याचा आरोप जैनूज

अहदीखान याजकडे आला. त्यावरून त्यास कैद करून, गाढवावर बसवून, तोंड काळें करून, लस्कराचे आसपास फिरवून, भीक मागवून, कैद करून, ग्वालेरीस पाठविलें. दुसरें खुशालराम वकील राजे जैनगरकर याचा लष्करांत होता तो पेशजी रावराजा प्रतापसिंग याचे दुंबाल्याची दिवाणगिरी मुखत्यारी करून होता. अलीकडे नजबखानासी मिळून मागें रावराज्यास लुटविलें होतें म्हणून त्याची व याची आकस होती. त्यास एका ×× यानें मारून टाकिलें तो ×××× व राजा प्रतापसिंग याचे दुमेवर आला त्याजवरून त्याचे लस्करावर दोन हजार फौजेची चौकी राजश्री पाटीलबावानीं पाठविली आहे. पुढें जें ठरेल तें विनंति लिहूं. तात्पर्य; पैका मेळाव्याचे दिवस आहेत. श्रीमंत राजश्री पंत–प्रधान–साहेब दैववान आहेत कीं, त्यांचे प्रतापें यश सेवक लोकांस यत्न न करतां येतें. ईश्वर त्यांस सलामत बेसलामत राखो आणि दिवसेंदिवस अधिक प्रताप होवोत. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४६.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:–

विनंति ऐसीजे: छ २६ माहे जिल्हेजीं पातशाहा आग्रियाहून कुच करून शिल्लक किस्ती दर–गावास भरती करून, मौजे फत्तेपूरसमीप लस्कर अफराशाहाबखान यांचें होतें तेथें दाखल जाले. राजश्री पाटीलबावा भरतपुराचेनजीक होते, तेथून कुच करून पातशहाचे लस्करासमीप आठ कोसांवर येऊन मुक्काम केला. छ २९ रोजीं मिरजा अकबरशाहा यास पातशहानीं नबाब बहीरमखानास समागमें देऊन सामोरा पा' राजश्री पाटीलबावानीं आपले लस्कराबाहेर डेरा उभा केला होता तेथें अकबरशहास बसविलें. एक हत्ती, एक घोडा, सात किरमिजी पोशाक वस्त्रें, व एक खिरमी जवाहीर व एकशें एक मोहोरा नजर व हामराही सरदार राजश्री कृष्णाजी पवार वगैरे याणीं माफक मरातब नजरा देऊन, त्याजसमागमें पातशहापाशीं येऊन, पातशहाची मुलाजमत जहाली. पायावर डोई ठेवून एकशें एक मोहोर नजर केली. पातशहाजाद्यास पांच मोहरा नजर केल्या. याजसमागमील सरदार कृष्णाजी पवार आदिकरून किरकोळी होते, त्याणीं माफक मरातब अवद्यांनीं नजरा केल्या. राजश्री पाटीलबावा यांचे पाठीवर पातशहानीं बहुत ममता–पुरस्कर हात ठेवून आज्ञा केली कीं, तुह्मी उरुबरा बसा. त्याजवर राजश्री पाटीलबावा बसले. पातशहानीं पारच्या खिलत, जगा बमय, परगीरी व शिरपेंच व मोत्यांची कंठी व हत्ती, घोडा, तरवार, ढाल, येणेंप्रों सन्मान केला. हामराही कृष्णाजी पवार वगैरे सरदार होते त्यांस खिलत पांच पांच पारच्याचे, बमय, शिरपेंच व जगे सुध्धां सुमार खिलत ५० पन्नास व दुशाले सुमारें दीडशें व गोशवार दीडशें व येणेप्रों तरवारीचे कबजे च्यार व वस्त्रें देऊन, सन्मान करून, दोन घटका पातशहासी खलबत करून, रुकसत होवून, आपले डेरियास जाऊन, पातशाचे लष्करचा व अफराशहाबखानाचे लष्करचा बंदोबस्त आपलीं पलटणें बसवून केला. शिवाय पाटीलबावाचे परवानगीशिवाय इकडून तिकडे जाऊं पावत नाहीं. पातशहाचे

लष्करचे लोक अफराशहाबखानाचे लस्करांत कोणी जाऊं पावत नाहीं. याप्रों बंदोबस्त करून पैका करारापों आणवण्याचा तगादा आहे. पुढें पातशहाचे विच्यारें राजश्री पाटीलबावा मसलत ठरवितील ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाो हे विनंति.

श्री.

लेखांक ४७.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे: छ ३ मिनहूस पातशहा, अफराशाबखान याचे लस्करांतून कूच करून अंबाजी इंगळे याचे व पाटीलबावांचे लस्कराचेमधें जाऊन मुकाम केला. डेरियास दाखल जाले त्यासमयीं राजश्री पाटीलबावांनीं एकवीस मोहरा नजर केल्या. पाटीलबावांचे लस्करांत पातशहा दाखल जाले. हिंदुस्थानी लस्कर दरोबस्त एकीकडे आहे. पाटीलबावा, पातशहा, अंबाजी इंगळे ऐसे एकीकडे आहेत. या नक्षानें मुकाम करून आहेत. च्यारशे तोफा व दहा हजार स्वार व तीस पलटणें एकूण चाळीस हजार स्वार प्यादा, विना तलवार पादाक्रांत होवून जैसी पाण्यांत माती पडून विरून जाती त्याप्रों यवनाचे फौजेची अवस्था जाली आहे. कोणी कोणांत मिळत नाहींत, याप्रमाणें जालें. पुढें अमलांत येईल ते विनंती लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४८.

१७०६ मार्गशीर्ष शुद्ध ११.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंति ऐसीजे:—इष्टिन साहेब इंग्रेज पातशाहाजाद्यास घेऊन श्रीकाशीस गेले. हें वर्तमान विलायतेस कंपनीनें ऐकून इष्टिनास पत्र लिहिलें कीं, तुह्मी हिंदुस्थानचे पातशाहाजादा समागमें घेऊन येतां, त्यास तुमचा काय इरादा आहे ते लिहून पाठविणें, एकतर दक्षणी सरदारांचा आमचा सलुक जाला आहे आणि त्यांचे मर्जीशिवाय त्यांसी बदसलूकी करून पातशहाजाद्यास विना त्यांची मर्जी घेऊन आला हें ठीक नाहीं, तर देखत—पत्र पातशहाजाद्यास माधारा रा॥ पाटीलबावापासीं बिदा करणें, ते पातशहास विनंति करून पातशाहाजाद्याची तकसीर माफ करून त्याचे स्वाधीन करितील, तुह्मी या बखेड्यांत न पडणें. म्हणून लिहिलें होतें. त्याजवरून इष्टिन इंग्रेज यानें पातशाहाजाद्यास समागमें दोन पलटणें देऊन, रा॥ सदाशिवपंत बक्षी रा॥ पाटीलबावाकडील याजसमागमें बिदा केलें. ते लखनऊस आले आहेत. पुढें लस्करांत दाखल जालियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ४९.

१७०७ अधिक चैत्र वद्य ५.

पै॥ छ २० जमादिलाखर सन खमस समासीन.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाइत छ १९ जमादिलावल स्वामीचे कृपावलोकनें करून येथास्थित असे. विशेष. पेशजीं छ १७ रबिलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. ते पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हालीं अग्रियाचे किल्यांत सरकारचा अंमल जाला वगैरे इकडील वर्तमान विस्तारें राजश्री नानांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून ध्यानास येईल. कृपा करणार धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

श्री.

लेखांक ५०.

१७०७ अधिक चैत्र वद्य ५.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

पो गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक सा। नमस्कार विनंति येथील कुशल ता। छ १९ राबल जाणून स्वानंदलेखन—आज्ञा करीत गेले पो. विशेष. इकडील वर्तमान पेशजी छ १७ राखरीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं पाऊन विस्तारवृत्त कळलेंच असेल. हालीं वर्तमान तरी, एकमास जाला, राजश्री पाटीलबावांनीं रायाजी पा। यास अग्रियाचा किल्ला द्यावा, ह्मणून डिगेचे मुकामींहून रवाना केलें होतें. त्यास, हे अग्रियास जाऊन, अंमल करून, किल्यास, मोर्चे लाविले होते. त्यास, छ ११ मिनहु-पावेतों किल्ला जुंजला. निदान भवानसिंग वगैरे पलटणवाले व गोलंदाज किल्यांत होते ते फोडून छ १२ मिनहूस येऊन रायाजी पाटील यांस भेटून मागील तलब द्यावी आणि पुढें आमचे भायबंदीचा बंदोबस्त करून द्यावा ह्मणोन बोलोन, परस्पर वचन प्रमाण होवून, छ १५ मेनहूस अग्रियाचे किल्यांत राजश्री पाटीलबावाकडून रा। धलपतराव आमें गृहस्थ दाखल जाला. सुन्यादीनखान याजकडील आपला लोक सर्व किल्याबाहेर निघोन जुमामहजदीपासीं येऊन डेरा केला आहे. किल्यांत राजश्री पाटीलबावाकडील बंदोबस्त जाला. व सुज्यादीनखानाच्याही भेटीचा ठराव राणेखानभाई व रायाजी पा। यांचे वि। ठरलें आहे कीं, मा।रनिल्हेसही भयदाब लावून देऊन त्याचेही चालवावें, ह्मणोन ठरलें आहे. पुढें एक विचार आहे कीं, श्रीयमुना उतरून प्रातःकाळीं समीप रामगड, अलीकडे नजबखानानें अलिगड ह्मणोन नांव ठेविलें आहे, तेथें जाऊन, तोही किला खाली करून, आपला अंमल करून, पातशाहासुद्धां दिल्लीस जावें. हा येक विचार आहे. परंतु पातशाहा दिल्लीस जावयाची जलदी बहुत करितात. याजकरितां दुसरा विचार आहे कीं, अलिगडाकडे येक सरदार मातबर व फौज पलटण समागमें देऊन त्यास तिकडे रवाना करावें व पातशाहासहित आपण दिल्लीस जावें. असे दोन विचार ठरले आहेत.पुढें प्रत्ययास येईल तो विचार लिहूं. वरकड बारीक—मोठें वर्तमान राज्याच्या वाक्याच्या फर्दी पातशाहाच्या दरबारच्या व राजश्री पाटीलबावाच्या व वजिराचे दरबारच्या व कलकत्त्याकडील वर्तमान सविस्तर फारसी फर्दीवरून कळेल. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंती.

श्री.

लेखांक ५१.

१७०७ आषाढ वद्य ९.

पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी:—

विनंतिपत्रीं आज्ञा कीं:—तयमूरशाहा अब-दालीकडील राजकारण मोठें आहे. याजकरितां तुह्मी सिलसीला लावून ठेवणें. उपयोगी पडेल. ह्मणून आज्ञा. त्यास, श्रीमंत स्वामीचे अर्जी आली ते स्वामीनीं आपलें पत्र व सरकारचें पत्र खलिते गुलाम महमदखान यास जाब पाठविले होते ते त्यांस दिल्हे. व आह्मीही आपली अर्जी त्याकडून पहिले तीर्थरूपाचे नांवें पत्रें आलीं होती देान, त्यांचे जाब लिहून देऊन रवाना केलीं आहेत. उत्तरें आलियावर सेवेसी पाठवून देऊं. या दिवसांत तयमूरशाहाकडील वकील पातशहापासी स्नेह शिष्टाचार करावयास व येथील यांचे दौलतीचा रंग पहावयास तेथून रवाना केला आहे. तो अद्यापि दिल्लीस आला नाहीं. पुढल्यासालीं त्याचे मानस दिल्लीकडे स्वारी करावयाचें आहे, ह्मणून श्रवणांत आलें. ते विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक ५२.

१७०७ आषाढ वद्य ९.

विज्ञापना. कुवरसेनाचीं पत्रें येथें नजब खानाकडे बातमीचीं पाठविलीं होतीं ते बजिनस सेवेसी पाठविलीं आहेत. पाहून मर्जीस येईल त्याप्राणें बंदोबस्त करावा. हे विज्ञापना.

श्री.

लेखांक ५३.

१७०७ आषाढ वद्य ९.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २३ माहे रमजान मुकाम श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान पेशजी छ २३ माहे साबानीं विनंतिपत्रें पाठविलीं होतीं ते पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल.हालीं इकडील बारीकमोठें वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. कृपा करणार धनी समर्थ. बहुत काय लिहिणें ? कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

पौ छ २जिल्हेज सन सीत आश्विन मास.

श्री.

लेखांक ५४.

१७०७ आषाढ वद्य ११

विज्ञापना ऐसीजे. राजश्री पाटीलबावा यांचे मोठे मोहरेची अलकाब, वकील मुतलखुमद्दूल—उमराव व मुतगरुल—मुमालिक फरजंद अलीज्याहा महाराज्याधिराज माधवराव सिंदे श्रीनाथ बाहादूर मनसुर जमा फीदवीशहा—अलम पातशाहा गाजी, येणेंप्रमाणें मोठी मोहर आहे. दस्ती मोहर लाहान, वकील मुतालख आलिज्याहा श्रीनाथ महाराज माधवराव सिंदे बाहादूर, येणेंप्रमाणें आहे.

लेखांक ५५.

दिवसांत आसफद्दौला वजीर यांस इंग्रजानीं उत्तर दिधलें कीं, आमच्यानें तुमचा मुलूक राखवत नाहीं, तुह्मीं आपली खबरदारी करून घेणें. त्यावरून वजिरांचे येथें फौजेची निगादास्त हिंदुस्थानी लोकांची कमपेश आहे. श्रीकृपेनें राजश्री माहादजी सिंदे यांनीं ग्वालेरचें इंग्रेजाचें पारपत्य करून इटाव्याकडे किंवा कालपीकडे अंतरवेदींत उतरले तर तमाम अंतरवेद सगळी आहे. नजबखानाचे काबूत पातशाहा. व नजबखान आजपावेतों शपथपूर्वक ह्मणतो कीं सीखाचे जुंजाचा फैसला जाला ह्मणजे आह्मीं राजश्री माहादजी सिंदे यांचे सामील होतों. इंग्रजासी जुंज नमूद होत नाहींत. सरकारची जरब भारी जालियावर ताबेदारी करितील. इंग्रजांस अतिशय भितात. व पूर्वी स्वामीस पत्रें लिहिलीं व सेवकाकडून सेवेसीं लिहविलें तैसींच बोलणीं आहेत. अंमलांत येत नाहीं. पुढें होईल तें लिहूं. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

लेखांक ५६.

खान याजसमागमें गेले आहेत. तिकडून सीखही भारी जमावानीसीं मुकाबल्यास आले आहेत. नित्यानीं गोळा-गोळीचें जुंज होतें. परंतु सीखाचा गलबा भारी जाणोन, याजपासीं दिल्लींत फौज व पलटणें व तोफखाना आहे त्यांतून आणिक सरंजाम त्याकडे स्वार व पलटणें रा करितात. आह्मी नित्यानीं इंग्रजाचे बाहेर निघण्याविसीं तगादा करितों. त्यास उत्तर देतात कीं, सीखासी जुंज लागलें, आतां त्यासी दबून सलूक करावा तर सलतनतेची आबरु रहात नाहीं, जर त्यासी सलुक न करावा तर तुह्मासी बोलत गेलों व श्रीमंतांस लिहीत गेलों या गोष्टींत अप्रामाणिकता येते, या अर्थीं राहिली साहिली हुजूरची फौज तेही सिखावर पाठवून सरहद्दपर्यंत मुलूख हस्तगत करून तिकडील खात्रजमा जाली ह्मणजे पातशाहासहीत अंतरवेदींत उतरतो. ह्मणून धातुपोषणाच्या गोष्टी मात्र बोलून आमचें समाधान करितात. परंतु अंमलांत येईल तेव्हां खें.वरकड माार पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे. हे विनंति.

लेखांक ५७.

कीं राहिले ते कीं तुम्हास द्यावे, आह्मांस दुसरे गांव द्यावयासी व ऐवजही देणें बनत नाहीं. आपले गांव सरकारांतून करार करून घेणें यापेाही स्पष्ट उत्तर दिल्हें तेव्हां आमचे वरातीस कोठेंही ठिकाण नाहीं. याजकरितां हुजुर विनंती लिा आहे, कीं पाटीलबावाचे सनदेंत गांव वजा करून हुजुरची सनद आमचे नांवें पाठवून द्यावी.

गांवाची जमा	बी॥
३१५० तालुके द्यावल जमा गांव दोन.	
३००० मौजे आष्टेट जमा.	
१५० मौजे निचरोळी.	
३१५०	
२५० पो गाव दोन जमा	
२०० मौजे नारोळी जमा गुजराचे आमलांत	
५० मौजे खरे झासी जमा स्रो	
२५०	

लेखांक ५८.

श्रीगणराज.

सेवेसी विनंति. चिरंजीव गोविंदराव पुरुषोत्तम याचे लग्नाचे निश्चयांत आणिलें. प्रसंग महर्गता व वोढीचा प्रकार, याची सीमाच जाली. आजपर्यंत सर्व आबरु स्वामीकृपेनें राहिली. पुढेंही स्वामीचा वरदहस्त मस्तकीं आहे. तेणेंकडून सर्व पार पाडणार स्वामी समर्थ. दो चौ रोजां आज्ञा घेऊन जावें. सोबत व पहिले देणें येथें थोडेंबहुत त्यांनीं या दिवसांत उचल बहुतच आरंभिली आहे. त्यास कांहीं ताकीद होऊन आहेत. साह्यता वडावी व मर्जीस आल्यास सरकारांतून लग्नासंबंधीं कांहीं कुमक बक्षीस अथवा फाजील पैकीं जाल्यास सर्वांत भूषण व समई योग आहे. मर्जीहून प्रसंग असल्यास स्वामी कृपा करतील, ही खातरजमा आहे. सेवकास अन्य उपार्जना नाहीं. स्वामी कृपेनें सर्व प्रकारें संरक्षण जालें व आबरु राहिली. यत्किंचित आयुष्य तेंही पार पाडणार स्वामीच आहेत. श्रुत होय, हे विनंति. उत्तरी आज्ञा व्हावी, हे विनंति.

श्री.

लेखांक ५९.

मुख्य मुद्रा.

१६३० आषाढ वद्य ५.

स्वस्तिश्री राज्याभिषेक—शके ३५ सर्वधारी संवत्सरे आषाढ बहुल पंचमी, रविवासरे क्षत्रिय कुळावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं रा॥ बापूजी सोनाजी परभू उपनाम दिघे (शिक्का पेशवे) देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी ता॥ मुढेंखोरें, सुभा प्रांत मावळ, यांसी इनामपत्र दिल्हें ऐसें जे:— स्वामी परराष्ट्रांतून स्वराज्यांत आले त्या प्रसंगीं तुह्मी राजश्री परसोजी भोंसले याची जमी—निसी करून असतां त्याचे तर्फेनें स्वामीचे दर्शनास येऊन लांबकानीचे मुकामीं दर्शन घेतलें. स्वामीचे आज्ञेवरून राजश्री परसोजी भोंसले यांस फौजेनिसीं स्वामीचे दर्शनास आणिलें. ते प्रसंगीं तुह्मीं सेवा बहुत एकनिष्ठेनें केली व पुढेंही निष्ठेनें वर्तणूक करतां. तुमचें ऊर्जित करून वंशपरंपरें चालवणें, हें स्वामीस अवश्यक. याजकारितां तुम्हीं विनंति केली कीं, आपण स्वामीच्या राज्यांतील वतनदार सेवक आहों, जें ऊर्जित कर्णे तें वतनसमंधावरी केलियानें परंपरागत चालेल. त्यावरून स्वामी तुम्हांवरी कृपाळू होऊन नूतन इनाम देहे तो मुढेंखोरें पैं॥ २

मौजे भवळी १ मौजे टेमघर १

ऐसीं, दोनीं गांवें इनाम कुलबाब, कुलकानू, खेरीज हक्कदार व इनामदार करून, चतु:—सीमा भूमि [illegible]—मर्यादेप्रमाणें देखील जल,तरु, पाषाण,झाड—झाडोरा, निधि—निक्षेपसहित, इनाम आजरामरामत करून दिल्हा असे. तरी सदरहू दोहीं गांवचा इनामउपभोग तुह्मीं व तुमचे बापभाऊ जनाजीराम देशकुलकर्णी खोत पुत्रपौत्रादि—वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप असणें. स्वामी व स्वामीचे वंशपरंपरेनें तुह्मांस दोनी गांव चालवितील. जाणिजे. निदेश समक्ष.

मोर्तब. बार. सुरुसूद बार.

अस्सलपत्र जोडबंद आहेत मोर्तब सुमार २ तेरीख छ १९ रविलाखर,सु॥ तिसा मया.

श्री.

लेखांक ६०.

१६४१ आषाढ शुद्ध ५.

स्वस्तिश्री राज्याभिषेक-शके ४६ विकारी संवत्सरे आषाढ शुद्ध ५ पंचमी गुरुवासर. क्षत्रियकुळावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं तपोनिधी वल्लभगीर गोसावी यांसिः- दिल्हें इनामपत्र ऐसी जे

तुह्मी हरिभक्तपरायण तपोनिधि तुमचे मठीं अतीतअभ्यागत येत असतात. त्यास अन्नपाणी पावल्यानें स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण, ऐसें जाणोन, स्वामी तुह्मांवर कृपाळू होऊन मौजे आंबवली तो मुठेंखोरें प्रां मावळ, हा गांव पेशजीच्या मोकासियाकडून दूर करून, हालीं कुलबाब कुलकानू खेरीज इनामदार व हक्कदार, चतुःसीमापूर्वक करून दिल्हा असे. तरी मौजे [illegible]पले दुमाला करून घेऊन तुह्मीं व तुमचे शिष्यपरंपरेनें इनाम अनभऊन सुखरूप रहाणें. जाणिजे.

लेखनालंकार. मोर्तब.

बारसूद. बारसुरुसूद. बार सुमंत. बार मंत्री.

श्री.

लेखांक ६१.

१६८२ मार्गशीर्ष शुद्ध १४.



दस्तक सरकार राजश्री पंतप्रधान त॥ कमाविसदार व जकाती मा॥हाय. सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. राजश्री गणेश हरि कारकून नि॥ जवाहिरखाना याचे तांदूळ खंडी ७ सात खो फिरगाण कोकणांतून आणितील, त्यास आणूं देणें. जकातीचा तगादा न लावणें. जाणिजे.

छ १२ जमादिलावल. आज्ञा प्रमाण.

बार.

श्री.

लेखांक ६२.

१६८२ पौष वद्य १३.

राजश्री कृष्णराव बापूजी व भिवराव बापूजी उपनाम रामडोहकर गोत्र विश्वामित्र सूत्र आश्वलायन कुळकर्णी कसबे मजकूर गोसावी यांसिः-

सेवक बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार. सुहुर सन इहिदे सितैन मया अलफ. तुह्मी हुजूर कसबे पुणें येथील मुकामीं विनंती केली कीं, आपणास मोगलाईंतून अलमगीरसानी बादशाहा यांणीं कसबे रामडोहो, प्रां गांडापूर, सरकार दौलताबाद, सुभे खुजस्तेबुनीयाद, हा गांव दरोबस्त इनाम करार करून देऊन बादशाही फर्मान करून दिल्हा. त्याप्रमाणें आपणांकडे भोगवटा चालत आला. व सरकारतर्फेनें सरदेशमुखी व बाबतीही आपणांकडे चालतात. त्यास, आपण स्वामींच्या राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक यास्तव स्वामीनीं कृपाळू होऊन कसबे मजकूरचा मोगलाई अंमल सरकारांत आला; याजकरितां पेशजाची बाहशाही फर्मान

आपणाजवळ आहे तो पाहून मोगलाई अंमल व सरदेशमुखी व बाबती पेशजीं आपणाकडे चालत आहेत त्याप्रों दरोबस्त इनाम करार करून देऊन भोगवटियासी सनद करून दिल्ही पाहिजे, ह्मणून, त्याजवरून मनास आणितां, तुह्मी राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक, तुमचें चालवणें अवश्य जाणून, तुह्मावर कृपाळू होऊन, तुह्मीं बादशाही फर्मान आणून दाखविला तो पाहून, को मजकूर हा गांव, हक्कदार व इनामदार व मुकासाखेरीजकरून, बाकी मोगलाई अंमल व सरदेशमुखी व बाबती पेशजी चालत आहेत त्याप्रमाणें, देखील जल, तरु, पाषाण, निधिनिक्षेपादि, देरा-बस्त इनाम करून देऊन हे सनद करून दिल्ही असे. तरी सदरहू प्रमाणें कसबेमजकूरचा दरोबस्त अंमल तुह्मीं आपले दुमाला करून घेऊन तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनभऊन सुखरूप राहाणें. जाणिजे. छ २५ जमादिलाखर. आज्ञाप्रमाण. मोर्तब.

श्री.

लेखांक ६२.

१६८२ पौष वद्य १३.

राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी पा गांडापूर गोसावी यांसि:—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार व आशिर्वाद. सु॥ इहिदें सितैन मया अलफ. कृष्णराव बापूजी व भिवराव बापूजी, उपनाम रामडोहकर, गोत्र विश्वामित्र, सूत्र आश्वलायन, कुळकर्णी कसबे मजकूर, यांणीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं विनंती केली कीं, आपणांस मोगलाईंतून बादशाहा अलमगीर सानी यांणीं कसबे मजकूर हा गांव दरोबस्त इनाम करार करून देऊन फर्मान करून दिल्हा. त्याप्रमाणें आपणाकडे भोगवटा चालत आला. व सरकारतर्फेनें सरदेशमुखी व बाबती ही पेशजीं इनाम दिल्ह्याप्रमाणें चालतात. त्यास, आपण स्वामीच्या राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक, यास्तव स्वामींनीं कृपाळू होऊन कसबे मजकूरचा मोगलाई अंमल सरकारांत आला, याजकारितां बादशाही फर्मान आपणाजवळ आहे तो पाहून मोगलाई अंमल व सरदेशमुखी व बाबती पेशजीं आपणाकडे चालत आहे त्याप्रमाणें दरोबस्त इनाम करून देऊन भोगवटियास सनद करून दिल्ही पाहिजे. म्हणून, त्याजवरून मनास आणितां हे राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक, यांचें चालवणें अवश्यक, यांजवर कृपाळू होऊन कसबेमजकूर हा गांव हा त्यांस, हक्कदार व इनामदार व मोकासा खेरीजकरून, बाकी मोगलाई अंमल व सरदेशमुखी व बाबती पेशजीं चालत आहे त्याप्रमाणें, देखील जल, तरु, पाषाण, निधिनिक्षेपादि, दरोबस्त इनामकरार करून देऊन हें पत्र सादर केलें असे. तरी सदरहूप्रमाणें कसबेमजकूरचा दरोबस्त अंमल मशारनिलेच्या दुमाला करून यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत लेहून घेऊन अस्सल पत्र मारनिलेजवळ भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ २५ जमादिलाखर.

आज्ञाप्रमाण. मोर्तब असे.

श्री.

लेखांक ६४.

१६८५ वैशाख शुद्ध ११.

पुा राजश्री चिंतो विठल गोसावी यांसि:—

उपरी. राजश्री मल्हारजी होळकर यांनीं चौथाई सरंजाम सरकारांत द्यावा असा करारवचन तीर्थरूपांजवळ केलें असतां,आतां वैजापूरांवेर मात्र देऊं ह्मणतात ही गोष्ट अपूर्व आहे ! सर्वांनीं केल्या कराराप्रों द्यावें आणि यानीं कां न द्यावें ? तुह्मी करार केला असतां कां देत नाहीं, वचन तुह्मीं केलें तें कोठें राहिलें, असें त्यांचें आंगीं लाऊन बोलल्यास कार्य होईलसें आहे. तर तुह्मी तीर्थरूपास विनंति करून, त्यास कायल करून, चौथाई सरंजाम करारापों सरकारांत येई तीं गोष्ट करणें. यावेसीं तीर्थरूपास विनंति लिहिली आहे. तुह्मीं वरचेवर स्मरण देऊन कार्य करून घेणें. जाणिजे. छ १० सवाल. सुहुरसन अर्बा सितैन मया व अलफ. मल्हारबाचा प्रकार प्रत्ययास आलाच आहे; परंतु जेथवर निकड होईल तितकें करणें. छ माार.

(लेखनसीमा.)

श्री.

लेखांक ६५.

१६८५ श्रावण शुद्ध ९.

राजश्री चिंतो विठल गोसावी यांसि:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं लिहिलें कीं,अप्पाजी गणेशास ताकीद होऊन गोपाळरावाचे हवालीं ठाणें हो तें करावें, ह्मणून संशय धरून लिहिलेंत व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांचे मनांत संशय आला आहे ह्मणून लिहिलें,तें कळलें. त्यास, तुह्मी वडिलास विनंति करून अप्पाजी गणेशास ठाणें न द्यावयाविसीं आह्मीं पत्रें लिहिलीं असतील तीं पत्रें खामखा आणवणें. वडिलाचें चित्तांत संशय आणणारे आणतात. येथें तर वडिलाचे मर्जीसिवाय दुसरा अर्थच नाहीं. असें असतां, लहान माणूस वडिलाचें चित्तांत विपर्यास आणून देतात हें काय ? तरी हें पत्र वडिलास विदित करणें. या मजकुराविसीं वडिलाची खातरजमा केलीच असेल. आह्मींच ल्याह्मवेसें काय आहे ? परंतु हें पत्र ल्याहावयाचें कारण हेंच कीं, इकडील मजकूर सविस्तर तुम्हांस ठाऊक असतां, चित्तांत संदेह आणून या गोष्टीचा अंदेसा न करतां पत्र लिहिलें याचें कारण कळलें नाहीं. परंतु असेंहि वाटतें कीं, वडिलाचे मर्जीचा भाव पाहून पत्र लिहिलें, असें वाटतें. पत्र संदेह धरून लिहिलें याचें कारण मात्र लिहून पाठवणें. जाणिजे. छ ७ सफर बहुत काय लिहिणें ? तेथील वृत्त कळावें म्हणून लिहिलें तें कळलें. तुम्हाविसी संदेह नाहीं. छ मजकूर.

(लेखनसीमा.)

श्री.

लेखांक ६६.

१६८५ कार्तिक.

केंदूर दमाजी गायकवाड यांजकडे दरोबस्त द्यावें. त्याचे ऐवजीं मौजे मजकूरचा आकार अजमासें सात हजार व कित्ता दरसाल रुपये दाहा हजार एकूण सतरा हजार रुपये. याचा सरंजाम श्रीमंतांकडे रेवातीरीं द्यावा. विद्यमान खांसा माारनिले. हस्ताक्षर रामचंद्र केशवदास सन अर्बा सितैन, कार्तिक वद्य.

श्री.

लेखांक ६७.

१६८६

राजश्री चिंतो विठल गोसावी यांसि:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुम्हांकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी प्रस्तुत तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांची मर्जी कसी आहे, शरीरप्रकृत कसी, अवषध कोणाचें घेतात, हें लिहिणें. मोगलाकडून हिम्मतखान आले होते, त्यासी सलूखाचें बोलणें कसें जाहालें, हिम्मतखानाचा भाव कसा आहे, सलूख जाहाला हा किती दिवस चालेल, हा प्रकार व त्याचा बोलण्याचा आशय कांहींच कळला नाहीं. जी दिल्ही जागीर ती द्यावी आणि पुढें नीट चालवें, हा आशय नबाबाचा व त्याचे कारभाऱ्याचा कसा आहे, हें लिहिणें. वरकड वर्तमान मल्हारबाकडील व शिंद्याकडील लिहून हमेशा पाठवीत जाणें. वरकड वर्तमान बारीक-मोठें हमेशा लिहिणें. इकडील वर्तमान तर तीर्थस्वरूपाचें पत्रीं पूर्वी लिहून पाठविलें आहे, त्यावरून कळेल. प्रस्तुत हैदरनाईक मायनहळ्ळीस गेला आहे. तेथें एक दोन मुक्काम होईलसें दिसतें. त्याचें मानस हेंच कीं, चार दिवस घालवावे. हे छावणीस राहत नाहींत, हें त्याचें मत आहे. झाडी सोडून झुंजायास यावयाचा प्रकार दिसत नाहीं. रात्रीस छापा घालावा, हे इच्छा धरीत आहे. दुसरा प्रकार तर किमपि दिसत नाहीं. नबाबाकडेहि पत्रें पाठवीत आहे कीं, तुम्ही यावें. हाहि प्रकार करीतच आहे. नवाबहि काडळूर— संगमावर येणार आहे. पुढें पहावें. याचें त्याचें कसें आहे हें न कळे.याचे पारपत्याचा मजकूर तरः प्रस्तुत तो झाडींत आहे. पर्जन्य बहुत. महर्गता विशेष. असा प्रकार आहे, च्यार रुपये मिळवावे ते दिवस मागेंच गेले. प्रस्तुत ऐवजाचा प्रकार कोठेंही दिसत नाहीं. असा प्रकार आहे. याचें पारपत्य जाहाल्याखेरीज यावयाचें कसें ठीक पडतें ? तोहि आपले छावणीची वाट पाहात आहे.त्याचेहि लोक फुटतात व राजकारणें येतात. परंतु आपले फौजेस रोजमऱ्यास ठिकाण नाहीं. तेव्हां ते कसे येतात ? हे सर्व अर्थ वडिलास विदित करणें. आपले अपूर्ण.

श्रीमोरया.

लेखांक ६८.

१६८७ चैत्र शुद्ध ९.

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी:—

पो। गंगाधर यशवंत साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता।। चैत्र शुद्ध नवमी मु।।इटावें जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. आपलेकडून दोन तीन पत्रें राजश्री सुभेदारांस आलीं. परंतु आमचे स्मरण येकही पत्रीं न जालें. ऐसें नसावें. इकडील वर्तमान तरी:-नजीबखानांनीं सलूख जालियावरी अंतर्वेदच्या मुलखांतील बंदोबस्ताकरितां अनूपशहरीं आलों. तेथें नवाब सुज्यातदवले येऊन भेटले.कितेक प्रकारें निखालस भाव बोलून साहाय्य व्हावयाचा करार करून गेले. त्याउपर राजश्री सुभेदार साहेब इटावियासी आले. येथील काम उरकोन गंगातीरीं मेहंदीघाटांस जाणारें. सविस्तरें राजश्री सुभेदारसाहेबीं लिहिलें

आहे, त्यावरून कळेल. सर्वदां पत्रीं संतोषास पाववावें कृपा केली पाहिजे. कोणेविशीं आमचें विस्मरण पडों न द्यावें. उभयताहि वृद्धावस्था आहे. स्नेहाची वृद्धीच असावी. लोभ असो दीजे हे विनंति. चिरंजीव राजश्री विस्वासराव याच्या साहित्यांस अंतर होणार नाहीं. या प्रांतीं स्वारी गेलियावर रजवाडियांची पारपत्यें होतील. चिंता न करावी. राजश्री महादाजी सिंदे मैत्र व राजश्री अवाचितराव गणेश झासीं प्रांतीं आले होते त्यांनीं उत्तम प्रकारें बंदोबस्त केला, हें चिरंजिवांनीं सविस्तर लिहिलें असेल, त्याजवरून कळों येईल. लोभाची वृद्धि करावी, हे विनंति.

श्री.

लेखांक ६९.

१६८७ वैशाख वद्य ५.

राजश्री चिंतो विठ्ठल गोसावी यांसि:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. पुरंधरचे जुने लोकांनीं आमचें नांव करून दग्यानें किल्ला घेतला म्हणोन परस्परें वर्तमान विदित जालें. त्यास, हे गोष्ट आम्हांस किमपि ठाऊक नसतां, मधीं लबाडी करून कर्म केलें त्याचें पारपत्याविसी तीर्थस्वरूपास लिहिलें आहे. तुम्हीं हि विनंति करून लबाडी केली त्यांचें पारपत्य करवणें. वडिलाच्या चित्तांत संशय न येतें करणें जाणिजे. छ १८ जिल्काद. बहुत काय लिहिणें ? (लेखनसीमा.)

श्रीगजानन.

लेखांक ७०.

१६८७ आषाढ शुद्ध २.

श्री.

रमाकांत चरणीं
तत्पर नारो शंकर
राजेबहादर.

॥ सनधि करि दई श्री महाराजा श्रीराजा नारो संकर बहादुरजीकी सरकार तै हजुर राजश्री पंडितराव विस्वासरावजीके ऐते सिधि श्रीठाकुर मोहेकम—सिंधको आपर मौजे लगधःमौ १ तुह्मारी जागीरमै तीर्थरूप लछमन संकर कैलासवासी नै दयौ हतौ सु अबै तुमसे बाचा करि मै हाजिर होइ अर्जविंती करित व मैहरवानगी करि हाल सनधि करी दई सु पाऐ जै हौ सरकारकी सेवा सुभचिंतकी करै रहनौ अस्वन सुदि सात संवत १८१८ मुकांम करहरा.

सदरहूमों मौजे मजकूर जागीर करार करून दिल्ही असे. घेऊन सरकारचाकरी रुजू राहणें. जाणिजे. छ ४ रविलावल सन सलास. मोर्तब सुद.

(मोर्तब सुद.)

सनदेप्रमाणें करार
सरकार रो महमद
मीरखान टोके हजूर
इनायेतखानी व बाबुराव गणेश छ १ मोहोरम संमत १८२१
मोर्तब सुद.

(मोर्तब सुद.)

श्री.

लेखांक ७१.

१६८७ आषाढ शुद्ध ११.

यादी सु॥ सीत सीतैन छ १० मोहरम. सौ। पार्वतीबाई यांज- कडील फरमास रा। माहादुजी तात्या खि- जमतगार पुसोन आ- ज्ञा करितील. तेणें- प्रमाणें करावें.

१२५ मोत्यें पाटल्यां- स खरीदी करून द्यावीं ह्मणून.

७६ पाचमणी.
२ बांळ्यांस थोर दर, मों। पेटच्या गळ्यां- तील यांसीं.
१० माळेस पांच मणी.
६४ चिंचपेटच्या गळ्यांतील.

७६ लहान

२०१

४ हेब यांकडील नथा ४ करविल्या त्यास मोत्यें ४ माणीक मणी दर १ प्र॥ ४ दर रु॥ २५अगर शंभरा अलीकडे रु. १०० सोनें. त्याजपैकींच.

६ पानड्या बिंदीच्या ३ यासी
३ चुणी.
३ पाचाकिडे

६

राधाबाई यांसि नथ थोर मोत्यांची करून द्यावी ह्मणून परवानगी घेऊन करून द्या ह्मणतात.

१

श्री.

लेखांक ७२.

१६८७ श्रावण शुद्ध ११.

राजश्री चिंतोपंत तात्या गोसावी यांसि:- अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्रे॥ महादजी शिंदे दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास, सविस्तर अर्थ लिहित जावें. श्रीमंत राजश्री रावसाहेब देशास आले. त्यांची आपली भेट झाली असेल. त्यास, सविस्तर वर्तमान लिहून पाठवावें. येथील वर्तमान तपसीलवार कार- भाराचें वगैरे राजश्री बाळाजीपंत यांनीं आपणास लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. सारांश जातेसमईं आपण आह्मांस सांगितलें कीं, वरीस भरेपर्यंत स्वहित किंवा अनहित मनास न आणावें; त्याजप्रों आपले वच- नाचें दृढतर धरून त्याअन्वयें आहों. दुसरा माार मातुश्रीबाईकडून पत्रें आलीं. त्यांत मजकूर कीं, घरीं पंच्यवीस हजार रुो खर्च काढून भक्षिले, त्यास कर्जदार ऐवजाची निकड करितात, याची तरतूद करून पाठवणें ह्मणोन. त्यास, आह्मांपासीं ऐवज आहे किंवा नाहीं, आणि येथें तरतूद होती अथवा नाहीं, हा अर्थ सर्व आपणास ठावकाच आहे. याजकरितां हें पत्र आपणांस लिहिलें आहे. तरी आपण पंच्यवीस हजार रुो कर्ज मातुश्रीस देवावे. आम्ही व्याजा- सुद्धां ऐवज जेथें सांगाल तेथें पावते करूं. मुख्य आपणांस लिहिल्यावरून ऐवज पावेल हा भरंवसा जाणून लिहिलें आहे. तरी लिहिल्याप्रों। कार्य करून उत्तर पाठवावें. वरकड सर्व गोष्टी आपण बोलले आहांत त्याजवरी कायम आहों. कळावें. रा॥ छ ११ सफर.

मातुश्रीस रहावयास जागा पेडगांव द्यावें ह्मणून करार होता. परंतु अद्यापिवर तें काम जालें कीं न जालें हें लि॥ नाहींत. कार्य करून द्यावें. हे विनंति.

श्री.

लेखांक ७३.

१६८७ भाद्रपद वद्य ११ प्रथम.

राजश्री चिंतो विठल गोसावी यांसि:— उपरी. तुम्हीं पूर्वीं पत्र राजश्री भिकाजी नाइकाचा। पाठविलें तें पावलें. त्यावरून सविस्तर वृत्त कळलें. त्या पत्राचें उत्तर पूर्वीच रवाना जहालें त्यावरून सर्व तुम्हांस इकडील भाव कळलेच अस्तील. प्रस्तुत बलरामानें पत्र लिहिलें होतें. त्यांत आशय होता कीं, विठलरायाचा। निराळीं पत्रें तीर्थस्वरूपांस येतात हें काय? म्हणून तुमचा आशय बलरामानें लिहिला. त्यास, पत्र कांहीं निराळें राजकारण रा- खावें, आशय कळावा, याअर्थें पत्र येथून गेलें नाहीं. येथील इतबार सर्व तुम्हांवरच आहे. पत्र द्यावयाचें कारण हेंच कीं, पाहिले लहानमोठा निरोप सांगून पाठविणें तरी याजबा। पाठविण्यांत येत असे, त्यावरून त्याणेंच होऊन पत्र येथून नेलें आहे. आणिक कांहीं प्रकार नाहीं. दुसरें, तेथें तरी येथील खातरजमेचा मनुष्य कोण आहे त्यास पत्र लिहावें? सारांश गोष्ट हेच कीं, संदेह वारंवार न येणें. जाणिजे. छ २३ रबिलोवल. बहुत काय लिहिणें?

श्री.

लेखांक ७४.

१६८७ कार्तिक शुद्ध ७.

मिर्जा आदलबेग खुशवख्त बाशद:— तहवर व जलालत दस्त—गाहा. सुा। सीत सितैन मया व आलफ. पा। मंदोसर व उज्जनवासे व सुखेड हे महाल तुह्मांकडे शिंद्याकडून आहेत. त्याची जप्ती सरकारांत करून रसद हुजूर द्यावी लागती. याजकरितां तुमचें प्रयोजन असे. तरी पत्र—दर्शनीं हुजूर येणें. दिरंग न लावणें. या कामास स्वार, दिम्मत गणोजी कदम यांस पाठविले आहेत, मसाला रुपये एक हजार देविले असेत. तर आदा करणें. जाणिजे. छ ५ जमादिलोवल. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधि:)

बार.

(सांब.)

पत्कंजलीनस्य मुद्रेयमपराजिता बाजीरायतनूजस्य रघुनाथस्य राजते.

श्री.

लेखांक ७५.

१६८७ कार्तिक शुद्ध ७.

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री हरबाजीराम दि।। सिंदे गे।। यांसि:— सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु।। सीत सितैन मया व अलफ पा। शाहाजापूर व बडवंदे व उमरगड वगैरे महाल तीन सिंद्याकडून तुह्मांकडे कमाविसीस आहेत. त्याची जप्ती सरकारांत करून रसद द्यावी लागती. याजकरितां तुमचें प्रयोजन हुजूर असे. तरी देखत आज्ञापत्र हजूर येणें, दिरंग न लावणें. या कामास स्वार दि।। गणोजी कदम पाठविले आहेत. तर यास मसाला रुपये १००० येक हजार देविले असत. तर आदा करणें. जाणिजे. छ ५ जमादिलावल. आज्ञाप्रमाण. (लेखनावधि:)

॥ श्रीराम ॥

लेखांक ७६.

१६८७ माघ शुद्ध १४.

श्री
झाळसाकांतचरणीं
तत्पर खंडोजीसुत
मल्हारराव होळकर.

॥ सिध श्रीसुबेदार मलारराव होलकर बचनात्. बषतावरसींग तालुका गोपालपुर दिसे सुप्रसाद मालुम होय. आगे समत् १८१६ वा सं० १८१७ दोवो साल बाबुराव कोनेरके अमलमे पंडत राघो लछमनके मारफात बाकी रुपया रह्या है. सो हीसाब कबजमोजब सरकारमे रुजुवात कर बाकीका फैसला कीया चाहिये. तो तुम कुल हीसाब दोना सालका और कबजे मुकासदारोकी होय सो ले सीताब हजूर आवना ढील न करणा. मीती माह सुध १४ समत् १८२२.

(मोर्तब सुद+)

॥ श्रीराम ॥

लेखांक ७७.

१६८७ माघ शुद्ध १४.

श्री
झाळसाकांत-
चरणीं तत्पर खं-
डोजीसुत मल्हा-
रजी होळकर.

॥ सिध श्रीसुबेदार मलारराव होलकर बचनात्. बिसालसींग तालुका लाहर दिसेसु प्रसाद मालुम होय. आगे अमृतासिंग हजुर आय समत् १८१७ के सालकी कबुलीयत सरकारमे लीपदइ है. सो रुपया सरकारमे आदा कीया नही. और समत् १८१६ के सालकी बाकी पंडत राघो लछमनके मारफत की रही है. सोवा सालकी कबजा मुकासदारांकी और सतराके सालका रुपया. ले सीताब हजूर आवना. ढील न करणां. मीती माह शुध १४ समत् १८२२

(मोर्तब सुद +)

श्री.

लेखांक ७८.

१६८७ माघ शुद्ध १४.

झाळसाकांतचरणीं
तत्पर खंडोजसुत
मल्हारजी होळकर.

॥ सिध श्रीसुबेदार मलारराव होलकर बचनात्. चतुरसींग वा भीमसींग दिसे सुप्रसाद मालुम होय. आगे तुमकों सरकारके पैरषाहजान तालुका इंदुर षीका समय १८१७ के सालकी जमां हजुरसुं करार करदई सो करार मोजीब रुपया आदाकीया नही और पंडत राघो लछमन इनकी चीजबस्त तुमने लइये बात अछी न करी. हाल देष ते परवाना पंडत मसारनीलेका राजीनामा और सतराके सालके कबुलीयत माफक रुपया ले सीताब हजूर आवनां. ढील न करणां. मिती माह शुध १४ समत् १८२२. (मोर्तब सुद +)

श्री.

लेखांक ७९.

१६८७.

राजश्री नारोपंत नाना गोसावी यांसि:—

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित महादजी सिंदे दंडवत विनंति

उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. पूर्वी दोन च्यार पत्रें आपणास पाठविलीं त्यांचें उत्तर आलें कीं, दरबारचा बंदोबस्त करितों. आणि देशींहून वर्तमान आलें कीं, लोकांचे घरीं चौकिया बसऊन उपद्रव केला आहे व महालींहि जप्ती केली. एशियास, पूर्वी कच्चे वर्तमान इकडील जें जालें तें लिहिलेंच आहे. तरी आपण व राजश्री विष्णु महादेव एकत्र होऊन दरबारचा बंदोबस्त करावा. आपण उभयतां करितील ते आह्मांस मान्य आहे. प्रस्तुत इकडील वर्तमान कोटेयाजवळ मुक्काम आहे. कोटचाची खंडणी जाहली व मारवाडचीहि खंडणी होऊन विल्हेस लाविलें. अतःपर राजश्री मल्हारजी होळकर यांजकडे जात आहों. त्यांचा मुक्काम प्रस्तुत दतियानजीक आहे. ते आह्मीं एकत्र होऊन कितेक सरकारी कामें मातबर करावीं, हाच अर्थ चित्तांत धरिला आहे, दुसरा प्रकार नाहीं. लोकांचे घरीं चौक्या बसल्या आहेत, याजमुळें लोक दिलगीर आहेत. परंतु, कांहीं आह्मांस सोडून जातात, ऐसा अर्थ नाहीं. तशाहीमध्यें लोक दिलगीर जाहलियानें साहेबकाम निखालस होत नाहीं. याजकरितां उभयतां आपण चित्तावर धरून, जेणेंकरून चोकिया व जप्ती उठोन सरदारीचा बंदोबस्त होय, तो अर्थ करावा. आमची धणियाचे पायांपाशीं एकनिष्ठता आहे. दुसरा अर्थ कांहीं नाहीं. ऐसें असोन, देशीं हा उपद्रव करावा यांत धणियाची किफायत आहे कीं काय, येविसीं श्रीमंतांसही पत्रें लिहिलीं आहेत. प्रविष्ट करून, उत्तरें पाठवावीं. सर्व प्रकारें भरंवसा आपला. असें असतां लोकांचे घरीं उपद्रव होतो व माहलची जप्ती केली त्याचा अद्यापि कांहींच बंदोबस्त आपण करीत नाहींत, यावरून अपूर्व आहे. याउपरी तरी श्रीमंतांची मर्जी काय हें मनास आणून ल्याहावें. त्याप्रमोंच वर्तणूक केली जाईल. आज पंचवीस हजार फौज आह्मांपाशीं असोन, माघील बखेडचामुळें मोठचा मनसब्यास उपयोगी पडत नाहीं. याकरितां लि॥ असे. र॥ छ. २२ सफर. बहुत काय लिो ? लोभ असो दीजे. हे विनंति.

(मोर्तब सुद.)

श्री जोतिःस्वरूप
चरणिं तत्पर जया-
जीसुत जनकोजि
सिंदे निरंतर

श्री.

लेखांक ८०.

१६८८ वैशाख वद्य ३.

राजश्री चिंतो विठल गोसावी यांसिः—

उपरी मोरो नरहरी यांस जामीनाविसीं तगादा जाहाला आहे. त्यास, माारनिलेकडे गुंता नाहीं. तरी तीर्थरूपास विनंति करून सोडून देवणें. म्हणून तुम्हांस पूर्वी लिहिलेंच होतें; परंतु त्यास अद्यापि सोडिलें नाहीं. जामीनाविसींच अटकाव आसिलाच तर तुम्ही दरम्यान होऊन यांस सोडणें. कदाचित् यांजकडे मुद्दाच लागू जाला तरी याजपासून जाबसाल करून घेतला जाईल. हे मुलख फोडून कोठें जाणार आहेत ? तरी तीर्थरूपाचा कागद देऊन सातारियास लाऊन देणें. हें पत्र कोणास न दाखविणें. लिहिल्याप्रमों करून आपल्या जिम्मा करून घेणें. जाणिजे छ १७ जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? (लेखनसीमा.)

श्री.

लेखांक ८१.

१६८८ ज्येष्ठ वद्य १.

राजश्री रामाजीपंत यांप्रतिः—

बापूभट आशीर्वाद उपरी. लेह्यास कारण कीं, श्रीमंत चिंतो विठ्ठल तात्या यांनीं चादशीचायी राम आह्मांस दिल्हा. त्याचा चकनामा व नारो शंकर यांचें पत्र वेदमूर्तीस देणें, ह्मणून अलाहिदा तुह्मांस आलात्यावरून तुह्मी दोन पत्रें आह्मांस पाठविलीं. कळावें ज्येष्ठ वद्य प्रतिपदा चंद्रवार, बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

श्री.

लेखांक ८२.

१६८९ आषाढ शुद्ध १०.

राजश्री कमाविसदार पाा सिंदखेड यांसिः—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो केदारजी सिंदे दंडवत. सुा समान सितैन मया व अलफ. पाामजकूर येथील अंमल पेशजीचे कमावीसदाराकडून दूर करून सालमजकुरापासून तुह्मांकडे मामलत सांगोन रसदकरार २२००० बावीस हजार करार केले असेत. तरी माहालीं अंमल बसलियावरी भरणा करून कबज घेणें. यासो मामलतसमंधे कलमें.

(श्रीजोतिस्वरुपचरणिं
तत्पर तुकोजीसुत केदारजी शिंदे निरंतर)

रसदेचा ऐवज फिरेतोंपर्यंत मामलत काढूं नये कलम. १
आलफ फितूर मुलूक शिरस्तेप्रों मजुरा देऊं कलम. १
व्याज एकोत्रा शिरस्तेप्रो मजुरा पडेल. १
सिंबंदी माहालमाार पेशजीप्रों मजुरा पडेल. कलम १
येणेंप्रों च्यार कलमें करार केले असे. तरी इमानेंइतबारें मामलत करून, कचा हिशेब समजावीत जाणें. जाणिजे. छ १ सफर. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

(मोर्तब सुद.)

बार.

श्री.

लेखांक ८३.

१६८९ आषाढ शुद्ध १०.

राजश्री अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा केदारजी सिंदे ० दंडवत. सुा समान सितैन मया व अलफ. पा॥ सिंदखेड येथील अंमल तुम्हांकडून दूर करून सालमजकुरापासून राजश्री
यांजकडे सांगितला असे. तरी तुह्मीं दखलगिरी न करणें. मा॥रनिले अंमल करतील. पा॥मजकूरचीं ठाणीं असतील तीं यांचे स्वाधीन करून कबज घेणें. जाणिजे छ.९ सफर बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

(मोर्तब सुद.)

[श्रीजोतिस्वरूपचरणिं
तत्पर तुकोजीसुत केदारजी शिंदे निरंतर.]

श्री.

लेखांक ८४.

१६८९ कार्तिक वद्य ११.

चिरंजीव राजश्री राव यांसिः—

रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. मौजे साकोरें, पो माणिकपुंज, हा गांव राजश्री त्रिंबक सूर्याजी यांजकडे आहे. तो त्याकडे चालवावा, येविसीचा करार सालमजकुरीं सन समान सितैनांत झालाच आहे. तर, आ-

पलेजवळ माानिलेचे गांवाविसीं कोण्ही वालमेल करील, तर त्याचें न ऐकावें. माारनिलेकडेच सुदामत चालत आल्याप्रों सुरळित चाले तें करावें. राजश्री चिंतामण हरि मौजेमजकुरास उपद्रव करितात. त्यास ताकीद करावी. रा छ २४ जमादिलाखर बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद.

श्री.

लेखांक ८५.

१६८९ कार्तिक वद्य १२.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री चिंतो विठ्ठल गोसावी यांसि:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. शिंदे येतात येतात म्हणून तुम्ही बोलत गेला व त्याचीं ही पत्रें च्यार महिने येतों येतों म्हणोन येतात; परंतु हा कालपर्यंत त्यांचें येणें होत नाहीं. कारभार तो जाला पाहिजे. हिंदुस्थानांत फौजा जाऊन बंदोबस्त व्हावा लागतो. त्याणीं विलंब लाविला तर कोठवरी वाट पहावी ? जरी आठा रोजांत सत्वर येत असिले तर उत्तम. यावें. नाहीं तरी करणें तसें करावें लागेल. जाणिजे. छ २९ जमादिलाखर, सुा समान सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें ? बिसा दिवसांत त्यांनीं निघोन चालते व्हावें. ते तर जाहालें नाहीं. अद्याप निघावयाचें वर्तमान कळत नाहीं. यास्तव लवकर काय तें कळावें. दोहींकडून काम बुडवावें हें ठीक नाहीं. उत्तर रवाना सत्वर करणें. जाणिजे. छ मजकूर. बहुत काय लिहिणें ?

(लेखनसीमा.)

श्री.

लेखांक ८६.

१६९०.

यादी राजश्री दादासाहेबांकडे कर्ज आमचे मारफतीचें. सुा। तिसा सितैन मया व अलफ.

रु.

१०००० रुद्राजी गिरमाजी.
३०००० किता रुद्राजी गिरमाजी.
३०००० सदाशिव अंबादास.
९००० दहीवेलीची मामलत अजमासें.
१५००० किता नांवाचें स्मरण नाहीं

१८४०००
२५००० शिदाप्पाशेट वीरकर.

२०९०००

श्री.

लेखांक ८७.

१६९२ मार्गशीर्ष वद्य ५.

नकल.

राजमान्य राजश्री भास्कर बल्लाळ गोसावी यांसि:—

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुा इहिदे सबैन मया व अलफ. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडील अनुष्ठानें आनंदवल्लीस नेहमीं चालतात. त्यांपैकीं येक अनुष्ठानाचीं वर्णी वो राजश्री नारायणभट चैसास, वास्तव्य श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, यांजकडे नेहमीं सांगणें. जाणिजे. छ १९ साबान. आज्ञाप्रमाण.

श्रीमार्तंडभैरव.

लेखांक ८८.

१६९४ आषाढ वद्य ७.

श्रीमत् राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक भगवंतराऊ शंकर कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना. भवानी नाईक राक्षे श्रीगोंदेंकर व गोपाळ नाईक राक्षे या उभयतांच्या भाऊपणाच्या वांटियाचा कजिया आहे. त्यास, भवानी नाईक यांस आम्ही जामीन जालों. मुदतीस न आला सबब त्याचें कर्ज मातुश्री सकुबाई सिंदे याजकडे आहे. रुपये ४०००० चाळीस हजार आहे. तो ऐवज उभयतांचा कजिया विल्हेस लागेतों नाईकमजकूर यांस ऐवज देणार नाहीं. स्वामींची आज्ञा येईल तेव्हां देऊं. ज्यास ऐवज देवाल त्यास देऊं. मित्ती शके १६९४ नंदननाम संवत्सरे, आषाढ वद्य ७ सप्तमी. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

श्रीशंकर.

लेखांक ८९.

१६९५ भाद्रपद शुद्ध ६.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामाजी जनार्दन स्वामीचे सेवेसी:-

पे।। लक्ष्मण अप्पाजी सां। नमस्कार विनंति उपरी. सैद अबजलचाची जमीन राजश्री तात्याजवळ गहाण ठेवावयाचा करार केला. त्यास, हालीं तूर्त ऐवज पांचशें त्यास दिल्हे आणि पुण्यास पत्र पा। आहे. कदाचित् त्याहीं जमीन न. ठेविली तर सदरहू पांचसें रुो एकोत्र्याचे मित्तीनें देऊं. मित्ती शके १६९५ विजयनाम संवत्सरे, भाद्रपद शुद्ध ६. बहुत काय लिहिणें? हे विनंति.

श्रीमार्तंडभैरव.

लेखांक ९०.

१६९५ पौष वद्य १३.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री भावान नाईक राक्षे स्वामीचे सेवेसी:-

पो। भगवंतराव शंकर सां। नमस्कार विनंति उपरी. राजश्री बाबूराव रामचंद्र यांसि रुो ५२०० पांच हजार दोनशें तुह्मांकडून देविले आहेत. हे वैशाखअखेर देणें. मित्ती सके १६९५ विजईनाम संवत्सरे, पौष वद्य १३, सु।। तुंगभद्रातीर. ज्येष्ठ शुध प्रतिपदेपासून रुो पुढें राहिले तर दर सदे रुो ०।।० प्रों व्याज देऊं. हें खत लिहिलें सही.

हस्ताक्षर कृष्णाजी सखदेव, दिामा।र.

श्री.

लेखांक ९१.

१६९५.

यादी मोगलाई अमलाच माहाल सु।। अर्बा सबैन—

किता—	किता—
० पा। पडदूर	१ को। पानगांव
१ पा। नरसी	१ को। रमणपूर
१ पा। वासीम	१ को। खलविरें
१ पा। जिंतूर	१ को। शाहागड
१ पा। बदापूर	१ को। भोंगाव
१ पा। सीरसाले	१ को। टाकळी
१ पा। पोहनेर	लालाईची १ अंदूरें वगैरे गांव धारूरपैकीं १ अष्टी सैद जुनदीची १ पा। टाकळीपों फुटगांव राजे वि. नायकदास याजबा।
१ पा। वळूर	
१ पा। शेलगांव	

१ पाा लोणार

१ पाा बाह्मणी
१ पाा पाचळेगांव
१ पाा कोसडी
१ पाा वेस

१३

४ पाा अंबाडपों
फुटगांव
१ बाल्हेगांव
१ चंदनपुरी
१ कडेठाण.
१ दरेगांव

४

१ मौजे कसनेर

१४

माहाल व गांव २७

श्री.

लेखांक ९२.

१६९६ आषाढ वद्य १२.

यादी त्रिंबक सूर्याजी विज्ञापना ऐसीजे. सुा खमस.

सेवकाचें गांव जप्त आहे तें मोकळें करावयाच्या सनदा खानदेश व पाल हबेली मामलेदार व जमीदारास सनदा.

१ कसबे साकोरें पाा माणिकपुंज.
१ मौजे नरें, ताा पाल्हवें.

२

दोन गांव दौलतीचा बंदोबस्त जाल्यानंतर तुह्मांकडे चाकरींत दिल्हे जातील. करार.

ताासी माहाल ताा अवाचितगड येथील हवाला पुरातन गणेश सूर्याजीचे नांवें चालत आला. हालीं राा बाजी गोविंद याणीं आपले भावाच्या नांवें करून घेतला आहे. तो पेशजीप्रों चालवणार धणी समर्थ आहेत.

सालिना मोहना.
१५० मोईन तूप.
२४ पोरगा.
३६ दिवटया
तेल वजन पक्के ८८।
दरमहा ८८३॥

तूर्त साकोरे याची मोकळीक चिठी देणें.

छ २५ जमादिलावल सुा खमस सबैन. मोकळीक सनदा असत.

१ नारो कृष्ण तरवे सर—सुभेदार पाा खानदेश.
१ जमीदार.
१ मोकादम.

३

श्री.

लेखांक ९३.

१६९६ भाद्रपद वद्य १.

राजश्री चिंतो विठल स्वामी गोसावी यांसि:—

विनंति उपरी, हैदर नाईक याजकडे सालगुदस्त तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबीं ऐवज करार केला. त्यापैकीं राजश्री कृष्णाजी नाईक दातार यांस दोन लक्ष रुपये द्यावयाचा ठराव तुमचे विद्यमानें आपाजी—राम याजवळ जहाला. त्याविसीं मागें तुमचें श्री नाइकाचें पत्र घेऊन आपाजी—राम याजकडे पाठविलें होतें. त्याचे जाब आले ते पाहून, नाइकांस दाखऊन, राजश्री नारो आपाजी याजकडे पाठविले आहेत.ते तुह्मासी बोलतील. त्याविसीं फिरोन कागदपत्र काय लागतील ते तयार करऊन, नाईक सांगतील त्याप्रमाणें ऐवज आणावयाची तर्तूद करून, ऐवज सरकारांत सत्वर येई तें करणें. जाणिजे. छ १३ रजब, सुा खमस सबैन मया व अलफ. हे विनंति.

श्री.

लेखांक ९४.

१६९७ चैत्र वद्य २.

चैत्र व॥ २ हबशास पत्र कीं आंसाहेबानीं शेकअल्ली जमातदार याचे जबानीं मजकूर ऐकोन मेहरबानी करून खत

पाठविलें तें पावोन खुषवक्ती हासील जाली. कितेक मजकुराचा माारनिलेचे जबानीं हवाला देऊन लिहिला तो कलम जमातदार याणीं येथें येऊन आपले दिलांतील अर्थ जाहीर केला. तो दर्यात करून बयानवार हकीकत हजूर श्रीमंतसाहेबाकडे अर्जदास्त लेहून पाठविला असे. हुजुरून हुकूम आल्यावर साहेबांस जाहिर करूं. कितेक मजकूर जमातदार माारनिले याचे जबानीवरून कळतील.

हू.

लेखांक ९५.

१६९७ चैत्र वद्य ७.

अजम वुइलिम हारनबी इस्कोयर प्रजीदेंत गोवर्णदोर जनराल बंदर मुंबई दाममहबतहः—

शाहामत अवली मर्तबत हशमत व मजीलत मवलात दस्तगाहाय अतिजाद दोस्तां अजि ज्यानीब ाचर्ती विठल सलाम अजाम आंके येथील खैरखुशी जाणून आपली खैरखुशी हमेषा कलमीं करीत गेले पाहिजे. दीगर. बहुत रोज मोहिबाकडून खत येऊन खबर मालूम होत नाहीं. याजबरोन ताजूब दिलांत आलें आहे. तरी हे बात दोस्तीचे जागां लाजीम नसे. खतखतूत हमेषा पाठऊन दिलखुषी बेयैत करावे. शाहामतअवलीपन्हा महादजी सिंदे फौजसुद्धां शाहामतपन्हा तुकोजी होळकर फौजसुद्धां गुजराथप्रांतें दरकुच येऊन नर्मदापार मुकाम केला आहे. इजानेबाही याचे सोबत आहेत. त्यास, याची व मोहिबाची दोस्ती एकरंग चालावी हें इज़ानेबाचे दिलांत येऊन हें खत कलमी केलें आहे. तरी आपले ादिलांतील खुलाशाचा मजकूर कलमी करावा. त्याबमोजी शाहामतपन्हा यांजसी जवाबसाल होऊन कलमी केला जाईल. पेशजी इज्जतमहा दादो मल्हार मोहिबानजीक रवाना केले ते जाऊन पोहोंचोन मजमून मालूम केलाच असेल. तरी ज्या बातेंत दुतर्फा दोस्ती इज्यानेबाचे दरम्यानागिरीनें चालेल तेच बात दिलांत आणावी यांतच नफा असे. ज्या बाता त्या मकानीं असतां रुबरू बोलण्यांत आल्या होत्या, त्याप्रमाणें गुदस्तां दरपेष अंमलांत आल्या. याची हायेस दिलांत आलीच असेल. हेंच जाणून दोस्तीचे जागा कलमीं केलें आहे. तें दिलांत यावें. परस्परें दोस्ती यांची व मोहिबाची असावी, यांत नफाच दुतर्फा आहे. व दीगरबात परस्पर असिल्यानी नफा नाहीं, हेंच इजानेबाच्या बातांत व दोस्तीचे जागां मालूम व्हावें, सबब कलमीं केलें आहे. तरी हे बात दिलांत आणून जवाब पाठवावा. रा॥ छ २१ सफर. ज्यादा काय लिहिणें ? इ॥ किताबत.

श्री.

लेखांक ९६.

१६९७ श्रावण.

श्रीमंतास जाबसाल ल्याहावें. इष्टोलाविसींचा मजकूर येण्या राहण्याचा तेथें दोघे ममतेचे आहेत.

१ मेस्तर होम. १ मेस्तर हटली, गाईकवाडापों. दाहा किटीणीकडे आले. पो साडेसाहा सरकारांत आले. बाकी ऐवज अमानत ठेवावा. दरमहा घेतला पाहिजे, ह्मणून किटीण ह्मणतो. त्यास, दरमाहांत माहाल लाऊन दिल्हे आहेत. मसलत सेवटास गेली पाहिजे. त्यास, जनरालास पुसोन दोहोंचे जमेची घेऊन पाठवणें ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास,

दरमहाचे ऐवजांत गाइकवाडाचा ऐवज वेणें, हें सेवकास अगोदरच समजलें आहे व सेवेसीही लिहिलें आहे. हालीं यास पुसावें तरी हे ऐवज देवीत नाहीं आणि उगेंच हलकें व्हावेंसें होतें. महालाचा तपसील तरी उज्याड मुलुक आहे. आमोद तरी नेहमीं दिल्ही. हसोटचा कजीया ऐसा. हे तपसिलाखालींच जे समजोन कांहीं बोलिलों नाहीं. बंगाल्याचा हुकूम आलियावर सर्व नीट होईल.

कारनेलीची वाईट गोष्ट जनरालाजवळ आजपर्यंत बोलिलों नाहीं. व मागील गोष्टीचें प्रयोजनही नाहीं. सेवकाचा दोष निवारण व्हावा म्हणून दुभाषास दाखवावयाकारितां सेवकाचे पत्रावर मोहर करून पाठविली, म्हणोन पत्रीं आज्ञा. त्यास, मोहरेचें पत्रच आलें नाहीं. तेव्हां शोध करावा.

ओझ्यास उंटें पन्नास व सासे बैल दिल्हे असतां, हजार गाडे आणावयास डबईस माणसें किटणीनें पाठविलीं आहेत. येविसीं बोलून हुकुमाप्रों चालत तें करणें, म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास, खंबाइताहून निघतेसमयीं आमचें वोझें दोन तक्षिमा न चाले म्हणून राहिले. एक तक्षम मात्र आलें. त्यास, तंबूखेरीज इंग्रजाची हैराणगत जाली, म्हणोन मेस्तर वारलीस बोलत होता. त्यास, वोझ्याविसींची गोष्ट त्यास रुचणार नाहीं. यास्तव तूर्त बोलणें ठीक नव्हे. बंगाल्याची अवधी होऊन जाजती दिवस जात आहेत. तात्पर्य उगेंच रहावें हें ठीक दिसतें.

अवधी राहिली नाहीं. प्रसंगास्तव बोलिलों. आज्ञेपूर्वींच सारे अर्थ सेवकाचे ध्यानांत आहेत. परंतु हा समय नाहीं. याचा संतोष राहून जें होईल तें करणें उचित. आपला काल प्रतिकूल आहे. या समयांत एकादी गोष्ट बोलतां बोलतां त्याणीं वाईट मानिल्यास जर सनद त्याजवळ नासिली तरी पुढें ऐवज सरकारांत मागतील. यास्तव समज द्यावी. याशिवाय कांहीं दिक्कत असिल्यास आज्ञा व्हावी. १

सुरतकर मोगलाकडील बाकीचा फडशा निमेवर जाला. त्यास साऱ्या ऐवजाचें कबज सुरतकर मागतो. येविसीं जनरालास बोलोन साराच ऐवज सुरतेस येई, ऐसीं पत्रें पाठवावीं, भडोजेस निम्मे, सुरतेस निम्मे, ऐवज द्यावा, ऐसा करार. तेव्हां कराराप्रमाणें त्याजवळ दस्तऐवजी असली पाहिजे.

श्री.

लेखांक ९७.

१६९७ भाद्रपद शुद्ध ४.

राजेश्री लक्ष्मण आबाजी गोसावी यांसि:-

सुा सीत सबैन मया व अलफ. राजश्री विश्वासराव यशवंत याचीं पत्रें सुरत अठाविशींतून आलीं. त्यांत मजकूर लिहिला कीं, सरकारची फौज माहालचे रखवालीकरितां सोनगडाकडे गेली. हेबातमी फितुरियांचे फौजेस कळोन, सोनगड डावा टाकून, फितुरियांची फौज सरकारचे फौजेस आडवी आली, असें वर्तमान आलें. त्यास, सरकारचे फौजेची मदत लौकर झाली पाहिजे, याजकरितां हें वर्तमान करणेल किटिणीस कळवून, तिकडील रवानगीचा निश्चय करून, उत्तर लौकर पाठवणें. याखेरीज कलमें उगवावीं:-

दरमहाचे पांच ल- १ निम्मे मुलूख अक्षांत गुजरात वगैरे थवा रुपायास दररसद व फत्तेसिंगाक- माहाचे उशीर लागडील धरूं नये. त्यास त्या वेळेस कुच

त्याणीं रोख पाठ- करून हमराहा पार- वावे. पत्त्यास चलावें.

मजकूर गुजरून ठीक करणें. जाणिजे. छ ३ रजब- (लेखनावधिः)

श्री.

लेखांक ९८.

१६९७ भाद्रपद शुद्ध १३.

श्रीमंताकडे पत्रें रवाना, भाद्रपद शुद्ध १३ गुरुवार मुकाम भडोजः-

मेस्तर मार्टीन व मेस्तर फ्लेचर यांचें म्हणणेंः लडाई बंद जाहलियाची तकसीर जनरालाकडे अथवा कोषल याजकडे नाहीं. बंगाल्यांतून हे गोष्ट जाली आहे. इतके दिवस सरजनराल नव्हता. आह्मी श्रीमंताची कुमक केलियावर विलायतेहून आला. त्याजकडे मेस्तर टेलर पाठविला आहे. पंधरा दिवस, निदान वीस दिवसांत बंगालियास पोहोंचेल. तो सरजनरलास समजाऊन सांगोन खामखा गेल्या दिवसापासून दीड महिन्यांत परवानगी घेऊन पत्रें पाठवून देईल. तोपरियंत श्रीमंतांनीं स्वस्थ असावें. इंग्रेजी लष्कर श्रीमंतासमागमें राहील. जनरालानें श्रीमंताचा हात धरिला आहे तो कदापि सोडणार नाहीं. श्रीमंताची बाजी सिध्धी जाईल.फिकीर करूं नये.बंगालेवाले मुमईकराची गोष्ट ऐकतील, ऐसें दृष्टीस येतें. याप्रमाणें बोलले. २

करनेल यांनीं निशापत्र जातीनें लेहून दिल्हें. हें मिस्तर मार्टीनास व मेस्तर फ्लेचर यांस ठाऊक नाहीं. हें वर्तमान थोडेंसें कळल्यावर त्याणीं आश्चर्य केलें. या उभयतांस ठाऊक नाहीं, तेव्हां जनरालासही ठाऊक नसेलसें आहे. ते मुंबईस गेल्यास सर्व कळेल. उभयतां म्हणत होते कीं, गोविंदराव गाइकवाड यांनीं जनरालास पत्र पाठविलें कीं श्रीमंतांनीं फत्तेसिंग याजपासून रुपये व्यावयाचा करार केला, यांत आमची खुषी आहे म्हणोन पत्र पाठविलें असतां आतां कां अमी होतात ? त्यास, मींही समयिक उत्तर केलें. त्यास, याप्रमाणें सेनाखासखेल याणीं पत्र पाठविलें कीं काय, याचा शोध उगाच असावा.' १

मेस्तर शहाकडे कांहीं अपराध असल्यास महिन्या पंधरा दिवसांत छाण करतां कळेल. अंगीं असल्यास त्यास बरतर्फ करणार, त्याजकडे दोष फार आहेत, म्हणोन इष्टोल सांगत होता. १

नर्मदेस पूर मातबर आला. यामुळें उभयतां मेस्तरांनीं आह्मांस राहऊन घेतलें. पाणी उतरलें म्हणजे जावें. पलीकडे कीम नदी आहे तीस पूर आला आहे. नर्मदेचा पूर उतरेल तेव्हां तेथें उतार सांपडेल. तेथें नावा नाहींत.उतार अवघड.म्हणोन राहऊन घेतलें.

मेस्तर शहानें मुंबईचे कोसलदारांची व जनरालाचे मर्जीची माहितगिरी सांगितली. मस्तुतची गोष्ट बंगालियांतूनच जाली आहे. मुंबईवाल्यांस अभिमान पडला आहे. ते श्रीमंताचा हात धरिला तो सोडणार नाहीं व दिलगीरही आहे. कारण दुसरा जनराल विलायतेहून रवाना केला तो महिन्या पंधरा दिवसांत मुंबईस पोंहचेल. तेव्हां श्रीमंताकडून जो लाभ होणें तो नव्या जनरालास होईल, आपल्यास कांहीं नाहीं म्हणोन दिलगीर आहे. सारांश, आपलें काम विलायतेशिवाय होणार नाहीं.खषकीचे वाटेनें कोणी शहाणा माणूस पाठविल्यास आठ दहा महिन्यांत बंदोबस्त पक्का होऊन येईल. याप्रमाणें सांगितलें. त्यांचें मान जावयाचें दिसतें. स्पष्ट बोलोन दाखवीत नाहींत. परंतु यास पाठवावयास

सला ठीक नसे. याविसीं बापू सारस्वतासी बोलिलों आहे. हा निवेदन करील. १

पु॥ सेवेसी विज्ञापना. मेस्तर माष्टीन व मेस्तर फ्लेचर उभयतां आमचे बिराडास बुधवारीं सायंकाळीं येऊन सांगितलें कीं, श्रीमंतास लिहिणें कीं, कोणेविसीं फिकीर न करावी. मेस्तर माष्टीन गंगाबाईप्रसूतसमई पुण्यांत होते. त्यास पुत्राचा संषय पुसिला. त्याणीं सांगितलें कीं, प्रसूत जाली तें अर्भक निवर्तलें, उपरांत दुसरें वेतलें असेल, निवर्तल्याची खबर आह्मी ऐकिली, पांचजणी बायका गरोदर जवळ होत्या. याप्रमाणें सांगितलें. १

श्रीमंतांस आह्मी पत्र पाठविलें आहे कीं, कामकाज लागल्याची आज्ञा करावी ह्मणोन मेस्तर माष्टानानें सांगितलें. उपरांत बापू सारस्वताची गांठ घालून दिल्ही जे, सरकारचें कामकाज आज्ञेवरून हे तुह्मांस सांगतील, त्याप्रमाणें करून देत जावें. त्याणीं कबूल केलें. अनुष्ठानाच्या ब्राह्मणाचा मजकूर सांगितला. त्याचे हरएक साहित्याविसीं कबूल केलें. त्यास, महाराजांनीं या उभयतांस पत्रें व किरकोळी आज्ञा करणें ते करीत जावी. आज्ञेप्रमाणें करितील. १

आज्ञेचे अन्वयें निकडीनें मुंबईस पोहाचावें, ह्मणोन कस्त करीत आहें. परंतु पर्जन्य भारी व कीम नदीस उतरावयास उपाय नाहीं. यास्तव एक दिवस अधिक लागला. १

मेस्तर होमानें सरकारांत पत्र इष्टोलाचें लखोटयांत घालून पाठविलें. रूचरू नेऊन गुदरणें, ह्मणोन त्याजला लिहिलें. मेस्तर टेलर बंगालियास श्रीमंताचे कामाकरितां गेला, भाद्रपद शुद्ध ३ मंगळवार, आज दहा दिवस जाले, ह्मणोन सांगितलें. त्यावरून मित्ती लिहिली असे व पत्र दिल्हें तें पाठविलें आहे. सेवसी पावेल. १

येणेंप्रमाणें येथील वृत्त कच्चे सेवेसी कळावें ह्मणोन लिहिलें आहे. सुरतेस जाऊन, गंभीरास बोलून, जलदीनें मुंबईस जातों. उभयतां मेस्तर ज्या गलबतावर बसोन मुर्मईहून आले, तें गलबत चांगलें. त्याजवर बसोन जाणें, म्हणोन उभयतांनीं सांगितलें. त्याप्रमाणें जातों. जनरालास स्वामीचे कामाचा अभिमान बहुत पडला आहे कीं, केली गोष्ट सिद्धीस न्यावी. याप्रमाणें बहुतजण इंग्रेज सांगतात. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

श्री.

लेखांक ९३.

१६९७ आश्विन शुद्ध १५.

शेवेसी लक्ष्मण अपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान्ता आश्विन शुध्ध पौर्णिमा रविवारपर्यंत महाराजाचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. मुंबईस पोंहचल्यावर जनरालाची भेट होऊन बोलणें जालें. त्या मजकुराचीं पत्रें दोन सेवेसीं पूर्वी पाठविलीं आहेत. पावोन वृत्त कळलेंच असेल. जनरालास अभिमान मोठा पडिला आहे. मेस्तर टेलर खासखा काम करून येतो, हा भरंवसा यांस आहे. त्याचें पत्र यावयास पन्नास दिवसांची मुदत जनरालानीं सांगितली होती. त्यास, तेरा दिवस जाले. बाकी सवा महिन्याची प्रतीक्षा आहे. आज्ञेप्रमाणें खर्चाविसीचे मार बोलिलों, परंतु ते गोष्ट घडत नाहीं. तपसीलवार पूर्वी लिहिलेंच असे. हालीं नवीन मजकूर बातमी:—

बारभाईची कांहीं जमीयत चार हजारपर्यंत साष्टीचे रोंखावर तळोजे म्हणून गांव

आहे, तेथें खाडीपलीकडे आली. तेव्हां जनरालानीं आपली जमीयत साष्टीचे कुमकेकरितां हजार माणूस मद्रासी पाठवून ठाण्याचा बंदोबस्त केला व पुरंधरास पत्रें पाठविलीं कीं, लढाई बंद बंगाल्यांतून जाली असतां साष्टीवर तुमची जमीयत आली हें काय, तैसेंच तुमच्या मनांत असिलें तरी सांगणें. या अन्वयें पाठविलीं असेत. हे गोष्टीस बारा दिवस जाले.अद्यापी बारभाईची जमीयत तळोज्यासच असे.बारभाईकडून अंतर पडावें म्हणजे बंगालेवाल्यास जाबसाल करावयास येईल. याप्रों कलह निर्माण जाला आहे. परंतु विस्तार होतां दिसत नाहीं. कलम १

जलदीनें खुषकीनें पत्रें स्वामीकडे पाठवावीं तरी, सांप्रत बारभाईनीं बंदोबस्त फार केला आहे. कासीद निभणार नाहीं. यास्तव जलमार्गें रवाना करितों. हीं पोंचावयास च्यार दिवस अधिक लागत असतील, परंतु खुषकीनें उपाय नाहीं. जहाजांतून रवानगी परतंत्र म्हणून विलंब लागतो. कलम १

पुा. मर्जी प्रसन्नसी दृष्टीस पडिल्यापासून कांहीं कांहीं युक्तीचे वाटेनें बोलोन, येथें तीन कोशलदार १ मेस्तर द्रेपर १ मेस्तर रामसी १ मेस्तर आसीलेबारहन येकूण तीन आहेत, यांची भेट घेतली. वस्त्रें दिल्हीं. यांत द्रेपर मात्र सरकारचे लक्षांत विशेषसा नाहीं. उभयतांत तरी पेंच आहेत. त्याचेही म्हणण्यांत कीं, खासा बंगाल्यास मेस्तर टेलरानें सारा मजकूर समजाविल्यानंतर लढाईच ठरत्ये. चिंता न करणें. असें वारंवार समाधान करितात. येथें पुणियाहूनही पत्रें कांहीं कांहीं येत असतात. त्याचा अर्थ मनास आणून मागाहून सेवेसी लिहितों.

करनेल अपटण बंगाल्याहून पुरंधरास रवानां जाला होता तो निजाम अल्लीखान याचे मुलकांतून बारभाईचे अमलाचे सदरेस येऊन पोंहचला. इंदोरी म्हणून गांव आहे. त्या सुमारास कोणी दगा करून मारून टाकिला. बहुतशी जमीयत समागमें नव्हती. होते त्या साऱ्यांस मारिलें. बारभाईचे अमलांत मारिलें. याप्रों येथें खबर आली आहे. लिहिलें आलें नाहीं. खबर मात्र आहे. पक्की असली तरी दुणावेल. लिहिलीं येतील. शोध करून मागाहून सेवेसीं लिहितों. कलम १

चेनापट्टणाहून कासीदपत्रें घेऊन मुंबईवाल्याकडे येत होते. ते पत्रें कल्याणास यांनीं धरून पुण्यास पाठविलीं. कासीद कैदेंत होते, त्यांतून येकजण पळोन आला. त्यावरून बारभाईचे कारकून येथें आहेत, त्यांस पत्रें आणून देणें म्हणून ताकीद केली. तथापि अद्यापि पत्रें इंग्रजाचे हातास आलीं नाहींत. याप्रों किरकाली गोष्टी होऊन, इंग्रेजास विषाद येत असतो. कलम १

जनरालास बंगालवाले आपलें ऐकतील-सा भरंवसा बहुत आहे. यास्तव हे म्हणतील तैसें तूर्त ऐकावें, सलाह उचित आहे. स्वामीनीं कोणेविसीं जलदी करूं नये. यांणीं अभिमान सोडिल्यास खोटी थोडी महिन्यांची राहिली आहे. इंग्रजाचे सोबतीचा गुण व्यर्थ होणार नाहीं. कांहीं येक प्रकारें चांगलेंच होईल. जनरालास पत्रें तुमचे लिहिल्यावरून व लक्ष्मण अपाजी बोलिला तो मजकूर त्याणीं हजूर लिहिला आहे त्याजवरून तुमचे भरंवशावर मुदतीची प्रतीक्षा करीत आहे. याअन्वयें मर्जीस आल्यास पत्रें पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. वरकड मार हसोट आंकलेश्वर व तेती लक्षामध्यें व वसई साष्टीचे

वतनासमधें बोलावयाचे आहेत. परंतु समय नाहीं. पुढें लढाई सुरू जाल्यावर ठकि पडेल. यास्तव जलदी करीत नाहीं. याचा

श्री.

लेखांक १००.

१६९७ आश्विन वद्य ३.

राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यासि:-

सु॥ सीत सबैन मया व अलफ येथील सारी माहितगारी तुह्मांस आहेच. सारांश फतेसिंगास आश्रय जबरदस्ताचा सांपडला, सबब ऐवज हातास येत नाहीं व शेवाहि नाहीं. गोविंदराव तरी जातीनें वोढक व कोणाचे आश्रयानेंहि छंद करितो ऐसें दिसोन येतें याचे तपसील पत्रीं कशास ल्याहावें? तुह्मीं माहितच आहा. असो! बहुत लेहून फल काय? खुलासा मजकूर:— येथील इंग्रेज आमचे हुकुमांत असिल्यास उभयतां गायकवाड आर्जेत वर्ततील व ऐवजहि मिळेल. पुढील मसलतेस उपयोगी पडेल. थोरले मसलतीस इंग्रेजी सामान तूर्त बंद आहे. परंतु गुजरातचे बंदोबस्तास तरी उपयोगी असावें. उफराटा फतेसिंगास आश्रय त्याचा. मग फतेसिंगानें कां न ओढावें? गोविंदराव आपला. त्यास मात्र दाबल्यानें लोक हंसतील. उत्तम पक्ष, फतेसिंगासच दाबावें. निदानीं दोघांसहि दाबून सरकारकाम करावें. सांप्रत कांहींच होत नाहीं. सबब आम्हीं रेवातीरास आलों. पुढें काय मसलत करावी ते लिहिणें. जसें जनराल कोशल सांगतील तसें केलें जाईल. तूर्त च्यार दिवस रेवातीरीं पाणी पिऊन स्वस्थ आहों. परंतु फौजेस व पाईदळास पोटाचें संकट पडलें आहे. देशचीं राजकार्जे बहुत लागलीं होतीं व सांप्रतही आहेत. परंतु बंगाली खबरा ऐकोन कांहीं दचलीं; कांहीं आहेतच. तुह्मास कळावें. इकडील मजकूर सविस्तर राजश्री रामचंद्र विठल यास आज्ञा केली आहे, त्याचे लिहिल्यावरून कळेल. तें समजोन त्याप्रें॥ बंदोबस्त करणें. जाणिजे. छ १५ शाबान बहुत काय लिहिणें?

(लेखनावधि:)

श्री.

लेखांक १०१.

१६९७ आश्विन वद्य ३.

पुा राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसि:—

सुा सीत सबैन मया व अलफ. पा॥ हासोट हा माहाल कोपनीकडे दरमाहाचे ऐवजांत दिला होता. त्यास फतेसिंगाकडील ऐवज व राजश्री गोविंदरायाची वांटणी व फतेसिंग चाकरीस स्वारी-बराबर वगैरे जाबसालाचा फडशा करोन देतों. माहाल बक्षीस द्यावा, ह्मणून कारनेलानीं आड घातली. तेव्हां ऐवज सध्यां उपयोगास यावा वगैरे जाबसाल बोलून यावें या अर्थें पा॥ मारची सनद मध्यस्ताजवळ दिल्ही. ती सनद घेऊन ठेविली. जाबसाल तैसेच राहिले. ऐसी याची रीत आहे. व पा॥ अंकेलश्वर येथील पाऊण लाख रुपये मात्र सरकारचे कमाविसदाराकडून देवावे. त्यास, तेथें मेस्तर शाहानीं ठाणें घातलें तें उठवावें. तरी जनराल विरुद्ध मानितील. याजकरितां तुह्मांस त्याचे जाबसालाकरितां सांगितलें होतें. त्यास, येविसींचा जाबसाल करोन पाठवणें. पाचे ठाणें सरकारचें सरकारांत द्यावयाविसीं तेथून पत्र पाठऊन देणें. जा-

णिजे. छ १५ शाबान. बहुत काय लिहिणें? तुह्मीं प्रसंग पाहून करावें. येथून वरचेवर लिहितों हें सूचना मात्र समजणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १०२.

पो छ २६ साबान

१६९७ आश्विन वद्य ५.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री लक्ष्मणपंत अण्णा स्वामीचे सेवेसीः—

पो रामचंद्र विठल कृतानेक दंडवत प्रणाम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. आपण गेल्यादारभ्य पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. सदैव आपलेकडील वृत्त लिहित जावें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांची स्वारी बडोदियाहून निघोन छ ११ शाबानीं रणगडास रेवातीरीं येऊन दाखल जाली. श्रीमंत राव व सखाराम हरि गायकवाडाचे कारभाराकरितां मागेंच आहेत. आजपर्यंत खासा स्वारी या प्रांतें रहावयाचें कारण, सुरत अठाविशींत चिखल भारी, तोफा चालावयाचें संकट. दुसरा प्रकारः गुजराथ निर्बंध करावी, बडोदें—अहमदाबाद द्यावीं, मसलती पुढें जाण्यास पृष्ठीं बल,या अर्थें राहिलों. त्यास फत्तेसिंग गायकवाड याचा कारभार कारनेल किटींण यांचे विद्यमानें जाला. पंचवीस लाख ठरले. एक महिन्यानीं पंधरा द्यावे. दुसरे महिनियांत दहा द्यावे. जर पहिल्या हप्त्याचे पंधरा न आले तरी बडोदें घेऊन द्यावें. याप्रमाणें करार होऊन कारनेलीचें जातखत लेहून घेतलें. त्यास पहिले हफतियाचे रुपये न आले. ऐवजाचे लोभास्तव केलें होतें तें न जालें.बडोदें घेऊन द्यावें, तेंहि किफायतच. त्यास, बडोदें घेऊन देईनात. त्याचा पक्ष करूं लागले. राजश्री गोविंदराव यासी करार केला होता कीं, पहिल्या हफत्याचें न आले ह्मणजे बडोदें घेऊन देऊं. त्यासही भरंवसाच होता कीं, फत्तेसिंगास रु॥ मिळत नाहींत, दिवस काढितो, वाइद्यास जिंकोन बडोदें द्यावें, याप्रमाणें होता. त्यास दोन्ही गोष्टी करारप्रमाणें न जाल्या. दुसरा हप्ता होऊन गेला; पहिल्यास ठिकाण नाहीं ! तुह्मीही माहीत या गोष्टीस आहां. आजपर्यंत साडेसहा लक्ष मात्र अजमासें सरकारांत आले. वरकड ठिकाण नाहीं. तेव्हां इकडून निकड होत गेली. रुपया न मिळे. तेव्हां गोविंदरायास हिस्सा दौलतेचा तिसरा देतों, तिसऱ्या हिशाचे रुपये त्याजकडे सोळा लक्ष सासष्ट हजार सासे ऐशी देऊं. याप्रमाणें मध्यस्ताचे तर्फेनें त्रिंबकजी भालेराव बोलून गेले. पट्टण वगैरे ठाणीं, मुलूकसुद्धां, सरकारांत द्यावीं, गोविंदरायाची समजावीस करावी, बोलिले. त्यास, गोविंदराव मान्य नाहीं. सरकारांतूनही दोन तीन लाखांची कबूल केली असतां, त्याणीं वोढून, कूच करोन महीपार गेले. फत्तेसिंगाकडून ठाणीं सरकारांत यावीं, मग थोडेंबहुत सरकारांतून देऊन गोविंदरायास दाबून दबावून समजावीस करावी, तरी ठाणींही फत्तेसिंगाकडून येत नाहींत, हालीं गोविंदरायाचेच हवालीं करार, ऐसी दिक्कत करितात. सरकारचे रुपये दोहिशांचे ह्मणावे तरी, गोविंदरायानीं वसूल घेतला ह्मणून पर्याय लाविताति ऐवजास ठिकाण नाहीं पा हासोट हा महाल दरमहाचे ऐवजीं इंग्रजाकडे दिल्हा आहे.

तो बक्षीस कोपिनीचे सरकारांत द्यावा ह्मणजे फत्तेसिंगाकडील ऐवज वं तिजाई वांटणी व चाकरी वगैरे जाबसालांचें फडशे करोन देतों, ह्मणून कीटणीनें दरम्यान आड घातली. तेव्हां परगणेमजकूरची सनदहि करोन, मध्यस्त बोलणार त्यांजवळ दिल्ही असतां रुपये देत नाहींत व गोविंदरायाचा विभाग देऊन त्याची समजावीस होत नाहीं. ऐवजाचे लोभास्तव व मसलतीचा उपयोग पाहून कारभार केला. त्याची गत ही केली ! हालीं आणखी अडीच लक्ष एक महिन्यानीं देऊं, ह्मणतात. गोविंदराव गेलेच आहेत. त्यांणीं मुलकांत उपद्रव केला ह्मणने तोहि ऐवज त्यांचे वसुलांत गेला, म्हणतील. एवंच ऐवज नाहीं. पदरचे गोविंदराव फौज सुद्धां गेले. फत्तेसिंगाचे चाकरीचा उपयोग नाहीं. कीटणीचा आश्रय करून बसले. चहूंकडून मसलतीस पेंच पडला. खर्चाची वोढ, लोकांचा गवगवा, तो लिहितां पुरवत नाहीं. अहमदाबाद द्यावी; त्यास इंग्रेजाचें नेट कमी पडलें. गोविंदराव उठोन गेला, तेा शहरांत गेला म्हणजे भारी पडेल, याजकरितां आपाजी गणेश यांनीं आपलेकडेच मामलत ठेवावी ह्मणून संदर्भ लाविला. तें कबूल करणें प्राप्त झालें. चार पांच लक्ष रुपये त्यांनीं द्यावेसें केलें आहे. परंतु ठाणियांत सरकारचें माणूस नाहीं. तेव्हां त्याचा अर्थ कळतच आहे. ऐसें चहूंकडून गायकवाडाचे कारभाराचे वोढण्यामुळें मसलत फसली. उपाय याजपुढें नाहीं. याजकरितां हें मजकूर जनरालासी बोलोन काय करावें तेसला पुसणें. ऐवज येत नाहीं त्यापक्षीं फत्तेसिंगाचे महाल जप्त करून ४ रु. द्यावयास येतील. फौजेचे पोटाची सोय पडेल. याजकरितां त्याचे विचारास कसें येतें तें पुसणें. कारनेल सरकारचे उपयोगाचें तें करितो, म्हणतात. परंतु ऐसे प्रकार आहेत,समजत नाहीं. आजपर्यंत सोशिले. हालीं लोक उठोन जावयाचे. विचारावरी आले. पैक्यास दर्शन नाहीं. भाषणाचेच प्रकार. बोलण्याचा धरच नाहीं. ऐसें आहे. रवाना. छ १७ शाबान. बहुत काय लिहिणें ? लोभ असो दीजे. हे विनंति. कोणताही कारभार विल्हेस लागेना. बडोद्याजवळ खराब होत बसावें, याजकरितां श्रीमंतांनीं कुच करोन रेवातीरास यावयाचें केलें. चार दिवस श्रीमंत रायास मागें ठेविलें. कांहीं सोय पडली तरी पहावी, म्हणून ठेविलें. परंतु कोणतेंही घडत नाहीं. याजकरितां जनरालास सला पुसोन ल्यावें. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. जरी इंग्रेज श्रीमंताचे हुकुमांत असता, तरी फत्तेसिंगाचे कारभाराचा बखेडा न होता. गोविंदरायांसहि दाबून सांगावयास येतें. येथील गृहस्थाचे वोढण्यामुळें मसलतीची घाण झाली. तुम्हांस कळावें. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

श्री.

लेखांक १०३.

१६९७ आश्विन वद्य ७.

पुरवणी राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यांसि:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ.

कारनेल कीटिण याजकडे पहिली सरकारचीं उंटें दोनसें होतीं. त्याजवरी मनस्वी वोझें लादून खराब केलीं. तीं मेलीं. हालीं बडोदियाहून कुच करोन यावयाकरितां पन्नास उंटें व साहासे बैल दिल्हे.ऐसें असोन, हालीं शंभर गाडे पा॥ डबाई येथील आणा-

वयाकरितां दोनसें माणसें पाठविलीं आहेत. अगोदर तेथें राहून परगणा खराब केला. प्रस्थुत याप्रों। करितात. कांहीं रीतीचा प्रकार राहिला नाहीं. कजीया करावा तरी दूर पहावें लागतें. याजकरितां तेथून यास पत्र येऊन सरकारचे हुकुमासिवाय वर्तणूक न करीत तें करणें. सर्वाविषयीं वोढकता. तुह्मांस वाकफगारी आहे. दिवसें दिवस अधिक ओढितात. इलाज नाहीं ! येविसी जनरालास पुसावें. मसलत काय सांगील त्याप्रों। करावें. तूर्त मसलत तोंडीं येऊन बैद जाहाली. फौज व सिपाई दळ आहे, त्यास दरमहा पांच लक्ष रुो पाहिजेत. येथें तरी लक्षाची प्राप्त नाहीं. मोठें संकट पडलें आहे. कोठें इलाज चालत नाहीं. सिबंदीची नित्य कटकट पडली आहे. कसें करावें, तो विचार लिहिणें. जाणिजे. छ. १९ शाबान. बहुत काय लिहिणें. (लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो.

(श्रीमत् रघुनाथराव)

लेखांक १०४

१६९७ आश्विन वद्य ९.

रा। लक्ष्मण अपाजी यासिः—

सु।। सीत

मिस्तर होम आला. हा दोहींकडे समजाऊन डाक बसवीलसें दिसेन येतें. यास्तव कारनेलीची वाईट गोष्ट पत्त्याशिवाय बोलूं नये. सांप्रत कारनेलावर वज्रहोम आला आहे. आतां याच्यानें वेडें वांकडें ओढवणार नाहीं. इतके दिवस ओढिलें, तेव्हां कोणी दुसरा मुद्दई नव्हता. आतां चिंता नाहीं. परंतु, मिस्तर होम त्याचे हि बरेंच च्याहातो व सरकारचे कामावर हि नजर आहे. यास्तव कारनेलीसी वाद करूं नये. आपल्यास कार्मासी गरज.

एकूण पांच कलमें लिहिलीं आहेत. जाणिजे. छ २१ साबान.

(लेखनावधिः).

श्री

१६९७ कार्तिक शु• १

लेखांक १०५.

पु।। राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यांसिः—

सु।। सित सबैन मया व अलफ.

अलाहिदा लिहिलें आहे तें जनरालाचे दुभाशास दाखऊन, त्याणें इंग्रेजी लिहिले त्यास दाखविल्यास तुमचे सांगितल्याचे दोष उडतील. लटीकवाद येणार नाहीं. व सरकारची मातबरी पोख्ती राहती. कारनेलीबराबर वाद केल्यास मातबरी राहात नाहीं; यास्तव पत्राची इंग्रेजी नकल करून त्याचे नजरेस पडे तें करणें. सुचक विचार लिहिला आहे, परंतु तुमचे युक्तीस येईल तसें करणें. तुमचे पत्रावर मोहर करून पाठविली दुभासियास प्रमा +++ सबब केली असे. जाणिजे. छ २९ शाबान.

(लेखनावधिः)

खरी हि गोष्ट असाक्ष असिल्यास बोलूं नये. तिची पंचाईत पडल्यास लटीक—वाद येईल. पत्तेवार मात्र बोलावी.

कितेक तपसील रामचंद्र चिटणिसाचे पत्रावरून कळतील. कारनेलीसी ओढूं नये, ह्मणोन लिहिलें. त्यास, आम्हीं गैरवाजबी तरी ओढीतच नाहीं. वाजबी हि कांहीं बोलतों. कांहीं किरकोळ बोलतच नाहीं. सालढालीखालीं घालितों.

श्री.

लेखांक १०६.

१६९७ कार्तिक वद्य ३.

शेवेसी लक्ष्मण आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागा कार्तिक वागा २ शुक्रवारपर्यंत मुगा मुंबई स्वामींचें कृपेंकरून यथास्थित असे. विशेष बंगाल्याचा जाब अद्यापि आला नाहीं. जनराल कोसलदार रात्रंदिवस प्रतीक्षा करीत आहेत. मुदतीची अवधि तरी जाली. परंतु पत्र येऊन पोहोंचलें नाहीं. प्रस्तुतचे दिवस मुदतीपेक्षां अधिक जात आहेत. साऱ्यांचें लक्ष पत्राकडे लागलें आहे. आठ-रोजांत पत्रही येईल. इकडील विशेष वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलें आहे. अधिकोत्तर ल्याहावेंसें नाहीं.

महाराजांची स्वारी नर्मदा-दक्षण-तीरास आली हें वर्तमान रागा बज्याबा,चिंतो विठ्ठल, व बाळाराव निागा सिंदे,यांसि सेवकानें व त्याकडील आपाजी साबाजी येथें आहेत त्यांणीं लेहून पाठविलें आहे कीं, तुमचे संकेतप्रों श्रीमंत नर्मदातीरास आले, सोनगडास पोचल्या दाखलच. अतःपर तुह्मी विलंब न करतां सत्वर जाऊन सामील व्हावें, इंग्रजाचा पक्का भरंवसा आहे. ऐसीं दोन पत्रें पाठविलीं आहेत. महारा जानींही तिकडून याचअन्वयें पाठवावयाची आज्ञा करोन, ते लवकर येऊन सामील होत तें केलें पाहिजे. बाबूजी नाईक चौवेजन गावल्यानें दहा हजार फौज येईल. गुंता नाहीं. आपाजी साबाजीस शरिरीं समाधान नाहीं, याजमुळें राहिले. नाहीं तरी, यांसच पाठविलें असतें. अद्यापिही दोन चार दिवसांत किंचितसा उतार पडला ह्मणजे पाठवितों. जनराल यांचीं खातरजमा उत्तम प्रकारें करितील.

मुंबई सफा बारभाईंचे हातीं लागेल, ह्मणोन बहुत दिवस वार्ता आहे. सत्यनिथ्या न कळे. माहाराजांजवळ बातमी, असेल ते खरी, थीं करोत कीं, हे गोष्ट खरी न होत. १

बंगाल्यांतून काम होऊन येतें हा मोठा भरवसा यांस. हे सेवकाची खातरजमाही करितात. व सेवकासही याचे ह्मटल्यावरून भरंवसा वाटतो. परंतु हुकूम बंगालेवाले याचे हातीं आहे. यास महाराजांनीं फौजेचा जम पडेल तितका पाडावा. राजकारणानें येतील ते लौकर येतले करावें.

गोविंदराव गायकवाड थांस कसेंही करून समजून आणावयाची आज्ञा व्हावी. सरकारचे सरदार व फौज आहे ते न फाटल्यानें आणखी राजकारणानें बहुत येतील. जुने रुसोन गेल्यानें येणार मागेंपुढें पाहातील. यास्तव गोविंदरावसुद्धां सारे फौजेची एकत्रता राहेसी आज्ञा व्हावी. १

बज्याबा सिंदे वगैरे यांचीं राजकारणें. १

मेस्तर मास्तिनानें वस्त्रें घेतलीं नाहीं, बहुत आग्रह केला. तथापि पादशाची व कंपनीची आज्ञा नाहीं, ह्मणोन घेऊन मग सेवकाचे बिराडास पाठविलीं. बारभाईकडे लक्ष यामुळें न घेतलीं, ऐसा अर्थ नाहीं.

सरकारचेंही ममतेंत आहेत. १

येथें कोसलदारः—

१ मेस्तर ड्रेपर १ मेस्तर मास्टस १ मेस्तर प्लेचर १ आशबर्नर १ मेस्तर रामसी १ गारडीन बसऱ्याहून आला त्यासही कोसलांत घेतात.

य.स पत्रें सरकारांतून बहुमानाचीं यावीं. पत्रें आल्यानें यांस संतोष होतो व जनरालास ही फार गोड ममतापुरस्कर वारंवार येत असावीं.

इष्टोल यांस हजार माणसाची सरदारी जनरालानीं सांगितली. तें माणूस तयार होत आहे. पुर्ते तयार करावयासाठीं त्यास येथें बलाऊन घेतलें. अद्यापि येऊन पोहचला नाहीं. पोहचेल, तेथें जनरालाचे ममतेचे आणखी दोवेजण आहेत.

१ मेस्तर होम १ मेस्तर हाटली हे दोन आहेत. यांजपासीं अधिकउणें आज्ञा करणें असेल ते करीत जावी. उभयतां आपले प्रीतीचे ह्मणून जनराल सांगत होते. त्यांत मेस्तर हटली शाहाणा, खबरदार, मातबर आहे. हजार माणसाचा सरदार आहे.

गोवेंवाले फिरंगी याजवळ सरंजाम तयार आहे, ह्मणून ऐकिलें. त्यास, त्याजकडे युक्तीनें गुप्त पत्र पाठवून त्याचा शोध करितां त्यांजला सरकारचें एक पत्र पाठवावयाची आज्ञा कीं, कितेक आज्ञा लक्ष्मण आपाजी यांस केली आहे, हे तुह्मांस कळवितील, उत्तर लौकर पाठवून द्यावें.; व या-अन्वयें पत्र पाठवावयाची आज्ञा. पत्रांत स्नेहभाव बहुत असावे. १

राजश्री बापू व रामचंद्रजी आशिर्वाद उपरी. दर कुचास व दर लढाईस कारनेलींनीं अडवून मागावें तेव्हां कुच करावें. लढाईस कमी केली ऐसे, ऐसी नाना प्रकारें नालिश जनरालास कोणी समजाविलें ह्मणोन मेस्तर होमाचे गुजारतीनें किटणीनें श्रीमंतास विनंती केली, ह्मणोन विस्तारपूर्वक लिहिलें त्यास, कारनेल किटीण यांणीं बावापिराचें पुढें मात्र माइकवाडाचे कारभारसमंधें जातखत लेहून दिल्हें असतां, करारापरी निकाल न केला हें गोष्ट लहान-मोठ्यास ठाऊक. हें मात्र जनरालासी बोलिलों. वरकड दरकुचांत अडवून मागितलें अथवा लढाईंत कमी केली, हें किमपी आपण जनरालापासी बोलिलों नाहीं. कारनेलीची नालिश मात्र तिळमात्र केली नाहीं. जनराल व कारनेल व मी तिघेजण स्वस्तिक्षेम आहों. जनरालास पुसावें. त्यांणीं नालिशी केली असें म्हटल्यास कारनेलीचें म्हणणें खरें आहे. कारनेलीनीं नाहक आमचा संशय धरून वाईट मानावें ऐसें नाहीं.

सखाराम हरीकडील जासुदासमागमें पत्रें रवाना केलीं असत.

श्री.

लेखांक १०७.

१६९७ कार्तिक वद्य ४.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यासिः-सु॥ सीत सबैन मया व अलफ. नबाब निजामअलीखान यांचें सूत्र हुजूर आहे. परंतु फितुरी-यांकडे त्यांचें लक्ष. त्यास जनरालाचें पत्र नबाबास जावें कीं, आम्ही श्रीमंतांचा प्रतिपक्ष करितों, तेव्हां तुम्हीं श्रीमंतांचे नोकरांसी मिळोन जुंजास येणें हे गोष्ट उचित नाहीं, याजकरितां आपण फुतरि यांचा पक्ष सोडून श्रीमंतांचा उपयोग तें करावें, यांत उत्तम आहे, असें असोन आपण त्यासी मिळोन जुंजास येतील तर आम्हांस जुंजणेंच प्राप्त आहे. चिंता नाहीं, उचित तें ध्यानांत आणावें. याप्रों पत्र गेलियानीं कांहीं उपयोग पडला तरी पडेल. फितुरि यांचा पक्ष सोडतील, ऐसें दिसतें. याजकरितां याप्रमों ल्याह्याचें जनरालाचे सलेस येत असलियास युक्तीनें पुसणें. त्याचे सलेस येत नसलियास, अगत्य नाहीं, जाणिजे.

छ. छ १७ रमजान. लेखनावधिः

श्री.

लेखांक १०८.

१६९७ कार्तिक वद्य १२ वृद्धिः

राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यांसि. मुा सीत सबैन मया व अलफ.

तुह्मीं विनंतिपत्र व हैदर अल्लीखान यांचा खलिता पाठविला तो पावला. लाख रुाचे होन पाठविले आहेत ह्मणून माारनिलेनी लिहिलें आहे. जनरालांनीं तुह्मांस सांगितलेंच असेल. तरी ते वीस हजार पाचसे एकोणतीस दोन लाख रुपयाचे आले आहेत ते जनरालापासून घेऊन हुजूर पाठवून देणें. इकडील मजकूर कलमें:-

इंग्रेजी सामान स्वारी बरोबर होतें तें तुह्मांस दखलच आहे. त्यापों जखमी व आजारी होऊन गेलें व दारुगोळा भडोचेस राहिला. खानदेशांत जावयाचें योजिलें आहे. घाट चढोन गेलिया उपरी फितुरी मुकाबिलियास येतील. सामान पोख्त असलें पाहिजे, याजकरितां जनरालासी बोलोन आणखी सामान रवाना करीत तें करणें. सामान पोहोंचेतों परवानगीही येईलच.

येथील कुच-मुकामचा प्रकार याचे चित्तास येईल तेव्हां करावा, हें उपयोगीं नाहीं. येथील मर्जीनें व्हावें, हें उत्तम असें. कांहीं मर्जीनें चालतात, कांहीं ओढितात, केवळ ओढीत नाहीं. प्रसंग पाहून बोलणें नाहीं तरी चालतें हेंही तूर्त बरेंच आहे.

मेस्तर इष्टोर सरकारचे ममतेचा आहे. येथें असलियानें उपयोग. याजकरितां त्यास व वारलीस यास जनराल हुजूर पाठऊन देत तें करणें. फार न ओढितां मर्जीनें होईल तें करणें.

खासा स्वारी रणगडास रेवातीरीं आली. रेवेचेठायीं भक्ती व कलकत्त्याची परवानगी-ही येणें याजकरितां तेथेंच च्यार दिवस रहावयाचे चित्तांत होतें. परंतु कारनेलीनें पुढें चालावयाविसी आग्रह केला. ते समयींच त्यांस सांगितलें कीं, येथून कुच करणें, तेव्हां घाट चढून गेलियाखेरीज सोय नाहीं. फौजेस पोटास मिळालें पाहिजे, खानदेशचे सुमारें गेलियावरी च्यार रुपये पोटास मिळतील.याप्रों सांगितलें,तेव्हां मान्य केलें. हाली तापीपार जालियावरी पुढें जावयास आंदेशा करितात. सामान यावयाचें आहे, ह्मणतात. परंतु परवानगीची वाट पाहतातसें दिसतें. याचें बोलण्याचें प्रमाण नाहीं. पुढें तुमची सलाह येईल तसें करूं. येथें पोटाचा मोठा पेच. शत्रू जवळ आहेत.

गाइकवाडाचा कारभार त्यांणी बिघडला. उभयतांचाही उपयाग चाकरीचा नाहीं व पैकाही नाहीं. ऐसें असोन याचीच रुष्टता हरएक विषयीं वाढून खटे व्हावें याप्रों याची रीत आहे. उपाय नाहीं !

ऐकून कलमें पांच तुह्मांस कळावीं याजकरितां लिहिलीं असेत. समजोन, समय पाहून, बोलावयाचें तेंच बोलणें. सरकारचा उपयोग नाहीं, बोलून नाश, ऐसें असलियास न बोलणें.संमंध यासीच पडला आहे. जाणिजे. छ २६ रमजान. हैदर अल्लीखान याचे पत्राची नक्कल तुह्मांस पाहावयाकरितां पाठविली असे. छ. मजकूर लेखनावधि:

श्री.

लेखांक १०९.

१६९७ कार्तिक शुद्ध १३.

पुरवणी राजश्री लक्ष्मण आपाजी गो यांसिः—

सुा सीत सबैन मया व अलफ. कारनेल किटीण तुह्मावर बहुत श्रमी जाहाला व आह्मावर तसाच जाहाला. सारांश आपलें कामही नाहीं. व याचा दोष मात्र जाहाला. कित्तेक गोष्टी मेस्तर होमाचे रुबरु केल्या. तेव्हां त्यासारिखेंच बोलला. त्यांत कुचास मागत होते. तेव्हां कुच करीत होते हे तर गोष्ट त्याणीं केलीच नव्हती. मग आह्मीं कशी केली ह्मणावी ? मजला निरोप देणार, दुसरा इंग्रेज कामावर आणणार, हेंही पुसिलें. तेंही नाकबूल गेलों. ऐसे किरकोळ मजकूर व काढावयाचा मजकूर कबूल जहालों. तेव्हां तुम्हाकडे लटीक वाद येईल, होम त्यास स्पष्ट लिहील, तेव्हां तुमचें बोलणें तेथें प्रमाण पडणार नाहीं. हा मोठा दोष आला. परंतु गायकवाडाचे कारभाराविसीं भीड धरली नाहीं. तेथें मात्र त्यास अर्धा ठास बसला. त्याविसीं त्याणीं बहुत पर्याय लाविले. जनरालाचा हुकूमच होता, ऐसेंही सांगितलें. सारांश, जबरदस्तीमुळें आपलें वाजबीही बोलणें शेवटास जात नाहीं. डबईचे, उपद्रवाचे वगैरे किरकोळ मजकूर कांहीं नाकबूल गेलों; कांहीं कबूल गेलों. किरकोळ मजकुराचा वाद सांगितल्यास आपल्याकडेच लघुत्व येतें. त्याचे उपकार बहुत. तेव्हां किरकोळ बोलतांच येत नाहीं. सारांश, तुमचें बोलणें जनरालास केवळ प्रमाण पडणार नाहीं. होम खरें करावयास आले. त्याची माया त्याजकडेच दिसते. जातीस जात प्रमाण पडते. तथापि तह्मी शाहाणे आहां व येथूनही गायकवाडाचे मजकुरांत काईल केलें, याजमुळें तिसरा हिस्सा प्रमाणिक—पण राहील. पुढें तुह्मी आलियास हे संतोषी, यास्तव यावें ह्मणोन अलाहिदा पत्रीं लिहिलें आहे परंतु जनरालाची मर्जी तुम्हांवर बहुत संतोषी असिल्यास तेथेंच रहावें. यांत गुण फार आहेत. यास भय मोठें आहे. रुष्ट तरी जाहालेच. परंतु भयही आहे. ज्यापक्षीं राहणें त्यापक्षीं जनरालाचें पत्र आम्हांस यावें कीं, यास जाबसालाबद्दल आह्मीं ठेऊन घेतलें ह्मणजे तेंच पत्र कारनेलास दाखऊं. तेव्हां दोष पडणार नाहीं. जनरालाची मर्जी बहुत तुह्मांवर प्रसन्न असालियास ऐसें घडेल तुमचे विचारे जसें बरें दिसेल तसें करणें तुमची नजरही बरीच चालते. येथील कांचा मजकूर मात्र लिहिला असे. बडोद्याहून जलदीनें रणगडास रेवातीरीं आलों. तेथें इंग्रेज व चिरंजीव राजश्री बाळ वगैरे सारे आठा दिवशीं आले. पुढें दक्षणेस चलावें, हा मजकूर बोलण्यांत ठरला. त्यांत गायकवाडाचा कारभार ठीक न जाहाला. देघेही बराबर नाहींत व. ऐवजही नाहीं. ऐसें जाहालें. यास्तव तो कारभार सुधरावयास आह्मी कारनेल यत्न करितों. होईल तें खरें. तपसील किती ल्याहावा ? कांहीं राजश्री रामचंद्र विठल चिटणीस लिहितील. अमीनखानाची नजर सुधी नाहीं. राा सदाशिव महादेव पाठविलें, त्यासही उपद्रव जाहाला. प्रसंगावर नजर देऊन, आपाजी गणेशाची मामलत करार केली. च्यार रुपियांची नीशा ठरली. त्यांत अमीनखानानीं सिबंदीचें निमित्य ठेवून कारभार बिघडला. शेवटीं अमीनखानापासून च्यार रुपये घेऊन मामलत करार केली. सावकारी नीशा कांहीं दिल्हीं. तेही रुपये वसूल पडत

मसलतीस पेंच पडेल. यास्तव खानदेशचे सरदेस भोडगांवपावेतों जावें, ऐसें ठहराविलें. कारनेल चलावें तर म्हणतात हुकूम आणवितों म्हणतात. क्षेपानिक्षेप तरी बोलत नाहीं. रेवातीरींही राहूं देत नाहींत. असें अर्धोदकीं आलों आहों. जनराल अतंस्त त्यास काय लिहितात, तेंही पूर्तें समजत नाहीं. परंतु जनराल वगैरे कोशलदार आमचे हितावर आहेत, हें जाणोन कुच तरी करितों. आठा दाहा दिवशीं भोडगांवाजवळ जाणार, ऐसें योजिलें आहे. पुढें ईश्वरसत्ता प्रमाण. येकही निश्चय करवत नाहीं. तुह्मीं तेथील हरद्द मनास आणून लिहिणें. जसें ल्याहाल तसा डौल धरावा लागेल. येकही बोलणें इंग्रेजाचे शास्वत दिसत नाहीं. काय करावें तें लिहिणें. जाणिजे. छ ११ रमजान.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक ११०.

१६९७ मार्गशीर्ष शुद्ध २

राजश्रियाविराजित . राजमान्य राजश्री लक्षुमणपंत आण्णा स्वामीचे सेवेसी:—

पोष्य बाजी त्रिंबक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ मार्गसीर शुद्ध दितीयापर्यंत मु॥ उ × × × येथें समस्त सुखरूप असो विशेष. तुह्मां. कडून इतके दिवस वर्तमान कळत नव्हतें. त्यास, छ २० रमजानीचीं पत्रें आलीं त्याजवरून परम समाधान जाहलें. ऐसेंच निरंतर पत्र पाठवून साकलें वर्तमान लिहून पाठवीत जावें. विशेष, तेथचा मजकूर लिहिला. त्यास वोढ फार. मागें वोन तीन महिने हजारग्रमाणें देत होते. हालीं पांचग्रमाणें दरमाहा खर्चास देतात. त्यास, आपण लिहिलें कीं खर्चाचा अजमास पाठवून द्यावा. त्यास, खर्चास अजमासें साहा साडेसाहा हजार रुपये खर्च दरमाहा लागतात. तरी फारकरून लोक दूर केले तरी इतका खर्च लागतो. आपणांस कळावें म्हणोन लिहिलें असे. चिरंजीव यांस बरें वाटत नाहीं, म्हणोन आपण लिहिलें. आतां बरें नाहीं. ज्वर निघाला म्हणोन लिहिलें. त्थास सर्वस्व आपण तेथें आहेत. तरी समाचार त्याचा आपण घेत जावा. राजश्री शिवाजीपंत आपणापासीं आहे तरी त्यांचा समाच्यार घेत जावा. खर्चाची हलाखी फार, म्हणोन चिरंजीवानीं लिहिलें आहे. तरी आपण श्रीमंतास विनंति करून चाळिस पन्नास रुपये द्यावे. यजमानानीं न दिल्हे तरी आपण द्यावे. आह्मीं ल्याहावें ऐसें नाहीं. परंतु सूचना मात्र लिहिली असे. आम्हीं येथें चाकरी केली ती रुबरु गांठ तुमची व श्रीमंत सौ॥ मातुश्री बाईसाहेबांची पडेल तेव्हां समक्ष सांगतील तेव्हां आपणांस कळेल. इतकें असोन चिरंजीव तेथें आहेत. उपरणें पांवरुणावांचून आबाळ. कारकुनाचा व त्यांचा वर्तमान आइकितों. तरी फार ल्याहावेंसें नाहीं. सर्व भरंवसा आपला आहे. बहुत काय लिहिणें ? लोभ असो दिजे. हे विनंति.

श्री.

लेखांक १११.

१६९७ मार्गशीर्ष शुद्ध ६.

राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यांस:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. आलीकडे तुह्मांकडून विनंतिपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. भेस्तर टेलर याजकडून आजपर्यंत पत्र यावें तें कांहींच दिसत नाहीं. खासा स्वारी इंग्रेजी सामानसुद्धां

तापीवर सोनगडानजीक दाखल जाली. तमाम देशाहून राजकारणें आलीं आहेत. कोंडाईबारी चढतांच कितेक मुत्छद्दी व सरदार येऊन सामील होणार. त्यास, करनेल किटण म्हणतात कीं चिखली परगणियांत जाऊन रहावें. त्यास स्वारीचा रोख माघारा फिरलियानें मसलतीचा अनुपयोग, राजकारणें उठतात व परगणियांत राहिल्यानें शौरत येक प्रकारची जाती. सरकारचे व इंग्रेजाचे एखलासांत दरज पडली, ऐशा कल्पना करोन फितुरी उमेदवार होतील. कितेक हुजूर येणार ते नाउमेद होवून केलेली पैरवी सोडतील-इत्यादिक नकसानी. याजकरितां येथून माघारे कुच होत नाहीं, म्हणून करनेलीस साफ सांगितलें आणि जनरालास ये बाबिसी तपशीलवार लेहून पाठविलें असे. यांचा नक्कल तुम्हास मजकूर कळावा येतदानिमित्य पाा आहे. तरी सावंत समजोन, जनरालासी बोलोन, बारी चढोन गुजराथ व खानदेश याचे दरम्यान भोडगांवावरी जाववाविसीं यास परवानगी घेऊन पाठवावी. लढाईखेरीज दाचानेंच हतवीर्य होवून मसलतीचा उपयोग पडतो. तें काय निमित्य न करावें ? बारीचे आसपास राहिल्यास चिंताही नाहीं. देशांत दहशत पडोन फितुरी जमणार नाहीं हा तर मोठी सोय आहे.सहजांत न लढतां काम होतें, तें काय जाणून न करावें! जनरालाचे कुमकेनें मोठा आब वाढला. ऐसेंच न लढतां इंग्रेजी सामानसुद्धां पुढें गेलों तरी कोण्ही सन्मुख येत नाहीं. विरान जातात. ऐसाप्रकार असतां करनेल परवानगीचा उजूर करितात. माघें फिरावयाविसीं दुराग्रह करितात. यांत सारी मसलत बिघडती. मिळविल्या यशाचा दाब कमी पडतो व चिखलींत राहिल्यानीं मालही खराब होतो. ऐवजाची वोढ, येक जागा राहिल्यानें फौजेच्या पोटाची सोय नाहीं. हे सर्व अर्थ समजाऊन पुढें बोललों. बळें जावयाविसीं सत्वर यास परवानगी पाठवून देणें व तेथील वर्तमान अधिकोत्तर असेल तें लिहिणें,जाणिजे छ ४ सवाल.

(लेखनावधि.)

श्री.

लेखांक ११२.

१६९७ मार्गशीर्ष शुद्ध ७.

सर्व मसलतीचा जिम्मा आपला आहे, तेव्हां कमकसर आपणच ध्यानांत आणावें. मसलतीचा मोहरा माघार फिरविल्यानें लौकिकांत शौरत कैसें होईल ? व येणार नाउमेद होतील, ते फिरोन पछाडावरी यावयास बहुत भारी पडेल. सत्वर आजी जलदीनें जबाब पाठवावा. येथपर्यंत आल्यानीं शत्रूवर बहुत दाब पडोन हतवीर्य जाहले आहेत. भोडगांवपर्यंत गेल्यानीं लढाईखेरीजच मसलत सुधरत आहे. आमचा भार सर्व आपणावर; तेव्हां ज्यांत या मसलतीचा उपयोग पडे, तेंच करावें; आणि येथील सरदारांत एकंदर परवानगी किरकोळ कामें दबावानीं होतील तीं करीत जावीं म्हणून व खानदेशांत जाण्याची परवानगी पाठवावी. गुजराथेचे तोंडीं भोडगांव आहे, तेथपर्यंत जाण्याची परवानगी जरूर पाठवावी. इज्यानेंव फौजसुद्धां व आपला सरंजाम तयार असलियानें फितुरी नाउमेद होऊन जमगार नाहींत, शरणच येतील. आणि एक जागा आपले माहालांत मुक्काम करोन राहिलों तरी आपले आमचे येक लासांत दरज पडली, ऐसें समजाऊन उमेदवार होतील. याजकरितां पुढें चालले-

यानें सोय आहे. बहुतेक कामें जालियांत आहेत. इंग्रेजी सामान न लगतांहि स्वारी-बराबर देशीं असलें ह्मणजे फितुरी सहजांत दाबानेंच फुटोन जातील. मुकाबल्यास यावयाचें होणार नाहीं. आह्मास सुचलें तें लिहिलें आहे. जसें तुमचे विचारें ठरेल तसेंच अमलांत येईल. कोणेविसीं दुराग्रह नाहीं. परंतु चिखलीकडे गेल्यास मनसुब्यास वांकडें पडतें. सबब तपसीलवार लिहिलें आहे. उत्तर पाठवावें. कारनेलीस हुकूम पाठवावा. छ २ सवाल.

श्रीशंकर.

लेखांक ११२.

१६९७ मार्गशीर्ष शुद्ध १४.

राजश्री आण्णा स्वामींचे सेवेसीः— विनंति. आपणास कळावें ह्मणून विस्तारें दोन बंद लिहिले आहेत. आपण देशांतीलहि साधनें केलीं. अपाजी साबाजीची खातरजमा करून रवाना केलें. फार उत्तम जालें ! आण्णा ! हरतऱ्हेनें तूर्त मसलत सेवटास न्यावी, हेंच लक्ष लागलें आहे. आपणही त्या प्रेत्नांत आहेत. सारांश, हरतऱ्हेनें जनरालास पलटवर आणावें. कोपशदार व जनराल कोपीन त्यांचीही पातशहा आदिकरून सर्वांची इच्छा तृप्त करावी. परंतु आपली मसलत सेवटास न्यावी. हें लक्ष जाते समई कितेका प्रकारें तुह्मांसी बोलिलों आहों. सारांश, अण्णा ! हरतऱ्हेनें लढाई सुरुची परवानगी येई ते गोष्ट करावी. राबंदिवस ध्यास तुह्मांकडे आहे. गायेकवाडाची कुलकट व कोणाचे कोण हें पहावयाचें तरी गोविंदरावानीं ××××××× × × ×ले. ते गंभीराजवळ कारकूनच राहिल्यामुळें × × ले. त्याची नक्कल आह्मांजवळ होती ते पाठविली आहे. त्यावरून सर्व ध्यानास येईल. तूर्त आपली मसलत साधे ते गोष्ट करावी. तुह्मांकडे निजध्यास लागला आहे. मेस्त्र इष्टोर इंग्रज कितेक आह्मासी उमेदीच्या गोष्टी सांगून गेले आहेत. रामसिंग त्याजपासीं आहे. त्याजल बलावीत जावें आणि यादीप्रों। वस्तावनी जिन्नस देईल तो मागावा आणि इष्टोलापासीं तरवार येथें होती. आह्मी मागत होतों.त्यास चुकोन समागमें गेली.सईफ आहे ते तरवार जरूर रामसिंगास सांगून मागावी. आरबी एक घोडा चांगला आह्माकरितां त्यास सांगावा. परंतु तरवार रामसिंगास ठावकी आहे. येथें आह्मीं मागितली: तेव्हां मेस्त्र होमास दिली, म्हणून सांगितलें. परंतु येथें कोणाही इंग्रजाजवळ तरवार राहिली नाहीं. सर्वांचें सांगणें कीं मेस्त्र इष्टोलानींच माघारीं नेली आहे. त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे. तरी ते तरवार ठिकाणीं लाऊन आणऊन पाठवणें. एक चड्डयाळ जबाबी चांगलें, जबाबी म्हणजे तास वाजतात तें जरूर त्याजला सांगून मागवावें आणि जिन्नस येईसें करावें. आपण तेथें आहेत. कुटुंब आणविलें, म्हणून ऐकलें. फार उत्तम जालें. परंतु इकडील काळजी मात्र राखावी. आह्मी येथें सारी आणली ती मागती सुरतेस पाठवितों. तुमची परवानगी पुढें चालावयाची आली, ह्मणजे लाऊन देतों. वरकड वारंवार श्रीमंताचीं पत्रें आपणास जातात. आह्मी लिहितों न लिहितों सर्व तुह्मांस माहीत आहे. तेव्हां वारंवार काय ल्याहावें ? आबा सरदाराकडे गेले होते. त्यांचीं वचनेंप्रों घेतलीं आहेत. सर्वांची नजर इंग्रजाचे अनकुलतेवर आहे. आबा गेलियानीं इतकें मात्र जालें जे सरदार दोघे सिंदे होळकर तिकडे जात नाहींत. तूर्त राहून, इंग्रजसह श्रीमंत आले

तरी खानदेशांत येऊन मिळतात. ऐसेंच वचन घेऊन आत्रा येणार. गोविंदरायाकडील घडेलसें फार केलें. परंतु घडलें नाहीं. त्याचें मूळ व फळ तरी खामखा येईल. नारोपंत येथें आहेत. मर्जीचे वगैरे सर्व ध्यान आहे तेंच आहे. देशांत तुह्मीं केलें त्याचे व इकडील साधन जें पडेल तें पाडावें. येथेंही खटपट करीत आहों. खर्चाची मोठी ओढ आहे. कर्जवाम तरी दोन चार लाख मिळेसें करावें. हैदराकडील ऐवज मुंबईस आला आहे तोही सत्वर पाठवावा. दारू, सिसें व बंदुका एकंदर जरूर पाठवाव्या. लडाई सुरू जाली ह्मणजे इष्टोलास जरूर पाठवावें. परवानगी द्यावी. आपण तेथें आहेत. प्रसंग पाहून करणें तें करावें. केवळ येथील अर्थ तुह्मांस सर्व माहीत आहेत. वारंवार ल्याहावें, ऐसें नाहीं. गोविंदरावबाबाकडील देवळाचे संमंधाचा ऐवज हजार रुपये घेऊन पाठविता. त्यांचें कार्य बनविल्या मनोदयानुरूप अण्णा! सर्व घडेल. चिंता नसावी. बनेल तैसें करावें. रां॥ छ १२ सवाल. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

श्री.

लेखांक ११४.

१६९७ मार्गशीर्ष शुद्ध १४.

पुरवणी. राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोस्रावी यांसिः— सुा सीत सबैन मया व लफ. जनरालासी बोलोन जाबसाल उगऊन द्यावयाचीं कलमें. ताः— पा

अंकलेश्वर येथील दरसाल पाऊण लाख रुपये कोपिनीकडे द्यावे, याप्रमाणें करार असतां, तेथें मेस्तर शहानीं ठाणें बसविलें. दरोबस्त वसूल घेतात. त्यास पा मारीं सरकारचे कादार असावे. पाऊण लाख रुपये मात्र कादाराकडून देवविले जातील. याचा जाबसाल करोन घेणें. या माहालचा रुपया सालमजकुरीं झाडून घेतला. हा याचे दरमहाचे खर्चात पडेल. मग रदबदली करितील. तेव्हां ऐकावयाचें नाहीं. कलम १ पा

हासोटचा मा तुह्मांस पेशजी लिा होता. त्यास, विश्वनाथ नारायण व नारो गोपाळ साक्ष देत ऐसें पक्कें असावें, ह्मणोन लिहिलेंत. यास,हे दोघे मध्यस्थ. याणीं सरकारचे जाबसाल उगवून घेऊं,मग सनद देऊं, यापरी करार करोन घेऊन गेले.आणि सनद अटकाविली आहे. हे साक्ष देतील. व मेस्तर होम यासहि सांगितलें आहे. जाबसालांत तफावत नाहीं. मेस्तर हटलीसही सांगावें, ह्मणोन लिहिलें. तरी ते दरबारास येत नाहीं त्याची गांठच पडत नाहीं तथापि बनलें तरी सांगोन पाठवूं. कलम १

गायकवाडाकडील ऐवज दहा लक्ष किंवा चवदा लक्ष कारनेलीकडे आहे ऐसें ऐकतों. साडेसाहा सरकारांत याणीं दिल्हे. वरकड याजकडे आहेत. तो ऐवज द्यावयाविसीं जनरालानीं कार. भाऱ्यांस लि॥ आहे, म्हणून तुम्हीं दर्शविलें. त्यास यास विचारिलें. हे नाहीं म्हणतात. याजकारितां जनरालाचें पत्र घेऊन हुजूर पाठवाल तरी ऐवज देतील.

पा भुतसर व बोहारी हे दोन्ही माहाल नेहमीं अगर दरमाचे ऐवजीं सरकारांतून दिल्हे नसतां तेथें जबरदस्तीनें मेस्तर राबगंभीर याणीं ठाणीं घातलीं आहेत. उठावीं तरी ठाणीं घालणार येकीकडे राहातील. जनरालाचे चित्तांत विक्षेप येईल. याजकरितां उपेक्षा केली. त्यास, हें बोलोन दाहा महाल सोडून द्यावयाविसीं यास

ताकीद व्हावी. पैकीं बोहारीचा अंमल चंदरारायाकडे चालला आहे. भुतसर मात्र बोलणें. बोहारीचा शोध करून लिहून पाठवूं. चिखली, वांसदें, बलसाड येथील जकाती गंभीरानें उठविल्या.

भाटे पाा चौऱ्यासी हा गांव गायकवाडाकडील. तेथें तूर्त ठाणें घातलें व त्याचे जकातीसहि विक्षेप करितात. हे गोष्ट नसावी. सरकाराकडून उपेक्षा मुर्वतीनें होती. गायकवाड कलह करितील तेव्हां आह्मास शब्द जनराल ठेवितील. यास्तव हरयेक गोष्ट करारमदाराखेरीज होऊं नये. येविसीं बोलणें.

हैदरअलीखान याजकडील लाख रुो होन आले ते तुह्मीं जनरालापासून घेतलेच असतील. त्यांत शिसें व बंदुकाचे खरेदीस दहा हजारांचे ठेवून वरकड हुजूर पाठवणें. पेशजी सनद पाठविलीच आहे.

फत्तेसिंगास जितके रुजू करूं तितके रुपये देणें म्हणोन ताकीद पाठवणें तरी महिना पंधरा दिवस चालेल. सदरहू कलमें समजोन, व खतसीर बोलोन, जाबसाल करोन घेणें. वाजवीचे रीतीस चिंता नाहीं. तुम्हींहि युक्तायुक्त पाहून करीत असतां. जाणिजे. छ १२ सवाल. बहुत काय लिहिणें ? नरम तरी बोलावें परंतु स्पष्ट बोलत जावें. परिणामीं गोड वाटेल. खोटें येकंदर करूं नये, बोलूं नये हेंच, आमची मर्जी समजणें. तुम्हीं तेथें प्रसंग पाहून बोलणें व सत्यच बोलणें. जाणिजे. छ मजकूर.

श्री.

लेखांक ११५.

१६९७ मार्गशीर्ष वद्य १.

पुा राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यांसि:—

सुा सीत सबैन मया व अलफ. पाा हासोटचा मजकूर मेस्तर होम यासी बोलावा, व मेस्तर हाटली यासीहि बोलावा, म्हणोन तुह्मीं लिा. ऐशास, मेस्तर होम दरबारास येणें तें कारनेलीबा येतात. येकट्याची गांठ पडत नाहीं. परंतु त्याचे दुभाशास सांगोन त्याजकडून त्यास सांगविलें आहे. व मेस्तर हाटली तो दरबारास येतच नाहींत. बोलवावें तरी ठीक नाहीं. तथापि त्यास हा मजकूर कळावयाचा येत्न करितों. जाणिजे. छ १४ सवाल.

(लेखनावधि:)

श्री.

लेख क ११६.

१६९७ मार्गशीर्ष वद्य ३.

राजश्री लक्ष्मण आपाजी गो यांसि:—

सु॥ सीत सचैन मया व अलफ. सुरतकर मोगल याजकडून सरकारची चौथायी येणें. त्यास, तो सुधामत देत नाहीं. येविशींचा मजकूर पेशजी लिहिला आहे. त्याप्रमाणें जनरालास समजावून जनरालाचें पत्र गंभीरास पाठऊन, मोगलास ताकीद होय तें करणें. हुजूरोनही गंभीरास सांगूं. परंतु जनरालाचें पत्र जरबेनें आल्यास गुंता पडणार नाहीं. जाणिजे. छ १६ सवाल. बहुत काय लिहिणें ? येथें ऐवजाची ओढ आहे ते पत्रीं किती लिहावी ? तुम्हास वाकीफच आहे व जनरालही अर्धे वाकीफ जाहाले असतील. सांप्रतच्या प्रसंगीं बारभाईचे फितुरांतून सर्वांस ओढा-

वयास फावलें. इलाज चालत नाहीं. बारभाईशीं विरोध करावा कीं, हे किरकोळ लबाड्या करितात. त्यांशीं विरोध करावा, तेव्हां येकही सेवटास जात नाहीं. सारें विलग पडलें आहे. येक जनराल मात्र आमचे पक्षावर प्रबळ. याजमुळें आमची स्थित आबरू आहे. वरकड सारे लबाड्या करावयास तयार. यास्तव जनरालाचीं पत्रें कारनेलीस क्षेप–निक्षेप यावीं. फत्तेसिंगाकडील वसूल पडला. ऐवज देणें. तेरा लक्ष वसूल फत्तेसिंगाकडीलच कारकून सांगतात. दहा वसूल, करनेल म्हणतात. साडेसहा अलीकडे. सरकारांत तफावत किती? यास्तव कारनेलीस पत्र जरूर जरूर पाठवावें. व गंभीरास व सुरतचे मोगलास अशीं ताकीदपत्रें पाठवणें. हुजूरही पाठवावीं. व निराल्याही ताकिदा जाव्या. जाणिजे. छ १६ सवाल.

श्री.

लेखांक ११७.

१६९७ मार्गशीर्ष वद्य ६.

पुा राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसि:–

सुा सीत सबैन मया व अलफ. शहर सुरत येथील चौथाईचा अंमल सरकारचा येणें तो सुरतकर मोगल सुरळित देत नाहींत. दिक्कत करितात. वाजबी चौथाईचे आकारपैकीं चौथाई ऐवज देऊन भरकवज सरकारचे कमाविसदारापासीं मागतात. ऐशास, सरकारांत वोढीचा प्रसंग! हरकसेंहि च्यार रुपये येऊन चालावें. त्यास, वाजबीचेच अमलास दिक्कत पडते. येविसीं जनरालास अलाहिदा पत्र लिहिलें आहे. तरी हें सविस्तर अर्थ तुह्मीं त्याशी बोलोन मोगलास व गंभीरास जनरालाचीं ताकीदपत्रें पाठवावीं कीं, वाजबी चौथाईचा ऐवज देत जावा, दिक्कत न करावी. याप्रों पत्रें सत्वर वेऊन पाठवणें. जाणिजे. छ १९ सवाल.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक ११८.

१६९७ मार्गशीर्ष वद्य ९.

राजमान्य राजश्री भवानजी विसाजी यासि:–

रघुनाथ बाजीराव प्रधान. आशीर्वाद. सुा सीत सबैन मया व अलफ. तुमचे निष्ठेचे अर्ज राजश्री लक्ष्मण अप्पाजी याणीं हुजूर लिहिले तें कळलें. उत्तम आहे. तुह्मीं खातरजमेनें सरकारसेवा करीत जाणें. तुह्मास सर्फराज केलें जाईल. जाणिजे. छ २२ सवाल. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक ११९.

१६९७ मार्गशीर्ष वद्य १४.

पुरवणी राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यासि:–

सुा सीत सबैन मया व अलफ. हैदरअलीखान याणीं बसालतजंगाची फौज लुटली. त्यास, बजिन्नस पत्रें हैदर नाईकाचीं व राजश्री बाजीराव गोविंद व विठल विश्राम यांचीं सरकारांत आलीं. त्यांच्या नकला करून तुह्माकडे पाठविल्या आहेत, त्यावरून कळेल. जाणिजे. छ २७ सवाल. बहुत काय लिहिणें?

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १२०.

१६९७ मार्गशीर्ष.

व आपली फौज न फुटों देतां आहां तैसेंच मुंबईहून जाब येईतोंपर्यंत स्वस्त राहावें श्रीकृपेंकरून तुमचे मनोदय खामखा सिद्धीस जातील. संशय न धरावा. बंगालेवाले आमचें ह्मणणें ऐकतील. आम्ही केलें कर्म सिद्धी नेऊं. चिंता न करावी. हे गोष्ट गुप्त मनांत ठेवावी. गाईकवाड याचाही कारभार आहे तसाच असो द्यावा. मुंबईहून लिहिलें येईल तेव्हां सर्व समजेल. श्रीमंतांस कोणी कांहीं समजावील, हर एकाची सला देईल, तरी कोणाचेंही ऐकों नये. याप्रमाणें ल्याहायासी सांगितलें. बारभाईची फौज व फतेसिंगाचे लोक एकत्र होऊन विश्वासराऊ यसवंताची लडाई जाहाली. दोनीशें माणूस विश्वासरायानें कापून काढिले. हें वर्तमान जासूद महाराजाकडे विश्वासरायाकडून पत्रें घेऊन येत होता त्याचे जबानीं ऐकोन उभयतां इंग्रजापासीं सांगितलें कीं, लडाई बंद जाहाली असतां बारभाईनीं व गायकवाडानीं मिळून सरकारचा अंमल कसा उठविला व जुंजले कसे ? हें ऐकोन आश्चर्य मानिलें व महमद इसफावर बसराईची फौज याउपरीं जाणार नाहीं हें त्याणीं सांगितलें. त्यास, हे इंग्रज अगोदर अन्याय कोणाचा होतो हा लक्षांत धरितात. यास्तव अमीनखान अमदाबादेस गेले आहेत त्यांस, अमदाबादेचें कामकाज होणार नाहीं व इंग्रजाचा शब्द लागेल ऐसी वर्तणूक होऊं नये येविसीं अमीनखानास सूचना लिहिणें तैसी ल्याहावी. सबाह्य अभ्यंतर इंग्रजांचें लक्ष महाराजांकडे दिसतें. हे उभयतां कोषलदार गुप्त खलबत्ये आहेत. टेलर बंगाल्यास गेला. बाकी पांचजण मुंबइस राहिले. परंतु तिघेही फार शहाणे, समंजस व आपले मसलतीची चिंता करणार असे आहेत. या उभयतांनीं फार खातरजमा केली असें कीं, त्यांस म्हटलें कीं, बंगालेवाले तुमचें न ऐकत, तेव्हां मग काय कराल, तुमच्या वचनावर आम्हीं फसावें कीं काय ? असें थोडेसेंही बोललों. परंतु त्यांचें म्हणणें एकच, खामखा बंगालेवाले आमचें म्हणणें ऐकतील; फिकीर न करणें. याप्रों बोलणें जाहालें. मी जें त्यांसी कोंडून युक्तीचे वाटेनें काईल करून बोलिलों तें पत्रीं ल्याहावें तरी विस्तार होतो. यास्तव त्याचें बोलणें लिहिलें आहे. मुंबईस गेल्यावर सविस्तर सेवेसी लेहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय. हे विज्ञापना.

टेलराची रवानगी करून मग हे मंबईहून निघाले. मुंबईकराचे हद्दत या

(पुढें मजकूर गहाळ.)

श्री.

लेखांक १२१.

१६९७ मार्गशीर्ष.

राजश्री लक्ष्मणपंत अण्णा स्वामीचे सेवेसी:-

विनंति उपरी. इकडील वर्तमान श्रीमंतांचे पत्रावरून अवगत होईल. अमीनखान याची रवानगी अमदाबादेस तुह्मी येथें असतांच झाली होती. त्याउपरी जनरालाचें पत्र लडाई मौकूफ करावयाविसीं आलें. मशारनिलेस पाठविले ते फिरोन आणावयाचा पेंच युक्तीनें करणें तें जालें पाहिजे. याजकरितां आपाजी गणेश यांजकडून राजकारण हुजूर गेलें होतेंच. तेव्हां पांच लाख रुपये त्याजपासून घेऊन त्याजकडे अंमल सांगावा. याप्रमाणें करोन अमीनखानास समजोन सांगावें व आपाजी

गणेश याजकडून ऐवज व्यावा यास्तव राजश्री सदाशिवपंतांस श्रीमंतानीं अमदाबादेस पाठविलें. आपाजीपंतांकडून करारा-प्रमाणें ऐवज न आला व अमीनखानाची सिंदी फार चढली ती वारल्याखेरीज उठणें होत नाहीं, ऐसें दिसोन आलें. व अमीनखानाकडून लडाई मौकूफ करविली असतां, एक दिवशीं शहरांतून त्यांनीं याचे मोरच्यावर चालविलें. त्यास, इत्यादिक पेच पाहून, अमीनखानाकडे मामलत सांगितली. ऐशास आपाजी गणेशाकडून कारकून सदाशिवपंताकडे बोलावयास आले होते, त्यांस अमीनखानानें कैद केलें. बदराहाची गोष्ट बोलावयास आले त्यांस धरणें युक्त नव्हे. त्याणीं तो त्यांच्या लबाडया समजोन केलें असेल. परंतु सरकारचे आज्ञेशिवाय केलें तें कार्याचें नव्हे. परंतु उपाय काय ? दक्षणेकडे निघावयाचें केलें. याजकरितां उपेक्षा करणें प्राप्त जाली. इंग्रेजाकडून दोन तोफा खांबाइताहून खान मशार्निलेकडे देविल्या होत्या त्या माघाऱ्या देविल्याच आहेत; परंतु अमीनखान देतीलसें वाटत नाहीं. याजकरितां येविसींची सूचना जनरालास करावी. श्रीमंतानीं सविस्तर मजकूर तुम्हांस कळावे, याजकरितां लिहिले आहेत ते समजोन, युक्तायुक्त ध्यानांत आणून, तेथील मर्जी पाहून, व श्रीमंत सोनगडेचे सुमारें जातात, लडाई सुरूच होईल हें समजोन, जें बोलावयास युक्त तें बोलावें. केवळ पंचाइतीवर येऊन पडे तें करावें. याजखेरीज आह्मांस आश्रय नाहीं. वास्ल्यानीं परिणाम काय हें आपणांस कळतच आहे. तेथें विस्तार काय ल्याहावा ?

राजश्री गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल याजकडे सिनोर द्यावें ह्मणून जनरालानीं यास लिहिलें आहे, ह्मणून आपण श्रीमंतांचे पत्रीं लिहिलें, परंतु कारनेलीनें मजकूर येथें बोलिले नाहींत. वांटणीही देत नाहीं. ऐवज येत नाहीं. हा पेंच ! याजकरितां सोनगड—भोडगांवपावेतों जावयाचा विचार केला आहे. च्यार रुपये तिकडे तरी मेळवून फौजेस द्यावे लागतील. इंग्रेजास चिखलीपर्यंत जाणेंच होतें. सोनगडापर्यंत जावयाची परवानगीही यांणीं आणिली आहे. भोडगांवापर्यंत गेलियानें सरकारची सोय, ह्मणून यासी बोलतो. हेही युक्तीनें परवानगीपाणी लागतें यापरी लेहून आणितो ह्मणतात. परंतु हें अंतर्यामचें बोलणें. याचें जनरालास कळूं न देतां पर्यायेंकरून पाण्याचें निमित्य सांगून त्याची परवानगी भोडगांवापासीं रहावयाची आलियास उत्तम आहे. घाटतोंडींच भोडगांव. गेलियानें फितुरी चढोन येतील. तेव्हां हे झुंजतील. अंगावर आलियास जुंजावें, ऐसी यास परवानगी आहेच. कजिया लागला ह्मणजे जनरालास मागून साहित्य पुरविणेंच लागेल. परवानगीही इतकियांत येतच आहे. त्याचेंही मानस तुह्मीं लिहिलें होतें कीं त्याजकडून कजिया लागलियास मग हे लडतील, निमित्य पाहतात. यापरी आहे. त्यास तुमचे सलेस येईल तें करावें. हे दिवस लढाई सुरू व्हावयाचे आहेत. या दिवसांत पंचाईत न पडतां होईल तें करावें. कारनेलीची सरकारची पंचाइती पडली, ह्मणजे कामाचे वख्त विरुद्ध पडेल. सारें धारवट पहावे, लिहिणें तें तुह्मांस सर्व समजावें, या अर्थें श्रीमंत लिहितात. परंतु तुह्मी तेथील भावमर्जी पाहून कराल हे निशा आहे. कळावें. मजलाही श्रीमंतांची आज्ञा होती त्यावरून लिहितों. कळावें. रा॥ राघोपंत सुखरूप आ-

हेत. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें ? लोभ असावा हे विनंति.

लेखांक १२२.

१६९७ मार्गशीर्ष.

से ठाऊक. त्या कोषलांतील मग गुंता काय ? त्यांचे बोलण्यावरून माझी खातरजमा पटत्ये कीं, बंगालियाहूनच कामें होऊन येत. दोनी महिने पुर्ते लागत नाहींत. त्यांत दहा दिवस टेलरास जाऊन जहाले. निमे वाट बंगालियाचा गेला. फौजेची खातरजमा करून जैसें गांठोडें आहे तैसें महाराजानीं जतन करोन राखावें. श्री कृपा करील. चिंता नाहीं. मी लौकर मुंबईस जातों. मजला चैन पडत नाहीं. सारा वेळ ह्याच उद्योगांत आहे. हे विज्ञापना.

श्री.

लेखांक १२३.

१६९७ पौष शुद्ध ३.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसि:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. फत्तेसिंग गायकवाड याजकडील तेरा लक्ष रुपयेपर्यंत आले, असें फत्तेसिंगाकडील कारभारी सांगतात. इंग्रेज दहापावेतों वसूल सांगतात. सरकारांत साडेसहापावेतों वसूल झाला आहे. कारनेल व होम दरबारास आले, तेव्हां तुह्माविर्सी जनरालानीं लिहिलें आहे, हा मजकूर सांगितला व फत्तेसिंगाच्या ऐवजाविर्सी लिहिलें आहे. परंतु हुकूम आला नाहीं. कापड वगैरे जिन्नस आपले काय उपयोगी, ऐसा मजकूर लिहिला आहे. याजवरून अर्धी परवानगी तरी आहे. परंतु हुकूम नाहीं, ऐसें बोलले. ऐसियासी, आमची बहुत ओढ हें जाणून मागितल्यास कांहीं कापड वगैरे देतीलसें दिसून येतें. परंतु, त्याचा मजकूर कांहीं बोलण्यांत नाहीं. ऐवज आलाच नाहीं, ऐसें बोलतात. यास्तव त्यास निक्षून ताकीद यावी कीं, जो जिन्नस फत्तेसिंगाकडील आला असेल तो बाजार-निरखाचे भावें देणें. त्याप्रों फत्तेसिंगाचे ऐवजांत मजुरा पडतील. सोनें, रुपें, कापड, जवाहीर जें असेल तें देणें, ह्मणून हुकूम यावा तेव्हां आह्मास प्राप्त होईल. दोन तीन लक्षांचा जिन्नस व नक्त मिळोन आल्यास महिनाभर स्वस्थ चालेल. नाहीं तर कांहीं अबरू रहातां दिसत नाहीं. नित्य दहा बारा हजार रुपये तलब चढते. पैशास ठिकाण नाहीं. बंगाल्याचे हुकुमाची वाट किती दिवस पहावी ? कारनेलीचा अथवा जनरालाचा दोष नाहीं. आपले दैवाचा दोष आहे ! याचा तपसील किती लिहावा ? जाणिजे. छ २ जिलकाद. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १२४.

१६९७ पौष शुद्ध १२.

पुरवणी राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसि:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. कारनेल आप्टण कलकत्त्याहून रवाना जहाले होते. ते पुणियास येऊन पोंहचले तेव्हां मसलती लांबेलसें दिसतें. त्यास, अपटणाची कांहीं दुराशा असली अगर सर जनराल कलकत्त्येकरास दहा पांच लाख कबूल केलियानें लडाई सुरू होऊन फितुरियाचें पुरतें पारपत्य होत असलियास 'जनरालाचे विचारें कबूल करोन मसलत शेवटास न्या-

वयाचें करणें. सध्यां आपटण आला आहे, त्यास याची दुराशा कांहीं आढळलियास, कबूल करावें. व कलकत्तेकराची दुराशा जनरालाकडून कळली तरी प्रसंगोपात्त दहा पांच पडती तरी कबूल करोन मोगलसुद्धां फितुरी नेस्तनाबूद करावें. याप्रमाणें होत असेलियास करणें. जाणिजे. छ १० जिलकाद. बहुत काय लिहिणें ?

हरयेक देण्याघेण्याची गोष्टी प्रयोजन पडल्यास करावी.उगीच कशास करावी ? येथें कारनेल म्हणतात कीं आम्ही पहिल्या करारासिवाय कांहीं मागत नाहीं.इंग्रेजाचा स्वभावहि आहे कीं हरयेक कारभार पक्काच करावा. शंभरदां मागों नये, लटकें बोलों नये, ऐसें तरी आहे. तथापि बनेल प्रसंग तसा करावा. तुम्हांस आमची मर्जी विदितच आहे. इंग्रेजाची कारभाराची रीतहि वाकीफ जहाली आहे. तेव्हां बनेल प्रसंग तसें करावें. सारांश, आपलें काम मनोदयानुरूप होय तसें करावें. ज्या रीतीनें आपले मतलब साधतील व ओझें जड न पडे तसें बोलणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १२५.

१६९७ पौष वद्य ४.

राजश्री लक्ष्मण आपाजी गो। यांसिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें पावलें. रा॥ गोपाल धोंडदेव याचें पत्र पाठविलें तें पावलें. ऐशास, माारनिलेचे पत्राचें उत्तर व ताकीदपत्रें पाठविलीं आहेत तीं त्याजकडे पावतीं करणें. राजकारणें घडेल तें करवणें. जाणिजे. छ १७ जिलकाद, बहुत काय लिहिणें ? (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १२६.

१६९७ पौष वद्य ११.

पु॥ राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. पौष वद्य तृतीयेचीं विनंतिपत्रें तुम्हीं पाठविलीं तीं छ २३ जिलकादीं पावलीं. विस्तारें मजकूर लिहिले, ते कळले. कलमें. त॥

हैदर नाईक व राजश्री भगवंतराव प्रतिनिधी याजकडील बातमीचें व अपटणाकडील वगैरे बातमीचें वर्तमान पांच सात कलमें विस्तारें लिहिलीं तीं सविस्तर कळलीं. याउपरीहि अधिकोत्तर आढळेल तें लिहीत जाणें. कलम १

सुरतेचे चौथाईविसीं जनरालास पत्र तुमचे लिहिल्याप्रों पाठविलें असे. तरी वाजवी चौथाईचा अम्मल घ्यावयाविसीं मोगलास व गंभीरास ऐसीं पत्रें पाठवणें. कलम १

पेशजीचे करारापों रुपये देणें अथवा जकातीची वगैरे हस्तबूद अंमल देणें ऐसें ल्याहावें. दोहींसहि आम्ही राजी. हस्तबूद अंमल दिल्यास तोटा जाला तरी आह्मांस कबूल असे.

पा॥ चिखली, वासंदे, बलसाड येथील जकातीचे अमलाविसीं व भुतसर, बोहारी व भाटे यांची जप्ति गंभीरानीं केली त्याविसीं जनरालाशीं बोलिलों. त्याणीं सांगितलें कीं, गंभीर माहीत आहे, तो श्रीमंतापासीं गेला असे. तेथेंच जाबसाल होईल. म्हणून बोलिले. त्याचा विस्तार लिहिला तो विदित जाला. ऐशास गंभीरानीं आलिया उपरीस सदरहुविसीं फार बोढिलें. तेव्हां पा॥ भुतसर हा महाल दरमहाचे ऐवजीं द्यावयाचें केलें. वरकड जकात वगैरे सोडा-

वयाचा करार मशारनिलेनीं केला. हा मजकूर तुह्मीं जनरालास सांगणें. याउपरी दिक्कत पडणार नाहीं. पडली तरी लिहिलें जाईल. कलम १

अमलांत येईल तेव्हां खरें.

येकूण कलमें तीन. जाणिजे. छ २५ जिलकाद. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

श्रीशंकर.

लेखांक १२७.

१६९७ पौष वद्य १४.

राजश्री लक्ष्मणपंत अण्णा स्वामीसः-

पोष्य सखाराम हरि साष्टांग दंडवत प्रा. विनंति येथील वर्तमान ता॥ पौश वद्य चतुर्दशीपर्यंत सुखरूप जाणून स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. आपण पत्रें विस्तरें मजकुराचीं श्रीमंतास वद्य तृतीयेचीं पाठविलीं तीं एकादसीं पावलीं. आह्मांस संकलित हवाला देऊन चिठीमागें तरवारेचा

.....

मजकूर लेहून पाठविलीं, त्यावरून व सरकारचें पत्र पाहून सर्व कळलें. सारांश, तूर्त सर्व मसलत, अपटण आले, त्याजवर आहे. येविसींचें साधन जनरालापासून वगैरे जसें पडेल तिकडोन पाडून, अण्णा ! मसलत सिद्धीस जाई, तुमचे आमचे मनोदयें व श्रीमंताची इच्छा पूर्ण होये, ते गोष्ट हरप्रेत्नें, अर्थें, प्राणें, खर्च तुमचा आमचा जाला तरी करून, लढाईचीच ठरून, फितुरिभाचीं पारपत्यें घडेल ते गोष्ट, अण्णा ! करावी. मुंबईवाले जनराल यांचे हातून अपटण व मुंबईतील कोशलदार व तेथील बंगालियांतून आले कोशलदार ऐसे लोभाविष्ट. पेशजीचे दारमदारासेरीज आणखीही उमेदवार करून पल्यावर आणावे. बल्की, कलकत्तेवाले व कुंपनी यांचीही आणखी आशा दाखवावी. परंतु सर्व प्रकारें मसलत शेवटास न्यावी, हेंच घडवावें. सर्व मदार तुह्मांवर आहे. मसलतीचा मोहरा-सर्व, अण्णा ! तुमचे माथां आहे. यशच घेऊन, आह्मां सर्वांत वरिष्ठता करून दाखवावी. तुह्मी प्रसंगानरूप समय पाहून बोलाल, कबूल कराल, तें श्रीमत् निभावितील. येविसीं सविस्तर कोठवरी ल्याहावें ? वरकड इकडील सर्व अर्थ, श्रीमंताचे आज्ञेचीं पत्रें आहेत, त्यावरून कळतील. वरकड सर्व राजकारणें वगैरे जीं साधनें त्यांचीं लक्ष्यें सर्वांचीं इंग्रजांकडे आहेत. याचे अनुकूलतेवर सर्व अनकूलता आहे. याणीं नेट मात्र धरावे. लडाई न पडतां महिन्या दोन महिन्यांत मसलत सिद्धीस जाऊन, सर्व लोभ इंग्रजांचे प्रविष्ट होतील. गुंता नाहीं. कळेल तैसी खर्चाची खातरजमा करावी. वरकड घराऊ मजकूर तरीः-तूर्त कारनेलीची बेमर्जी आह्मांवर आज च्यार पांच दिवस फारच जाली आहे. कारण कीं, गोविंदरायांचें बोलणें आह्मी बोलतों. यामुळें त्याचे मनांत विक्षेप वाढत आला. बारीक मोठे जाबसाल सरकारतर्फेचे करणें पडतात. यामुळें, वकिलीस बोलणार त्याणीं त्यांस मन मानेसें चिडविलें आणि तुफान उठविलें कीं, सखाराम हरीचे राऊत जाऊन कही मारितात. फितुरियाकडील बेदड वगैरे येऊन फौजा घाट उतरल्या. नवापुरावर पांच सात हजार फौज आली. तेव्हांपासून नित्य कहीवर चालवितात. एथें दोन तीन महिने गुजरले. चारा जवळ नाहींसा जाला. लांच जावें लागते. एकीकडे कहीस रखवालीस जावें तों भलतेकडे दगा होतो. फत्तेसिंगाकडीलहि पें-

दारी, राजपिंपळेवाले वगैरे यांचेहि राऊत फिरतात; परंतु सांप्रत फितुरियांकडीलच लोक येऊन, मारामार करून, कहीचे घोडे लष्करचे आजपर्यंत पांच सासें नेले. हालीं इंग्रेजाचे गाडे एकादशीस सुरतेहून येत होते ते लुटले. माणसें तोडलीं. फितुरियाचें पेंढार यांनींच कृत्य केलें. त्या समयीं लष्करची कहीहि पाडली. त्यांत माणसें दहावीस धरून नेलीं. तीं नवपुरास नेऊन सोडलीं. ऐसें असतां, आह्मांवरच तुफान घेतलें. सुरतअठाविशीचा अंमल गोविंदरायाकडे होता, तो फत्तेसिंगाकडे द्यावा, हे मोठी रद्दबदली कारनेलीची. इंग्रेजाजवळ गमाजी पाटील वगैरे कारकून. त्यांचे बोलणियावर फार. तेव्हां उत्तर हेंच कीं, फतेसिंगाकडील ऐवज झाडून पंचवीस लाख. पैकीं गोविंदरायास तिजाई मुलूक होता तो हिसा तरी सारा ऐवजाचा वजा करून, सोळा लक्ष सासष्ट हजारांचा भरणा करावा. ह्मणजे अंमल सोडितों. निदानीं तूर्त पांच लक्ष तरी द्यावे. पेशजी साडेसापर्यंत पावले आहेत. त्याजकडील दहाचा भरणा जाला तो ऐवज अमानत तुह्मांजवळ आहे तो द्यावा. ते देईनात, ह्मणोन अंमल सोडिला नाहीं. गोविंदरायाचा अंमल कमाविसदार राखून सरकारात वसूल आणविला. तूर्त वोढीस लाख पन्नास हजार रुपये घेतले. यामुळें इंग्रज आह्मांवर फारच रुष्ट, आम्हीच वडों देत नाहीं ह्मणोन, जाले. आणि हेनिमित्त मुद्दा पत्ता नसतां नाहक ठेऊन मारूं, हल्ला करूं, श्रीमंतानीं आम्हांस निरोप द्यावा किंवा सखाराम हरी घालवावे, पारपत्य करावें, नाहीं तरी आम्ही करितों, ऐसें अटीस आले. विलाज नाहीं ! श्रीमंतही लाचार जाले ! निरुपाय ह्माला ! मोठें संकट सर्वांस प्राप्त झालें. केवळ निदानास गोष्ट आली. श्रीमंतही खरे लाचार जाले. तेव्हां पुढें प्रसंग जाला तो पुरवणीवरून कळेल. हे विनंति.

श्रीसांब. सपुत्रे विजयते.

लेखांक १२८.

१६९७ माघ शुद्ध २.

पा॥ राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यांस:-

सु॥ सीत सबैन मया व अलफ. थोरल्या मनसुब्याचीं शुभसूचनें लिहिलीं तीं कळलीं. बहुत आनंद जहाला. ऐसेंच दिवसेंदिवस शुभवार्तेचीच इच्छा आहे. कलम १

भूतसरचे पहिले लिहिल्याप्रों कलम पुसावें. उगेच दाबले आहेत. कलम १

हसोटचा मजकूर कारनेलीनीं उपक्रम केला. तेव्हां जवळ मेस्तर होमहि होते. त्यास काईल केलें. नारो गोपाळ व विश्वनाथ व त्रिंबकजी भालेराव जवळच होते. त्यांस काईल केलें. विश्वनाथ व नारो गोपाळ व त्रिंबकजी भालेरावहि पष्ट बोलले. तेव्हां, पाहिजे तरी हसोटची सनद अमानत आहे, माघारीं आणऊन देऊं, ऐसें बोलले. परंतु आह्मींच आणविली नाहीं. खटे मात्र होतात. जाबसालांत काईल मात्र होतात.मिस्तर होमाचा दुभाषा लक्ष्मण आहे, तोहि जवळ होता. काईल केलें. पुढें सनद आणऊं. जलदी केली नाहीं. कलम १

जनराल व कोशल सारे मायेंत गोड बोलून, दिवसेंदिवस अधिक अधिक मेलवावे. त्यांची मर्जी किरकोळ मजकुरासाठीं खटी करावयाची नाहीं. युक्तीचे वाटेनें गोडीनें कायल करून होईल तितके जाबसाल उगवावे. कलम १

मिस्तर हाटली दरबारास येत नाहींत.

आह्मीं बलावावें तरी कारनेल वाईट मानितील. त्याणीं यावें तरी तोच प्रसंग. यास्तव त्यास जनरलाचें लिहिलें आल्यास आठा पंधरा दिवसीं दरबारास येत जातील. माझी पूर्ती ओळखच नाहीं. सखाराम हरीची मात्र गांठ कधीं कधीं पडते. कलम १

हैदराकडील कागद लक्षाचे होन पाठविले ह्मणोन आला. होन तरी न आले येविसीं हैदर व बाजीरायास आह्मी परभारें लिहितों व जनरालानींहि ल्याहावें कीं, तुह्मीं लटीक श्रीमंतास लिहून लटीक दाद आह्मांकडे कसा आणिलांत. म्हणजे ऐवज फजीत होऊन पाठवीलच. आम्हास जनराल लटकें बोलणार नाहीं, हे खातरजमाच आहे. परंतु जनरालानीं त्यास फजीत करून ल्याहावें, हें बरें दिसतें. कलम १

आंकलेश्वराचे महालपोटीं पाउण लक्ष द्यावे, ऐसें करारांत आहे. यांतच भाव आहे कीं, सरकारचे कमावीसदार असावे. निके रुपये मात्र यांस द्यावे. दुसरे उगऊन कलम लिहिलें नसेल. परंतु यांतच स्पष्ट भाव आहे. महाल पावणेदोन लक्षांचा आहे. त्याचा कमावीसदार राहिला तरी लक्ष रुो त्याणें आह्मांस द्यावे लागतील. तेहि त्यास नडच पडेल. तेव्हां सिबंदी वाढवून मनास येईल तसा खर्च वाढवितील. आणि ऐवज देणार नाहीं, हें कसें योग्य दिसेल? यास्तव कमावीसदार आमचा राहील. तो ऐवज पाउण यास पावते करील. येणेप्रों कलम १

दरमहाचे ऐवजांत बलसाड आहे. तेथें कमावीसदार आमचे असावे सबब कीं, कमाल बेरिजेस तोटा नफा आमचा. दरमहा ऐवज मात्र त्यांस निक्का द्यावा. त्यांचा कमावीसदार असिल्यास आम्ही परगण्याची कमाल बेरीज दरमहांत धरूं तेव्हां त्यासच संकट पडेल. हे पेच समजवावे. कलम १

गोव्याकडील फिरंग्याकडील राजकारणाचा मजकूर जनरालाचे कानावर घालून त्याच्या विचारें जाहाल्यास करावें. कलम १.

रो गोविंदराव गाइकवाड याचे जाबसालास तुह्मी माहित नाहीं, सबब त्याचे तर्फेनें कारकून पाठवावा, ह्मणोन नारो गणेश हजूर आहेत त्यास ताकीद केली. ते पाठवितील. तुम्हाजवळ येतील. त्यांची रुजुवात करून देणें. वरकड जाबसाल वाजबीचे रुईनें होईल तो करीत जाणें. गैरवाजबी पक्ष धरून गोष्ट कोणाचीहि न बोलणें. पत खरें बोलावयाची बहुत संरक्षण करणें. मोठें काम यांतच आहे. कलम १

खर्चाचा ताण मोठा बसला. कांहींच इलाज चालत नाहीं. किटिंग, फतेसिंगाकडील ऐवजाविसीं जनरालास लिहिलें आहे, जाब आला नाहीं, म्हणोन सांगतो. दोन तीनदां लिहिलें म्हणोन सांगितलें. याविसीं त्यास जरूर जरूर सांगावें. फौज पोटावांचून काय खाईल ? कलम १

सुरतेस बंदुखा वगैरे विकत घेऊं येविसीं एकंदर परवानगी गंभीरास यावी. कलम १

आपटणाची खबर नाहीं. कलम १

र॥ छ २१. सवाल. शुक्रवार (लेखनावधिः) कलमें तेरा लिहिलीं आहत. पैकीं बेदरीचा चंदूरायाकडे अंमळ आला. पो छ ३० जिल्काद.

श्रीशंकर.

लेखांक १२३.

१६१७ माघ शुद्ध २.

राजश्री लक्ष्मणपंत अण्णा स्वामाच सेवेसीः—

पोष्य सखाराम हरी साष्टांग दंड-

वत प्रणाम विनंति येथील वर्तमान ता। माघ शुद्ध द्वितीयापर्यंत यथास्थित असे. विशेष. पूर्वी आठा दिवसांत वर्तमान जाळें तें अलाहिदा लिहिलेंच आहे. कारनेलीची बेमर्जी आह्मांवर त्यासी कारणें तुम्हांस दिसतच आहेत. निमित्य, गाडे सुरतेचे वाटेवरे येतां लुटलें तें तुमचे रावतांनीं, हें ठेविलें. त्याचा मुद्दापत्ता कांहीं लागेना. फितुरियाकडील पेंढारी येऊन कही मारितात, हेच गोष्ट पक्की दाखल्यांनीं पुरली. यामुळें विचारावर कारनेल आले आहेत. परंतु वारेवीराचे दुःख पेडवली याचें आहे. मसलत सर्व त्याजवर. याजमुळें मात्र सर्व सोसावें लागतें. विलाज नाहीं ! आह्मींही वोढिलें नाहीं. लाचारीस मात्र कूच करून चाललों. परंतु श्रीमंत येऊन माघारें आणिलें. आह्मी मानाजी शिंदे, वगैरे फौज मिळोन तफावतीनें डावे बाजूस उतरलों आहोंत. रात्रंदिवस ध्यास तुम्हांकडील लागला आहे. हरतरेनें अपटणास मोह जनरालाजवळोन पाडवावा आणि मसलतच सर्व सिद्धीस न्यावी. मूल खरें, याजवर भांडण भांडतील. तरी मुलाविसीं इंग्रेजांनीं खातरजमा करून श्रीमंताचे वोटींत घालावें त्यास दगा पेंच नाहीं. परंतु फितुरियांचें पारपत्य झालें पाहिजे. त्याणीं मूल नसतां विनाकारण फितूर केला व दौलत गारद करून मोगलास दिली. पुढेंही लबाडी करतात. वचनें, प्रमाणें देऊन श्रीमंतांसीं बेमानी केली. पुढेंही इतबार नाहीं. त्यांचा अभिमान गैरवाजबी याणीं नच धरावा. ऐशी गोष्ट ज्या तरेनें होईल ते खटपट साधन आण्णा ! करावें. तुह्मी कराल तें येथें निभेल. परंतु सर्व मसलतीचा गुना तुह्मावर आला आहे. याचें विस्तारें कोठवर ल्याहावें ? इतके दिवस श्रममेहनत केलियाचें सार्थक निरार्थक होऊं न द्यावें. निदान जें मागतील तें इंग्रेजांस देऊं. राहील तीच दौलत करूं. परंतु नबाबसुद्धां फितुरियांचें पारपत्य घडे तेच गोष्ट करावी. यांत श्रीमंतही कबूल आहेत. तूर्त लांबणीवर पडलें. येथें तापीतीरीं दोन महिने जाले. वैरण बारा पंधरा कोस, तेही मिळेना. महागाई, पोटास नाहीं. ऐसा पेंच जाला आहे. बारा पंधरा कोस कही जाती, तेव्हां फितुरियांकडील पेंढारी, बेदड व धाडचा राऊत निवडक येऊन कहीवर घालवितात. रखवालीस पथकें पाठवावीं तीं एकीकडे जाऊन दगा भलतीकडे होतो. त्यांतही नित्य फौजेनें जावें, हेलपटे, पोटास नाहीं. आम्हीं, मानाजीबाबा आणखी एकदोन टोळिया, ऐसें बारीनें जावें. त्यांत वरकड गेले तरी दगाच होतो. मानाजीबावा, आम्हीं जावें, तरी नित्य पंधरा कोस जाणें येणें पडतें. फौज खराब होत चाललीं. सबब, हरतरेनें तजवीज करून येथोन दहा पंधरा कोस कुच चारापाणी पाहून सोनगडापुढें पूर्वेस घडे ते गोष्ट करून परवानगी पाठवावी. येथें बसलियानींच परिणाम लागून फौज जगत नाहीं. येविसींचें साधन करून जरूर परवानगी पाठवावी. बारी चढोन गेलियांत सर्व मसलत सिद्ध आहे. मोठे हंगामाचे दिवस जातात. फितुरियांकडील फौज गलबलली आहे. सर्वांचीं राजकारणें सिद्ध; परंतु बारी चढावी हें व इंग्रज काय करितात. इतकी वाट पाहतात. पुढें लढाई अगर फार दिवस मेहनत इंग्रेजांस पडत नाहीं. सहजांत हें रुख मात्र होऊन खानदेशांत गेले ह्मणजे मसलती सिद्धीस जातील आणि सर्व गोष्टी त्याच्या व श्रीमंताचे मनोदयानरूप घडतात. त्याविसीं तुह्मांस तिकडेही समजतच असेल.

येथून ल्याहावेसें नाहीं. सूचनाअर्थ लिहितों. वाचावयाचा कंटाळा न करावा. तूर्त कारनेलानीं फितुरियांवर रोष धरावा, त्याचे अपराध त्यास शासन योजावें; तें सोडून आमचेच गळां पडले. लाचार होऊन सोशीत आहों. श्रींमंतांचे मर्जीचाही दुसरा अर्थ नाहीं. कृपाच करीत आहेत. परिणामावरि सर्व नीट आहे. गायकवाडाचें आहे तसेंच आहे. कांहीं एक नवें घडलें अथवा घडणार नाहीं. मसलत ज्यारी जाली ह्मणजे श्रीमंतांचे चाकरीस फौजसुद्धां गोविंदराव यांस आणितों. येथील गुंता नाहीं. दुसरें तरी इंग्रजच होऊन राहिले आहेत. मेस्त्र इष्टोलाजवळोन आमची फर्मास व येक आरबी घोडा वळो करावयाला एक मागावा. रामसिंगास सांगत जावें. त्याचें वर्तमानही लिहीत जावें. बहुत काय लिहिणे ? कृपालोभ कीजे. हे विनंती.

श्री.

लेखांक १३०.

१६९७ माघ शुद्ध २.

राजश्री लक्षुमण आप्पाजी यासि:—

सुहुर सन सीत सबैन मया. ग्रहणाचे आधले दिवशीं धवशा व हरी फडके भेटले. शत्रूस बहुत आव आला. धवशा नव्हता तेव्हां मध्यम होते. हालीं जबरदस्तीनें घाटाखालीं येऊन गांठ घालावी, हा त्यांचा विचार जाहला. सामान बहुत जहालें. तीस हजारपर्यंत जहालें. आमचें सामान थोडें. त्यांत भक्षावयास नाहीं. सबब वेदिल जहालें. कारनेल आठाची गोष्ट सांगतात व करितीलही. यशअपेश मनुष्याचे अधीन नाहीं. लोकदृष्टीनें आमची बाजू हलकी दिसते. लज्या रक्षील-दुसरा उपाय नाहीं. अंगरेजाची व आमची बेदी करून, सेवट बरा दिसत नाहीं. आतां मुंबईहून कुमक यावयास दिवसगत पाहिजे, लढाई तरी दोन च्यार पांचा दिवसां अलीकडे पलीकडे होईल. धवशा आला नवता तें आह्मीच लढतों, ऐसी बराबरी होती सांप्रत ते भारी दिसतात. इंग्रेज थोडे, कसें होईल तें पहावें. उपाय कांहीं सुचत नाहीं. जनराल व सारे अंगरेज शहाणे म्हणोन वाटत होतें; परंतु या वेळेस आमची फजिती जाहल्यास त्यांचीही जहाली. अबरूसी व प्राणासी गांठ आहे. अद्यापि आठ च्यार दिवस लागले तरी तुमची 'कुमक आल्यास व कांहीं लक्ष देोन तरी खर्चास आल्यास शत्रूचीं पारपत्यें होतील. नाहीं तरी मगची गोष्ट पत्रीं कशास ल्याहावी ? समजतच आहे. ते परिछिन्न गांठ घालितात. आमचे व अंगरेजी सामान बहुत थोडें. खर्चास नाहीं, याजवरून समजणें. अंगरेज जनरालास लिहीत असतां कांहीं तर्तूद न केली, हें बारभाईचें पुण्य समजावें. दुसरें कारण दिसत नाहीं. मसलत मारली असतां सर्वही गमावलें. तेव्हां आमचेंच अदृष्ट समजावें ! अतःपर काय वारंवार ल्याहावें ? आतां हिंमत सोडीन म्हटल्यास परिणाम दिसत नाहीं. सर्व भरवसा चरणाचा आहे. दारू शिसेंही सामान पाठविल्यास कांहीं पाठवणें. आठच्यार दिवस त्याणीं दम खादला व मुंबईचें सामान आल्यासें मोठेंच काम होईल. देोहींतून येक फडशा होईल. आतां लांबत नाहींसें दिसतें. जाणिजे. छ १ जिल्हेज, बृहस्पतिवार. (लेखनावधिः)

खास दस्तुरी पत्र याच मजकुराचें कारनेलीकडे दिल्हें आहे. तें ते जनरालाकडे पाठवितील. ते तुह्मांस देतील. पत्र

मोकळें आहे. संशय येईल कीं, लखोटा फोडिला. तरी पत्र मोकळें दिल्हें आहे. जनराल यांणीं वाचलें तरी चिंता नाहीं. बरेंच आहे. म्हणोन मोकळेंच पत्र कारनेलीकडे दिल्हें. तें आगोदर पोंचलें असेल. हें पत्र दुसरें पाठविलें आहे. जाणिजे. छ मजकूर. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३१.

१६९७ माघ वद्य ६.

राजश्रि लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सुा सीत सबैन मया व अलफ. पा. अंकलेश्वर येथील पाऊण लाख रुपये दरसाल इंग्रेजास द्यावे याप्रमाणें तहनाम्यांत करार असतां, मेस्तर राबट गंभीर याणीं परगणे मजकुरीं ठाणें घालून झाडून अंमल बंद केला आहे. त्याविसीं वारंवार तुम्हांस लिहिलें व गंभीरासही सांगितलें. परंतु अंमल सुटत नाहीं. जनरालाची परवानगी पाहिजे म्हणतात. तहनाम्याखेरीज वर्तणूक करावयाविसीं जनरालानीं यास सांगितलें असें नाहीं. पावणेदोन लक्षांचा महाल बळावून बसले आहेत. त्यास, तुम्हीं जनरालासी बोलोन माहाल सरकारचा सरकारांत द्यावयाविसीं पत्र जनरालाचें गंभीरास पाठविणें. अगर सध्यां माहाल द्यावयाचा अनमान असला, तरी लाख रुपये तरी परगणे मजकूरचे सरकारांत द्यावे. येथें खर्चाची वोढ. कोठून ऐवज मिळावयास जागा नाहीं. फौज पोटावांचून हैराण आहे. दोन्ही प्रकारांतून कोणता तो करून घेणें. माहाल सरकारांत द्यावा, पाऊण लाख रुपये घेत जावे; अथवा लाख रुपये सरकारांत सध्यां सालमनकूरचे द्यावे. पुढें करारप्रमाणें अंमलांत येईल. व शहर सुरत येथील चौथाईची बाकी सनवातची मोगलाकडे राहिली होती. त्यास, मेस्तर गंभीराचे मुर्वतीमुळें निम्मेंसिम्मे सोड देऊन ऐवज पेशजी घेतला. हालीं सालमजकूरचा ऐवज वाजबी यावा त्यास, सुरतकर मोगल निम्मे ऐवज देतो आणि चौथाईचा दरोबस्त ऐवज पावला म्हणून कबज द्यावे म्हणतो. गंभीरानीं ताकीद करावी ते करीत नाहीं. याजकारितां हाही मजकूर जनरालास समजावून एविसीं मोंगलांस व गंभीरास पत्र पाठवावें कीं, वाजबी चौथाईचा ऐवज करारप्रमाणें देणें. येणेंप्रमाणें पत्रें पाठवून ऐवज पावेसा करणें. चहूंकडून नानाप्रकारचे लडेलटके प्राप्त होतात. बाहेरील मोगलाचा अंमल बंद करावा तरी गंभीर वाईट मानितील. काय लिहितील नकळे. येथें तों मसलतीचे लांबणीमुळें वोढ पडली तें लिहितां पुरवत नाहीं. ज्याचा भरवसा त्याजकडूनच विक्षेप होतो. उपाय नाहीं ! हें सर्व जनरालांनीं चित्तांत आणून सुधरावें हें उचित आहे. सर्व भरंवसा त्यांचा आहे, ऐसें बोलणें. तुमचीं पत्रें माघ शुद्ध शष्ठीचीं पावलीं. त्यांचीं उत्तरें मागाहून समजोन लेहून पाठवितों. जाणिजे. छ १९ जिल्हेज. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

श्रीशंकर.

लेखांक १३२.

१६९७ माघ वद्य ८.

राजश्री लक्ष्मणपंत अण्णा स्वामीचे सेवेसीः—

पोष्य सखाराम हरी कृतानेक प्रों विनंती येथील वर्तमान ता। माघ वद्य अ.

द्दमीपर्यंत सुखरूप असो. विशेष. आपणाकडील माघ शुध द्वितीयेचीं व सप्तमी—नवमीचीं पत्रें आलीं तीं विस्तारें अक्षरशा सरकारचीं पाहिलीं व आह्मांस एक बंद पाटींपोटीं व पुरवणीचा वर्ख ऐसें लिहिलियानें सर्व मजकूर समजला. अण्णा ! आपण विस्तरें येथील मसलतीचे अर्थ ध्यानांत आणून कालजी करितां. येविसींचीं साधनेंही करितात, याचे प्रकार मजला विदित. आपणासारखे आपणच आहेत. परंतु यास तरी संशय नाहीं. मसलत पेंचांत पडली आहे. येथें उपाय नाहीं. गोष्ट बोलली आहे. सर्व श्रीमंतांनीं वरचेवर लिहिलेंच आहे. याउपरी कांहीं सुचत नाहीं. व लिहवत नाहीं. सारे विलग अर्थ जाले आहेत. त्यांतही आपले आपल्यांत विरुद्धें वाढलीं आहेत. इंग्रज आह्मावर कारनेल किटण रुष्ट जाले आहेत. त्यास संबोधनास आपले थोरले ग्रहस्त सरकारबावा अनुकूल. नारो गोपाल गोदादर्शनीं हे एकत्र होऊन रात्रंदिवस खलबतें करितात. श्रीमंताची मर्जी तरी सवत—मत्सरें वाढवावें. हें सर्व येथूनच आहे. यामुळें अर्धींच विलग. त्यांत हे अर्थ प्राप्त ! तेव्हां बुडत्याचे पाय खोलीं, ऐसें जालें आहे. आह्मी येथें मुलें माणसें सुधा आहों. त्यास, कोणी आलिया संकटीं पडलों आहों. ऐशास इंग्रजी स्थलें सुरत भडोच. याशिवाय कोठें जागा नाहीं. सबब जनरालासी पक्कें बोलोनें त्याचें आश्वासन घ्यावें. दोहीस्ते लाऊन हरयेक जागा ठेऊं. नंतरीं खातरेस येईल तिकडे जातील. त्यास मनाई न करावी. परवानगीनें ठेविली तैसी परवानगीनें जावी, ऐसें न करावें. बारीक मोठे पेंच सर्व ध्यानांत तुमचे आहेत. ल्याहावसें नाहीं. इतके अर्थास संभाळोन जें कर्तव्य तें करावें आणि अपटणास लेहून पाठवावें. वरकड गोविंदराव—बावाचे वगैरे मजकूर लिहिले ते सवीवर आहेत. येक श्रीमंताचे कल्याणाखेरीज बाकीचें नीट आहे. हे गोष्ट प्रमाणच आहे. त्यांतही साधन रदबदली करणें तितक्या करून ठेवाव्या. बावाची मर्जी करणें सर्व तुह्माखेरीज नाहीं. आपला ऐवज देवलाबाबत बेदरचे तलावरील गुतऊन ठेविला आहे. सांगाल ल्याहाल तेथें पावता करूं. वरकड दरबारीं मसलतसमईचें कांहीं सुचत नाहीं. प्राणरक्षण कसें होईल हेंच सलाह पडलेलें आहे. अनुपत्यकालांत सर्व गोष्टी प्रतिकूल मसलतीस पडल्या आहेत. विलाज नाहीं. राजश्री आबा आले. ते आह्मी येक जागाच आहों. त्यामुळें नारिंगाची मसलतैक्य होऊन इंग्रज आह्मावर चिडविलें. त्यास सदाशिवबावा अनुकूल पडले आहेत. श्रीमंतास विनंती करून नारोपंताचें जाणें इंग्रजाकडे मना करविलें. त्यास त्या कामांतून काढिलें, हें समजोन कर्नेलीजवळोन रदबदली सख्त श्रीमंतासी करविली कीं, त्याखेरीज दुसरा कामांत नसावा. ऐसें केलें आहे. तेव्हां कर्नेलीचे मर्जीस्तव नारोपंत फिरोन कामांत घालणें प्राप्त. श्रीमंतांनीं अप्पाजीपंत निहाय नेमिले होते, परंतु आतां पुढें चालत नाहीं. इंग्रज दाब धरूं लागले आहेत. मसलत विलग. त्यांत हे प्रकार बनले आहेत. ऐसे बारीक मोठे प्रकार किती ल्याहावे ? नानाप्रकारचे पेच व कटकटी ! कोणांत कोणी नाहीं ! ऐसी गोष्ट जाली आहे. इतकेंही सोसून आमचा निश्चय जो आहे तोच खंबीर प्राण जाईतों सुटणार नाहीं. प्राणाचा संकल्प घालोन श्रीमंताची सेवा आरंभिली आहे. त्याचा शेवट करावा. एक वेळ फितुरियांचें पारपत्य व्हावें. श्रीमंत दौलतीवर बसले ह्मणजे कृतकृत्य जालों. पुढें इच्छा दुसरी नाहीं, यांत संशय नाहीं.

कसेंही गुजरलें तरी श्रीमंताचे चरणाचें लक्ष व मसलतीचे शेवटास जाणियाचें ध्यान दुसरें कदापि होणार नाहीं, हे खातरजमा तुमची आहे व माझा निश्चय हाच यांत गुंता नाहीं. परंतु आढळले अर्थ लिहिले आहेत. श्रीमंताचे मर्जीत दुसरा प्रकार नाहीं, हे माझी खातरजमा. परंतु ज्याणीं जें समजवावें तें ऐकावें, हा प्रकार प्रारंभापासून आहे तो मात्र आहे. त्यास विलाज नाहीं. अस्तु ! श्रीकृपेनें मसलत मात्र सिद्धीस जावी, हेच काळजींत आहे. परंतु ऐशा बखेडियांनीं दुष्मन शेर होतात व कितेक येणारांसहि संशय पडतो. गोविंदराव गाईकवाडामुळें लोक दोष ठेवितील. आह्मासी इंग्रज असें चालल्यानीं श्रीमंताचा व इंग्रजांचा इतबार लोक कसा धरितील. हे मसलतीस विरुद्ध हें समजोन श्रीमंतांनीं आज्ञा निक्षून करावी, तें मात्र घडत नाहीं. अस्तु! दैवच मसलतीचे विलग, त्यास यत्न काय ? तत्रापि जेथवर होईल तेथवर प्रेत्न सेवक लोकांनीं करावा, यांतच श्रेयस्कर जाणून श्रम साहास करीत आहों. परिणाम लावणार श्री व श्रीमंत आहेत. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ कीजे. हे विनंती.

श्री.

लेखांक १३१.

१६९७ फाल्गुन शुद्ध ८.

राजश्री लक्ष्मण अप्पाजी गो यांसि:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. एक दोन पत्रें तुमचीं आलीं, त्यांत जनरालाचे बोलण्याची खातरजमा लिहिली. आठ पंधरा दिवसांत लढाई सुरू व्हावयाचें होईल, ह्मणून विनंति लिहिली होती. त्यास, येथें पत्रें पाऊन पंधरा रोज जाले. अद्यापि कांहीं दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. प्रथम दिवस दिसतो. तापीतीरास तीन महिने एक जागा मुक्काम जाले. वैरणफांटें मिळावयाचें संकट. फौजेस रोजमरा नाहीं. पोटाचा गवगवा. लोकांनीं काय करावें ? पोटास तों पाहिजे ? त्याचे श्रम कोठपर्यंत पहावें ? तुमचे लिहिल्याचे तकव्यावरी पंधरा दिवस लोकांस उमेद होती. खर्चास असतें तरी, चार दिवस अधिक उणे लागते तरी निभावलें जातें.याजकरितां हे प्रकार युक्तीनें जनरालासी बोलून, सत्वर येथून कुच होय तें करणें. खानदेशांत गेलियानंतर, चार दिवस मुक्काम तेथें पडले तरी कामास पडतील. घोड्या माणसांत बाकी राहिली नाहीं. घोडी खराब जाहालियाउपरी लढाईच्या उपयोगी तरी काय पडतील ? इत्यादि प्रकार सुचऊन जलदी होय तें करणें. हैदर–नाईकाचे ऐवजीं जनरालानीं रुपये देविले आहेत, म्हणून कारनेल यांनीं विनंति केली. सुरतेस राउत पाठवावें, म्हणून सांगितलें. त्यावरून तेथें राउत पाठविले. अैशीं हजार रुपये गंमीरांनीं द्यावे. त्यास, रुपये नाहींत, पंधरा रोजीं पन्नास हजार देऊं, याप्रमाणें म्हणतात. येथें तों मोठें संकट, आजीचा दिवस गेला, प्रातःकालीं काय करावें, ऐसें प्राप्त आहे. गंभीर सरकारचे कामास नानाप्रकारें बोढितो. अलाहिदा पुरवणी–पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. जाणिजे. छ ६ मोहरम. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३२. (२)

१६९७ फाल्गुन शुद्ध ८.

पुा॥ राजश्री लक्ष्मण अप्पाजी गो॥ यांसी:—

सुा सीत सबैन मया व अलफ. जाबीतजंग हरि बल्लाळ यास सामील जाले. परंतु नगर व अशेरी दोन किल्ले द्यावयास फुतुरियांनीं कबूल केले आहेत ते द्यावे, ऐसें जाबीतजंग ह्मणतात. हरि बल्लाळ ह्मणतात कीं, एक लढाई मारा, त्यानंतर किल्ले देऊं. यामुळें दोघांची अट पडोन जाबीतजंग दोन कोस रुसोन मागे फिरले, असें वर्तमान आलें आहे. दुसरें: जाबीतजंगाचें बोलणें सारे फौजेनें माझें आराब्याचे आंत रहावें. फितुरी तें ऐकत नाहीं. इहेी बातमी आली. जनरालास सांगावीसें असलियास सांगणें. जाणिजे. छ ६ मोहरम. बहुत काय लिहिणें ? बारभाईकडील बातमी लिहिली आहे. परंतु बाजार आवाई आहे. जाणिजे. छ मजकूर.

(लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १३४.

१६९७ फाल्गुन शुद्ध ११ वृद्धि. राजश्री लक्ष्मण अपा गोसावी यासिः—

सुा सीत. आज करनेल किटिंग यांणीं साहित्यपत्र आपला कारभार स्थीर रहावा ह्मणोन मागितलें. त्यांत भाव स्पष्ट दिसोन आला कीं, दुसरा कोणी करनेल याचे जागा पाठवून यास तेथें नेणार. ऐसियासी याणें साहित्यपत्र मागितलें, तेव्हां आह्मास देणेंच पडलें. दुसरा प्रकार ह्मणावा तरी, हे आम्हासी खेचाखेची बहुत करीत होते. परंतु आमचें काम व्हावें, या पलुयावरहि बहुत. यास्तव आम्हांस यास काढावेंच काढाव, हा आग्रह नाहीं. काढिले तरी हेच पाहिजेत, हाहि आग्रह नाहीं. जनरालाचा मर्जी दरकार आहे, कोणेहि प्रकारें काम सेवटास जावें. परंतु यांचे मुरवतीबद्दल पत्र देणें लागलें. हा प्रकार तेथें श्रुत करणें. दोहीं प्रकारांस आह्मी राजीच आहों. दुसरा येईल तोही ओढक मिळाला तरी हाच बरा. यास्तव कोणी अमीनादाखल आम्हांजवळ नेहमीं असावे. म्हणजे आमचे मसलतीस सोय पडेल. हें पत्र बहुतच गुप्त लिहिलें असे. कोणास कळों नये. कळल्यास हे वाईट मानितील. यास्तव सावधपणें कानावर घालणें. जाणिजे. छ १० मोहरम. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३५.

१६९७ फाल्गुन शुद्ध ११ वृद्धि. राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सुा सीत सबैन मया व अलफ. कितेक इंग्रेजाकडील पेंच व घरचेही कितेक आहेत ते वारंवार कोठवरी ल्याहावे ? बाहेरील मनसबे तोडजोडी कराव्या त्या राहिल्या. घरांतलिच पेंच उलगडणें प्राप्त होतें. एक प्रकार असतां तरी ल्याहावयास येतें. नित्य नवेच प्रकार इंग्रेजाचे व किरकोळ. याजकरितां जनरालाकडील इतबारी आमचें बोलणें समजावयास येथें असलियानीं समजोन त्यास सांगेल. इकडेही समजावील. याजकरितां जनरालांसी बोलोन हर कोण्ही पाठवावा, म्हणून पेशजी तुम्हांस लिहिलें होतें तें अद्याप जालें नाहीं. तरी याउपरी जनरालासी बोलोन त्याचा इतबारी शाहाणा दुभाश्या ऐसा पाठवून देणें. मसलतीस लांबण पडली. खर्चाची वोढ, लोकांचे गवगवे त्यांत नाना प्रकारचे. हें कोठवरी सोसावें ? अथः पर मसलतीची गोष्ट सिध्धीस जात असलीयास उत्तम. नाहीं तर मुमईस उठोन यावें लागेल. सविस्तर मजकराची आज्ञा करोन

बाबू कोलटकर यास पाठविलें आहे. याचे जबानीवरोन कळेल. संकलितार्थ, अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. जाणिजे. छ १० मोहरम. जनरालासही मोघमपत्र सविस्तर तुम्हांस लिहिलें आहे म्हणून पाठविलें असे. पावतें करणें. किरकोळ मजकूर वारंवार जनरालासी बोलावें, हें उचित नाहीं. परंतु येथें प्राप्त होतात तें तुम्हांस कळावें याजकरितां लिहा आहे. युक्त समजावया योग्य तें सांगणें. मुख्यत्वें त्याचा ईतबारी दुभाशा प्रमाणिक येथें डेऱ्याजवळ राहून वाजवी त्यांस सांगे ऐसा आला म्हणजे लडे पडणार नाहींत. छ मजकूर. सरकारची जोडी कलकत्त्यास मेस्त्र टेलर याजकडे पाठविली होती. त्या जोडीबा जनरालास तेथून पत्र आलें तें पाठविलें असे. पावतें करणें. पुरवणीपत्र पाठविलें नाहीं. सविस्तर जबानीवरून कळेल छ. मा. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३६.

१६९७ फाल्गुन वद्य ३.

पु॥ राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. मसलत लांबणीस पडली. खर्चास तोड नाहीं. याजकरितां इंग्रेजी सरंजाम सोडून, फितुरियांवरी चालून जाऊन, लडाई करावी, श्रीनें दौलत दिल्ही आहे तरी त्यास मारून घेऊन, नाहीं तर होणार तें होईल, ऐसें योजिलें होतें. परंतु, तातड न करावी, दोन लाख रुपये कर्ज देतों, म्हणून कारनेळ होम बोलिले. त्याउपरी गाहाणवट द्यावें, यापरी दिक्कत घातली. सरकारांत गहाण ठेवावयास कांहीं नाहीं. हे जाबसाल करतां आठ च्यार रोज गेले, तों धौशा येऊन मिळाला. ते सबळ जाले. याजकरितां तोहि प्रकार राहिला. हालीं मसलत कांहीं सुचत नाहीं. तेविसींचे प्रकार अलाहिदापत्रीं विस्तारें लिहिले आहेत. कळतील. ऐशीं हजार जनरालानीं हैदरनाईकाचे ऐवजीं देविले. त्यापरी पन्नास आले. तीसहि आल्यादाखल. परंतु वोढ भारी. रोजमरादेखील जाहला नाहीं. कोठपर्यंत ल्याहावें ? जाणिजे. छ १७ मोहरम. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३७.

१६९७ फाल्गुन वद्य ६.

राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यांसिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. अपटणाचें पत्र आलें. त्यांत भाव, गंगातीरीं यावें, ऐसा आहे. त्यास, जनरालाचे विचारास आली तरी नाजूक मसलत आहे. त्यास, पक्केपणें जनरालांची व मुंबईकर सारे इंग्रजाची अनुकूलता मात्र असली पाहिजे. त्याचा कटकणा ऐसा करावा जे, दारमदारार्चे बोलणें हें केवळ येक पक्ष समजोन होत नाहीं. तेव्हां अपटण याणीं त्यांचें वर्तमान ऐकिलें, तैसेंच येथें येऊन आमचें ऐकावें. त्यास, पल्ला लांब, याजमुळें दिवसगत लागती. सबब, ऐसी तोड काढावी कीं, आह्मीं सारे इंग्रजसुद्धां फौजसह कुच करून खानदेशांत श्रीगंगातीरपर्यंत जावें, तेथें अपटण यांनीं तिकडोन यावें, आणि सर्व मजकूर समजावे, उपरांतिक त्याचे आमचे विचारें होईल तैसें करूं; नाहीं तरी आम्हांस मुंबईस पोंहचवावें. ऐसें असावें. इतकियांत आह्मी इंग्रजसह घाटावर गेलों ह्मणजे देशांतील कितेक सरदारांचीं वैगरे

राजकारणें आहेत त्यांचीं साधनें करून मेळऊन घेऊं. फौजहि जमा होईल. मुलूक मारून पोटासहि मिळेल. आमची मजबुदी जाली, ह्मणजे फितुरी सहजांतच पेचांत येतील. इंग्रजांसहि मेहनत पडणार नाहीं. मसलत सिद्धीस जाईल. परंतु या गोष्टीस इंग्रजाची अनुकूलता पक्की पाहिजे. कितेक राजकारणें येतील, त्यांत मातबरांची खातरजमाहि आंतून करावी लागेल. ही येक मसलत आहे. आमचा अभिमान धरून मसलत सेवटास नेणें व कांहीं अपटणांचेंहि मान्य करणें. त्यासहि साधन आहे हा प्रकारहि बोलोन पाहाणें. फितुरी लचाड, कृत्रिमी, आह्मांस कैदेदाखल ठेवावयाची योजना करून अपटणांस अनेका प्रकारें समजावलें आहे. त्यांचा आंतील भाव बारीक अर्थ अपटणाचे ध्यानास आले नाहींत. सबब तुम्हीं जनरालापासून त्यास सुचवावें आणि या प्रकारची मसलतहि जनरालास कळवावी. हे अपटणास समजों न द्यावें आणि मसलत मारावी. हाहि कटकणा आहे. तूर्त अपटणानीं लिहिलें, हें तरी प्रत्यक्ष डौल कैद करावयाचा आहे. तेव्हां इंग्रजाचे घरीं आह्मी आलों असतां त्याचे स्वाधीन आह्मांस करून कैद करवितात हे मोष्ट त्यांचे अभिमानास उचित कीं काय ? फितुरियांनीं कृत्रिम करून बाह्यात्कारें दाहा लक्षांचा खर्च चालवितों, ऐसें समजाविलें. इंग्रज आम्हांपासून गेले ह्मणजे ते आपले खेळास चुकणार नाहींत. हे सर्व अर्थ तुम्हांस माहीत आहेत. येविसीं विस्तर कोठवरी ल्याहावा ? सर्व मदार जनरालावर आहे. प्रसंगास तुह्मी तेथें आहां. कळतील तैशा तोडजोडी बोलाव्या. इकडेहि वरचेवर कळवीत जाणें. जाणिजे. छ २० मोहरम.

(लेखनावधिः)

श्रीसाच सपुत्रो ४.

लेखांक १३८.

१६९७ फाल्गुन वद्य ६.

पु॥ रा॥ लक्ष्मण आपाः—

सु॥ सीत. आपटण व बारभाईकडून सलूखाचा पैगाम आला तो अलाहिदापत्रीं लिहिला आहे. त्यावरून कळेल. केवळच एक—कल्ली आहे. कैदेचा मजकूर आहे, हा आपटण समजला असेल किंवा नसेल. हजार राऊत व शागीर्द पेशा दोन—सें माणूस ते ठेऊन देणार. खर्च ते चालविणार. म्हणून उपकार. दाहा लक्षांतच सारें. परंतु त्याचीं माणसें ह्मणजे कैद, हें ते समजलेच नसंतील. जनरालास सांगितल्यानें समजतील. त्यांचे मतें इंगरेजी काइद्याप्रों तीं माणसें आमचे हुकुमांत राहातील. तरी तसें नाहीं. कैदेचा प्रकार स्पष्ट दिसतो. दरमहा पंचवीस हजार ते धर्मादायाप्रों देतील तेव्हां देतील. ऐसा सलूख करून आम्हांस काय कर्तव्य आहे ? दौलत करावी ह्मणोन अंगरेजाचा आश्रय धरिला. त्यास, कैद ! तेव्हां दैव ह्मणावें ! तेव्हां हा प्रकार आह्मी कबूल करीतच नाहीं. जनरालही करणार नाहींतच. त्याची चर्चाच नाहीं. परंतु तहच करणें, तेव्हां भीमा, दुसरा गोदावरी, तिसरा गुजरात व तापी—उत्तर—तीर, देखील माळवा, ऐसें उत्तम, मध्यम, कनिष्ट प्रकारचा तह होईल तरी करावा. चवथा प्रकार तीनही होईनात, आह्मांजवळ तरी मसलत करावयास खजाना नाहीं, जनरालाजवळहि खजाना नाहीं, हैदर तरी पाठवीत नाहीं. चो महिन्यांनीं लक्ष आले तरी काय होणार ? तेव्हां एकटी गुजरात तरी निवळ आम्हांकडे असावी. परंतु हा तह पक्का नाहीं. गुजरातेंत गुजराण करून वर्ष दोन वर्षें राहूं. सारें दवलतीचा दावा आहे. तेव्हां याचा काट

जनरालाचे हातून विलायतेस पक्का करावा. पातशाहा व कंपनी राजी करून, त्यांचा हुकूम हिंदुस्तानचे सारे जनरालास आणून मग आपले मनोरथ सिद्धीस न्यावे. गुजरात तरी फौजेचें व आमचें पोट भरावयास काल गुदराणीस पाहिजे. वरकड त्याणीं लिहिला प्रकार हा तर होणेंच नाहीं. याबद्दल मरण कबूल ! परंतु कैद पुरवत नाहीं ! निदानीं दहा लक्ष अंगरेज जनरालांनीं घेऊन आह्मांस रेवातीरीं भडोचेजवळ ठेवावें. रणगड बहुत मर्जीची जागा, तेथें राहून दाहाच घेऊं. परंतु त्यांचे कैदेंत राहाणें नाहीं. भडोचेजवळ रणगडास राहूं. तेथें वर्ष दोन वरीस स्नानसंध्या करून काल नेऊं. राजकारणें विलायतेंतील व हिंदचीं ज्यारी असतील, त्यांस अंगरेजांनीं मना करूं नये. अंगरेजाचे आश्रयानें राहाणें, ह्मणोन त्यांचें संमत पाहिजे. रणगड भडोचेहून सतरा कोस आहे. तेथेंच नेहमीं राहूं. भडोचेहून साहित्य यावें. आह्मीही मजबुतीनें राहूं. दरमहा लक्ष रुो म्हणजे बारांत खर्च चालवूं. गुदराण करून राहूं. डबाई वगैरे माहाल आहेत तो ऐवज बारांतच. हे केवळ कनिष्टाहून कनिष्ट प्रकार. परंतु तुटोंच लागले तरी जडावें, म्हणोन तुम्हांस लिहिले आहेत. हे प्रकार जनराल त्यांसीं पहिल्यानें बोलतील तरी कांहींच होणार नाहीं. ते खचतील. यास्तव निदानींचा विचार होईल तरीच बोलावा. नाहीं तरी तोंडाची वाफ गमाऊं नये. याखेरीज सिंदीचें कम-तरीन पन्नास साठ लक्ष देणें आहे. याची वाट जाहाली पाहिजे. याचा विचार जाहला पाहिजे. कळावें म्हणोन सविस्तर लिहिलें आहे. हा प्रकार कोणासींच बोललों नाहीं. तुम्हांस मात्र च्यार पांच पर्याय सलुखाचे लिहिले आहेत. तेही खजाना नाहीं, लाचार आहों, स कमतीचा सलूख करावा लागतो. नाहीं तरी हे गोष्टच बोलणें उचित नाहीं. जाणिजे. छ २० मोहरम. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १३९.

१६९७ फाल्गुन वद्य ७.

पारसी पत्र.

कारनेल अपटण यांस पत्र लिहिलें आहे त्याची नकलः-

तुह्मीं पत्र पाठविलें त्यांत तहाचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. ऐशास, आमचा व इंग्रेजाचा तह जनराल व कोसल मुंबईकर यांचे मारुफातीनें कुंपनीचे मोहरेनसी करारमदार जाहाला तोच सर्वा इंग्रेजांनीं सेवटास न्यावा. आम्हीं कुंपनीचे सरकारांत करारमदार करून दिल्हयाप्रों आमलांतही आणून दिल्हें. त्याजकडील आमचें कार्य राहिलें तेंही तहनामियाप्रों सेवटास नेतील हाच भरंवसा आहे. कदाचित् तफावत दिसोन आलिया विलायतेस जाणें प्राप्त आहे. पेशजी परस्परें तह ठरला आहे, त्याखेरीज दुसरा मजकूर कसा घडेल ? तुह्मीं बंगाल्याहून आलेत, ते परस्परें फितुरियाकडे जाऊन त्यांचें सांगितल्याप्रों मनमानेसें लिहिलें. तेव्हां कबूल कसें करावें ? आह्मांजवळ येऊन, आमचेंही वर्तमान मनास आणून, मग जाबसाल करितां, तरी तुमची दूरदेशीं व वाजवीची चाल नजरेस येती. येक-पक्षींच ऐकोन, आह्मांकडील कांहींच मनास न आणितां लिहिलें. यावरून अपूर्व दिसोन आलें ! त्यांणीं तहाचे मजकूर तुम्हांस सांगितले, त्यांतील दगाबाजीचे कुन्हे आहेत ते तुम्हांस समजले नसतील. सबब

असें आह्मांस लिहिलें ते गोष्ट मंजुर पडणार नाहीं. छ २१ मोहरम.

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १४०.

१६९७ फाल्गुन अखेर.

राजश्री लक्ष्मण आपाजी यांसिः—

सुहूर—सन सीत सबैन मया व अलफ. अपटणानें तह केला, हा शेवटास जाणार नाहीं. श्रीमंतांचा तह पडल्यासिवाय साऱ्या दौलतीस चैन नाहीं. बारभाई थकले. फौजेस द्यावयास रुो नाहीं. बहुत हैराण जाहाले. यास्तव कांहीं तह पाडावा, ऐसें, हरि फडके व आपा बळवंत वगैरे फौजेसमीप आहेत, या सरदारांचे मनांत आलें आहे. बातमी खरी आहे. अमदाबाद द्यावी, निदानीं सारी गुजराथ द्यावी, आणि तह पाडावा, ऐसें आंत घाटतात. येविसीं त्यांणीं पुणियाकडेही लिहिलें असेल. अपटणाचें संमत घेऊन आह्मासी बोलतील, ऐसें तह—कीक बातमींत वर्तमान आलें. त्याजवरून हें आगाव पत्र तुह्मांस लिहिलें असे. गुजरातेवर तह करावा किंवा न करावा ? गुजरातेपैकीं दोघे गायकवाडांचा कारभार पुणियास ठेवितील. सरंजाम्यांचे महाल आहेत. त्याविसींही सलोखा करतील. तेव्हां थोडकेंच राहील. बहुतकरून इंग्रेजांनीं निवडक परगणे घेतलेच आहेत. तेव्हां दहा पांच सात कोठें निव्वळ रहातील हें कळत नाहीं. आमचा भाव कीं, इंग्रेजास हुकूम बंगालियाचा अर्धा तरी आलाच आहे, बाकीहि श्रीकृपेनें येईल. विलायतेचाहि येईल. यार्णी सारींच दौलत आमची कायम करून द्यावी, ह्मणजे आमचे नफे व इंग्रेजाचेही नफे आहेत. पुढें मोगलाचें पारपत्य करावें. त्यांत चवथाई देऊं. आमचे सरंजामी हरामखोर आहेत. त्यांचे पारिपत्यास अनकूळ असावें. तेथें दहला देऊं. एकूण इंग्रेजाचे बहुतच नफे. आमचे तरी आहेतच, कदाचित् तूर्त (पुढें गहाळ).

श्रीसांबः सपुत्रो ४.

लेखांक. १४१.

१६९८ चैत्र शुद्ध १.

राजश्री लक्ष्मण अपाः—

सु॥ सीत. लौकर वाचून जनरालासी व आणिक मायेचे कोशलदारासी व इष्टोरासी बोलावे याविसीं मनन करून बोलणें.

इंगरेजी सरंजाम लढाईचा बंद. याजमुळें मनसुबा रुतणीस पडला. यास्तव नवाब निजामअल्ली व धवशाचें राजकारण आह्मीं तयार केलें. त्याचीही अर्जी आहे. परंतु त्यास संवशय इंगरेजाचा आहे कीं, आह्मी श्रीमंताकडे जालों आणि बारभाईकडे अपटणाचे हुकुमावरून मुंबईकर इंगरेज जाहाले तरी मनसुबा सेवटास जाणार नाहीं. यास्तव जनरालांनीं खातरजमा करावी कीं, आह्मीं रघुनाथरावाचा पक्ष करूं, निदानी बहुत संकट पडलें तरी उगेच राहूं, परंतु बारभाईचा पक्ष धरणार नाहीं. असें लेहून द्यावें, म्हणजे काम होतें. विलायतेच्या हुकुमाचा पेच नाहीं. तो यावयास वर्ष पाहिजे. तोंपावेतों बारभाईचीं पारपत्यें होऊन दौलत कायम होईल. सविस्तर बोलून पक्कें करून ठेवणें. येविसीं सुरतकर मोगलाकडून धवशाची खातरजमा करावी लागेल व देऊं, करूं तें देतील. येविसींही खातरजमा करावी. पुढें त्याजकडून तफावत होईलच, तेव्हां माघारें द्यावयास येईल. येविसीं सविस्तर बोलणें.

कलम १

खर्चास नाहीं, ह्मणोन वारंवार तुह्मांस लिहिलें. फतेसिंगाकडील ऐवजाविसीं लिहिलें. त्यावरून जनरालासी ताकीद करणें आली कीं पावती पाठवून देणें. त्यावरून ताळी लागले आहेत. सा लक्ष भरणा कमपेश जाहाला, आणि दाहाचो पावती मागतात. इतके दिवस मनास येईल तसा रुपया उखळला. सारे इंगरेज एकमत होऊन एक साक्ष देतील. आम्ही तरी परिछिन्न पावती देत नाहीं. मनसुचा तरी, उरावर शत्रु. तशांत यासी वाद सांगणें प्राप्त. पावती द्यावी तरी च्यार लक्ष रुपये बुडवावे. येविसीं दोडजोड बोलून त्याचा कोणी इतबारी आल्यास आह्मांस चैन पडेल व च्यार रुपये मिळतील नाहींतरी नित्य कटकट कोठपरियंत करावी? त्यास तरी लोभामुळे सुचत नाहीं. दुसरा कोशलदारांनील अथवा गारडीन कोणी येता तरी आह्मास पेच न पडता. तूर्त दुहीरी पेचांत आहों. येविसीं वारंवार किती ल्याहावें ! कलम १.

सर्व भरंवसा जनरालावर आहे. परंतु त्याच्या बंदीमुळें दुसरी राजकारणें करावीं लागतात. येविसीं हस्तें परहस्तें आमचें काम करूं, ऐसें पूर्वी जनराल तुह्मांसी बोललेच असतील. त्याच्या दस्तऐवजावर धरून बोलणें. जाणिजे. छ २९ मोहरम.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १४२.

१६९८ चैत्र शुद्ध २.

राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यासिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ.

धौशाकडील राजकारण आलें आहे. हा मजकूर पहिलाही तुह्मांस लिाच आहे. व इलीहि अलाहिदा पत्रीं लिा आहे. कळेल. तात्पर्य, मोगलाचें राजकारण अंगरेजाचे मध्यस्तीखेरीज चैनत नाहीं. याविसीं मागें कची खातरजमा अंगरेजाकडून जरूर जाली पा. याचा प्रकार जनरालासी फार समजोन बोलणें. जनरालाकडून कार्य आमचें सेवटास जाईना. आपटणानें गुंता पाडिला ह्मणून मोगल अनुकूल करून घेणें प्राप्त जालें. व मोगल मागेल तें देणें प्राप्त. याचा संशय कदाचित् जनरालाचे मनांत येईल कीं, आपले मध्यस्तीनें मोगल अनकूल करून देविल्यानें श्रीमंत व मोगल येकत्र होऊन फितुरियाचें पारिपत्य करितील, आपण अभिमान धरिला असतां आपल्याच्यानें कांहीं जालें नाहीं, तेव्हां आपल्यास श्रीमंतांनीं जें देऊं केलें आहे तें प्राप्त होणार नाहीं, कंपनीचे सरकारचा नफा आपटणांनीं फितुरियापासोन ठराऊन घेतला असेल तोही बुडेल, तेव्हां मोगल अनकूल श्रीमंतांस करून देणें वाईट. असे चितांत आणून, मोगलाचे खातरजमेविसीं जनराल आमचे अनुकूल होणार नाहींत. अशी उगीच आशंका चित्तांत आली. म्हणून हा मार तुह्मास कळावयाकरितां लिा असे. तरी असी आशंका तरी जनरालाचे चितांत न ये आणि मोगलाचे राजकारणाचे खातरजमेस जनराल अनुकूल होत, तसे तऱ्हेनें बोलोन धौशाची व निजामअल्लीची खातरजमा अलाहिदा लिाप्रमाणें करीत तें करणें. तुह्मी शाहाणे व आमचे यख्तीयारी आहां. न तुटतां तोडजोड होईल तें करणें. जाणिजे. छ ३० मोहरम. बृहस्पतीवार.

(लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो ४.

लेखांक १४३.

१६९८ चैत्र शुद्ध ६.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य रा॰ जश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराऊ प्रधान नमस्कार. सु॥ सीत सबैन मया व अलफ.

फतेसिंग गायकवाड याजकडील ऐवज सरकारांत द्यावयाविसींचा मजकूर जनरालाजवळ बोलिलों. त्यांणीं ऐवज द्यावयाविसीं किटिणीस लिहितों म्हणून कबूल केलें. लिहिलें असेल. त्यास, फतेसिंगाबाबतचा ऐवज जिन्नस व नख्त जें असेल तें किटिणीजवळ मागोन घ्यावें. न द्यावयाविसीं जनरालाचा आग्रह नाहीं, ह्मणून लिहिलेंत. त्यास, येथें किटिणीकडून गाईकवाडाबाबत नख्त तो एक पैसा देत नाहीं. कापड व जवाहीर मिळोन चाळीस पन्नास हजारांचें आलें आहे. त्यास, जवाहिरास विकून फौजेस पोटास द्यावें, तरी जवाहीर कोणी साहुकार घेत नाहीं. चाळीस पन्नास हजारांचें जवाहीर व कापड यार्णे फौजेस दुरोजा पुरणार नाहीं. जवाहीर गाईकवाडाबाबत गाहाण ठेवून कोणी ऐवज देईल तरी पाहूं. एकंदर ऐवज देत नाहीं. फार पुसिलें तरी दिक्क होऊन परवानगी आणवितों, अथवा खर्च जाहला, ह्मणतो. शुद्ध बोलतच नाहीं. + + येथें सरकारचा ++सरदार असावा. इंग्रजा + + + +पाऊण लाख ++ द्यावें. नाहींतरी + + पाऊण लाख रुपये घेऊन सर + + लाख रुपये द्यावें. + + सरकारचा कमावीसदार ठेविला नाहीं. महाल पावणेदोन लाखांचा. यास इंग्रजांनीं लाख रुपये सरकारांत द्यावे. साल-मजकूरचें येणें. हा मजकूर जनरालासी बोलोन ते लाख रुपये मागोन घेऊन हुजूर पाठवणें. अगर, येथें किटिणीकडून देवावे म्हणून परवानगी जनरलाची पाठवून देणें.

असो. अंकलेश्वर कांहीं अंग्रेजास दिल्हें नाहीं. पाऊण लाख रुपये मात्र दरसाल द्यावें, असा करार आहे. तोटानफा सरकारचा. हेंच आम्हांस पुरवलें. त्याचा आग्रहच असल्यास एक लक्ष रुपये सरकारांत मागावें. कलम १.

सारांष खुलासा मजकूर. हरप्रकारें पांचचार, तीन, तरी लक्ष रुपये पाठवावे. कांहीं कुमक तोफा माणूस देऊन इष्टूर पाठवावा व लढावयाची परवानगी यावीह्मणजे सत्वर कार्यसिद्धि होईल. सरकारची कामें व जनरालाचीं. दुहेरी नफे होतील. आमची सर्व मदार जनरालावर आहे. सविस्तर बोलणें जसें पुढें सांगतील तसें करूं. परंतु खर्चाशिवाय फौज रहात नाहीं. नाकर्ते पण येतें.

कळावें हे विनंति.

सुरतकर मोगलाकडून चवथाईचा ऐवज येत नाहीं. याविसी जनरालासी बोलणें त्यावरून जनरालाजवळ बोलिलो. त्यास जनराल बोलिले कीं, मोगलाचा मुलूक लष्करामुळें चोळटला, त्यास भक्षावयाचें मानसीक; यापमाणें बोलिलें, म्हणून लिहिलें त्यास येथें खर्चाची वोढ, फौजेस पोटास नाहीं, सबब दिलगीर. गाईकवाडाकडील ऐवज हि इंग्रजाकडून येईना. सुरतकराचा हा तपशील. फितुरियांची फौज बारी उतरली. हरिपंतास ज्याचीतजंग धौशा मिळाला. तेव्हां ते जमले. त्यांची फौज बारी उतरली, सबब, सुरतअठावीशींतील अंमल झाडून उठला. रुपयास ठिकाण नाहीं. पोटाचा विचार कांहीं सुचत नाहीं. सुरतअठावीशींतिल सरकारचे

परगणे व गायकवाडाकडील परगणे येथें ऐवज नेहमीं नेमणूक आहे त्याप्रमाणें परगणियांतून पावला. ज्याजती च यंदा घेतला. १

दोन लाख रुपये येथें इंग्रजांनीं कर्ज देतों ऐसें इंग्रजांनीं—किटींग व होम दोघांनीं हि—कबूल केलें आहे,म्हणून तुह्मास लिहिलें. परंतु बोलिले मात्र, पैसा एक दिल्हा नाहीं. पुढेंहि मिळत नाहींसें दिसोन आलें. कलम १.

सुरतेंतील मोगलानें सालमजकूरीं जाजती च ऐवज दर परगण्यांत घेतला. कोठें नेमणुकेप्रमाणें घेतला. कमी तरी कोठेंही घेतला नसेल. परगणे चोळटले तरी त्यांस कांहीं तोटा नाहीं. सरकारची व गायकवाडीची मात्र नुकसानी. त्याचा ऐवज गुंतला आहे तो घेऊन जाजती च घेतला. याप्रमाणें रुजू करून देऊं. जनरालांनीं इतबारी पाठविल्यास होईल. गंभीर मात्र त्याजविसी लिहीत असतील. त्याचा अर्थ तर्कानें समजावा. ऐवजाचा नफाच त्यास जाहाला.सरकारचा व गाईकवाडाकडील चौथाईचा अगल सुरळीत होत नाहीं.पन्नास रुपये देऊन शंभराचे कबज मागतो. यास्तव आह्मी ऐवज घेत नाहीं. अगदीं वसूलच पडला नाहीं.

लेखांक १४४.

१६९८ चैत्र शुद्ध ६.

निदानीचे पक्ष लिहिले आहेत. वाचून प्रसंगानरूप बोलणें. आह्मांस तर भय प्राप्त जाहलें कीं, याच्यानें किमपि हुकूम अपटणाचा मोडवत नाहीं. पुढें हे तरी परस्वाधीन. काय करतील न कळे. तेव्हां आबरूवर आलें, त्यापेक्षां प्राण जातील तरी बरें. आबरू शत्रूचे हातीं न जावी. बरकड जें दैवीं असेल तसेंच खाऊन राहूं. सर्वस्वें बुडालों.आतां इतकीच इच्छा राहिली. लौकर बोलून पक्के करणें. त्याची हिंमत कांहींच नसली तरी,भेट घेऊन,लागलेंच खर्चाचा काहीं बेजमी करून, होनावराकडे हैदराकडे पावते करावे. बोलून ठेवणें रुचरूई येविसीं बोलणें होईलच. जाणिजे. छ ४ सफर.

(लेखनावधिः

श्रीसांबः सपुत्रो ४.

लेखांक १४५.

१६९८ चैत्र शुद्ध ६.

राजश्री लक्ष्मण आपाः—

सु॥ सीत. आजपर्यंत पत्रें लिहीत गेलों. तुम्हांस पावलींच. उत्तरेंही आलीं. सेवटीं निदानीं हे फळ दृष्टीस आलें. आतां कांहीं तोड दिसत नाहीं. आपटणानें आमची व जनरालाची व कोशलद्वारांची आबरुच घेतली. आह्मी तरी सर्वस्वें बुडालों. गुजरात अमदाबादेखेरीज सोडविली होती तेहि हातची गेली. परम दुःख ! काय ल्याहावें ? असो ! सांप्रत येकदोन पर्याय लिहिले आहेत त्यांची उत्तरें जलद यावीं. याप्रों तन्ही निदानीं जनराल कोशलांनीं करावें. पत्रीं काय लिहावें ? तथापि लिहिलें असे. तूर्त जनरालाचें भेटीसच येतों. जनरालाची पुर्ती ममता व पुढें जनरालास भीडेस पाडून आपलें काम करून घ्यावें. त्यास, त्याचे हातीं कांहीं दिसत नाहीं. जसा आपटणानें ठराव केला तसेंच त्याणीं लिहिलें. तोडमोड देखील नाहीं. पुढें आह्मीं तेथें राहिलों तेव्हां दुसरा हुकूम आला कीं यास चौकीचीं माणसें देऊन पुण्यास पाठवणें. तेव्हां याणीं त्यास साफ ल्याहावें कीं, आमचे घरीं जो येईल त्यास दुसऱ्याचे हातीं देणेंच नाहीं. हा दस्तुर इंगरेजी नाहीं.

तरी आमचा बचाव होऊन भडोचेसच चार साहा महिने विलायतेचा हुकूम येई तोंपर्यंत पोटाची बेगमी करून ठेवावी. शागीर्देपेशा व हात्ती घोडे मिळोन दरमहा तीस हजार तन्ही पाहिजेत. यांत त्यांची मर्जी. खर्चाविसीं काय ओढावें? परंतु शत्रूचे हातीं परिछिन्न देऊंच नये. निदानीं यांचा उपायचें नाहीं. लक्ष दोन लक्ष. निदानीं कर्जवाम तरी देऊन हैदराकडे तन्ही पोहचतें करावें. हरयेक बहाना करावा. मागें बळ राहील त्यासही पोढाचाऊन द्यावें. पुढें कपालीं असेल तें होईल. कलम १.

आंगरेजाप्रों थोर बलकट नाहीं ह्मणोन त्यांचा पक्ष केला. सेवटीं आमचे कपाळानें घालविलें! येविसीं जनरलास काय शब्द ठेवावा? दैव आपलें! वारंवार जनरालास छळूं नये. दैव असेल तसें होईल. कलम कित्ता.

दहों लक्ष सिंदीसुद्धां बारभाई देतात. इतक्यांचेच परगणे डबाई वगैरे रेवातिरीं द्यावें. तेव्हां त्यांतच गुजराण करूं. दुसरा काय इलाज? निदानीं काशीप्रयागाकडे लाऊन द्यावें. प्रयागीं अथवा श्रीजवळ चित्तास येईल तेथें राहूं. दाहापांचाचे जें देणें तें तेथेंच परगणेच लाऊन द्यावें. याप्रों आपटणास लेहून करवावें. कपालीं नसल्यास मग लटके हव्यास कशास करावे? पण शत्रूचे कबजात राहणें यापेक्षां जीव जाईल तर बहुत उत्तम! कलम १.

आज मारवाडांत निघोन गेल्यास वाट फुटेल. हजार पांचशें दोनसें चाकरीस तन्ही येतीलच परंतु तुमचे लिहिल्यावरून यांकडेच आलों. यांणीं स्वस्थता करूनें ठेवावें. निदानीं हैदराकडे खर्चास देऊन पोहचवावें कलम १.

सवासहा लक्षाचे जवाहीर गाहाण पूर्वीं ठेविलें तें माघारें आमचें आह्मांस द्यावें. यास खर्चासही द्यावयाचें न होय, तरी साहा लक्ष गाहाण घेऊन, पांच चार लक्ष खर्चास देऊन, हैदरखानाकडे पोहचतें करावें. काम न जाहलें तेव्हां जवाहीर आमचें माघारें देतील. बेइमान नाहींत हे तर खातरजमाच आहे. कलम १.

निदानींचे पक्ष लिहिले आहेत. वाचून प्रसंगानुरूप बोलणें. आम्हांस परम भय सांप्रत जाहालें कीं, याच्यानें किमपी हुकूम आपटणाचा मोडवत नाहीं. पुढें हे तरी परस्वाधीन. काय करितील न कले. तेव्हां आबरूवर आलें, त्यापेक्षां प्राण जातील तरी बरें. आबरू शत्रूचे हातीं न जावी. वरकड जें दैवीं असेल तसेंच समजून राहूं. सर्वस्वें बुडालों! आतां इतकीच इच्छा राहिली. जाणिजे. छ ४ सफर, चैत्र शुद्ध शष्टी, सोमवार.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १४६.

१६९८ चैत्र शुद्ध १०.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः-

सुा सन सीत सबैन मया व अलफ. फितुरी व धवशाजवळ कारनेल किटिण कूच करून जातात. धवशाकडील राजकारण लागलें आहे. त्याची वाट आठ दाहा दिवस पाहावी लागते. तिकडील राजकारण होतें न होतें. याजमुळें फौजेचा जथ राखिला पाहिजे. इंग्रज तरी कूच करून जातात. मुंचईचा हुकूम यांस एका महिन्याचा. त्यास, महिन्याचा दिवस तीन चार बाकी आहेत. दोन चार दिवस आह्मीं यांजवळ रजबदल करून मागितले. येकूण सात

आठ दहा दिवस आह्माजवळ राहावें, ऐसा करार करून घेतला असतां, मध्येंच कूच करून जाऊं लागतात. कारण कीं, फतेसिंगाकडील ऐवज यांजकडे दाहा लक्ष पैकीं सरकारांत सवासाहा लक्ष पावला असतां दाहाची पावती मागतात. न द्यावी तरी दबावून कूच करून जातात. पेंचामुळें उपाय नाहीं. दहा दिवस राहावें ऐसा करार करून घेतला असतां, पावतीची अडणूक दाखवून मध्येंच कूच करून जातात. सबब पावती देणें प्राप्त जाहालें. अडऊन पावती घेतली. जनरालास व तेथील कोशलदार तुमचे मायेचे असतील त्यांस समजाऊन ठेवावें. अद्यापि पावती दिल्ही नाहीं. परंतु आज उद्यां निकडच पडली तरी द्यावी लागेल. जोंपर्यंत चुकेल तोंपर्यंत देतच नाहीं. इलाज नाहीं तेव्हां द्यावी लागेल. कांहीं तपसील लाऊन हेऊं.यास तीं फतेसिंगाकडून तेराची भरती ह्मणोन फतेसिंगाकडील कारभारी दोन तीनदां बोलले होते. हे दाहाच पावले ह्मणत होते. तीन वरते घेतले असतील. दाहांत साडेसाहा आह्मांस पावले. साडेतिहीची तफावत. लाख पन्नास हजारही नव्हेत. किती रुपये आह्मी द्यावे. आमचे लस्कर उपाशीं मेलें. आह्मांस व आमचें जनावरांस देखील चंदी मिळतां संकट. सांप्रत पाव चंदी देतों.ऐशया समयांत हेही रुपये हातीं येत नाहीं. रुपयाविसीं दैवयोगच नाहीं. असो ! तेविसी तोड कशी करावी तें तुह्मींच विचार करून लिहिणें. तेथें प्रयत्न होईल तो करणें. हजुर आल्यापेक्षां तुमचें तेथें रहाणें बहुत उपयोगी आहे. सांप्रत आह्मांस जनरालाचें येथें येणें. जें देतील तेंच समजून राहाणें. नर्मदातीर भडोच आहे. तेथें राहाण्याचें मानस आहे. शहरापासून पावकोस अर्धकोस राहावेसें मानस आहे. अथवा पेठेंत बनल्यास राहूं. सर्व भरंवसा त्याचा आहे. काय करितील ते करोत. सर्व हकीकत त्यांस जाहीर करावी. त्यासी प्रतारणा करावयाची नाहीं. जर धवशाकडील राजकारण सिद्ध जाहालें तरी श्रीकृपेनें जाहालेसें समजतों. व्हावेंसें दिसतें. परंतु होईल तेव्हां खरें.आतां सर्व आशा सोडून तीर्थवास तरी करावा. जितकें खर्चास मिळलें तितक्यांत संवसार करावा. व्यापार करून फळ नाहीं, तेव्हां कशास करावा ? फिरंगी गोवेकर यांजकडीलहि राजकारण आहे. बनलें तरी करितों. हाही मजकूर त्यांचे कानावर घालणें. परंतु सर्वांमध्यें श्रेष्ठ अंगरेज. त्यांस सामील करून शत्रूची पारपत्त्येंहि निमे जाहलीं असतां, फिरोन हिसका बसला. तेव्हां वैराग्य ही प्राप्त जाहालें. तुह्मी ल्याहाल तसें केलें जाईल. शत्रूचें हातीं न जावें इतकेंच पुरें. तीर्थवास, उत्तम स्थल, इतकें मात्र पुरें. जाणिजे. छ ८ सफर.

श्री.

लेखांक १४७.

१६९८ चैत्र शुद्ध १३.

राजश्री लक्ष्मण अपाजी गोसावी यासिः..

सु॥ सीत सबैन मया व अलफ.

कारनेल किटीण याचे वाकडेपणाचे अर्थ सरकारांतून तुह्मांस लिहित गेलों त्यापरी जनरालासी बोललां असाल. त्यास, हाली कारनेल सरकारांत वाकडेपणा दाखवीत नाहीं. तरी कोणेहेविसीं जनरालासी याचे वर्तणुकीचे भाव न बोलणें. कळल्यास रुष्ट होतील. याजकरितां बोलला असाल ते बोलला. पुढें एकंदर न बोलणें. सरकारचें जवाहीर साहा लक्षाचें गाहाण ठेविलें आहे. त्यास, सरकारचे फौजेस पोटास द्यावयास ऐवज नाहीं. याजकरितां जनरालासी

हरतऱ्हेनें बोलोन, जवाहीर हातास येईल तें करणें. म्हणजे हरकोठें गाहाण ठेऊन फौजेस रोजमुरा द्यावयास येईल. जाणिजे. छ ११ सफर. बहुत काय लिहिणें ? कारनेलीचा रंग पाहून, मागाहून लिहिलें येईल त्याप्रों बोलणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १४८.

१६९८ चैत्र वद्य ५.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. धौशाचे विद्यमानें नबाब निजामअल्लीखांचें राजकारण आलें आहे. परंतु, जनरालाकडून खातरजमा पा॥, त्याविसीं जनरालासीं तुह्मीं बोलिलेंत,त्यांनीं उत्तर केलें तें सविस्तर लिहिलेंत तें समजलें. त्यास ये गोष्टीचा अर्जू धौशाची फार आहे कीं, जनरालाकडून पक्की खातरजमा असावी कीं,पक्ष करणें तरी श्रीमंताचाच करूं, हें न घडे तरी फितुरीयांकडे कदापी होणार नाहीं. असें लिहिण्यांत यावें व कोणी आमचा विश्वासूक सुरतेस येईल त्याची तेथेंच खातरजमा व्हावी. असे भाव आहेत. त्यासी येविसीं जनरालांनीं धौशाचे नावें पत्र पाठवावें कीं, श्रीमंतांचें वडिलांचें बोलणें ठरेल त्याप्रों तुह्मी त्यांचे उपयोगीं पडावें,इकडील संशय कोणेविषयीं न धरावा, आह्मी पुरंदरकर यांचा पक्ष करणार नाहीं, कोणेहि औंशीं त्यांची कुमक करणार नाहीं, खातरजमा असों देणें. म्हणून पत्र आह्माकडे पाठवावें. हा उत्तम पक्ष. हें न घडे तरी,याच अन्वयें आमचें तऱ्हीं नांवें पत्र पाठवावें कीं, धौशे व नबाब निजामअल्ली यांनीं तुमची कुमक केलिया आम्हांस खुशी आहे. त्यांचे हातें आपलें काम करून घ्यावें. पुरंदरकरांची कुमक आह्मीं कोणेही औंशीं करणार नाहीं, असें पत्र साफ यावें. आणि गंभीरास येक पत्र जनरालाचें यावें कीं, धौशे व निजामअलें यांकडील कोणी तुम्हांकडे भला माणूस आला तरी तुम्ही खातरजमा करणें कीं, पुरंदरकरांची कुमक जनराल व आह्मीं करणार नाहीं, फुरसत पडली तरी श्रीमंतांचीच कुमक करूं असें पत्र सुरतकरांस यावें. ह्मणजे या कार्याचें साधन पक्कें जालें. धौशाचें पत्र साफ आलें आहे. त्याची नकल करून पाठविली असे. तीच जनरालांस वाचून दाखवावी. मजकूर गुप्त ठेवावा. मुख्य पक्ष धौशास जनरालाचे खातरजमेविसीं बिनकिलाफ यावें व गंभीरास हि लि॥प्रों यावें. जर धौशास पत्र नच देत, तरी आमचे तऱ्हीं नांवें पत्र लि॥अन्वयें यावें. हें जलद करून पाठवावें, धौशाचे मजकुराविसीं सरकारचें पत्र पावलें ह्मणून जनराल ह्मणत होते, असें तुमचे लिहिल्यांत. त्याजवरून तुमचे लि॥प्रों जनरालांस पत्र पाठविलें असे. हें त्यांस देऊन, धौशाचे खातरजमेचें पत्र लिहिल्याप्रमाणें जें येईल तें घेऊन सत्वर पाठवणें. जनरालांस पत्र लिहिलें आहे. त्याचा मसोदा तुम्हांकडे पा॥ असे. मजकूर कळेल त्याअन्वयें बोलणें. जाणिजे. छ १९ सफर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १४९.

१६९८ चैत्र वद्य ५.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यासिः—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. अपटणाचीं पत्रें सरकारांत करनेल कीर्टिंग यास हालीं आलीं. त्यांचा भाव पहिल्या लिहि-

ण्यावर सक्तता असे. हालीं नरम भाव लिहिले आहेत जे, आपण तह केला याचा प्रकार कलकत्येवाले यांच्या हुकमाप्रमाणें केलें असे. त्यास, आपणास तूर्त तुमची कांहीं कुमक करूं नये व बारभाईची कुमक करूं नये. त्यास, तूर्त तुम्ही हरयेक कोणी मोगल अगर भोसले आपले कुमकेस आल्यास आणावे. यांत आमचा आग्रह नाहीं. आम्हास विलायतेचा हुकूम आला म्हणजे आम्ही आपली कुमक करूं, विलायतेचा हुकूम, आपणच कुमक करावी, म्हणून येईल, बारभाईची कुमक करावी, असा येणारच नाहीं. आह्मीं बारभाईची कुमक करणार नाहीं. तूर्तचा प्रकार जाहाला. त्यांत तूर्त इंग्रजी कुमक आहे, तो सरंजाम माघारा नेववावा, हें मात्र ठरविलें आहे. यांत आम्हांवर रोष नसावा. कलकत्याच्या हुकमावरून करावें लागलें. याजी॥ हालीं नरम–पणाचे लिहिणेयांत भाव आहेत. म्हणून करनेल यांनीं निवेदन केलें व सरकारांत पत्रही आलें. त्यास, करनेल तेथेंच जात आहे. याचा भाव तेथें तुम्हीं मनास आणावा. तेथील कोशलदार वगैरे इंग्रजांस समजला असेल. त्यास, तेथील शोध करून लिहून पाठविणें. छ १९ सफर. मंगळवार पंचमी, प्रातःकालच्या ६ घटिका दिवस.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १५०.

१६९८ चैत्र वद्य ६.

राजश्री लक्षुमण आपाजी गोसावी यांसिः–

सु॥ सीत सबैन मया व अलफ. करनेल आपटण याणीं सरकारांत पत्र लिहिलें आहे त्याचा दर जवाब एक खुशकीच्या मार्गें रवाना केला असे व येक हालीं तुह्मांकडे पाठविला आहे. तरी तुह्मीं जनराल यांचे विद्यमानें मशारनिलेकडे रवाना करणें. अपटणास पत्र लिहिलें आहे त्याची नक्कल पाठविली आहे ही पाहून जनरालास सविस्तर अर्थ समजावणें. जाणिजे. छ २० सफर. बहुत काय लिहिणें?

(लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो ४.

लेखांक १५१.

१६९८ चैत्र वद्य ६.

पु॥ राजश्री लक्ष्मण आपाजी गो॥ यांसिः–

सु॥ सीत सबैन मया व अलफ. सरकारांत खर्चाची वोढ आहे, ही तुह्मांस समजूनच आहे, याविसीं जनरालासी बोलोन कांहीं तोड काढावी, म्हणून तुह्मांस वारंवार लिहिलेंच आहे व तुम्हींहि बोलतच असाल. अपटणानें तह केला, त्यांत तीन लक्ष सालिना खर्चास देऊन कोपरगांवीं राहावें ऐसें ठराविलें. त्यास, कोपरगांवीं रहाणे कसें घडतें? हा मजकूर विस्तारें पेशजी ऐक दोन पत्रीं लिहिला. कोपिनीच्या स्थलांत राहूं. येथें सदरहु ऐवज जनरालांनीं अपटणास लिहून फितुरि याजकडून आपण घेऊन आमचा खर्च चालवावा. म्हणून एक दोन पत्रीं लिहिलें होतें. त्याजवरून जनरालाजवळ बोललां. त्यांणीं आपटणास लिहिलें. त्याचा जाब जनरालास आला कीं, कोपीनीच्या स्थलांत राहून खर्चास द्यावयास अनकूल पडणार नाहीं. यापरी त्याचा जाब आला, म्हणून जनरालानीं सांगितलें, म्हणून लिहिलेंत. त्यास, याविसीं पेशजी तुह्मास लिहिलें असेल, त्यावरून तुह्मीं जनरालासी बोललां. परंतु, आम्हासहि

फितुरि याजकडून खर्चास घेऊन राहावें, हें योग्य नाहीं. खर्च चालला पाहिजे, हें संकट जनरालास. परंतु पदरचा खर्च करून चाल वावों हि हिंमत न होय. तरी आमचेच ऐवज दोन तीन आहेत ते दाखवावे. एक, सा लक्षाचें जवाहीर गाहाण आहे तें आपटणानें फितुरियांस द्यावें, ह्मणोन ठराविलें आहे. अपटण आमचे जवाहीर कोण देणार ? जनरालानीं अपटणास साफ ल्याहावें, ज्याणें आह्मापाशीं जवाहीर दिलें त्याचें त्याजवल आह्मीं देऊं, दुसऱ्यास देणार नाहीं, तुह्मी काय समजोन फितुरियास द्यावें ह्मणून ठरावितां, आम्हांस दुसरेयास देतां नये, ज्याचें त्यास देऊं म्हणून आपटणास जनरालानीं ल्याहावें आणि आमचें जवाहीर आम्हांस द्यावें. ह्मणजे सा लक्षाचे जवाहीर हरयेक जागा ठेवून, निदानीं तीन लक्ष रुपये मिळतील. हा येक ऐवज. दुसराः कारनेल किटिंग यांणीं फतेसिंगाबाबत दहा लक्ष रुपये वसूल करून घेतले. त्यापैकीं सरकारांत सा सवा सा लक्ष अजमासें दिल्हे आणि पावती दहाची घेतली. त्यापोटीं बक्षीस लक्ष सवा लक्ष जाऊन बाकी वाजवी दोन अडीच लक्ष पावेतों निघतात. याचा तपसील तुम्हांस लिहिलाच आहे. हा ऐवज जनरालांनीं वाजवी आह्मांस देववावा. व मोगल सुरतकर याजकडे चौथाईचा ऐवज येणें. त्यास सालमजकुरीं पैसा आला नाहीं. मोगलाकडे चाळीस पन्नास हजार रुपये येणें. तो सुद्दामत देत नाहीं. त्यास गंभीरास जनरालांनीं ताकीद करून, सदरहु ऐवज देवावा. हे तीन ऐवज आमचे आह्मांस देवावे. पदरचें देणें यांत लागत नाहीं. यापोटीं जनराला जवळ बोलोन, जवाहीर वगैरे लिहिल्यापोटीं मागोन घ्यावें. आपटणाचें पत्र सरकारांत आलें. त्याचा जाब त्यास लिहिला आहे. तो त्यास जनारलाकडून पावता करावा. त्याच्या मसुद्याची नकल पाठविली आहे. तात्पर्य, बहुत नरम लिहिलें आहे. यांचें कारण आमची कुमक इंग्रेजांनीं सोडिली व त्यांजवळून मोगल तहवरजंग गेला तेंही आमच्याच सूत्रानें गेला. पुढें दो ती महिन्यांनीं आम्हांस उपयोगी पडेल. हालीं उभयतां आंगजोरच आहों. त्यांत फितुरयाची फौज फार सडली. महागाई. वैरण मिळत नाहीं. घोडीं माणसें उपासी मरतात, लोकांस रोजमरा सा सात महिने नाहीं. सबब फौज उटोन जात आहे. तीजसध्यें कुवत नाहीं. यापमाणें तिकडील हैराणगत तूर्त आहे. पुढें जमनील. हालीं त्यांची आपली बरोबरी आहे. सबब लडावयाचा विचार ठराविला आहे. सरकारचे फौजेचा लडावयाचा दम भारी आहे. व येथें सुरतेस सरंजाम पाहिजे तो मिळतो. दारूगोळा, सिसें व सिबदी गाडद मिळते. लोकांतही दम मोठा. यास्तव लडाईची तर्तूद करीत आहों. या दिवसांत गाठल्यास मनसबा ठीक पडतो. पुढें ते भारी होतील. सबब आह्मीहि बलकटीच आंतून करितों. त्यांस न समजावें, समजल्यास सावध होतील. यास्तव नरम जाब आपटण यास लिहिला आहे. लडाई आठ पंधरा दिवसांत व्हावी, ऐसें आहे. गोविंदराव वैगेरे बोलाविले आहेत. तेहि इतक्यांत येतील. लडावयाचा केवल निश्चय नाहीं. बनल्यासारिखें होईल. तुह्मी सुरत, मुंबई, भडोच या तीनही स्थलांतून हरयेक मर्जीस पडेल तेथेंच राहूं. तेथें खर्च चालला पाहिजे. तो जनराल देतीलच. परंतु जनरालावरही संकट न पडतां आपला ऐवज त्याणीं उगऊन दिल्यास त्याचे हातीं आहे. येणेंकरून त्यास संकट नाहीं, व आमचे काम समजोन प्रसंगानुरूप बोलणें. जाणिजे. छ २० सफर. (लेखनावधिः)

लेखांक १५२.

१६९८ चैत्र वद्य ७.

अजम मेस्तर बाढम ईस्कोयेर कोशलदार बंदर सुरत दाम महबतहू:—

छ मलाज मुख लिसान दस्तगाहाय अतिजाद दोस्ताआन. आजीज्यानीच चिंतो विठल सलाम आंके. यथील खैरखुशी जाणून आपली खैरअफीयत कलमीं करीत जावी. दिगर. अजम उइलिम हारनबी जनराल यांस खत अदमीयासोबत पाठविलें आहे. त्यास, ज्याहाजावरून आदमीयाची रवानगी करून मुंबईस पोंहचत ऐसें करावें. व तिकडून जबाब घेऊन येईल त्यास ईजानेबानजीक पोंहचाऊन द्यावें. रोा छ २१ सफर. दराज काय लिहिणें ? हे किताबत.

श्रीशंकर.

लेखांक १५३.

१६९८ चैत्र वद्य १४.

राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यांसि:—

सु।। सीत सबैन मया व अलफ. खासा स्वारी सुरतेस येऊन राहिली. लोकांचे शिबंदीचा गवगवा. मसलत सर्व प्रकारें बिघडली. सर्व संकटप्राप्त्या एक इंग्रजांचे प्रतिकूलतेमुळें जाली.परंतु याचे घरीं असरियास येऊन राहिल्यानीं दुसरियाचा उपद्रव लागों देणार नाहीं व राहूं तोंपर्यंत जा ह्मणणार नाहीं, ऐसी खातरजमा पक्की होती. यामुळें वीस बेवीस रोज येथें गुजरले. वरचेवर तुह्मांस व जनरालांस पत्रें लिहीत गेलों. अपटणांसहि दोन पत्रें लिहिलीं. कांहीं तरी सोय निघेल. जनरालांनीं अंगेज केला आहे. त्याची काळजी त्यांसच असावी. आजपर्यंत ज्याचा हात इंग्रजांनीं धरिला तो सोडला नाहीं. ऐसा यांचा लौकिक ऐकत आलों ऐसें असतां, सांप्रत आह्मांस पटकी बसविली. केवळ विश्वासघात, मोठे दगाबाजहि बेइमानी होत गेले, त्यांच्यानेंहि कोणाचा जाला नसेल ऐसा, जाला आहे.त्यांचें विस्तर कोठवर ल्याहावें ! असो ! एथें दम खाऊन शिबंदीचा गवगवा वारावा,लोकांचें हातून मुक्त व्हावें, तोडजोड पडेल तैसी पाडावी, दुसरे कोठें गेलियास परिणाम नाहीं, ऐसें जाणून लाचारीस आजपर्यंत मुक्काम करून राहिलों. मुंबईस यावें अथवा भडोच सुरत येथें राहावें, तरी शिबंदीनें प्राणाशीं गांठ घातली आहे. यांचे हातून उलगडा जाला म्हणजे मग जो विचार करणें तो करावा. ऐसें असतां, काल छ २७ सफरीं मेस्त्र गंभीर व कारनेल किटीण यांनीं येऊन साफच सांगितलें कीं, इतके दिवस तुह्मी येथें राहिलां, त्यास शहराआसपास तसदी फौजेची लागती, फडके वगैरे फौजा तुह्मांवर येणार, आह्मांस कुमक होणार नाहीं, व फौजसुद्धां तुह्मांस ठेऊन घेतलें, याची बदलामीहि आह्मांवर येईल, यास्तव कूच करून जावें, हरकोठें दम खाऊन फौज जगवावी, बचाव जे रीतीनें होईल तैसा करावा, आमचें भरवासियांवर राहूं नये. शहरांत येत असाल तरी दोनशें माणसांनसीं यावें, महमुदीबागांत शहरांत जागा करून देऊं,जाजती लोक आंत घेणार नाहीं. ऐसें तुटकेंच बोलिले. इतके दिवस मसलतीची उमेदच दाखवीत गेले. टेलरचें पत्र आलें, यांत कांहीं बरें असेल असें ह्मणत होते. त्याचा जाबसाल परस्पर त्यांस जनरालाचा आला व तुह्मींही त्याचें बोलणियाचे भाव सुचवून लिहिले. बंगालवाले जनरालांचें पत्र तरी आह्मांस

पावलें नाहीं. परंतु अर्थ ध्यानांत आला. त्याजवरून केवळ संकटाचे दिवस प्राप्त जाले. तेव्हां फिरंगियाचें राजकारण, सुरतेंत त्याची कोठी आहे, त्याचे हातून दुवणकरांसीं लागूं केलें. त्याणीं, येऊन राहावें, आमचे पेटयांत आलियास बाहेरील पेंच पडों देणार नाहीं, फौजसुद्धां बचाव करूं, पुढें गोव्याकडील जाबसाल आणून मसलत करणें तैसी होईल. इतका त्याचा आसरा धरून तूर्त प्राण रक्षावयाकरितां तेथें गेलों. परंतु सर्व भार इंग्रजांवर आहे. ज्या तेरेनें आमची कुमक होय ते गोष्ट त्याणीं करावी. त्यांचे घरींहून दुसरे जागा गेलों, ऐसें न समजावें. कालहरण मात्र केलें आहे. हे अर्थ जनरालासी बोलावे. जाणिजे. छ २७ सफर. तूर्त सुरतेस आहों. कलकत्तेकराचें पत्र पाठविलें आहे, त्याचा जाबसाल तुह्मांकडून आला ह्मणजे करणें तैसें केलें जाईल. छ मजकूर.

लेखांक १५४.

१६९८ वैशाख शुद्ध ६.

वर्ष सहा महिने गुजरातेवरच तह पडला तरी कबूल करावा लागेल. तेव्हां, इंग्रेजाकडील पा॥ माघारे द्यावे ऐसा तह आपटणानें ठराविला आहेच. त्याप्रों सारे पा॥ आमचे हवालीं करावे. परगणेयाची स्मरणानें नांवनिसी:—

नेहमीं दिल्हे होते.

१ उर्पाड
१ जंबूसर
१ आमोद मागाहून मेस्तर शाहानें करून घेतले.
१ आंकलेश्वराचे दरसाल उकते पाडण लक्ष द्यावें.

आपटणाचे तहाप्रों हेहि माहाल आह्मा.कडे येतील. कदाचित् भीड पडलीच तर थोडीबहुत रद्दबदली आह्मांस ऐकावी लागल. परतु आमची मर्जी नर्मदातीरीं बहुत. यास्तव हसोट अंकलेश्वर हे तरी घेणें प्राप्त आहे. जंबूसर मातबर, सबब द्यावें लागेल. कदाचित आमोद मात्र आपले रजावंदीनें त्याजकडे ठेऊं. उर्पाड तीही लक्षांचे, आमोद लक्षाचे बेरजेचे अजमासें लिा आहे. येविसीची तोडजोड कसें बोलावें, त्याचा विचार आपले जागाच दोन दिवस करून, गणदोष मनन करून बोलणें. हा कागद अद्यापि येथें कोणासही जाहीर नाहीं तेथेंही जाहीर नच व्हावा. मेस्तर शाहा पुर्ता ममतेंत असल्यास, त्यास विचार पुसावा. बापू सारस्वत योग्य असीलियास बोलणें. नाहीं तरी जनरालासीच एकांतीं बोलणें. परंतु त्यासहि लोभ असेलच. तेव्हां बोलणें सक्तच पडेल. लोभापुढें वाजवी गैरवाजवी समजत नाहीं.त्याजपासूनच आह्मास काम घेणें. तरी त्याचाच लोभ तोडावा हें त्यास कसें गोड वाटेल ? यास्तव प्रसंग पाहोन बोलावें. परंतु केवळ पोकळ सोडूं नये. आपटणानेंच त्याचा लोभ तोडला आहे. जर ते आह्मांस दौलतीवर बसवितील तर आह्मीं लिहून दिल्हें आहे, त्यापैकीं एक गांव माघारा घेत नाहीं. व आणिकही मर्जीस आल्यास थोडें बहुत देऊं. परंतु त्याचे करारापों त्याच्यानें सेवटास न जाईं, तेव्हां आमचा करार कोठें राहिला? जवाहीर व पा॥ माघारे देणें त्यास वाजवीचे रुईनें प्राप्त आहे. वाजबी विचारतील तरी देतीलच. परंतु या कालांत वाजबी ह्मणजे जुलूम ह्मणतात. तपशीलवार लिहिलें आहे. उत्तर तपशीलवार लिहिणें आणि बापू सारस्वत हजूर पाठवणें. कलम १

दरमहांत दिल्हे.

१ हसोट
१ आंकलेश्वरचे बाकी
१ बलसाड
१ भूतसर
४

सदरहू च्यार परगण्यांत आमचे कें-मावीसदार वाजवी असावे. त्यांणीं साल-गुद्दस्ता जबरदस्तीनें ठेविले ते पा। सांप्रत आह्मांकडे देवावे. हसोटची सनद कारनेलीं-नीं लटकें बोलून दगाबाजीनें नेली आहे, ती सनद मावारी द्यावी. विश्वनाथ दुभाषा व नारो गोपाळ व भालेराव त्रिवर्ग मध्यें होते. विश्वनाथ, नारो गोपाळ याचे हवालींच केली होती कीं, फतेसिंगानें चाकरीस बराबर यावें. गोविंदराव याची तिजाई सरकारांत हवालीं करावी व तिजाईचे रुपये सोळा लक्ष साहासष्ट हजार द्यावे. तीनही कामें करावीं. ६०० दिल्ह्यावर हे सनद कारनेलीजवळ द्यावी. ऐसी बाशर्तीची दिल्ही असतां, वि-श्वनाथ व नारो गोपाळ यांणीं खुशामती-स्तव दिल्ही. ती कारनेलीनें मुंबईस पाठ-विली. यास्तव विश्वनाथ तेथें गेला आहे. त्यास पुसणें, रुबरु बोलवणें, आणि सनद मावारीं घेणें. आह्मास पा। द्यावे लागलील यास्तव तेथेंच येव्हांच बोलावें. कलम १.

पा। व जवाहिराचे विषईं मग बोलल्यास कसें ठीक पडेल ? हसोटचे वगैरे जाब-साल वाजवीचे येव्हांच बोलत जावें. ऐसें सुचलें तें लिहिलें असे. तुह्मीं तेथें प्रसंग पाहून बोलणें. केवळ येथील लिहि-ल्यावर च न जाणें. तुह्मीं येकन्यारी, इ-तबारी, प्रामाणिक, शाहाणे ऐसे समजोन तुह्मांस पाठविलें. तुह्मावर जनरालही कृपा करितात. व जनरालही प्रामाणिक. यास्तव बोलावें. गैरवाजवी बोलूं लागल्यास मग बोलूं नये. जसा प्रसंग देखावा तसें बो-लावें. कलम १.

बापू सारस्वतास पाठवणें. कांहीं काम आहे. फिरोन पाहिजे तरी पाठवूं. कलम १.

येणेंप्रों कलमें लिहिलीं आहेत. उत्तरें पाठवणें. जाणिजे. छ ५ रोवल.

(लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १५५.

१६९८ वैशाख शुद्ध ७.

राजश्री लक्ष्मण आपाजी यांसिः—

सुा सीत सबैन मया व अलफ. अपट-णानें तह केला तो केवळ अयोग्य. अह्मांस परिच्छिन्न अमान्य. तेव्हां लढाईच सुरू राहिली. बारभाई सोनगडपावेतों आले. आह्मीं सुरतेचे पूर्वेस अश्विनीकुमाराज-वळ असों. आंग्रेज मावारे आले ते गांवांत (शहरां) राहिले. कदाचित लढाईच प-डली तरी इंग्रेजाची कुमक येईल, हा भर-वसा नाहीं. बहुधा येणारच नाहीं. त्यांत करनेल नित्य रुष्ट, याजमुळें अगदींच भर-वसा नाहीं. तोंडानें देखील गोड बोलत नाहीं. असो ! जे मसलत प्राप्त होईल तसें करूं. तुह्मी येविसीं जनराल—कोशलास सांगोन आमची कुमक करीत, असा हुकूम पाठवावा. आह्मी त्यांजवर चढोन जात नाहीं. तेच चढोन आले तरी मात्र कुमक करीत, इतकाच पुरे. त्याचा हुकुम आला झणजे झक मारीत येतील. असो ! तुह्मी पुसाल, होईल तरी कराल. न ऐकत तरी उपाय काय ? शहरांत जावें तरी फौज उठोन जाईल. मग, बंगालियाचा हुकूम आला तरी केवळ आंगरेजाच्यांनींच काय होणार ? यास्तव बाहेर राहिलों. जाणिजे. छ. ६ रबिलावल, बृहस्पतिवार. (लेखनावधिः)

श्री.

लेखांक १५६.

१६९८ वैशाख शुद्ध ८.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी:—

विनंति सेवक बाजीराव गोविंद व विठ्ठल विश्राम कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ता। छ ७ रबिलावल मुा। बेंकापूर स्वामीचे कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. इकडून पत्रें, तुंगभद्रा दक्षणतीरींहून येक व उत्तरगिरीच्या मुकामांहून दोन व मुक्काम मजकुरींहून येक, येकूण चार जोडया समागमें विनंतिपत्रें लिहिलीं, त्यांजवरून सविस्तर विवेदन जालेंच असेल. बंकापुरास मोर्चे लाविले ह्मणून लिा होतें. त्यास, बारा तोफा जोडून, मार तोफाचा बहुत करून, किल्ला जेर करून, काल खालीं करून घेतला. येथून कूच होऊन धारवाडास जात आहों. तिसरे मुक्कामास धारवडास दाखल होऊन, मोर्चे लाऊन, दो रोजांत धारवाड घेऊन, मिरजपर्यंत येत आहों. ऐसीयास, खासास्वारी तिकडून कूच होऊन पुढें दरमजल यावें. ह्मणजे इकडून हे फौज व महाराज करवीरकरवार्सा आपलें सूत्रांत आहेत त्यांची फौज, दाहा हजारपर्यंत आहे, येकत्र होऊन शत्रूचें पारपत्य सहजात होतें. अखेरीचे दिवस आले, याजकरितां जलदीकरून यावें. पुढें मसलत लांबली तरी, हे छावणीकरितां मावारा फिरतील. याजकरित। विनति लिहिली आहे. मोठ्या प्रेतेंकरून येवढ्या भारी सरंजामानसी नबाबास घेऊन आलों. आतां तिकडून विलंब जाहला तरी मग काय करावें ? यास्तव स्वामीनीं या समयांत अंगरेज जें मागतील तें कबूल करून समागमें घेऊन पुढें यावें. याणीं ह्मटल्याप्रमाणें अमल।त आणिलें. याप्रों तिकडून जोरा व्हावा, ह्मणजे कार्यसिद्धि जाहली. येथें तिकडील नाना प्रकारचीं वर्तमानें येतात. याजकरितां तेथील वर्तमान आह्मांस आठवे रोजीं कळे असें कासीद जोडया चांगल्या निवडून बाध—मुदतीनें पोंहचत असें रा। करावे. म्हणजे वर्तमान परस्परें वरचेवर कळेल. नबाबानीं स्वामीस पत्र लिहिलें आहे तें पाठविलें आहे. स्वामीनींहि पत्र नवाबास बहुत संतोषाचें ल्याहावें. नवाबाचें लक्ष सर्व प्रकारें स्वामीपासीं आहे. स्वामीकडील वरचेवर वर्तमान कळत नाहीं, ह्मणूनच बहुत श्रमी होतात. याजकरितां वरचेवर पत्रें येत जावीं. स्वामीच्या आज्ञेवरून मुबलक पैका खर्च करून आले. तेव्हां, यासी संतोषाचीं पत्रें आल्यानें, बहुत संतोषी होऊन कार्यास पडतील. नबाबांसी आह्मी करार—मदार करून दिल्हा आहे. त्याप्रों संनदा स्वामीच्या आल्या पाहिजेत. त्यास, तपसीलवार संनदा यावयाकरितां मार्ग दुर्गट. याजकरितां नवाबाचे नावें येक संनद कीं, बाजीराव याणीं तुह्मासी करारमदार करून दिल्हा आहे त्याप्रों सरकारांतून करार असे. पत्राचें संनद लेहून, आमच्या लखोट्यांत घालून, पाठवावी. याचें कारण आपण म्हणतील तरी येथील बोलण्यांत भाव आहे कीं, मसलतीस पैका तुम्हापासीं यावयास नाहीं आणि धणियाच्या सनदा आणून द्याव्या ह्मणून करार केला त्याही येत नाहीं. यांजकरितां लिहिलें असे. हीं पत्रें पावतांच स्वारी पुढें दरमजल यावी. हा योग घडला तर फारच उत्तम. कदाचित् विलंबाचा प्रकार असला तरी, तेथील मसलतीचा विचार कोणे प्रकारेचा तो पुरवणीपत्रीं तपसीलवार लेहून पाठवावा. स्वामीकडे पैका पाठवावा याविसीं नवा-

बासी बोललों. त्यास, पैकाही सोईसोईनें पाठवितील. शिंदे, होळकर, स्वामीच्या लक्षीं आहेत, ह्मणोन येथें वर्तमान एकिलें. त्यास त्याजकडीलहि वर्तमान ल्याहावयाची आज्ञा केली पाहिजे. सारांश गोष्ट तिकडून यावयाची त्वरा जाहल्यानें इकडील श्रमाचें सार्थक आहे. याजकरितां विस्तारें विनंति लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्री.

लेखांक १५७.

१६९८ वैशाख शुद्ध ८.

श्रीसांबः ० सपुत्रो विजयते.

राजा शाहूनरपति हर्षनीधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ता। रामजी कडूसकर सु।। सीत सबैन मया व अलफ. तुह्मीं पेशजी किल्ले घेतले आहेत. हालींहि जेथवर तुमचा हात पोहोंचेल तेथपर्यंत किल्ले हस्तगत करणें. किल्लुच्याच्या बंदोबस्ताकरितां व फितुरी याजकडील मिलाफी कुल आहेत तीं हस्तगत करून, च्यार रुपये घ्यावयाकरितां राजश्री लक्ष्मण आपाजी तुम्हास लिहितील त्याप्रों करणें. जाणिजे. छ ७ रबिलावल. आज्ञाप्रमाण.

(लेखनोवधिः)

श्री.

१६९८ वैशाख शुद्ध १०.

पुरवणी राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यासीः-

सु।। सीत सबैन मया व अलफ.

अपटणाचे तहाचें पत्र बंगाल्यास पावोन त्याचा जाब येई तोंपर्यंत मुंबईवाले लढाई करतील असा रंग दिसत नाहीं. परंतु केली गोष्ट आपली सिद्ध होत्ये, ह्मणोन हर्षित आहेत. बारभाईचे दोषः इंग्रेजी च्यार जहाजें धरून नेलीं व वाट अद्यापि सुरळित चालत नाहीं व भडोचेजवळ तीन लक्षाचा मुलूक देऊं केला तो अद्याप नेमून देत नाहीं. ऐवज मसलतीस खर्च जाहला त्याचे ठिकाण नाहीं व हंगामा मिटावा सबब तह केला तो हंगामा मिटत नाहीं, अधिकच होतो. कोपरगांवचा तह बंदीखान्यादाखल. त्यास श्रीमंत राजी नाहींत. सखारामपंत व नानाफडणीस या दोघांनीं मात्र तह केला. परंतु शिंदे, होळकर, भोंसले वगैरे सरदार व मोरोबा वगैरे मुछदी राजी नाहींत. सदोबाचें बंड उभें राहिलें आहे. असा चहूंकडून हंगामा भारी दिसतो. त्यास, श्रीमंतास पुण्यास राज्यावर बसविल्यास राज्याचा आळा बसोन राज्य चालेल. हंगामा दूर होईल. याप्रमाणें बंगालेवाल्यास पत्रें तयार होत आहेत ह्मणून लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. मसलतीचा भार त्यांजवरी, तेव्हां त्याचीं साधनें त्यांस सुचतील तीं करावीं, हें उचित असे.

पंधरा दिवसांत बंगालेवाले याचें कृत्य काय आहे तें कळेल. जर कुमक करून पुण्यास न्यावयाचा करार केला आहे त्याप्रमाणें केल्यास उत्तम जाहलें. कदाचित अपटणानें तह केला हाच खरा ह्मटल्यास तूर्त अमदाबाद हातास आली म्हणजे मोठा आश्रा आहे. अमदाबादेस राहिल्यानें पुढें मसलत होईल ह्मणोन लिहिलें. सारे मसलतीचे अर्थ तुह्मी लिहितां तें खरे व येथेंहि सुचतात. परंतु एक ऐवजाची तोड पडत नाहीं. त्यामुळें कांहींच घडत नाहीं. पोटास तों पाहिजे. कलम १.

अमदाबाद हस्तगत हाईल, परंतु अमीनखानाचे हातास आल्यास ते आप्पाजी

गणेशास बरे म्हणवितील. त्यास, श्रीमंत रायास समागमें फौज देऊन, लांब लांब मजली करून अमीनखान व आपण एक होऊन अमदाबाद हस्तगत करावी. ही गोष्ट केल्यास बडेल म्हणोन लिहिले तें कळलें. परंतु फौजेचे जाणें ऐवजाखेरीज कसें होतें ? सारे अर्थ चित्तांत आणून एक विलग, त्यामुळें राहिलें. कलम १.

इंग्रेजानें मसलत धरिली. हा मजकूर गोविंदराव गायकवाड यास लिहावा व त्याजकडे कोणी पाठवावा म्हणून लिहिलें. त्यास, तुमच्या लिहिल्याच्या पूर्वीच पत्रें व कारकून पाठविला आहे. कलम १.

कदाचित खासा स्वारीचें जाणें अमदाबादेकडे होतें तरी शहर हस्तगत लवकरच होतें. परंतु खासा स्वारी गेल्यास दोष फार म्हणून लिहिलें. त्यास, खरेंच आहे. शहर सोडून गेलियानें पाठीवरी फितुरी येतील. कलम १.

इंग्रेजाच्या म्हणण्यांत या उपरी अपटणानें तह केला तोच बंगालेवाले मंजुर करणार नाहींत. कैदेचा तह बंगालेवाल्याच्या मनास येणार नाहीं. पुण्यास न्यावयाचें पत्र पाठविलें आहे त्याची शरम त्यास येईल, म्हणून लिहिलें तें कळलें. कलम १.

गायकवाडाकडील ऐवज करनेलीकडून आला व येणें. त्याची पावती दिल्ही, त्यांची नकल पेशजी पाठविली व हालींही नकल पाठविली असें पाहोन समजणें. त्यांतच त्याजकडोन ऐवज येणें तो पावतींतच समजावा. कलम १.

जनराल गार्डन यास तुमचे लिहिल्याप्रमाणें पत्र पाठविलें आहे. कलम १.

एकूण कलमें सात. जाणिजे. छ ९ रबिलावल.

[लेखनावधिः]

श्री.

लेखांक १५८.

१६९८ वैशाख शुद्ध १०.

पुरवणी राजश्री लक्ष्मण अप्पाजी गोसावी यांसिः—

सुहुरसन सीत सबैन. मुंबईकर जनराल व कोशलदार यांणीं आमची मसलत धरिली. त्या करारप्रमाणें सिद्धीस न्यावी. बंगाल्याच्या बंदीचा हुकूम आला तो यांणीं न ऐकावा आणि केलें कार्य सिद्धीस न्यावें, हिम्मतीनें हा तोर राखावा, तें याच्यानें न जाहालें. तस्मात हिम्मतीचे कोते, ही गोष्ट अनभवानें कळोन आली. असो ! हालीं कलकत्याची परवानगी आली. अझून तरी जलदी करून मसलत सिद्धीस न्यावी. तूर्त सवड आहे. हें ही न होय, तेव्हां यांच्या करण्याची तारीफ काय करावी, हें कळतच आहे. तिसरा पक्षः तूर्त खर्चास दोन चार लाख रुपये द्यावे, म्हणजे आह्मी दोन चार महिने ढकलूं. त्यास आमचाच ऐवज याजकडे आहे. जवाहीर सव्वा सहा लक्षाचें अनामत व फतेसिंगाबद्दल कारनेलीकडे अडीच लक्ष व कित्ता फतेसिंगाकडील कारकून तेरा लक्ष म्हणून सांगतात. त्यांतील तीन लक्ष, येकूण साडेपांच लक्ष. याप्रमाणें बारा लक्षांचा ऐवज आमचाच आहे. त्यांपैकीं द्यावे अथवा तूर्त कर्जदाखल रुपये द्यावे. म्हणजे फौजेस थोडेबहुत देऊन चार दिवस निभाऊं. कांहींच न होय, तेव्हां लाचारीस्तव बारभाईकडे सलूकाचा संदर्भ लावावा लागेल. परंतु इंग्रेज जनराल मुंबईकर यास खातरजमेनें मसलत सिद्धीस न्यावी हा अभिमान असल्यास, कोणताही विचार जलदीनें करावा. एक तूर्त मसलत जलदीनें सिद्धीस न्यावी अथवा खर्चास द्यावें, म्हणजे

चार दिवस काढावयास येतील. हें कांहींच न होय, तेव्हां पुढें करतील हें कळतच आहे. सलूक करणें प्राप्त जाहाला. त्यासही इंग्रेज दरम्यान लागतील सबब आधीं बोलून ठेवणें. सर्व गोष्टी इंग्रजांचे बलावर आहेत. बारभाईसी सलूख कसा घडतो ? उभयपक्षीं तोड काय राहिली ? हें तुह्मांस कळतच आहे. लाचारीस उभे. गुजराथेवर तोंड पडल्यास तूर्त मसलत गा + + ऐसे मनांत आहे. परंतु फितुरी दाहाखेरीज ऐकणार नाहींत. इंग्रजी सरंजाम मावारा सुरतेस येऊन राहिला तो बाहेर लष्कराचे राहून, पांच सात कोस कूच केलें तरी तेंही तोड पडेल. तूर्त इंग्रज मावारे फिरले, बंगालियाहून परवानगी आली, असे वर्तमानावरच फडके वैगरे घाबरे जाले आहेत आणि सलुख्याचें राजकारण कृष्णराव बळवंत यांणीं राजश्री सखाराम हरीचें मार्फतीनें लाविलें आहे. त्यांसी नाद लाविलाच आहे. परंतु दाहाविना तेंही शेवटास जाणें संकटच आहे. सर्वप्रकारें तूर्त गळाठा पोटाविना मसलतीचा झाला आहे. येथें सुरतेस बहुत प्रेत्न केला. परंतु लाख पन्नास हजार रुपये कर्जवामही मिळेना. यामुळें लाचार झालों आहों. गायकवाडाकडील ऐवजाचा व पावतीचा मजकूर तुम्हांस विस्तारें पूर्वी लिहिलाच आहे. पावती दिली तरी त्यांत दरम्या फार ठेविल्या आहेत, न द्यावी हे गोष्ट प्रमाण. परंतु येथील लाचारी व वक्तसमय ! करनेली विना उपाय नाहीं. ऐसे समजोन गुणदोश पाहून केलें आहे. कसाही ताठा जाला आणि यार्णी मसलत शेवटास नेली म्हणजे अवघड नाहीं व त्यार्शी वादहि सांगणें नाहीं. मसलतीपुढें दाहापांच लक्षांचे कमजास्तही पेंच नाहीं, ऐसें समजोनच केलें. पावती दिली अतां मसलतीस तेंरी ठिकाण नाहीं आणि दिवसेंदिवस उदास व रुष्टताच कर्नेल दाखवितात ! सरकारतर्फेनें सरळतेस गुंता नाहीं. अस्तु ! तूर्त पंचाईतीसी प्रयोजन नाहीं. भलते प्रकारें लाख दोन लाखें रुपये मिळालियास मसलतच मारतों, ऐशी उमेद धरितों. प्रेत्न होईल तो करणें. जाणिजे. छ ९ रबिलावल.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १५९.

१६९८ वैशाख.

यादी

१ सहा लक्षांचे जवाहिराचा मजकूर.

१ जनराल खर्चास काय देतील त्याप्रोंच द्यावें.

१ सिंबंदीस निदानीं पंचवीस लक्ष.... पाहिजेत.तेव्हां रु॥चा...अर्धा देऊं...त्यास जवाहीर मागोन द्यावें. गहाण ठेऊन कर्ज रुपये घेऊन पाठवणें.

१ कंपनीचे जाग्यांत राहिल्यास पेंच न पडे ते जनरालांनीं करावें. आह्मीं येऊं अथवा सुरत भडोचेस राहूं आणि बाळास व सदाशिव रामचंद्रास पाठऊं.

१ जनरालाखेरीज दुसरा आश्रय भूमंडळीं नाहीं.

१ पोटाचें संकट. जनावरास पाव चंदी देतों.

१ भडोचेस रहावें. पाव कोस अर्ध कोसावर राहावेंसें मानस आहे.

१ धवशाचें राजकारण न जाल्यास मुंबईस येतों.

१ सिंबंदीविसीं ल्याहावें.

कोठें राहावें ऐसें जनरालांनीं लिहीत जावें.

१ अपटणाचीं पत्रें पाठविलीं. त्यांचा मसुदा जनरालास दाखवावा.

१ लाख रुपये कर्ज पाठवणें. ह्मणजे येथें रोजमरा फौजेस देऊं. इतर धरणीं पारणीं होतील.

१ कोंकणचे मार्गे हैदराकडे जावें तरी वाट अवघड; फौज न निभावे. तथापि विचार करून पाहतों.

येकूण पत्रें २.

श्री.

लेखांक १६०.

१६९८ ज्येष्ठ शुद्ध १४.

नकल पत्राची.

जनराल यास पत्र कीं:—

अलीकडे आपणाकडून खत येऊन खुषीची खबर मालूम होत नाहीं. तरी ऐसें न करावें. हरवख्त आपली खुषी कलमीं करून दिलशानगी करीत जावें. दरींविला विलायतेहून बादशाहाचा व कंपनीचा अपटाणांस हुकूम आला कीं इंज्यानेबाची कुमक केली, साष्टीचा किल्ला घेतला, हे गोष्ट मोठी चांगली जाहाली. यामोंा विलायतेहून हुकूम आपल्यास आल्याचें वर्तमान आह्मीं येथें परस्परें ऐकिलें. परंतु हे खुषीची खबर आपण आह्मांस लेहून इतला दिल्हा नाहीं. त्याजवरून ताजूब वाटलें. कारनेल अपरण यार्णी तह करून कलकत्त्यास सर जनराल यांस लेहून पाठविलें आहे. त्यास गैरवाजवी तह केल्यामुळें सर जनरालहि या गोष्टीच्या अंदेशांत पडलेच असतील. सांप्रत मुख्य गोष्ट कीं, आपल्यास विलायतेचें लिहिलें आलें असेल मयां अर्थें या गोष्टी दिरंगावर न घालाव्या. तसल मारून बाजू शेर करावी. आपले अभिमानाची शौरत दुनियेंत महसूर होय तो अर्थ घडवावा. येथील खर्चाचा मोठा गलाठा आहे, येविसीं लक्ष्मण आप्पाजी यास लिहिलें आहे असे. जाहीर करितील. त्याप्रों अमलांत आणावें. छ १३ रबिलाखर.

श्री.

लेखांक १६१.

१६९८ ज्येष्ठ शुद्ध १४.

पु॥ राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांस:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ: मेस्तर शाहाचा इरादा विलायतेस जावयाचा आहे. त्यास सुरतेंत येऊन स्वामीस भेटोन जावें, हें याचें मानस. त्यास, माारनिलेस विलायतेस सरकारतर्फेचें काम सांगावें, ह्मणोन विस्तारपूर्वक लिहिलें तें कळलें. ऐशास, मेस्तर शाहा येथें येऊन भेटोन जाणार हें उत्तम आहे. तुमचे लिहिल्याप्रों विलायतेचा धरबंद याचे हातून केला जाईल. जाणिजे. छ १३ रबिलावर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १६२.

१६९८ ज्येष्ठ शुद्ध १४.

राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसि:—

सु॥ सीत सबैन मया व अलफ. तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें.

जनराल यासी जवाहिराचा मजकर बोलून पाहातों, ह्मणोन लिहिलेंत. ऐशास मेस्तर होम याचें लिहिलें तेथून आलें. त्यांणीं लिहिलें आहे कीं, आपली कुमकच होईल व आपलें जवाहीर अमानत आहे तें देवव-

याविसीं बंगाल्याचे कोसलदार याणीं मुंबईस लिहिलें आहे. त्यास जवाहिराविसीं परवानगी आली. आपटणांनीं केल्याचा गैरवाका सर जनराल यास समजला. त्या अर्थें मुंबईकर जनराल आमचे जवाहीर आमचे हवालीं करितील. त्यांत सध्यां विलायतेच्या लिहिल्याची शौरत जाहाली आहे, हें लिहिलें खरें. जनराल यांसहि आलें असेलच. तेव्हां लौकर मसलत मारून न्यावी हा त्याचे इराद्याचा डौल नजरेस पडत असल्यास, आजच जवाहीर मागितल्यानें मसलतीची उभारणी करीत असतां जवाहीर मागतात तेव्हां मसलत तुटते असें जनराल यास भासत असल्यास लौकर कुमक करावी, मसलत मारावी, हेंच बोलून तसेंच घडवावें तथापि या गोष्टी बादजबरसातेवर गेल्या असा अर्थ असल्यास जनराल याजवळ आपले येथील खर्चाचा मजकूर बोलून जवाहीरहि त्याजवळ मागावें. समागमें कारखाने वगैरे पागा व सिलेदार व हत्तीचा खर्च व उष्ट्रखान्याचा खर्च चालतो कसा ? जवाहीर घेऊन हरकोठें ठेऊन च्यार दिवस खर्च चालऊं. सारांश कीं, हे दोन्ही प्रकार लिहिले आहेत. सध्यांच मसलत मारून न्यावयाचा डौल नसल्यास जवाहीर जनराल याजवळ मागावेंच आणि खर्चाचीही निकड त्यास समजाऊन, खर्चाविसींही बोलावें. बाराशें रुपये नित्यचा खर्च जरूर जरूर केल्यास लागतो त्यास, दरमहा तीस हजार रुपये दिल्हे तरी जवाहिराविसीं निकड न करणें. मागावें तरी खरेंच. निकड मात्र करूं नये. नाहीं तरी, करावी. कलम १.

फितुरी याची फौज पुढें आली होती ते माघारा कुच करून गेले. हालीं त्याचा मुक्काम सोनगडानजीक आहे. त्यांनीं डबई-कडे कृष्णाजी पवार सातआठशें स्वार रवाना केले असत. कांहीं फौज इकडे छावणीस ठेवितात. परंतु फौज बेदिल. कोणी इकडे छावणीस रहात नाहीं. याप्रमाणें वर्तमान आहे तुम्हांस कळावें. कलम १.

नवाब हैदरअल्लीखान बहादर यांचीं पत्रें व राजश्री बाजीराव गोविंद यांचीं पत्रें छ १० रबिलाखरीं हुजूर आलीं. बाहादर बमें फौज पायदळ मिळोन साठपासष्ट हजार व तोफखाना वगैरे सरंजामानसी तुंगभद्रा उत्तरतिरीं आले.लौकरच कृष्णातीरास येऊन पोंहचणार. फितुरियास बाहादरांनीं ताण चांगला बसविला आहे. तुह्मांस कळावें. कलम १.

येथील खर्चाचा मोठा गलाठा. नित्य खर्च चालणें कठिण. जवाहिराचा येखादा दागिना मोडावा तेव्हां रोजचा खर्च दाणावैरणीचा चालतो. याप्रों दररोज चाललें आहे. खर्चाविसीं काय करावें ? इंग्रजाचे पेटयांत आल्यावर सर्व प्रकारें भरंवसा जनराल याचा आहे. तरी खर्चाची निकड त्यास समजावून, त्याजकडून खर्चाची बेगमी होय तो अर्थ करणें.

कलम १.

जवाहिरही सरल्यांत आहे. हेच फिकिरींत आहों. १.

कारनेल टामस किर्टीण येथें कितेक कामकाजाचे अर्थ उगीच समाधानयुक्त बोलत होते ह्मणोन लिहिलें तें कळलें, ऐशास, कारनेल याजकडे फतेसिंग गायकवाड याजबाबत दहा लक्ष रुपयांचा हवाला आला. त्यांपैकीं बाकी ऐवज राहिला असतां, दहा लक्षांची पावती द्यावी. हें कारनेलीचें बोलणें; परंतु सरकारांतून पावती न दिल्ही, या नमुळें ते रुष्ट होऊन गेले. बाजबी ऐवज निघेल तो देवावा ह्मणोन जनराल याजवळ बोलावें. याप्रमाणें पेसजी तुह्मांस

सविस्तर लिहिलेंच आहे. हल्लीं कारनेलही तेथें गेलेच आहेत. तरी हा मजकर जनराल यासी बोलोन वाजबी ऐवज फिरेल तो मागावा. फतेसिंगाकडील कारकून तेरा चवदा पावले झणत होते. परंतु कारनेल बडोद्याचे मुक्कामीं दाहा रोख पावले ऐसें बोलले होते. त्यास पावती आमची असे. ते वजा करून बाकीचे रुपये घेणें. पावतींत दीड लक्षाची रयात आहे. कलम १.

जनरल इत्यादिक इंग्रज यांस विलायतेचा भरंवसा फार आहे, म्हणोन लिहिलें. त्यास, विलायतेहून बादशहाचें व कंपनीचें लिहिलें आलें कीं, मुंबईकर जनराल यांणीं सरकारची कुमक केली, साष्टीचा किल्ला घेतला, हे गोष्ट उत्तम केली. आमची मसलत सेवटास न्यावी, म्हणोन कलकत्तेकरास लिहिलें आलें. त्यांणीं लढाई सुरू करावयाची परवानगी जनरालं यास पाठविली झणोन कलकत्याहून येथें साहुकाराचीं लिहिलीं आलीं आहेत व इंग्रेजहि येथील बोलतात. मुंबईहून फतेमारी आली त्यास, मेस्तर बाडम यांस हा मजकूर जनराल याणीं लिहिला आहे, झणोन साहुकारींत वर्तमान आहे. परंतु बाडमाचें बोलणें इतकेंच. मात्र खुशालीचें वर्तमान आहे. यापरी येथें सर्वत्र बोलतात. तेव्हां मुंबईस लिहिलें नसेल आलें, असा अर्थ कांहीं दिसत नाहीं. हें जनराल तुम्हांसी बोलतात किंवा हा मजकूर गुप्त ठेवितात, हें न कळे. आम्हांस साहुकाराकडून व इंग्रेजाकहून बातमी कळली. हा पत्तेवार अर्थ त्यास बोलावयाचा नाहीं. परंतु यापरी लिहिलीं आलीं हे संकेतार्थ बोलून, त्याच्या आंगीं लावावें. झणजे काय जो अर्थ असेल त्याचा खुलासा निघेल. कोणी कांहीं बातमी सांगतो त्याचीं नांवें नच द्यावीं. मोघम मात्र बोलावें. नांव घेतल्यास पत जाईल. फिरून बातमी कळणार नाहीं. सावधतेनें बोलावें. कलम १.

जनराल याणीं सांगितलें कीं, श्रीमंतांनीं आम्हांस लिहिलें आहे त्याचा जाबसाल सविस्तर मेस्तर बाडम व मेस्तर गंभीर याणीं खर्चाचा मजकूर वगैरे मजकूर लिहिला. त्याचा जाबसाल उभयतां मशारनिलेस लिहिलें आहे ते सविस्तर सांगतील. म्हणून लि।। ऐशास, येविसीं बाडम यास विचारलें; परंतु ते म्हणतात कीं, हा मजकूर जनराल याणीं लिहिला नाहीं. मागाहून लिहिलें येईल. मेस्तर गंभीर काल छ १२ रबिलाखरीं भेटीस आले. दोहोंचहूं रोजीं गंभीर भडोचेस जाणार. कलम १.

राजश्री सखाराम हरि फितुरियाकडे गेले. त्यास फितुरी झणतात कीं, श्रीमंतानीं साहा सात लक्ष रुपयेखेरीज किल्ले करून देशीं जहागीर देतों ते कबूल करावा. आणि सर्व बंदोबस्त फितुरियानें करावा. झणोन मशारनिलेनीं लिहिलें होतें. ऐशास सखाराम हरि तेथें गेले. तेव्हां ते सांगतील त्याप्रों त्यास लिहिणेंच. परंतु फितुरियांचा इतबार काय ? यांचा इतबार कोणत्याही गोष्टीचा नाहीं. निदानीं आठ नऊ कबूल होतील. परंतु ते बेइतबारी. याजकरितां भडोच सुरतेस राहूं. हाच पक्ष मशारनिलेस लिहिला आहे. कलम १.

येकूण कलमें आठ असेत. जाणिजे. छ १३ रबिलाखर. (लेखनावधिः)

पैवस्ती छ २० रबिलाखर.

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १६३.

१६९८ ज्येष्ट वद्य ११.

राजश्री लक्ष्मण अप्पाजी यासिः-

सु।। सबा सबैन मया. आज कांहीं उणापुरा महिना होत आला. सुरतेंत दाखल जाहलों. पत्रें पांच चार तुम्हांस पाठविलीं व जनरालासहि लिहिलें. गंभीर-बडमासहि बहुत सांगितलें. तेव्हां त्यांनीं मोघम बारा हजार रुपये देविले. येथें तरी दरमहा साठ निदानीं चाळिसास उणें पडत नाहीं. तेव्हां बाकीचा ऐवज कोठून आणावा ? ऐसियासी, हे दरमहा काय देतात तें स्पष्ट पुसावें, तीस हजार, निदानीं पंचवीस हजारहि, दिल्यास हरकसेंहि चालवूं. दहाबाराच देणार, ऐसाच मजकूर असिल्यास आह्मांस जेथें जाऊं तेथें पोंहचाऊन द्यावें. जवाहिर मोडून खावें तरी जवाहिरहि जवळ नाहीं. साहा लक्षांचें जवाहिर त्याजपासींच गाहाण आहे, तें तरी निदानीं द्यावें. च्यार महिने कारखाने यांस व जवळचे लोकांस देऊन चालऊं. उपाशी मरतील, त्यापेक्षां निरोप द्यावा. जिकडे देव बुद्धि देईल तिकडे जाऊं. दरमहा काय देतात तो मुकर्रर कळल्यावरी त्यासारिखा विचार ठहराविला जाईल. त्यास कोणी भ्रम घातला आहे कीं, आम्हांजवळ जवाहिर बहुत आहे. त्यास, हत्ती घोडीं उपाशीं मरतात अद्यापि भ्रम न जाय, तरी काय इलाज करावा. निदानीं बंगाला आहे. काशी प्रयाग कोठेंहि जाऊन पोट भरोन राहूं. निदानीं हत्तीं, घोडीं, उटें विकत घेत असले तरी देऊं. निदान फुकटहि देऊं. बारभाईस मात्र न द्यावें. वरकड फुकट मागतील तरी देऊं. आमच्यानें अतःपर खर्च चालवत नाहीं, हे पष्ट जनरालासी व कौशलासी बोलावें. भीड धरून रहावयाचा समय नाहीं. दसरा जाहालियावरी बारभाईच्या फौजा भोवत्या येतील. वाट फुटणार नाहीं. पावसाळा हर तर्तूद करून जो आह्मांस ठेवील तिकडे जाऊं. याणीच पोंहचावून द्यावें. निदानीं महिन्याची बेगमी करून निरोप तरी द्यावा. कोठेंहि गेलों तरी इंग्रेजाची दोस्ती तोडावयाची नाहीं. विलायतचा हुकूम आल्यावरी जवळच असिल्यास याजवळच येऊं. जाणिजे. छ २४ रबिलाखर.

(लेखनावधिः)

लक्ष्मण गोपाळासहिं कामाकाजांत घेत जाणें. शाहाणा आहे व मर्जीचाच आहे.

श्री.

लेख.क १६४.

१६९८ ज्येष्ठ.

राजश्री लक्ष्मण आपाजी गो यांसः-

सुा सबा सबैन मया व अलफ.

सुरतेस येऊन येक महिना जाहाला. पत्रें पांच च्यार तुह्मास पाठविलीं व जनराल यांसहि लिहिलें. गंभीर-बाडमासही बहुत प्रकारें सांगितलें तेव्हां त्याणीं मोघम बारां हजार रुपये देविले. येथें तरी दरमहा साठ, निदान चाळिसास उणें पडत नाहीं, तेव्हां बाकीचा ऐवज कोठून आणावा ? जनराल यांची मर्जी कोठपर्यंत आहे, काय दरमहा देतात, ते पुसावें. तीस हजार निदान पंचवीस हजार, यांतहि दोन च्यार हजार कमी दिल्यास हरकसें चालवूं. बाराच हजारानें इतका खर्च कसा चालतो ? जवाहीर मोडून खावें, तरी जवाहीरही

जवळ नाहीं. सवा सहा लक्षाचें जवाहीर त्याजपाशींच गहाण आहे. तें तरी निदानीं यावें आणि बारा हजारांतून जाजती पंचवीसपर्यन्त अथवा किमानपक्ष वीसपर्यंत तरी जनराल याणी द्यावें. ह्मणजे दोन्ही ऐवजांची कारखानियाचा व जवळच्या लोकांचा खर्च चालेल. आमचा तरी सर्व प्रकारें मसलतीचा भार जनराल याजवरच. या प्रसंगीं खर्चविचाविसीं उपेक्षा न करावी. आणि याउपरी आमचा अंत पाहूं नये. जनराल यांजवर बादशाहा व कंपनी खुश जाहाले. जनराली यांजकडे बहालच केली. यांचे वाजवी करण्याची रीत महसुर जाहालियाउपरी, जनराल जें करितील तेंच मान्य. हेंच त्यांचें वाजवीपणाची शौरत. याजकरितां मसलत सिध्दीस लौकर न्यावयाचे अर्थ बोलावे. खर्चास लिहिल्याप्रमाणें जनराल यांसि आपले ओढीचे अर्थ बोलून सदरहुप्रमाणें त्याजकडून बेगमी होवून येई तो अर्थ करणें. काल तुह्मांकडे पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत स्पष्ट तुह्मांस निरोपाचा मजकूर लिहिला आहे. परंतु तो तुम्हीं कांहीं जनरलास यांसि बोलूं नये येथील खर्चाचा व मसलत मारून न्यावयाचाच अर्थ बोलावा. खर्चाची बेगमी जरूर करून घेणें. खर्चास न देत तरी निरोप मागणें ह्मणोन मागील पत्रीं लिहिलें असे. परंतु निरोप मागितल्यास त्यांची मर्जी खटी होईल. तें सर्व प्रकारें आमचे कार्यास खोंचतात, विलायतेपावेतों काट करितात व पदरचे खर्चासही देतात. त्या अर्थीं त्यांसि रुक्ष बोलणें मनास प्रशस्त वाटत नाहीं. बारा हजार दरमहा देतील म्हणोन बादशा बोलला. यापेक्षां अधिक जें होईल तें दरमहा ठहरावावें व जवाहीर द्यावें. तेथींकडून खर्च चालेल. केवळ त्याजपाशींच मागावें, तरी त्याजकडे सरकारचा काय लांड्या. त्याबद्दल युक्तीनें वाईट न दिसतां बोलावें. जें देतील तेंच घेऊन दोन महिने गुदराण करूं. इतक्यांत भाद्रपदांत काय हुकूम येतो तो कळेल. त्यासारीखा मजकूर ठहरेल त्याप्रो लिहूं तेव्हां बोलावें.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १६५.

१६९८ आषाढ शुद्ध १.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ. तुह्मांकडे रुो ३०० तीनसें पाठविले आहेत. तरी दोनशें रुपये तुह्मीं आपणास खर्चास घेणें व शंभर रुपयाची मेवा ईस्टुर वगैरे कोशलदार, आपले उपयोगीं पडत असतील, त्यांस त्यांचे मर्जी जोगा महिन्यांत येकदोन वेळां ज्या मेव्याचा जसा हंगाम असेल त्याप्रमाणें घेऊन देत जाणें. सदरहू रुो येथें अर्जुनजी नाथजी त्रिवाडी सुरतकर साहुकार यांजकडे भरून याणीं व्रजभुकणदास तापीदास यांजवर मुमईची हुंडी दिल्ही ती घेऊन पाठविली असे. तर सदरहूप्रमाणें ऐवज घेऊन पावलियाचें उत्तर पाठवणें. जाणिजे. छ २९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

बार.

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १६६.

१६९८ आषाढ वद्य ६.

राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसिः—

सु॥ सबा सबैन मया व अलफ. तुमचीं ज्येष्ठ शुद्ध दशमीचीं पत्रें आलीं. त्या अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर वरचेवर लिहीत जाणें.

येथील खर्चाची वोढ मोठी. दररोज दोन हजार रुपये पाहिजेत. त्यास, इंग्रेजाचा प्रकार वोढीचा. लिहिल्याप्रों ऐवज देणार नाहींत. याजकरितां किमानपक्ष तीस पस्तीस हजार दरमाहाची वेरीज तुह्मांस लिहिली. याणीहि खर्च चालणेंच नाहीं. तथापि च्यार दिवस हरकसी गुजराण होईल. आणि जवाहीर मागणें, त्यास, बारा हजारांची नेमणूक जनराल याची असल्यास, याणीं येथील खर्चाचा सेवट कसा लागतो ? याजकरितां तुह्मीं जनराल यासी बोलोन, जवाहीर तर्ही मागावें. ह्मणजे जनराल याजकडील ऐवज व जवाहीर हरकोठें ठेऊन, दोनी ऐवजांनीं च्यार दिवस खर्च चालऊं. आजच कारखाने उपासी मारतां येत नाहीं. कलम १.

तिकडे भाऊचें बंड बळावलें आहे. तिकडे येखादा शाहाणा मनुष्य पाठवणें, म्हणोन पेसजी लिहिलेंच आहे. त्यास तुह्मी ज्यास पाठवाल त्यांणीं जाऊन, काय चरित्र आहे तें मनास आणावें. केवळ हुजुरूनच पाठविलें, हाहि भाव दर्शऊं नये. असें मधेंचें बोट तोंडाजवळ न्यावें, तोंडांत सांपडूं देऊं तर नये. दाखवावें तर खरें. याप्रों तेथील भावगर्भ काय असेल तो मनास आणावा. याप्रों जो जाईल त्याणीं करावें. त्यास कांहीं आशा उपजे, असें बोलावें. परंतु दस्ताऐवज सांपडू न देणें. आह्मापासून येक अंतर तेव्हां पडलें कीं, रुबरू आणून पाहिलें नाहीं. दुरूनच पाहिलें. हें तर गोष्ट खरी. वरकट मातबर मुछदी यानें जवळून पाहून खोटा म्हणाले. तेव्हां काय पाहावें या अर्थें न पाहिलें. हेहि भाव येथील त्यास समजावे तुम्हांकडील कारकून अथवा खिजमतगार, असें समजल्यास दोष नाहीं. कलम १.

सदरहू आठ कलमें खास दस्तुरी लेहून याचीं पहिली रवानगी तुम्हांकडे केलीच आहे. पत्रें येऊन पोंहचलींच असतील.

कलम १.

नवाब हैदरअली खानबहादर बमय फौजसुद्धां कुच दरकुच बंकापुरास येऊन बंकापूर घेतलें. पुढें दरमजल धारवाडास येऊन तें घेऊन मिर्जेस येणार. याप्रों नवाबाचीं पत्रें व बाजीराव गोविंद यांचीं पत्रें छ ६ रबिलावलचीं त्याणीं रवाना केलीं ते छ ८ जमादिलावलीं पोंहचलीं. त्यांच्या नकला तुह्मांस पाहावयास पहिले रवानगींत पाठविल्या आहेत. येऊन पावतील. तरी पुढें त्यास काय सला ल्याहावी ते सला लिहिणें. कलम १.

स्वहस्तें परहस्तें कसें तरी आमचें कार्य व्हावें, हे मर्जी पूर्वी जनराल याची होती. त्यास, याचा संदर्भ लाऊन ते संतोषानें आम्हास दुसरे स्थळीं पोंहचावींत असें करावें. निरोपच द्यावा. येथें दुसरें राजकारण अंगरेजाचे प्रतिमेचें आहे. परंतु याची मर्जी तोडून कसें जावें, या अंदेशांत आहों. जवाहीर घेऊन व याचें संमत घेऊन दुसरें तर्ही राजकारण करावें; या विचारांत आहों. कलम १.

सिद्दी याजकडील फौजेचें राजकारण

करावयाचें मांडिलें आहे. त्याचे वकील येथें आले आहेत. त्यासी बोलतच असो. होईल तेव्हा खरें. सिद्दी म्हणजे नगर ठठा भुजे पलीकडे. तेथील फौज यावयाचा मजकूर. कलम १.

मेवा शेंपन्नासाचा अंगरेज मायेचे व कौंसलदारास खरिदी करून वाटावा. कलम १.

लक्ष्मण गोपाळ याजवर बहुत ममता करीत जाणें. येविसीं याचें पत्र हुजुर येई असें करणें. कलम १.

मारवाडचें राजकारण करून फौज आणावयाकारितां राजश्री बिजेसिंग याजकडे माधवराव वैद्य रवाना केले असेत. भागोजी गवारी व कृष्णराव भास्कर तेथें आहेतच. होईल तें खरें. कलम १.

एकूण नव कलमें लिहिलीं आहेत. परंतु यांत सारासार पाहून छान करून बोलत जाणें. तुम्हांस मसलत सुचेल ती लिहीत जाणें. तुम्ही शाहाणे व मर्जीस वाकीफ आहां व येकनिष्ठ आहां. तुम्ही मसलत, येथील उपयोगी तेच ल्याहाल व कराल. मनसब्याचा पेंचपांच आढळल्यास उगऊन उत्तर लिहीत जाणें. येथेंही छान होईल. फिरोन उत्तर येईल तैसें बोलावें. चार दिवस अधिक लागले तरी चिंता नाहीं. परंतु मनसुबा नासूं नये. हे मोठे शाहाणपणचे उपाय आहेत. तूर्त दुसरे राजकारणावर आमचा भार आहे. परंतु याची मर्जी खटी करावयाची नाहीं व आपलें तर केलें पाहिजे. याजला विलायतेचा हुकूम लौकर येईल, हा भरंवसा येत नाहीं. यास्तव च्यार रुपये खर्चाची वेढ अधिक आगळी दाखऊन व सर्वस्वें हस्तपरहस्तें काम करून. हें पहिलें भाषण आहे. त्याजवरच कोठून रजा द्यावी व जवाहीर द्यावें. पुढें आंतून गुप्तरूपें आमची कुमक करीत तें करावें. जाहीर न करीत तरी चिंता नाहीं. आह्मावर अंगरेजाचें, या जनरालाचे, उपकार मातबर. यासी छद्म करणें उचित नाहीं. परंतु यांणीं हरयेक तजविजेनें काम आमचें करावें. यांस देऊं केलें तें देऊंच. दुसरेंही काम जाहालें तरी यासी वाकडी गोष्ट करावयाची नाहीं, हें खातरजमा करणें. मेस्तर शाहा विलायतेस जातात. लवकरच तेथें येथील. त्यांचे जबानीवरून कांहीं मजकूर कळतील परंतु दुसरीं राजकारणें कोणतीं, हें त्यांस नांवनिसीं सांगितली नाहीं. तुह्मींही न बोलणें. जवाहीर सवासाहा लक्षाचें हातास आल्यावर मेस्तर शाहास रद्दकजीं व कांहीं वाटखर्ची पाउण लक्षाचें ऐसीं हजारपर्यंत जवाहीर द्यावयाचें आहे. तुह्मांस पूर्वी सूचना असावी. लक्ष्मण गोपाळ ममतेंत घेतल्यास तुम्हांस विचारास सोबत उत्तम होईल. आमचीही मर्जी सांपत कोशलांत द्यावा, अशी आहे. तेथें तुह्मांस त्याची वर्तणूक दृष्टीस पडत असेल, त्याप्रों करणें. आह्माजवळ नारो गोपाळ हा सर्वही मजकूर सांगतो. कोशलांत आहेत, यास्तव कोसल करून केल्यास पेंच पडत नाहीं. तेथें पक्की त्याची खातरजमा करून घेणें. वरकड ज्याचे त्याप्रों बोलत जाणें. इष्टोराचे मैत्र बहुत. आमचे ममतेचा. त्यासी बोलत जाणें. कारनेलीसी कार्याकारणें बोलावें. वरकडही अंगरेज ममतेंत राखावें. मेवा वांटावा. हरतऱ्हेनें कोसलदार वगैरे ममतत द्यावे. मेहनत करावी. सर्व मुछदी गेले. तुह्मी राहिलां. तरी सर्वांपेक्षां अधिक करून दाखवाल हा भरंवसा आहे. श्री कृपा करणार. हा कागद दोन तीन वेळां वाचणें.

मेहनत करणें. जाणिजे. छ २० जमा-दिलावेल.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १६७.

१६९८ आषाढ.

खासा स्वारी सुरतेहून बाहेर पडली. यांचा कितेक अर्थ खसूसियेंत दस्तगाहा लक्ष्मण आप्पाजी तुह्मांस सांगतील, त्याजवरून कळेल. सारांश कीं, स्वारी बाहेर निघाली ह्मणोन, इंग्रेजाची दोस्ती आहे. त्यांत दुसरा विचार आहे असा अर्थ नाहीं. आह्मी बाहेर निघाल्यामुळें कदाचित् जनराल याचे मनांत विपर्यास येईल. त्यास तुम्ही सरकारचे खैरख्वा आहां. ज्या गोष्टीनें सरकारमसलतीचा उपयोग तेंच करणें. वरकड विलायतेचा हुकूम सरकार-कुमकेविशीं आला म्हणजे आह्मी जवळच आहों. सरकारची व इंग्रेजाची दोस्ती आहे, तेच ज्यारी असावी, हाच इरादा आहे. ह्मणोन पत्रें:—

१ मेस्तर होम
१ मेस्तर वारलीस
१ मेस्तर इष्टोल
१ कारनेल किर्टिंग

४

श्री.

लेखांक १६८.

१६९८ आषाढ.

पु॥ विज्ञापना. हुजूर येण्यासंबंधें मा॥र तरीः तीन प्रकारची आज्ञा एक वेळच आली. त्यास सेवकास महाराजाचे मर्जी-सिवाय कोणासी दरकार नाहीं. येण्यास गुंता काडीमात्र नाहीं. बलावून घेतल्यास सेवकास फार संतोष. येथें राहिल्यानें हवा मानत नाहीं. पाणी फार वाईट. बराबरील माणसें देखील कितेक दुखण्यांत पडलीं आहेत + + + अस्वस्त. लष्करांत आल्यानें फार चांगलें आहे. तीन प्रकारचे आज्ञेंतून सेवटचे पत्रांत निश्चय खास—दस्तुरें नच येणें, तेथेंच उपयोग, ऐसें लिहिलें आहे त्यावरून येण्याची जलदी न केली. जनरालाची तरी प्रसन्नता सेवकाचे ठाईं बहुत दिसत्ये, परंतु येथें रहाण्याविसीं पत्र मागावें तरी पूर्व-कथन संपूर्ण सांगितलें पाहिजे. त्यांतही करनेलीची नालीशच होते. व स्वरूपासही ठीक नाहीं तरी आबच जाईल. तथापि युक्तीनें आब राहून पत्र देतील तर पाहातों. नाहीं त्यापक्षीं निघोन यावयाचें करितों. परंतु बंगाल्याचे पत्राचा जाब काय येतो, पुढें हे काय करितात, हें सर्व मनांत आणून किटणीवर तेथील यखत्यार आहे तैसा राखतों, असें असिल्यास निघोन येतों. तूर्त मसलतीचे रीतीनें सेवकाचें येथें राहाणें-यांत उपयोग फार दिसतो.

जनरालास कोसलदारास हरयेकाध गोष्टीची भीड पडोन म्हटलें तसें ऐकतील. लक्ष्मण गोपाळ आहेत. परंतु यांचें वजन नाहीं. सेवकाचें येथें हजर जाल्यावर, मग कोणी तरी शाहाणा माणूस येथें जरूर ठेविला पाहिजे. परंतु माहीत व मातबर असा ये गोष्टीस वाकब असावा. म्हणजे हे चहातील. लक्ष्मण गोपाळास तरी किमपि वाकबगारी नाहीं. माहाराजाची वळखच नाहीं, तेव्हां माहितगारी कोठून असणार ? सेवकास हुजूर आणवितों म्हणोन किटणीसी करार माहाराजांनीं केला असेल. त्यांस, सेवकाचे

येकूण कलमें पांच लिहिलीं आहेत. जाणिजे. छ २ जमादिलाखर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १७१.

श्रावण शुद्ध १५.

राजश्री लक्ष्मण अपाजी यासीः—

सु॥ सबा सीतैन मया व अलफ.

तुह्मीं विनंतिपत्रें आषाढ वद्य एकादशीचीं पाठविलीं तीं छ ६ जमादिलाखरीं पावलीं.

इंग्रेज मसलत सिद्धीस नेतील हा भरंसा धरूं नये. चिरंजीव अमृतराव यास बाहेर काढावें. समागमें राजश्री आबाजी महादेव यांस देवावे. आपण सुरतेत रहावें. सेनाखासखेल यांस मेळऊन द्यावें ह्मणोन कितेक मसलतीचा धारेवट लिहिला तो कळला. ऐशास, सेनाखासखेल याचे लक्षाचा अर्थ तरीः— बडोद्याचे मुकामींहून त्याचें जें लक्ष आहे तें समजलेंच आहे. सांप्रत त्याचीही नजर बारभाईच्याच पक्षाची जाहाली आहेसी दिसते. फतेसिंग व सेनाखासखेल यांच्या भेटी जाहाल्या. पुढें त्याचा काय इत्यर्थ ठरेल तो पहावें. चिरंजीवास बाहेर काढावें, तरी आपले जवळ सामान किती? त्यांत चिरंजीवाबराबर बाहेर काय काढावें?

खर्चाविसी बहुत प्रकारें बोलतो. परंतु मेस्तर बाडमास हुकूम केला आहे त्याप्रमाणें देतील. जाजती देत नाहीं त्यावरून जवाहीर तरी द्यावें. कोशलांत गोष्ट काढावी + + + + + सालाची + + + + केली त्यास उपाय + + + + +राविसी बोलतों, मागतों. नच देत तेव्हां निरोपच मागतों. म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास, जवाहिराविसी कोशलांत गोष्ट नियोन इत्यर्थ ठरणार होता. त्यास कोशल होऊन इत्यर्थ ठरलाच असेल. व बंगाल्याचीहि परवानगी जवाहीर द्यावयाविसी आलीच आहे म्हणोन मेस्तर होमासहि पत्र आलेंच होतें. त्यास, येथील खर्चाचे वोढीचे अर्थ जनरालासी बोलून, जवाहिराविसी झटून जाबसाल दोहा चहू रोजांत यावा असा आहे. तुमचा जबाब साल आलाच असेल. बळ धरीत असल्यास उत्तमच आहे. इंग्रेजांकडूनहि त्यास उत्यजन देत जाणें. कलम १.

स्वामींनीं कोशेलदारास व आणखी इंग्रेजास पत्रें पाठविलीं तीं ज्याचीं त्यास प्रविष्ट केलीं. दोन कोशलदार राहिले त्यास पत्र पाठवावें ह्मणोन लिहिलें. त्याजवर हालीं मेस्तर गारडीन व मेस्तर इष्टाकहउस यांस पत्र लिहिलें आहे व मोष्टिनाचा लखोटा होमानीं होमाचें नांवावर तें होतें ह्मणोन फोडला. त्यास, चिटणीसाजवळोन चुकोन नांव पडलें. हालीं मोष्टिनासहि पत्र लिहिलें आहे. पावतें करणें. कलम १.

आजचा निरोप मागावयाचा करार. त्यास, पुढें त्याच्या फौजा येऊन उभ्या राहातील, तेव्हां काणेएक गोष्ट बारभाई आपटणास सांगतील आणि आपटण सांगतील आणि आपटण ह्मणतील ते गोष्ट मुंबईकरास कबूल करावी लागेल. मुंबईकराचाहि विलाज चालणार नाहीं. आणि तेव्हां राजकारणहि होणार नाहीं. यास्तव राजकारण करावयाचे दिवस हेच आहेत, राजकारण बनलें हि आहे. निरोप मागावयाचे खालीं + + +

त्यास, तो मूल खोटा. त्याचा मुद्दाहि सांप्रत आह्मांजवळ आहे. हें तुह्मीं जनराल व कोसलासी बोलणें. कलम १.

एकूण कलमें आठ. जाणिजे. छ १३ जमादिलाखर.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १७२.

१६९८ अधिक भाद्रपद शु. ८.

कारनेल अपटण यास पत्र जे. निमक-हरामी चाकरांनीं फितूर केला. सबब मुंबई-करांचे विद्यमानें कंपणीच्या मोहोरेनसी इंग्र-ज़ाशीं तह करून कुमक घेतली. फितुरियांस जरबहि बसली. पुढें, करारा-प्रों मसलत सेवटास जावी, इतकियांत तुमचें येणें पुरंधरीं जालें. तेथें जसें तुमच्या समजण्यांत आलें तसा तह ठराऊन इंग्रजी कुमक महकूब केलीत त्यामुळें लढाईहि महकूब जाली. आह्मीं सुरत जागा कंपणीची जाणान तुम्हां इंग्रज लोकांचेच भरवसीयावर तीन महिने जाऊन राहिलों. आपल्याकडील. हि इंतजारी केली कीं, आमचे पल्याची तऱ्हे आपण काहाढतील. ती कांहीं दिसोन आली नाहीं. आम्हांस तर खर्चाची मोठी वोढ. ते कोठपरयंत सोसावी ? शहरचें राहाणें. वांस लकडी देखील विकत घ्यावीं. पैशाची तर अबादानी नाहीं. इतकी हि तसदी सोडून इंग्रजाचे भरंवसियावर राहि-लो असतां किल्ले धार येथें कबिला व चिरंजीव मूल दिडावर्षांचा लाहान तेथें आहेत. त्यास फितुरियाणीं फौज पाठऊन मोर्चे लाविले. फितुरियाणीं लढणें अगर बोलणें तें आह्मासी असावें. बायकोमुलांस तसदी करावी हें योग्य कीं काय ? चहूंकडून पेंचच जाणोन बाहेर निघालों. तुह्मांस हें वर्तमान कळलें असतें तरी तुह्मी त्यास निषेध केलाच असतां तस्मात तु-ह्मांस हे खबर नसेलसें दिसोन येतें. या-स्तव हें साविस्तर तुम्हांस लिहिलें असे. आमचें कार्यसिद्धि उत्तम होय ते नेकसलाह लिहिणें. छ ७ रजब.

श्री.

लेखांक १७३.

१६९८ अधिक भाद्रपद शुद्ध ८.

नकल पत्राची पेशवे माधवराव यांहीं कारनेल आपटनास लिहिलें त्याची नकल:-

आतां तुमचे अर्जास जाब लिहितों:-

श्रीमंत रघुनाथराव यांसी तहनामा लि-हिला होता कीं, त्यास पैका आणि त्यांहीं राहावें तें आम्हीं आतां फिरवितों. त्याची वगत आम्हीं श्रीमंत रघुनाथराव यांची निशा शुद्ध हृदयापासून कबूल करितों कीं, त्याहीं राहावें श्रीबनारसमधें. त्यास पैका अथवा गांव रुपया पांच लाखांचा करार करीन, परंतु त्याही गांवामधें फितूर अथवा हंगामा फिरून न करावा आणि हरको-णहापासीं हंगामाची मैत्री न करावी व आह्मांस सांगितल्याखेरीज त्याहीं त्याचेच मुक्काम न फिरवावे. १

आमची इच्छा सर्व जनराल कौंशेल कलकत्याचे त्यासि अर्जी करावी कीं, दोस्तीचें त्यांहीं लिहावें. बनारसवाल्यास त्याच्याच तर्फेनें श्री० रघुनाथरावास पैका द्यावा. जो करार होईल तो त्यास ५ लाख रुपयास आम्ही मराठ्ट गांवामधून कालपी अथवा परगणें ह्या कार्यास ठराऊं. १

आम्ही हुकूम करूं त्या पैक्यास अथवा गांवास चालता करावयासि ज्या दिवशीं रघुनाथराव कबूल करितील हा करार वरती लिहिल्याप्रमाणें त्या दिवसापासून देऊं; परंतु पैका देणें अथवा गांव श्री. रघुनाथराव बनारस पावलियानंतर. १

ह्या कार्यास थोडे दिवस बंदोबस्तास लागतील त्यास्तव मुंबईचे जनराल कौंव-शेल यांहीं श्री० रघुनाथराव यास जामीन राहावें कीं, श्रीमंतांहीं सुरतेस राहावें जव-पर्यंत हा करारजाब ठरावून पाठवितील;

पंरतु त्याहीं फितुर-कार्य अथवा इंगामा न करावा. १

ह्या कार्याचा जाब लिहावयासि हेगई न करणें आणि श्रीमंताहीं नवा तहनामा न करावा आम्ही निश्चई केला असे याखेरीज दुसरे न करावें ऐसें असोन श्रीमंत कबूल न करतील तर इंग्रेजांनीं ज्या बंदोबस्तास गुंतल्यात त्याचप्रमाणें चालावें.

तुह्मांस अर्जी करितों कीं ही सर्व हकीकत मुंबईच्या जनराल कौंवशेल यास लिहिणें व जाहीर करणें आमचा हाच निश्चैई ज्यादा काय लिहिणें ? ता० २१ आगोस्त सन १७७६.

श्री.

लेखांक १७४.

१६९८ अधिक भाद्रपद शुद्ध १२.

पुा राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसि:-

सु॥ सबा सबैन मया व अलफ. खासा स्वारी छत १० रजबीं, मौजे उदवाडा ता॥ बादलापारडी येथून कूच होऊन अर्जुनगडानजीक कोसावर मुकामास आली. किल्ल्यांत फतेसिंग हवालदार होता तो खालीं उतरोन रुजू जाहला याजमुळें त्यासच किल्ला मजकूर काईम करून ठेविला व किल्ल्यावर हुजुरचे लोक व कारकून ठेऊन बंदोबस्त केला; दवणकर जमियतसुद्धां भेटले. याजबराबर तोफाही आहेत. या दबावांनीं इंद्रगड वगैरे जे वाळ त्यास आहेत त्यांवर शह टाकून हस्तगत होतील ते करीतच असो. गोव्यास पत्रें मुख्य फिरंग्यास व राजश्री जिवाजी विश्राम यास लिहून तुम्हांकडे पाठविलीं आहेत. तरी हीं पत्रें जलद फिरंगियाचा कोठीवाला तेथें आहे याज वळून रवाना करवणें अगर हरतर्‍हेनें जसी तुम्हांस सोई पडेल तसी पाठवणें. तेथून लौकर सरंजाम आला पाहिजे. वरकड सविस्तर पुा॥ पत्रावरून कळेल. जाणिजे. छ ११ माहे रजब. बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १७५.

१६९८ अधिक भाद्रपद शुद्ध २.

मंजूर

करनेल कीटिंग यासी पत्र जे:- तुह्मी पत्र छ ३ रजबचें पाठविलें तें पाऊन संतोष जाहला. विलायती जाहाज छ २ मिनहूस मुंबईस पोहचलें सरकारचें करारमदार जाले ते कंपणीनीं मान्य केले. व जनराल व कोसलदार कलकत्तेकर यासी कंपणीचा हुकूम आला कीं, इकडील सरकारचे बंदोबस्तास अनुकूल होणें, उन्मूल हुकूम न करणें व कंपनीचा फर्मान येथें आला तो अद्यापि खुला जाला नाहीं. याचें सविस्तर वर्तमान जनरालास विचारून मागाहून लिहून पाठवूं व मिस्तर टेलरचें पत्र छ १७ जमादिलावलचें जनरालास आलें कीं सरकारचे बंदोबस्ताविसीं जें कोशिष होईल तें उत्तम प्रकारें करीन व सर जनराल व कोसलदार कलकत्तेकरास सरकारचीं पत्रें पाठवावयाविसीं कितेक मजकूर लिहिला वे मुंबईकर जनरालासही पत्र लिहावें कीं, कंपणीचे सरकारची फौज सरकारचे मदतीस येईल ते सेवकाचे तैनातीस करून हजूर पाठवावी. ऐसे कितेक मजकूर लिहिले ते अक्षरशाइ ध्यानास आले. ऐसियासी, आह्मी ज्या गोष्टीची मार्गप्रतीक्षा करीत होतों तेंच तुह्मी खूष खबर विलायती जाहाज येवून पोहचल्या लिहिली.

यावरून बहुतच संतोष जाहला. कंपणीचा फर्मान जनरालास आला, त्यांतील अर्थ सविस्तर लिहून पाठविणें. मिस्तर टेलर बहुत शाहाणे व सरकार कामाचे उपयोगी. ते जो उद्योग व तर्तुद करतील ते सरकार-उपयोगी उत्तम करतील. सर जनराल व कोसल कलकत्तेकर यासी पत्र तुमचें लिहिल्याचे अन्वयें पूर्वीच लिहून, एक पत्र मिस्तर टेलरास ऐसीं दोन पत्रें कलकत्त्यास रवाना केलीं. मुंबईकर जनराल हे अंतःकरणापासून सरकारचे कार्यास उत्तम उद्योगप्रयुक्त आहेत. हे अर्थ अनभवास व निदर्शनास आले व पुढेंहि पुरतेपणें येतील, बेभरवसा याचाच आहे. यासहि पत्र लिहिलें आहे व तुमची सेवाचाकरी व निष्ठेचे अर्थ हजूर दृढतर आहेत. कंपणीचे सरकारची फौज सरकारचे मदतीस रवाना होती येसे सिध जाल्यास हे फौज तुमचे तैनातीस देऊन हजूर रवाना करावे म्हणून मुंबईकर जनरालास पत्र लिहिलें जाईल येविसीची खातरजमा आसो देणें हिंदवी लाखोटा हिंदुस्थानांतून आला म्हणून तुह्मी पाठविला तो पावला. जनराल करनेक यासी कंपणीनीं मुंबईचे जनरालाखालीं पाठविलें म्हणून मजकूर लिहिला तो कळला. खासा स्वारी सुरतेंत कंपनीच्या घरीं होती.परंतु खर्चाची वोढ फार व किले धार येथें कबिला व चिरंजीव लाहान आहेत. तेथें फितुरियाणीं फौज पाठवून मोरचे बसविले. सबब सुरतेहून बाहेर निघालों. सरकारचे फौजेसहि बोलाविलें आहे व सांप्रत्य विलायतेचाहि हुकूम आला आहे. तरी श्रीकृपेनें फितुरियांचे पारपत्य होऊन लवकरच बंदोबस्त सरकारचे दौलतीचा होईल. तेथें जनराल व कोशलदारांची खातरजमा आमचे तर्फेनें करणें कीं, मुंबईकर आंगरेजासी दोस्ती दिवसेंदिवस ज्यादा आहे. खर्चाचे तंगीमुळें व धारेस कबिला व चिरंजीव आहेत त्या किल्ल्यास मोर्चे बारभाईकडील लागले याजमुळें सुरतेहून बाहेर निघोन किल्ले अर्जुनगड व पारनेरा येथें आलों. कांहीं परगणे जप्त केले थोडा बहुत खर्च चालतो व दमणकराचे मार्फातीनें गोवेकर फिरंगीयासी संधान लाविलें. परंतु आमचें खरें लक्ष बंबईचे आंगरेजाकडे आहे. गोव्याची कुमक आली तरी येओ. कामाहि सुरूं होईल. कारण, जे दिवशीं विलायतचा हुकूम बंबइचे जनराल-कोशलास येईल व त्याचें लिहिले आह्मांस येईल ते दिवशीं त्याजवळच येऊं. तूर्त त्यास खर्चाचें संकट. सबब, च्यार दिवस या मुलकांत गुजराणा करितों, जाणिजे. छ १६ रजब.

श्री.

लेखांक १७६.

१६९८ अधिक भाद्रपद वद्य ७.

राजश्री लक्ष्मण आपाजी सो।। यांसि:—

सु।। सबा सबैन मया व अलफ. तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. जवाहिराविशीं जनरल याशीं बोलणें जाहलें. निकड केल्यास जवाहीर देतील. त्यास, जनराल कोषल याच्या नांवें आठाआठ दिवसांच्या तफावतीनें पत्रें पाठवावीं, म्हणोन लिहा तें कळलें. ऐशास दक्षणेकडे आलों. फिरंगा यांसि सलसीला लाविला. याचें कारण मी सुरतेंत राहिल्यानें पुढें बारभाईच्या फौजा येऊन उभ्या राहतील,मग मसलतीस बळ पडणार नाहीं. याचकरितां जलदी करून इकडे आलों. परंतु अंगरेजाचा भरवसा पक्का. थोर तरांडे. पल्यासहि याच तराडयांत पाहोंचवावयाचें, हें समजो-

नच त्यास तोडावयाचे नाहींत. इकडे येऊन लहानमोठीं राजकारणें करून पाहतों. दोस्त जे कोणी आहेत त्यांच्या गळ्यांत हात घालतों. मेळऊन घेतों. परंतु थोर जो भरवसा आहे तो एक अंगरेजाचा. तेव्हां जवाहिराविषीं निकड केल्यानें अगदींच तोडलेंसें त्याच्या चित्तांत येईल. आधीं सुरतेहून निघालों, इकडे आलों, तेसमयीं त्यास न विचारलें. हें एक त्याचे चित्तांत काय आलें असेल तें न कळे. आणि जवाहीरही निकडीनें मागितल्यास त्यास परिच्छिन्न भासेल कीं, उठून गेले. आणि आम्हांस त्याचा दरकार. याजकरितां त्याजवळ झटून मागवूं नये. जवाहीर त्याजवळ असल्यानें त्यांसही हेंच समजेल कीं, मसलत आह्मांवरच आहे. चार दिवस खर्चाच्या वोढीमुळें व बारभाईच्या पेंचामुळें बाहेर पडले, पोट भरलें, परंतु अंगरेजाखेरीज दुसरा विचार नाहीं. यास्तव तुम्हींहि त्याची खातरदास्त करावी. संतोषानें त्याच्या चित्तांत दुसरा विचार न येतां, जवाहीर दिल्यास घेणें. परंतु जनरालाच्या समाधानानें जे गोष्ट होईल ते करणें. लिहिल्यावरून जनराल कोशल यास खलिते पाठविले. परंतु लिहिला अन्वय सविस्तर ध्यानांत आणोन, याचे कोशल करून मनसब्यास युक्त असल्यास खलिते देणें. नाहीं तर न देणें, जाणिजे. छ २० माहे रजब.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १७७.

१६९८ अधिक भाद्रपद वद्य ९.

राजश्री लक्ष्मण अपाजी गोो यांसिः-

सु॥ सबा सबैन मया व अलफ. दमणेनजीक आल्यानंतर अर्जुनगड--इंद्रगड हस्तगत जाले. त्यास दमणकर फिरंगियाचें सूत्र सरकारांत हे दोन्ही किल्ले घावे म्हणजे दोनशें गोरा व तीनशें पागडीवाला व आठ दहा तोफा लढाईचा सरंजाम देतों म्हणून आलें. त्यास इतका सरंजाम तूर्त खासा स्वारीसमागमें आल्यानें मोठीच इभ्रत पडोन सरकारचीही जमीयत मिळेल. ती व हा सरंजाम इतक्यानसीं दहा हजार फौजेसी लढाई द्यावयास उपयोग पडेल अशी अनुकूलता वहत आहे. परंतु आंगरेजाचा आह्मांस पक्का भरोसा, क्षेपनिक्षेप कुमक करितील असा असतां मग फिरंग्याकडे काय स॥ गुंतावें ! म्हणून किल्ले न दिल्हे व त्याचा सरंजाम कुमकेस न घेतला. तूर्त आपलेच बळावर आहों. डाहाणू-तारापूरकर तेही लौकरच येतील. श्रीकृपेनें चिंता तरी नाहीं. कदाचित फितुरियांकडील पेंच अनावरसा दिसों लागल्यास असरा आंगरेजाचेच स्थलाचा आहे. हा भावही जनरलासी सविस्तर बोलावयाचे अन्वयानें प्रसंग समजोन स्थलें संरक्षण करणें. सुरतेहून निघालों त्याचें कारण येक तरी खर्चाचा वोढा. त्याचें संकट जनरालास किती घालावें ? ते आमचे दोस्त. त्यांचें नुकसान सरकारांत प्रशस्त नसे. दुसरें सुरतेस वसोन मसलतही दबलीसी दिसती, सबब बाहेर मुलकांत आलों. आतां फिरंगी वैगरे सर्वांशीं राजकारणें करणेंच प्राप्त. होतां होतील खरी. परंतु मुख्य भरोसा व पेंच दिसो लागला तरी आसरा आंग्रेजाचाच असे. कंपनीचें स्थल फार दूर टाकून जात नसों. हे प्रकार तपसीले--करून बोलावे. र॥ छ २२ रजब. गोव्यास पत्रें रवाना करण्याकरितां तुह्मांकडे मागेच पाठविलीं आहेत तीं गोव्यास पावतीं करणें. जिवाजी विश्राम यांचे विद्यमानें गोवेवाल्यास पोहचत तें करणें. छ मा॥र.

(लेखनावधिः

श्रीसांबः सपुत्रो ४

लेखांक १७८.

१६९८ अधिक भाद्रपद वद्य ९.

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसः—

सु॥ सबा सैबन मया व अलफ. तुह्मी विनंतिपत्र पाठविलें, तें छ १२ रजबीं प्रविष्ट जालें. जनराल यांस विचारलें कीं, आपल्यास मसलत होत असल्यास करावी, नाहीं तरी सरकारचा दुसरा दोस्त कोणी करीत असल्यास करावी कीं काय ? त्याजवरून त्याचा जाबसाल जनराल यांणीं केला कीं, मसलत सिद्धीस जात असल्यास करावी. हालीं विलायतेहून इंग्रेज ज्यान करणक आला आहे. तो सर्वे कोपलदारांहून वरिष्ठ आहे. जनराल हर्नबी याची तहगीरी जाहाली ह्मणजे यांणीं जनराली करावी. तरी, यास सरकारचें पत्र पाठवावें. सध्यां आमचे येथें काम कांहीं नाहीं. याजकरितां हुजूर यावयाविसीं पत्र सादर करावें ह्मणोन. इत्यादिक प्रकारें लिहिलें तें कळलें. ऐशास, जनराल सरकारचे दोस्त. सरकारमसलत सिध्धीस जात असल्यास त्यांस संतोषच असावा. हेंच त्याच्या थोरपणास उचित असे. तुमच्या येण्याचा मजकूर तरी आह्मी इकडे येऊन फिरंगियासी सीलसीला लाविला, ह्मणोन इंग्रेजासी दुसरा विचार आहे, असा अर्थ नाहीं. तुह्मीं तेथेंच जाबसालास राहाणें. अंगरेजाचा विलायतेहून हुकूम आला म्हणजे जवळच आहों. जेथें बोलावितील तेथें येऊं. पुढेंहि अंगरेजाचाच भरंवसा आहे. त्यासी स्नेह केला आहे तो ज्यारीच असावा. तुह्मी तेथें राहिल्यानें कितेक मनसबेहि आहेत आणि उपयोगहि आहे, याजकरितां यावयाचें न करणें. तेथें राहाणें. वरकड सविस्तर-बलसाडाहून फतीमारी देऊन खिजमतगारा-बरोबर पत्रें पाठविलीं आहेत, पावोन त्या—अन्वयें जनराल यांस तुह्मी बोललांच असाल. विलायतेहून ज्यान करणक यास थैली याच मजकुराचें पत्र र॥ केलें आहे. त्याजबराबर पहिले खानगी पाठविलीच आहे. सांप्रत तुह्मी आलियानें जनराल कोशलास वाटेल कीं, आह्मासी सर्वस्वें तोडून गेले. तेव्हां बेरंग होईल. आह्मी फिरंगियास सामील करून मसलत करणार; परंतु याचा ऐवज थोडा. बल थोडें. प्रामाणिकताही कमीच असेल. हत्तीवर बसलों होतों ते सांप्रत लहानश्या घोडयावर बसलों. याचें कारण कीं, हत्ती मातबर खरा, परंतु पायास अजारी, मार्ग न चालवे, तेव्हां घोडयावर बसणें प्राप्त आहे. इतक्यांत हत्तीचे पाय शाबूत जाहाले, मार्ग चालतो असें समजल्यास, फिरोन हत्तीचीच स्वारी मंजूर होईल. तूर्तचे प्रसंगीं चार दिवस पोट भरतों. जनरल याचे दरमहा पंधरा हजार द्यावे ते आह्मांस थोडे व त्यास बहुत. तेव्हां बाहेर पोट भरल्यास आमची सोई व त्यांची आहे. तुह्मांस तेथें रहावयाविसीं लिहिलें. येणे करून तुम्हांस भासलें कीं, आम्हांस दूर ठेवितात, जवळ बाळगावयाची मर्जी नाहीं. तर असा अर्थ न समजणें. तेथेंच उपयोग बहुत आहे. हजूर पांच सात जण आहेत. हरकसें काम चालेल. परंतु तेथें तुह्मासारिखा दुसरा इतबारी सांप्रत कोण आहे ? तुह्मी हुकुमाची वाट पाहाणें. उपयोग नाहींसा दिसेल तेव्हां बलाऊं. जाणिजे. छ १८ रजब.

हे पत्राची नकल आहे. पहिलीं पत्रें पावलीं असतील; तथापि जलमार्गास्तव तिहींरी रवानगी केली आहे. खुलासा मजकूरः आंगरेजच आह्मास आदरेंकरून

बलावीत ऐसें जाहाल्यास फार उत्तम आहे. येथेंच दोन तीनसें माणूस पाठवावें. आह्मीं गोव्यास पत्रें पाठवून, हजार दोन हजार गोरे व काळे आणविले आहेत. परंतु यावयास येक मास पाहिजे, तोंपर्यंत बारभाई चैन कसीं पडूं देतील ? तूर्त बारभाई आपले गीरीफदारींत आहेत. ह्मणोन आमचे महिनाभर भ्रमानें चाललें. याउपरि कांहीं दिवस चालेल. इतक्यांत मुंबईची अथवा गोव्याची कुमक आली ह्मणजे कार्य—सिध्धी जाहाली. आमची देशची फौजही बलांविली आहे. परंतु टोपीकर मिळावयाची वाट पाहातात किंवा पाउसामुळें दिरंगाईवर पडले आहेत, हें समजत नाहीं. पांच हजार चांगली फौज असल्यास पुण्यासच दाखल व्हावें, ऐसा समय आहे. परंतु दक्षणेजवळ येऊन मसलत दिरंगावर पडली आहे. असो ! श्रीकृपेंकरून मनसुबा बिघडणार नाहीं, ऐसें दिसोन येतें. तेतियाकडीलहि पत्रें आलीं. संदर्भ आला आहे. गोपाळ धोंडदेव व नरसिंहाचार्य आले. त्यास, भेटावयाची अर्जी आहे. त्यास आह्मीं जबानी सांगोन पाठविलें कीं, आमचा नांवचा शिक्का चालवावा, हे खबर पोंचल्यावर आह्मी भेटीचा उद्योग करूं. दोन तीन हजार माणूस माहुली साष्टीचें सुमारें पाठवावें. त्याचे मानस वज्रजोगिणीस भेटावयाचें आहे, तें कबूल केलें. परंतु आमचे नांवें मोहर चालेल तेव्हां मिलोन. माधवराव नारायणाची मोहर आहे तों परिछिन्न भेटणारच नाहीं, ऐसें जबानी सांगोन पाठविलें. तो खरा नाहीं. अक्षर पाहिलें. कांहीं मिलत नाहीं. परंतु तूर्त आपले विलग प्रसंगास्तव मात्र भेटावें. समजोन द्यावें; बाजवी असल्यास पेच नाहीं. परंतु बाजवी नसेल. तुह्मीं भोळ्या माणसाच्या जबानीवर न जाणें, अबदूल गनी वृध्ध, त्यास कांहीं कलत नाहीं. वृद्ध मनुष्यास खराच दिसतो. त्याजवळ कांहीं करणी असेलसें भासतें. छ २२ रजब.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १७१.

१६९८ भाद्रपद शुद्ध ३ सोमवार.

राजश्री लक्ष्मण अपाजी यासिः—

सु॥ सबा सबैन. तोतियाच्या कांहीं खुणा अर्ध्या अर्ध्या ल्याहाव्या ह्मणोन लि॥. तरी सेवटील स्वारीस तीर्थरूप भाऊसाहेब हिंदुस्थानांत गेले तेव्हां मजपासीं अगोधर काय बोलिले ? तेव्हां हिंदुस्थानांत जाण्याचा निश्चय केला. तर्थिरूप कैलासवासी नानासाहेबांचीं व त्यांचीं व आमचीं भाषणें कशीं कशीं जाहालीं, तें सविस्तर सांगावें. त्यावेळेस विठ्ठल शिवदेव व फडणीस व दादू फौजदार वगैरे कोणते कोणते मागून घेतले कोण दिल्हे, तें सविस्तर पुसावें- विसाजी केशवास वसईं सुभेदारी तर्थिरूपांनीं सांगितली ते समईं तर्थिरूप उभयतांचीं व माझीं भाषणें कशीं जाहलीं, तें सविस्तर सांगावें. दोनच जाबसालावर कळेल. असो. येव्हां त्यास खुणा पुसाव्या, तेव्हां परीक्षा करावी. ऐसियासी हा प्रसंग परीक्षा करावयाचा नव्हे. परीक्षा आह्मांस पुर्ती कळलीच आहे. संशय नाहीं. तुह्मीं नवे, म्हणोन तुम्हांस संशय. पत्रावरून तरी पुर्तीच परीक्षा कळली, पवमान दीड अध्याय येतो, ह्मणोन तुमचे लिहिण्यांत. तरी नवे अलीकडे पवमान शिकले असिले, तरी न कळे अलीकडे शिकण्याचा प्रकार तरी ध्यानांतच आहे. तुह्मांस कळावें. अबदूल गनी वृद्ध गेले, परीक्षा करून आले, ह्मणोन लिहिलें. तरी प्रायः वृद्ध व बध्य स्त्रिया व भट आश्रित मं-

डळी यांस खरा वाटतच आहे. गंगाधर-भट कर्वे देखील संशयाची गोष्ट सांगत होते. अश्यांच्या बुद्धि किती, ध्यानांतच असेल. त्याजपासीं कांहीं जादू असेल, असें-ही तर्कांत येतें. परंतु ते जादू किरकोळां-वर पडते. मोठ्यांवर पडत नाहीं, ऐसेंहि दिसते. अबदूल गनीवर जादू असेल अ-थवा कांहीं द्रव्य मिळालें तरी हेही मोठी जादूच ! असो ! इतकें तपशिलाचें तूर्त कांहीं प्रयोजनच नाहीं. त्यास खरा अथवा खोटा ह्मणावें, ऐसा समय नाहीं. त्याचे परीक्षेचे दिवस नव्हते. तुह्मांस मात्र कळावें, ह्मणोन तपसील लिहिले असे. खरा कळ-ल्यावरी मजपासून अणुमात्र अमर्यादा होणार नाहीं, हे खातरजमा ठेवणें. वरकड तुमचीं पत्रें दहा बीस बंद आले. सर्वहि वाचले. उत्तरें कामाचे मजकुराचीं मात्र लिहिलीं प्रयोजन नाहीं त्यांचीं उत्तरें क-शास ल्याहावी ? तुह्मीं आंगरेजाची मर्जी दुरुस्त राहे तें करणे. हें काम बहुत मोठें, लहान नाहीं; तेथें काम नाहीं असेंच दृष्टीस पडेल, तेव्हां हजूर येणें. तेथें दुसऱ्यास पाठऊं. जोंपर्यंत कामांत जीव दिसतो तों-पर्यंत जलदी करणें उचित नाहीं. छ २ साबान.

(लेखनावधिः)

श्रीसांबः सपुत्रो विजयते.

लेखांक १८०.

१६९८ भाद्रपद.

राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यांसिः—

सुा सबा सबैन मया व अलफ. इक-डील मजकूर तरी, जनराल यांस कळवावा यास्तव सविस्तर खुलासा मजकूर तुह्मांस लिहिला आहे. त्यास, जनराल याचा कानावर घालून त्यास विचारणें. कोणती मसहलत सांगतात, ते आह्मांस कळावी. सांप्रतकाळीं आमचे दोस्त अंगरेज आ-हेत. त्यांचे सल्लेनें करणें तें करावें. येथील मजकूरः—

भाऊकडून नरसिंहाचार्य व यज्ञेश्वर दीक्षित दोघे शास्त्री आले. त्याचा मजकूर कीं, माधवराव नारायणाचें नांवें सिक्का पूर्वी केला मोडितों, आमचें नांवें करितों, नारायणराव याचा मूल नव्हे, तो खोटा, सबब आह्मीं पूर्वीच न करावा, परंतु तेव्हां गरजेसाठीं केला, आतां आपण आले ह्मणजे सर्व दौलत आपली, मजला कारभार सांगावा, आपलें आज्ञेप्रों मी कारभार करीन, कै-लासवासी तीर्थरूप नानासाहेबांचे जागीं आपण आहांत. याप्रों त्याचा मजकूर.

कलम १.

हा मजकूर बहुत चांगला. परंतु भाऊ खोटा असल्यास, दगासा वाटतो. खरा असिल्यास, पेंच नाहीं. आह्माकडील मजकूर तरीः येथें जमीयतदारी नाहीं. परंतु औ-रंगाबादेकडून कांहीं राऊत व गाडदी आणविले आहेत व डबईहून थोडेसे ये-तील. सुरत अठाविशीतींल कांहीं मिळत नाहीं. तलासांत आहों. परंतु पांच हजार-पावेंतों राऊत व प्यादे मिळतील, दि-वाळीपावेतों जमा होतीलसें दिसतें. परंतु येतील तेव्हां खरें. केवळ आपलेच बळानें मातबर मसलत होईलसें दिसत नाहीं. थोडीबहुत चालतच आहे. फिरंगी तरी लबाड व नाकुवत. अंगरेज तरी बंगा-ल्याचा अथवा विलायतेचा हुकूम च्या-हातात. तेव्हां कसें करावें ? कलम १.

अंगरेजास दरम्यान घेतल्यानें बळकटी. परंतु आह्मी विलायतेच्या अथवा बंगाल्या-च्या हुकुमाची वाट पाहतों. त्यास, हे सरकार असल्यास मग लढाईस तयार

कसे होतील ? हा दोष. याची काय तोड करावी ? जनरल वगैरे अंगरेजास पुसावें.

फितुरियाकडून राजश्री बाबुराव बल्लाळ काणे आले. त्याचा मजकूरः पांच सात लक्षाचे परगणे द्यावे. रेवतीरीं राहावें. निदानीं दाहाचेही कबूल करितील व सुरळीत परगणे द्यावे आणि होळकर सिंदे दरम्यान देतों. त्यांचे विद्यमानें रेवातीरीं राहावें. बहुधां अमदाबाद वगैरे मर्जीचेप्रों पंधरा वीस लक्ष पावेतों देतील असें तर्कानें दिसतें. इतका मजकूर बाराभाईकडील नजरेस येतो. कलम १.

आह्मांस अंगरेज दरम्यान घेतल्याशिवाय भरंवसा पुरवत नाहीं. अंगरेज घेतले तरी येक दोष आहे.

भारभाईस तोतियानें बहुत ताण दिल्हा आहे. तमाम किल्ले तोतियास वश जहाले. त्याजपाशीं काय करामत आहे, हें कळत नाहीं. याजमुळें आमच्या मसलतीस जीव आहे. येक महादजी सिंदा मात्र लढावयास पुढें जाहाला आहे.

तोतिया जनकोजी खरा जाहाल्यास पेंच पडेल. यास्तव आगारी घेतली आहे. याजमुळें बारभाई आमचे पाय धरीलसें दिसतें. कलम १.

हे कितेक समक्ष बोलणें जनराल याचे व्हावें हें मानस आहे. त्यांस, आम्ही कोणत्या मुकामीं यावें ? साष्टीच्या रोखें यावें किंवा मुंबईसच यावें, हें जनराल याची सलाह कसी आहे, तो त्याचा खुलासा काढणें. कलम १.

येकूण कलमें साहा लिहिलीं आहेत. त्यांत भाऊसीं कसें बोलावें, बारभाईसीं कसें बोलावें, भेटीचा सलाह कसा देतात, तें पुसावें. जाणिजे. छ १२. कारनेल किटिंग व होम, इष्टोल, वारलिस वगैरे जे जे इष्ट असतील त्यांस सलाह पुसावी. खबर द्यावी. मित्रता वाढवावी. उपयोगी आहेत.

(लेखनावधिः)

कान्हु कुटा व उदेभान दोवे पाठविले आहेत. जबानीवरून कळेल. हाच मजकूर जबानीं आहे; परंतु प्रगट न करणें. मसलत येकच ठहरली नाहीं.

लेखांक १८१.

१६९८ भाद्रपद.

चालऊं. याजकरितां जवाहिर मागणें. बंगालेवाले यांनीं लढाई मना करविली आणि जनराल याचे करणें आपटणांनीं आपले जागा वाजबी असतां गैरमंजूर करून एकपक्षी तह केला. त्यास, जर विलायतेचा हुकूम लढाईचा आला तरी जवाहिराविसी अडऊन धरावें, असा कांहीं विचार नाहीं. आपटणांनीं याचें करणें गैरमंजूर केलें. परंतु, विलायतेहून मंजूरच केलें. मंजूरच केलें हा लौकिक याचा हाऊन याच अभिमानानें मसलत सिद्धीस नेतिल. जवाहीर आमचे हवालीं केलें ह्मणोन मसलत सोडावी, या गोष्टी जनराल याजपासून दूर आहेत. हे अंदेशा त्यांनीं चित्तांत आणों नये. तुह्मींही येविसीं खातरदास्त करावी. कलम १.

भाऊचें बंड जाहालें आहे. तेथून कारकून जनराल याजकडे दोवे आले आहेत. त्यास जनराल याचें कागदावर सिक्का मुलाचे नांवें आहे व जनराल यांस पत्र लिहिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास, बंडाकडे शाहाणा मनुष्य पाठवणें ह्मणोन पेसजी तुह्मांस लिहिलेंच आहे. मुलाचे नांवें सिक्का केला आहे. तरी मूल कोणता तें लिहिलेत नाहीं. तरी लिहिणें. ज्या अर्थीं त्याजकडील कारकून इकडील

मसलतीचें बोलणें जनराल याजवळ बोलतात, त्या अर्थीं खऱ्याखोटयाचा संदेहच वाटतो. तुह्मीं तिकडे र।। केलाच असाल. आह्मीही इकडून र।। करितों. त्याजकडील कारकून तुमच्या ओळखीचे आहेत. युक्तीनें येथील नांव न कळतां त्याचा दस्तऐवज आणऊन इकडेच पाठविणें.

कलम १.

मेस्तर शाहाचे ऐवजाचा मजकूर लिहिलात ऐशास शहा येथें आल्यानंतर आपले कर्जाचा ऐवज मागे.

तेचा हुकूम येईल. त्यास, बहुत दिवसांचा अवकाश. फितुरी जबरदस्त होतात आणि आह्मीं येथें राहिल्यानें आब रहात नाहीं. कितेक राजकारणें आहेत तींही नाउमेद होतात. त्यास, पहिले जनराल याचें बोलणें होतें कीं, तुमची मसलत कोणी करीत असल्यास करवावी, याजकरितां आमचा दोस्त कोणी मसलत करी असा उभा राहिल्यास, त्यांत जनराल याचा सला असावा. आम्हांस त्याजकडे पोंहचवावें. जाहीरात अगर अंतरगति या गोष्टीस त्याचें अनुमत असावें. येविसीं बंगालेवाले सर जनराल यास पत्र लिहिलें आहे त्याची नकल तुह्मांस व जनराल यांस पाहावयास पाठविली आहे. तरी जनराल यांस दाखविणें आणि तुह्मींही येविसीं जनराल यासि बोलून त्याचा खुलासा काढावा. त्याच्यानें आमचें साहित्य अव्वल व्हावें. तथापि न होय तरी आह्मी मसलतीस उभा करूं त्यास त्याचें अनुमत असावें हे तरी तुटून नसोत.

त त्याची व सरकारची दोस्ती आहे ते काईम असावी. वरकड जनराल ह्मणतील कीं तुमची मसलत उभी करी असा कोण आहे ? त्यास मोरोबाचें राजकारण आलें आहे. हें त्यास ठाऊकच आहे. सध्यां मोरोबाचें राजकारण. अशीं कितेक आणखीही येतात आणि मसलत करावयाचे दिवसही हेच आहेत. फितुरियास चहूंकडील ताण. थोडक्यानेंच काम होईल. पुढें दिवसेंदिवस शत्रूची प्रबलता न जाहाली तों अगोदरच जरब बसोन गुंज. श्रीकृपेनें मसलतही सिध्धीस जाईल. इकडील कुमक करीत नाहीं तेव्हां फितुरियाचीही करूं नये. निखालस असावें. पुढें जसें घडणें तसें घडेल. तरी येविसी सविस्तर त्यासी बोलोन, या गोष्टीस त्याचा सला कसा काय आहे तो काढून या गोष्टीस पुर्ते त्याचें अनुमत घ्यावें. जनराल यांच्या अनुमतें आमचा दोस्त कोणी उभा राहून कार्य केल्यास जनराल याची व आमची दोस्ती आहे.

(लेखनावधि:)

श्री.

लेखांक १८२.

१६९८ आश्विन शुद्ध ३.

राजश्री सुखाराव बुरुडकर गोसावी यांसी:—

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य र।। रघुनाथ बाजीराव प्रधान आशिर्वाद. सु।। सबा सबैन मीया व अलफ. तुमचे एकनिष्ठेचे अर्थ कितेक र।। लक्षुमण आपाजी यांणीं हुजूर विदित केले. त्यावरून संतोष जाहाला. तुम्ही पुरातन सेवक, पदरचे. तिर्थस्वरूप कैलासवासी रावसाहेबांपासोन आजपर्यंत निष्ठेनें सेवा करीत आलां. दरम्यान कितेक पेच पडिले. तथापि समय रक्षून सेवटीं निष्ठा साहेबसेवेवरीच ठेविलीत. शाबास तुमचे खानदानाची असे ! त्यांस या उपरी तालुके सुवर्णदुर्ग येथील किल्याचा बंदोबस्त जंजिऱ्यासुद्धां अलंगनौबत चौकी पाहाऱ्याचा करून हुशार राहाणें, बार-

भाईचे लोक आल्यास पारपत्य करणें. याखरीज विजयदुर्ग,अंजनवेल,रत्नागिरी येथील किलेकऱ्यांस सांगोन त्यांची खातरजमा करणें आणि हुजूर लेहून पाठवणें, ह्मणजे सनदा दिल्या जातील. यासमई सेवा करून दाखविल्यास विशेष कृपा तुम्हांवर होऊन, तुमचे मनोदयानुरूप सर्व घडोन येईल. खातरजमा ठेवणें आणि किले जितके सरकारांत रुजू होतील तितके करून घेणें. कितेक आज्ञा करणें ते तुम्ही आपलेकडील शाहाणा माणूस जलद हुजूर पाठवून देणें. सुवर्णदुर्गास आरमार आहे, तें तयार असो देणें. मागाहोन आज्ञा होईल, त्याप्रमाणें करणें.

श्री.

लेखांक १८३.

१६९८ आश्विन शुद्ध ३,

पु॥ राजश्री लक्ष्मण आप्पाजी गोसावी यासि:—

सु॥ सबा सबैन मया व अलफ. तुह्मीं पूर्वी पेशजीं सिक्केकटारीचा मजकूर लिहिला होतात व हालीं तुह्मीं राजश्री आबाजी माहादेव यांस लिहिल्यावरून सिक्केकटार तुह्मांकडे पाठविली असे; जे काम लौकर होउन येत असल्यास त्या कामावर सिक्के करीत जाणें.

दिरंगावर असल्या हुजूर लिहिणें. खासा स्वारी जवळच आहे. कार्य पाहून करावयाचें तें करणें. इतबारी कोणी सिक्के करावयास पाठवावा, ह्मणोन लि॥ त्यास, तुह्मींही सरकारचे इतबारीच आहां. तुम्हां परतां इतबारी कोण आहे ? तरी हा चित्तांत संशय न धरणें, इतबारी यख्तियारी तुह्मीच आहां. जाणिजे. छ १ रमजान. खासा स्वारीहि तिकडे जलद येणार. जवळ आल्यावर तुम्हीं येणें. छ मजकूर.

(लेखनावधि:)

श्री.

लेखांक १८४.

१६९८ आश्विन शुद्ध ११.

पु॥ राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसि:—

सु॥ सबा सैबनं मया व अलफ. कारनेल आपटण यांणीं फितूरियांसी तह करून तहनामा मुंबईस पाठविला. त्याची नक्कल बाडमानीं हुजूर पाठविली आहे. व सरकारांत पत्र लिहिलें आहे. त्यास यादीची नक्कल व बाडमाच्या पत्राची नक्कल तुह्मांस पहावयास पाठविली आहे.याजवरून कळेल. याच पत्राची रवानगी पहिली केली, ते दमणास गेली. याजकरितां दुसरी रवानगी केली असे. त्यास जनराल हर्नबी याची व सरकारची दोस्ती, त्या अर्थी उचित मार्ग असेल तेच सलाह देतील. परंतु, जाहिराणा तरी यादी—प्रमाणेंच कबूल करावें, ह्मणतील. त्यास, अंतर्गती कोणती कसी सलाह देतात, हा त्याचा खुलासा काढून लेहून पाठवणें. बाडम यास पत्राचा जाब मोघम लिहिलें आहे कीं,हें जें बारीक मोठें बोलणें आहे तें लिहितां नये,यास्तव पेस्तर शाहाचें येणें झाल्यास फार उत्तम आहे, नाहीं तरी बापू कामती अगर दुसरा कोणी इतबारी पाठवावा. ह्मणोन लिहिलें असे. तुह्मास कळावें. जाणिजे. छ ९ रमजान. बहुत काय लिहिणें ? बाबूराव काणे अलि ते, रेवातीरीं मर्जीचे स्थलीं राहून रुषी संख्या लक्ष द्यावे, म्हणतात. अवतारपावेतों भाव आहे. प्रमाणेंही लाऊन देणार. परंतु येकदां करार जाहाल्यास मग फिरावयाचें संकट. यास्तव कोशल करून लिहिणें. निदानीं काय बोलावें ? भाऊचें सूत्र तरी पक्केंच आहे. नरसिंहाचार्य येथें येऊन गेले. मोरोबाचेही निरोप बाबूरावा—बराबर आहेत. जीव कलतच आहे. बनोज येईल तेव्हां खरें. हजरदां बोललें आणि कांहीं जाहलों

नाहीं. तेव्हां पुढें कोणता भरवसा? जाणिजे. छ मजकूर. कलकत्त्यास व श्रीस पत्रें लिहिलीं आहेत. कोणी गलबत जाईल तेव्हां रवाना करणें.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १८५.

१६९८ अश्विन शुद्ध १५.

पु॥ राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सु॥ सबा सबैन मया व अलफ. कदाचित बारभाइचा तह बनल्यास रणगडास राहावें. त्यास, राहावयास जागा मजबूद चांगली असावी. तेव्हां गढी मजबूद बांधावयास दोन तीन महिने पाहिजेत. तेव्हां भडोचेस राहावें लागेल. त्यांत दुसरें हि एक आहे कीं, फितुरियांचा पुरता इतबार पडेतों जातांही येत नाहीं. कारण कीं, ते दबा धरून, विसराखालीं पाडून, आपले कर्मास चुकावयाचे नाहींत. यास्तव आम्ही दोन महिने भडोचेस, दोन महिने रणगडास या प्रमाणें राहात जाऊं. आह्मांस आश्रा तरी भडोजचाच आहे. ज्या समयीं शिंदे, होळकर व इंग्रेज दरम्यान राहातील, तेव्हां या गोष्टी ते करणार नाहींतसें दिसतें, परंतु सावधगिरीनें असावें हेंच खरें. सलूख जाहाला तरी आम्हांस आंगरेज मध्यें द्यावे लागतीलच. मध्यस्त आंगरेज, तेव्हां त्याचे तें राहाणें अवश्यमेव प्राप्तच आहे. एविसीं अगोधर सूचना जनरालास व ममतेचे आंगरेज व कोशलदार यांस असावी. बारभाईची व भाऊची लढाई सुरूं जाहाली. आह्मीं काय करावें तें आंगरेजांनीं सलाह सांगावी जाणिजे. छ १३ रमजान.

(लेखनावधिः)

बारभाईसी सख्यच ठहरलें तरी रणगडास जाऊं. तेथें पंधरा दिवस राहून भडोचेस येऊं. रणगडास किल्ला मजबूद करावा लागेल. घर राहावयास चांगलें पाहिजे. तेव्हां सहा महिने तरी जलदीनें केल्यास पाहिजेत. तेव्हां भडोचेस राहावें, उचित दिसतें. आंग्रेजाचा आश्रा पाहिजे. विलायतेच्या हुकुमाचीहि वाट पहातच आहों. बंगाली यांचा हुकूम पाठवी तों तूर्त दोन लक्ष पाठवावे, ह्मणौन धोंडो खंडोजीनें लिहिलें होतें. त्याहि तूर्त देत आहों. बंगालकरास दाहाहि अंतस्त निदानीं कबूल करणें ह्मणोन लिहिलें होतें. त्याणीं लिहिलें कीं, दोन लक्ष तूर्त पावावे, ह्मणजे हूकूम पाठवितो, बाकी बादज फते मागाहून पाठवावे. त्यांस, याचेहि तर्तुदेंत असावें. भडोचेस आश्रा आहे; अमदाबाद, डबई वगैरे येथील बंदोबस्त तेथें जाऊन करावे; हा एक पक्ष. हा एक पक्ष, भडोचेस राहूनच करावे. त्यास, एविसीं जनराल-कोशलाची सूचना गंभीरास व बाडमास असावी, गुप्तरूपें असावी. छ मजकूर. कांहीं मजकूर उदेभान चौकीदार रुबरू सांगेल.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक १८६.

१६९८ आश्विन वद्य ९

राजश्री लक्ष्मण आपाजी गोसावी यांसिः—

सुहुरसन सबा सबैन मया व अलफ. किल्ले डबाईस रा॥ फत्तेसिंग गाईकवाड याणीं वेढा घातला आहे. गाईकवाड याजकडून अमीनखान व अनाजी व बाळाजी रघुनाथ व आणिखी गैरपतकें येऊन मोर्चेबंदी केली आहे. त्यास, गुदस्तां बडो-

द्याचें मुक्कामीं खासा स्वारी असतां, त्याजविशीं कारनेल किंटण याणीं रदबदली करून त्याजवर सरकारांतून कृपा होत गेली. सांप्रत मशारनिलेची वर्तणूक बदराहा होऊन याप्रमाणें केलें. हें वर्तमान कारनरास सांगोन ते गाईकवाडास लेहून वेढा उठवीत अस-ल्यास बरेंच आहे. कारनेलीचे पत्रानें काम होईलसें नाहीं; तथापि जनरालाचें व कारनेलीचें पत्र गेल्यास कांहीं उपयोग पडेल. गंभीर भडोचेस आहे. त्याणें दबाविलें तरी काम होईल. परंतु अश्या काळीं कोण साहित्य करितो ? फुकट दबावन्यास काय जातें ? परंतु दबावतीलसे दिसत नाहीं. असो ! प्रयत्न जाहाल्यास जनरलाचें पत्र, कारनेलीचें व गंभीराचें जाई तें करावें. नाहीं तरी, लढाईनें तरी डबई राखीतच आहों. गारा व दारूचा आंत तोटा आहे. वरकड बाहेरील वेढा डबाईकराचे खातेरंत नाहीं. दारू व गारा रणगडास पोहचल्या तरी कांहींच फिकीर नाहीं. दोन महिन्यांनीं बडोद्याची खबर घेतली जाईल. फतेसिंगाचे सामान व हिंमत सर्व नजरेत आहे. जाणिजे. छ २१ रमजान.

(लेखनावधिः)

लेखांक १८७.

१६९८ आश्विन.

पावलियाचें पत्र आलें नाहीं. तोंपावेतों उत्तरहि देत नाहीं. व दुसरें पत्र छ २८ रमज़ानीं येऊन पोंहचलें, त्याचें उत्तर छ२१ जिलकादीं त्यास बहुत जबाऊ नीचे फजीत करून लिहिलें. हा भाव कोसलदार मजकूर व फारमर साहेब यांणीं सांगितला कीं, हें सर्व आदिअंत बाईस लिहून पाठविता, हे आपले वचणावर कायम आहेत. मीं येथील प्रसंगींचें वर्तमान साकल्य पत्रीं लिहिलें होतें, ते सर्व कौसलदार मजकूर यास विदित केलें कीं, याजकडीलहि भाव कळला. तेव्हां तें सर्व ऐकून ह्मणाले कीं, हे सर्व सत्य परंतु ऐसें ऐकिल्यास धीर पुरणार नाहीं. ऐसें ल्याहावें कीं, येथें स्वामीचे कार्यास ठेवून च्यार महिने बसल्याविना कार्य केल्या येणार नाहींच. हा सिश्वय असावा. या गोष्टीस फार दिवस गेले. एका मासाचे अंतरांत आठा दिवसांत किंवा पंधरा दिवसांत निदान येक मास ऐसें लिहिणें. शत्रूचा किमपि पक्ष धरनार नाहींत. जैसें कळेल तैसें सरकार—मसलतीस सादर होऊन, बोलले. करारामों निश्चितार्थच जाणावा. आजपावेतों जालें वर्तमान तिकडे लिहितों, ऐसें सांगितलें. तेव्हां यासी उत्तर केलें कीं, तुम्ही जैसें आपले यजमानास लिहितां, हे आमचे हितार्थच लिहितां, तर तेच आह्मांस आज्ञा केल्या आह्मी त्याप्रों विनंतिपत्रीं अर्जी करून लिहूं. तेव्हां ते बोलले कीं, हे आह्मांत सर्व जातींत ये गोष्टीची गळ आहे. आपणांत आपुन शत्रुमित्र असलियास भेदाभेद ठेवीत नाहींत. परंतु बाध्यात किमपीही बोलत नाहीं. तुह्मास कार्यासी गरज किंवा कथेसी गरज. सारांश, जे खुसीचा भाव तें करणें. आह्मास अगत्य करणें तें तर सांगितलें. किरकोळ पदार्थ जो तुम्हीं पत्रीं लिहिला आहे. तोच येथास्थित. ते गोष्टीनें धीर पुरणार नाहीं, याजकरितां सांगितलें. त्यावरून तपसीलवार पत्र लिहिलें ते तर आरतराम त्रिवाडी गुमस्ते गोपालनाथजी या.

[पुढें गहाळ.

श्री.

लेखांक १८८.

१६९८ कार्तिक शुद्ध २.

गोवेकर मुख्य हालीचे सरदार यांसी:— सरकार राजश्री रघुनाथ बाजीराव प्रधान यांजकडून करार कीं:—सरकारची कुमक पूर्त—कशानीं करावी. त्याची यादी अलाहिदा जाहाली आहे. त्या करारा—प्रमाणें कुमक होऊन सरकारचें काम शेवटास जावें आणि सरकारांतून खुद्द तुह्मास रुपये ४,००,००० येकूण च्यार लक्ष रुपये बाजतफत्ते द्यावे. येणेंप्रमाणें करार केली आहे. या करारा‌प्रमाणें च्यार लक्ष रुपये देऊं. छ १ सवाल, सु॥ सबा सबैन मया व अलफ. छ मजकूर.

श्री.

लेखांक १८९.

१६९८ कार्तिक वद्य १.

राजश्री माहादजी शिंदे गोसावी यासि:— सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रीं॥ रघुनाथ बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरी येथील कशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. प्रस्तुत सुरतेहून बातमी आली कीं, पादशाहा व असफद्दोले फौजसुद्धां दक्षिणचे मोहिमीस येणार, अमदाबाद असफद्दौलास द्यावी. माळव्यापर्यंत बदाबस्त केल्यानंतर दक्षणचा सर्व बंदोबस्त करावा. त्यास, जोर असल्यास काय त्यांणीं करावयाचें आहे ? दुसरा मजकूर: धारेस चिरंजीव आहे. त्या किल्ल्यास फौजेनें वेढा घातला. यामुळें सांप्रत तसदी फार होते. याकरितां चिरंजिवास आह्माजवळ पोंहचाऊन देऊन किला ज्याचा त्यास द्यावा. सांप्रत अंगरेजाखेरीज दुसरा जागा अश्रयाचा दिसत नाहीं. ह्मणोन यथें राहणें प्राप्त आहे. तुह्मासारखे मातबर सरदार असतां आमचें राहणें परकी स्थलीं व्हावें ! परंतु कालापुढें उपाय काय ? धारेचा किल्ला खंडेरायाचे हवाले करितों. चिरंजिवास व कबिल्यास पाठवणें. दौलत जेव्हां कपाळीं असेल तेव्हां मिळेल. तूर्त येथें अचरूनें आहों. कोणाचे पेंचांत नाहीं, इतकेंच सुख मानून आहों. आंगरेज मैत्रकीस बहुतच उत्तम. याची तारीफ काय लिहावी ? जाणिजे. छ. १४ माहे सवाल.

श्री.

लेखांक १९०.

राजश्री लक्षुमण अपाजी यासि:—

प्रती सौ॥ आनंदीबाई आशीर्वाद. सु॥ सबान सबैन मया व अलफ. हरि श्यागीर्द याजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं व जबानीं निरोप सांगून पाठविले ते विदित जाहाले. ज्या गोष्टी भावी असतात त्या घडतात, त्यापक्षीं आह्मी दूरच आहों, हा भ्रमच बरा. विशेष कर्मफलाच्या गोष्टी काय ल्याहाव्या ? रवीसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत ते घेऊन पावल्याचें उत्तर पाठवणें व यादु येवलेकर यास तीळगुळ देणें. खरकसिंग वगैरे आणखी कोणी जे आपले मंडळीचे असतील त्यांस आमचे तीळगुळ देणें,जाणिजे. छ १ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें ? हे आशीर्वाद. नागो राम मुनसी यास तीळगुळ देणें. छ मजकूर. हे आशीर्वाद.

श्री.

लेखांक १९१. १६९८.

तहनामा सरकार राजश्री रघुनाथ बाजीराव प्रधान यांचा व पुर्तकशाचा विद्यमान किल्ले गोंवेकर. सु॥ सबा सबैन मया व अलफ. सरकारची कुमक पुर्तकशांनीं करावी आणि सरकारांतून पूर्तकशास बदफत द्यावा तपशील:—

पूर्वीं फिरंगाण प्रांत गड किल्लेसह जो सरकारांत आला आहे तो दरोबस्त द्यावा. त्याप्रमाणें साष्टी अंग्रेजाकडे गेली. त्याचे ऐवजीं गोव्याचे लगता येक किल्ला व साष्टीचे बेटांत जितका ऐवज उत्पन्न होत असेल तितका ऐवजाचा मुलूख द्यावा. कलम १.

आम्हासी शत्रू घरचे व बाहेरिल बेमबलक जाहाले आहेत. त्यांचा पक्ष एकंदरच कोणही विपईं करूं नये आमचे मर्जीप्रमाणें अनुकूल असावें. जे सरकारचे मित्र अथवा शत्रु तेच पुर्तकशानेंही आपलें जाणावें येणेंप्रमाणें कलम तिसरें ३.

पुर्तकशाची फौज गोरे व पागडीवाले मिळोन पांच हजार, निदान साडेचार हजार, असावी; व तोफा व गर्नाळा मिळोन तीस दागिने असावे. यास दारुगोळा पोख्त सामान बाळगावें. याचा खर्च वाजवी जो होईल तो गोंव्याहून सरंजाम निघेल त्या दिवसापासून ते मसलत शेवटास जाऊन सरकारांतून पुर्तकशाचे फौजेसं निरोप देऊं तोंपावेतों आकार करून बंदरापावेतो ऐवज देऊं. गोंव्याहून सरंजाम हुजूर येऊन पावल्यावर, सरकाराचा मुलूक सुटत जाईल. त्याचा रुपाया येईल तो सरकारचे फौजेचे वगैरे खर्चाचे अजमासें व पुर्तकशाचे फौचेचे वगैरे खर्चाचे अजमासें वांटून घेत जाऊं. मसलत सेवटास जाऊन पुर्तकशाचे फौजेस रुखसत करूं तेव्हां कुलखर्चाचा आकार पुर्तकशाचा सरंजाम होईल, त्यांत हे पावती वजा करून बाकी ऐवज देऊं. हिसेबाचे रुईनें परस्पर वर्तावें कलम दुसरें.

एकूण तीन कलमें लिहिलीं आहेत. त्याप्रमाणें परस्पर चालावें. ही मसलत सेवटास गेल्यावर त्यानंतरही दिल्हासानें अनुकूल होत जावें. फौजेचा खर्च वगैरे कुमकेसंबंधीं लागेल तो देत जाऊं.

श्री.

लेखांक १९२.

१७०० ज्येष्ट शुद्ध ११.

यादी अजमास नेहेमीं नेमणूक मुक्काम मुंबई स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ तिसा सबैन मया व अलफ.

——————————रुपये.

३ देवाकडे काफूर व दशांग वस्ता व चंदन मिळोन दरमहा
१४ आचारी व पाणके अ॥ २
११ शागीर्द अ॥ २ ए॥
६ सदाशिव आगाशा
५ मोरोबा दामला

११

४० ब्राह्मण पूजेस अ॥ २
२ कामाठी अ॥ १ एकूण अडसरीं ५॥
४ दिवट्या अ॥ १ ए॥
४९ कारकून अ॥ ४ ए॥
२५ चिंचक पांडुरंग
१५ सदाशिव धोंडदेव
५ भास्कर भिमाजी
४ लक्ष्मण यशवंत

४९

४० कोळी वगैरे अ॥ १० ए॥
४६ भोजन खर्च अ॥ १० दर ४॥—प्रमाणें
२१ बाग, वरल अ॥ ८
५ विश्वनाथ धनाजी
५ धनाजी द्वारकाजी
२॥ विराजी
२॥ हिराजी
६ पाणी घालावयासी माणसें अ॥ ४ दर १॥ प्रमाणें

२१

६ जासूद अ॥ २ दर ३ प्रमाणें

२३६

दरमाहा बेगमी ९४४ रुपये

श्री.

लेखांक १९३.

१७०० मार्गशीर्ष शुद्ध १०.

राजश्री सदासिवपंत दाजी स्वामीस:— पोष्य भास्कर शंकर साष्टांग नमस्कार. कोडेलशेषभट आचारी पाठविला आहे. तर त्याजपासून पंधरा दिवस चाकरी द्यावी. कदीम आठ रुपये रोजमरा आहे व इजाफा ऐक रुपाया करून घेतो. आणि छ २० जिलकादापासून रोजमरा द्यावा आणि सदरहूप्रमाणें चाकरी घेत जावी. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. छ ९ जिलकाद.

श्री.

लेखांक १९४.

१७०० मार्गशीर्ष शुद्ध १२.

राजश्री सदाशिव धोंडदेव यासि:— सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तळ्याजवळ पंचमुखी माहादेव त्यापासीं त्याच देवळांत भवानी आहे. तीस नथ करोन द्यावयाचा मानस आहे. तरी, तुह्मीं तेथें जाऊन चिठ्या घालाव्या कीं नथ करावी किंवा न करावी. करावी ऐसी आली, तरी मोतें, माणिक, मणी व सोनें सुद्धां, (श्रीवरळेश्वर येथील भवानीस नथ पेशजी करून दिल्ही आहे. रुपये चोवीस हालीं) हे देवीस त्याप्रों दोन अधिक अथवा दोन उणे लागले तरी नथ करून देवीच्या नाकांत घालणें. तुह्मांकडील त॥च्याऐवजीं मजुरा पडतील. जाणिजे. छ ११ जिलकाद.

(लेखनावधि:)

श्री.

लेखांक १९५.

१७०० मार्गशीर्ष शुद्ध १४.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसि:—

रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ तिस, सबैन मया व अलफ. जनराल याजकडील आयन्याची जोडी नजर आली आहे ती फोक्त करणें. व पोशागाबद्दल रुपये ३५०० साडेतीन हजार व शागीर्द पेशाचे इनामाबद्दल रुपये १००० एक हजार एकूण साडेचार हजार रुपये जनराल याजकडून आलेन आले म्हणोन राजश्री त्रिंबकजी भालेराव यांस विचारणें. जाणिजे. छ १३ जिल्काद बहुत काय लिहिणें ?

(लेखनावधि:)

पौ छ १४ जिल्काद, सन तिसा. मु॥ मुंबई.

श्री.

लेखांक १९६.

१७०० मार्गशीर्ष वद्य १.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यांसि:— रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ सन तिसा सबैन मया व अलफ. नारोराम कमळाकर याचे आईस व बायकोस रोजमरा येकमाही रुपये १२॥ प्रमाणें दरमाहा तुह्मांकडून देविले असते. तरी ८ छ जिल्हेजापासून दरमाहाचा दरमाहा तेथें आहेत तोंपर्यंत देत जाणें. तुह्मांकडील तसलमातीचे ऐवजीं मजुरा पडतील. जाणिजे. छ १५ जिलकाद. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधि:)

पो छ ४ जिल्हेज.

पौष शु॥ ६.

बार.

श्री.

लेखांक १९७.

१७०० मार्गशीर्ष वद्य ९.

राजश्री सदासिव धोंडदेव यांसिः—

सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तेथें अनुष्ठानाचे ब्राह्मण आहेत, त्यांपैकीं येका ब्राह्मणाचें हलकें अनुष्ठान पाहोन, संक्रांत— अमावास्या— पौर्णिमा तीन पर्वे आमच्या- वरचें समुद्रस्नान व दहा नमस्कार याप्रमाणें सांगावें. आणि त्याची तीन अधेल्या दर- माहा निराळीच द्यावी. तेथील ब्राह्मणांपैकीं कांहीं गेले अथवा दुखण्यास पडिले, तरी त्यांच्या मोबदला दुसरे चांगले मिळाले तरी लावावे. नाहीं तरी, येथें लिहोन पाठवावें. जाणिजे. छ २२ जिलकाद. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पौ छ २५ जिलकाद, सन तिसा.

बार.

श्री.

लेखांक १९८.

१७०० मार्गशीर्ष वद्य ९.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान सु॥ तिसा सबैन मया व अलफ. सरकारांत पालखीस लावावयाकरितां तावदानाचें प्रयोजन असे. तरी तावदानाचे बेताची यादी अलाहिदा पाठविली आहे. त्याबरहुकूम आकरा तावदानें खरेदी करून लौकर हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ २२जिलकाद.आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ २४ जिलकाद.

सन तिसा.

श्री.

लेखांक १९९.

१७०० मार्गशीर्ष वद्य ९.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजेश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तालुके बेलापूर खेरीज कळवें व परसिक येथील अलम खेरीज कमाविस हुजुरून शंकर भिकाजी कामथ यास सांगितली असे. त्यास सरकारांतून दाहा हजार रसद ठराविली आहे याकरितां नागू जासूद याजबराबर सनदा देऊन तुम्हाकडे पाठविल्या आहेत. तरी कामथ याजवळोन पांच हजार रुपये रोख घेणें. बाकी पांच हजार राहिले, त्याची साहुकारी निशा त्रिंबक पांडुरंग याचे गुजारतीनें घेणें आणि सनदाही कमाविसदारास देणें. त्या त्रिंबक पांडुरंग याचे दाखल्यानें देणें.जाणिजे. छ २२ जिलकाद. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक २००.

१७०० मार्गशीर्ष वद्य १०.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें

फर्कीराचा मजकूर लिहिला. त्यास, खासा स्वारी तेथें असतां त्यांस खर्चासही दिल्हेंच आहे. हालीं ते दूध मागत अस-
ल्यास देत जाणें. कलम १.

दाहा कामाठ्यांची नेमणूक होती, त्यांपैकीं पांच तेथें आहेत म्हणून लि॥. त्यास, माहादाजी मोरेश्वर, कामाठ्यांक-डील कारकून, यास ताकीद केली त्याजव-रून त्यांणीं अर्ज केला कीं, कल्याणाहून दुसरे पांच कामाठी र॥ केले आहेत. ते पावले न पावले तें लिहिणें.

दाहांपैकीं कमी असल्यास भरती करून ठेवणें. कलम १.

घोडयाचा पोरगा होता तो पळून गेला, त्यास दुसरा पाठवावा, म्हणोन लिहिलें. त्याजवरून हुजुरून माहार पोरगा पाठविला असे.

माहादेवभट ठेविला होता तो घरीं गेला, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास, त्याचे ऐवजीं दुसरा ब्राह्मण तुह्मीं ठेवणें. कलम १.

कल्याणास आरसे वगैरे जिनस आहे, तो यादीप्र॥ मुंबई नेऊन फरोख्त करावया-विसीं लक्ष्मण बापूजी कारकून ठेविला आहे. तो मुंबईस जिन्नस घेऊन येईल. त्यास, तुह्मीं व त्रिंबक पांडुरंग व भास्कर भिमाजी व कारकून मिळोन यादीप्रमाणें जिन्नस फरोख्त करणें.

त्रिंबक पांडुरंग व भास्कर भिमाजी व तुह्मी तेथें आहां. त्यास, खासा स्वारी इकडे आल्यावर जनराल इकडील काय मजकूर बोलत असतात व विलायतेकडील व बं-गाला व मद्राज सुरत येथील नवल विशेष वर्तमान आढळेल तें लेहून तुह्मीं

येकूण कलमें साहा. छ २३ जिलकादे. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ २५ जिलकाद,
संध्याकाल.

श्री.

लेखांक २०१.

१७०० मार्गशीर्ष वद्य १०.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्ष-निधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजश्री सदाासिव धोंडदेव यांसि —

सु॥ तिसा सबैन मया व अलफ. सर-कारांत तावदानें पाठविणें त्याचा येत येणें-प्रमाणें.

५ पहिलीं पांच त्यांची उंची दीड हात चार बोटें व रुंदी एक हात बारा बोटें. याप्रमाणें.

५

२ सेवटचीं दोन. त्यांची उंची दीड हात च्यार बोटें व रुंदी येक हात बारा बोटें. याप्रमाणें.

२

५ मधलीं पांच. त्यांची उंची पावणे दोन हात व रुंदी येक हात अडीच बोटें. याप्रमाणें.

५

१२

एकूण बारा तावदानें सदरहु लिहिल्याप्रमाणें चौकशीनें चांगली किफायतवार अशीं

पाहून, खरेदी करून, लौकर हजूर पाठवून देणें.जाणिजे.छ२३जिलकाद.तावद्दानें चांगलीं साफ, ज्यांत मंद दिसत असेल तीं न घेणें. साफ असतील तीं घेणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

पो छ २४ जिलकाद.

श्री.

लेखांक २०२.

१७०० मार्गशीर्ष वद्य १०.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहू नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तुह्मांस मुंबईत अनुष्ठानाच्चे ब्राह्मण आहेत, सबब बंदोबस्तास प्यादे आसामी दाहाची नेमणूक करून दिल्ही ते पुरत नाहीं ह्मणोन विनंतिपत्र पाठविलें. त्यास, त्याशिवाय ज्याजती प्यादे असामी चार करार करून दिल्हे असत. तर पेशजी प्यादे यांची नेमणूक रोजमऱ्याची करून दिल्ही आहे त्याप्रों यांसही रोजमरा करून कामकाज घेऊन रोजमरा देत जाणें. जाणिजे. छ २३ जिलकाद. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ २५ जिलकाद.
संध्याकाळ.

बार.

श्री.

लेखांक २०३.

१७०० मार्गशीर्ष वद्य १२.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार.सुहुरसन तिसा सबैन मया व अलफ. तो बेलापूरपैकीं ऐवज तुम्हांकडे जमा आहे. त्यापैकीं त॥ विसाजी जयराम व गोविंद पुतळाजी यांजकडे खरेदी जिनसाबद्दल रुपये ५०० पांचसें तुम्हाकडोन देविले असते तरी सदरहू रुपये मशारनिलेचे पदरीं घालून कुबज घेणें. जाणिजे. छ २५ जिलकाद आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ ३० जिलकाद सन तिसा सायंकाल पौष शु॥ २.

बार.

श्री.

लेखांक २०४.

१७०० मार्गशीर्ष वद्य १३.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहू नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव व त्रिंबक पांडुरंग व भास्कर भिमाजी यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. कल्याणांतील जफ्तीपैकीं आरसे व भांडीं तांब्याचीं वगैरे जिन्नस यादीव॥ आहे तो मुंबईस नेऊन फरोख्त करावयाविसीं लक्ष्मण बापूजी कारकून कल्याणास ठेविला आहे व हालीं संताजी कोंडचा खिजमतगार हुजुरून पाठ-

विला आहे त्यास हे जिन्नस कल्याणांतून घेऊन मुंबईस येतील. त्यास, तुह्मीं व हे मिळोन जिन्नस फरोख्त करणें. जर किंमतीस फारच अजमासें तोटा येऊं लगल्यास दास्तान करून ठेवणें. जाणिजे. छ २६ जिलकाद. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ ४ जिल्हेज पौष शु॥ ५.

श्री.

लेखांक २०५.

१७०० पौष शुद्ध २.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपाति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. बद्दल देणें त॥ विसाजी जयराम व गोविंद पुतळाजी व माहादाजी विश्वनाथ यांजकडे खरेदी जिनसाबद्दल रुपये २९३७॥ दोन हजार नवसे साडेसततीस रुपये तुम्हांकडे तालुके बेलापूर नि॥ शंकर भिकाजी कामत कमाविसदार याजकडून दाहा हजार रुपयांचा भरणा करविला आहे. त्यापैकीं सदरहू रुपये देविले असेत. पावते करून कबजा घेणें. त्रिवर्ग जिन्नस तुमचे गुजारतीनें खरेदी करितील. तरी निरखाची चवकशी करून, जिन्नस खरेदी करून, सत्वर रवाना करणें. जाणिजे. छ ३० जिलकाद. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ ५ जिल्हेज.
पौष शुद्ध ७.

बार.

श्री.

लेखांक २०६.

१७०० पौष शुद्ध ५.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसीः—

रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. बंगला व सोफ्याचे वगैरे कारखाने याचा हिसेब तुम्हांकडे पाठविला असे. त्यास, कामाची रुजवात पाहोन, हिसेबाची चौकशी करून फिरून हिशेब सरकारांत पाठवून देणें. जाणिजे. छ ४ जिल्हेज. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो॥ छ १० जिल्हेज.
पौष शु॥ १०.

श्री.

लेखांक २०७.

१७०० पौष शुद्ध ११.

यादी खरेदी जिन्नस, मु॥ मुंबई, स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ तिसा सबैन मया व अलफ.

रुपये.

८०५॥= हरभरे खंडी ६४। ए॥
६७८८= भावनगरी ५४।
दर १२॥
१२७॥ जंबूसरी १० दर१२॥॥
३६३॥ बाजरी ३॥.॥ सवाबत्तीस खंडी
अर्धा फरा.
२११॥॥= जुनी दर खंडीस
१०॥ मोठें खंडी
२०८१॥.

१५१॥– नवी बाजरी खंडी १२८१ प्रों दर खंडीस १२॥.

१७७॥ डाळ तुरीची १०
९० प्रों खंडी ५ दर १८
८७॥ प्रों ५ दर १७॥

३२॥ उडीद खंडी २ दर १६.
१३९। मूग १०।.॥८॥ दर १३॥.

२६॥=॥ हमाली, गोण्या गलबतावर चढवणावळी व दलाली.
१५॥–॥ हमाली.
११८= दलाली.

६८॥। कागद.
४९ खरें भाडें गलबत ५ शिवाय ५४
४१॥। बट्टा शेंकडा २॥ प्रों.
४४८ ता॥ माहादाजी विश्वनाथ.

रु.
४४० भरणा.
८ माहादाजीपंत.

२१५२॥–॥

एकवीसशें बावन रुपयांची याद खरेदीस कारकून आले त्यांजबरोबर लिहून दिल्ही. छ १० जिल्हेज, पौष शु॥ ११.

श्री.

लेखांक २०८.

१७०० पौष शुद्ध १२.

(श्रीसांबः०

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः–

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. महादेवभट करमरकर यास बरें वाटत नव्हतें; समब घरीं गेले होते. त्यास, हालीं बरे होऊन मुंबईस गेले आहेत ह्मणोन बालाजी विश्वनाथ यांणीं हुजुर विनंति केली कीं, त्यास पहिल्याप्रमाणें देवपूजा व अनुष्ठान सांगावयाची आज्ञा व्हावी. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी पहिल्याप्रों! देवपूजा व अनुष्ठान महादेवभट यांस सांगणें. जाणिजे. छ १० जिल्हेज. आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक २०९.

१७०० पौष वद्य १४.

(श्रीसांबः०

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपती हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः–

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. अनुष्ठानाचे ब्राह्मण तेथें आहेत. त्यास आजपरियंत अनुष्ठान जाहलें असेल त्याची दक्षणा ब्राह्मणास देऊन निरोप देणें. देवाचे पुजेचे दोन ब्राह्मण आहेत. त्यांस मात्र पूजा करावयास ठेवणें. जाणिजे. छ २७ जिल्हेज. आज्ञा प्रमाण. देवाचे पूजेस राजश्री मोरेश्वरभट करमरकर व महादेवभट करमरकर आहेत, त्यांसच आतां पूजा करावयास ठेवणें. छ मजकूर. मोरेश्वरभट व महादेवभट हे न राहात,

तरी यांचे ऐवजीं दुसरे चांगले ब्राह्मण पाहून ठेवणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

बार.

पै॥ छ ९ मोहरम
सन तिसा सबैन.

श्री.

लेखांक २१०.

१७०० पैप.

यादी मुकामीं मुंबईस ब्राह्मण ठेविले त्याजमुळें स्वारी राजश्री पंतप्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. अजमास रुपये

९९० ब्राह्मण अ॥ ३ ए॥
७७४ दक्षणा.
१५६ भोजनखर्च ई॥
६० दूध, साखर वगैरे

९९०

८ आचारी अ॥ १ ए॥
२० पाणके अ॥ ४ दर ५
१८ कामाठी अ॥ १३ ए॥

०३६

नेमणूक——————————रुपये

७७४ दक्षणा ब्राह्मणांस एकमाहा
५२४ नेहमीं दरमहा रुपये २६५

दुमाही

२० शागिर्द अ॥ ३ ए॥
४ त्रिंबक मल्हार देव.
४ कृष्णाजी देव.
२ गुंडो सयाजी.

१०

दुमाही.

१३१८

पों तसलमातीस ७०० रुपये. बाकी खालीं ६१८ रुपये.

श्री.

लेखांक २१०(अ).

१७०० पौष.

यादी मुंबई येथील अनुष्ठानाची वगैरे नेमणूक दरमहा. सु॥ तिसा सबैन रुपये.

१२ भोजनखर्च आसामी.
४ सदाशिव धोंडदेव.
४ पाणक्या.
४ देवाचा नैवेद्य.

१२

१५ बागास कामगार आसामी ५ दर आसामीस रुपये ३ प्रमाणें.
२० चौकीदार आसामी ५ दर आसामीस रुपये ४ प्रमाणें.
४० कारकून आसामी २.
२५ त्रिंबक पांडुरंग.
१५ सदाशिव धोंडदेव.

४०

५ देवाचे पूजेस ब्राह्मण. त्यास दक्षणा रुपये.
४ पाणक्या ब्राह्मण यास दरमहा रोजमुरा रुपये.

९६

येकूण शहाण्णव रुपये दरमहा खर्चास नेमणूक येणेंप्रमाणें करार.

श्री.

लेखांक २११.

१७०० पौष.

यादी शागिर्द सु॥ तिसा सबैन मया व अलफ. यांस

रोजमुरा येक माही.....रुपये

६ सदासिव व केशव आगाशा
५ कदीम नेमणूक.
१ जास्ती छ ४ जिलकाद.
५ मोरो बल्लाळ दामला.
४ कदीम नेमणूक.
१ जास्ती छ ४ जिल्हकाद.

—

११
अकरा रुपये दरमाहा करार.

श्री. नमन.

लेखांक २१२.

१७०० पौष.

यादी खरेदी जिन्नस. सु॥ तिसा सबैन.

९०० बाजरी बैलसर, दर बैलीं कैली मापें ८२॥ प्रों १८॥॥.

११२५ हरबरे बैलसर १५०, दर बेलीं ८२॥ प्रों १८॥॥ खंडी.

१८७॥ मूग बैलसर २५, दर बैलीं ८२॥ प्रों खंडी ३८२। दर ८।१ प्रों.

१५० उडीद बैलसर, २५ दर ८२॥ प्रों खंडी ३८२॥ दर ८।२ प्रों.

३०० डाळ बैलसर ४३, दर ८२॥ प्रों खंडी ६। दर ८।१ प्रों.

७५ कागद केरे.
५० खासे कीर्दीचे.
२५ खर्चीं.
७५

२०० जकात रुपये.

२९३७॥

दोन हजार नवशें साडेसततीस रुपयांची सदासिव धोंडदेव याजवर वरात देणें.

पो छ ५ जिल्हेज, पौष शु॥ ७, लष्करांतून याद आली ते.

श्री.

लेखांक २१३.

१७०० माघ शुद्ध ८.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यांसि:—

सु॥ तिसा सबैन मया व अलफ. अनुष्ठानाचे ब्राह्मणांस दक्षणा देऊन निरोप देऊं, म्हणोन पेशजी तुम्हांस आज्ञा केली आहे. त्यास, हालीं तेथील दरमाहाचे नेमणुकेचे खर्चाची याद अलाहिदा पाठविली आहे, त्याप्रों खर्च करीत जाणें. जाजती खर्च असेल तो तोडसरे, तुम्हीं व त्रिंबक पांडुरंग तेथें राहाणें. भास्कर भिमाजी यास हुजूर पाठवून देणें. बेलापूर व कल्याण व पणवेल येथें सरकाराच्या तोफा व बंदुका व दारूगोळा वगैरे जिन्नस असेल तो तुम्हांकडे पोंचविणें म्हणोन ठाणेदारास ताकीदपत्रें पाठविलीं आहेत. व याच कामाकरितां आबाजी साबाजी कारकून पाठविले आहेत. हे सरंजाम घेऊन तुम्हाजवळ येतील त्यापैकीं तोफा वगैरे जो जिन्नस फरोख्त होईल तो करणें. फरोख्त न होय तो माफजतीनें सरकारच्या वाड्यांत नेऊन ठेवणें. जाणिजे. छ ६ मोहरम. आज्ञा प्रमाण. तुह्मी व त्रिंबक पांडुरंग मिळोन जनराल कोशालासी बोलत जाणें. खर्च तोडणें जरूर. खर्चाची यादी पाठविली त्याप्रमाणें करणें. वाड्याची व देवाची व वरलचे बागाची तितक्यांतच निगेवानी करणें. जातीनें मेहनत करीत जाणें. विश्वनाथ नारायण आपले इतबारियांत आहेत. ते व तुम्हीं उभयतां मिळोन काम तेथील चालवणें. वरकड आबाजी साबाजी व ब्रह्मणजी पारसी याचे जबानीवरून कळेल. (लेखनावधि:)

श्री.

लेखांक २१४.

१७०० माघ वद्य ७.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहुनरपति हर्षनीधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री चिमणाजी गोपाळ व सदाशिव धोंडदेव व त्रिंबक पांडुरंग व भास्कर भिमाजी यांसिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. सरकारचे मामलेदार कोकणांत होते ते मुंबईस गेले. त्यास, अलाहिदा हिशेब तुम्हास समजावणें ह्मणोन ताकीदपत्रें पाठविलीं आहेत. हीं त्यास देऊन, वाजबीच्या रीतीनें त्याचा हिसेब पाहून; लौकर त्यास हुजूर रवाना करणें. जाणिजे. छ १९ मोहरम.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक २१५.

१७०० माघ वद्य ७.

(श्रीसांबः

सपुत्रो विजयते राजा शाहु नरपति हर्षनिधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री बाबुराव मोरेश्वर यासिः—

रघुनाथ बाजीराव प्रधान. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तुह्मी मुंबईस गेला. त्यास, तेथें चिमणाजी गोपाल व सदाशिव धोंडदेव व त्रिंबक पांडुरंग व भास्कर भिकाजी तेथ आहेत. त्यास कळवें—परसीकचा हिसेब समजावणें म्हणजे चौकशीनें पाहातील मग तो हिसेब घेऊन हुजूर येणें. जाणिजे. छ १९ मोहरम.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक २१६.

१७०० फाल्गुन वद्य ३०.

(श्रीराजा शाहु नरपती हर्षनीधान रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव नातू यासिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. मीरजाखान याजकडे तोफखान्यापैकीं शिलकी जिन्नस तीनशें सवासत्याणव रुपये तीन आणे याचा ठेविला आहे. तो फोख्त करावयास भवानी शंकर—राम यास आज्ञा करून पा॥ आहेत. त्यास, तुम्हीं व मशारनिले मिळोन जिन्नस फोख्त करून, त्यापैकीं दोनसें सवाबेंचाळीस रुपये दोन आणे भवानी शंकर यास देऊन, कबज घेणें. बाकी येकसे पंच्याहातर रुपये येक आणा तुम्हाकडील हिसेबी जमा करणें. जाणिजे छ २९ सफर. आज्ञा प्रमाण.

(लेखनसीमा.)

पो छ २८ रबिलावल सन तिसा सबैन.

बार.

श्री.

लेखांक २१७.

१७०१ चैत्र शुद्ध १३.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यासिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तुह्मांस चिरंजीव राजश्री माधवराव नारायण याचा कौल व राजश्री लक्ष्मण आपाजी याणीं आपलें खासगत पत्र देऊन तुह्माकडे पाठविलें आहे, ह्मणोन ऐकतों. त्यास तुमचा विचार जावयाचा आहे किंवा रहावयाचा आहे, हें समजलें पाहिजे. तरी लेहून पाठविणें. तर

तुमच्या चित्तांत जावयाचेंच असल्यास अगाधरे विनंति लिहिणें. म्हणजे येथून कारकून पाठविला जाईल. त्याच्या हवालीं तेथील बंदोबस्त करून, मग तुम्हास जावयाचें असल्यास जाणें. जाणिजे. छ ११ रबिलावल. हें वर्तमान ऐकलें. परंतु खरें कीं खोटें, हें समजत नाहीं. तथापि, तुम्हाविसीं हुजूरची खातरजमाच आहे कीं, हुजूरचा निरोप घेतल्या शिवाय जाणार नाहीं. परस्परें ऐकलें, सबब लिहिलें असे. छ मजकूर.

आज्ञा प्रमाण.

(लेखनावधिः)

पो. छ २८ रबिलावल, सन तिसा सबैन.

श्री.

लेखांक २१८.

१७०१ चैत्र वद्य ८.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. कल्याणच्या ठाण्यांत घोडीं पाडाव केलीं, त्यांपैकीं तीन घोडीं सुभानराव मोरे याजवळ साष्टीस आहेत. त्यास फत्तेसिंग यांजवळ कवायती लोक आहेत. ते खर्चाकरितां गवगवा करितात, ह्मणोन त्यानें हुजूर अर्ज सांगोन पाठविला. त्यावरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी मोरे यांजवळ सरकारची तीन घोडीं आहेत तीं ठाण्यांत अवघे मिळोन पाडाव केलीं असल्यास, वाजबी मनास आणोन, मोरे याजवळून घेऊन, तुम्हीं व फत्तेसिंग मिळोन फरोख्त करून, याचा ऐवज होईल तो लोकांस वांटणीप्रमाणें देणें. फत्तेसिंगास सुरतेच्या मार्गें हुजूर येणें म्हणोन आज्ञा केली आहे. त्याजबरोबर त्या लोकांसहि र॥ करणें जाणिजे. छ ११ रबिलावल.

(लेखनावधिः)

पो॥ छ २५ रबिलावल.

सन तिसा.

श्री.

लेखांक २१९.

१७०१ चैत्र वद्य १३.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव नातू यासिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ सन तिसा सबैन मया व अलफ. मद्दल देणें खर्चास रुपये.

१०० सैद आबदुला मुंबईत आहे त्यास.

१०० सेख महमद.

——

२००

एकूण दोनशें रुपये तुम्हांकडील तसलमातीचे ऐवजीं देविले असेत. पावते करून कबज घेणें. जाणिजे. छ २६ रबिलोवल.

आज्ञा प्रमाण. (लेखनावधिः)

पो. छ २२ रबिलाखर.

सन तिसा सबैन.

बार.

श्री.

लेखांक २२०.

१७०१ वैशाख वद्य ४.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव. सु॥ तिसा सबैन मया व अलफ. तुम्ही चिरंजीवांकडे पुण्यास जाणार ह्मणोन ऐकलें. सबब, तेथें रहावयास हुजुरून बाळाजी विश्वनाथ कारकून पाठविले आहेत. तरी तुमचे तसलमातीस ऐवज आहे, त्य[illegible]

पैकीं नेमणुकीच्या। खर्च जाहाला त्याचा हिसेब यास दाखवून बाकी शिलक राहिला असेल तो ऐवज बाळाजी विश्वनाथ याचे स्वाधीन करून कबज घेणें. व तेथें सरकारचा जिनसाना आहे त्याची मोजदाद यांस देऊन पावती घेणें. सरकारचा वाडा व बंगला व बाग व विहिरी तेथें आहेत त्यांची देखरेख तुम्ही करीत होता त्याप्रमाणें तुम्हीं यास समजाऊन देणें. तेथील देवांचे वगैरे खर्चाचे नेमणुकीची याद तुह्माजवळ असेल ती मशारनिलेचे स्वाधीन करणें. जाणिजे. छ १७ रबिलाखर.

आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ ५ जमादिलाखर.
सन समानीन.

श्री.

लेखांक २२१.

१७०१ अधिक श्रावण शुद्ध ६.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ समानीन मया व अलफ. तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. आज्ञापत्र सादर जाहाल्यावरून बाळाजी विश्वनाथ याचे जिनसाची मोजदाद दिली. माझा बारभाईकडे जावयाचा मजकूर नसतां कोणी गैरवाका समजाविला आहे, हे नकळे, ह्मणोन तुह्मीं कितेक आपले निष्ठेचे अर्थ लिहिले ते कळले. व भास्कर भिमाजी याणेंहि विदित केलें. ऐशास, तुह्मांवर सरकारची बेमर्जी होऊन तुमच्या जागा दुसरा कारकून पाठविला, असा कांहीं अर्थ नाहीं. तुह्मी पुण्यास जाणार, हे बातमी दोन तीन जागांहून हुजूर कळली. तेव्हां तेथें देखरेखीस कारकून तरी असावा, सबब बाळाजी विश्वनाथ रवाना केला. मागाहून तुमचींही पत्रें आलीं. तुम्ही येकनिष्ठ, हे तुम्हांविषयीं खातरजमा दिसोन आली. त्यास, तुम्हांवर सरकारची कृपाच समजणें. तुह्मीं पहिल्याप्रमाणेंच तेथील कामकाज करीत जाणें. बाळाजी विश्वनाथ याजकडे मोजदाद जिनसांची दिल्ही असेल ते फिरोन माघारी घेणें. येविषयीं त्यासही ताकीदपत्र पाठविलें आहे. तो हुजूर येईल. जाणिजे. छ ५ रजब. आज्ञाप्रमाण. पो॥ छ १४ साबान, सन समानीन, श्रावण शु॥ १४.

(लेखनावधिः)

श्री.

लेखांक २२२.

१७०१ श्रावण शुद्ध ६.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. सरकारांत जिनसाचें प्रयोजन आहे. तरी ज्यादारोप व मोती वाघमारा खिजमतगार पाठविला आहे, याजबराबर येणेंप्रमाणें र॥ करणें.

पालकीस तावदानें सुमार बारा पाहिजेत. त्यांचे मेजपेषजी तुह्माकडे पाठविलें आहे. त्याप्रमाणें बारा तावदानें पाठवून देणें. खरीदी करून र॥ करणें. १

इंग्रजी कमचा दाहा दाहा खरीदी करून पाठवणें. १

बार्क नवा वजन पके ८८२ दोन शेर खरीदी करून र॥ करणें. १

एकूण तीन कलमें लिहिलीं आहेत, त्याप्रमाणें करणें. जाणिजे. छ ४ साबान.

खरेदीस ऐवज लागेल, तो सरकारचे ऐवजापैकीं खर्च करणें. छ मजकूर. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ १८ साबान, सन समानीन, श्रावण वद्य सप्तमी.

श्री.

लेखांक २२३.

१७०१ श्रावण शुद्ध ८.

(श्रीमत् रघुनाथराव.)

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसीः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ.

चिमणाजी गोपाल याजकडे पणवेलीपैकीं साडेचारशें रुपये सिलक आहे, ते पेशजी लक्ष्मण रणसोड याजकडे देण्याविषयीं पत्रें त्यास सादर जाहालींच आहेत. त्याजवरून मशारनिलेनीं लक्ष्मण रणसोड याच्या हवालीं ऐवज केला असल्यास उत्तम. नाहीं तरी तुह्मीं त्याजकडून ऐवज मागोन घेणें. दिक्कत करूं लागल्यास जनराल यास पत्र दिलें आहे. हें त्यांस देऊन त्यांजकडून निक्षूण ताकीद करवून ऐवज आपले पदरीं घेणें. ऐवज दिक्कत न करतां दिल्यास जनराल यास पत्र द्यावयाचें प्रयोजन नाहीं. कलम १.

तुह्मांकडे बेलापूर वगैरे माहालचा ऐवज जमा करविला होता. त्यास, कोणे महालचा काय ऐवज तुम्हांकडे जमा काय जाहला आहे व त्यांतून खर्च काय जाहला आहे, त्याचा झाडा तपसीलवार हजूर लिहून पाठवणें. दाहों हजारपर्यंत तुह्माजवळ शिल्लक असल्यास आपलेजवळ ठेवणें. दाहा हजारावर असतील ते हजूर पाठवून देणें. कलम १.

एकूण कलमें दोन लिहिलीं असेत. त्याप्रों करणें. जाणिजे. छ ६ साबान. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ १८ साबान, सन समानीन श्रावण व॥ ४.

श्री.

लेखांक २२४.

१७०१ श्रावण शुद्ध १४.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. त्रिंबक पांडुरंग यांस पंचवीस रुपये दरमहाची नेमणूक करून सनद सादर जाहली आहे. त्यास, हालीं हें पत्र नदर केलें आहे. तरी त्रिंबक पांडुरंग यास रुपये न देणें. दरमहा बंद करणें. तुह्मांकडे खर्चाची नेमणुकीची याद पहिली सादर केली आहे त्याची नकल हजूर पाठवून देणें. जाणिजे. छ १३ रमजान. आजतागाईत तुह्मांकडे जमा काय व खर्च काय जाहाला आहे व बाकी सिलक काय राहिली ते तपशीलवार लेहून पाठविणें. छ मजकूर. (लेखनावधिः)

पो छ ४ सवाल, आश्विन शु॥ ६.

श्री.

लेखांक २२५.

१७०१ श्रावण वद्य ४.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. भागे व बाके

तांब्याचे व दुबारी गोळे वोतावयाचा फर्मा पंचरसी विश्वनाथ नारायण याचे येथें आहे तो सरंजाम तोफा वोतावयाचा जो असेल तो जहाजावर घालून हुजूर रा॥ करणें. जाणिजे. छ १८ साबान. आज्ञाप्रमाण. या कामाकरितां बाळू कुमकर पाठविला आहे, याजबराबर रा॥ करणें. छ मजकूर.

(लेखनावधिः)

पो॥ छ ३ रमजान,
सन समानीन, भाद्रपद शुद्ध ५.

श्री.

लेखांक २२६.

१७०१ श्रावण वद्य ५.

पु॥ राजश्री सदाशिव धोंडदेव यासिः—

सु॥ समानीन मया व अलफ. दोन शेर बार्क नवा चांगला औषधास पाठऊन देणें म्हणोन पेशजी तुह्मांस लिहिलें होतें. त्यास आणखीही त्याशिवाय येक शेर मध्यम ऐकूण तीन शेर पाठवून देणें. कदाचित् दोन शेर चांगला न मिळाल्यास तीन शेरही मध्यम प्रतीचा पाठवून देणें. जाणिजे. छ १९ साबान. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो॥ छ ३ रमजान,
सन समानीन, भाद्रपद शु॥ ५

श्री.

लेखांक २२७.

१७०१ श्रावण वद्य १०.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव व विश्वनाथ नारायेण यांसिः—

रघुनाथ बाजीराव. सु॥ समानीन मया व अलफ. केशवजी कासार वोतारी हुजुरून आठा रोजाचा निरोप घेऊन आपले घरीं मुंबईस आला आहे व यांजबराबर सरकारांतून बाळू शेटच्या खिजमतगार दिल्हा आहे. त्यास हा आठ रोज घरीं राहील. उपरांत हुजूर येऊं लागेल ते समयी तोफा वोतावयाची हातेरें वाकें व भाते व दुबारी गोळे वोतावयाचा पंचरसी फर्मा वगैरे सरंजाम या दोघांबरोबर देऊन हुजूर रा॥ करणें. जर केशवजी आठा दिवसांनंतर निघावयास हैगई करूं लागल्यास, भवानजी विसाजी यांस पत्र दिल्हें आहे तें त्यांस देऊन जनरल यांजकडून ताकीद करून केशवजीस पाठवून देणें. जाणिजे.

छ २३ साबान आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो॥ छ ५ रमजान सन समानीन.

श्री.

लेखांक २२८.

१७०१ श्रावण वद्य १२.

पु॥ रावजी सदाशिव धोंडदेव यांसिः—

सु॥ समानीन मया व अलफ. कवायती लोक व बंदुका येथें आहेत, त्यांस हुजूर रवाना करावयाची जसी आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करीन, म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यांस, बंदुका व कवायती माणूस आहे तें हजूर पाठऊन देणें. लोकांस दर असामीस दोन तीन रुपये खर्चास देणें. जाणिजे. छ २५ साबान. आज्ञाप्रमाण. लोकांस जामीन ठाव ठिकाण मिळाले तरी उपयोगी. बंदुखा घेऊन पटऊन गेले तरी बंदुखा व रुपये नाहक बुडतील ऐसें न करणें.

(लेखनावधिः)

पो॥ छ १४ रमजान, सन समानीन, भाद्रपद वद्य २.

श्री.

लेखांक २२९.

१७०१ श्रावण वद्य १२.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यासिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ तुम्ही विनंति पत्रें दोन पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं.

बाळाजी विश्वनाथ यांची मोजदाद जिनसाची दिली होती, ते माघारे घेतली. त्यांणीं नेमणुकेशिवाय पाउणशें रुपये खर्च केला आहे. त्याचा ते फडशा हजूर करणार म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास, तुम्हींहि तगादा न करणें. बाळाजी विश्वनाथ हजूर आल्यावर समजोन फडशा करोन घेतला जाईल. कलम १.

व्यंकटराव पिलाजीचा व रतनजी पारसी याचा मजकूर लिहिला तो कळला. पुढें त्याजकडे पत्रें पाठवावयाचीं असेत. परंतु कोणी ममतेचा जाऊं लागेल त्याजबराबर पाठऊं. सबब जहाजाच्या शोधांत हमेषा राहावें. येकादो माणसांस नेहमीं तेंच काम पाहिजे. बारभाईंनीं वकील कलकत्यास रवाना केल्याचा वगैरे बातमीचा मजकूर लिहिला. तो कळला.

पकी बातमी लिहिली येईल तितकीच लिहित जाणें. बाजारी बातमी न लिहिणें. त्यांतहि जरूर असल्यास लिहिणें. परंतु ही बाजारी बातमी, असें लिहीत जाणें. कलम १.

तावदानाचा मजकूर लिहिलांत, कीं पहिल्या खेताची मिळत नाहीं. त्यास, थोडीसी जाजती असली तरी कार्यास येईल. त्याच मेजाची कसी मिळतील ?

जाजतीच मेजाची घेऊन पाठवणें.

कल्याणापैकीं कांहीं जिनस विकावयाची होता तो आतां खासा स्वारी सुर्तेस आली. सबब फरोक्त करीत नाहीं म्हणोन लि॥. त्यास कल्याणपैकीं आरसे आहेत त्यांपैकीं ज्यांची कलई उडाली असेल व पालखीस लागू होत असें असतील ते पालखीकरितां हजूर पाठविणें.

म्हणजे दुसरे पाहिजेत तितकेच खरिदी करणें. बाकी ज्या आरशास कलई असेल ते विकणें व दुसराहि कल्याणपैकीं जिनस असेल तो फरोख्त करणें. ज्यांत किफायत नजरेस येईल तेंच तुम्ही करणें. तुमची नजरही बरी आहे.

मिर्जा तेथें आहेत. त्यास तुम्हीं त्याजकडे सहजांत जाऊन त्यास पुसणें कीं, श्रीमंत सुर्तेस आले आहेत त्यास तुमचे चित्तांत जावयाचें आहे किंवा नाहीं. हा त्याचा भाव काढून हजूर लेहून पाठवणें. सरकारतर्फेनें हा त्यासी जाबसाल न बोलणें. तुम्हीं होऊन आपले तर्फेनें सहजांत त्यासी बोलोन, त्याचा शोध घेऊन लिहिणें. त्यासी आपले तर्फेनेंच बोलणें. कलम १

येकूण कलमें साहा लि॥ आहेत. त्या प्रें॥ करणें. जाणिजे. छ २५ साबान आज्ञाप्रमाण.

(लेखनाबधिः)

पै॥ छ १४ रमजान, सन समानीन, भाद्रपद व॥ २.

श्री.

लेखांक २३०.

१७०१ भाद्रपद शुद्ध १०.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव व विश्वनाथ नारायण व लक्ष्मण रणसोड यांसिः—

रघुनाथ बाजीराव. सु॥ समानीन मया व अलफ. कवाइती लोक यांस आंगरख्याबद्दल आठशें आंगरखे होत ऐसा पटुकल

बखारींत चवकसीनें खरेदी करून, आपाजी आइतोले पाठविले आहेत, याजपाशीं देणें. जाणिजे. छ ९. रमजान. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पे॥ छ १'१ रमजान,
सन समानीन, भाद्रपद वद्य २
बार.

श्री.

लेखांक २३१.

१७०१ भाद्रपद शुद्ध १०.

राजश्री सदाशिव धाँडदेव यांसिः—

सु॥ समानीन मया व अलफ. नरलपेकीं कवायती गारदी याचे आंगरखे बालाजी सदाशिव याणीं तुमच्या हवालीं केले आहेत ते व आणखी तुह्मांजवळ जे आले असतील ते झाडून हुजूर पाठवणें. जाणिजे. छ ९ रमजान. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ १४ रमजान, सन समानीन भाद्रपद वद्य २.

श्री.

लेखांक २३२.

१७०२ भाद्रपद वद्य ४.

राजश्री भगवंतराव कदम यासिः—

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री स्नेहांकित रघुनाथ बाजीराव आशिर्वाद. सु॥ इहिदे समानीन मया व अलफ. तुह्मी विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. लिहिला मजकूर सविस्तर निवेदन जाहाला. ऐसियास तुमची निष्ठा आहे तसी कृपाहि हुजूरची आहे. त्यास, तुमचा कारकून हजूर आल्यानंतरी आज्ञा करणें ती केली जाईल. जाणिजे. छ १७ रमजान.

श्री.

लेखांक २३३.

१७०१ भाद्रपद वद्य १२.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यासिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. बार्के पाठविला तो पावला. त्यांत सदासिव वैद्याबाबद आहे तो किमतीस बरा पडला आहे. दारुस्तर टेणट याजकडील पाठविला, त्यांस रुपये अडीचपट आधिक पडून फार उंचहि नाहीं. तरी हाली गोविंदा जांबूळकर खिजमतमार पाठविला आहे. याजबराबर दहा शेर बार्क जितका उंच मिळेल तितका सदासिव वैद्य याचे गुजारतीनें खरीदी करून हुजूर पाठविणें. जाणिजे. छ २५ रमजान. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो ४ सवाल आश्विन शु॥ ६.

श्री.

लेखांक २३४.

१७०१ आश्विन वद्य ७.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यासिः— रघुनाथ बाजीराव नमस्कार सु॥ समानीन मया व अलफ. सरकारांत दारू करणार कारीगर यांचा दरकार आहे, त्यांस तुह्मी जनराल यांस हटकून देान कारीगर त्याजवळ मागणें. शेवटीं त्याणीं येकच दिल्यास त्यास हजूर पाठविणें. जर जनरल यांणीं द्यावयास आनमान केल्यास तेथें कारीगर असतील त्यांचा शोध करून, त्यास फोडून तेथें त्याचा दरमहा असेल त्याहून जाजती च्यार पांच रुपये सरकारातून केले जातील हा लोभ दाखवून, आणि तेथें घरीं जातों म्हणोन निरोप द्यावा अथवा सुरतेस जातों असा निरोप घेऊन हुजूर तुम्हीं त्यास पाठवून देणें. पेशजी

तुम्हास पालखीच्या तावदानाविसी पांच च्यार वेळां लिहिलेंच आहे. त्याप्रों तावदानें पालखीच्या मेजाचीं हुजूर पाठवणें. जाणिजे. छ २० सवाल आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पौ छ १ जिलकाद, सन समानीन.

श्री.

लेखांक २३५.

१७०१ आश्विन वद्य १०.

राजमान्य राजश्री सदासिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. बेहराम पारसी याचीं मुलेंमाणसें यांचे खर्चाची नेमणूक दरमहा रुपये ५ पांच करार करून पेशजी सनद सादर जाहली आहे. त्यास, तुह्मांकडून येक रोजमरा मात्र पावला, बाकी पावलें नाहीं. सबब, हुजूर ई॥ छ १ जिलकाद सन तिसा ता॥ सवाल अखेर सन मजकूर पावेतों हिसेब रुपये ५५. पैकीं आदा हुजूर रुपये ३० तीस व तुह्मांकडून रुपये ५ ऐकूण पस्तीस रुपये आदा होऊन, बाकी रुपये २० वीस तुह्मांकडून देविले असेत तर पेशजी सनद दिल्ही आहे ती पाहून सनदेंत ज्या महिन्यापासून रोजमरा देत जाणें ह्मणोन लिहिलें असेल तें हस्तकबिल धरून, हिशेब होईल त्यांत पस्तीस रुपये वजा देऊन, बाकी वीस रुपये देविले आहेत. यांत जे निघतील ते देणें. पुढें सदरहूप्रमाणें पांच रुपये दरमहा देत जाणें. जाणिजे. छ २३ सवाल. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो छ ३ जिलकाद सन समानीन.

बार.

श्री.

लेखांक २३६.

१७०१ कार्तिक शुद्ध ८.

राजमान्य राजश्री सदाशिव धोंडदेव यांसिः—

रघुनाथ बाजीराव नमस्कार. सु॥ समानीन मया व अलफ. तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. र॥ व्यंकटराव पिलाजी यांजकडे पत्रें पाठवावयाचीं अस-ल्यास अगोधर पाठवावी, ह्मणोन वगैरे म-जकूर लि॥ ते कळले. त्यास हरजीवनराव व हणमंतराव या उभयतां कारकुनांस पत्रें लेहून पाठविलीं आहेत. जिदा बंदर ये-थील हकमांसहि खलिता पाठविला आहे. त्यास, ज्याहाज जाऊं लागलें ह्मणजे हीं पत्रें रवाना करणें. आजपर्यंत कारकून बंदर जिदा येथेंच होते. त्यास ज्याहाज सोईचें पाहून जर तें बंदर—मजकुरीं असल्यास तेथें त्यांस पावतें करावें. नाहीं तरी, पुढें विलायतेस गेल्यास तेथें त्यांस जाऊन पोह-चत अशा सोईच्या जहाजांवर रवाना कर-णें. जिदा बंदर येथील हकमांस खलिता आहे तो त्यांस पावता करावयाविसीं जहाजवाल्यांस सांगोन रवाना करणें. तुमचे तीर्थरूपांस आरोग्य जाहलें असल्यास तुह्मीं हजूर येणें. जाणिजे. छ ७ जिलकाद. जनरल गार्डर्ड येथून मुंबईस गेले आहेत, त्यास खलिता पाठविला आहे. हा पोहोंचतां करून उत्तर घेऊन पाठवणें. छ मजकूर. आज्ञाप्रमाण.

(लेखनावधिः)

पो॥ छ १९ जिलकाद

सन समानीन.

श्रीमार्तंडभैरव.

लेखांक २३७.

१६९५ पौष वद्य १३.

राजश्रीयव विराजित राजमान्य राजश्री भावान नाईक राक्षे स्वामीचे सेवेसीं. पो। भगवंतराव शंकर सां। नमस्कार विनंति उपरी राजश्री बाबूराव रामचंद्र यांसि रु॥ ५२०० पांच हजार दोनशें तुम्हांकडून देविले आहेत हे वैशाखअखेर देणें मिती शके १६९५ विजईनाम संवत्छरे पौष वद्य १३ मु० तुंगाभद्रातीर जेष्ठ शुध्द प्रतीपदेपासून रु॥ पुढें राहिले तर दरसद रु॥ ·॥· प्रों॥ व्याज देऊं हें खत लिहिलें सही

हस्ता अक्षर कृष्णाजी सखादेव दि॥ म॥र.

श्री.

लेखांक २३८.

१६९५।१६९६.

हिसेच रंगो सखाजी सिलेदार सु॥ अर्बा सबैन त॥ सन खमस सबैन सालिना तैनात बोली बारमाही नक्की रुो.

३०० खासा अ॥ १
१००० स्वार अ॥ ४ दर २५० प्रों॥

१३०० ५

मुदत कबज इ॥ छ० ५ जिलकाद त॥ छ० १३ रमजान ये॥ माहे १० रोज ८ ये॥ १११०

वजा सूट माहे १ रोज २५ ये॥ रु॥
१७०॥=

बाकी ९३९।=

वजा दर रो॥ रु॥
१९

१५॥= नाणे वटा.
१० दरबारखर्च

२५॥=

२४१।
रु॥
६९८७=
रु॥
२१५॥
बाकी रु॥
४८२॥=

पैकीं वजा दर असामीस रु॥
१० सरदारी खर्च
५ कारकुनी

१५
रु॥
७५
बाकी रु॥
४०७॥=

श्री.

लेखांक २३९.

नकल.

१६९६ आषाढ वद्य ५.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य रे॥ बाळाजी कृष्ण गोसावी यांसिः—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. राजबाग राजश्री चिंतो विठल यांस ईनाम आहे. त्यास बागेच्या बेगमीस व बैल चरावयास मौजे कोथरूड येथील कुरण पेशजीपासून बागाकडे आहे. तें हालीं तुम्हीं जप्त केलें आहे. ऐश्यास बागाचे

बैल सालाबाद चरतात, तेथें चरूं देणें. व बागेचे बैलाचे बेगमीस तीस पसतीस हजार गवत निघतें तें काढीत असतात याप्रों कुरण आहे तें बागाकडे पेशजीप्रों करार केलें असे तरी राजबागाकडे चालवणें. जाणिजे. छ० १८ जमादिलावल. आज्ञा प्रमाण. सिक्का. मोर्तब.

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २४०.

१६९६ आषाढ वद्य १४.

राजश्री बाळाजी विश्वनाथ प्रे॥ मोह गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेरबहादर दंडवत. सु॥ खमस सबैन मया व अलफ. बदल देणें बाबूराव कासी रोजमुरा व अर्जबाबचे येवजी प्रों मजकूर येथील सालमजकूरचे रसदेचे येवजी रो १००० येक हजार देऊन पावलियाची कबज घेणें. हिसेबीं मजुरा असे. आवण अखेर निमे भ॥ अखेर निमे देऊन कबज

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप धुरंधर गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादर

द्यावें. जाणिजे. छ० २७ जमादिलावल.

मोर्तब सुद.

बार.

श्री.

लेखांक २४१.

छ० १५ रोबल

१६९६ वैशाख शुद्ध ४.

विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० २ रावल मु॥ अवंतिकापुर येथास्थीत असे. विशेष. येथील मजकुराचीं कलमें येणेंप्रमाणें.

चिमाजी नारायेण याच्या वाड्यांत रहावयास जागा दिल्ही आहे. कुशाबा हि पहिल्यापासून याच वाड्यांत रहात होते त्या प्रें॥ दुसरी जागा निकालस येथें मिळणार नाहीं. क्षिप्रेचे उदक समीप व देव हि समीप यास्तव सर्वांच्या विच्यारें येथें रहावें असें ठरलें त्याजवरून येथें राहिलों. घोड्याची सोय वाड्यांतच जाली आहे. पालखीस व उंटास मात्र जागा येथें नाहीं. त्याजला दुसरे ठिकाणीं जागा करून दिल्ही आहे. जाग्याची बेगमी जाली आहे. चिंता नाहीं. कलम १.

राजश्री बजाजीपंत नि॥ पाटीलबावा याजकडून हजार रुपये येणें त्याजपों॥ बऱ्हाणपुरचे मुकामीं तिनसे रुपये घेतले व येथें तीनसे येकूण सा शे रुपये घेतले. बाकी च्यार से राहिले. ते हि येका दो रोजांनीं देतों म्हणोन म॥रानिलेनीं मान्य केलें आहे. यासिवाय खर्चास लागल्यास मी देईन. तुम्हीं कोणेहविसीं चिंता न करावी म्हणोन आमची खातरजमा केली आहे. पीरखान हि वरचेवर समाचार घेत असतो त्याणें हि सांगितलें आहे कीं दोन च्यार हजार रुपये तुम्हास लागल्यास राजश्री बाळाराव यांणीं येथें गोपाळपंत कारकून याजवर चीठी दोन हजार रुपयाची दिल्ही त्यास म॥रानिलेस चीठी दिल्ही

त्यांणीं आम्हासी उत्तर केलें कीं दोन हजार रुपये देखिले परंतु नेमून दिल्हा नाहीं तथापि तुमची खर्चाची अडचण तरी से दोन (मे) रुपये देतों तेव्हां आम्ही त्याजला खर्चाची बोढ फार सांगितली मग पांच से रुपयाची चीठी सावकारावर घेतली आहे परंतु येथील चालीच्या सिक्यास व भूपाळ व कुरराचे चालीचा ऐवज त्याणें देवीला. त्यास दर सेकडा पांच सा रुपये बटा पडतो त्याजमुळें गोपाळपंत याजकडे दोन तीन वेळ गेलों यावरोन ऐवज दुमरा नाहीं म्हणतात त्यास मी देईन. तुम्ही दुसरिया जवळ न मागावे. जे समई तुम्हांस पाहिजेत ते समई सांगावे याप्रों सांगितले आहे सारांष उभयताचें लक्ष आपले ठिकाणीं लागलें आहे मार्गीं येतांना हि वारंवार परामर्ष करीतच आले बोलेंपाऱ्हें व घोडीं पागेपैकीं जे समई मागितलीं ते समई देऊन सांभाळून आणिलें. येथें हि कोठें देवधर्मास जाणें तरी घोडीं रथ पाहिजे तरी सांगत जावें. पाठवून देऊं. याप्रों त्यांचे निरोप हि येत असतात. आम्हांस कोठें जाणें परंतु त्याजकडून अनमान कांहीं नाहीं. गवताचे व लांकडें जळाऊ याचें विचारिलें आहे. थोडीबहुत बेगमी करितों म्हणोन बजाजीपंत यांणीं मान्य केलें आहे त्याजपैकीं दोन गाडे लांकडें जळाऊ आज पाठविलीं मागती येक वेळ त्याजकडे जाऊन कांहीं बट्टा कमी जाला तरी उत्तम नाहीं तरी निदान पक्ष येवज बट्टा देऊन घेतों बाकी दीड हजार रुपयेविसीं बाळारावजीस त्यांणीं लि॥ आहे. त्याचें उत्तर येईल तेव्हां देणार ऐसा भाव बोलण्यांत दिसतो. त्यास येक पत्र बाळारावजीचे गोपाळपंत याजला घेऊन जरूर पाठवावें कीं उजनीत एवज बट्टा न पडतां चालत असल्याप्रों ऐवज देणें दिक्कत न करणें याप्रों घेऊन पाठवावे म्हणजे ऐवज त्याजपासून घेतो. हालीं चीठी दिल्ही आहे तो तर ऐवज घेतों. कलम १.

येथें कोट व हालीं सिका चालतो. येथून तट्टें पांच व उंटें दोन सामानासुद्धां पाठविलीं आहेत. पावतील. आपाजी साबाजी याची पालखी पो आहे. त्याच्या भोयांस आलेले हिसेब खर्चास आगखी हि जेथवर प्रेत्न होऊन गवत व लांकडें येतील तीं घेतच आहों. बाकी गवत व लांकडें विकत घेणें लागतील त्यास कुशाबांनीं येथें उजनप्रगणियापैकीं दोन गांव कमाविसदारापासून केले आहेत येथून पांच सात कोस तेथें गवताची व लांकडाची सोय पाहून खरीदी घेतों. गवताचा भाव त्या खेडयांत रुपयाचे हजारा बारासे मिळतें. पेंढी नासिकच्या आपल्या कुरणच्या पेंढीप्रों आहे. येथें शहरांत गवत रुपयाचे पांच से अधिक मिळत नाहीं तेव्हां खेडयाहून आणवावें हें उत्तम दोन उंट येथें आहेत व दोन तट्टें आहेत घेऊन येत जातील. पेंढी लहान फार आहे. कडबा रुपयाचा तिन से च्यार से मिळतो. परंतु च्यार से कडबा मिळून आपल्याकडील ऐसी शंभर पेंढी होईल याप्रमाणें लहान पेंढी आहे कुशाबाच्या गांवापैकीं च कांहीं रुपये २५ पंचवीस दिल्हे आहेत व तटें उंटे याजला खर्चास मार्गीं हणवंताजवळ रुो २५ पंचवीस दिल्हे आहेत त्याचा हिसेब तेथें समजून द्यावा. लक्ष्मणराव पाग्या याजबा॥ पाठविली आहेत. लक्ष्मणराव याची व हणवंताची रुबरु करून दिल्ही आहे. मार्गीं सांभाळून घेऊन जाईन. तेथें पोंचऊन पत्र पो॥ याप्रों॥

करार केला आहे. जामदारखानियामागें राहावयास मिसल नेमून घेतली आहे. चौकी पाहरा करवून नेऊन पांचवितों म्हणोन मान्य केलें आहे. कलम १.

येथून पागेचा सरंजाम वगैरे पाठविला आहे त्याची याद अलाहिदा असे. कलम १.

कुशाबाकडून कांहीं येवज हस्तगत करणें येविसींचा तगादा माारनिलेस लाविला आहे. त्याणें उत्तर केलें कीं अठावीस हजार रुपये वसूल जाले ते सोय पडली तरी तेथें घेऊं. सोईचा असल्यास नाहीं तर गवतच घेऊं. कलम १.

येथून मोत्तादार वगैरे पाठविले आहेत त्यास आदा येणेंप्रों

	रोजमरा	आघाव
हणवंता खो।	३	५
येसू	३	०
गुणोजी	३	३
भवानी	३	०
सारवान	३	०
आणिक नवा	०	२
ठोविला दरमहा रु॥ ४ छ० मजकुरापासून तेरीख पडले काम करावे तूर्त		
	१५	१०

रोजमरा छ० १६ सफरचा सर्वांबद्दल दिल्हा आहे. आघाव मात्र दिल्हे आहे. तेहि लिहिले आहेत. कलम १.

बऱ्हाणपूरच्या मुकामींऊन एक पत्र व उजनीच्या मुकामीं पावल्यावर दोन पत्रें अजूरदार याजब॥ पाठाविलीं आहेत पावलीं असतील. कलम १

येजमानाकडे पाठविले बाकी ऐकूण तीस हजार च्यार से वसूल जाले नाहींत त्याची वरात पाटीलबावाची घेतली ती च दाखविली. आम्ही उत्तर केलें कीं आम्हांस वरातेसी समंध काय आहे येथें खर्चास लागेल ते तुम्हांपासून घेत जावें यापें॥ आज्ञा आहे त्याचा जाबसाल केला कीं येथें दुसरा ऐवज कोठून द्यावा सारांष आम्ही तगादा करावयास आळस करीत नाहीं. परंतु प्राप्त होणें कठीण आहे. एक पत्र हि आपण कुशाबास ल्याहावें कीं हर तजवीज करून च्यार पांच हजार रु॥ बाबूराव याजकडे देणें मग जे वसूल होतील ते घेऊं परंतु पत्र पाठवावें. कलम १.

येथें तीन घोड्या सरकारच्या व दोन तटे राहिलीं आहेत व येक घोडी आमची येकूण साहा त्याजला माणसें तीन मात्र मोतादार ठेविले आहेत. अधिक नाहीं व दोन गाडीचे बैलाविसीं कुशाबास सांगितलें आहे. हे देऊन दुसरे तरणे घेतो. बैल आणून देतां. म्हणोन मान्य केलें आहे. बाळाजीपंताकडून दोन माणसें चौकी पाहरियास घ्यावयाची सोय नाहीं. त्याजला विचारिलें त्यांणीं उत्तर केलें कीं तुमच्या वाडियासमोर क॥दार राहतात त्याचीं माणसें तुमच्या दरवाजियासमोर आहेत त्यास आम्हीं सांगितलें आहे तुम्ही चौकी पाहरियाची काळजी न करावी. रुबरु हि क॥दार याची करून दिल्ही आहे. क॥दार याच्या दरवाजियास व आपल्या दरवाजियास मधीं गली मात्र आहे. अष्टौ प्रहर माणसें क॥दार याचीं आपले दरवाजियापुढें असतात. क॥दार यास हि आम्हीं सांगितलें आहे चिंता नाहीं. कलम १.

चिरंजीव राजश्री मुकुंद आपा याजवर हजार रुपयाची उंट गवत बाहेरून गाव खेडियाहून आणवावें लागेल यास्तव ठेविले आहेत. से॥ दापीबाई याजकडे येक खिसमतगार नवा ठेवून दिल्हा आहे. मातुश्री कामीकडे

सदवा आहे च. त्र्यंबका कोठीचे कामावर व जामदारखाना याचे खोलींत आहे. खोली मजबूद आहे. संदूख मेळवितो.त्यांत लिहिल्याप्रों ठेवित जाऊं. पिराजी सा।दार व लक्ष्मण व समाधान व तुळाजी खास बारदार येकूण चौघे आहेत. रात्रीं चौघांनीं च्यार प्रहर जागत जावें. देवधर्मास जाणें तरी येथील घरचा बंदोबस्त राखून बरोबर जातात. चिंता नाहीं. जामदारखानियाचे खालीं जवळ नेहमीं समाधान पूर्व्या अष्टौ प्रहर बसवीत असतो. त्याजला दुसरें काम नाहीं. कलम १.

चिठी ब्रह्माणपुरीं दिल्ही होती त्यास मा।रनिले आपले भेटीस आले याजमुळें आमची व त्याची भेट जाली नाहीं. हरिश्चंद्रपंत तेथें होते त्याजला ऐवजाविसीं विचारलें त्याच्यानें कार्य जालें नाहीं. दोन माणसें तेथून हि आणलीं होतीं उजनीस पावल्यावर त्याजला निरोप दिल्हा. बसू जासूद व गोविंदा म्हणोन प्यादा येकूण दोन असामी होत्या. कळावें. कलम १.

गवताची व लांकडाची बेगमी पुर्ती बाळाजीपंत याजकडून होतां दिसत नाहीं. जे होईल ती करून बाकी खरीदी करावी लागेल. कलम १.

येणेंप्रमाणें कलमवार लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. स्वारी इकडे येणार त्यापूर्वी च सुचना अगोधर आली म्हणजे दाणादुणा खरीदी करणें तरी ठीक पडेल. नाहीं तरी माहागाई होईल ऐसें आहे. यास्तव अगोधर सुचना असावी. तिकडून कोणही नासिकास जाईल तरी बाबाजी गणेश याजला नासिकच्या बंदोबस्ताविसीं लेहून पाठवावें.तेथें दाणादुणा कांहीं आहे. हरभारा तो व बधारियाच्या बागांतील भात वगैरे होईल ते प्रोक्त करवावें. आतां ठेऊन उपयोग काय आहे. मेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. आपलेकडील वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जावें. हे विज्ञापना.

श्री.

लेखांक २४२.

१६९६ श्रावण शुद्ध १३.

पो। छ० २७ जा।खर श्रावण

शेवेसी कृष्णाजी सिवदेव सां। नमस्कार विज्ञापना. ता। श्रावण शुद्ध १३ मुकाम अवंतिकापुरीं येथें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपली रबीची वरात रतलामेचरी खंडेराव त्रिंबक याजवरी होती. चैत्रअखेरचा वायदा होता. त्यास वैशाखमासीं ऐवजाची निकड मा।रनिलेस केली तेव्हां सरकारांतून च्यार दिवस ऐवज न देणें म्हणोन का।दारास ताकीद केली. त्याजउपरीं इंदुरास श्रीमंत आले तेव्हां आम्ही यासमागमें गेलों. तेथें राजश्री आबाजी माहादेव याचे व पाटीलबावाचें रहश करून दिल्हें आमचे ऐवजाची निकड लाविली तेव्हां ताकीदपत्र का।दारास दिलें. तो तें च लस्करास आले मागतीं त्यांनीं दोन महिन्याचा वायदा करून घेतला कीं रसदेचा ऐवज तूर्त सरकारांत द्यावा लागतो. यास्तव दोन महिन्यांनीं ऐवज पडे ऐसें सरकारांतून करार करून त्यांणीं घेतला तो दोन महिने जाहाले रसदेचा हि ऐवज त्यास मिळेना. आणि लोकांचें हि त्यास देणें फार. माहालचा ऐवज वसूल घेतला तो मागील कर्जदारास दिल्हा. पुढें आणखी कर्जदारांनीं त्यास फार च अडविलें. रसदेचा ऐवज मिळेना. तो आमचे ऐवजास ठिकाण च नाहीं. दुसरेयास मामलत

सांगावी ऐसें जाहालें. आम्हीं आपले ऐवजाविसीं सरकारांत निकड लाविली तेव्हां त्यांणीं सांगितलं कीं तुम्हांस ऐवजाचें अगत्य असलें तरी सालमजकूरचा रसद देऊन जमा मामलत करणें म्हणजे त्याची वाकी रांगडयाकडे असेल तीं तुमचे हातास येईल. नाहींतरी येणार नाहीं. खंडेराव यास निकड लावावी तरी त्याची अवस्ता फार च कठीण. त्रिंबक मल्हार याजवरी चिठी देणें म्हणोन निकड लाविली परंतु त्याचें चित्त शुध्द नाहीं. त्यांणीं त्यास बाहेर घातलें. चीठी कांहीं कबूल करणार नाहीं. याचे स्वाधीन त्यांणीं शें दोनशें घोडे मात्र केले. ऐवज झाडून देशास घेऊन आले. त्याजमुळें त्यास कर्ज भारी जाहालें. दुसरेयांणीं मामलत केली तरी बाकी आपले हातास येणार नाहीं. ऐसें जाणोन मामलत आपलेकडे करून घेतली. नर्मदेपर्यंत लष्करासमागमें गेलों होतो. कळावें. आषाढमासीं नर्मदेचे मुकामींहून मामलत आपलेकडे करून घेऊन येथें आलों. चवथ व नजराणा मिळोन पंचावन हजार रु॥ तूर्त द्यावे लागले यांची तरतूद हा कालपर्यंत करितों. रु॥ उजनींत मिळत नाहींत. सावकाराचीं झाडून दिवाळीं निघालीं फारकरून ऐवजाची तोड पडली. एका दो दिवसांत रतलामेम जाऊन आपले बाकीचीं रुजुवात करितों. रांगडे पंधरा वीस हजारपर्यंत बाकी कबूल आहेत त्यास रुजवातमुळें जाजती निघेल. त्यापैं॥ वसूल करून लौकरीं च पाठवितों. कार्तीक मार्गश्वर मासीं वसूल चाळीस लागेल. पेशजी आठावीस हजार राजश्री विष्णुपंत बाबाकडे भरले. हालीं आज्ञा कराल तेथें जमा करितों आम्ही येथील बाकीची रुजुवात करितों त्याची निशा पत्रीं घेऊन दसरियाचे सुमारें भेटीस येतो. पुढें आणखी ऐवज सिंदे याजकडे येणें त्यास आपली त्याची समक्ष होईल तेव्हां त्याची तोड निघेल. याजकरितां लवकर च येतों. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

श्री.

लेखांक २४३.

१६९६ श्रावण शुद्ध १३.

राजश्रियाविराजीत राजमान्य ,राजश्री बाळाजीपंत आपा स्वामीचे शेवेसीः—

पो। कृष्णाजी सिवदेव सां नमस्कार विनंति. उपरी. येथील कुशल ता। श्रावण शुध १३ मुकाम अवंतिकापुरीं येथें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असो. विशेष. बहुत दिवस स्वामीकडून पत्र येत नाहीं तर ऐसें न करावें. सदैव पत्रीं परामर्ष करीत असावें. आम्ही येथें रबीचे वरातेकरितां पेचांत पडलों. निदान कोठें ठिकाण लागेना तेव्हां मामलत करणें प्राप्त जाहाली. बाकीची रुजुवात करून निघेल ते वसूल करून पाठवितों. आगि मी हि लौकर च स्वामीचे भेटीस येतों. कार्तिकमासीं कांहीं ऐवजाची तोड पाडून लौकर च येतों. इतके दिवस श्रम केले त्यासारखे ऐवज वसूल करून पाठविला म्हणजे सार्थक. नाहीं तरी व्यर्थ रिकामे येऊन काय सांगावें ? यास्तव याचा निकाल करून घेतल्यावरी येतों. कळावें. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंति.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २४४.

१६९६ श्रावण वद्य १३ वृद्धि.

राजश्री आनंद शंकर वैद्य जकात गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर दंडवत. ह्मु॥ खमस सबैन मया अलफ बद्दल देणें शिलेदार बाबूराव काशी याची रोजमरा व अर्जबाबाचें ऐवजी रु. ६८

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बाहदर

सालमजकुरचे रसदेचे ऐवजीं देऊन पावलियाचा कबज घेणें. हिशेबी रोजमरा असे. श्रावण अखेर निम्मे भा॥ अखेर निम्मे देऊन कबज द्यावें.

जाणिजे. छ० २७ जमादिलाखर.

मोर्तब सुद

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २४५.

१६९६ श्रावण वद्य १३ वृद्धि.

राजश्री रतनभाई पारसी प्रो। बाणदेवी गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर. रामराम सुहुरसन खमस सबैन मया व अलफ. बदल देणें सिलेदार बाबूराव कासी यासि रोजमुरा व अर्जबाबचे ऐवजी प्रें॥ मजकूर येथील सालमजकूरचे रसबेचे ऐवजी रुो ४००० चार हजार देऊन पावलियाची कबज घेणें. हिमेबी मजुरा असे. जाणिजे. छ० २७ जमादिलाखर श्रावणअखेर निमे. भा॥ अखेर निमे द्यावे. छ० मा॥र.

श्रीराजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप धुरंधर गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बहादर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २४६.

१६९६ श्रावण वद्य १३.

राजश्री जिवाजी रघुनाथ प्रो। कामरेज गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समशेर बहादर दंडवत. सु॥ खमस सबैन मया अलफ बद्दल देणें शिलेदार बाबूराव काशी याचा रोजमरा व अर्जबाबचे ऐवजीं रुपये २००० दोन हजार प्रो। मा॥र येथील सालमजकुरचे रसदेचे ऐवजीं देऊन पावलियाची कबज घेणें. हिशेबी मुजरा असे. श्रावणअखेर निमे भा॥ अखेर निमे देऊन

कबज व्यावें. जाणिजे. छ० २७ जमादिलाखर.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बाहदर.

मोर्तब सुद

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २४७.

१६९६ श्रावण वद्य १३ वृद्धि.

राजश्री भिकाजी यादव प्रे॥ चिखली गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर. दंडवत सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी याची रोजमरा व अर्जबाबेचे ऐवजी रु. २००० दोन हजार प्रे॥ म॥र येथील सालमजकूरचे रसदेचे ऐवजी देऊन पावलियाचा कबज घेणें. हिशेबी मुजरा असे. श्रावण अखेर निम्मे भा॥ अखेर निम्मे देऊन कबज घ्यावें. जाणिजे. छ० २७ जमादिलाखर.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बाहदर

मोर्तब सुद

बार.

श्री.

लेखांक २४८.

१६९६ भाद्रपद वद्य १.

राजश्री चिंतो विठ्ठळ स्वामी गोसावी यांसि विनंती उपरी हैदर नाईक याजकडे सालगु॥ तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबीं ऐवज करार केला त्यापैकीं राजश्री रुष्णाजी नाईक दातार यांस दोन लक्ष रुपये द्यावयाचा ठराव तुमचे विद्यमान अप्पाजीराम याजवळ जाहाला त्याविसीं मागें तुमचें व नाईकांचें पत्र घेऊन अप्पाजीराम यांजकडे पाठविलें होतें. त्याचे जाब आले ते पाहून नाईकांस दाखवून राजश्री नारो अप्पाजी याजकडे पाठविले आहेत ते तुम्हांसी बोलतील. त्यास येविसीं फिरोन कागदपत्र काय लागतील ते तयार करवून नाईक सांगतील त्याप्रमाणें ऐवज आणावयाची तर्तूद करून ऐवज सरकारांत सत्वर येईतें करणें + जाणिजे छ० १३ रजब सु॥ खमस सबैन मया व अलफ* हे विनंति.

श्री.

लेखांक २४९.

१६८९ कार्तिक शुद्ध ७.

राजश्री

मोर्तब सुद

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये॥ तुकोजी होळकर दंडवत. सु॥ समान सितैन मया व अलफ राजश्री माहादाजी गोविंद यांची बोली सरकारांत सालमज-

+ ह्या फुलीपुढील अक्षर नानाफडणिसाचें; व * ह्या फुलीपुढील चार अक्षरें सखारामबापूचीं.

बार.

कुरीं करून त्यांच्या पथकाच्या सरंजामांत प॥ मजकूर ऐवजीं जागा रुपये १४२४८॥ चौदाहजार दोनशें साडे अठेतालिस रुपयाची करार करून हें पत्र सादर केलें असे. तर तुम्हीं प॥ मजकूर पै॥ सदरहू चौदाहजार दोनशें साडे अठेचाळिस रुपयाचे तनखियाचे गांव मशारनिलेस नेमून देऊन चालविणें. जाणिजे छ० ५ जमादिलाखर. बहुत काय लिहिणे ?

श्री म्हाळसाकांत चरणी तत्पर मल्हारजि सुत तुकोजी होळकर.

मोर्तब सुद

बार.

श्रीशंकर.

लेखांक २५०.

१६९६ कार्तिक.

हिसेब बाबूराव कासी सिलेदार सु॥ खमस सबैन इ॥ छ १४ साबान गुदस्त त॥ छ १५ रमजान सालमजकूर येणें माहे १३ तैनात बारमाही नकी रे॥

३३२०० बारमाही तैनात

३०००	खासा	१
५०००	असामदार	५
१२००	कारकून	१
२४०००	स्वार अ॥	८० दर ३००
३३२००		८७

२७५० जाजती माहे १ दरमहा रे॥

३५९५०

२०

पैकीं वजा सूट माहे २ दरमहा रे॥ ३०००

प्रे॥ ६०००

बाकी २९९५०

पैकीं दरबारी खर्च दरसदेंप्रें॥ १० प्रे॥

रु. २९९५

बाकी २६९५५

वसूल वाटे सुधा गु॥ रे॥ २८१४

बाकी रें॥ २४१४१

पैकीं वजा नाणे बट्टा दरसदे रे॥ १५॥-

प्रे॥ ३७७२

बाकी नत्खत रुपये २०३६९

पालखीची तैनात रे॥ ९००

ये १००० चाकरी माहे १३

आकार १०८० वजा सूट

माहे २ दरमहा रे॥ ९० प्रे॥ १८०

बाकी रु.

अफतागीर बदल रु॥ ७५

२१३४४

रे॥

६४८॥ पोतापैकी सालमजकूर

परभारे वराता महालानिहाय

१०००	प्र॥ बालेश्वर २०० पैकी
२०००	प्र॥ कामरज
३४१॥	की॥कटोदरें दर ६८१॥पैकीं
२०००	प्र॥ घनदेवी ४०० पैकीं
१०००	प्र॥ मोई
२०००	प्र॥ चिखली
४३१७॥	लालजी प॥ प्र॥ पेदलाद
५००	प्र॥ ढवलके
३	गु॥ पैकीं
८७७	पादरे
०	सोनगड पेशजी १००० गेर

१४०३९॥

१४६८७॥

बाकी	६६५६॥
किता मोघम वि॥ मोरो दामोदर २३२७॥ वसूल १८९	२१३८॥
बांकी लमाबद्दल देवीले	१०००
	९७९५

यासी ऐवज रु॥
१००० सोनगड वरात
१२०० नख्त देविले

२२००

बांकी	६९९५
जाजती दिल्हे	५
	७०००

यासी येवज माहाला निहाये रु॥
११५० प्र॥ व्यारें
११५० प्र॥ राणी आई अंतापूर
११५० प्र॥ चिखली
११५० प्र॥ माहे
१२५० प्र॥ वडवड
१२५० प्र॥ खडकीधा मोडी

७०००

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५१.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री भगवंतराव गायकवाड पो। व्यारें गोसावी यांसः—

छ. अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य स्रे॥ गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत रामराम. सु॥ खमस सबैन मया व अलफ बदल देणें सिलेदार बाबूराव कासी यासि रुसकतीचे ऐवजीं रु॥ ११५० साडे अकरासे प्र॥ मा॥रीचे ऐवजी देऊन कबज घेणें. जाणिजे छ० २५ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती आखिल प्रौढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम शेर बाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५२.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री रतनजी पारख* पो। घनदेवी गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहंदर रामराम सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी याची देणें रुपये २००० दोनहजार पो। मा॥रीचे ऐवजी देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० २५ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम शेर बाहदर

मोर्तब सुद

---

* रतनजी पारसी हा पारख होता.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५३.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री आनंद शंकर वैद्य जकात किल्ला कटोदरें गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर दंडवत. सु॥ खमस सबैन मया अलफ राजश्री बाबूराव काशी याची वरात पेशजी सादर आहे. त्यास वराते प्रों। ऐवज पत्रदर्शनीं देऊन कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ० २५ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेलसमसेरबाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५४.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री बाळाजी विश्वनाथ पे॥ मोहे गोसावी यांसी—:

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेठ समशेर बाहदर. दंडवत सु॥ खमस सबैन मया अलफ राजश्री बाबूराव काशी याची वरात दर्शनीं तुम्हावरी सादर आहे. त्यास वराते प्रे॥ ऐवज पत्रदर्शनीं देऊन कबज घेणें. बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ २५ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेलसमसेरबाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५५.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री जिवजी रघुनाथ पे॥ कामरेज गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर दंडवत. सु॥ खमस सबैन मया अलफ रा॥ बाबूराव काशी याची वरात पेशजी तुम्हावरी सादर आहे. त्यास वरातेचा ऐवज अद्यापि दिल्हा नाहीं तरी हालीं पत्रदर्शनीं देऊन कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ २५ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेलसमसेरबाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५६.

१६९६ कार्तिक वद्य १२.

श्री राजाराम
छत्रपती अखिल प्रौ
ढ प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
नाखासखेल सम
सेर बाहदर

चिरंजीव राजश्री त्र्यंबकराव गायकवाड प्र॥ खडक धामोडी याप्रति गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर आशिर्वाद सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी यासी रुकसतीचे ऐवजी रुपये १५०० दीडहजार पे॥ मा॥ रीचे ऐवजीं देऊन कबज घेणें जाणिजे छ २५ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५७.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री सिदो तुकदेव पो. चिखली गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर दंडवत. सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें सिलेदार बाबूराव कासी यासी रुसकतीचे ऐवजीं रुपये ११५० साडे अकरासे पो मजकूरीचे ऐवजीं देऊन कबज घेणें. जाणिजे छ० २५ माहे रमजान.

श्रीराजाराम
छत्रपती अखिल प्रौढ
प्रताप पुरंदर गोविंदराव
गायकवाड से
ना खासखेल सम
सेर बहादर.

मोर्तब सुद.

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५८.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री जिवाजी रघुनाथ पे॥ कामरेज गोसावी यांसिः—

छ. अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर दंडवत. सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी यांसि देणें रुपये २००० दोन हजार पे॥ म॥रीचे ऐवजीं देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० २५ माहे रमजान.

श्रीराजाराम
छत्रपती अखिल प्रौढ
प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
नाखासखेल सम
सेर बाहदर.

मोर्तब सुद.

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २५९.

१६९६ कार्तिक वद्य १२.

श्री राजाराम
छत्रपती अखिल प्रौ
ढ प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
नाखासखेल सम
सेर बाहदर

चिरंजिव राजश्री त्रिंबकराव गायकवाड पो वलचडे या प्रती गोविंदराव गायक वाड सेना खासखेल समशेर बाहदर आशिर्वाद. सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी यांचीं रुकसतीचे ऐवजीं रुपये १५०० दीड हजार पे॥ मा॥रीचे ऐवजीं देउन कबज घेणें. जाणिजे. छ० २५ माहे रमजान.

मोर्तब सुद

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६०.

१६९६ कार्तिक वद्य १२.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ आंतापूर.

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखास-खेल समशेर बाहदर रामराम. सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें सिलेदार बाबूराव काशी यांसी रुकसतीचे ऐवजी रुपये ११५० साडे अकरासे पे॥ मा॥रीचे ऐवजीं देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० २५ माहे रमजान

श्री राजाराम
छत्रपती अखिल प्रौ
ढ प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
ना खासखेल सम
सेर बाहदर.

मोर्तब सुद

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६१.

१६९६ कार्तिक वद्य १४.

गंगाभागिरथी मातुश्री भवानीबाई गायकवाड वडिलांचे सेवेसी:—

अपत्य गोविंदराव गायकवाड शेना खासखेल समशेर बहादर दंडवत विनंती. उपरी बदल देणें राजश्री बाबूराव कासी नि॥ चिंतो विठ्ठल यांस सोनगड जिल्हेचे सुकडीचे ऐवजी हे॥ १००० एक हजार देऊन पावलियाची कबज घेणें. हिसेबी मजुरा असे जाणिजे. छ० २७ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६२

१६९६ कार्तिक वद्य ३०.

चिरंजीव राजश्री त्र्यंबकराव गायकवाड पे॥ खडक धामोडी यांसि गोविंदराव गाय-

कवाड आशिर्वाद सुहुर सन खमस सबैन मया अलफ बाबूराव काशी नि॥ राजश्री चिंतो विठ्ठल याची वरात तुम्हावर सादर आहे. त्यास म॥रनिले रुस्कत होऊन देशीं जातात. त्यास वराते मेँ॥ ऐवज तूर्त देऊन पावलियाचा कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ० २८ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्री राजाराम
छत्रपति अखिल प्रौ
ढ प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
नाखासखेळ सम
सेर बाहदर

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६३.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

राजश्री सिदो तुकदेव पे॥ चिखली गोसावी यांसि: –

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेळ समशेर बाहंदर. दंडवत सु॥ खमस सबैन मया अलफ राजश्री बाबूराव काशी याची वरात पेशजी सादर आहे. त्यास वराते पे॥ ऐवज पत्रदर्शनीं देऊन कबज घेणें बोभाट येऊं न देणें. जाणिजे छ०२५ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्रीराजाराम
छत्रपती अखिल प्रौ
ढ प्रताप पुरंदर गोविं
दराव गायकवाड से
नाखासखेळ सम
सेर बाहदर

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६४.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

गंगा भागिरथी मातुश्री भवानी बाई गायकवाड वडिलांचे शे॥.

अपत्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहंदर. दंडवत विनंती उपरी राजश्री बाबूराव काशी याची वरात तुम्हावर सादर आहे. त्यास म॥रानिले रुस्कत होऊन देशीं जातात. यांस वराते मेँ॥ ऐवज तूर्त देणें आणि पावलियाचा कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. रा॥ छ० २८ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६५.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ अंतापुर गोसावी यांसि.

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेना खासखेळ समशेर बाहंदर रामराम सुहुर सन खमस सबैन मया अलफ बाबूराव काशी नि॥ राजश्री चिंतो विठ्ठल याची वरात तुम्हावर सादर आहे त्यास मशारनिले रुस्कत होऊन देशीं जातात. त्यास वराते मेँ॥ तूर्त ऐवज देणें.

फिरोन बोभाट येऊं न देणें. छ० २८ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती आखिल प्रौढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम सेर बाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६६.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

राजश्री रतनजी पारसी परगणें घणदेवी गोसावी यांसिः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेना खासखेल समसेर बाहंदर रामराम. सुहुर सन खमस सबैन मया अलफ बाबूराव काशी नि। राजश्री चिंतो विठ्ठल याची वरात तुम्हांवर सादर आहे. त्यास म॥रनिले रुस्कत होऊन देशीं जातात. यांस वराते प्रें॥ ऐवज तूर्त देऊन पावलियाचा कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. छ० २८ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती आखिल प्रौढप्रतापपुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम सेर बाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत

लेखांक २६७.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

राजश्री भगवंतराव गायकवाड.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बाहंदर रामराम. सुहुर सन खमस सबैन मया अलफ राजश्री बाबूराव काशी नि। चिंतो विठ्ठल याची वरात तुम्हांवर सादर आहे. त्यासि मशारनिले रुस्कत होऊन देशी जातात त्यासि वराते प्रें॥ तूर्त ऐवज देणें. फिरोन बोभाट येऊं न देणें रा॥ छ० २८ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपति आखिल पौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से ना खासखेल सम सेर बाहदर

मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २६८.

१६९६ कार्तिक वद्य ३०.

चिरंजीव राजश्री त्र्यंबकराव गायकवाड प्रें॥ वलवाडे यांसिः—

गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर आशिर्वाद. सुहुर सन खमस सबैन मया अलफ बाबूराव काशी नि। राजश्री चिंतो विठ्ठल याची वरात तुम्हांवर सादर आहे. त्यास म॥रनिले रुस्कत होऊन देशीं जातात यास वराते प्रें॥ ऐवज तूर्त देऊन पावलियाचा कबज घेणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. रा॥ छ० २८ माहे रमजान. बहुत काय लिहिणें ? हा आशिर्वाद.

श्री राजाराम छत्रपती आखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से ना खासखेल सम सेर बाहदर

मोर्तब सुद

श्री.

लेखांक २६९.

१६९६ पौष वय २

तेरीज शिलेदार सु॥ खमस सबैन छ० १५ जिल्काद पर्यंत रुपये

		वसुल		बाकी
निराजी त्र्यंबक	५	७६८	५१८।।।·।।।	२४९८=।
व्यंकाजी गिरमाजी	५	८१४	४५६।।=।।	३५७।·।।
येसाजी वागद्रे	५	९७२	४६४।।·	५०७।।
यमाजी कोकोट	७	१०९४	६०२।।।=।।।	४९१८–।
राणोजी गाडे	११	१६८५	७७९।।=।।।	९०५।–।..
कान्होजी कदम	३	५०९	२०९।।=।।	२९९।–।।
भवानजी सुरवे	३	३१४	१६५८=।।	१४८।।।·।।
खंडोजी कादरे	२	३५७	२४४।।।–	११२८=
रंगराव	५	७३०	२१५।।	५१४।।·
फिगोजी शिंदे	४	५१९	३०१८–।।	२१७:।।=।।
थोरात	३	४८९	४२७।।।·।	५१८=।।।
घाटगा	१	१७०	१७०।=।।।	·।=।।।
विगवर	१	१८५	८०	१०५
राघोबा	१	१४०	१३९।।–	·।=
बहिरजी	१	१८७	२१८=	१६५।।।=
मोरो रघुनाथ	३	४५४	२६५८=।	१५८।।।–।।।
केशवराव	१	१७३	११७।।।=	५५८=।
कृष्णपुरी	२	५२५	२८२।=।।।	२४२
मनाजी जाधव	१	१२०	११५।।–।।	४।=।।
संताजी राऊ सिंदे	१	११	१०।=।।	·।।–।।
साकरोजी महाडीक	२	४६	४०।।।=	५८–
भीकाजीपंत	२	६	६	०
				४५०२।=।

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७०.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध १.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ आंतापूर.

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर रामराम सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी यासी रुकसतीचे ऐवजीं रु १००० येकहजार पे॥ मजकूरचे ऐवजीं देऊन कबज घेणें जाणिजे छ० २९ माहे रमजान.

श्रीराजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर	मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७१.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध १.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ गोसावी यासिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर रामराम सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी यासी रुकसतीचे ऐवजी रु ७००

सातशे प्र॥ मजकूरचे ऐवजी देऊन कबज घेणें. जाणिजे.

छ० २९ माहे रमजान.

श्रीराजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर	मोर्तब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७२.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध १.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ अनावल गोसावी यांसिः—

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहंदर रामराम. सु॥ खमस सबैन मया अलफ बदल देणें शिलेदार बाबूराव काशी याची रुकसतीचे ऐवजीं रुपये १५० दीडसे प॥ म॥रचे ऐवजीं देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० २९ माहे रमजान.

श्री राजाराम छत्रपती अखिल प्रौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेर बाहदर	मोर्तब सुद

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७३.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध १.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ कोंढ गोसावी यांसि:—

छ. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहंदर रामराम. सु॥ खमस सबैन मया अलफ बद्दल देणें सिलेदार राजश्री बाबूराव काशी यासी रुकसतीचे ऐवजीं रु. १५० दीडशे पे॥ मा॥रीं ऐवजीं देऊन कबज घेणें.

जाणिजे. छ० २९ माहे रमजान.

मोर्तब सुद

श्री राजाराम छत्रपती अखिल पौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम सेर बाहदर

बार.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७४.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध २.

राजश्री भगवंतराव गायकवाड आंतापुर छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर रामराम. सु॥ खमस सबैन मया अलफ राजश्री बाबूराव काशी याची वरात तुम्हांवरी सादर आहे. त्यास मुशारनिलेची रुकसती जाहली आहे. तर पत्रदर्शनीं देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० ३० माहे रमजान.

मोर्तब सुद

श्री राजाराम छत्रपती अखिल पौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम सेर बाहदर

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७५.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध २.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ कोंढ गोसावी यांसी—:

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर. रामराम सु॥. खमस सबैन मया अलफ. रा॥ बाबूराव काशी याची वरात तुम्हांवरी सादर आहे. त्यास वरातेचा ऐवज पत्रदर्शनीं देणें. मुशारनिलेची रुकसती जाली आहे तरी ढील न करणें. देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० ३० माहे रमजान.

मोर्तब सुद

श्री राजाराम छत्रपती अखिल पौढ प्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड से नाखासखेल सम सेर बाहदर

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक २७६.

१६९६ मार्गशीर्ष शुद्ध २.

राजश्री भगवंतराव गायकवाड पे॥ गोसावी यांसिः--

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर रामराम. सु॥ खमस सबैन मया अलफ रा. बाबूराव काशी याची वरात तुम्हावरी सादर आहे. त्यास याची रुसकती जाली आहे तरी पत्रदर्शनीं ऐवज देऊन कबज घेणें. जाणिजे. छ० ३० * माहे रमजान.

श्रीराजाराम छत्रपती आखिल श्री ढप्रताप पुरंदर गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहदर	मोर्तब सुद

श्रीशंकर.

लेखांक २७७.

१६९६ माघ. १ प्र

ताळेबंद राजश्री बाबूराव काशी सिलेदार पतक दि॥ राजश्री गोविंदराव गायकवाड सेना-खासखेल समशेर-बाहदर इ॥ छ० १५ रजब अश्विनमास सु॥ अर्बा सबैन ता॥ छ० ३० जिलकाद पौशमास सु॥ खमस सबैन मया अलफ जमारुपये.

* मोडकांच्या जंत्रींत रमजान ३० नाहीं.

तीं॥

७८३८७॥ सरकारपैकीं जमा

३६८३॥ पोत्यापैकीं गु॥ लखापा

नाईक खटावकर

२८१५ किता

१८९ किता

६४८॥ किता

३२ जखमी ब॥

३६८३॥

४१५४॥॥ परभारे वराता व नत्खत

१००० प्र॥ बालेश्वर वरात

५०० प्र॥ ढवळके वरात

९२७ ठाणे पादरे

८७७ गु॥ धोंडजी भिसे

५० गु॥ लखापा

९२७

३ गु॥ महीपतराव

२५ गु॥ भोबन भाई

२५ गु॥ मोरो येशवंत

२९३ गु॥ अंताजी नागेश

४३ नत्खत

२५० उसनवार १

२९३

१०० वरातेवर स्वार गेले त्यास अहाजबानी स्वार

८१॥॥ गु॥ लखापा ने॥

१२० रुसकती समई गु॥ लखापा

४१५४॥॥

७८३८७॥

त॥
७२६३॥ रुजुवात नरसीपंत
त॥ अपा फडणीस
३५८० परभारे वराता
१००० बालेश्वर
५०० ढवळके
८७७ पादरे
१२०० किता रुवक
३ किता

३५८०
३६८३॥ पोत्यापैकीं
२८१४ किता
६४८॥ किता
१८९ किता १०
३२ जखमी

७२६३॥
५१४॥≈ रुजुवातेसिवाय

७८३८४≈
२५ थोबनभाई
२५ मोरो येसवंत
५० पादरेल ख॥
१०० वरात स्वार
२९३ अंताजी नागेश
८१॥≈ लखापा
१३८।–। कमावीस तुटीपैकी व कसर
८४६॥≈। उचापत हाकावणी व जमाली गैर
३२॥ घोडी काढणावळ
८४॥≈। कर्ज अमदनपैकी जमा
३५३८॥–॥ कर्ज हासना जमा
७०२ वि॥ चिंतो विठल
२५५ उंटाबदल घेतले
४० चांदणीबदल
२०० गु॥ धोंडाबा नाईक
२५ देणें रंगराव
१२ देणें रजपूत कापडाव॥
२०० नत्रू लस्करातून अलिमावर
गु॥ भिमाजीपंत

---

४० वि॥ गबाजीपंत बाबा
४१९४≈ किरकोळी नी॥ वार
१६२ गु॥ अबाजी नाईक कापडाव॥
५०० गु॥ दौलत बाबूराव
३०० बाजी विश्वनाथ उरेडेकर
५ सोनवर्णीच॥ वि॥ सद
रु. २०० वि॥ बाबूराव रामचंद्र व बापूभट याचे कर्ज येमाजी कोकाटे याजकडे रु॥ १०५ होते. तें वसूल करून घेतलें परभारें तैनातींत येमाजी माार याचे
रु. २०० गु॥ रामाजीपंत नासीकर घोडीब॥
रु. ३५० गु॥ बाबूराव रामचंद्र घोडा रास १ ब॥
रु. ९ गु॥ रंगराव हावला .फिरगोजी सिंदा
रु. ७ गु॥ बापूजी शंकर दि॥ दौलत बाबूराव.

श्री.

लेखांक २७८.

१६९७ चैत्र शुद्ध ५.

श्री
मन्मल्लारि चर
णी तत्पर खंडोजी
सुत मालराव
होलकर.

दस्तक सरकार राजश्री तुकोजी होळकर

त॥ कमाविसदारान व राहादारान व ठाणेदारान व जमीदारान व जकाते बाजे लोक महालानिहाय सु॥ खमस सबैन मया व अलफ. र॥ गणेश शिवराम नि॥ राजश्री चिंतो विठ्ठल हे कसबें महेश्वरींहून देशीं जात आहेत. समागमें घोडीं रास पांच व माणसें सात असेत यांसीवाय बटीक एक अशीं जात असेत त्यांजला कोणेविशीं मुजाहीम न होतां आपलाली हद्दपार करून देत जाणें. जाणिजे छ० ४ सफर.

मोर्तब सुद

श्री.

लेखांक २७९.

१६९७ चैत्र शुद्ध ६.

राजश्री त्रिंबक बाबूराव कमा॥विसदार सरकार बिज्यागड गोसावी यांसि:--

स्ने॥ अहिल्याबाई होळकर दंडवत सु॥ खमस सबैन मया व अलफ. र॥ गणेश शिवराम निसबत राजश्री चिंतो विठ्ठल यांजकडील देशास जात आहेत. त्यास खरगोणास आल्यावर याजबराबर माणसें देऊन आपली हद्दपार करून देणें. असेरीस पावते करून देणें. जाणिजे छ० ७ सफर. बहुत काय लिहिणें ?

मोर्तब सुद

श्री.

लेखांक २८०.

१६९७ कार्तिक शुद्ध १.

रोखा शके १६९७ मन्मथनाम संवत्छरे कार्तिक शु॥ १ ते दिवसी खत लिखिते धनकोनाम राजश्री चिंतोपंततात्या यासी रिणकोनाम मल्हार खंडेराव कस्तुरे आम्मकार्य-परत-संमंधे तुम्हापासोन घेतले कर्ज म॥ भिवजी ना॥ येवलेकर मु॥ रुपये १२०९१ अक्षरीं बारा हजार येक्याण्णव यासी व्याज दरमहा दर सद्दे रुपये १ येकोत्रा प्रमाणें देऊं हे खत लिहिलें सही वि॥ ३० चिनसुट देऊं.

साक्ष.

१ पत्रा-प्रमाणें साक्ष केसो महादेव सिवारे क॥ पुणतांबे

पत्रा-प्रमाणें साक्ष राघोपंत जनार्दन दाउदखानी क॥ पुणतांबे सरकार संगमनेर

१ साक्ष शुक्लंभट चित्राव

गणेश तुळजी दि॥ म॥रानिले

पत्र-प्रें॥ बाबा वैष्णव मांडवगणे त्र्यंब (क) कर

श्री.

लेखांक २८१.

१६९७ कार्तिक शुद्ध १.

पार माहास्थल मौजे पाथरडी

दर्या बे॥ मोकदम मौजे हत्रळ सैदापूर, प्र॥ सेवगाव सु॥ सन ११८५ कारणें जामीनक॥ लिहून दिधला ऐसाजे. बीजमानत बो॥ मानको शामराज व बावाजी मल्हार कुळकर्णी मौजे साकेगांव प्रां॥ म॥र. यांस आपण हजीर जामीन असूं. सबब

कीं याचा व मौजे म॥रचे मोकदम व समस्त दाहीजन या उभयतांचा गाव नि॥ हिसेबाचा लढा आहे, यानिमित्य तुमचे थळास आले. त्यास तुम्ही आपले मायथळ करून मौजे टेंभुरणीचा पार दिल्हा. तेथें जाऊन म॥रानिले जाऊन हिशेबाचा फडच्या करितील. न करतां हजीर न जाले तर हजीर करूं. न करूं सको तर म॥रानिलेचे निसबर्ताचा जाब करूं. हा जामीनकरार लिहिला. सही.

बा॥ भवानी येशवंत निशाणी नांगर
कुळकर्णी मौजे म॥र

त॥ छ० २९ माहे साबान

श्री.

लेखांक २८२.

१६९७ कार्तिक शुद्ध १.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब.

दर्या बे॥ देवजी प॥ मे॥ मोजे काळेगांव प्र॥ सेवगांव सु॥ सन ११८५ कारणें. जामीनकदबा लेहून दिधला ऐसाजे. बीजमानत बो॥ नागोजी येकसिंग मौजे साकेगांव प्र॥ म॥र यांस आपण हजीर जामीन असो. आजी सबब कीं म॥रानिलेकडे सरकारची बाकी आहे. सबब म॥रानिले हजीर राहून फडच्या करितील. फडच्या न करितां गैरहजीर जाहाले तर हजीर करूं. न करूं तर म॥रानिलेच्या नि॥ जाब करूं. हे जामीनकदबा लेहून दिल्हा. सही.

गाही नि॥ नांगर
मकाजी प॥ आंबवे वि॥ चिंतो नागेश
मौजे चितळी. जोसी कुळकर्णी
गोमा महार बादल मौजेम॥र.
मौजे म॥र.

श्री.

लेखांक २८२.

१६९७ कार्तिक शुद्ध १.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब.

दर्या बे॥ दलजी प॥ मे॥ मोजे साकेगांव प्र॥ सेवगांव सु॥ सन ११८५ कारणें जामीनकदबा लेहून दिधला ऐसाजे. बीजमानत रो॥ रामजी गीगे मौजे म॥र यांसि आपण हजीर जामीन असो. आजी सबब कीं सरकारबाकी त्याजकडे आहे. त्याचा फडच्या करील. फडच्या न करिता गैरहजीर जाहाला तर हजीर करूं. हजीर न करूं तर याचे नि॥ जाब करूं. हे जामीनकदबा लेहून दिधला सही.

गाही नि॥ नांगर.
साचार्जी माळी माहा- वि॥ चिंतो नागेश
वळ मौजे म॥र. जोसी कुळकर्णी
मौजे मजकूर.

धोंडी माहार.
मौजे म॥र.

श्री.

लेखांक २८४.

१६९७ कार्तिक शुद्ध १३.

राजमान्य राजश्री राजो लक्षुमण यासी माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सीत सबैन मया व अलफ राजश्री बाबूराव कासी याणी हुजूर विदित केलें कीं आपल्यास जामिन देऊन राजो लक्षुमण याणीं कर्ज घेतलें त्याजवर आपण गुजराथ-प्रांतीं गाइकवाडाकडे चाकरीस गेलों तेव्हां मशार-निल्हे आपल्याबराबर बळेंच चाकरीस आले त्या वर्षी श्रीमंत कैलासवासी रावसाहेब भोसलेयावर स्वारीस गेले ते समयीं गाइकवाडांनीं फौज कुमकेस श्रीमं-

ताकडे पाठविली त्या बराबर आपण कार· कून करून दिल्हा होता त्याणीं राजश्री गोपाळन॥ तांबवेकर याजपासून तलबेचा निकाल करून घेऊन न पुसतां घरास गेला त्याजवर राजो लक्षुमण वगैरे आपणाजवळ तलबेचा पैका मागों लाग.ले त्यास त्या कारकुनास घेऊन येणें त्याजपासून निकाल करून देवितों असें सांगितलें त्याजवर त्या कारकुनाकडे कोण कोणा गेले ते ते काये समजलें हं कळलें नाहीं त्या उपरांत तो कारकून वारला त्यास आपण कर्जाचा तगादा करितो त्यामुळें त्या तलबेचा लढा सांगून कर्जाचा निकाल करीत नाहीं त्यास ताकीद जाली पाहिजे म्हणून त्याजवरून हें पत्र तुम्हास सादर केलें असें तरी तुम्ही चाकरी केली त्याचा फडशा त्या कारकुनापासून करून घ्यावा तो न घेतला त्याचा कइया बाबूराव कासी याजकडे काय या उपरी याचें गुजरातीचें कर्ज तुम्ही घेतलें आहे तें दस्ताप्रमाणें व्याजसुद्धां निकाल करून देणें येविषयीं फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे छ० ११ रमजान

आज्ञा प्रमाण. (लेखनसिमा)

श्री.

लेखांक २८५.

१६९७ कार्तिक वद्य ४.

श्रीमंत रे॥ तात्यासाहेब

दर्याबि॥ मोकदम मौजे जिवडगे प॥ सेवगांव सु॥ सन ११८५ कारणें साहेबाचे सेवेस जामीन-कदबा लेहून दिधला ऐसाजे. बीजमानत बे॥ बाबाजी मल्हार व माणकोजी शामराज कुळकर्णी मौजे साकेगांव यास आपण जमान असूं. आजि सबब कीं साहेबाच्या स्वारापासून म॥रनिले गैरहजीर जाले. याजनिमित्तें साहेबाच्या स्वारांनीं जामीनतलब केली. त्याजवरून म॥रनिलेस आपण हजीरजमन असूं. गैरहजीर जाले तर हजीर करूं. हजीर न करूं तर म॥रनिलेचे नि॥ जाब करूं. एक दिवस गैरहजीर जाले तर कार्यास येणार नाहीं. हा जामीनकदबा लि॥ सही.

नि॥ नांगर.

बें॥ माहादाजी माणकेश्वर कुलकर्णी मौजे म॥र.

छ० १७ माहे रमजान.

श्री.

लेखांक २८६

१६९७ कार्तिक वद्य ४.

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब.

दर्या बे॥ मकाजी प॥ आहेरे मौजे चीतळी प्र॥णें सेवगांव. सु॥ सन ११८५ कारणें जामीनकदबा लेहून दिल्हा-ऐसाजे. बिजमानत बे॥ भिमाजी डांगे चौगुले मौजे साकेगांव प्र॥ म'॥र यांस आपण हजीरजामीन आहों. तर म॥रनिले हजीर राहून फडच्या करितील. फडच्या न करितां गैरहजीर जाहाले तर हजीर करूं. हजीर न करूं तर म॥रनिलेचा जाब करूं. हे जामीनकदबा लेहून दिधला. सही.

गाहीं नि॥ नांगर

देवजी प॥ मौजे

काळेगांव

ब॥ चिंतो नागेश जोसी मौजे चीतळी

गोमा माहार बादल मौजे म॥र.

श्री.

लेखांक २८७.

१६९७ पौष.

र॥. चिंतो विठ्ठल यांजकडे बातमीकरितां माणसें पाठविलीं होतीं त्यांतून

एक माणूस त्यांनीं आपलेजवळ ठेवून घेतला ते सासवडानजीक आणि एक माणसासमागमें निरोप सांगोन पाठविले कीं माचीवाल्यांनीं बंगालेवाल्यास समजाविलें कीं हा मूल जो आहे हा वडील घरचा टिक्याचा खावंद आहे श्रीमंतास पेशवाईचा संबंध नाहीं. त्यावरून येथें आपठण आलियावर आपटणानें म्हटलें कीं मूल तरी लहान दौलत चालवावयास योग्य श्रीमंत दादासाहेब ते आहेत. थोर कृतकर्मे...हजर आहेत ते दौलत करितील. बारभाईनीं उत्तर केले कीं त्यांनीं नारायणरायास चांगलें न पाहिलें ते या मुलास व आम्हांस चांगलें काय पहातील याची पाठ आम्हीं घेतली याणीं मुलूक घेऊन असावें राज्याची गोष्ट तो घडणार नाहीं-त्यांसीं गुजराथेचा मुलूख देतों तेथें त्यांनीं असावें. किल्ला देणार नाहीं. किल्ला दिल्यानें खूळ करितील. थोरले श्रीमंताचा व इंग्रजाचा पूर्वीपासोन स्नेह तो एकीकडे ठेवून इंग्रजांनीं साष्टी वगैरे किल्ले घेतले हे नीत कीं काय ? तेव्हां आपटणानें उत्तर केलें कीं साष्टी वगैरे घेतली ही गोष्ट आम्हीं चुकलों तुमची माघारी तुम्हांस देतों. त्यासंबंधें जो खर्च लागला असेल तो तुम्हीं द्यावा. बारभाईनीं कबूल केलें कीं साष्टीचा खर्च माघारा देतों साष्टी द्यावी व चंद्रावरचें राज्य आमचें भोसल्याचें आहे तें सोडावें तेथील राजा कैदेस घातला आहे तो सोडावा. श्रीमंताचा पक्ष करूं नये. ते व आम्हीं समजोन घेऊं हा उत्तम पक्ष. मसलतसंबंधें जो खर्च मागतां तो ही देऊं वखारीस जागा पुण्यांत मागतां ती देऊं याप्रमाणें कबूल जाहलें. त्याविषयींचा मजकूर बोलावयाकरितां दोन इंग्रज मुंबईस पाठविले आहेत तेथेंच निश्चय ठरणें तो ठरेल. निदान गुजराथ खेरीज किल्ले देऊं याप्रमाणें ठरोन मुंबईस इंग्रज पाठविले आहेत. आपटणाचें म्हणणें मुंबईवाले चुकले असले तरी चाकरीवरून दूर करूं याप्रमाणें येथील मजकूर आहे. आपटणाच्या भेटी व माचीवाल्याच्या दोन वेळा जाहल्या. आपटणाकडे निरोपी माधवराव जाधवराई केले आहेत ते निरोप सांगतात त्याचे ऐकोन येतात याप्रमाणें जाहलें आहे. श्रीमंताचे मतें आम्हीं या कूटांत आहों परंतु आम्हांस येथें कोणी पुसत नाहीं ज्या कालीं अनीनिसि अनीन लागेल त्या कालीं जितके आमच्यानें घेवून ठेवितील तितके घेऊन ठेवूं. आतांच निघोन यावें तरी श्रीमंताचा पक्ष इंग्रज सोडीत नाहीं ऐसा तरी निश्चय कोठें आहे ? तथापि यावें तरी तूर्तच मुलालेकरांस प्रतिबंध होणार येथें राजश्री सखाराम बापूचे मनांत श्रीमंत नसावे ऐसें नाहीं परंतु पुण्यांत कामाचे नाहींत येथें असल्यानें आपणांस दगा करितील. बाहेर मुलूख घेऊन असावें परंतु हरएक प्रकारें सलूख करून बखेडा तोडावा ऐसें मानस आहे. भगवंतराव प्रतिनिधीची उभारणी बापूंनींच केली. नाना फडणीसाचें लक्ष भवानरायाकडे सर्वात्मने. त्याचे कुमकेस फौज पाठवावयास नानांनीं योजिली होती परंतु बापूनें मना केली. या उभयतांचें अंतर्याम शुद्ध नाहीं. बाह्यरंग एक आहे. माचीवाल्याचें म्हणणें कीं याप्रमाणें सलूख होत असला तर उत्तम, नाहीं तरी आम्हीं युद्धास सिद्ध आहों. मसलतीचा खर्च व साष्टीचा खर्च देऊं म्हणतां व वखारीस जागा वगैरे आमचीं कामें तुम्हीं करून देणार त्यास कबूल आहे. परंतु तम्हीं

श्रीमंतास हातीं द्या म्हणाल तरी आम्हीं देणार नाहीं. गुजराथचे पार करून देऊं मग तुम्हीं व ते समजोन घेणें. श्रीमंतांनीं गुजराथेवर ऐकलें तरी उत्तम जाहलें. न ऐकलें तरी याप्रमाणें तुम्हीं आम्हांस देणें म्हणजे आम्हीं मुंबईवाल्यांस सांगोन श्रीमंतास गुजराथेवर समजावितों. मुंबईवाल्याचे वोढून धरिलें तरी मुंबईवाल्यास चाकरीवरून दूर करूं. मुंबईवाल्यांनीं ऐकिलें आणि श्रीमंतांनीं न ऐकिलें तरी गुजराथ पार करून देऊं वडील घरचा मूल म्हणतां तरी तीन पिढ्या नाना माधवराव व हा मूल तीन पिढ्या दौलत केली हे बाजीराव याचे पुत्र असतां मुलास दौलत द्यावी हें ठीक नाहीं दादासाहेब च योग्य आहेत.

श्री.

लेखांक २८८.

१६९७.

श्रीमंत राजश्री तात्या साहेब

दर्या ब॥ भिकाजी डांगे चौगुले मौजे सांकेगांव प्र॥ सेवगांव सु॥ सन ११८५ कारणें जामीनकतबा लेहून दिधला ऐसा जे बिजमानत ब॥

नावजी डांगे मौजे म॥र यांस आपण हजीर जामीन असो. आजी सबब कीं म॥रनिलेकडे सरकारची बाकी आहे. गैरहजीर राहून फडश्या करतील. फडच्या न करितां गैरहजीर जाहले तर हजीर करून-हर्जार न जाले तर म॥रनिलेच्या नि॥ जाब करून नि॥ नांगर

मकाजी प॥ आहवे मौजे चितळी. ह॥ चिंतो नागेश जोशी कुळकर्णी

देवाजी प॥ मौजे काळेगांव. मौजे मजकूर.

श्री.

लेखांक २८९.

राजश्री जीवनाजी कोठवळे मु॥ मेहर बन्हाणपूर यासि प्रति केशो गंगादास व जैराजबाई मु॥ म॥र रामराम विनंती उपरी. रे॥ मोतीलाल देसावल याकडे सरकारचीं ताकीदपत्रें श्रीमंताचीं हजीर. त्यास मोतीलालाकडील रुपया जो येईल त्याची चवथाई पुण्याची श्रीमंताची व सेहर बन्हाणपूर सुभेदाराची चवथाई रे॥ येकूण रे॥ निमे सिवाय हजारीं तुम्हांस खाजगत रु १०० संभर देऊं. याप्रमाणें देऊं. यासी अनउत्तर न करूं. हें लिहून दिल्हें सही. बि॥ मकूदराज धनी दोघे हजूर लिहिलें सही.

श्री.

लेखांक २९०.

१६९८।९९.

यादि हिशेब गैरमजरा मौजे साकेगांव प्रे॥ सेवगांव सु॥ सन ११७७ इ॥ आवलसाल ता॥ अखेर जमा. रे॥.

१०६४ बाबती सरदेशमुखीपैकीं.

२०० मुरडपट्टी श्रीमंत र॥ सखारामपंत बापू यांचे गावाबाबद.

४९॥ कारकुनी बाबती सरदेशमुखी तिसाला तीस-गांवकरपैकीं.

१३॥ बेलदार चावडी गांवामधें.

२५ रामराय मैराल जंतीवाले करमलकर.

३२ बईल तोफखाना श्रीमंत रे॥ पंत प्रधान.

३०॥ राघोपंत व भास्करपंत कारकून जागीर.

११६॥ वांकी कचे जमेपैकीं.
९ बाजार बाबा.
१४० मोकासी सन ११७५ साल ब॥.
९६॥। गांवखर्च उचापत वगैरे.

१७७६॥।
५० कारकुनी वेतली रोखा रामचंद्र कासी पुणियांत.

१८२६॥।

श्रीपांडुरंग.

लेखांक २९१.

चैत्र शुद्ध ७ शके १६९९.

राजश्री माहादजीबावा सिंदे गोसावी यांसि

छ सकल-गुणा-लंकरण-अखंडित-लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्रे॥ त्र्यंबकराव महादेव आशिर्वाद विनंती येथील कुशल जाणोन स्वकिय लिहित जावें विशेष आपणाकडे आमचा कर्जाचा ऐवज येणें त्या पे॥ आपणा कडून देविले रुपये

३१००० रदकर्ज देणें चिंतो विट्ठल
३०००० देणे सदाशिव केशव ब॥.

६१०००

एकसष्ट हजार रे॥। पावते करुन कवज घ्यावें तेणें-प्रें॥ कर्जाचे ऐवजीं मजुरा पडतील छ ५ रविलावल बहुत काय लिहिणें चैत्र शुध्ध ७ हेमलंबी सवंत्छरे कृपा लोभ किजे हे विनंति.

श्री.

लेखांक २९२.

१६९९ ज्येष्ठ शुद्ध १०.

राजश्री बाबूराव रामचंद्र क॥दार मौजे साकारे पे॥ माणिकपुंज गो॥ यासी सु॥ समान सबैन मया व अलफ. तुम्हाकडे रसदेचा ऐवज येणें तो ब॥ देणें दिमत चिंतो विट्ठल याजकडून सिलेदारास आठवड्या पै॥

रुपये
१५०० साल मजकूरचें येणें ते
१५०० पेस्तर सालचे रसदेचे रुपये

३०००

एकूण तीन हजार रुपये देविले आहेत तरी पावते करून कबज घेणें. जाणिजे छ ८ जमादिलावल.

बार.

श्री.

लेखांक २९३.

१६९९ ज्येष्ट शुद्ध १५.

राजेश्री सिवराम रघुनाथ स्वामी गोसावी यांसिः—

विनंती उपरी. रत्ना फरास दिमत फरासखान याची जागा पेठ बुधवार शहर पुणें येथें रुंद हात १५ पंधरा व लांब हात ३० तीस यापे॥ होती. ती सरकारांत घेऊन माहादाजी बल्लाळ कारकून सिलेदार यास दिल्ही. याचें मुबदला छदू फरास याची जागा लांब हात तीस व रुंद हात २४ चोवीस इमल्यासुधां गणेश पेठेंत सरकारांत जप्तीस आहे व नूरखान गाडदी याची जागा खुली रुंद हात १५ छेदू फरास याचे जागेचे पुढें आहे ती ऐसें प्रें॥ फरासम॥र यास देविली असे. तरी देणें.

जाणिजे छ १३ जमादिलावल सु॥ समान सबैन मया अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंती.

श्री.

लेखांक २९४.

१६९९ आश्विन शुद्ध ७.

राजश्रियाविराजित-राजमान्य—राजश्री विसाजी केशव स्वामी गोसावीयांसी

पे॥ माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें विशेष सरसुभा प्रां। कोकण येथील फडणिसी र॥ गोविंद विठ्ठल यांजकडे होती ते दूर करून र॥ बलवंतराव माहादेव कोलटकर यांजकडे सांगितली होती ते हालीं दूर करून पेशजी प्रमाणें गोविंद विठ्ठल यास सांगोन वेतन पेशजी प्रमाण

सालीना.	रुपये
५००	खुद्द
१०००	पालखी
१६५	पागे अ॥ ३ एकून
२२॥	तेल दिवटीस दरमहा ८८७॥

प्रमाणें.

सालीना वजनपके ८=। दर ८८४ प्रमाणें.

१६८७॥

येकूण सोळासे साडेसत्यासी रुपये सालीना मोईन करार केली असे तरी मशार-निल्हे यांजपासुन फडणीसीचे काम काज वेऊन वेतन सालीना सरकारांतून सोळाशे साडेसत्यासी रुपये पावित जाणें जाणिजे छ ५ रमजान सु॥ समान सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री.

लेखांक २९५.

१६९९.

यादि चिंतो विठ्ठल यास सालमजकुरापासून जातीस तैनात देखील पालखी व शागीर्द पेशा वगैरे कुल पडलें पान सुध्दां सालिना सु॥ समान सबैन मया व अलफ

	रुपये
	३००००

यासी ऐवज म॥रनिलेकडे गांव व जमीन व वतन व असाम्या चालतात त्याचे रे॥ व हाली लाऊन द्यावयाचे मिळोन. रे॥

११८७८। चालत आहे त्याची वेरीज रे॥

२३९८। गांवचा आकार व जमीन रे॥

१६२३। सरकारांतून ईनामगांव रे॥

१३१०॥। मौजे अहीरे त॥ कर्यातमावळ दरोबस्त

३१२॥ मौजे रिहे त॥ पोनमावळ येथील मुकासा.

१६२३।

६०० मौजे आंबेसल त॥ जुलवणी प॥ मकडाई हा गांव भरतसिंग राजे यांनीं आपले तर्फेनें दिल्हा आहे त्याचा आकार सरकार होड येथील हिसेबी खर्च पडतो त्याप्रमाणें

१७५ जमीनीचा आकार रु॥
८५ मौजे हिंगणी त॥ कर्यातमावळ बागेस जमीन बिघे अजमासें ८१५
६० मौजे चांदसी पे॥ दिंडोरी पे॥ इनामजमीन चावर ·॥· आकार साला बाद हिसेबीं खर्च पडतो त्याप्रमाणें
४० मौजे सुंदरवाडी प॥ अशेर पे॥ जमीनी ब॥

१७५
३३०॥= मौजे कासार आंबोली त॥ मुठें खोरें येथील जिल्हे बाबा वगैरे पंतसचीव यांचे तर्फेनें आहे त्याचा आकार म॥रानिलेचे वडिलास पंत म॥रनिले यांनीं आश्रितपणा संमंधे धर्मादाव वर्षासन गांवगन्ना व जमीन त्याचा ऐवज यथास्थित न पावे याजकरितां त्या ऐवजीं मौजे मजकूरचा सदरहू अंमल सचीवांनीं दिल्हा आहे म्हणतात.

२७४८॥=
पे॥ वजा कासार आंबोली येथील जिल्हे बावा वगैरे आकार सन अर्बा सबैनांत म॥रानिलेस सालिना दाहा हजार पावावे असा करार जाहाला त्या बेरजेंत धरिले आहेत त्यास म॥रनिलेचे वडिलास सचीवांनीं गांव दिल्हा त्यास हालीं तैनातेसिवाय चालवावा ऐसें केले सबब वजा रु॥
३३०॥=
बाकी २३९८
७८०० कानगोईचे वतन माहालानिहाय प्रांत खानदेश म॥रनिलेचे तर्फीमेचा आकार अजमासे रु॥
११०००
पे॥ वजा सिबंदी व कारकून रो
३२००
बाकी रो
१६८० असाम्याचीं वेतनें रो
४०० शहर बऱ्हाणपूर येथील असामी केसो विठ्ठल यांचें नांवें.
२५० त॥ कर्यातमावल येथील फडणिसी जनार्दन गोविंद याचें नांवें.
३०० पे॥ सिंनर येथील फडणिसी अंताजी यशवंत याचें नांवें.
२५० प॥ वणं-दिंडोरी येथील फडणिसी आबाजी अनंत नि॥ म॥रानिले याजकडे.
३०० शहर बऱ्हाणपूर येथील बारा माहालचे तहसीलदारीची असामी.

१८० रामचंद्र आईतोळे याचे पागेची फडणिसी भिकाजी मोरेश्वर नि॥ माारानिले यांचें नांवें रोजमरा दुमाही रो ३० तीसप्रमाणें साहा रोजमऱ्याचा आकार.

१६८०

११८७८।
१८१२१॥। नेमून द्यावयाची बेरीज.

श्री.

लेखांक २९६.

१७०० फाल्गुन वद्य १०.

यादी चिंतो विट्ठल सु॥ समान सबैन /मया व अलफ. तैनात सालिना रु. ३०००० पे॥ नाडगौडेपणाचे वतनाचे ऐवजीं वजा रु. ७८०० बाकी तैनात सालिना करार २२२०० रुपये.

यास ऐवज म॥रनिलेकडे इनाम गांव व जमिनी व असाम्या चालतात. व साल-म॥रापासून लाऊन द्यावया[illegible]मेळोन

रुपये

५९४५॥। चालत आहे.
२३९८। गांव इनाम वैगेरे व जमिनी मिळोन आकार दस्तर रुजू बेरीज — रु.
३५४७॥ असाम्या
१६८० कि॥ त॥ अलाहिदा याद.
१८६७॥ कि॥ सालम॥रापासून
१६८७॥ सरसुभा कोंकण येथील फडनिशी.

१८० रामचंद्र येतोळे याचे पागेची फडणिशी.

१८६७॥

३५४७॥

५९४५॥।
१६२५४। सालम॥रीं लाऊन द्यावयाचा करार
६००० हतलाख ऐवज अखेर साला आंत पावावा —— रुपये
१०२५४। गांव लाऊन द्यावयाचे

१६२५४।

२२२००

येकूण बावीस हजार दोनसे तैनांत सालिना सदहूप्रमाणें असाम्या सात लिहिल्या आहेत. त्या पै॥ पेशजीपासून चालत होत्या त्या प्रें॥ चालवाव्या. न चालत त्याचा ऐवज वेतनांत बाकीस उतरून हुजरून पावेल येणे प्रें॥

सन अर्बा पासून छ २३ सफर सन राहिले वेतन द्यावे व तिस्सा सबैन फालत्या पै॥ दोन साले गुन मास. वजा करून बाकी वेतन द्यावे रुपये

१ एक साल सरकारांतून द्यावें.
१ एक साल पै॥ ऐवज मुच्छद्दगिरीनें मेळवून द्यावा.

—

२

होत नाहीं.

असल यादी दप्तरीं आहे त्याची नकल हे असे.

श्री.

लेखांक २९७.

१७०१ ज्येष्ट शुद्ध १४.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री धोंडो महादेव गोसावी यांसिः-

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ तिस्सा सबैन मया व अलफ. आबाजी माहादेव यांची मुलें मनुष्यें त्रिंबकास आहेत त्यांस उंटें व घोडीं व तट्टें माणसें देऊन पुणियास राजश्री चिंतो विठ्ठल यांजकडे पोंहचावून देणें. जाणिजे छ १२ जमादिलोवल आज्ञा प्रमाण.

लेखन सिमा

श्री.

लेखांक २९८.

१७०१ ज्येष्ट वद्य १३.

॥ श्री ॥ कहाडे श्वर चरणी तत्पर नारो कृष्ण निरंतर

छ म॥ अनाम देशमुख व देशपांडे सरकार बिज्यागड यासी नारोकृष्ण सुभेदार प्रांत खानदेश सु॥ समानीन मया व अलफ सरकार-मजकूर येथील कानगोईचें वतन राजश्री चिंतो विठ्ठल यांचे आहे. त्याची जती सरकारातून पेशजी झाली होती ती हालीं मोकळी करून हें पत्र तुम्हास सादर केलें असें तरी तुम्हीं कानगोईची जती उठवणें म्हणोन छ ४ रबिलावल-तिसा-सबैनची सनद सुभास सादर झाली त्यावरुन हें पत्र तुम्हांस सादर केलें असें तरी सरकार-मजकूर येथील कानगोईचे वतनाचा भोगवटा चालत आल्याप्रें॥ मशार-निले-कडे चालवणें जाणिजे छ २६ जमादिलावल मोर्तब सुद

श्री मोर्तब सुद

बार.

श्री.

लेखांक २९९.

१७०१ मार्गशीर्ष.

हिशेब भगवंतराव अनंत जवारकर

५० मुदल शके १६९७
२५ भाद्रपद शुद्ध ५
२५ आश्विन वद्य १२

५०

सरासरी मिती आश्विन शुद्ध १
६ व्याज त॥ भाद्रपद वद्य ३०
रोख
माहे १२ कचे ६००

५६

६॥। व्याज त॥ शके ९९ भाद्रपद वद्य ३० माहे १२

६२॥।

७॥ व्याज त॥ शके १७०० भाद्रपद वद्य ३० माहे १२

७०॥

९॥ व्याज त।। शके १७०१ कार्तिक वद्य ५ माहे १३॥

—

८०

श्री.

लेखांक ३००.

नकल

१७०२ आश्विन वद्य ५.

चिरंजीव राजश्री त्रिंबकराव यांसि चिंतो विठ्ठल आशिर्वाद उपरी आम्ही खुशरजावंदीनें खरिदी केली त्यापैकीं तुम्हांस दतनें वगैरे दिल्हीं बितपसील.

१ कानगोचें वतन प्रां खानदेश सरकार पैकीं निमे खंडो गंभीरराव निमे आम्हीं तो आम्हीं आपले निमे तुम्हांस दिल्हें इनामे वगैरे सुध्धा

२ मौजे रेहें व मौजे लालवावली येथील भट कुळकर्ण पोनमावळची

२ पुण्यांतील वाडे वोंकारेश्वराजवळचे व बाग

—

५

एकूण पांच पैकीं एक कानगोचें वतन व दोन कुळकर्णं ज्योतिषवृत्ती दोन गावची व दोन वांड तुम्हांस दिल्हे आहेत सुखरूप अनभवणें यास कोण्हासी संमध नाहीं कोण्ही भाऊबंद दिक्कत कदाश्वित् काल देश जाणून करतील त्यास आमची शफत असे तुम्हीं सरकार-लक्षानें वर्तणुक करून सुखरूप वंशपरंपरेनें अनभवणें मिती आश्विन वद्य ५ शके ७०२ शार्वरी संवत्छरे हें आशिर्वाद सरहू वतनास व घरास कोण्हा भावबंदास समंध नाहीं कोण्हाचा लढा यांत नाहीं हे आशिर्वाद.

—

श्री.

लेखांक ३०१.

१७०५ ज्येष्ट वद्य.

चिरंजीव राजश्री त्रिंबकराव यासिः— पार्वतीबाईचा आसीर्वाद उपरी. तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर असें नसावें येणाराबरोबर पत्र पाठवीत जावें. सखाबाईस यावयाबसी लिहिलें त्यास तेथें आल्यावर पारसनिसाचे वाड्यांत जावें लागतें त्यास तेथें जावयाची सोय नाहीं त्यास पुढें सोय पाहून यावयास येईल यास्तव यावयाची अडचण पडती. तुमच्या कामाकाजाविसी देवास विचारिलें त्याविसी गोप्रदान देवयाचें करार जालें त्यास रो। पाठवून देणें म्हणजे गाय घेऊन पाठवून देऊं. आम्हीं येथून पाठवित होतों परंतु ती आमची गाय घेत नाहीं तर आणीखी भवास विचारून काय लागेल ते रो। पाठवून देणें जमना इनें डबे करावयास दिल्हेत आरड्या जाहला असेल पा। देणें. त्याची मेहनत काय होईल ती लेहून पाठवणें म्हणजे पाठवून देऊं कळावे हे आशीर्वाद.

—

श्री.

लेखांक ३०२.

१७०५ ज्येष्ट वद्य १४.

विद्यार्थी सदाशिव भगवंत सां दंडवत विनंति त।। जेष्ठ व।। १४ रविवार पावेतों मु।। सातारा येथें असों विशेष येथील वर्तमान पेशजी लिहिलेंच होतें त्याचें उत्तर आलें नाहीं तेथून ग्रहस्त आले त्याणीं मात्र पत्रांतील भाव खुणेचे सांगितल्यावरून कळले येथील वर्तमान तरी श्रीमंताचा काल होतां च दसरे दिवशीं भिंती मोकळ्या

जाल्या त्याजवर राजश्री त्रिंबकराव आलिंयावर विचार होऊन मातुश्री सखाबाई यांस पुण्यास न्यावी हा आग्रह पडोन सखाबाईनीं एक उपोषण केलें ते वेळे धोंडो गणेश व नारो भगवंत याणीं फडनिसाचे कानावर घालोन इत्यर्थ ठराविला कीं, श्रीमंत तात्या याणीं हळोंच हातीं धरून खोलींत घालावी ही ही बातमी कळलियावर तो विचार राहिला फडनिसांचा आग्रह वस्त्रें देण्याचा आहेच परंतु बाबूराव याणीं तें काम परवानगीचा उजूर करून उभयतानीं हि पत्रें पाठविलीं आहेत ते परवानगी आठ दिवसांत आणून देणार राजश्री परशरामपंतभाऊ यांस लिहिलें आहे लोणीस यांचे व्याही चिंतोपंत लिमये आहेत त्यांस पत्रें पाठविलीं आहेत ते भाऊंजवळ रदबदली करून पत्र घेणार याजकरितां आपण त्वरा करून त्यांचें कानावर घालावें कीं वाटणी होऊन फारीखत जाली असतां बळेंच घरांत शिरोन त्याचे स्त्रीस अटक केली आहे याजकरितां दहाहजार रुपयं नजर घेऊन सरकारांतून दत्तपुत्र घ्यावयाची परवानगी देऊन पदाचीं वस्त्रें यावीं ह्याजप्रमाणें बोलोन वस्त्रास अडथळा पडे तें केलें पाहिजे आम्हीं घरास जाण्यास निरोप मागत होतों त्यास फडनिसाकडून अडथळा करून राहविलें आतां पळोन यावें या विचारांत आहों यावयास च्यारदिवस अधिकउणें लागतील याजकरितां पत्र पावतांच वस्त्रास अडथळा पडे तें करावें चिदरावर जामिनीची चिठी आपणास दिल्ही याजमुळें फडनिसास फारच विषाद आला आहे भेटीनंतर सविस्तर कळेल तात्यांचें पत्र आपल्यास शिवाजीबराबर आहे तें दस्ताऐवजींच आहे जिजीबाई एत असतां येऊं दिल्ही नाहींत ऐसें आहे तें दाखऊन वस्त्रास अडथळा पडे तें करावें आम्हीं तूर्त कारागृहातच आहों पुढें त्रिंबकरायास बाह्यात्कारें करावें पत्र मागील व हे वाचून फाडून टाकावें सविस्तर राजश्री गणपतराव वैद्य सांगतां कळेल त्यांस विचारावें हे विनंति.

श्री.

लेखांक ३०३.

१७०५ आश्विन शुद्ध १५.

श्रीमंत राजश्री जेयरामपंत दादा स्वामीचे सेवेसीः—

आज्ञांकित येसाजी सिताराम मुा॥ नासीक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २० जिलकादपर्यंत वर्तमान येथास्थीत असे. यानंतरी चिंतोपंताचे वाडियांतील वस्तवाणी मोजदाद करोन व गावांत मठकर व केसो ठाकर व माई ब्राह्मणीन याचें घरीं ठेविलें त्यापे॥ भिकाजी मोरेश्वर यांनीं नेलें काय बाकी राहिले त्याची चवकशी करून लेहून पे॥. उत्तर येईल त्याप्रे॥ वर्तणूक कर्णें म्हणून आज्ञा त्यावरोन

चिंतोपंताचे वाडियांतील मोजदाद केली त्याची याद तपसीलवार व बस्ता येक वेगळा च होता. त्यांत पांघुर्णें लुगडें व पोशाक वस्तवाणी सोन्याचे दागिने व रुप्याचे व मोत्यें कंठा येक रुजु यादि दोन पाठविल्या वस्तवाणी भांडीं वगैरे यादिप्रो चिंतोपंताचे च वाडियांत कोठडींत ठेवून आज्ञेप्रो त्याचे च जिमेस लाविलें. आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करूं.

कलम १.

धोंडाजी नाो रेवे याचें घरीं चिंतोपंताची वस्तवाणी वतनी कागद चाळीस

पन्नास आहेत. रेघे मजकूर याचे घरींहून कागदपत्र वस्तवाणीची चवकशी करून मुचलका घेऊन च्यार तट्टे भाडियानें करोन पांच गार्दी व नाइकास पुण्यास रवाना करावे म्हणोन आज्ञा त्यास रेघे मजकूर यास आपले पत्राचे पूर्वी पुण्याहून मुजरत जासूद च आला होता. आम्हास हि पूर्वी स्वामींनीं पत्र लिो होतें कीं धोंडाजी नो· रेघे याजकडे चिंतोपंताचे मुदे पुसावयाचे आहेत तर नाईक माार यास पा। देणें. आम्ही नित्य नाईकास तगादा करीत च होतो. नाईकाचा करार कीं विजयादशमी जाल्यानंतरी जावें पुण्याहून जासूद येथें तिसरे दिवशीं आला हें वर्तमान नाईकास कळल्य तरी आमचा निरोप घेऊन च्यार पांच दिवस गावांत च लपोन राहिले तेव्हां स्वामींचीं पत्रें ययें आलीं हें वर्तमान कळतां च नाईक पुण्यास आले मागें चिरं-जीवास पळविले मुलें माणसें झाडोन वाडियातोन गेलीं. घरास कुलपें लाविलीं. आम्ही घरीं चवकी बसविली नाईकाचा भाऊ त्या च वाड्यांत विभक्त आहे. त्यास तगादा केला आहे. धोंडाबा नाइकाकडे वस्तवाणी व कागदपत्र खरे आहेत. बाबू गणेश याचे रुमालांत यादी निघाल्या त्या सेवेसी पाठविल्या आहेत. वतनी कागद आहेत त्यापो भिकाजी मोरेश्वर यांनीं धोंडाबा नाईकास पत्र लेहून मखमला-बादचे इनामाबद्दल महजर व सरकारचे पत्रे व महजर मिळोन ११ आकरा नाई-कांनीं बाबू गणेश याजला देऊन पावती घेतली. वरकड वस्तवाणी कागदपत्र वस्-वाणीचे वस्त्यांत रेघेमजकूर यानें ठेविले त्याम तीन वार जाले थोडके दिवसाचा कारभार आहे. स्वामींनीं बाबू कोटवाले यास समक्ष पुसावें. रेघे याचे घरीं चवकी तमी च अमो द्यावी किंवा उठवावी ? आज्ञा येईल त्यो। वर्तणूक करूं.

कलम १.

गंगाधर मोरेश्वर यास तगादा करोन वरातेप्रे।। ऐवज घेऊन फडच्यास पुण्यास पे।। म्हणोन आज्ञा त्यास माारनिले धोंडो-पंत कादार याजकडे चाकर आहेत. आम्ही आपले आज्ञेवरोन तगादा केला सुभेदारांनीं आठा दिवसाचा करार केला कीं आम्ही पत्रें पुण्यास स्वामीस लिो. हे रुपये व येस ठाकर याजवदल रुपये लखाकडे आहेत. तेथें लखानें तोड पाडिली तरी उत्तम. नाहीं-तरी आमचें पत्राचें उत्तर आलें म्हणजे गंगाधरपंतानें रुपये द्यावे असें जाल्यास तोड पाडूं. तरी स्वामींनीं सुभेदाराचें पत्राचें उत्तर पाठवून द्यावें. त्याप्रे।। कर्तव्य करूं.

कलम १.

येस ठाकराकडे वरातीबद्दल फडशा करोन व्याजाचे फडशास पे।। म्हणोन आज्ञा त्यास लखा जेव्हां आम्ही पुण्याम पाठ-विला ते येस ठाकर त्यानें आपले जिमेस करोन घेतला तो अद्याप घरास आला नाहीं. आपले पत्रावरोन येस ठाकर याचे चिरं-जिवास तगादा आठ रोज रात्रं दिवस आणोन बसविला परंतु येक पेस्याचे दर्शन न जाले. पराकाष्टा जे करावयाची ती केली तेव्हां त्या मुलाजवळ जामीन घेऊन त्या मुलानें लखाकडे आपला चुलता शामजी ठाकर लखाकडे पा। आहे कीं तेथें लखानें रुपयाची तोड पाडिली तरी उत्तम नाहीं-तरी स्वामींनीं पत्र आपले धोंडोपंतास द्यावे ठाकराकडोन सरकारचा ऐवज यावयाचा आहे त्यास ठाकराची कुळें वाजवी अस-ील तीं कारकून वसूल करील त्यास दिमत न करावी. येथें कुळें हिमायती कार. ठाकरापासी कुळासिवाय एक कपदिक हि

निघ्यावयाचा नाहीं वरें मात्र आहेत. नित्य माध्यानीचें संकट जाणोन स्वामीस विनती लि॥. मान्य करणार स्वामी समर्थ.

कलम १.

केसो ठाकर याजकडे वजनी जिन्नस होता किती व भिकाजी मोरेश्वर यांनीं नेला किती. बाकी जिनस वगैरे राहिले तो (त)पसील लिो। म्हणोन आज्ञा त्याप्रे॥ चवकसी करोन केसो ठाकर वाणी याचे घरीं जिनस बाकी राहिला. व भिकाजी मोरेश्वर यांनीं नेला त्याची याद येकंदर पाठविली. जिनस त्याचे घरीं तसाच राहूं द्यावा किंवा चिंतोपंताचे वाडियांत नेऊन ठेवावा किंवा पुण्यास रवाना करावा! नाहींतरी वाणी याचे च जिमेस करोन येवज निरखाप्रे॥ द्यावा याची आज्ञा येईल त्याप्रे॥ वर्तणूक करूं. कलम १.

बापूभट मठकर

याजकडे भांडी होती ते भिकाजी मोरेश्वर यांनीं नेली त्याची याद म॥रनिलेचे घरीं आहे यादीची नकल घेऊन पाठवावी. भटजीस पुरसीस करावी त्यास भटजी तर मृत्य पावले त्याचे बंधु आहेत ते सप्तशृंगास अनुष्टानास गेले. घरीं बायेका व बाबू भटजीचा चिरंजीव लहाण आहे तो कांहीं माहीत नाहीं. त्या मुलापासीं जामीन घेऊन बापू भटाचा बंधु आणविला. तो आला म्हणजे आज्ञेप्रे॥ पुरसीस करितो. भटजीचे घरीं भांडीं ठेवलीं त्याची याद बाबू गणेश कोटवाले यास विचारलें त्यांनीं उत्तर केलें. भांडीं आणिलीं परंतु याद नाहीं. येकंदर याद मात्र बाबूचे रुमालांत होती ती सेवेसी पाठविली असे.

कलम १.

माई ब्राह्मणीन इचें घरीं पोथ्या वस्तवाणी भिकाजी मोरेश्वर यांनीं ठेविली ते आणिली बाकी कांहीं राहिली असेल त्याची चवकशी करोन लेहून पे॥ म्हणोन आज्ञा त्यास ब्राह्मणीनीचें घरीं बाळबद्द पोथ्या गाठोडें दोन होतीं तीं बाबू गणेश यांनीं नेलीं पावती घेतली आणिखी चीजवस्त कांहीं माईचें घरीं नाहीं. कदचा लेहून घेतला कीं चिंतोपंताचा याखेरीज सुतळीचा तोडा आंगीं लागल्याम हजार रु॥ सुन्हेगारी देऊं म्हणोन लेहून घेतलें.

कलम १.

खंडोपंत देशपांडे यास व्याजाचे फड. च्यास पो। म्हणोन आज्ञा त्यास धापेचा उपद्रव वृध जाला. चिरंजीव येक होता तो मृत्य पावला देशपांडे यास घोड्यावर चसावयास शक्त नाहीं श्रीमंत हरीपंत तात्यांनीं आज्ञा केली होती कीं खंडोपंतास व्याजाचा तगादा न करावा. त्याचे आज्ञेवरोन दोन महिने त्यास आम्ही तगादा केला नाहीं आपली आज्ञा प्र॥ परंतु त्यास आराम जाल्यावर पाठवून देतों. खताची मिस्सी पाहोन हिसेब लेहून पाठविला तरी येथें फडच्या करोन येऊं. तेथें च पाठवावें असी आज्ञा जाल्यास डोली भाड्यानें करोन आराम झाल्यावर पाठवून देतों. राजश्री धोंडोपंत सुभेदार यांनीं आम्हांस सांगितले आणखी येक वेळ स्वामीस पत्र लिहून हिसेबाची याद आणिल्यास उत्तम. नाहींतरी जाईन. स्वामीस विनंती लिहीणें हें च कीं देशपांडे वृध फार तरी खताची मितीप्रे॥ याद लेहून पे॥. खत पे॥ म्हणजे फडच्या करोन घेतों. कलम १.

राणोजी देशमुख पिंपळजकर याजकडे येके चाळीस व रीतीप्रे॥ ऐवज घेतला. राणोजी पळोन गेला. त्याचे बायकोनें रुपये दिल्हे. व्याजाची हि निकाल कर्ती तरी स्वामींनीं रोखा व व्याजाचा हिसेब

लेहून पे॥. येथें फडशा करोन घेतों. राणोजी असता तरी पाठवून देतो. रोखा हिमेच व्याजाचा जो होईल तो पाठवून द्यावा. कलम १.

राजश्री भिकाजी मोरेश्वर याचे वाड्यांत कोकणचे बन्हाडकरी राहिले त्यास आम्ही तसदी दिल्ही म्हणोन लिहिलें त्यास आम्ही तसदी दिल्ही नाहीं. येथून लिहिणार लबाडीनें पत्रें लिहीतात तीं स्वामींनीं ध्यानास न आणावीं.

कलम १.

बाबू कोटवाला याचा चुलता मृत्य पावला यास अवरोध आला याकर्ता पाठविला नाहीं. बाबूभट मठकर याची पुरसीस करावयाची व त्याचे घरीं चीजवस्त असेल ती बाबूचे गुजारतीनें आणायाची मठकर गांवीं नाहीं तो आला म्हणजे कदन घेऊन रुजुवात करोन बाबूस आज्ञेप्रे॥ पाठवितों वर्ते पाठवला म्हणोन लिो। परंतु अवरोधामुळें राहिला. च्यार पांच रोज जाले म्हणजे सेवेसी पे॥ ता.

कलम १.

सदरहू कलमें दाहा ध्यानास आणोन आज्ञापत्र येईल त्याप्रे॥ वर्तणूक करूं हे विज्ञापना.

पे॥ छ २७ जिल्काद सन अर्बा समानीन.

श्री.

लेखांक ३०४.

नकल.

१७०६ भाद्रपद वद्य १.

यादी सदाशिव गणेश काळकर वा॥ वाडा फणसें मौजे वार्डे ता। विजेदुर्ग वि॥ सटवाजी बिन कचोजी लाड हुजरे नि॥ सरकार.

३ भांडीं वगैरे
१ तपेलें तांब्याचें शेराचें.
१ तपेलें आच्छेराचें.
१ पळी लोखंडी.
० खुर्दा टके १॥९
—
३

९ पांगुरणें जुनीं
१ पागोटें
१ शेला
१ अंगरखा छिटी
१ ऐरडें सोवळ्याचे
३ धोत्रें
२ धोत्रें
१ आंगवस्त्र
—
३

१ पासोडी छिटी प।घरुण अंगावरील
—
९

१ पितळेची डबी तपकीरीची
१ बेडी लोखंडी पाई सरकारांतून पुण्याचे मुकामची
१ डोली बास सुद्धां
—
१५

येणें प्रे॥ पुण्यांतून किल्ले वंदन येथें मा॥रानिलेस अटकेस पाठविलें सनद सरकार छ २३ जा॥वल सन अर्बा समानीन पै॥ किल्ले मजकुरीं छ १४ सवाल भाद्रपद वद्य प्रतिपदा सन खमस समानीन मुक्काम बेलमाची.

श्री.

लेखांक ३०५.

नकल.

सिका.

ज्येष्ठ शु० ८ शके १७०८.

कबालेपत्र कोतवाली शहर पुणे विद्यमान वाशिराम सावलदास त॥ ताराचंद व॥ धरमचंद जोहोरी व हरीकचंद व॥ हिराचंद वखारी व पाणाचंद व॥ भुकण व मूळचंद व॥ रायचंद जोहोरी व आसाराम व॥ भुदरजी शेट व॥ कमवे शहर–मजकूर सु॥ सीत समानीन मया व अलफ सन हजार ११९५ शके १७०८ पराभव नाम संवछरे दिल्हे कवालेपत्र ऐसे जे माणिकविजे जर्ता गुरू हरकविजे गछविजे अनसूर व॥ पेंठ वेताल याची जागा पेंठ–मजकूरीं घर कवलार एक मजला खण सुमार ३ होते. ती देवालय पारसनाथाचें बांधावयास आगवड्या पिछवड्या सुध्धां इमल्यासमेत तुम्हांस विकत दिल्ही. त्याची किमत रुपये १५० दिडसे तुम्हांपासून घेऊन जागा स्वसंतोषें देऊन खरेदी पत्र करून दिल्हें. तें तुम्ही चैत्रा आणून दाखविलें. त्याजवरून चैत्रांहून गणेश रंगनाथ कारकून व कृष्णाजी बिन सुभानजी गवड्या चाकर नि॥ सरकार यास पाठवून जाग्याची मोजणी. वगैरे चौकसी करून कलमें करार करून दिल्हीं बि॥ बि॥

लांबी पुर्व पश्चिम आगवड्यास पश्चिमेस गल्लीचे हाद्देस भिंतीचे आसार सुध्धां पिछवड्यास पुर्वेस गल्लीचे हाद्देस घराचे भींतीचे आसार सुधा गज १९॥ सुमार. यासी चतुःसीमाः सेजार १ पुर्वेस मधी गल्ली, उत्तरे कडील सेजारी दामोदर कोठारी वगैरे याचे घरापासून दक्षिणेस रस्त्याकडे जात असे. रुंद पुर्व पश्चिम गज सुमार २॥ अडीच पलीकडे बाळा वल्लद जयराम कुंभार याचे घर कवलार.

१ पश्चिमेस मधीं गल्ली दक्षिण–उत्तर जात असे. रुंद पुर्व पश्चिम गज ४॥ साडेच्यार. पलीकडे कृष्णाजी बहिरव थत्ते यांचे घर कवलार.

१ दक्षिणेस सुकलाल परदेसी रजपूत याचे घर कवलार.

१ उत्तरेस इछी गुजराथीण व दामोदर कोठारी व केशवजी व बनेश्वर ब्राह्मण गुजराथी याचें घर कवलारी.

—

४

रुंदी दक्षिण उत्तर गज सुमार ६८१॥ ऐन गर्भी गज

·।१॥। चांदई दक्षिणेकडील ऐन रुंद गज ·।।३॥ पैकीं निम्मे सुकलाल परदेसी रजपूत याची गज सुमार ·।१॥। बाकी तुमचे घरा–खालीं

·॥· चांदई उत्तरेकडील खुद्द तुमचे जागा खालीं गज

——

६।॥३।

घरास शेतखाना जागा नाहीं स॥ दखल बाद कलम ०

घराचे पाणी मोरी बांधोन सिरस्ते–प्रों। रस्त्याचे मोरीस मेळावावें. कलम १.

पिछवड्यास पुर्वेस घराचे भिंतीस दर्वाजा गल्लींतून वागावयास पुर्वमुख असे. कलम १.

घराचा आगवडा पश्चिमाभिमुख असे. कलम १.

एकूण लांबी साडे एकूणीस गज व रुंदी पावणेसात गज सवातिन तसू व कलमें

सात येणेंप्रमाणें जागा तुम्हाकडे करार करून देऊन किंमतीच्या रुपयांवर सरकार सिरस्ता दरसद्दे रुपये १० प्रमाणें रुपये १५ पंधरा तुम्हांपासून घेऊन कबालेपत्र तुह्मांस मोगवटियास करून दिल्हे असे. तर सदर्हू जाग्यांत देवाल-याची इमारत बांधोन मुर्तीची स्थापना करून तुम्हीं व तुमचे पुत्र-पौत्रादी वंशपरंपरेनें पारसनाथाचा उत्छाव करीत जाणें. जाणिजे. छ ७ साबान. मोर्तब सुद. मोर्तब.

बार रुजू

श्रीशंकर.

लेखांक ३०६.

१७०८ कार्तिक वद्य १०.

खरीदीखत शके १७०८ पराभव नाम संवत्सरे माहे कार्तीक व॥ १० दशमी ते दिवसीं राजश्री विठ्ठल मोरेश्वर इ॥ गोपाळ नाईक उपनाम गोळे महाजन साकीन वेलंदूर त॥ गुहागर प्र॥ आंजणवेल सरकार सुभे दाभुळ हालीं व॥ क॥ पुणें यासी त्रिंबकराव चिंतामण जोसी राईरीकर साकीन उरवडे त॥ मुठेखोरें हाली व॥ क॥ पुणें सु॥ समानीन मया व अलफ. सन ११९६ कारणें आपण आपले स्वसंतोषें खरीदीखत लिहून दिल्हें ऐसेंजे. क॥ त्रासीक येथें श्रीक्षेत्र पंचवटींत घर आमचें श्रीरामचंद्रजीचे पश्चमेस आहे दक्षणेचे आंगे पीछावड्याचे दरवाज्यावर दुघई साया दुमजला खपरेल तख्तपोसीसुधां व पुढें उत्तरेस खुली जागा च्यार दिवाळीं घालून पुढील दरवाजा उत्तरमंस्थ लाविला आहे, त्यासुधां तुम्हांस फरोख्त दिल्हा असे. त्याची किंमत रो॥

शाहाजानीं पंचमेळ तमाम वजन पुरें आपण आपले पदरीं घेऊन घर व जागा तुम्हांस दिल्ही असे. त्याचे हमशाई पूर्वेस बाळं ठाकूर जटाळ, व पश्चमेस रस्ता, दक्षणेस गल्ली. श्रीरामचंद्रजीस जावयाची, उत्तरेस रस्ता. जाग्याची मोजणी ता॥. दक्षण उत्तर लांबी रुंदी पूर्व पश्चीम गज गज इमारती सिवाय इमारतीसिवाय दिपाये दिवाल गज वाला गज सुमार सुमार

गज येकंदर मोजणी इमारतसुधां येणेंप्रो॥ असे. घराचे दरवाजे आगवाडियाचा उत्तराभिमुख. पिछवाड्याचा दक्षणाभिमुख. त्याणें वागत जावें. घराचे पाणी आगवाड्याचे उत्तरेचे रस्त्यांत जातें तैसें जात जाईल. व पिछवाड्याचे पाणी दक्षणेकडे जातें तैसें जात जाईल. सदरहूप्रों॥ तुम्हांस हदमहदूद मिरास करून दिल्ही असे. सुखें तुमचे मनास येईल त्याप्रें॥ इमारत बांधोन वंशपरपरा नांदत जावें. यासी कोणी आमचे वंशींचा अथवा पर कोणी मुजाईम होईल त्यास आम्ही वारूं. तुम्हासी समंध नाहीं. हे खरीदखत तुम्हांस लि॥ दिल्हें. सही

श्री.

लेखांक ३०७.

नकल.

१७१० ज्येष्ठ शुद्ध १०.

राजश्री दुलभशेट गोविंदजी मु॥ के॥ पुणें गोसावी यांसीः-

छटु फुराम याची बायको खानम तुम्हास हें बेदावेपत्र लेहून दिल्हे कारण ऐसें जेः-

आमचा भर्तार छटू फरास श्रीमंत नारायणराव साहेब यांच्या दंग्यांत सरकारचे गुनेगारींत आला; सबब मजला चाकणचे किल्यांत मुलाबालासुधा कैदेंत ठविलें. भर्तार श्रीमंत दादासाहेबांबराबर होता, तिकडे मयत झाला. साडे तीन वर्षें मी कैदेंत होते त्यास सन समान सबैनांत तुम्ही सरकारांत विनंती करून माझा खंड ठराविला रुपये ३०० तीनशे; आणि आदितवार पेठेंत आमचे कामाठी महल्यांत खपरेल अकरा खण सरकारांत जप्ती होते, त्यापैकीं साहा खण सरकारांतून मजला बक्षीस राहावयास दिल्हें. त्याची सरकारची चीटी घेतली. त्याजवर सरकार खर्च वगैरे खर्च पडला; तो मजपासी द्यावयास नाहीं. तेव्हां सदरहू सहा खण तुम्हांकडे गाहाण ठेविलें त्याचें गहाणपत्र पेठ मारचे चावडीवर आमचा जातवाला दाऊदभाई याचे साक्षीनें लेहून देऊन तुम्हांकडून सरकारचे रु॥ देविले. व खर्चाचे रोख घेऊन दिल्हे. त्याजवर घरांत भाडेकरी घातला, आणि भाड्याचे दहावीस रुपये आले, ते तुम्हांस दिल्हे. पुढें तुमचे रुपये व्याजसुधां देऊन खण सोडवावे; त्यास, आपली नादारी, अन्न भक्षावयास नाहीं, आणि भाडेकरी कोणी राहीना. अशांत बाहादरखान गाडदी सरकार आज्ञा घेऊन जबरदस्तीनें येऊन घरांत राहिला भाडें पैसा येईना. त्याजवर माझीं पोरेंबालें मेलीं. अन्नासाठीं खेडेगांवीं जाऊन राहिलें. त्याजवर तुम्हीं गहाणवटाची हकीकत व पत्रें सरकारांत दाखऊन परवानगी घेऊन मोठ्या सस्तीनें बाहादरखानास घरांतून काढून खण साहा आपले कबजेंत ठेविलें; त्यास वरीस दीढ वरीस जाहालें. हालीं केवळ नादार, अन्नवस्त्र नाहीं, म्हणोन फते-महमद वल्लद शेख महमद व फते-आली वल्लद मिरजा मोमीन बेग दि॥ चाकर तोफखाना यांस घेऊन तुम्हांकडे आलें का सदरहू खण तुम्हांकडे आहेत ते तुम्हास बेदावाखत लेहून देतें आणि मजला साहा च्यार महिने अन्न पोटास द्यावें. त्यास तुम्हीं उतर केलें कीं, तुजला सोडविली, पदरचा पैका दिल्हा, त्यास दाहा वर्षें गुजरलीं, पैशास ठिकाण नाहीं, घर बाहादरखान यांणीं घेतले होते ते आम्हीं जबरदस्तीनें सोडविलें, त्यास व्याजसुधां पैका देऊन सोडवावें, निदान जें तुझ्या खातरेस येईल तें व्याज व मुद्दल देऊन आपला जागा घर चित्तास येईल त्यास विकणें, अथवा गहाण ठेवणें, आणि पैका देणें, आपले मोईचे घर नाहीं. म्हणोन बहुत प्रकारें सांगितलें. परंतु त्या घरास कोणी खरीददार होत नाहीं, आणि माझ्यानें गहाण ठेविल्यास कोणी ठेवीत नाहीं. मी आपले खुश-रजावंदीनें तुम्हांस बेदावा लेहून दिल्हा आहे. तर आगवाडा पिछवाडा पूर्वेकडील रिकामा जागा व बांधलेला इमलासुधां साहाखण तुम्हाकडे गाहाण होतें तें तुम्हांस खंडून तुमच्या ऐवजांत दिल्हें. मागेंपुढें कोणी या खणाविशईं वाद सांगावयाचा सबंध राहिला नाहीं. व तुमचे रुपये व्याजसुधां फिटले. तुम्हास बोलावयाचा समंध राहिला नाहीं. मिती शके १७१० कीलकनाम संवछरे जेट वा॥ ७ वार बुधवार सु॥ तिसा समासीन मया व अलफ. हस्तअक्षर महिपत मल्हार महाजन पेठ भातखळें सरकार जुन्नर

सदरहू निशाणी पांच बोटें करंगळीनें खानम छटु फरास याचे बायकोनें केली.

साक्ष

१ फते महमद वलद शेख महमद दि॥ तोफखाना असामी जेजालंदाज खानमचा जांवई यांनीं रुबरु साक्ष ल्याहावयास सांगितली कीं सदरहू घराचा वेदावा आपण मध्यस्ती करून, केला असे. हस्ताक्षर लक्ष्मण फटकाळे वर लिहिलेप्रमाणें खानम यास पुसोन लिहिलें असे.

निशाणी शेख-अदम खानमचा पालक लेक याची पारसी असे.

साक्ष भत्य आलीबेग वलद मीरजा मोमीनबेग दि॥ तोफखाना. आपण मध्यस्ती करून बेदावा करून दिल्हा असे हस्ताक्षर सदाशिव वाईच नि॥ घोले मंगलवाडेकर.

निशाणी नांगर.

१ पत्राप्रों। साक्ष सखाराम धोंडाजी. उभयता धणी रुजू.

१ पत्राप्रों। मनोहर अनंत किरकसे. उभयतां धणी रुबरु.

१ पत्राप्रों। साक्ष नंदापा वाळेकर दोघे धनी रुबरु.

१ शादतराम मोतीचंद शाखधणी बोई हजूर.

साक्ष जोत्या नष्टे.

——— दोघे.

धणी उरुबुरु.

श्री.

लेखांक ३०८.

नकल.

१७११ आषाढ शुद्ध ६.

यादि दुलभशेट गोविंदजी यांणीं सरकारांत विनंति केली कीं रविवार पेठेंत श्रीगोपालकृष्णाचें ठाकुरद्वार केलें आहे, त्यालागतीं चांभाराची जागा च्यार छपरें आहेत त्यास तेथून काढून चांभाराची जागा ठाकुरद्वाराकडे द्यावी त्यास सरकारची आज्ञा कीं चांभारास राजी करून काढावें. त्या चांभाराचे छपराचे दक्षणेस छटू फरासाची जागा सरकारांत जप्तीस आहे ती तान्हाजी येवला खिसमतगार याचे तसलमातीस दिल्ही आहे त्या जाग्यांत चांभार रहावयास राजी आहेत म्हणोन त्याजवरून छटू फरासाची जागा आहे तिचे मोबदला जागा सेटजीकडून दुसरेकडे घेऊन छटुची जागा पहावयाची आज्ञा. सु॥ तिसैन मया व अलफ.

छटू फरास याची जागा रविवार पेठेंतील सरकारांत जप्तीस आहे.

३० लांबी पुर्व पश्चीम हात
२६ रुंदी दक्षण उत्तर हात

—

या जाग्यांत इमला कौलार
२५ लांबी खण ७ येक हात
९ रुंदी हात.

—

हाली किंमत रो॥. १००

फरास मार याचे जाग्याचे मोबदला दुलभशेट याची जागा इमला कौलार दीड मजला पेठ रविवार
२३ लांबी हात
१४ रुंदी हात

—

इमल्याची किंमत अजमासे रो॥ २५०

दुलभशेट गोविंदजी यांणीं रविवार पेठेंत ठाकुरद्वार केलें आहे तेथें शेजारीं चांभाराचीं छपरें आहेत त्यास दुसरेकडे ठेवावे तर त्यास जागा पाहिजे याकरितां त्यांचे दक्षिणेस शेजारीं छटू फरास याची जागा

सरकारांत जप्तीस आहे ती मजला देवावी मी त्यास देईन. आणि त्याचे मोबदला माझी जागा पेठ माारीं आहे ती सरकारांत घ्यावी म्हणोन विनंती केली त्याजवरून शेटजींची जागा पेठ माारीं लांबी हात तेवीस रुंदी हात चौदा त्यांत इमला अजमासें अडीच शें रुपयाचा आहे ती सरकारांत घेऊन त्याचे मोबदला छदू फरास याची जागा चांभाराचे लगतीस दक्षणेस आहे ती सरकारांत जप्तीस आहे ती लांबी हात तीस व रुंदी हात सवीस त्यांत इमला अजमासे शभर रुपयांचा आहे ती जागा दुलभशेट गोविंदजी यास देणें म्हणोन सदरहू अन्वयें राघो विश्वनाथ याचें नांवे पत्र देवावें देणें.

सनद लिहीणें.

छ ४ सवाल सन तिसैन आशाढ मास.

श्री.

लेखांक ३०९.

नकल.

१७११ कार्तिक शुद्ध ७.

राजश्री राघो विश्वनाथ गोसावी यांसिः-

सुमा तिसैन मया व अलफ. दुलभशेट गोविंदजी यांनीं पेठ रविवार शहर पुणे येथें श्री गोपालकृष्णाचा ठाकुरद्वारा केला आहे. तेथें शेजारीं चांभारांचीं छपरें आहेत. त्यास दुसरेकडे ठेवावे तरी त्यास जागा पाहिजे याजकरितां त्यांचे दक्षणेस शेजारीं छदु फरासाची जागा सरकारांत जप्तीस आहे ती मजला देवावी. मी त्यांस देऊन त्यांची जागा ठाकुरद्वाराकडे घेईन. सरकारचे जाग्याचे मोबादला माझी जागा पेठमाारीं आहे ती सरकारांत घ्यावी म्हणोन विनंति केली त्याजवरून शेटीची जागा पेठमाारीं लांबी हात २३ व रुंदी हात १४ त्यांत इमला अजमासें अडीचशें रुपयांचा आहे. ती सरकारांत घेऊन मोबादला छदू फरासाची जागा चांभाराचे लगती दक्षणेस सरकारांत जप्तीस आहे ते लांबी हात ३१ व रुंदी हात २६ त्यांत इमला अजमासें रो शंभराचा आहे ती जागा सेटी माार यांस देणें छ ५ सफर वार कीर्दीस आहे.

श्रीसर्वेश्वर.

लेखांक ३१०.

१७१४ जेष्ठ शुद्ध १०.

पौ॥ जेष्ट शु॥ १३ त्रयोदशी शके १७१४ परिधावी संवत्सरे

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्र्यंबक रावजी स्वामीचे शेवेसीः—

सेवक मोरो त्र्यंबक गोडबोले साष्टांग नमस्कार विनंति विशेष. तिर्थरूप बाबां वैशाख वद्य एकादशीस देवाज्ञा जाली. हें वर्तमान मजला ब्राह्मणवाडे येथें समजलें. उपरांत घरीं आलों. कळावें. ईश्वरसत्ता प्रमाण. त्यांचे सर्व प्रकारें बरें जालें. आपलें छत्र गेलें. असो. तुम्हीं आपणाकडील सर्व वर्तमान लिहीत जावें. राजेश्री त्र्यंबकराव परचुरे यांस सा॥ नमस्कार सांगावे. र॥ मिती जेष्ट शुद्ध १० गुरुवार. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे. हे विनंति.

सेवेसी रामाजी केशव पळानिटकर सा॥ नमस्कार विनंति लिहिली पारसोन सदैव पत्रीं संतोषवीत असावे. या योगें स्नेह जाहाला यास अंतर नसावें. बहुत काय लिहावें ? कृपा लोभ करावा हे विनंति.

सेवेसी चिंतो रामचंद्र पळनिटकर कृतानेक सा॥ विनंति लिहिली पारसोन कृपेंल

अंतर नसावें. भेट होईल तो सुदिन. हे विनंति.

श्री.

लेखांक ३११.

१७१४ श्रावण.

विनंती विशेष. राजश्री मोरोपंत भाऊ आम्ही मेजवानीस बोलाविले होते. आपली गोष्ट श्रीमंताजवळ निघाली ते सहजात येथें काहाडली होती. तदनंतर असें हि बोलले कीं राजश्री बालाजीपंत सावरकर यांजवर हि कृपा बहुत करितात. आम्ही जनस्थानीं गेलों ते समई बालाजीपंत यास उद्योगाकरितां राहून घेतलें. राजश्री खंडेरावजी यांचें बरें व्हावें म्हणोन उद्योग केला. त्याचें फल ऑतां असावें त्यावरून मीं बोललों कीं ते ममता करितात यांत बाळाजीपंताचें उर्जित करण्यास अगाध नाहीं. ते थोर. त्यांणीं सहज यांजकडे बरें दृष्टीनें अवलोकन केल्यास कूर्मबालकापरी यांचे कल्याण होईल. जें आपलें म्हणविलें त्याचे चालवावें हे थोराचें लक्षण. यास्तव बाळाजीपंत कुलीण. थोर शहाणपणाची जात. अनुभवजन्य आहे. आपली दौलत थोर. संग्रह मनुष्यांचा असावा. श्रीमंत नानासाहेबीं जो मनुष्य गुणी आढळला, स्वराज्य परराज्यांतील, तो संग्रहोन ठेविला. बाळाजीपंत बुध्धीमान आहेत. याचा संग्रह आपल्याजवळ ऐसें भाऊचें हि मानस. त्यांत जे समई मा॥रानिल्हेस हातीं धरून सांगितलें कीं आमचें कल्याणाविसीं आम्हांजवळ असावें. त्यास थोरांनीं ज्यास हातीं धरलें त्याचे अभिमानपुरस्कर चालवितील च ते च आपण कोणे समई कोणी येक वस्तु संग्रहीं काय गुण. हे सुज्ञ सुक्ष्म दृष्टीनें अवलोकितात. मा॥रानिल्हेस नेमणूक त्या समयानरूप खर्चाची चालती करून आपले पदरीं ठेविलें असतां याचा हि पायगुण आपल्यास अनभवलाच आहे.

श्रीसर्वेश्वर.

लेखांक ३१२.

१७१४ श्रावण वद्य ३.

पैवस्ती श्रावण व॥ १३ शके १७१४ परिधावी.

राजश्री त्र्यंबकरावजी स्वामीचे शेवेसीः—

विनंति. राजश्री त्र्यंबकरावजीस पत्र आपलें लिहिल्यावरून पाठविलें आहे. ते कृपा करीतच आहेत. राजश्री बळवंतराव सावरकर यांस पत्रें आमचे लाखोट्यांत होतीं तीं पावती केलीं. त्यांनीं उत्तरें दिली आहेत. पावतील. आमचे येण्याचा योग कैंधीं म्हणोन लिहिलें त्यास चातुर्मास जालियावर विचार करावयाचा आहे. तुम्हीं फार सावधपणें वर्तणें. व मर्जी संपादन युक्तीनें करून घ्यावें. दर्शनास जात च असाल. सारांश प्रमाणीकतेची आवड यजमानास फार आहे. आपण हि तसेंच आहां. कसें वर्तावें हें ल्याहावें म्हणोन लि॥. त्यावरून लि॥ आहे. विशेष ल्याहावें नलगे. निरंतर वरचेवर होईल तें कळवाल तेणें करून संतोष असे. बहुत काय लिहिणें ? तीर्थस्वरूप राजश्री बाजीपंत दादा काकिर्ड्यास स॥ नमस्कार आपण जाऊन सांगावें त्याकडे आठा चोहों रोजीं जात जावें. समागम योग्य आहे. लोभ करावा. हे विनंति.

सेवेसी रामाजी केशव पळनीटकर कृतानेक स॥ नमस्कार. विनंति. येथील क्षेम श्रावण वद्य ३ पर्यंत जाणोन स्वकीय कु-

शललेखन करीत असावें. विशेष. आपण दोन पत्रें रुपेनी पाठविलीं तीं पावोन कुशलार्थ कळला. आपले पत्राचे अर्थ राजश्री भाऊसी बोलोन उत्तरें पाठविलीं आहेत, त्याजवरून सर्व अर्थ ध्यानांत येईल. सर्वदा पत्र पाठवून सांभाळीत असावें. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

श्रीसर्वेश्वर.

लेखांक ३१३.

१७१४ श्रावण वद्य ३.

पैवस्ती श्रावण व॥ १३ शके १७१४ परिधावी संवत्सरे.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्र्यंबकरावजी स्वामीचे सेवेसीः—

सेवक मोरो त्र्यंबक गोडबोले कृतानेक स॥ नमस्कार विनंति. येथील कुशल त॥ श्रावण वद्य ३ त्रितिया पर्यंत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. आपण एकदोन पत्रें विस्तारें लिहिलीं तीं पावोन सविस्तर कुशलार्थ कळले. चिठी यजमानाकडे द्यावयाची ती बराबर गेली असेल कामास अडथळा पडला याजमुळें दुसरी दिली म्हणोन लि॥ त्यास चिठी आम्हांबराबर आली नाहीं. यजमानाजवळ प्रविष्ट जाली आहे. खासगीकडे शोध करावा. थांग न च लागला तर दुसरी चिठी आपण दिली असेल तिजमध्यें पहिली चिठीचा आशय आणिला असेलच. त्यापक्षीं चिंता नाहीं सरकारचे ऐवजाच्या मुदती—भरत आल्या म्हणोन घोरांत आहों ऐसें विस्तारें लिहिलें त्यास जे वेळेस करार जाला ते समयीं गावचा वगैरे एकदम फडशा करावा ऐसा विचार करून च आपण कबूल केलें ऐसी गोष्ट जाली च आहे त्याजप्रमाणें पैरवी करून भरणा करावा वचनांत करारांत अंतर पडलें तर पुढें विशेष रुपा संपादून द्यावयाची त्यांस वांकडें पडेल याजकरितां रावजी करारसमयीं विचार करून जो नेम केला त्याजप्रमाणें पारे पाडावें घर मोकळे करून द्यावयाचें तें जें चित्तांत होतें तें च सुटलें तेणें करून बहुत संतोप जाला. यजमानास पत्र द्यावें म्हणोन लिहिलें त्यास करार आहे त्यांत कोठें गुंतले—यास कानावर पडलें म्हणजे ते क्षणीं च उलगडा पडतो. ऐसे रुपेचा प्रकार आपण लिहिला त्या पक्षीं उगेंच पत्र ल्याहावें ऐसी रीत नव्हे, म्हणोन लिहिलें नाहीं. कळावें. बहुत काय लिहिणें ? रुपा लोभ करावा. हे विनंति.

श्री.

लेखांक ३१४.

१७१४ आश्विन शुद्ध १.

राजश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबकरावजी स्वामीचे शेवेसीः—

पो। बाळाजी रामचंद्र सांवरकर कृतानेक स॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल त॥ आश्विन शु॥ १ मु॥ जनस्थान जाणून स्वकीयार्थ लिहीत असले पाहिजे. रुपा करून पत्र पाठविलें तें सुसमयीं प्रविष्ट होऊन परमानंद जाला. परंतु स्वकीय प्रकृतीचा मजकूर कांहीं लिहिला च नाहीं व राजश्री खंडेराव दादाजीस सरदारीचो वस्त्रें जालीं म्हणोन येथें दाट खबर ऐकतों, त्याचें हि कांहीं लि॥ नाहीं. या खेरीज राजश्री भिकाजी मोरेश्वर यांची जती मोकळी जाली म्हणोन येथें त्यांनी वदंता घातली आहे. हें हि कांहीं समजालियांत येत नाहीं त्यास रुपा करून आप्त जाणोन

सर्व मा॥र लेखनीं कळविला पाहिजे. यानंतर राजश्री लक्ष्मणपंत लेले यांचा मा॥र लि॥ यास मा॥रनिलेस मी निघालियाचे पाठीमागें ज्वर जाला त्याजमुळें त्यास कोणाची फुकट घोडचाची सोबत लागतांच आपला निरोप देखील न घेतां गंगापुरास आले. येथें आलियावर हि मला समजलें नाहीं. आतां समजलें. येथें येऊन हि बरें वाटत नाहीं. असो. परंतु आपला तर निरोप घ्यावयाचा होता ? अशाच्यानें कामें जर होतीं तर नोकर पृथ्वीवर कोणीच न राहाते. राजश्री धोंडोबा नाईक रेघे यांस साडेचौशाविशीं तगादा केला. ते समयीं बोलले कीं देतों. त्यास वायदा केला. त्याजवर फिरोन बदलले कीं, रावजीचें पत्र कोठें आलें ? त्याजवरून शिपाई बसविले. इतकियांत आपलें पत्र आलें कीं, सव्याज रुपये द्यावे. हें त्यांस दाखविलें. तेव्हां प्रयत्नानें वाटेवर येऊन आजचा च वायदा केला आहे. हे रुो आज्ञे प्रों। सव्याज घेतों. परंतु पुढील रुपयाविशीं तंटा पडेलसें दिसतें तगादा सख्त करीतच आहों. हे रुपये वसूल साडेच्यारशें जालियावर दिंडोरकर देशमुखास तगादा करितो; कळावें. धोत्रजोडे बेता प्रों तयार करविले आहेत. पीतांबराचा माग्या गांवास आमचे धोळखीचा गेला आहे. एका दोहों दिवशीं आलियावर तो हि उद्योग होईल. मध कोणी प्रमाणीकसा जासुद येऊं लागला म्हणजे जरूर पाठवितों. रा॥ मोरोपंत भाऊ दसरियास यावेसें केलें होतें, परंतु येथें ऐकिलें कीं, रा॥ दादाजीस वस्त्रें सरदारीचीं जालीं. त्याजवरून दीपवाळी करून निघावें ऐसें केलें आहे. मी हि शेवेसीं समागमें येतों. आतां पुणियांत येण्यास भरंवसा एक आपले पायाचा वाटतो. तेणेंकरून वारंवार दर्शनापेक्षा होते. भेट होय तो सुदिन आहे. रा। भाऊजी रा॥ दादाजीस व आपल्यास पत्र लि॥ आहे. याचे त्याजकडील मी हि त्यांस पत्र लि॥ आहे. त्या सुद्धां उत्तरें घेऊन प॥. त्यांचे उत्तर आणवावें म्हणोन रा। भाऊंनीं आपलियास लिहावयास सांगितलें आहे. शेवेसी श्रुत होय. दयावृद्धि करीत च आहेत. तसी निरंतर करावी. हे विज्ञाति. रा॥ विनायकपंतास नमस्कार प्र॥ करावे.

श्री.

लेखांक ३१५.

१७१४ मार्गशीर्ष.

पैवस्ती मार्गशीर्ष वद्य ११ शके १७१४ परिधावी संवत्सरें.

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे शेवेसीः-सेवक आवाजी भास्कर ठकार कृतानेक सा० नमस्कार विज्ञापना. ल्याहावेया जे आपले थोरले कामाविशीं माहदजी रानवडे याचे कानावर घातलें आहे कीं पाटिल वावाकडून करून घेणें त्यास त्यांनीं मान्य केलें आहेतेम्हणतात कीं त्यांची आमची भेट जाली म्हणजे बंदोबस्त करून देऊं त्यास आपण पंचमीस मुळखेडास यावें म्हणजे ते तिकडे येणार बेत केला आहे तर आपण अगत्य यावें कार्य करावया जोगे आहेत मी श्री कोल्हापुराहून आल्यापासून शरीरास समाधान नव्हत वायकोस व आम्हांस उभयतांस समाधान नव्हतें. आताशीं समाधान वाटत आहे. चिरंजीव बाळास त्याचे मागें लाविलें आहे. त्यांनीं मान्य केलें आहे पंचमीचा करार केला आहे. आपण यावयाची चिटी त्यांचे नांवें द्यावी.मोघम द्यावी कीं आम्हीं येतों. कळावें बहुत काय लिहिणें? कृपालोभ असो दीजे. हे विनंति.

आवंदा आडचण फार आहे. रुपयाची मात्र तजवीज करितों. माघ अखेरपर्यंत रु॥ १०० शंभर देतों. कळावें. हे विनंति.

हुं

लेखांक ३१६.

१७१७ चैत्र वद्य १२.

रणमस्तखान व दावेदार-खान टोके खुश-वख्त बाशद.

छ तहवर व जलादत दस्तगाहा सु॥ खमस तीसैन मया व अलफ. राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांचे कर्ज तुम्हाकडे येणें त्याचा फडशा वाजवीचे रीतीनें करून देत नाहीं म्हणोन हुजूर विदित जालें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे तरी मा॥रनिलेचे कर्जाचा फडशा वाजवी खता पें॥ करून देणें.

जाणिजे छ २५ रमजान. जादा काय लिहिणें ?

श्री राजा शाहु नर पति हर्ष निधान माधव राउ नारा- यण प्रधान.	लेखन सीमा

श्री.

लेखांक ३१७.

१७१९ फाल्गुन वद्य ६

छ ७ सवाल चैत्र मास सुहूर-सन समान तिसैन मया व अलफ.

साहेबाचे सेवेसी पुरवणी ता॥ छ १९ रोजीं सेना-धुरंधुर यांनीं समारंभ दिवाण-खाण्यांत करून सर्व मुछद्दी मंडळी व मानकर वगैरे यांसी बोलाऊन राजश्री भवानी माळो व त्याची मंडळी बळवंतराव भवानी सुध्दां अधिर लक्ष्मण रामचंद्र माधव कृष्णराव माधव अनंदराव वैद्य व नेमतराव कायत शिंद्याक डील व केशवराव व्यंकटेश होळकारा-कडील वकील व नरसिंगराव अनंत नबाबा-कडील बुऱ्हानशाचे चिरंजीव असामी दोन गुजर मंडळी व्याही जावई व भासे वगैरे मिळोन पाऊणशें इसम यांसी वस्त्रें शेला पागुटीं योग्यायोग्य पाहून बराणपूर ज्याहनाबाद येणेप्रे॥ दोन सनगें सर्वांस देऊन राजश्री पग्सोजी भोसले यांसी शेला पागुटें पैठणी अबासी दिल्हे व मुधोजी भोसले यांसी कुंचडेंटोपडें झगा दिल्हा बादलीपोशाख दिल्हा राजश्री सेनासाहेब सुभे यांसी बसंती वर्खी कच्या रंगाचे सेलापागुटें दिल्हें नंतर अत्तरदान पानदान गुलाब होऊन सेनासाहेब सुभे यांनीं आपल्या कडून वर्खी कच्या रंगाचा पोशाख दिल्हा सर्वांस निरोप दिल्हा साहेबाचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्री. लेखांक १.

लेखांक ३१८.

१७१९ माघ वद्य ३०.

पे॥ छ ४ रमजान सुहूर सन समान तिसैन मया व अलफ मु॥ पुणें.

श्रीमंत महाराज राजश्री अमृतरावसाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक व्येकाजी नींबाजी मुकाम कारवान दोनी कर जोडून रुतानेक सां॥ दंडवत विज्ञापना येसीजे:— ता छ २८ माहे शाबान रोज गुरुवारीं अस्तमानीं डाक रवाना केली. येथील बातमी

नवाब वंदगानअलीचें वर्तमान त॥ छ २३ माहे शाबान रोज सेनवारीं तिमरे प्रहरास डाक रवाणा केली ते सेवेसी प्राविस्ट जाहली असेल. छमजकुरीं मिस्तर छोटे कीरीकपात्रीक फिरंगी वकील याचें येथें वर्तमान आलें कीं बंदराकडे इंगरेज फिरंगी व फरासीस फिरंगी याची लडाई जाहली. इंगरेज फिरंगी यांनीं फरासीस फिरंगियाचे सात झाज पडव करून आणले म्हणून वर्तमान आलें. सबब त्यांनीं खुसी केली. त्याजवरून नवाबांनीं इकरामत-दवला भाऊसिंगचा उपरि यास हुकूम केला कीं नवे तोफा तकतावर च्यार चडविल्या आहेत त्या तोफाचे अकरा बार फिरंगियाचे खुसीचे करवणें. आणखी नवे तोफाचा पला पाहणें, म्हणून हुकूम केला. मग भाऊसिंगचा उपरी व इकरामतदवला यांनीं जाऊन नव तोफाचे अकरा बार खुसीचे केले. नवे तोफाचा पला पाईला, ते अर्ज जाहली. खिलबत्तीतील लहान च्यार तोफा तेरा जजाला तयार करावयास जीनसीमधें पाठविले. ते तयार करून वाडन पेठेस पाठवणें म्हणून हुकूम जाहला. संध्याकाळीं मसरनमुळूक बरामद जाहले. भाऊसिंगचा उपरी व इकरामतदवला मामुली इसम याचा सलाम जाहला. गोस्टमात अवघेयासि जाहली. इकरामतदवला यानें नवे तोफाचा पला पाहून आले ते सांगितलें. येक प्राहरास बारखास जाहले. इकडे नवाब च्यार घटका रात्रीस पच-माहलांत बरामद जाहले. सैद उमरखां व मीरदेतारअलीखां व मामुली इसम याचा सलाम जाहला. गोस्टमात अवघेयासी जाहली. रेजेपुरजेवाले व दोघ आदळे याचं गायण होतें तें ऐकत बसले. ते येक प्रहर पांच घटकास बारखास जाहले. रात्रीस खैर सला. ता॥ छ २४ माहे शाबान रोज रविवारीं नवाब साहा घटकास जागले मसरनमुळूक जागले. मग नवाब दोन प्राहरास पच-माहलांत बरामद जाहले. कलण हज्याम व सेख उमरखां व मीरदेतारअलीखां व मामुली इसम याचा सलाम जाहला. गोस्टमात अवघेयासी जाहली. मग नवाबानें हज्यामत घेतली. दोन प्राहर तिसरीमधे बरखास जाहले. मग इकडे मसरनमुळूक येक प्राहर साहा घटकास बंगलेमधें बरामद जाहले. मीर अमजरांदवला समसेरजंग रघोत्तमराव रेणुराव व मामुली इसम याचा सलाम जाहला. मग मसरनमुळूक रघोत्तमराव रेणूराव रोसेनराय यासी गोस्टमात जाहली. यांनीं कागदपत्र दाखविले ते पाईले. मग मीर अमजरांदवला समसेरजंग यासी गोस्टमात जाहली. मग मसरनमुळूक अडीचा प्राहरास पालकीमधें स्वार होऊन चवकांतील आपली हवेलीमधें गेले तेथें बसले. मसरनमुळूक रघोत्तमराव रेणूराव रोसेनराय यासी एकांत गोस्टमात जाहली. कागदपत्र दाखविले ते पाईले मग तीम इसम अरब याची मिसल पाईली. मग तेथून तीन प्राहरास निघाले ते आपले हावेलीस दाखल जाहले. ते अर्ज जाहली. रे॥ नरसिंगराव अमील मसेमुद्दळास गेला त्याची अर्ज जाहली. मग नागपुरास भोसले याजकडे नवाबाकडील येक सुर्तुस्वार व रे॥ माधवराव वकील भोसले याचा याजकडील येक सुर्तस्वार ऐसे दोघ सुर्तुस्वार नवाबाकडील कागदपत्र व माधवराव वकील याजकडील पत्र घेऊन नागपुरास गेले त्याची अर्ज जाहली. येलजपुराहून इसमालखां याजकडील पत्र घेऊन जासूदजोडी आली ते अर्ज जाहली. आणखी नागपुराहून येक सुर्तुस्वार पत्र घेऊन रे॥ माधवराव वकील भोसले याचा

याजकडे आला त्याची अर्ज जाहली. रात्रीस येक घटकास मसरनमुल्लूक बंगलेमधे बरामद जाहले. मीर अलम व मुस्तकीमजंग व रघोत्तमराव व मामुली इसम याचा सलाम जाहला. मग एकलतदवला धाकले खममहून एक त्याची मुलाजमात जाहली. नजर गुजरली. मग मसरनमुल्लूक मीर-आलम व मुस्तकीमजंग रघोत्तमराव व एकलतदवला यासी एकांत गोष्टमात जाहली. मग एकलतदवला यानें खममेचें पत्र दाखविलें तें पाहिलें. व मग मीरअलम यानें चिनापटणचे कागदपत्र दाखविले ते पाहिले. मग रघोत्तमराव यानें पुणेचे डाकेचे पत्र आलें होतें तें दाखविलें तें पाहिलें मग धारूराकडील डाक आली ते गुजरली ते पाहिले. येक प्राहरास वरखास जाहले. रात्रीस नवाबाचे दरबारची खैरसला. ता छ २५ माहे शाबान रोज सोमवारीं नवाब साहा घटकास जागले. मग मसरनमुल्लूक जागले. व मग मसरनमुल्लूक येक प्राहरास बंगलेमधें बरामद जाहले. मीर आलम व मुस्तकींमजंग रघोत्तमराव रेणूराव व मामुली ईसम याचा सलाम जाहला. मग मसरनमुल्लूक मीर आलम मुस्तकीमजंग रघोत्तमराव यासी येकांत गोस्टमात जाहली. यांनीं कागदपत्र दाखविले ते पाहिले. मग येलजपुराहून इसमालग्वां याचें पत्र आलें होतें तें गुजरलें तें पाहिलें. मग चवचे-यासी गोस्टमात जाहली. तीन प्राहरास वरखास जाहले. ते अर्ज जाहली. नवाबाचे दररबारची खैरसला. चिनापटणाहून मिस्तर इसभीन साहेब फिरंगी व आणखी येक फीरंगी ऐसी दोघे फिरंगी आले. त्याची आर्ज जाहली. संध्याकाळीं मसरनमुल्लूक बंगलेमधें बरामद जाहले. मुनीरन मुल्लूक व रोसेनराय व मामुली इसम याचा सलाम जाहला. गोस्टमात रोशेनराय व मुनीरनमुल्लूक यासी जाहली. यांनीं पत्र दाखविलें तें पाहिलें. येक प्राहरास वरखास जाहले. रात्रीस नवाबाचे दरबारची खेरसला. ता छ २६ माहे शाबान रोज मंगळवारीं. नवाब माहा घटकास जागले. मग मसरनमुल्लूक जागले. मग मसरनमुल्लूक सात घटकास जाऊन नानकराम याचे हवेलीमधें वसले. तेथें रघोत्तमराव व मुनीरनमुल्लूक व मामुली इसम यास बोलाऊन घेतलें. याचा सलाम जाहला. गोस्टमात अवघेयासि जाहली. मग नवाब जनाने—याचे बंदोबस्तीनें मसरनमुल्लूक याचे चवकांतील हवेलीमधें आले तेथें वसले. नाच कंचन्याचा होता. गुलाल पाहिला. मग तेथून नवाब दोन प्राहरास निघाले ते जनानेयाचे बंदोबस्तीनें आपले हवेलीस दाखल जाहले. मग मसरनमुल्लूक व तमाम अमीर उमराव दिवानखानेमधें येऊन बसले. तेथें मसरनमुल्लूक रघोत्तमराव व मीर अमजतदवला यासी गोस्टमात जाहली. गुलाल पाहिला. मग मसरनमुल्लूक दोन प्राहर येक घटिकास निघाले ते आपले हवेलीस दाखल जाहले ते अर्ज जाहली. खैरसला. संध्याकाळीं मसरनमुल्लूक बंगलेमधें बरामद जाहले. रघोत्तमराव रोसेनराय व मामुली इसम याचा सलाम जाहला. मग मसरनमुल्लूक रघोत्तमराव रोसेनराय यासी गोस्टमात जाहली. यांनीं कागदपत्र दाखविले ते पाहिले. येक प्राहरास वारखास जाहले. मग नवाब च्यार घटकास पच--महालांत बरामद जाहले. सेख उमरखां व मीरदेतारअलीखां मामुली याचा सलाम जाहला. रेजेपूरजेवाले व आदळे याचें गायेण होतें ते ऐकत बसले. दीड प्राहरास वरखास जाहले.

रात्रीस खैरसला. ता छ २७ माहे शाबान रोज बुधवारीं नवाब साहा घटकास जागले. मग मसरनमुळूक जागले. मग नवाब येक प्राहर तिसरीमधें खावागामधें बरामद जाहले. मसरनमुळूक मीर एकजतदवला व मामुली इसम यास बोलावून घेतले. याचा सलाम जाहला. मग नवाबासी मसरनमुळूक यासी गोस्टमात जाहली. येक प्राहर साहा घटकास बरखास जाहले. नासरमुळूक याचा नातू लहान मूल निवरतल्याची अर्ज जाहली. मग मसरनमुळूक बंगलेमधें बसले. रघोत्तमराव रेणूराव रोसेनराय यास बोलावून घेतले. याचा सलाम जाहला. गोस्टमात यासी जाहली. यांनीं कागदपत्र दाखविले ते पाहिले. तीन प्राहरास बरखास जाहले. गोदड-आबडाबादेहून येक तोफ आली ते जीनसीमधें दाखल जाहली ते अर्ज जाहली. संध्याकाळीं मसरनमुळूक बरामद जाहले. मुनीरनमुळूक व अज्यावणमुळूक व मामुली-याचा सलाम जाहला. गोस्टमात अवघेयासि जाहली. दिल्लीचें पत्र अकबारीचें आलें होतें तें पाहिलें. मग मुसारईमु फिरंगियास खमम तालुका दिल्हे. साहा घटकास बरखास जाहले. मग नवाब च्यार घटकास पच-माहलांत बरामद जाहले. शाहगारितपेशा याचा सलाम जाहला. शैख अदळे यार्चे गायेण ऐकत बसले. ते येक प्राहर तिसरीमधें बरखास जाहले. रात्रीस खैरसला. ता छ २८ माहे शाबान रोज गुरुवारीं नवाब साहा घटकास जागले. मग मसरनमुळूक जागले. नवाबाचे दरबारची खैरसला. मसरनमुळूक याचे दरबारास जाब जाहला. दरबारची खैरसला. महमदहुसेन अलीखां भोपाळवाला आला होता. जमादार यास पन्नास स्वारानिसी चाकर ठेविले. येक मोगल यास पंचवीस स्वारानिसी चाकर ठेविले. रघोत्तमराव कोटकर वगैरे तीन ईसम यास दीडसेहे स्वारानिसी चाकर ठेविले. आरब पन्नास पुण्याकडून आले त्यास चाकर ठेविले. आणखी आले ते लोक ठेवितात. कळावें. धारुराकडे कांहीं जमीयेत पाठविणार म्हणून बोलतात. कळावें. जाहलें वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. आणखी जें होई तें सेवेसी लिहीण. कळावें. सेवेसी सुर्त होय हे विज्ञापना.

श्रीपांडुरंग. लेखांक २.

लेखांक ३१९.

१७२० फाल्गुन शुद्ध १

पे॥ छ २४ शाबान सुहूर सन तिसा तिसैन मया व अलफ

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबाचे सेवेसी.

आज्ञाधारक तुकाजी लकोबा व बाला सावत कृतानेक दंडवत विज्ञापना त॥ छ माहे रमजानपावेतों साहेबाचे कृपावलोकनेंकरून मु॥ नागपूर येथें सेवकाचा वर्तमान येथास्थित असो. यानंतर राजश्री सईना साहेब सुभा याजकडील वर्तमान छ ४ रोजी पावेतो साहेबाचे सेवेसी लिहिला च आहे. यानंतर छ ५ रोजीं नागपुरापासून चवा कोसावर कापसी म्हणून गांव आहे तेथें श्नान देवपूजा करून भोजन करून बाडालगत च विचोबा होता तेथें आपण व कृष्णराव माधव श्रीधर लक्षुमन ऐसें बोलले प्रहर दिवस होतां आपल्याकडील अप्पाजी रघुनाथ आले-यावर त्यासी दोन घटका बोलून त्यास रवानकीचे विडे दिले व बरोबर स्वार देववाविसी नेमणूक जाली. नंतर च्यार घटका

दिवस राहतां सईनासाहेबसुभा व परसोजी भोसले याचे कुटुंब नागपूरास रवान केलें. यावर आपण व कारभारी बसून साहा घटका बोलणें जालें. नंतर च्यार घटका रात्रीस दरबार बरकास जाला. कारभारी डेऱ्यास गेले. छ ६ रोजीं कुच जालें आपण स्नान देवपूजा करून भोजन करून दीड प्रहर दिवस येतां कुच जालें. आठा कोसावर माथनी मोहोन म्हणून गांव आहे, प्रगाना नजरधन, प्रांत रामटेक. साहेंकाळीं मुकामास आले. गांव गुज्याबा गुजर याजकडे आहे. पुन्याकडून डाकची पत्रें आलीं होतीं. मग च्यार घटका रात्रीस कारभारी बोलाबून आपण व उभयेता कारभारी बसून डाकचीं पत्रें वाचून पाहिलीं. नंतर साहा घटका खलबत जालें. सवा पाहार रात्रीस नागपुराहून भवानी काळू मागें राहिले होते ते आले. नंतर दोन घटका बोलून सवा दो पाहारा रात्रीस दरबार बरकास जाला. छ ७ रोजीं मु॥ जाला. गुज्याबा गुजर यांनीं मेजमानी केली. सेनासाहेब व सईना-धुरंधर व परसोजी भोसले वगैरे दोनसे लोक जेवले. व उंट व घोड्यास दाना दिल्हा. च्यार घटका दिवस येतां स्नान देवपूजा करून, प्रहर दिवस येतां आपण व भवानी काळो व उभयता कारभारी बसून विठल वल्लाळ सुभेदार व रघुनाथ गोथ-घाटगे यांस पत्र लेहून सांडणीस्वार रवाना केले. दो पाहारा दरबार बरकास जाला. नंतर भोजन करून निद्रा केली. साहेंकाळीं निजून उठले. नंतर कचेरीच्या डेऱ्यांत बसून येसू सुभावा सिलेदार याचा घोडा करडा बोर बहुत चांगला होता तो आणून सरकारांत पागस लाविला. च्यार घटका रात्रीस भवानी काळोबा येऊन बोलत बसले. साहा घटका रात्रीस कारभारी आले-यावर आपण व कारभारी बसून येक प्रहर बोलनें जालें. नंतर भवानी काळो याच्या जावयास बेमार च वाखा होता म्हणून निरोप घेऊन पाव्ने. दो पाहारा रात्रीस कुच करून नागपूरास गेले. आपण व कारभारी बसून दोन घटका खलबत जालें. दो पाहारा रात्रीस (खजिन्याचे उंट च्यार) दरबार बरकास जाला. छ ८ रोजीं मुकाम च होता. प्रथकालीं स्नान देवपूजा करूण प्रहर दिवस येतां कलकत्त्याचा फिरंगी करमारटिश साहेब याजकडोन मुजरद जाडी पत्र घऊन आले-यावर आपण व कारभारी बसून तीं पत्रें वाचून पाहिलीं. नंतर च्यार घटका खलबत जालें. दीड प्रहर दिवस येतां दरबार बरकास जाला दो पाहारा भोजन करून श्वारी तयार करून, आपण व सईना-धुरंधर व परसोजी भोसले वगैरे मानकरी व उभयेता कारभारी पैसे जाऊन सवदागराचे उंट सुमारीं १२७ आले होते ते खरेदी केले. त्यानें नजर दाहा डब्या केल्या. नंतर सेना-धुरंधर याजबराबर बानाच्या कैच्याचे उंट सुमारीं १५ जातात त्या बानाची परीक्षा पाहिली. दाहा बान सोडले. दोन बान येक येका कोसावर गेले. नंतर दोन घटका बोलून साहा घटका दिवस राहतां श्वारी डेऱ्यास आली. यावर निद्रा केली. दोन घटका रात्रीस निजून उठले. नंतर घोडे दोन घटका पाहून कचेरीच्या डेऱ्यांत गेले. पाचा घटका रात्रीस कारभारी आले-यावर आपण व उभयता कारभारी व आनंदराव वैद्य याजकडील कारकून बाळाजीपंत व खंडोजीपंत पैसे बसून च्यार घटका बोलनें जालें. यावर खंडोपंत पुन्याकडून आला होता यास रवानकीचीं वस्त्रें सेला पागुटें पैठणीं

व महमुदा येक व किनखाबाचे ठान अर्ध येकून साडेतीन सनगें दिल्हियावर च्यार घटका बोलून, पावणें दो पाहारा रात्रीस दरबार बारकास जाला. छ ९ रोजीं स्नान देवपूजा करून, प्रहर दिवस येतां भोजेण करून, दीड प्रहर दिवस येतां कुच केलें. पुढें येका कोसावर येऊन जगननाथाचे यत्रेस लोक जातात. त्याचे घरचे कोण्ही घालवावयास आले होते, त्यास निरोप दिल्हा. मग आपण व सेना-धुरंधर यैसे येका अंबारींत बसून चालले तों पुन्याकडून डाकचीं पत्रें आलीं. नंतर तीं पत्रें वाचीत मुकामापावेतों आले. दाहा कोस कसबा भंडारें होतें. मुकाम जाला. तेथें गढी आहे. कमावीसदारानें मेजमानी केली. च्यार घटका रात्रीस कारभारी बोलावून तीं पत्रें वाचलीं. तों गांववाले येऊन बोभाट सांगितला कीं, आम्हास वाघानें बहुत उपद्रव केला आहे, मानसें मारितो. यांनीं हि बातमीवर जासूद पाठविले. मग आपण व कारभारी बसून येथून आठा कोसावर मोजलाखी म्हणून गांव आहे. प्रांत चांदगढीचा मुकाम नेमिला मग प्रहर रात्रीस दरबार जाला. छ १० रोजीं प्रेथकालीं च आपण व उभयेता कारभारी व बालाजीपंत काळेकर यैसे बसून च्यार घटका दिवस येईतोंपरियंत बोलनें जालें. यावर स्नान देवपूजा करून बैसले. लशेकरचे कुच जालें. आन आपण व सईना-धुरंधर व उभयता कारभारी यैसे बैसले. वाघाच्या बातमीवर बडे राजे व सिवा बाला हाजारी गेले होते. ते दो पाहारा बातमी आली कीं वाघ कोठें नजरेस येत नाहीं. मग दो पाहारा आपण व कारभारी मिळोन किल्ला पाहावयास गेले. जागजागीं पडक आहे. त्याची डागडुची करावयास सांगितली. सवा दो पाहारा घोड्यावर स्वार होऊन साहेंकालीं मुकामास आले. नंतर स्नान करून भिकाजी गोपाळ व उभयेता कारभारियास फराळास पाठविलें. नंतर आपण फराळ करून निद्रा केली. छ ११ रोजीं कुच करून सात कोसावर चांदगढी तेथें मुकाम नेमला होता. व भिकाजी गोपाळ याची रवानकी वराडांत होत होती. विडे देण्हार होते. परंतु वय-धुरुत होता. भोजेण करून कुच केलें. तों साहा घटका दिवस राहता मुकामास आले. बाडास येतां च मातक्यान स्वारी तयार करून आपण व सईनाधुरंधर व तातोश्री यैसे ऐका कोसावर शिवनगांवचा तलाव चांगला मोठा आहे तो पाहावयास गेले नंतर पाहून साहेंकालीं श्वारी बाडास आली. च्यार घटका रात्रपरियंत दरबार जाला. पाचा घटका रात्रीस कारभारी आले-यावर भिकाजी गोपाळ यास बोलावून येक प्रहरपरयंत वराडप्रांतीचा हिशेव पाहिला. नंतर तेथून साहा कोसावर कवडु पाटील याचा बाद आहे तेथें मुकाम नेमला. दो पाहारा रात्रीस दरबार बारकास जाला. छ १२ रोजीं स्नान देवपूजा करून श्वारी तयार करून मातक्यान सिवनगांवचा तलाव पाहून साहा घटका दिवस येता स्वारी बाडास आली. नंतर पावणे दोन पाहारा स्नान करून, भोजन करून, बैसले, तों पुन्याकडील डाकचीं पत्रें व विठल बल्लाळ सुभेदार याजकडील पत्र आलीं तीं वाचलीं नाहीत तसीं च ठाविलीं. मग मातोश्रीकडे जाऊन, येक घटका बोलून, भिकाजी गोपाळ यास व दारकोजी गायेकवाड यास विंड सईना-धुरंधर यांनी दिलें. दो पाहारा कुच केलें. भिकाजा गापाळबराबर च होता. पाच घटका दिवस राहतां मुकामास

दाखल जालें. प्रांत प्रतापगड. साहेकालीं कारभारी बोलावून, आपण व कारभारी यैसे बसून, दो पाहारां पुन्याकडोन डाकचीं पत्रें आलीं होतीं तीं वाचून पाहिलीं नंतर भिकाजी गोपाळ यास बोलावून वराड-प्रांतीचा हिशेब पाच घटका पाहून, छ १३ रोजीं विडे देववावयाचें ठरलें. मग आपण कारभारी व सईनाधुरंधर यैसे बसून दोन घटका बोलनें जालें. नंतर तेथून साहा कोसावर देरगांव आहे, प्रांत प्रत्तापगड, तेथें मुकाम नेमला. च्यार घटका रात्रीस दरबार बरकास जाला. छ १३ रोजीं प्रथ-कालीं कारभारी बोलावून, आपण व कार-भारी बसून, भिकाजी गोपाळ यास विडे दिल्हे व दारकोजी गायेकवाड यांस विडे देऊन खंडोपंत आणंदराव वैद्य याचा कारकून याजबराबर पुन्याकडे रवाना केला. नंतर दो पाहारा स्नान देवपूजा करून भो-जेन करून कूच जालें. साहा घटका दिवस राहता मुकामास आले-यावर बाडांत च होते. दोन घटका रात्रीस कारभारी बोलाऊन, भवानी दादू हि होता, मारनिले याचें च बोलणें दीड प्रहरपरियंत होत होतें. पावणे दो पाहारा रात्रीस दरबार बरकास जाला. छ १४ रोजीं प्राथकालीं च पुन्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. नंतर कारभारी बोला-ऊन, आपण व सईना धुरंधर व उभयता कारभारी बोलाऊन, पत्रें वाचून दाखविलीं. नंतर बाहेर आलेयावर आपण व बाळाजी-पंत कालेकर व व्यंकोजी भोसले नि॥ पीलखाना यैसे बसून, प्रतापगडचा कमावी-सदार यास बोलावून रागें भरले कीं, रानांत झाडी फार आहे, तुझ्यानें लावनी प्रगा-न्याची होत नाहीं त्यास बालाजीपंत काले-कर यास सांगितलें कीं मारनिले याचा झाडा पाहून कमावीस दुसऱ्यास द्यावी. हें च बोलनें दीड प्रहर दिवस येई तोंपर-यंत होत होतें. मग स्नान देवपूजा करून. भोजेन करून, निद्रा केली. साहेंकाली निजून उठले. नंतर आपण व सईनाधुरंधर यैसे बसून भवानी दादू यास बोलाऊन सांगितलें, तुम्ही आपली जोडी जगननाथास रवाना करावी, कारण कीं पुढें जाऊन सर-जाम करावा. याजप्रमाणें बोलून, रुष्णराव माधव यास बोलाऊन, पत्रें लेहून मारनिले याची जोडी रवाणा केली व पुन्याकडे दारकोजी कोरका रवाना केला आहे. पत्रें व जासूदजोडी रवाणा केली. नंतर साहा घटका रात्रीस दरबार बरकास जाला. छ १५ रोजीं च्यार घटका रात्र राहतां स-ईना-साहेब-सुभा यास ज्वर आला. दर-बार जाला नाहीं. छ १६ रोजीं ज्वर होता. दो पाहारा पुन्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. कारभारी बोलाऊन बाडांत च पत्रें वाचून पाहिलीं. सईनाधुरंधर यांनीं आपल्या तोफा साहा व येत्रा पुढें चींचगडास ला-विली. मग दरबार जाला नाहीं. प्रहर रात्रीस सईनासाहेब यांनीं फराल केला. छ १७ रोजीं च्यार घटका दिवस राहतां बालापुराहून सलाबतखान याजकडोन सां-डनीस्वार पत्रें घेऊन आला. मग कारभारी बोलाऊन पत्रें वाचून पाहिलीं. पत्रीं वर्त-माण कीं पेंढारियांनीं बहुत उपद्रव केला आहे. मग दोन घटका बोलून कारभारी आपले डेऱ्यास आले. प्रहर रात्रीस सईना-साहेब यांनीं आंगावरचे + + + + घेतलें. छ १८ रोजीं दोन घटका दिवस येतां कारभारी बोलाऊन, आपण व उभयता कारभारी बसून, छ ९ रोजीं रुष्णराज याज-कडोन जोडी पत्रें घेऊन आलं होते त्या पत्राचीं उत्तरें लेहून व येकाजी सकदेव व बालाजीपंत कोण्हेरकऱ्यांत आहेत यास

पत्रें लेहून, दोघ हुजरे व जासूद जोडी रवाणा केली. दीडप्रहर दिवस येतां दरबार बरकास जाला. भोजेण करून निद्रा केली. च्यार घटका दिवस राहतां कारभारी बोलाऊन, आपण व सईनाधुरंधर व उभयेता कारभारी व पांडुरंग गनएश व येकोजी भोसले येसे बसून भवानी दादू याचे कटकचे काग(द) वगैरे ताकीदी च्यार घटका दिवसापासोन प्रहर रात्रपर्यंत कागद लेहून दिल्हें. नंतर दरबार बरकास जाला. छ १९ रोजीं च्यार घटका दिवस आल्यानंतर स्नान करून कारभारी हि होते. ब्राह्मणास दक्षना रु॥ वीस व येक गाई दिल्ही. व आनखी दोघ ब्राह्मण होते त्यास पांच पांच रुपये दक्षना दिल्ही. नंतर दीड प्रहर दिवस आल्यानंतर आपण व उभयता कारभारी व पांडुरंग गनएस येसे बसून न्यापालचा राजा देरसिंग कासी पलीकडे च्यारसें कोस आहे त्यास पत्रें लेहून टेकचंद मिरधा याची जोडी रवाना केली. व हैद्राबादेस नबाबास पत्रें लेहून थईली करून साडनीस्वाराची जोडी रवाणा केली. नंतर कलकत्याच्या फिरंगियास पत्रें लेहून जासूदजोडी रवाणा केली. यावर सवा दो पाहारा भोजेन करून निद्रा केली. तों दोन घटका दिवस राहतां स्वारी तयार करून, कारभारीसुधां गावाबाहेर कलकीची झाडी फार आहे तेथें जाऊन, सालकरतां बास तोडविले. नंतर नदींत दोन घटका बसून घटका रात्रीस स्वारी डेऱ्यास आली. यावर कारभारी बोलाऊन बाडांत च मातोश्री व आपण व सईनाधुरंधर व उभयता कारभारी यैसे बसून मातोश्री व सईनाधुरंधर याचा मुकाम, नवा कोसावर चापगडचा मुकाम, नेमला. नंतर च्यार घटका रात्रीस दरबार बरकास जाला. छ २० रोजीं दीड प्रहर दिवस येतां कूच जालें. बराबर बावा उपाध्ये व श्रीमन शास्त्री व नारायन बावा चवफुले वगैरे शावकारमंडली येकोबा नाईक पिदडी व मुऱ्हार नाईक गडकरी व गंगाजी नाईक गडकरी व दरगदार बलवंतराव भवानी व चिटणिसाकडील शामराव चीटणीस व फडनिसाकडील कारकून व खासगीकडील सिताराम पंत व मुनसीकडील कारकून याजप्रमाणें बंदोबस्त करून दिल्हा. व बराबर पतक रघुनाथराव मुढे व पाटोळे दोघे मिलोन स्वार पाचसे व चवकी पाहाऱ्यास येक कुंपणी गारद्याची दिल्ही वगैरे सईनाधुरंधर याच्या घरपागा वगैरे लोक मिळोन दोन हजार व हाती पंधरा व बानाच्या कैच्याचे उट पंधरा व येत्राबराबर पाच हजार आहे. दीड प्रहर दिवस आल्यावर कुच जालें. सईनासाहेब गोटाबाहेर घालवून डेऱ्यास आले. यावर भवानी दादू यास बोलावून वस्त्र शेला पागुटें पेठणी व मलमलीचा झगा व पायजमा येकूण साडेतीन सनगे दिल्ही व घोडी येक दिल्ही. नंतर सदासिव राजाराम यास सेला पागुटें पेठणी दिल्हें, व घोडी येक दिल्ही, व हाती येक कटकांत देवविला, आन त्याचें काम त्यास सांगितलें, नंतर विडे देऊन बिदागिरी केली. यावर यात्रेंत त्याना घालून दरगावर आले. च्यार घटका दिवस होता. तेथें नदी आहे. आपण व कारभारी बसून तेथून माघारी. च्यार कोस कवडू पाटील याचा बाद आहे तेथील मुकाम नेमून दरबार बरकास जाला. छ २१ रोजीं प्राथकाळीं स्नान देवपूजा करून भोजन जालें. सवा प्रहर दिवस येतां नागपूराकडोन डाकचीं पत्रें आलीं. यावर कारभारी बोलाऊन पत्रें वाचून पाहिलीं. दीड प्रहर दिवस येतां कुच जालें.

प्रहर दिवस राहतां मुकाममजकुरीं दाखल जाले. यावर दोन घटका डेऱ्यास बसून, कारभारी बोलावून, आपण व परसोजी भोसले व उभयता कारभारी वगैरे मानकरी येसे तववावर जाऊन, तोफा दोन बोलाऊन, तळ्यांत गोळे दाहा टाकले. नंतर साहेंकालीं श्वारी डेऱ्यास आली. यावर आपण व उभयता कारभारी व परसोजी भोसले यैसे बसून, दोन घटका बोलून, मुकामाचा गाव पांच कोस चांदगढी नेमून, दरबार बरकास जाला. छ २२ च्यार घटका दिवस आल्यानंतर श्नान देवपूजा करून, भोजेन करून, पावने दो पाहारा कुच जालें. तों साहा घटका दिवस राहतां मुकाममजकूरीं दाखल जाले. नंतर दोन घटका डेऱ्यास बसून, श्वारी तयार करून, आपण व उभयेता कारभारी वगैरे मानकरी यैसे तेथून येका कोसावर सिवनगांवचा तलाव आहे तेथें गेले. नंतर तेथें जाऊन दोन घटका तलाव पाहून दोन घटका रात्रीस श्वारी डेऱ्यास आली. यावर आपण व उभयता कारभारी व पांडुरंग गनएश व बापू हाळद्या व बाळाजीपंत काळेकर यांच्या मारफतीनें कमावीसदार आहेत त्यांस प्रगादार कोणही भेटावयास आले नाहींत, याजकरीतां म।।रानिले याजवर बहुत रागे भरले होते. मग आपण व कारभारी बसून तेथून साहा कोसावर कसबा पालुदरे याजपलीकडे दो कोसावर तई म्हणून गांव आहे तेथें मुकाम नेमून दरबार बरकास जाला. छ २३ रोजीं प्रथकालीं आपण व परसोजी भोसले यैसे बसून, कारभारी बोलावून, बकरदासिंग सिकाकूर राजदरबारीं यास पत्रें लेहून साडनीस्वार रवाणा केला. नंतर श्नान देवपूजा करून, भोजेन करून, दीड प्रहर दिवस येतां कुच जालें. आन आपण चांदगढीचा किला पहावयास गेले. किलेदारांनीं हि बैठक केली होती. तेथें दोन घटका बसून विडे घेऊन कुच केलें. च्यार घटका दिवस राहतां मुकाम मजकुरीं दाखल जाले. नंतर तेथें नदींत आपण व कारभारी बसून च्यार घटका दिवसापासोन च्यार घटका रात्रपरयंत गवई याचें गायेन जालें. नंतर आपण व कारभारी बसून तेथून आठा कोसावर क।। देवनीचा मुकाम नेमून डेऱ्यास आले दरबार बरकास जाला. छ २४ रोजीं गावची रयेत फिरयाद आली होती. त्याजवरहोन मर्जी दिक्ष होती. प्रहर दिवस आल्यानंतर श्नान देवपूजा करून, भोजेन करून, दीड प्रहर दिवस येतां कुच जालें, तों तीन घटका दिवस राहता मु।। मजकुरीं दाखल जाले. बालाजीपंत काळेकर याजकडे कमावीस आहे त्यानें डेरे किल्यांत दिल्हे. मग माारनिले याजवर रागे भरले कीं, आवघे लशेकर व घोडी बाहेर राहिलीं आन आम्हीं किल्यांत राहिलों. म्हणोन च्यार घटका रागे भरोन, कारभारी बोलावून, आपण व उभयेता कारभारी बसून, येक प्रहर बोलनें जालें. नंतर दरबार बरकास जाला. छ २५ रोजीं प्रथकालीं कारभारी बोलाऊन मातोश्रीस व मईनाधुरंधर यांस पत्रें लेहून डाक रवाणा केली. नंतर दीड प्रहर दिवस येता श्नान देवपूजा करून सिवा वाला हाजारी यास सांगितलें कीं, तुम्हीं शेहराबाहेर जाऊन जागा पाहून यावें, बाहेर च जाऊन राहूं. मग भोजेन करून कचेरीस बैसले तो माारनिले जागा पाहून आले. यावर त्यास सांगितलें कीं डेरे बाहेर द्यावेत, मग कारभारी बोलाऊन, आपण व उभयेता कारभारी व पांडुरंग गनएश यैसे नदींत जाऊन,

डोगयावर वसून प्रहर दिवसापासून दोन घटका रात्रपरयंत खेलत होते मग श्वारी गोटास आली. छ २६ रोजीं च्यार घटका दिवस येतां पुन्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. नंतर कारभारी बोलाऊन, आपण व उभ येता कारभारी वसून, पत्रें वाचून पाहिलीं. नंतर च्यार घटका खलवत जालें. साहा घटका दिवस आल्यानंतर स्नान देवपूजा करून, सिवरात्र होती, दो पाहारा श्वारी तयार करून, आवघ्या देवाचीं दरशेन घेऊन, साहेकालीं श्वारी डेऱ्यास आली. नंतर स्नान करून, फराल करून, निद्रा केली. छ २७ रोजीं प्रथकालीं बालापूरहून सलाबतखान याचीं पत्रें आलीं. मग कारभारी बोलावून पत्रें वाचून पाहिलीं. व तेथें नदीया गांव आहे, नदींत मांडव घातला आहे, तेथें च सईपाक करविला होता. प्रहर दिवस येता नदींत जाऊन, स्नान देवपूजा करून, ज्वर येत होता त्याचें दान केलें. तांबडा बैल येक ब्राह्मणास दिल्हा. त्यास पांच रुो दक्षना दिल्ही. व येका ब्राह्मणास ताबा व यकास पवल व येकास खारवा व मसुरु दिल्हा. पांच ब्राह्मणास पांच रुो दक्षना दिल्ही. नंतर पावने दो पाहारा म्हमद आली व म्हमद मोहोशेम वराडचा कमावीसदार या दोघास रवाणा केले. कारण कीं कलकत्याच्या फिरंगी याजकडील वकील रतनपूरास येऊन दाखल जाला. याजकरितां या दोघांस पुढें रवाणा केले. मग सवा दो पाहारा भोजेन करून निद्रा केली. साहा घटका दिवस राहता कारभारी बोलाऊन, आपण व कारभारी वगैरे माणकरी यैसे नदींत डोगयावर बसून, दारूचें तोटे खेळत होते. मग दो घटका रात्रीस बाहेर येऊन नदींत बैसले. नंतर परसोजी भोसले वगैरे माणकरी दाहा वीस येकीकडे व लिज्यावा गुजर व कृष्णार्जी,मोहीता वगैरे लोक येकीकडे होऊन, दारूचे तोटे वाटून घेऊन, साहा घटका खेळत होते. मग प्रहर रात्रीस श्वारी डेऱ्यास आली. छ २८ रोजीं प्रथकालीं कारभारी बोलावून, विठ्ठल बल्लाळ सुभेदार याजकडोन डाकचीं पत्रें आलीं होतीं तीं वाचून पाहिलीं. पत्रीं वर्तमाण कीं, रा बगाजीपंत भातवेटीचे चवण्या-गडावर होते ते सुटून खालीं येसावा पानतठाणें याजपासीं आला आहे, व तेथील कमावीसदार आहे त्याच्या याच्या भेटी जाल्या. म्हणोन पत्रें आलीं. साहेबास कळावें. प्रहर दिवस येतां रामराव गुजर याजकडे भिवपूर आहे तेथें ते गेले आहेत. त्यांनीं परसोजी भोसले--यास मेजमानी केली म्हणोन मारनिले लोक सुमारीं से दीडसें घेऊन भोजेन करावयास गेले. तेथें जाऊन भोजेन करून यास वस्त्र परसोजी भोसले व गुज्यावा गुजर व कृष्णार्जी मोहिता यास सेला पागोटीं दिल्ही. प्रहर दिवस येतां नदींत जाऊन स्नान भोजेन करून निद्रा केली. साहा घटका दिवस राहता नदींत तोफा बोलाऊन, कारभारी व आपण बसून, पुढें पासोडीचे निशान लाऊन, साहेंकाल परयंत गोळ्या मारीत होते व कांहीं वराडपाड्या व पासरपाड्या बोलाऊन मालोमामलतीचा कारभार हि जाला. नंतर साहेंकालीं श्वारी डेऱ्यास आली व परसोजी भोसले भिवपुरास गेले होते ते हि आले. मग आपण व कारभारी बसून च्यार घटका रात्रपरयंत बोलनें जालें. नंतर दरबार बरकास जाला. छ २९ रोजीं.

श्री.

लेखांक ३२०.

१७१९ फाल्गुन वद्य १२.

पो छ ७ सवाल सु॥ समान तिसैन मया व अलफ.

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वरदे कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता॥ छ २५ माहे रमजान प्रां॥ लष्कर जागा शिंदी प्रगणे पळसगाव साहेबाचे कृपावलोकनें करून आज्ञा-धारकाचें वर्तमान यथास्थित असे यानंतर ता॥ छ १९ रमजानीं साहेबाचे सेवेसी विज्ञापना लिहिलीच आहे त्यानंतर ता॥ छ २० रोजीं सप्तमीस चंद्रपुराहून कुच करून मजल दर मजलीनें वद्य १३ बुधवारीं नागपुरास जावें त्यास राजश्री सेनाधुरंधर यांनीं प्रां॥ चंद्रपूर येथील बंदोबस्त करून वद्य १० सोमवारीं हिंगणघाटास मागाहून येऊन दाखल व्हावें येणें न जालें म्हणोन मु॥-मा॥रीं मुकाम केला आहे वरकड कारखाने आले आहेत मागाहून सडे एणार त्यांची मार्गप्रतिक्षा करीत आहेत नेमल्या मुकामा प्रां॥ जाणें झालें नाहीं उपरांतीक ठरेल त्या प्रां॥ सेवेसी विज्ञापना लिहितों ता॥ छ २२ रोजीं राजश्री दवलतराव शिंदे याजकडून पत्रें आलीं तीं त्यांचा वर्काल नेमतराव कायत यानें आणून गुजरलीं तीं उभयता कारभारी व आपण बसून वाचलीं नंतर हिंगणघाटच्या मुकामास आले तेव्हां वाघाची बातनी आली शिवसिंग हजारी भगवंतराव सालतकर कृष्णाजी मुगुटराव व बुरानशाचे चिरंजीव ऐसे पुढें पाठविले कीं तुम्हीं जाऊन वाघाची बातनी मनास आणून वाघरालाऊन आम्हांस सांगून पाठवावें त्यानंतर त्यांनीं जाऊन बंदोबस्त करून सांगून पाठविलें कीं वाघोलीच्या रानात वाघीण आहे तेथून निघाले उभयता श्री व ठकूबाई व त्यांचीं सून व कन्या बन्याबाई व आपण वाघरा लाविल्या होत्या तेथें येऊन आत हर्त्ता व सांडणी घालूनें वाघीण भडकाविली वाघरांत जाऊन पडली पडतांच वरते वासे टाकून बळकट पच्ची केली जीत धरून गोटास आणिली उभयता कारभारी व भवानी माळो व आनंदराव वैद्य होते यांसी दाखविली नंतर पुण्याची डाक आली ते वाचून पाहिली ता॥ छ २४ रोजीं हैदराबादे-कडून नबाबाकडील सांडनी-स्वार यांची जोडी पत्रें घेऊन आली ती उभयतां कारभारी व आपण बसून वाचिलीं यांनीं आपलीं पत्रें व रामचंद्र दादो यांच्या पुत्राचीं पत्रें आपल्या सांडनीस्वार याजसमागमें मशारनिलेकडे रवाना केलीं आळसपुरास पाठविलीं राजश्री गुंडो शंकर नागपुराहून एऊन भेटला एक मोहर नजर केली दुसरे दिवशीं वाघ एक मारला साहेबाचे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीपांडुरंग.

लेखांक ३२१.

१७२० आषाढ वद्य १२.

पे॥ छ २४ शवाल

सुद्दूर सन तिसा तिसैन मया व अलफ.

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबाचे सेवेसी.

आज्ञाधारक तुकोजी लकोबा व बाळा सावत कृतानेक दंडवत विज्ञापना ता॥ छ २९ मोहरमपावेतों साहेबाचे कृपावलोकन करून मु॥ नागपूर येथें शेवकाचा वर्तमाण यथास्थीत असे. यानंतर राजश्री सेनासाहेब सुभा याजकडील वर्तमान छ ५ राज-

पावेतों साहेबाचे सेवेसी लिहीले च आहे. यानंतर छ ५ रोजीं नागपुराहोन चवकोसावर कापसी म्हणून गांव आहे तेथें मु॥ होता तिसरे प्रहरीं-आपण व कृष्णराव व माधव व श्रीधर लक्षुमण ऐसे बोलत बसले होते. साहा घटका दिवस राहाता आपल्याकडील वकील गढे मडभ्याकडे जाववयाकरितां राजश्री आपाजी रघुनाथ यास रवानकीचे विडे दिले. व बराबर स्वार पंचवीस देववायाची नेमणूक जाली. नंतर सायंकाळीं सईनासाहेब व परसोजी भोसले याचे कुटुंब नागपुरास रवाना केले. साहेबास कळावें. मग आपण व कारभारी बसून तेथून आठा कोसावर माथनी मोहान प्रगाना नजरइन प्रांत रामटेकचा मुकाम नेमला. साहेबास कळावें. छ ६ रोजीं कुच करोन मुकाममजकुरीं दाखल जाले. सायंकाळीं पुण्याकडोन डाकचीं पत्रें आलीं नंतर कारभारी बोलाऊन पत्रें वाचून साहा घटका खलबत जालें. साहेबास कळावें. छ ७ रोजीं मु॥ जाला. गुज्याबा गुजर याजकडे गांव आहे, त्यांनीं मेजमानी केली. तिसरे प्रहरीं विठल बल्लाळ सुभेदार व रघुनाथराव घाटगे यांस पत्रें लेहून सांडणीस्वार रवाना केले. साहेबास कळावें. साहेकाळीं येसुभाई सिलेदार याचा घोडा बोर बहुत चांगला होता तो आणून सरकारांत लाविला. साहा घटका रात्रीस कारभारी आले. यावर आपण व भवानी कृष्ण व उभयता कारभारी ऐसे बसून च्यार घटका बोलनें जालें. यावर भवानी कृष्ण याचा जावयास फार सखा आहे म्हणून ते निरोप घेऊन घरास आले. साहेबास कळावें. छ ८ रोजीं मु॥ च होता च्यार घटका दिवस येता कटकाहून फिरंगियाची पत्रें व किष्णमराज याजकडील पत्रें आलीं होतीं. मग कारभारी बोलाऊन पत्र वाचून च्यार घटका खलबत जालें. दोप्रहरीं स्वारी तयार करून आपण व सईनाधुरंधर व परसोजी भोंसले व उभयेता कारभारी ऐसे जाऊन सवदागराचे उंट सुमारीं १७२ आले होते ते जाऊन खरीद केले. पु रुो २५००० याचे वीस हजार त्यांत बटा कापला दर सेकडा रुो पंधरा. याप्रमाणें बटा वजा करून सवदागरास वीस रुो खर्चास दिले. आन रुपयाचा वाईदा आठा महिन्याचा केला. साहेबास कळावें. चंवऱ्यागडावर राजश्री बगाजीपंत भातवने व राघोपंत चीटणीस होते. त्यास राघोपंतास किलेदारानें सोडून दिले. याचें व याचें बोलनें लागलें. येसोबा याजपासीं आहे. साहेबास कळावें. पांचा घटका रात्रीस कारभारी आले. यावर कचेरीच्या डेऱ्यांत आपण व कारभारी आनंदराव वैद्य याचे कारकून पुण्याकडोन खंडोपंत आला होता, त्यास निरोपाचीं वस्त्रें मेला पागुटें पैठणी व मंदीली येक व किनखाबाचे ठाण अर्ध येकूण साडे तीन सनगें दिल्हीं नंतर आपण व कारभारी बसून तेथून दाहा कोसावर काभडार म्हणून गांव आहे तेथील मु॥ नेमून दरबार बरकास जाला. छ ९ रोजी प्रहर दिवस येतां कुच जालें. पुढें एका कोसावर आले तों पुन्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. यावर आपण व सईनाधुरंधर ऐसे एका अंबारींत बसून पत्रें वाचीत मुकामापावेतों आले. गढी आहे. कमावीसदारानें मेजमानी दाणा वगैरे सरंजाम दिल्हा. च्यार घटका रात्रीस कारभारी बोलाऊन आपण व कारभारी बसून तेथून साता कोसावर मौजे कहनी प्रां चांदगढीचा मु॥ नेमून दरबार बरकास जाला. छ १० दो

प्रहरीं आपण व उभयता बंधु व परसोजी भोसले व उभयेता कारभारी ऐसे स्वारी तयार करून किला पाहावया गेले तों जागजागीं पडला आहे. किला पाहून कमावीसदारास डागडुजी करावयास सांगितली. यावर स्वार जाले– तों दोन घटका दिवस राहाता मु॥ मजकुरीं दाखल जाले. यावर च्यार घटका रात्रीस कारभारी बोलाऊन आपण व सईनाधुरंधर व उभयेता कारभारी ऐसे बसून तेथून साता कोसावर चांदगढीचा मु॥ नेमून दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. छ ११ रोजीं भिकाजी गोपाळ यास विडे देऊन वराड प्रांतांत रवाणा करीत होते. परंतु दीड प्रहर दिवस आलियावर कुच जाले. तो साहा घटका दिवस राहता मु॥ मजकुरीं दाखल जालियावर पांच घटका रात्रीस कारभारी कृष्णराव यादव व श्रीधर लक्ष्मण आले यावर आपण व उभयता कारभारी व बाळाजीपंत कालेकर ऐसे बसून भिकाजी गोपाळ यास बोलाऊन एक प्रहरपर्यंत वराडाप्रांतीचा हिसेब पाहिला. नंतर तेथून चवा कोसावर कवडु पाा याचा बाद होता तेथील मु॥ नेमून दरबार बरकास जाला. छ १२ रोजीं दो पाहारा पुण्याकडोन व विठल बलाळ सुभेदार याजकडून डाकचीं पत्रें आलीं तीं वाचलीं नाहींत. तसीं च ठेविलीं. नंतर मातोश्रीकडे जाऊन दोन घटका बोलून कुच जालें. च्यार घटका दिवस राहता मुकामास आले. यावर साहेकाळीं कारभारी बोलाऊन आपण व सईनाधुरंधर व उभयेता कारभारी ऐसे बसून दो पाहारां डाकचीं पत्रें आलीं होतीं तीं वाचून पाहिलीं. यावर भिकाजी गोपाळ यास बोलाऊन पांच घटका रात्रपरयंत वराडप्रांतीचा हिशेब पाहून छ १३ रोजीं विडे देववयाचें ठरलें. मग आपण व कारभारी बसून तेथून पांचा कोसावर देरगांव आहे. प्रांत प्रातावगडचा मु॥ नेमून दरबार वरकास जाला. छ १३ रोजीं प्राथकाळीं कारभारी बोलाऊन आपण व कारभारी बसून दोन घटका बोलून भिकाजी गोपाळ यास विडे देऊन वराडप्रांतीत रवाणा केला. साहेबास कळावें. व दारकोजी खिसमतगार यास विडे देऊन आनंदराव वैद्य याजकडील कारकून खंडोपंत पुण्याकडोन कामाकाजाकरितां आला होता. त्याजबराबर रवाणा केला. दो पाहारा कुच जाले. साहा घटका दिवस राहाता मु॥ आले. यावर च्यार घटका रात्रीस कारभारी बोलाऊन वाड्यामधें बोलाऊन मोहुर्त पाहात होते. मग दरबार बरकास जाला. छ १४ रोजीं प्राथकाळीं च पुण्याकडोन डाकचीं पत्रें आलियावर कारभारी बोलाऊन पत्रें वाचून पाहिलीं. यावर प्रांत बगडचा कमावीसदार यास बोलाऊन रागें भरले कीं रानांत झाडी फार आहे. प्रगान्याची लावणी जाली नाहीं. हें काय ? मग बाळाजीपंत यांस सांगितलें कीं माारनिले याचा झाडा पाहून कमावीस दुसऱ्यास द्यावी, ऐसें ठरलें. साहेबास कळावें. साहा घटका दिवस राहतां भवानी दादु यास बोलाऊन सांगितलें कीं, तुम्ही आपली जोडी पुढें जगनाथावर रवाणा करावी. कारण कीं सरंजाम करवावा. मग कृष्णराव माधव यास बलाऊन पत्रें लेहून माारनिलेयाची जोडी रवाणा केली नंतर छ १३ रोजीं द्वारकोजी गायकवाड रवाना केला परंतु कागदपत्र राहिले होते ते लेहून जासूद जोडी रवाना केली. साहेबास कळावें. छ १६ रोजीं च्यार घटका रात्र राहाता सईनासाहेब यांस ज्वर आला मग दरबार जाला

नाहीं. छ १६ रोजीं ज्वर होता. दो पाहारा पुण्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. मग कारभारी बोलाऊन बाडांत च पत्रें वाचून पाहिलीं. नंतर सईनाधुरंधर यांनीं आपल्या तोफा साहा व येत्या पुढें चिंचवडास लाविलें. साहेबास कळावें. छ १७ रोजीं च्यार घटका दिवस राहतां बालापुराहून सलाबतखान यांचीं पत्रें आलीं मग कारभारी बोलाऊन पत्रें वाचलीं. पत्रीं वर्तमान कीं, पेंढारियांनीं बहुत उपद्रव केला आहे. मग कारभारी आपले डेऱ्यास गेले. प्रहररात्रीस सईनासाहेब यांनीं अंगावर चोरपानी घेतलें. छ १८ रोजीं दोन घटका दिवस येतां कारभारी बोलाऊन बाडांत च आपण व उभयता कारभारी ऐसे बसून छ ८ रोजीं माथनी माहौज्याच्या मुकामीं कृष्णराज यांचीं पत्रें आलीं होतीं त्यांचीं उत्तरें लेहून व यंकाजी सखदेव यांस पत्रें लेहून व बालाजीपंत कोण्हेरे यांस पत्रें लेहून दोघे हुजरे व जासूद जोडी रवाणा केली. छ १९ रोजीं स्नान केलें. कारभारी हि होते. ब्राह्मणास येक गाई व वीस रुो दिल्ही व आणखी हि दोघे ब्राह्मण होते त्यांस पांच पांच रुो दक्षणा दिल्ही मग दीड प्रहर दिवस आल्यानंतर आपण व उभयता कारभारी व पांडुरंग ऐसे बसून ज्यापाळचा राजा दरेसिंग कासीपलीकडे दोनसें कोस आहे त्यास पत्रें लेहून एक चंदमिरधायाची जोडी रवाना केली. व हेशनदेसन बाबास पत्र लेहून भयली करून सांडणीस्वार याची जोडी रवाणा केली. नंतर कलकत्याच्या फिरंगियास पत्रें लेहून जासूदजोडी रवाना केली. नंतर अडचा प्राहारा दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. साहेकाळीं दो घटका रात्रीस कारभारी बोलाऊन आपण व सईनाधुरंधर व उभयता कारभारी ऐसे बसून मातोश्री चिमाबाई व सई यांनीं कुच करून नव कोसावर चिंचगड आहे तेथील मुकाम नेमला. व सईनासाहेब यांनीं

ऐका कोसावर माघारीं जाऊन राहावें ऐसा ठराव होऊन च्यार घटका रात्रीस दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. छ २० रोजीं दीड प्रहर दिवस आल्यानंतर मातोश्री व सईनाधुरंधर यांचें कुच जालें. बराबर बाबा उपाध्ये श्रीमनशास्त्री व नारायन बाबा चवफुले व येत्रा पांच हजार वगैरे सावकार मंडळी येकोबा नाईक पीदडी व मुऱ्हार नाईक गडकरी व गंगाजी नाईक गडकरी व दरग दार बळवंतराव भवानी व चिटणिसाकडील शामराव व फडनिसाकडील कारकून व खासगीकडील सितारामपंत व मुनसीकडील कारकून वगैरे लोक रघुनाथराव मुटे पाटोळे ऐसे दोघा मिळोन लोक पांचसे व चवकी पाहाऱ्यास कुंपणी गारद्याची एक व सईनाधुरंधर याच्या घरपागा व सिलेदार दोन हजार व हाती अंबारीचे व मुलें मिळोन पंधरा व बानाच्या कैचयाचे उंट सुमारीं १६ याजप्रमाणें सरंजाम देऊन बंदोबस्त केला. साहेबास कळावें. दीड प्रहर दिवस येतां कुच जालें. सईनासाहेब गोटाबाहेर जाऊन मातोश्री व सईनाधुरंधर यांस घालऊन माघारीं डेऱ्यास आले. नंतर भवानी दादु कटकचा सावकार यांस बोलाऊन सांगितलें कीं कांहीं श्वारी खर्चास मदत करावी. मग त्याजला कबूल केलें नंतर त्यास वस्त्र सेला पागुटें पैठणी व मलमलीचा झगा एक व पायजामा एकूण साडेतीन सनगे दिल्ही. व घोडी सरंजामसुधां एक दिल्ही. नंतर सदाशिव राजाराम यांस शेला पागुटें पैठणी व घोडी एक व कटका तयाचे हाती आहेत त्याजपैकीं हात

एक देविला. आन त्याचें काम त्यास सांगितलें. नंतर विडे देऊन त्याची रवाणकी केली. साहेबास कळावें. मग सईनासाहेब यांनीं कुच करून मुकामास आले. दोन घटका रात्रीस कारभारी बोलाऊन मावारीं पांच कोस कवडु प॥ याचा वाद होता तेथील मु॥ नेमून दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. छ २१ रोजीं सवा प्रहर दिवस येतां नागपुराकडोन डाकचीं पत्रें आलीं. नंतर कारभारी बोलाऊन पत्रें वाचून कुच जालें. तों साहा घटका दिवस राहाता मु॥ मजकुरीं दाखल जाले. यावर तलाव पाहून डेऱ्यास आले. यावर दोन घटका रात्रीस आपण व कारभारी वसून तेथून पांच कोस चादगढीचा मु॥ नेमून दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. छ २२ रोजीं दो पाहारा कुच जालें. साहा घटका दिवस राहतां मु॥स आले. नंतर दोन घटका रात्रीस आपण व उभयता कारभारी व पांडुरंग व बापू हाळद्या ऐसे वसून बाळाजीपंत काळेकर याच्या मारफतीनें कमावीसदार आहेत. कमावीसदार कोण्ही भेटावयास आला नाहीं. याजकरितां माारनिले याजवर बहुत रागें भरले होते. मग आपण व कारभारी वसून तेथून साहा कोसावर क॥ पालुदरपलीकडे दो कोसावर त्तई म्हणून गांव आहे तेथील मु॥ नेमून दरबार बरकास जाला. साहेबास कळावें. छ २३ रोजीं प्रथमकाळीं आपण व परसोजी भोसले ऐसे बसून कारभारी बोलाऊन आपण व कारभारी बसून बाकरद सिंग मिकाकुर राजबदरी यास पत्रें लेहून सांडणीस्वार रवाना केला. दीड प्रहर दिवस येता गढी पाहून कूच जालें. तों च्यार घटका दिवस राहाता मुकाममजकुरीं दाखल जालें. नंतर च्यार घटका रात्रीस आपण व कारभारी वसून तेथून आठा कोसावर क॥ पवार्नाचा मु॥ नेमून दरबार बरकास जाला. छ २४ रोजीं दीड प्रहर दिवस आलियावर कूच जालें तों च्यार घटका दिवस राहता मुकाम मजकुरीं दाखल जाले. राजश्री विठल बलाळ सुभेदार व वेनीसिंग व सखाराम आवधुत या त्रिवर्गाचा एक विचार होऊन राजश्री रघुनाथराव बुंधेले यांनीं आपल्याकडील कोण्ही वकील याच्या लस्करांत पाठवून यांचें व त्याचें बोलनें होऊन बोनीसिंगास तिकडे घेऊन गेले. माारनिले याच्या व त्याच्या भेटी वगैरे बोलणें होऊन बोनीसिंग कटगीच्या मुकामीं आला. मग बोनीसिंग व सखाराम अवधूत ऐसे विठल ×× सुभेदार याजपासीं येऊन सईनासाहेब यास पत्रें लेहून पाठविलीं. साहेबास कळावें. चांदगढीचा मु॥ बाईसाहेब याचीं पत्रें आलीं जे. छ २० रोजीं श्वार होऊन गेले तों मजल दरमजल बाजारीच्या मुकामीं दाखल जाले. एका दो दिवसा रतनपुरास जातील. साहेबास कळावें. बाळाजीपंत कालेकर यानें डेरे किल्यांत दिल्हे होते. आणि अवघे लशेकर बाहेर होते. याजकरितां माारनिले याजवर दोन घटका रागे भरले होते कीं अवघें लशेकर बाहेर राहिले आन आम्ही किल्यांत राहिलों हें काय म्हणून बोलत होते. छ २५ रोजीं प्रथकाळीं कारभारी बोलाऊन मातोश्रीस पत्रें लेहून डाक रवाना केली. दीड प्रहर दिवस येता सिवा बाळा हाजारी यास बोलाऊन सांगितलें कीं बाहेर जाऊन डेरे देववायास जागा पाहून यावें. तिसरे प्रहरीं डेरे बाहेर दिल्हे. साहेबास कळावें. छ २६ रोजीं च्यार घटका दिवस येतां पुण्याकडोन डाकचीं पत्रें आलीं. नंतर कारभारी बोला-

ऊन पत्रें वाचून पाहिलीं नंतर च्यार घटका खलबत जालें. सिवरात्र होती. देवदर्शनास गेले. साहेबास कळावें. छ २७ रोजीं बाळापुराहून सलाबतखान याचीं पत्रें आलीं नंतर पत्रें वाचून कारभारी बोलाऊन आपण व उभयता कारभारी बसून पत्रें वाचून पाहिलीं. नंतर म्हमद आली व महम मोहोशेम वैरागडचा किलेदार या दोघांस विडे देऊन रवाना केले. कारण कीं कलकत्याच्या फिरंगियाचा वकील नागपूरास येत आहे. तो रतनपुरास येऊन दाखल जाले. म्हणोन या दोघांस पुढें रवाना केले. साहेबास कळावें. व मग त्याचें तांबडे दान दिल्हें. छ २८ रोजीं विठल बलाळ सुभेदार याजकडोन पत्र आलीं तीं वाचून पाहिलीं. पत्रीं वर्तमान कीं चगाजीपंत भातवाल्याचे गडावर होता तो त्यांनीं सोडून दिल्हा. येसोबा पानतवाने याच्या व किलेदाराच्या भेटी जाल्या साहेबास कळावें. तेथून सईनासाहेब सुभा यांनीं रामटेकच्या पानाचे बैल दर १५ रवाना केले आहेत. साहेबास कळावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. जोडी रवाना छ २९ माहे रमजान.

श्री.

लेखांक ३२२.

१७२१ वैशाख वद्य १३

याादि हिशेब जोहार जेठा वाणी याजकडे कर्ज्यांचे येणें. रु॥

८०० मुद्दल रकम शके १७१०
फालगुन शुं॥ ५.

२०८=॥। व्याज ता॥ शके १७११
वैशाख व॥ १३ मु॥ ८।
माहे २॥। येकूण कचे
२२०० दर सदेशे॥ रु॥
२२ वजा बारोत्रा १॥।—।
वाकी रु॥.

८२०८=॥।
१०० किल्ला मुदल रकम शके
१७११ वैशाख व॥ १३.

९२०८=॥।
९२८— व्याज नउसे वीस रु॥
पावणे तीन आण्याचे ता॥
शके १७१२ वैशाख व॥
१३ मु॥ माहे १२.

१००४२८÷ दर सदे रु॥ १ शे॥
१००।= वजा बारोत्रा
सूट ८।= बाकी.

१०१२८=॥।
२५८॥ मोहतर्फा खर्च पट्टी वगैरे रु॥

१०३७।—॥।
पैकीं वसूल शके
१७११ चे सालचे भाडें
घराव॥ वसूल ११६॥=॥ रु॥
बाकी शके १७१२ वैशाख व॥ १३ रु॥
९२०॥=।
१०१।-।

व्याज ता॥ शके १७१३ वैशाख व॥ १३ मु॥ माहे बारा कच्चे ११०५८।≈ दर सद्दे १ प्रें॥ ११०।≈॥ वजा बारोत्रा

९८≈।

बाकी रु॥

—

१०२१।॥≈॥

१३॥≈ खर्च पट्टी

—

१०३५॥–॥

पै॥ वसूल घराचे भाडयाब॥ ९३८≈॥ रु॥

बाकी शके १७१३ वैशाख व॥ १३ रु॥

९४२।≈

व्याज ता॥ शके१७१४ वे॥ १०३॥≈।॥

व॥ १३मुद्दत माहे १२ ये॥

कच्चे ११३०८॥ दर सद्देप्रें॥

११३८–। रु॥ वजा सूट

बारोत्रा रु॥९।≈॥

बाकी रु॥

—

१०४६८॥।

२१। खर्चपट्टी

—

१०६७।०॥।

पे॥ वसूल १०२॥।०॥ रु॥

बाकी शके १७१४ वैशाख व॥ १३ रु.

९६४॥।८।

व्याज ता॥ शके १७१५ १०६८≈।

वैशाख व॥ १३ मु॥ माहे १२

ये॥ कच्चे ११५७७८≈ दर सद्दे

प्रें॥ ११५॥।०। वजा बारोत्रा

सूट ९॥≈

बाकी ... ... रु॥

१०७०।॥≈॥

१३। मोहतर्फा खर्च

—

१०८४८≈॥

पैकीं वसूल भाडचा ब॥ १९५॥ रु॥

बाकी शके १७१५ वैशाख व॥१३

८८८॥≈॥ रु॥

व्याज ता॥ शके १७१६ ९७॥–।॥

वैशांख व॥ १३

मुद्दत माहे १२ ये॥ कच्चे

१०६६४॥≈ दर सद्दे १ प्रें॥

१०६॥≈ वजा बारोत्रा ८॥।–।

बाकी रु॥

—

९८६॥०।

खर्चपट्टी वगैरे १३॥

—

१०००८।

पैकीं वसूल घराचे भाडयाबद्दल रु॥ २०९

बाकी शके १७१६ वैशाख व॥ १३

रु. ७९१८।०

प॥ शके १७१६ व्याज ता॥ शके १७१७

वैशाख व॥ १३ ८७

मु॥ माहे १२ ये॥ कच्चे ९४९२८≈

दर सद्दे रु॥ १ प्रे॥ ९४॥।≈॥ वजा

बारोत्रा सूट ७॥।≈॥ रु॥

बाकी रु॥

—

८७८८।०

खर्चपट्टी वगैरे १३८≈

—

८९१८≈।

व पैकीं वसूल २०९ रु॥

बाकी शके १७१७ वैशाख व॥१३ रु॥
६८२८/=।
व्याज शके १७१८ वैशाख व १३
७५८॥॰
मू॥ माहे, वारा ये॥ कच्चे ८१८६।=
दर सद्दे प्रे॥ रु ८१॥।-॥। वजा
बारोत्रा ६।॥÷
बाकी रुपये
७'१७।॰
खर्च पटी. १२॥=॥

७६९॥।=

पैकीं वसूल २०९ रु॥
बाकी शके १७१८ वैशाख व॥ १३
रु॥ ५६०॥।=॥
६१॥=।
व्याज त॥ शके १७१९ वैशाख व॥१३
मु॥ माहे बारा ये॥ कच्चे ६७३१॥=
रु॥हा सद्देचे रु॥ प्रे॥, ६७÷
वजा बारोत्रा सूट ५॥-॥।
बाकी रु॥

६ २॥=॥।
खर्च पटी. १२॥=

६३५॥॥॰।

पैकीं वसूल १८१।. रु॥
बाकी शके १७१९ वैशाख व॥ १३
रु॥ ४५४८॥।
व्याज त॥ शके १७२० वैशाख ४९॥॥=
व॥ १३
मु॥ माहे १२ ये॥ कच्चे ५४४८॥÷

दर सद्दे रु॥ १ प्रें॥ ५४॥=॥ रु॥
वजा बारोत्रा सूट ४॥॰॥ रु
बाकी रुपये ४९॥= रु॥

५०३॥॥=॥॥
खर्च पटी. १२।

५१६८=॥॥
पैकीं वसूल १९२॥॥-॥॥
बाकी वैशाख व॥ १३ शके १७२०
रु॥ ३२३।=
व्याज त॥ शके १७२१ वैशाख ३५॥-॥।
व॥ १३
मु॥ माहे १२ यो कच्चे रु॥ ३८७६
दर सद्दे रु॥ १ प्रें॥ ३८॥।- रु॥
वजा बारोत्रा सूट ३८=। रु॥
बाकी रु॥

३५॥-॥। रु॥
३५८॥।=॥॥
खर्च पट्टी वगैरे १०॥

३६९।=।॥
पैकीं वसूल रु॥ १९९
बाकी शके १७२१ वैशाख
व॥ १३ रु॥

१७०।=॥॥

श्री.

लेखांक ३२३.

१७२१.

श्रीमंत दादासाहेब यांची सेवा चिंता विठ्ठल यांणीं एकाग्र केली. फडणिसी व दिवाणगिरी करून मसलती केल्या व लढाया मारिल्या. नक्ष स्वामीचा बजावला.

पस्ती (स) वर्षं बेरोजगार किल्लेकोट वेडया बंदखाने विष घेऊन बायकामुलें निवर्तलीं घरेंदारें सर्वस्वीं लुटलीं गेलीं. कसाला थोर गुदरला. लोकांचे कर्ज देणें बहुत आहे. सबब माारनिलेचे शेवेवर श्रीमंत महाराज राजश्री बाबासाहेब मेहरवान होऊन अक्षई बक्षीस चिंतो विट्ठल यांचे पुत्र रो त्रिंबकराव चिंतामण यास मौजे बोज व मौजे जिऱ्हाले व बेलगाव व पिपळोद व गोवे कृष्णातीर पांच गांव इनाम दिल्हे असेत त्याच्या सनदा व पत्रें.

श्री.

१७२१.

लेखांक ३२४.

गांव वगैरेः—

१ मौजे साकेगांव पो सेवगांव.
१ मौजे चापडगांव पो सेवगांव.
१ मौजे विसापूर पो खटाव.
१ मौजे नहपतगांव पो कोसगांव.
१ मौजे अंबेसल व लोचनगांव.
१ शहर बऱ्हाणपुरीं.
१ अमिनी
१ तहवेलदारी

२

१ माज भादें पा सुलतानपुर.
१ मौजे चोपाळें पो नंदुरबार.
१ मुकासा मौजे कलमाड बु॥
ता तामसवाडी पो बाहाळ
१ मौजें दारणासांगवी पो नासीक येथें मुकासाविशीं.
गोविंदराव विष्णुकडे
१ नंदुरबार.
१ सुलतानपूर.
१ नवापूर.
१ भामरें.
१ थालनेर.
१ सोनगीर.
१ नरें.

श्री.

लेखांक ३२५.

१७२१ कार्तिक शुद्ध २.

पे॥ छ ८ जमादिलाखर मया तैन व अलफ.

भूपलक्ष्म्याशोभित मित्रजनकार्य-करणे निरंतर-सुप्रसन्न-चित्त राजमान्य राजश्री रावजी स्वामीचे शेवेसीः—

मित्रवर्गांतरगत प्रियतम मित्र बलवंतराव सोनदेव देवस्थळी कृतानेक सां॥ नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ कार्तीक शु॥ २ द्वितीयेपावेतों मुक्काम जानवले येथे सुखरूप असो. विशेष. चिरंजीव राजश्री राघोपंत दादा तेथें गेलेपासून त्याचीं पत्रें दोन च्यार आलीं परंतु आपलें पत्र न आलें. तेणेंकरून चित्त साकांक्षित आहे. तरी असें न करावें. निरंतर येणाराबरोबर स्वकीय स्वामिगौरवादि आनंदलेखनेकरून आनंदवीत असावें. हें परंपरागत स्नेहास व आपले चातुर्यादि गुणास उचित असे यानंतर चिरंजीव तेथें आहेत त्याजवर कृपा तीर्थस्वरूप कैलासवासी तात्या आमचे पितृव्यावर कनिष्ट बंधूप्रमाणें करीत होते तदनुरूप असावी. आपण तो करीतच असतील. जो गुण ज्याजमध्यें असतो तो गुण सहजामध्यें उपदेशावाचून घडतो. याविषयीं श्लोक. संत्यज्य दोषं गुण एव दृष्टीर्विधेयतामित्य-फलं वचो मे॥ विहाय नीरं सकलोपि हंसः पयः प्रगृण्हात्युपदेशतः किं॥ सारांश, आपली कृपा चिरंजीवावर असावी आणि आपले व

चिरंजिवाचे मनोद्यासारखी उभयताची कार्यें श्रीमंत यजमान स्वामीपासून व्हावी हा हेतु आहे. सुज्ञाप्रती विशेष काय लिहावें ? मातबरीं मेहरीस येतो. कळावें बहुत काय लिहिणें ? कृपा लोभाची वृद्धी निरंतर करावी. हे विनंती. नारळ शाहाळींव पोफळें पाठविलीं आहेत घेऊन पावलें. याचे उत्तर रवाना करावें. हें विनंति.

श्री.

लेखांक ३२६.

१७२१ कार्तिक व॥.

अर्जदास्त श्रीमंत महाराज साहेबास विनंती.

सेक आमद हाडीर श्रीमंत नि॥ तोफखाना. साहेबीं अर्ज लिहीली कीं पूर्वी नाडवाले जुमाशा फकीर महाराज नाना भाऊ साहेबाचे आमलापासून होते. फकीरबावानें कुवरनकीटी तिची कन्या हाजीफा तिजला बाई बाई म्हणून छटु फरास यांनीं बसावयाचा ठिकाणा केला. पुढें येक दिवसीं त्या बाईची आबरु घेतली. बदकर्म केलें. याची चर्चा जाली तेव्हां दहावीस लोक मिळाले. फकीरबावास म्हणूं लागले कीं तुम्ही फकीर थोराचे पेदे असतांनीं हें तुमचेंजवळ कर्म वर्तलें हें काय ? तेव्हां फकीरबावा बोलले कीं ऐसे कर्म तुम्हीं करूं नये. तेव्हां छटुराम यानें उत्तर केलें कीं तुम्हांस या गोष्टीचे कांहीं बोलावयाचें काम नाहीं. तेव्हां गरीब फकीर उगें राहिले, तेव्हां या गंडची व छटुरामची दोस्ती दाहावरशें चालली. श्रीमंत महाराज नारायणराव साहेबाचे गरदीचे वेळेस पळून गेले. छटूवर हि गरदी जाली. आतां श्रीमंतानीं तिची तिजला जागा काईम ठेविली आहे. पुढें तिनें फंद केला आहे कीं फकीराची जागा द्यावी. नाडेवाले फकीरबावा यांची पूर्वीपासून कबरी व मसीदा जागा आहे त्यांत ईणें फकीराचे जागेवर धर्मार्थ बावणें ठेविलीं होतीं तीं उलटून फकीराची जागा द्यावयास उभी राहिली आहे. म्हणते कीं माझे नवऱ्याची दोशस्तीन होती ती माझीच जागा यावर महाराजास अर्ज आहे कीं, इचे नवऱ्यानें दाहा मिळीनी केल्या त्या मिळून लटकें कुफराणें करून फकीरबावाची जागा द्यावयास उभ्या राहिल्या तर देवें कीं काय ! महाराजास इचे अर्ज आपण धर्ना आहांत यांतले अर्थ ध्यानास आणावे मग ज्या मार्ग लावले त्या मार्ग चालूं. या गोष्टीचा साक्ष पुरऊन देऊं. न देऊं तर सरकारचा गुनेगार.

श्री.

लेखांक ३२७.

१७२१ कार्तिक व॥ १४.

जबानी खेमचंद व॥ नारायणदास दाळवाले परदेशी पेठ गणेश शहर पुणें सु॥ मया तैन व अलफ. लेहून दिल्ही जबानी ऐसीजे पेठ मजकुरीं आम्हीं जागा खरेदी केली. त्यांत आम्ही नांदत आहों. हाली ती जागा छटुभाई फरास याची बायको आपली ऐसें बोलोन सरकारांत विनंती करून आम्हास सरकारातून ढलाईताकडून घराबाहेर काढून दिल्हें. त्यास ही जागा रत्नोजी फरास नी॥ सरकार याची त्याजपासून खुशरजावंदीनें आम्हीं घेतली ते समयीं जाग्याविशीं रत्नोजी फरास याचे नावें सरकारचें पत्र आहे. ते पाहोन अडीचशें रुपये देऊन खरीदपत्र करून घेतलें तें पेठकरी यास दाखवून चावडी पेठ मजकू-

रीची येथें नेऊन पत्र चावडीचे पत्र करून घेतलें ते समयीं चौकशी पेठ चावडी येथून करून आमचे पत्र करून दिल्हें व कोतवालचावडीस खरेदीपत्र व चावडीचे पत्र दाखविलें त्याजवरून त्यांनींही चौकशी करून मोजणी करून पत्र करून सीरस्ता-प्रें॥ कबज पत्राचे रुपये व कारकुनी घेऊन भोगवटी यास पत्रें करून दिल्हे आहेत तीं बाजिन्नस स्वामीनीं पाहोन माझी जागा घर नांदतें माझें देवावें येविशीं आज्ञा जाहली पाहिजे रत्नोजी जवळ जागा खरेदी करून घेतली तो ही येथें आहे चौकशी येविशीं जाहली पाहिजे सरकारांतून रत्नोजीस खोटा असें करून द्यावें म्हणजे स्वामी आज्ञा करतील त्यास मान्य आहे सदरहू लि॥ प्रें॥ खरें करून देईन हें लिहून दिल्हे. सई मी॥ कार्तिक शु॥ १४ बी॥ जनार्दन धोंडदेव कारकून दिम्मत मल्हार बाजी हुजूर गार्दी सरकार.

श्री.

लेखांक ३२८.

सिका असल बा॥ नकल.

आज्ञा पत्र राजश्री पंतप्रधान ता॥ मोकदम मौजे वागन ता॥ करेपठार प्रा॥ पुणें सु॥ इहीदे मयातैन व अलफ. मौजे मजकूर येथील मोकासा चिंतो विठल याजकडे सर लस्कर याजकडून इनाम चालत होता त्याची जफ्ती पेशजी सरकारांतून जाहली आहे. ते हाली मोकली करून चिंतो विठल मृत्यु पावले त्याचे पुत्र राजश्री त्रिंबकराव चिंतामण याजवर मौजे मजकूरचा मोकासा ईनाम मशारनिलेकडे पेशजीप्रमाणें चालवावयाची आज्ञा.

श्री.

लेखांक ३२९.

१७२२.

विनंति उपरि. श्रीमंतास चिठी लिहिली आहे ते पाहून दाखवून मजला काय आज्ञा करितात ते नंतर कळविणें. खासगत श्रीमंताचे माहाल आहेत तेथें गैरवाजबी लोकांची खेडीं व असाम्या जप्त आहेत त्या सोडल्यास किती संकट पडते आणि अन्न खावयास नाहीं येथें चित्तास येईल तें म्हणावें तेव्हां बाकी कोणती काय बोलावें ? बोलावें तरी अबरू गमवावी यास्तव अगोदर मजला निरोप होय असें करणें हे विनंति.

श्री.

लेखांक ३३०.

१७२२.

मौजे ढोकरी परगणे अकोले हा गांव चिंतो विठल यांसि इनाम दरोबस्त कवीजंग यांणीं पेशजी दिल्हा आहे. त्या गांवीं अंबराई लाऊन वगैरे कारकीर्द केली आहे. तेथील अमल चिंतो विठल यांचे पुत्र रे॥ त्रिंबकराव चिंतामण याजकडे सुदामतप्रें॥ देत जाणें म्हणोन पेशजी मुकदम व जमीदार यांस ताकीद केली असतां अमल यथास्थित चालत नाहीं म्हणोन हुजूर विदित जालें. त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी मौजे माारचे मुकदम व जमीदार व कवीजंग वगैरे कोणी दिकत करील त्यास निक्षुन ताकीद करून अमल बसऊन देणें मौजे माारची वैवाट रे॥ त्रिंबकराव चिंतामण याजकडे सुरळीत चाले तें करणें पुन्हा बोभाट येऊं न देणें म्हणोन पत्र किल्ले नगर येथील मामलेदरा

नि॥ सिंदे याचे नांवें येक. मौजे हुकेरी पे॥ अकोलें हा गांव चिंतो विठल यासी इनाम, दरोबस्त पेशजी कवीजंग यांणीं दिल्हा आहे त्या गांवीं अंबराई लाऊन वगैरे कारकीर्द केली आहे तेथील अमल चिंतो विठल यांचे पुत्र रे॥ त्रिंबकराव चिंतामण याजकडे देत जाणें म्हणोन पेशजी आज्ञा केली असतां माारनिलेकडे अमल सुरळीत चालत नाहीं म्हणोन विदित जालें त्याजवरोन हे आज्ञापत्र सादर केलें असे तरी मौजे मजकूरचा अमल सुदामतप्रे॥ सुरळीत रे॥ त्रिंबकराव चिंतामण याजकडे देणें. पुन्हां बोभाट येऊं न देणें म्हणोन पत्र किलेनगर येथील मामलेदार नि॥ सिंदे यांचे नावें १ मौजे ढोकरी पो॥ अकोले हा गांव चिंतो विठल यासी ईनाम १ दरोबस्त पेशजी कवीजंग यांणीं दिल्हा आहे त्या गांवी आंबराई लाऊन वगैरे कीर्द केली आहे तेथील अंमल चिंतो विठल याचे पुत्र रो त्रिंबकराव चिंतामण याजकडे देत जाणे म्हणोन पेशजी आज्ञा केली असतां मा॥रनिलेकडे अमल सुरळित चालत नाहीं म्हणोन विदीत जाले त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केलें असे. तरी मौजे माारचा अलम सुदामतप्रो सुरळीत त्रिंबकराव चिंतामण याजकडे देणें. पुन्हा बोभाट येऊं न देणें म्हणोन मुलाद्यास पत्र सदरहू अन्वये जमीदार मौजे माारचे यास पत्र १ कवीजंग सवाने मोगल खालावीजंग बाहादर यार्चें नांवे १मौजे माार तुमचे तिर्थरूपांनीं चिंतो विठल यास दरोबस्त गाव ईनाम दिल्हा आहे तेथील अंमल चिंतो विठल याचे पुत्र रो त्रिंबकराव चिंतामण याजकडे चालवणें येविसी का॥दार व मोकदम व जमीदार यांस तुम्हीं आपलीं पत्रें देऊन निक्षूण ताकीद करून मौजे माार दरोवस्त मारानिलेकडे सुरळीत चालवणें. बोभाट फिरोन येऊं न देणें पत्र १

मौजे माार चिंतो विठल यासी ईनाम दरोवस्त पेशजी कवीजंग यांणीं दिल्हा आहे तेथें आंबराई वगैरे कीर्द केली आहे. तेथील अमल चिंतो विठल याचे पुत्र रो त्रिंबकराव चिंतामण याजकडे चालवावयाविसी आज्ञा मुकदम वगैरे यास करून हें पत्र तुम्हास लिहों असे. तरी किलेनगर येथील तुम्ही आपले कमावीसदारास निक्षूण ताकीद करून मौजे माारचा अंमल दरोबस्त इनाम त्रिंबकराव चिंतामण याजकडे सुरळीत चालवणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. म्हणोन अलीज्या बाहादर सिंदे यांस

५ ——

श्री.

लेखांक ३३१.

१७२२.

राजश्री रावजी खासगिवाले गोसावी यांसि

छ अखंडित-लक्ष्मी-अलंकृत राजमान्य श्रो माधवराव न॥ देशमुख पा॥ नेवासे दंडवत विनंति उपरी येथील कुशल त॥ छ २१ रजब पावेतों मुक्काम पुणें येथें यथास्थित असो विशेष राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांनीं सरकारचीं पत्रें तुमचे नांवे आणलीं आहेत त्याप्रमाणें मशारनिल्हेचे कामा-काजाचा वंदोबस्त करून घ्यावा पुन्हा बोभाट न यावा बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति.

——

श्री.

लेखांक ३३२.

१७२२.

साहेबाचे शेवेसी. कुसाजी पानसोडे पेठ शुक्रवार पुणें अर्ज विज्ञापना का॥ सखाराम गणेश आंबडेकर निा॥ लछीराम बखतनाल यार्णे पेठ बुधवारचे दुकान घर दरोबस्त भिवभट शार्दूल याज पाशीं गाहाण ठेऊन ऐवज घेतला. त्यास भिवभटजीस ऐवजाची गरज लागली सबब भटजी व सखाराम गणेश आम्हापाशीं येऊन पेशजीचे भटजी-पाशील गाहाणखत व भटजीचे नांवें दुसरा कागद करून दोन्ही कागद आम्हांपाशीं देऊन माझा ऐवज नेला त्यास हालीं धटाई करून माझा ऐवज मजला देत नाहींत ना घर गाहाण ठेविल्याप्रों माझे स्वाधीन करीत नाहीं. घराच्या भाड्याचा ऐवज येतो तो देखील दुसरीकडे नेतात. मी गरीब माणूस. म्या लोकाचा ऐवज घेऊन याजला दिल्हा. त्याचे व्याजें देतां मी बुडालों. झा शके १७१८ चे चैत्र शुा १ ता शके १७२१ श्रावणमास त्यास मजवर स्वाम कृपाळू होऊन सखाराम गणेश आंबडेकर यास धटाई करितो आणि शिंदे होळकर याची हिमायेत दाखवितो. त्यास शिंदे यांचे लष्करांत ये विषयीं फड पडला तेथें माकुल होऊन आतां आंगबाकंचे माझ्या ऐवजाचा निकाल करून देत नाहीं ना गाहाण हि स्वाधीन करीत नाहीं. त्यास देवेवणार धनी समर्थ आहेत हे विज्ञापना.

श्रीगजानन.

लेखांक ३३३.

१७२२.

यादी

नाशिक पैकीं वाडे वगैरे

१ पंचवटीचा वाडा
१ पाा दिंडोरी येथील
१ परगणें हरष येथील बेलगांवचे कुळकर्ण
१ आंबराई उन्हाळ्याची
१ आंबराई उन्हाळ्याची
१ पाटिलकी चहेडीची
१ मोकासा मौजे दुगांव
१ आंबडीचे इनाम.

पुण्या पैकीं वाडे वगैरे

१ पागेचा वाडा व गाडीखाना
१ पुला वरील वाडा.

२

रामाजी जनार्दन कारकून त्याजपासून हिशोब वगैरे पुसावयाचे सबब त्याची घरें वगैरे आहेत त्यास मारानिले गैरहजर जाले त्यास त्यांची घरें वगैरे आहेत तेथें अंमल आमचा असावा.

श्री.

लेखांक ३३४.

१७२२.

यादि खा॥ राजश्री त्रिंबकराव चिंतायण सु॥ इहीदे मया तैन व अलफ. इनामगांव व वतनाची मोकलीक करून घेतली बद्दल खर्च. रु॥

४००० वे॥संपन राजश्री अपासंधि अग्नीहोत्री.
४००० ऐन द्यावयाचे ते दिल्हे.
० शिवाय वर्षासन मौजे अहिरे येथें करार करून देण्याचा करार ठरला आहे. दरसाल रुपये. २००

४०००

२००० वे॥ राजश्री बाळशास्त्री बावा यास.
१५०० राजश्री चिंतो वामन.
७०० राजश्री भाऊ सरंजामी दाखले पाहावयासंबंधीवगैरे खासा वगैरे कारकून मिळोन
१५०० नि॥ चिटणीस.
१००० खासा.
५०० तरेखसमंधी व लिहीण्यासमंधी.

१५००

१३०० नि॥ मजमदार खासा व कारकून.
२०००नि॥ फडणीस खासा व कारकून.
३००० अंतस्त वि॥ अग्नीहोत्री.
१५० नि॥ दप्तरदार पत्रें बार करावयासमंधी.
५०० शागीर्द पेशा नि॥ श्रीमंत स्वामी.

श्री.

लेखांक ३३५.

१७२२ वैशाख शुद्ध ५.

ती॥ राजश्री रावजी स्वामी वडिलांचे सेवेसीः—

अपत्य गोपाल धोंडाजी शिरसा नमस्कार विनंति विज्ञापना. येथील कुशल ता॥ वैशाख शु॥ ५ पो वडिलांचे आशिर्वादें सुखरूप असो. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस जाहले पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. असो. रा॥ वेंकाजी जयराम याजकडे गजीच्या संताचे वगैरे काम सांगितलें त्यास फार उत्तम केलें हालीं श्रीमंताचे स्वारी बरोबर रा॥० भिकाजीपंत आप्पा व माधोराव आले यांणीं आक्षेप केला आहे त्यास रा॥ माधवराव भय्या राजे बाहादर यांचें पत्र आन्या धुमाळ याचे नांवें आल्यास बंदोबस्त होईल. दुसरें आपण आम्हांस लिहिलें कीं आमचे हातची बाकी सर कानगोई संबंधी बागलाण प्रांतीची वसूल करून द्यावी म्हणून लिहीं त्यांस पदच्युत जाहल्यास कोणी उभे राहूं देत नाहीं. आपण वडील आहांत सर्व आपल्या ध्यानांत आहे परंतु बंदोबस्त राखावा. भिकाजी मोरेश्वर याचीं बोलणीं बहुत जाहलीं. भेटीनंतर सविस्तर निवेदन होईल. पत्रीं विस्तारें कोठवर लिहूं ? समक्ष भेटीस लवकरच येतो. कळावें बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विज्ञापना.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक ३३६.

१७२२ ज्येष्ट शुद्ध २.

राजश्री त्रिंबकराव चिंतामण गोसावी यांसी

छ अखंडित-लक्ष्मी-अलंकृत—राजमान्य श्रीो यशवंतराव होळकर दंडवत विनंती उपरी येथिल कुशल जाणोन स्वकिय लिहित जावें विशेष तिकडून भागोजी गवारी

आले त्यांनीं तुम्हा कडील स्नेह घरोब्याचे रितीस जमण्याचे प्रकार सांगितले. त्या-वरून बहुत संतोष जाहाला चिरंजीव राजश्री खंडेराव तेथें आहेत त्याजवर श्री-मंतांनीं लोभ करून सर्व प्रकारें संरक्षण केलें पुढेंही बंदोबस्त करुन देऊन सरकार-चाकरी घडे तें करणार तेच आहेत तुम्हीं प्रसंगीं आहा विनंती करून दरबारांत

॥ श्री ॥
म्हाळसाकां
त चरणी तत्पर
मल्हारजीसुत
खंडेरावहोळ-
कर.

दौलतीचा बंदोबस्त सत्वर होऊन सरकार-चाकरी घडे तें करावें सविस्तरें माानिले बो-लतील रा॥ छ १५ मोहरम सु॥ इहिदे मया तैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंति.

श्री
मोर्तब
सुद

श्री.

लेखांक ३३७.

१७२२ आषाढ वद्य ३.

मयराळजी बीन सिवापा वा०ी होण-राव कोठवळे नि॥ श्रीमंत मातुश्री आनंदी-बाई साहेब याचे तीर्थस्वरूप सिवापाकडे कर्ज लक्ष्मण भट दिवेकर यार्चें येणें रुपये बाराशें, त्याचे खत भास्कर माहादेव काणी-टकर यार्चें नांवाचे शके १६९४ चे सालीं करून घेतलें. त्यास ऐवज याचे घर कसबे पुणें पेठ रविवारांत पुरातन नांदतें कवलारी. त्याची हमशाई. उत्तरेस दामोदरदास को-ठारी. व दक्षनेस भिवजी कोठवळे. पश्चि-मेस रस्ता. व पूर्वेस + + + + मुदत येका वर्शाची व्याज दरमहा दर शेकडा एकोत्रा-प्रों अन्वयें खत लिहून घेतलें यावर मुदती-वर व्याजसुधा रुपयाचा फडच्या करून द्यावा आन आपलें घर सोडवून घ्यावें तों आम्ही तिर्थरूपसुधां श्रीमंतसाहेबाचे स्वारी-समागमें पुणियांतून गेलों पाठीमागें गर्दी जाली. वस्तभाव लुटली गेली. मुल लेकर गरीबतारीत येऊन परागदा जाहलो. ते अवांतर जागीं जाऊन राहिली. श्रीमंत बाईसाहेबाची स्वारी धारेकडून सुरतेस आली. आवया तवया भोगिला तो अ-कस्मात तिर्थरूप सिवापा निवर्तले उप-रातीक कालेकरून साहेब पुणियास आले. ते समयीं सेवक हि चाकरीस धणियाच्या पायापासीं आला. दिवेकर याजपासीं जा-ऊन त्यास मतलें कीं ई॥पासून घराचें भाडें काय वसूल जाहलें तें आह्मांस समजावणें ऐसें बोलणें दोन तीन महिने केलें परंतु ते कांहीं आम्हांस समजाविना. मग रु-ष्णाजी परड हुजरे नि॥ सरकार याचे वि॥ साहेबास अर्ज केला तो धणियांनीं मनास आणून दिवेकर यास हुजूर बोलाऊन सां-गितल कीं याचा हिसोब ई॥पासून घराचें भाडें काय वसूल जालें हें सरकारांत सम-जावणें त्याजवरून दिवेकर यांणीं आपला हिसोब आणून सरकारांत समजाविला. त्याची चवकसी करता घराचें भाड्याचे रुपये ४१०८ च्यार हजार एकसे आठ शके १७२० चे सालापावेतों वसूल जाहलें. त्याजपैकीं घराकडे खर्च रुो ३२५॥– ति-नसे पंचवीस नऊ आणे जाहले बाकी ३७८२।≈ तीन हजार सातसे बयासी रुो सात आणे निकालस पावती घरापैकीं दिवेकरास जाहली. येसें साहेबाचें ध्यानास येतांच होणराव याचे घरांतील भाडेकरी महंमद हुशेन ताजभाई व विश्राम इसमा-यल बहुरियास सरकारांत बोलाऊण आ-

णून ताकीद केली कीं दिवेकर यास भाडें न देणें. तवा बहुरी यानें अर्ज केला कीं दिवेकर यांणीं आम्हापासून भाडेचिठी सिवराम नारायण आठवले या घराची घ्यास लिहून देविली आहे. साहबांनीं त्यास सांगावें त्याजवरून आठवले यास हुजूर बोलाऊन सांगितलें कीं बहुरियास या घराचे भाड्याबद्दल तगादा तुम्ही आमचा परवाणीबिगर न करणें-आयसें सांगून दिवेकर आठवले यांस सांगितले कीं तुम्ही सरकारांत येऊन चवघे सावकार मिळून याची पंचाईत करणें त्यास पाच सहा महिने पंचावीत सरकारांत होत होती. आयसें असतां साहेबाणीं आपले समक्ष चवघे सावकार व दिवेकर व आठवले यास विचारलें कीं मुदल रुपये वारासें सावकाराचें कुलाकडे येणें-कुलाकडून पावती तीन हजार सातस ब्यायेसी रुो सात आणे वसूल सावकारास पावला असता सावकार कुळाचें घर सोडीत नाहीं त्यास तुम्ही पंचावीत मतें सांगावें. तव चवघांनीं साहेबास समजाविलें कीं कुलाकडे सावकाराचा कांहीं दावा राहिला नाहीं. कुळाचें घर व खत व बहुरियाची भाडेचिटी आयेसी सावकारांणीं यावी. आयेसें चवघांणीं साहेबास समजाविलें तें समईं दिवेकर व आठवले यांस सांगितलें कीं चवघांचें मतें आयसें ठरले. तुम्ही या घराचें खत व भाडेचिठी बहुरियाची बहुरियास देणें तें समईं बहूरी याजकडे घराचें भाडें आटकाविलें होतें तें बहुरियास आठवले यांणीं सांगितलें कीं तुम्ही मयराळ बीन सिवापा होणराव यास घराचें भाडें सरकारांतून तुम्हांस ताकीद देऊन आटकाविलें त्या दिवसापासून माझानिलेस देणें तुम्हाकडे आमचा कांहीं तगदा राहिला नाहीं. तुमची भाडेचिठी या घराबद्दल आम्हाजवळ आहे ती आम्ही तुम्हांस देऊं. आयेसें सरकारांत साहेबाचे हुजूर दिवेकर व आठवले यांणीं प्रमाण करून गेले कीं मयराळ होणराव याच्या तिर्थरूपाचें नांवचें होतें त्याचे त्यास देतों व बहुरियाची भाडेचिठी बहुरियास देतों. येणेंप्रमाणें मयराळ बीन सिवापा वाणी होणराव याचा व दिवेकर याचा फडच्या करून घेऊन याचें घर याचें हवाला केलें. पुढें कांहीं दावा या घरावर दिवेकर याचे कर्जाचा व सरकारचे नजरेचा राहिला नाहीं. मयराळ बीन सिवापा यांणीं आपलें घर स्वसंतोसें अनभवावें. भोडेचिठी गयेविले पडली. सबब आठवले यांणीं बहुरियास फारखती लिहून दिली. मिती आशाड व॥ ३ शके १७२२ रुद्रनाम संवत्सरे हस्ताक्षेर भिकाजी सिवराम आठवले.

श्री.

लेखांक ३३८.

१७२२ श्रावण वद्य २.

अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य राजश्री त्रिंबकराव चिंतामण गोसावी यांसिः—

सेवक अमृतराव रघुनाथ नमस्कार सु॥ इहिदे मया तैन व अलफ. तुम्हीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. निष्टेचा मजकूर लिहिला तो विदित जाहाला. ऐशास तुम्हीं पहिल्यापासून पदरचेच आहां. तेथें चिरंजीव राजश्री बाबासाहेब याजवळ लागू होऊन राहाणें. राजश्री विठ्ठल बल्लाळ यांसहि एका दोहों रोजीं तेथें पाठविलें

जाईल. जाणिजे. छ १४ रविलावल. बहुत काय लिहिणें ?

श्री
लेखन

श्री.

लेखांक ३३९.

१७२२ मार्गशीर्ष शुद्ध ८.

राजश्री कासीराव होळकर गोसावी यांसि

छ सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेा॥ बाजीराव रघुनाथ प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकिय कुशल लिहित जाणें विशेष प्रांत खानदेश येथील कानगोईचें वतन खंडो गंभीरराव व चिंतो विट्ठल यांचे त्याची जप्ती पेशर्जा सरकारांत जाहाली आहे त्यास चिंतो विट्ठल आपले तीर्थरूप मृत्यु पावले ऐशास सदरहू वतनाची जप्ती मोकळी करून वतन आपल्याकडे चालविलें पाहिजे म्हणोन चिंतो विठल यांचे पुत्र राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांणीं हुजूर विनंती केली त्याजवरून प्रांतमजकुराचे कानगोईचे वतन पाीं चिंतो विट्ठल यांचे हिश्शाची जप्ती हाली मोकळी करून चिंतो विट्ठल मृत्यु पावले त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामण याजवर कृपाळू होऊन प्रांत मा॥ येथील कानगोईचे वतन यांचे यांजकडे चालवण्याची आज्ञा करून हें पत्र तुम्हास लिहिलें असे तरी तुम्हांकडे प्रांत-मजकुर-पैकीं माहाल आहेत तेथील कमावीसदारांस व जमिनदारांस ताकीद करून लिहिल्याअन्वयें वतन व हक्कसूम इनाम व मानपान कानूकायेदसुध्धा चिंतो विट्ठल याजकडे पेशजी सुदामत चालत आल्या-प्रों त्रिंबकराव चिंतामण यांजकडे चालवणें व कानगोईचे वतनाचा शिरस्ता कागद-पत्राचा पूर्वी मोंगलाई अमलांतील असेल त्याप्रमाणें कागदपत्र मारनिल्हेचें दफ्तरीं पेशजी सनदेप्रमाणें देवीत जाणें जाणिजे छ ६ रजब सु॥ इहिदे मया तैन व अलफ बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

श्री.

लेखांक ३४०.

१७२२ मार्गशीर्ष वद्य ४.

राजश्री बखत-रामभाई आगरवाले गोसावी यांसि

छ अखंडित-लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्रे॥ गोपाळराव त्र्यंबक राजेबहादर आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकिय कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष बहुत दिवस जाले उम्हा कडुन पत्र येउन वर्तमान कळत नाहीं त्यास असें न करावें तर हमेशा पत्र पाठऊन स्व-कुशल-वर्तमान कळवित जावें तुमची बडती ऐकोन बहुत संतोष आहे ऐशास राजश्री त्रिंबकराव चिंतामण सर-कानगोइचें वतन प्रांतमजकुरीं आहे त्यास राजश्री सुभेदार यांजकडून सुभा आपलेकडे आहे हें जाणोन सर-कानगो याचें वतना बंदोबस्त माहालानिहाय बितपसिल

१	सरकार बिजागडचे खरगोण बतीसी	
	एा महाल.	
	एा कलमें	३२
१	पो आडावद.	

१ पो सुलतानपुर.
१ नंदुरबार.
१ पो उत्राण.
१ पो गाळणें.
१ पो थालनेर.
१ पो आंबेपोतडे
१ दुमालेगांव फुट जागिर तुमचे यजमानाचे सरकारांत आहेत. ते कलमें.

॥ श्री ॥
उमाकां
त चरणी तत्पर
॥ गोपाळराव त्रींब
क गजेबाहदर
णीरंतर.

एकूण सात महाल सरकार बिज्यागड खरगोण बत्तीशी महाल तेहतीस व फुट जागिरीचें गांव सिवाय सदरहू येथील हकरुसूम दर सद्दे रु॥ १ व गाव-गन्ना सालिना दर गावीं रुपया १ जकात भुसार व किराणा व कापड सुध्धा व मोहतर्फा व शेव-संबजी वगैरे व परगणे सुलतान-पूर येथील हवालदारी-बाब येणें-प्रों आहे ये विशई यांजकडून तुम्हा-कडे कारकून येतील ते तुम्हांस वर्तमान वतनाचें निवेदन करतील त्याप्रों बंदोबस्त करुन देवावायाचे वत्नाचें कामकाज सुरळीत चालऊन हक्करुसूम पावित जावे रा॥ छ १७ रजब बहुत काय लिहिणें हा आशिर्वाद.

मोर्तब
सुद.

श्री.

लेखांक ३४१.

१७२२ पौष.

राजश्री त्र्यंबक रावजी गोसावी यांसिः-स्नो विठलराव होळकर दंडवत. विनंति. उपरि तुम्हीं हरीपंतांचे नांवें चिठी पाठविली कीं अकरा गोण्या गोविंदा बराट याच्या हवाला करणें. न केल्यास कामास पडणार नाहीं म्हणून लिहिलें त्यास गोण्यास आज तीन रोज जाले तेव्हाच अशी निक्षून चिठी पाठविली असती तर गोण्या माघारा दिल्हे असत्या. तुम्हां खेरीज दुसरा विच्यार नाहीं. परंतु काल सगळा वीळ वाट पाहिली. कोणीच न आलें तेव्हां लोकांच्या गवगव्यामुळें गोण्या फोड़न वाटून दिल्हे. तुम्हांस कळावें. आतां जैसे तुम्हांस कळेल तैसी रावसाहेबांस विनंति करून सांगावें. पूर्वी आम्हांस असेंच कळलें असतें तर गोण्या न फोडतों. दुसरें मुलास देवी निघाल्या आहेत. तर कनाता दोन जरूर पाठवणें. बहुत काय लिहिणें !* हे विनंति.

श्री.

लेखांक ३४२.

१७२२ पौष वद्य ४.

अजू स्वारी राजश्री बळवंतराव नागनाथ सुभेदार ता॥ पट्टा ता॥ मोकदम मौजे निम्हाळे ता॥ देपूर पो॥ संगमनेर सुमा ईहिदे मया तेन व अलफ. मौजे मजकूर येथील कुलकर्ण चिंतो विठल याचे आहे त्याची जप्ती पेशजीं सरकारांतून होऊन तालुके मजकुराकडे सांगितली आहे. हालीं मोकळीं करून चिंतो विठल मृत्यु पावले त्याचे पुत्र राजश्री त्रिंबकराव चिंतामण याजकडे मौजे मजकूरचे कुळकर्ण पेशजी प्रो मारनिलेकडे चालवावयाची हुजुरून छ २६ जमादिलाखरची सनद सादर जाहाली त्याजवरून हे चिठी सादर केली

* येथन अक्षर विठोजी होळकर यांचें खुद

असे तरी मौजे मजकूरचे कुळकर्ण माारनिले अनुभवितील. कुळकर्णाचें गुमस्तगिरीचे कामावर बापूजी शामराज यांस माारनिलेनीं पाठविले आहेत. कुळकर्णाचे कामकाज करितील. जाणिजे. छ १८ साबान. मोर्तब सुद

मोतब
सुद

श्री.

लेखांक ३४३.

१७२२ पौष वद्य ४.

राजश्री अंताजी हरी ठाणे निम्हाळे स्वामी गोसावी यांसिः—

सेवक बळवंतराव नागनाथ नमस्कार सुमा ईहिदे मया तेन व अलफ. मौजे निम्हाळें ता. देपूर पो संगमनेर येथील कुळकर्ण चिंतो विठ्ठल याचे आहे त्याची जप्ती पेशजी सरकारांतून होऊन तालुके पट्याकडे सांगितली आहे. हालीं मोकळी करून चिंतो विठ्ठल मृत्यु पावले त्यांचे पुत्र राजश्री त्रिंबकराव चिंतामण याजकडे मौजे मजकूरचे कुळकर्ण पेशजीप्रों माारनिलेकडे चालवावयाची हुजरून सनद छ २६ जमादिलाखरची सादर जाहाली त्याजवरून तुम्हांस लिहिलें असे तरी मौजे मजकूरचे कुळकर्ण माारनिले अनुभवितील तुम्हीं दखलगिरी न करणें. माारनिले यांनीं बापूजी शामराज यांस कुळकर्णाचे गुमस्तगिरीचे काम सांगोन पाठविले आहेत याचे हातें कुळकर्णाचे कामकाज घेणें. रवाना छ. १८ साबान. बहुत काय लिहिणें ?

श्री
मोर्त
ब सुद

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक ३४४.

१७२२ पौष व॥ ८.

मशरुल अनाम देशमुख व देशपांडे, उत्राण यांसी

कासीराव होळकर सु॥ इहिदे मया तैन व अलफ राजश्री त्रिंबकराव चिंतामण यानीं श्रीमंताचें पत्र छ ६ रजबचें आणिलें कीं प्रांत खानेदश येथील कानगोईचे वतन खंडोगंभीरराव व चिंतो विठ्ठल यांचे त्याची जफ्ती पेशजी सरकारांत केली होती त्यास चिंतो विठ्ठल निधन पावले त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामण याजवर रुपाळू होऊन यांचे हिश्शाचे वतनाची मोकळीक केली आहे तरी तुम्हाकडील मामलेदार व जमिनदार यांस ताकीद करून पुर्वी चिंतो विठ्ठल यांजकडे वतन चालत होतें त्याप्रों यांजकडे चालवणें म्हणोन त्यावरून हें पत्र सादर केलें आहे तरी तुम्ही सरकारसनदेप्रों परगणेमजकूर येथील कानगोईचे वतनाचा हक्करुसूम व इनाम व घरें व मानपान कानू कायदे सुध्धां पेशजी चिंतो विठ्ठल यांजकडे सुदामत चालत आल्याप्रमाणें मशारनिल्हेकडे चालवणें व कागदपत्राचा सिरस्ता पुर्वी मोगलाई अमलांतील असेल त्या अन्वयें यांचे दफ्तरीं देत जाणें जाणिजे छ २२ साबान मोर्तब सूद

मोर्तब
सुद

॥ श्री ॥
म्हाळसाकां
त चरणीं तत्प
र तुकोजीसुत
कासीराव हो
ळकर.

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक ३४५.

१७२२ पौष वद्य ८.

राजश्री आपाजीराव निंबाळकर का॥दार पें॥ रावेर गोसावी यांसि

छ. अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ कासीराव होळकर राम-राम विनंती उपरी राजश्री त्रिंबकराव चिंतामणयानीं श्रीमंताचें पत्र छ ६ रजबचें आणिलें कीं प्रांतखानदेश येथील कानगोईचें वतन खंडोगंभीरराव व चिंतो विठ्ठल यांचे त्याची जप्ती पेशजीसरकारांत केली होती त्यास चिंतो विठ्ठल निधन पावले. त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामणयांजवर कृपाळू होऊन यांचे वतनार्चा मोकळीक केली आहे तरी तुह्माकडील माहाला निहायचे मामलेदार व जमीनदार यांस ताकीद करून पुर्वी चिंतो विठ्ठल याजकडे वतन चालत होतें त्या णीं यांजकडे चालवणें म्हणोन त्यावरून हें पत्र लिहिलें असे तरी तुम्हीं सरकारसनदेप्रमाणें पे॥ माार येथील कानगोईचे वतनाचा हक्करसूम व इनाम व घरें व मानपान कानु कायदे सुध्धां पेशजी चिंतो विठ्ठल यांजकडे सुदामत चालत आल्याप्रमाणें मशारनिल्हेकडे चालवणें व कागद पत्राचा सिरस्ता पुर्वी मोगलाई अमलांतील असेल त्या अन्वयें यांचे दफ्तरी देत जाण रा। छ २२ साबान

इहिद्दे मया तैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती

श्री म्हाळसाकां तचरणीं तत्पर तुकोजीसुत कासीराव होळकर

श्रीम्हाळसाकांत.

लेखांक ३४६.

१७२२ पौष वद्य ८.

राजश्री केसो कृष्ण गुो व देशपांडे पा॥ गाळणा गोसावी यांसि

छ. अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य स्ने॥ कासीराव होळकर देशमुख पो। मा॥ दंडवत सु॥ इहीदे मया तैन व अलफ. राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांनीं श्रीमंताचें पत्र छ ६ रजबचें आणिलें कीं प्रांत खानदेश येथील कानुगोईचें वतन खंडोगंभीरराव व चिंतो विठ्ठल यांचें त्याची जप्ती पेशजी सरकारांत केली होती त्यास चिंतो विठ्ठल निधन पावले त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामण यांजवर कृपाळू होऊन त्यांचें हिश्शाचें वतनाची मोकळीक केली असे तरी तुह्मांकडील महालानिहायचे मामलेदार व जमीनदार यांस ताकीद करून पुर्वी चिंतो विठ्ठल यांजकडे वतन चालत होतें त्याप्रों यांजकडे चालवणें ह्मणोन त्यावरून हें पत्र सादर केलें असें तरी तुह्मीं सरकार-सनदे-

श्री म्हाळसाकां तचरणींतत्पर तुकोजीसुत कासीरावहोळकर

प्रों मा। येथील कानगोईचें वतनाचा हक्क-रुसूम व इनाम व घरें व मान-पान कानू कायदे सुध्धा [illegible] चिंतो विठ्ठल यांजकडे सुदामत चालत आल्याप्रों मशार-निलेकडे चालवणें व कागद-पत्राचा सिरस्ता पुर्वी मोगलाई-अमलांतील असेल त्या अन्वयें यांचे दप्तरीं देत जाणें जाणिजे छ २२ साबान बहुत काय लिहिणें

मोर्तब सुद

बार

श्रीह्माळसाकांत.

लेखांक ३४७.

१७२२ पौष वद्य ८.

॥ श्री ॥ ह्माळसाकांतचरणीतत्परतुकोजीसुत कासीरावहोळकर

मशरुल अनाम देशमुख व देशपांडे पो। रावेर यांसि कासीराव होळकर सु॥ इहिद्दे मया तैन व अलफ राजश्री त्रिंबकराव चिंतामण यानीं श्रीमंतांचें पत्र छ ६ रजबचे आणिलें कीं प्रांत खानदेश येथील कानगोईचे वतन खंडोगंभीरराव व चिंतो विठ्ठल यांचें त्याची जफ्ती पेशजी सरकारांत केली होती त्यास चिंतो विठ्ठल निधन पावले त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामण यांजवर कृपाळू होऊन यांचे हिश्शांचे वतनाची मोकळीक आसे तरी तुम्हाकडील महालानिहायचे मामलेदार व जमिनदार यांस ताकीद करून पुर्वी चिंतो विठ्ठल यांजकडे वतन चालत होतें त्याप्रमाणें यांजकडे चालवणें म्हणोन त्यावरून हें पत्र सादर केलें असे तरी तुम्हीं सरकारसनदे-प्रों पा।-मजकूर येथील कानगोईचें वतनाचा हक्क रुसूम व इनाम वगैरे व पानपान कानू-कायदेसुध्धा पेशजी चिंतो विठ्ठल याजकडे सुदामत चालत आल्या बा। मशार-निलेकडे चालवणें. व कागद-पत्राचा शिरस्ता पुर्वी मोंगलाई अमलांतील असेल त्या अन्वयें यांचे दफ्तरीं देत जाणें जाणिजे छ २२ साबान मोर्तब सुद

मोर्तब सुद

बार

श्री.

लेखांक ३४८.

यादी श्रीमंत् यांस मेजमानीस पोषाख

श्रीमंत् खासे.

१ तिवट.

१ दुपट्टा.

२ महमुद्या.

·॥· किनखाप.

४॥ २५०

श्रीमंत् अप्पासाहेब.

१ तिवट.

१ दुपट्टा.

२ महमुद्या.

·॥· किनखाप.

४॥ १५०

४०० ३० मालि.

५७२

९७२

भोजनखर्च	१००
देहनगीखर्च.	१००
	११७२

श्रीमंताबरोबर गृहस्थ मंडळी.
मेजमानीस येणार.

१ बाळशास्त्री.	५०
१ गोपिनाथभटबाबा.	२०
१ वैजनाथ भट भागवत.	२५
१ बाळाजीपंत पटवर्धन.	२५
१ आप्पाजीपंत सहस्त्रबुद्धे.	२०
१ आबा काळे.	२५
१ मोरोबा दादा फडणीस.	१००
२ रामचंद्र गोसावी.	५०
१ सदाशिव माणकेश्वर.	४०
१ गोपाळराव मुनशी.	२५
१ बाळोजी कुंजर.	५०
१ शिवाजी बल्लाळ.	१५
१ गोविंदपंत.	१५
१ नारोबा आवटी.	१२
५ पोशाख दर १० प्रे॥	५०
१० पागोटीं १० दर ५ प्रे॥	५०
३०	५७२

श्री.

लेखांक ३४९.

१७२३ श्रावण वद्य ११.

विज्ञापना–

सेवेसी विज्ञापना. तागाईत छ २३ रबिलाखर रोज गुरुवार सायंकालपर्यंत वर्तमान तर राजश्रीकडील दरगदार यांणीं किल्याचा झाडा वगैरे कागदपत्र झाडे आणून दाखविले. रां माधवराव रास्ते यांणीं पाहून ठेविले कंपूचें धरणें आज उठोन लस्करांत गेले. वरकड बंदोबस्त रास्ते करीत आहेत. खर्चास आम्हांस नाहीं. याची आज्ञा असावी. सेवेसी श्रुत होय विज्ञापी.

साहित्यपत्र.

श्री.

लेखांक ३५०.

१७२३ पौष वद्य ९.

राजश्री सखाराम घाटगे सर्जेराव गोसावी यांसि:—

आसीर्वाद उपरी. उदाजी जाधव कुरग्या कोो खेड नि॥ तोफखाना याचा व तुळसाजी साडभर या उभयताचा काा मजकुरीं सेताचा व घराचा × × × कर्जीया होता त्याची पंचाईत सरकारातून नेमून देऊन पंचाईत मतें फडशा होऊन × × जामीन घेऊन फारखत्या हरदु जणाच्या × ल्या त्याजला सात आठ वर्ष जाहालीं असें असतां हाली तुम्हाकडील बहिरजी सिंदे याजला साडभऱ्यानें गैरवाका समजाऊन जाधवापाशीं सरकारचे गवत कापणावळीचा ऐवज होता त्यापैकीं मसाला वगैरे दोनशें रुपये घेऊन कुरण्यास खेडाहून पुण्यास आणिल्यावर साडभराचे सांगितल्यावरून तुम्हाकडील कारखान्याचे बैल कुरणांत जाऊन गवताची तसनस केली म्हणोन विदित जाहालें तरी तुम्ही राजश्री दौलतराव सिंदे अलीजा बहादूर यास सांगोन बहिरजी सिंदे यास ताकीद करऊन मसाला वगैरे दोनशे रुपये घेतले आहेत ते माघारा देवऊन तुळसाजी साडभर यास हुजुर पाठवून देणें. जाणिजे छ १२ रमजान. बहुत काय लिहिणें ?

श्री.

लेखांक ३५१.

१७२४ श्रावण शुद्ध ९.

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक कृष्णाजी बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना येथील कुशल ता॥ श्रावण शु॥ ९ नवमी रोज रविवार पावेतों मुक्काम शहर बऱ्हाणपूर येथें वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी कृपा करून आषाढ वद्य ५ चें पत्र पाठविलें तें श्रावण शु॥ ५ अस्तमानीं पावले लिहिला मजकूर कळला पत्रीं आज्ञा जे राजश्री गणेश शिवराम वकील राजेबहादार यांचे पत्र लष्करांतून आलें जे वतन-ममंधीं ताकीद-पत्रें व सोड-चिठीची सरकाराची आज्ञा जाली आहे राजश्री बापू चिटणीस यांजकडे परवानगी जाली आहे तर मागाहून लवकरच ताकीद-पत्रें व सोड-चिठी पाठवून देतों. ठराव जाला आहे त्याचे ऐवजाची तजवीज करणे ऐसें पत्र आषाढ वद्य तिसरीयेस आलें पुर्वी हजार रुपयांचा करार जाला होता हालीं चार रुपये कमजास्ती पडतील तरी मोतीराम वैगरे यांसी ताकीद करून ठेवणें पत्रें दाखल जाहालीं म्हणजे ऐवज देणें लागेल सोडचिठी येऊन काम सुरळीत चालूं जालें म्हणजे खासा स्वारीसमंधीं हजार दीड हजार रुपये खर्च पडेल तरी याची तरतुद करणें व पालखीचा सरंजाम करावयाचा आहे तें लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणें अडीच तीन हजार रुपये लागतील याची तजवीज करणें ऐसी पत्रीं आज्ञा सुचवली त्यासी एक बऱ्हाणपुरचा आकार सालाबाद पांच साहासे रुपये त्यांत महाल मजकूर खर्च जाऊन बाकी दीड दोनशें रुपये राहातात ते जतीवाला नेतो यास्तव इतके ऐवजाची सोय येथें होणार नाहीं सोड-चिठी आलियावर कोणाचे माथा काम मारिलें तरी हजार बाराशे रुपये देईल त्यासी स्वामीचें अभय-पत्र लागेल आमचा विश्वास तरी कोणास नाहीं पुर्वी राजश्री अमृतरावजीनी कारभार केला त्याचे फडशा अद्याप जाले नाहींत याजकरीतां सावकारमंडळी अनमान करितात हालीं कामावर हर-कोणी रुपये स्वामीचे खातरेवर देईल चिंता नाहीं गुमास्ते मंडळीचा भ्रममात्र आहे घरांत पाहावे तर नकार-घंटाच आहे बाहिर पाहावे तरी श्रीमंतांचे पदरचे कारकून यास्तव यजमानाचे नांवा-सारिखें रहावें लागतें गुमास्ते-मंडळींत तरी चांगला माणूस कोणी राहिला नाहीं कीं तोडजोड करील हाली सरकारची आज्ञा त्यासी तेही आपले आज्ञेखेरीज नाहींत त्यांचे शक्की-प्रमाणें आज्ञा जालियास हाजर आहेत परंतु वर कड माहालयाकार्यास सामल जाले पाहिजेत त्याची तजविज स्वामीची स्वारी इकडे आली म्हणजे सहजांत होऊन येईल भुसकुटे यांसी विचारले त्यांनीं उत्तर केले कीं तुर्त आम्हीं आपले घोरांत असो आम्हांकडे ऐवज मिळणार नाहीं हालीं त्याजकडील मामलती निघाल्या आहेत आपल्याकडील काम कबूल करीत नाहींत आपले आज्ञवरून मशार-निल्हेस दाहा पांच वेळा विचारलें त्यांचे मर्जीस येत नाहीं दुसरियांस बोलावें तरी ऐवजाशिवाय पैसा देत नाहीं यास्तव खानदेश-सुध्दां ऐवजाची तजविज होईल स्वामीची स्वारी या प्रांती आलियावर गुंता पडणार नाहीं पालखीचा सरंजाम करावयासी आज्ञा त्यासी तथून

याद येईल त्याप्रमाणें केला जाईल व लष्करांत काय खर्च पडेल त्याची व पालखीचे सरंजामाची येथें सरबराईकडील सिंद्याकडील माहालावर होईल चिंता नाहीं वरकड स्वारीचा खर्च खानदेश-प्रांतीं महालानिहाय गुमास्ते-मंडळीस पत्र दाखविलें त्यामी सेवेसी विनंति-पत्र लिहिलें आहे त्यावरून कळों येईल श्रावण शु॥ १ प्रतिपदेची विनंति-पत्रें डांकेस-मागमें पाठविलीं आहे तें पावलें असेल लष्करांत मशारनिल्हेकडे पत्र रवाना करून सत्वर बंदोबस्त होय तें जालें पाहिजे येथें खंडेराव मोरेश्वरकडील कारकून जतीवर आहे यामही परभोर वर्तमान कळलें त्याम मशारनिल्हेचे बोलणे जे खंडेराव मोरेश्वर यांचा सोड-चिठी आल्याशिवाय काम सोडणार नाहीं. तरी मोरो हरीचें पत्र खंडेराव यास आणवावें याउपर जतीवाल्याकडील वसूल नजाय तें जालें पाहिजे सिंद्याकडील माहाल यांची याद पाठविली आहे ते पावेल लष्करांत पत्रें परभारें रवाना करावी आणि इकडेही लष्करांत पाठवावयास दीक्षितांचे नांवें व गणपतरावजीचे नांवें ऐसीं दोन पत्रें पाठविलीं पाहिजेत म्हणजे येथून लष्करांत पाठऊं उत्तर आणवून सेवेसी पाठवून देऊं बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

श्री.

लेखांक ३५२.

१७२४ आश्विन वद्य २.

पो॥ छ १६ जमादिलाखर सु॥ सलास मयातैन व अलफ.

शेवेसी विनंती शेवक गोपाल हरी पटवर्धन चरणावरी मस्तक ठेऊन शिर-साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १५ जा॥खरपावेतों शेवकाचें वर्तमान यथास्तीत असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळला. दंगियामुळें आपण मुलामाणसांसुध्धां डकडे येणार. समागमें श्रीमंताकडील येक दोन शास्त्र्यांचीं कुटुंबें येतील त्यांचीं बरदास्त व्हावी म्हणोन आज्ञा. त्यास गवजी ! आज्ञेप्रमाणें बरखास्त थोडी बहुत होईल. चिंता नाहीं. परंतु पुणियांतील पलणकरी आले आहेत. त्यांणीं दाटी फार च केली ती आपलेकडून बापोजीपंत दाजी आले त्यांणीं पाहिली च आहे. तशांत आपलें व शास्त्रीबावाचें येणें जाल्यास जाग्याची सोय थोडी बहुत होईल. कळावें. बहुत काय लिहिणें ? कृपालोभ असो दीजे. हे विज्ञाती.

श्री.

लेखांक ३५३.

नकल.

१७२४ फाल्गुन वद्य ७.

राजमान्य राजश्री गोपाळ हरी पंत सचीव गोसावी यांसिः--

सेवक अमृतराव रघुनाथ नमस्कार. सु॥ सलास मया तैन व अलफ. मौजे कळंबोली त॥ पौन मावळ हा गांव राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांजकडे सरकारांतून इनाम आहे तेथें तुमचा संबंध नसतां एक साल ऐवज द्यावा म्हणोन पाटलास व याचे प्याद्यास व गांवचे बायकास मारहाण करून धरून किल्ले तिकोणा येथें नेलें आहे. म्हणून हुजूर विदित जालें त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी मौजे

मा॥रचे पाटील व बायका व माारनिलेकडील प्यादा धरून नेला आहे ते सोडून देऊन या उपर माारानिलेचे गावांस कोणेविशीं उपद्रव न करणें. जाणिजे. छ २० जिलकाद. आज्ञा प्रमाण मोर्तब.

श्री.

लेखांक ३५४.

१७२५ वैशाख शुद्ध १५.

राजमान्य राजश्री राघो नारायण दि॥ पंतसचीव गोसावी यासिः—

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार. सु॥ सलास मयातैन व अलफ मौजे अंबवली त॥ मुठेखोरें हा गांव रो॥ त्रिंबकराव चिंतामण याजकडे इनाम आहे तेथें फौजेचे दंग्यानें लूट होऊन गाव बेचीराख रयत उठून गेली. त्यास हाली माारानिलेनीं कौल व तगाई देऊन गावांत रयत आणून वस्ती करवून लावणी संचणी करितात ऐसें असतां तुम्ही राजगड तोरणा व किले तिकोना येथून व भोराहून मन माने तैसे रोखे करून वस्ती होऊं देत नाहीं. तुमचा संमंध कांहीं च नसतां उपद्रव करितां म्हणून हुजूर विदित जहालें त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं कोणेविसीं मौजे मजकुरास उपद्रव येकंदर न करणें. रोखे केले असतील ते मना करणें. फिरून बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ १४ मोहरम. आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

श्री.

लेखांक ३५५.

१७२८ ज्येष्ठ.

यादी माधवराव मल्हार यांसी तैनात सुद्दूर—सन सबा मया तैन व अलफ रुपये ५०० एकूण जातीस पाचशे रुपये तैनात सरकारांतून सरदारीचीं वस्त्रें आलियावर येणेंप्रों करार

शिवाय कलमें येणेप्रो

घोडें व तट्टू सरकार पैकीं निसबतीस येणेप्रों करार	विजयादशमीस वस्त्रें पोशाख सनग २ किमत रुपये ५० येणेप्रो करार

शिक्का पेशवे

श्री.

लेखांक ३५६.

नकल.

१६३० आषाढ शुद्ध ५.

मुख्यमुद्रा.

स्वस्तिश्री राज्याभिशेक—शके ३५ सर्वधारी संवत्छरे आषाढ वहुल पंचमी रविवासरे क्षत्रियकुळावंतसश्री—राजाशाहूछत्रपती स्वामी याणीं म॥ बापूजी सोनाजी परभू उपनाम दिघे देश—कुलकर्णी व गांव—कुलकर्णी त॥ मुठेखोरें, सुभा प्रांत मावळ यांसी इनामपत्र ऐसेजे स्वामी पराराष्ट्रांतून स्वराज्यांत आले त्याप्रसंगीं तुम्हीं राजश्री परसोजी भोसले यांची जमिनीशी करून असतां त्यांचे तर्फेनें स्वामीचें दर्शनास येऊन लांबकानीचे मुकामीं दर्शन घेतलें स्वामीचे आज्ञेवरून राजश्री परसोजी भोसले यांस फौजेनिशीं स्वामीचें दर्शनास आणिलें ते प्रसंगीं तुम्हीं सेवा बहुत एक-निष्ठेनें केली व पुढें हि निष्ठेनें वर्तणूक करिता तुमचें उर्जित करून वंशपरंपरेनें चालवणें हें स्वामीस अवश्यक याजकरितां तुम्हीं विनंति केली कीं आपण स्वामीचें राज्यांतील वतनदार सेवक आहों जें उर्जित करणें तें वतनसंमंधावरी केलियानें परंपरागत चालेल त्यावरून स्वामी

तुम्हांवरी कृपाळू होऊन नूतन इनाम देह ता मुठेखोरें पो २

मौजे भवर्ली १ मौजे टेमघर १

ऐशीं दोनींगावें इनाम कुलबाबकुलकानू वेरीज हक्कदार व इनामदार करुन चतुःसीमा भुमी पूर्व मर्यादिप्रमाणें देखील जलतरु-पाषाण-झाडझाडोरा निधिनिक्षेप सहित इनाम आजरामरामत करून दिल्हा असे तरी सदरहू दोहीगांवचा इनाम उपभोग तुम्हीं व तुमचे बाप भाऊं जनार्जीराम देश-कुलकर्णी पुत्र-पौत्रादि-वंशपरंपरेनें अनभऊन सुखरूप असणें स्वामी व स्वामीचे वंशपरंपरेनें तुम्हांस इनाम दोनगिांव चालवितील जाणिजे निदेश समक्ष मोर्तब आहे.

अस्सल पत्र जाडेवंद आहेत. मोर्तब सुद

बार सुरु सुद बार.

तारीख छ १९ रविलावर सु॥ तिसा मया.

श्रीनाथसाह्य.

लेखांक ३५७.

१७३१ भाद्रपद शुद्ध १.

श्री
जोतिस्वरूपच
रणी तत्पर माहाद
जी सुत दवलतरा
व शिंदे निरंत
र

अजसुभा राजश्री दौलतराव शिंदे ता॥ मोकदम मौजे बिडकीन-गांव पो॥ पैठण सु॥ अशर मया तैन व अलफ चिंतो विठ्ठल याणीं मौजे मजकूरचे पेठेचे शेटे यांसी ऐवज देऊन त्यांचे शेटेपणाचे वतना-पैकीं निमे वतन खरेदी करुन महजर करुन घेतला नंतर मशारनिलेचा काळ जाला हाली त्यांचे पुत्र राजश्री त्र्यंबकराव चिंतामण यांनीं शेटेपणाचे निमे वतनाचे वहिवाटीस मौजे मजकूरास कारकुन पाठविला त्यास तेथील शेटे यांनी मदत केली आहे. म्हणोन विदित जालें त्यांजवरून ही ताकीद सादर केली असे तरी तुम्हीं शेटयास निक्षून ताकीद करून त्यांनीं चिंतो विठ्ठल यांसी महजर करून दिल्हा असेल त्याप्रमाणें त्रिंबकराव चिंतामण यांजकडील हालीं कारकुन मौजे मजकूरास निमे शेटेपणाचे वतनाचे वहिवाटीस आला आहे त्यांजकडे वतनाची वहिवाट सुरळींत चाले असें करवगें जाणिजे छ. २९ रजब मोर्तब सुद.

मोर्तब
सुद

श्रीनाथ साह्य.

लेखांक ३५८.

नकल

१७३१ भाद्रपद शुद्ध १.

राजश्री जनार्दन वल्लाळ ठाणें जामगांव गोसावी यांसिः--

छ. अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा दौलतराव सिंदे दंडवत.

अशर मया तैन व अलफ मौजें बीडकीनगांव प्रो॥ पैठण येथील पेठेचे शेटे यांनीं आपलें निमें वतन शेटेपणाचें चिंतो विठ्ठल याजपासून ऐवज घेऊन त्यास खरीदी पत्रें करून पेशजी दिल्हें. नंतर त्यांचा काळ जाला. हालीं मा॥रनिलेचे चिरंजिव त्र्यंबकराव चिंतामण यांनीं शेटे-

पणाचें वतनाचे वहिवाटीस मौजें माागस कारकून पाठविला असतां त्यास तेथील सेट्यांनीं दिक्कत केली आहे म्हणोन विदित जालें. त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें आहे. तरी तुम्हीं मौजे माारचे शेटे यांसी निश्चू (न) ताकीद करून पेशजी चिंतो विठ्ठल यांसी खरीदी पत्र करून दिल्हें असेल त्याप्रों त्र्यंबकराव चिंतामण यांजकडील कारकून मौजे मारीं आला असेल त्याजकडे तेथील निमे शेटेपणाचे वतनाची वहिवाट सुरळीत चाले ऐसें करवणें. जाणिजे. छ २९ रजब. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

शिका

मो।

श्रीपांडुरंग.

लेखांक ३५९.

१७३१ फाल्गुन वद्य ८.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबकरावजी स्वामीचे शेवेसी.

पो श्रीधर कृष्ण सां। नमस्कार विनंती. येथील कुशल तां। छ २२ सफरपावेतों श्रीरूपेकरून वर्तमान येथास्थीत जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आम्हीं पुणियाहून क्षेत्र पंढरीस आल्याताा पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहीत असिलें पाहिजे. यानंतर राजश्री विठोबा नाईक तांबवेकर याजकडे श्रीमंत नाना फडणीस याचे दरबारखर्चापों बाकी येणें म्हणोन कोणी आकसांमुळें गैरवाका समजाविल्यावरून हुजरे वगैरे आपल्या विद्यमानें बसोन आम्हाकडील कारकून कृष्णाजी रघुनाथ तेथें आहे त्यास व घरीं बायकास वगैरे उपद्रव बहुत जाला. व आद्यापि हि होत आहे त्याकरितां आम्हीं यावें, त्यास पेशजी तेथें नेहमीं असतां मिंदे याजकडील घाटगे याजकडून वगैरे दररोज तांबेकर याचें देण्याचें धणी वगैरे फिर्यादी जाऊन मनस्वी उपद्रव परिणामीं तेथें कांहीं उत्पन्न व्हावें असी बाकी राहिली नाहीं दिनचर्यासुधां कठीण ऐसी खातरजमा होऊन बहुत श्रमाअंतीं परिहार व्हावा व श्रीमंत राजश्री रावसाहेब यांणीं समक्ष समजोन देऊन कृपा करून युक्तीचे वाटें परिहार करीत आले तत्राप नेहमीं उपद्रव कोठवर व चिरंजिवाचा वृतबंध हि करणें जरूर जाणोन क्षेत्रीं घरास आलों तों येथें हि घाटगे याजकडील आंमल आजपावेतों पुरविला होता. निवळपणें कामकाज सरकारांतून वगैरे समजोन व्हावे, असे स्वस्ततेचे दिवस आद्याप तेथें नाहींत. ना शरीरप्रकृत ठीक नाहीं जाणून राहिलों इतकियाद मार्गाची व तेथील सुपथेचें उत्तर आपलें आलियावर येतों त्यास तांबवेकर याजकडे तगादा वसोन फल नाहीं व तगादा करावयाजोगा जाबसाल हि नाहीं येविसीं पत्रीं तपसील कोठवरी लिहावा ? समजणारांनीं आपल्यास समजाविलें त्यांतील कारण व आकस आम्हा प्रसंगीं नाहीं जाणून उगवावा तें किमर्थ हें समक्षतेअंतीं कागदपत्रसुधां पक्की खातरजमा होईल येविसीं संवशय पडणार नाहीं. तूर्त अनुमानें ध्यानीं आणावें. जेमा प्रतादिनचर्यासुधां विचार कठीण. परंतु कैलासवासी सदाशिव नाईक तांबवेकर याचे वेळेस सरकारांत नजरा वगैरे पडोन खराबी होऊन दुकानें बंद जालें तत्राप यांतून कांहीं काळ बरा होता ऐसें असोन नानाचे खाजगीचा ऐवज देणार घेणार समक्ष असतां यावया-

जोगा असोन आज दाहा बारां वर्षें वाकी राहील न राहेल हें ध्यानीं आणावें. पूर्वी च आपण या कामांत इतकें नांव मात्र ऐकिलें परंतु वलखपूर्वक समजले नव्हते. हालीं लिहिल्यांत येऊन कळलें त्यास आपले वडिलांचा व तांववेकर याचा घरोबा व देवघेव व वाकीसाकी आद्याप काय हें आम्ही लिहावें तर आम्हांपेक्षां आपले ध्यानीं सर्व आहे. परिणामीं तांबवेकर याचें उणें तें तुमचें. आपला आमचा त्याचा दुसरा विचार नाहीं जाणून लि॥ आहे तर आपण प्रसंगीं असतां इतके दिवस लांबले हे च अर्धाक तर इतःपर तगादा उठऊन कारकून आमचा आहे तो च आपला ऐसें जाणून त्याजवर तांबवेकर याचे बायकामुलावर वडिलार्जित ममता तें ध्यानीं येऊन हर-येकविसीं दिनचर्या चालावी येविसीं वगैरे साहित्य जाहालियाचें उत्तर येऊन संतोष होय ऐसें करणें आपल्याकडे आहे इतकियावर हरतऱ्हेनें गैरवाका आणखी समजावितील त्यांतून समक्षतेअंतीं येक हि जाबसालास ठरणार नाहींत व त्याज-कडे गुंते त्यामुळें आकस धरून समजा-वणेचें कारण काय तें ममक्ष प्रत्ययासी येईल तर पुढें त्याचें ध्यानीं न घेतां मागें समजाऊन खराबी केली ते मात्र गैरवाका आकसामुळें असें ठरलें असतां भरून द्यावी येविसीं खातरजमा तिराइतांची मागावी. यथाज्ञानें विस्तारपूर्वक लेखन केलें. इतकियावर वडिलार्जित स्नेह व याचे देहप्रारब्धानरूप मर्जीस येईल तैसें व्हावें. बहुत काय लिहीणें ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

श्रीनाथ म॥

लेखांक ३६०.

१७३२ चैत्र शुद्ध १५.

श्री
जोतिस्वरूपच
रणी तत्पर माहाद
जी सुत दवलतरा
व शिंदे निरंत
र

अजमुभा राजश्री दौलतराव सिंदे त॥ हरीवलद पुंजाजी व नारायेण वलद लो-वजी ब्राह्मण-जाई सेटे कसवे वांडकीनगाव सु॥ अशर मया तैन व अलफ. तुम्ही आपले सेटेपणाचे निमे वतन आपले हिशाचे रो॥ त्र्यंबकराव चिंतामण यांचे तिर्थरूपास प्रोक्त करून देऊन खरीदखत लेहून दिलें. त्याचे वाहिवाटीवर मारनिले यांणीं आपले तर्फेनें कारकून पाठविला असतां दंडेली करून वाहिवाट चालूं देत नाहीं म्हणोन विदित जालें त्याजवरून हे ता-कीद सादर केली असे तरी तुम्ही खरीदखत दिल्याप्रों मुसावर शेकडा बैलावर सिरस्ता दोन रुपये व किराणा दर सहे बैलास च्यार रुपये व मीठ तांदूळ वगैरे व नकाशांत हकविकरी दरबैलास पक्का पैसा व बाटीक घोड्या व गाड्यास दर रुपयेस पक्का पैशा-प्रों व साळ्याचे मागास सालिना येक सेला व सणगराकडून सालिना येक चवाळे येक व कडबा वगैरे विकरीस गाड्यागमें पैसे पक्के दोन व जमीन मळे बिघे बारा त्यांत विहीरी सुमार च्यार सुध्धां व खंडेरायाची माळ जमीन बिघे पाऊणशे व निमे घर येणेंप्रों तुम्हीं लिहून दिलें त्याप्रों विनाविकृत मारनिलेकडे वहिवाट

चालूं देणें. वहिवाटीस तुम्हीं व तुमचे भाऊबंद तक्षीमदारांनीं हरकत केलियास कार्यास येणार नाहीं जाणिजे छ १४ रा॥ बल मोतंब सुद.

मोतंब सुद

श्री नाथ स॥

लेखांक ३६१.

१७३२ चैत्र शुद्ध १५.

राजश्री बाळाजी सखदेव गोसावी यांसिः-

छ. अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य म्ो॥ दौलतराव शिंदे दंडवत. विनंति. उपरि व्यंबकराव चिंतामण यांचे तीर्थरूपास हरी वल्लद पुंजाजी व नारायण वल्लद लोवजी ब्राह्मण जा-ई से--टे कसबें बिड कीणगांव यांनीं आपले शेटेपणाचें निम्में वतन प्रोक्त करून दिल्हें त्याचा हक भुसाव-र द-र-स-दे बैलास रुपये दोन व किराणा दर शेंकडा बैलास च्यार रुपये व मीठ व तांदूळ वगैरे व नकाशांत हक विकरी दर बैलास पैसा पक्का व बटीक व घोडीं व गाडयास दर रुपये ७ पका पैशाप्रे॥ व मागास येक सेला व चवाळें एक व कडवा वगैरे विकरीस गाडयामागें पैसे पक्के दोन व जमीन मळे बिघे बारा त्यांत विहिरी सुमार चार खुद्दां व खंडेरायाचा माल जमीन बिघे पाउणशें व निम्में घर येणें प्रों दिल्हें. त्याचे वहिवाटीस कारकून व्यंबकराव चिंतामण यांनीं पाठविला असतांशेटेमार यांनीं आपले खरीदखताप्रों निम्में वतनाचा दाखला न देतां दंडेली करितात म्हणोन विदित जाले त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिले असे तरी हरी व नारायण शेटे व यांचे भाऊबंदास निश्चून ताकीद करून खरीदखताप्रों। निमे वतनाची वहिवाट हक्कदक्क व जमीनविहिरी व घरा सुद्धां व्यंबकराव चिंतामण यांचे कारकुनास सोंपून देऊन निम्मे वतनाची वहिवाट घेत जाणें. येविशींचा फिरोन बोभाट येऊं न देणें. रा। छ १४ रा॥वल सु॥ अशर मया तैन व अलफ. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

श्री
जो ति स्वरुप च
रणी तत्पर माहाद
जी सुत दवलत रा
व शिंदे निरंत
र

मोतंब सुद

श्रीनाथस॥

लेखांक ३६२.

नकल.

१७३२ चैत्रशुद्ध १५.

रो॥ बाळाजी सखदेव गोसावी यांसिः—

छ. अखंडित-लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्री॥ दौलतराव सिंदे दंडवत विनंति उपरी व्यंबकराव चिंतामण यांचे तीर्थरूपास हरी वल्लद पुंजाजी व नारायण वल्लद लोवजी ब्राह्मणजाई शेटे कसबे बिडकीणगांव यांनीं आपले शेटे-पणाचें निमें वतन फुरोक्त करून दिल्हे त्याचा हक्क भुसांवर दर शेंकडा बैलास चार रुपये व मिठ व तांदूळ वगैरे नकाशांत हक्कविकरी दर बैलास पैसा पक्का वहिवाटीला व घोडी व गाडयास दर रुपायास पक्का पैशा प्रमाणे मागास येक शेला व चवळें येक व कडबा वगैरे विकरीस गाडया-मागें पैसे पक्के दोन व जमीन मळे बिघे बारा त्यांत विहीरी

(सिका) सुमार च्यार सुध्धां व खंडे-रायाचा माळ जमिन बिघे पाउणशें व निमे घर येणें प्रमाणें दिल्हें त्याचे वहि-वाटीस कारकून त्रिंबकराव चिंतामण यानीं पाठविला असतां शेटे-मजकूर यांनीं आपले खरीद्खताप्रमाणें निमे वतनाचां दाखला न देतां दंडेली करितात म्हणोन विदित जालें त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे तर हरी व नारायण शेटे यांचे भाऊबंदास निक्षून ताकीद करून-खरीद-खता-प्रमाणें निम्में वतनाची वहि-वाट हक्कदक व जमिन बिहीरी व घरा सुध्धां- त्रिंबकराव चिंतामण यांचे कार-कुनास सोपून देवऊन निमें वतनाची वहि-वाट घेत जाणें येविषयींचा फीरोन बो-भाट येऊं न देणें रा॥ छ १४ रबिलावल सु॥ अशर मया तैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंति मोर्तब.

श्रीनाथस॥.

लेखांक ३६३.

१७३२ चैत्रशुद्ध १५.

राजश्री जनार्दन वल्लाळ गोसावी यांसि

छ. अखंडित-लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्रीो दौलतराव शिंदे दंडवत सु॥ अशर मया तैन व अलफ रा॥ त्र्यंबकराव चिंता-मण यांचे तीर्थरुपापासून रुपये घेऊन केसो शामराज व बाबूजी मल्हार व नारे केशव जोशी कुळकर्णी मौजे साकेगांव प॥ शेवगांव यांनीं आपल्याले हिश्शाचे वतन गाहण ठेऊन गाहणखत लिहून दिल्हें त्यांत करार कीं ऐवज मुदतीस न दिल्यास वतन डुलेल तुम्हीं अनभव करावा याप्रमाणें आपले कुलदैवतांचे शफतपूर्वक व कसबे तिसगांव पा॥ मजकूर येथील कुलकर्ण-पण चिमणाजी सदाशिव व आत्माराम सदाशिव कुलकर्णी यानीं आपल्याले वतन गाहणखत साके-गांवकरां-प्रमाणें करार लिहून दिल्हें त्याजवरून मुदती भरून गेल्या यांजकरीतां त्र्यंबकराव चिंतामण

श्री
जोतिस्वरूपच
रणीतत्परमाहद
जी सुत दवलतरा
व शिंदे निरंत
र

यांणीं आपले तर्फे-नें वतनाचे वहि-वाटीवर कारकून पाठविले असतां वतनाचे हकदस्तुर व वतन-बाब मानपान त्यांस सोपून न देतां दंडेली करितात पत्र म्हणोन विदित जालें त्यांजवरून हे पत्र तुम्हांस लिहिलें असें तरी तुम्हीं हरदो गांवकरी यांसी बोलाऊन आणून त्र्यंबकराव चिंता-मण यांजपासी खतें पत्रें आहेत तीं आणवून पांच मेळवून उभयतांचे लेखाची चौकसी करून वाजबी पत्र व करारा-अन्वयें वत-नाची वहिवाट दोनी गांवची त्र्यंबकराव चिंतामण यांजकडे सुरळीत चालेतें करणें लेखपत्र असतां पडली करीत असल्यास निक्षून ताकीद करून वहिवाटीस दिक्कत न पडेतें करणें जाणिजे छ १४ रबिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब
सुद

श्रीनाथसा।

लेखांक ३६४.

नकल.

१७३२ चैत्रशुद्ध १५.

राजश्री जनार्दन बलाल गोसावी यांसिः—

श्रीनाथस॥

लेखांक ३६५.

१७३२ चैत्र शुद्ध १५.

राजेश्री केसो शामराज व बाबूजी मल्हार व नारो केशव जोसी कुलकर्णी मौजे साकेगांव पो। सेवगांव.

छ श्री। दौलतराव सिंदे दंडवत सु॥ अशर मया तैन व अलफ तुम्हीं आपले जोसी-कुलकर्णपणाचें वतन साहा गांवचें आपल्याले हिशाचे गाहण ठेऊन राजश्री त्र्यंबकराव चिंतामण यांचें तिर्थरूपापासून ऐवज घेतला त्याचें खत लेहून दिल्हे त्यांत करार लिहून दिल्हा कीं मुदतीस ऐवजाचा फडशा करून देऊं न करूं तर आमचें वतन तुम्हांस डुलेल बिलकुल वतनाची वहिवाट तुम्हीं करावी यांस तफावत अगर नवदीगर करूं तर आपले कुलस्वामीची शफत असें असतां मशारनिलेनीं वहिवाटीवर कारकून पाठविले त्यांस वहिवाट चाली न देता दिक्कत करिता म्हणोन हुजूर विदित जालें त्याजवरून हे ताकीद सादर केली असे तरी तुम्हीं गाहण लेहून खत लिहून दिल्हे त्यांत करार असतां दंडेली करणें कामाची नाहीं तर देखत पत्र तुमचे लेखा-प्रमाणें वतनाची वहिवाट त्र्यंबकराव चिंतामण यांचे कारकुनाकडे सुरळींत चालों देणें या उपरी बोभाट आलियांस कार्यास

श्री
जोतिस्वरूपच
रणी तत्पर माहद
जी सुतदवलर
व शिंदे निरंत
र

छ अखंडित—लक्ष्मी-अलंकृत-राजमान्य श्री। दौलतराव सिंदे दंडवत सु॥ अशर मया तैन व अलफ राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांचे तिर्थरुपापासून रुपये घेऊन केसो शामराज व बाबूजी मल्हार व नारो केशव जोशी कुलकर्णी मौजे साकेगांव पो। सेवगांव यांनीं आपल्याले हिशाचे वतन गाहाण ठेऊन गाहण खत लिहून दिल्हे त्यांत करार कीं ऐवज मुदतीस न दिल्यांस वतन डुलेल अनभव करावा या प्रमाणें आपलें कुलदैवताचे शफथपूर्वक व कसबे तिसगांव पा। मजकूर येथील कुलकर्णपण चिमणाजी सदाशिव व आत्माराम सदाशिव कुळकर्णी यांनीं आपल्याले वतन गाहणखत साकेगांवकराप्रमाणें करार लिहून दिल्हे त्याजवरून मुदती भरून गेल्या यांजकरितां त्र्यंबकराव चिंतामण यांनीं आपले तर्फेनें वतनाचे वहिवाटीवर कारकून पाठविले. असतां वतनाचे हक्कदस्तूर व वतन-बाब मान-पान त्यास सोपून न देतां दंडेली करीतात म्हणोन विदित जालें त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असें तरी तुम्ही हरदो गांवकरी यांसि बोलावून आणून त्र्यंबकराव चिंतामण यांजपासी खतें पत्रें आहेत तीं आणवून पांच मेलवून उभयतांचे लेखाची चौकसी करून वाजबी पत्र व करार अन्वयें वतनाची (सिका) वहिवाट दो दोन गांवची त्र्यंबकराव चिंतामण यांजकडे सुरळींत चोलतें करणें लेखपत्र असतां दंडेली करीत असल्यास निक्षून ताकीद करून वहिवाटीस दिक्कत न पडेतें करणें जाणिजे छ १४ रबिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती मोर्तब.

येणार नाहीं जाणिजे छ १४ रविलावल बहुत काय लिहिणें.

मोर्तब सुद

श्री.

लेखांक २६६.

१७३२ आषाढ शुद्ध १०.

पैवस्ती श्रावण व॥ १ शके १७३२ सु॥ इ॥ अशीर.

राजाश्रियाविराजितराजमान्यराजश्री त्रिंबक रावजी स्वामीचे शेवेसीः—

पोष्य गणेश उमाजी कृतानेक स॥ नमस्कार विनंति येथील कुशल त॥ आषाढ शुद्ध १० मुक्काम लष्कर नर्जीक सोपार येथ सुखरूप असो विशेष. श्रीमंत राजेबहादर याचे प्रकर्णांत आपण वागतां. आम्हीं लष्करांत आहोंत उभयपक्षीं स्नेह असावा म्हणोन राजश्री कुशावा जवळ बोलण्यांत त्रिवर्गांनीं आणिलें त्याजवरून माारनिलेनीं आम्हांस लिहिलें त्यास आपण व आम्हीं दोन नाहींत. एक मानोन उभयपक्षीं स्नेहाची वृद्धिंगत चालवावी. परस्परें कामकाजाची पैरवी राजेबाहादरप्रकर्णीं वगैरे राखीत जावी. वरकड माार कुशावाचे पत्रीं लिहिला आहे. त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें ? हे विनंति. + + + + पंधराचा आहे. लोभ कीजे हे विनंति.

श्री.

लेखांक २६७.

नकल.

१७३२ भाद्रपद व॥ ११.

राजश्री बनाजी बावाजी गोसावी यासि, ६ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजो मनोहरगीर सुभेदार तो त्रिंबक वगैरे नारायण सु॥ इसने अशर मयातैन व अलफ. राजश्री त्रिंबकराव चिंतामण यांणीं पुण्याचे मुकामीं समजाविलें कीं संवस्थान पेठ व पो. हरसुल येथील कानगोईचे वतन आमचे तीर्थरूप चिंतो विठ्ठल यांणीं खंडो गंभीरराव याजपासून खरीद घेतलें त्याची जती पेशजी सरकारांतून जाहाली होती त्याची मोकळीक होऊन आम्हांकडे चालवावयासी सरकारची सनद गोविंदराव सदाशीव सुभे प्रांत वागलाण वगैरे यांचें नांवे छ ४ रजब सन इहीदेमयातैनांत सादर जाली परंतु हालीमाजी वगैरे दंग्यामुळें वर्हावाटीस माहाली आम्हाकडून कारकून गेला नाहीं. त्यास सरकार सनदेअन्वयें संवस्थान व पो॥ मजकूर येथील कानगोईचे वतन आमचें आम्हाकडे चालविलें पाहिजे म्हणून त्याजवरून अलाहिदा सरकारच्या सनदा सनसीतसीतैन व स इहीदे मयातैनचे सालीं जाहल्या आहेत त्या पाहून सदरहू वतन माारनिलेकडे चालतें करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी संवस्थान पेठ व पो॥ हरसूल येथील कानगोई वतनाचा हकरुसूम व इनाम व पानमान कानूकायदेसुध्धां चिंतो विठ्ठल याजकडे पेशजी सुदामत चालत आल्याप्रों त्यांचे पुत्र त्रिंबकराव चिंतामण याजकडे सुरळीत देवऊन कानगोईचा सिरस्ता कागदपत्र मोगलाई

अमलातील असेल त्याप्रो मारानिलेकडे चालवणें. रा छ २४ शाबान बहुत काय लिहीणें ? मोर्तब.

श्रीसिद्धेश्वर.

लेखांक ३६८.

१७३६ अधिकभाद्रपद वद्य ३.

अजस्वरीं राजश्री बाळशास्त्री दीक्षित तो मोकदम मौजे जिन्हाळें पो संगमनेर सु॥ खमस अशर मयातैन व अलफ. मौजे मजकूरचे कुळकर्ण कैलासवासी त्रिंबकराव चिंतामण यांचें तें आपले तर्फेचे गुमास्ता ठेवून वहिवाट करीत असतां, साल गुदस्तांपासून तालुके पट्टा येथील मामलेदार गुमास्त्याचे हातून वहिवाट घेत नाहींत. तरी गुमास्त्याचे हातून वहिवाट घेण्याविसीं मामलेदार व मोकदम यांस ताकीद जाली पाहिजे; म्हणोन माधवराव त्रिंबक यांनीं समजाविलें. त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी मौजेमजकूर येथील कुळकर्णाची वहिवाट त्रिंबकराव याचे कारकीर्दीत गुमास्ता करीत असेल, त्याप्रमाणें हालीं माधवराव त्रिंबक आपला गुमास्ता गांवीं ठेवितील, त्याचे हातून कुळकर्णाचें कामकाज घेण. दिक्कत न करणें. येविसीचा फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ १७ रमजान. मोर्तब सुद.

मोर्तब सुद

श्री.

लेखांक ३६९.

राजश्री बाबासाहे पेंडसे स्वा.

सा. नमस्कार विनंति विशेष रानगुा रु॥ रुो ४०० चारशें जरूर आतांच पाहिजेत सबब विटूस पाला आहे व त्याजपाशीं यावें. कळावें. बहुत काय लिहिणें ? हे विनंति.

केशव खंडेराव.

२७॥ भार

पौ वजा दर रुपयास ७॥ प्रो मासे १३॥। तोले १८१॥। बाकी तोळे २६।१॥। वजाजती एक गुंजेची कमर ।। मासे ३

एकंदर वजन तोळे २६॥१॥। याजवर सु॥. शिरस्तेप्रो रु. ३८० पा आहेत.

श्री.

लेखांक ३७०.

१७४० ज्येष्ट वद्य ५.

राजश्री भिकाजी मोरेश्वर पा मोकदम मौजे अनंदवल्ली पो नासिक

कबुलात बेशमी काशी हेंगडा मौजे मखमुलाबाद पो दिंडोरी सन १२२८ कारणें कबुलात लिहून दिल्ही ऐसी जे. तुमचा इनाम मजरे गंधारवाडी मौजे मजकर येथील आहे. त्याप्रमाणें सेताची लावणी आम्हीं केली, त्याचा सारा दर बिघा रु॥ एक प्रो देऊं. खेरीज पा कुलकर्णी यांचे हकदारीचे दाणे देत जाऊ. मि॥ शके १७४० बहुधान्य नाम संवत्सरे माहे जेष्ट व॥ ५.

नि॥ नांगर

रामचंद्र गोविंद कुळकर्णी.

लेखांक ३७१.

भागाचे	यासी ताळा पाहावयासी
६००	६०० मुदल रुपये.
६००	१२ व्याज रुपये.
३६००००	६१२

भाग बेरीज

५८८७॥

व्याज बारा रुपये द्यावें घ्यावें णेयें प्रमाणें करावें कलम १

हिशेब तैनात.

सूर्याजी गायकवाड चाकर दरमहा रुपये ५ प्रो चाकरी रोज.

तैनात ५

चाकरी रोज ८॥

गुणाकार ४० किता.

२॥ कित्ता.

४२॥

सदरहूस तिसाप्रों भागावें १७-॥॥.

सदरहू सरासरी येक रुपया पावणेदोन आणे द्यावे ऐकूम कलम १

हिशेब व रूप मोजणी.



उंची गज
५

परीघ
३०

समूळ व्यास सुमार व देखील भिंत रुंदी व-रावर्दमुळें

समूळ क्षेत्र	आंतील क्षेत्र	बंदीस्त इमारत	२४० बंदीस्त इमारत चिरेबंदी.
१० व्यास		३०	
३ त्रिगुण तिपट	तिपट	१८	
—	—	—	
३०	१८	४८	

× × × ×

थाई	चवथाई	निमे	१३५ पोकळ इमारत
७॥	४॥	२४	३१५
१० साडेसातांनी गुणिलें.	६ गुणिले फिरोन व्यास.	२ रुंदी भिंत २ यांणीं गुणिलें	
—	—	—	
७५	२७	४८	
		५ उंची गज	
—	—	—	
३७५	१३५	२४०	

सदरहु येणेंप्रमाणें करावें. करून बंदिस्त इमारतीं चिरयाची आले तीस मग दर गजी पैका करार खंडून जो पैका हिसेबीं होईल तो द्यावा. व याजखेरीज पोकळ इमारतीची पोकळ भरणीची असेल तिचा पैका निराळा खंडून दरगजी बसऊन जो होईल तो द्यावा. कलम १.

हिसेब गुणाकार कपटसिंधु.



— बेरीज

रुपये.
१३६९८५१.
कलम १.

हिशेब गुणाकार साधा ताळा पाहावयासी धांवरा.

मोत्याचे दोण सर.	१२३४१
दरमोत्यास रुपये.	१११
	१२३४१
	१२३४१
	१२३४१
	१२३४१

बेरीज.

१३६९८५१.

कलम १

हिशेब आंता हुंडणावळ करार बोली रुपये १०००० दाहा हजार यासी दर स. दे. हुंडणावळ बोली रुपये ५ प्रमाणें रो ५०० पांचशें जाहाले. साडे दहाहजार रुपये द्यावे तेव्हां दाहाहजार रुपये हुंडणावळ देऊन बाकी रुपये याची चीठी द्यावी.

	रुपये गुणिले
पंच्याणवसें पावण चोवीस एक आणा हुंडणावळ इतक्या रुपयाची चिठी द्यावी. सावकारास रुपये.	१००० १००००
	१००००००००

यासी कारण मुदल मुदल गुणावें वर हुंडणावळ. व मुदल मिळऊन भाग द्यावा. जो भाग येतील तितके रुपयाची चिठीस व मुदलास जितकी बाकी राहील म्हणजे मुदलाचे भरीस जे रुपये हूंडमध्यें मावतील तितके हुंडणावळ रुपया द्यावें. एकूण कलम १	बेरीज ९५२३।।।– ४७६८– बेरीज. १००००

हिशेब दामाशाही खरेदीवांटणी येणेंप्रमाणें. रुपये.

केसर वजन.	तोळे ६०	रुपये २५६
पैकीं वजा घेतले तोळे	३०	घेतले तोळ्यासी गुणले रुपये. १०
करार द्यावें रुपये १२८		येकूण गुणाकारें बेरीज.
जमा तोळे.	जमा रो	
३०		

रागुराज

लेखांक ३७२.

गुलाम मोहिदीनखान दाम-महबत-हूं छ शाहामत व अवालीमर्तबत रफाअत व मा-अलमं-जिलत वा-आदज पौक आंकी भिकाजी मोरेश्वर यांणीं जाहीर केलें कीं मौजे मखमलाबाद पो दिंडोरी येथें सरकारांतून आम्हास इनाम जमीन आहे त्यास येशवंतराव सिवाजी व पठाण यांणीं दंगा करून खंडणी घेतली त्याची पटी जाहागरिचे कमावीसदार यांणीं करून ईनामाची जफ्ती केली आहे येविसी आज्ञा जाली पाहिजे म्हणोन त्याज तुम्हास कलमीं असे भिकाजी मोरेश्वर सरकारचे पदरचे याची ईनाम जमीन तुम्हाकडील कमावीसदार यांणीं जफ्त केली आहे त्यास ताकीद करून ऐवज न घेतां जमीनीची जफ्ती मोकळी करवणें. जमीन मोकळी होऊन यांची याजकडे सुदामत चालत आली आहे त्याप्रों चाले तें करावें.

श्री.

लेखांक ३७३.

तीर्थस्वरूप राजश्री तात्या स्वामीचे सेवेसीः—

अपत्य रघुपतराव याचे कृतानेक सां॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. रो बाबूराव अनंत आले. सर्व वर्तमान निवेदन केलें. इकडील वर्तमान पत्रावरून ध्यानास येईल. सारांष येथील बंदोबस्ताविशईं श्रीमंत बापूस विनंती करून आपण येथील बंदोबस्त करावा. येथील वर्तणूक आपले आज्ञेविरहीत नाहीं. दरबारसंमंधी ठराव करून बंदोबस्त करावा. आपण तेथील फडशा करितिल त्या अन्वयें निभावणी होईल. आतां आपण संवशय न धरावा येथील लक्ष आपल्या पायांसी. अथपर दुसरें नाहीं. आपण उपेक्षा केल्यास परिणाम नाहीं. सर्व भरवसा आपला आहे. बहुत काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंती. माहालचे प्रगणियाचे वर्तमान रो राजाराम सांगतील × × × ×.

(पुढील बंद गहाळ)

श्री.

लेखांक ३७४.

नकल.

राजाश्रियाविराजीत राजमान्य राजश्री परशराम भाऊ स्वामीचे सेवेसीः—

पोष्य हरी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उंपरी येथील कुशल ता॥ छ १६ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष.रो आबाजी नाईक कावरस याजकडे मौजे कारजगे हा गांव करवीरकराकडून आपाजी शामराज याचे विद्यमानें इनाम आहे. त्याप्रो सरकारांतून करार आहे. त्याचा वसूल आपणाकडे गुदस्तापासून चिकोडीचे जफ्तीमुळें आला असेल तो ऐवज देवऊन पुढें नाईकाकडे गांव सुरळीत चालता केला पाहिजे. सरकारांतून गांव चालवावयाचा करार जाला आहे. त्याप्रों नाईकाचे आगत्य धरून चालवावा. याचा ऐवज घेतला असेल तो द्यावा. र॥ छ १७ सफर. बहुत काय लिहिणें ? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

श्री.

लेखांक ३७५.

श्री
मोर्तब
सुद

साहेब मेहेरबान अन्याबा साहेब व व बाबा साहेब मेहेरबान सलामत हूं.

साहेब मुष्फक मेहेरबान अजी कमतरीन महमद जाफर व रजेबदीन व महमद इमान देसमुख पा। पोटवदे दुवा सलाम महवद मकसूद आ की येथील खैर सला जाणोन साहेबीं आपली खैर अफीयत हमेशा कलमीं करीत जाणें दिगर आम्ही साहेबाची वाट पाहतों परंतु आपले येणें होत नाहीं तर आतां आपण यावें तुम्हीं आलियावांचून येथील बंदोबस्त होत नाहीं. कितेक वर्तमान जबानीं खंडोजी वायकर सांगता मालूम होईल. विस्तार काय ल्याहावा ? रा॥ मल्हारजी नाईक यांनीं पत्र लि॥ आहे त्याजवरून सर्व विदित होईल आपण त्याजला पत्र एक लेहून पाठवावें, म्हणजे सर्व कामाचा बंदोबस्त होईल. ज्यादा काय लिहिणें ? हे किताबत.

गणराज गौरीसुत ।
लाल आंग मे बभुत ।
जिसके मुख पंच्यामृत ।
जमे दुत भागत ॥ १ ॥
नामा दरजी जुलाम ।
विठूराजका गुलाम ।
हुवा दुनियामे बदनाम ।
उने नाम डुबाया ॥ २ ॥

नामा माने नही । श्रीमार्गेश्वर वद्य ७.

श्रीभवानीशंकर.

लेखांक ३७६.

राजाश्रियाविराजितराजमान्यराजश्री भाष्करपंत स्वामी गोसावी यांसिः—

पोष्य दादो नरहर सां। नमस्कार विनंती उपरी येथिल कुशल जाणून स्वकीय स्वानंदवैभव लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण स्मरणपूर्वक कृपापत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. ऐसेंच निरंतर पत्रीं संतोषवित असावें. यानंतर राजश्री संताजी अंबाल्याबद्दल बाकीचा मजकूर लिहिला त्यास अवघे गांवकरी मिळोन पट्टी करून दिधली. त्याजमध्यें संताजीवर दोनशें रुपये लिहिले. त्याजवरोन संताजी ह्मणो लागला कीं आपल्याकडे चौघा भावाबरोबर जमीन नाहीं. आपण इतका रुपया कोठून द्यावा. जमीन मोडून द्यावी चौघाभावाप्रमाणें जमीन असलिया पट्टीचा रुपया लिहिल्याप्रों देऊं मग करार ठरला कीं जमीनीची वाट जालिया अधिक उणें पाहून घेऊं. मग पट्टीपैकीं रुपये १५० दीडशें वसूल दिधला. बाकी रुपये ५० पन्नास त्याजकडे तैशीच राहिली पुढें जमिनीची समजावीस व्हावी. तों तितक्यामधें आपल्याकडून कामकाज निघालें. आतां तुम्हांकडे कामाचा अधिकार आहे. वाजबी गैरवाजबी ध्यानांस आणून जैसें विल्हे लावायाचे असेल तैसें लावावें. तुमची हि शुक्रगुजरी नेकी गांवकरी यांणी फार सांगितली. आणि परस्परें ही ऐकिल्यांत आली. त्यास राहतां हेंच राहणें. वरकड कामकाज बरें वाईट होतच आहे. सूज्ञाप्रती विशेष काय लिहिणें ? कृपालोभ असो दीजे हे विनंती.

श्री.

लेखांक ३७७.

अजम राजश्री सेख हसन शेख इस-माईल सुभेदार मुा। बाणकोट यांसि:-

छ मोईबान मुखालिशान—दस्तगा अज दिल एकलास—रामभट आगाशे खोत कुलकर्णी मौजे राहाटगर हालीं वस्ती पुणें दुवा आं की येथील खुशी जाणून आपले कडील हकीकत लिहीत जावी. दिगर तुम्हीं पत्र पाठविलें पावलें व हयात खान जमातदार यांनीं सांगितले वरून सर्व अर्थ कळला. व आपण पत्र पाठविलें तेंच बाजिन्नस श्रीमंत राजश्री नानास दाख-विलेंवरून श्रीमंत संतोष जाहाले. इकडील मजकूर तुम्हांस कळावा या अर्थें हयात-खान जमातदार यांस पाठविले आहेत. हे खुद जबानीं सांगतील त्याजवरून कळों येईल. राजहंसाचा मेळा पाहून आम्हीं मुरंबीपणा केला ते पक्षीं मोत्याचा च चारा खात आहेत. जमेदारीचे रीतीनें कांहीं खि-जमत ध्यावयाची असलिया-लिहीत जाणें म्हणून लिा. त्यास इकडील जमीदारीचें आम्हांकडे आहे च. आपले तर्फेची इनाम जाहाल्यास आपल्याकडील ही जमीदारी होईल. दोस्तीचे जागा ज्यादा कायें लि-हिणें ? लोभ करावा. बारीक मोठ्या गोष्टी कित्तेक तुमच्या मनांत असतील त्याच आमच्या मनांत आहेत. त्या अन्वयें सूचना मात्र आम्हांस करावी. श्रीमंतांच्या कानावर घालून बंदोबस्त केला जाईल. आपण इनाम आम्हांस करून देवि-णार म्हणून हयातखान यांनीं सांगितलें त्यास कुटुंबाचा योगक्षेम चाले असें करून देविल्या फार उत्तम आहे.

श्री.

लेखांक ३७८.

आशिर्वाद विनंति उपरि. आपण म-जला येण्याविशीं च्यार पत्रें पाठविलीं त्यास मी पत्राची वाट न पाहावी. निरोपा-बरोबर आपली भेट घ्यावी. परंतु घरांत दोघी मुलींस समाधान फार नाहीं आ ती अवस्था राणुजी मातरे यांस पुसावी. ईश्वर कांहीं आरोग्य पडलें म्हणजे सेवेशीं येतो. कांहीं दुखण्याचें श्वेत कृष्ण जालें म्हणजे मजला कांहीं गुंता नाहीं. रागें न भरावें. मी आपला काय नाश केला अमेल तो समक्ष विनंति करीन. मी कांहीं चोरी एक पैशाची केली नाहीं. चोरी ऐसी माझे आंगीं लागली, तरी मनास येईल तैसें पारपत्य योजावें आणि चोरी च केली ऐसें असतें तर मजला अन्नावस्त्राची तारांबळ कशास व्होती ? जितका गांवचा हिशेब मजला ठाऊक आहे तितका दाखवीन. कळावें. पत्रें आपलीं फार आलीं म्हणोन रागें न भरावें. फार काय लिहिणें ? लोभ करावा हे विनंति. रा। माघ शु।। ३.

श्री.

लेखांक ३७९.

विनंति उपरि. आपण मुलामाणसांस पाठवावयाचा निश्चय केला होता त्यांत कांहीं विपर्यास ऐकतो. त्यास चित्तांत विपर्यास काडीमात्र न आणितां सुखरूप मार्गस्थ करावीं. येथें आल्यावर दुसरा अर्थ किंवा किंत चित्तांत न आणावा. वारंवार काय ल्याहावें ? दुसरा अर्थ घडावयाचा नाहीं. बहुत काय लिहिणें ? लोभ कीजे हे विनंति.

श्रीरामचंद्र.

लेखांक ३८०.

गजाश्रिया-विराजित-राजमान्य-राजश्री चिंतोपंत स्वामीं गोसावी यांसि

पो। सदाशिव चिमणाजी साचिव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावें विशेष पत्र पाठाविलें तें प्रविष्ट जालें. किल्ले राजगड येथील असामीच्या वेतना-विशीं लिहिलें त्यास सालगुदस्ताचे किल्ले-मजकूरचे देणेंच राहिले आहे या अन्वयें हेही राहिलें साल-मारचा अर्थ तरी हा कालपर्यंत किल्ले-मारचा तहबंद जाला नाहीं ठराव होऊन तह-बंद जाला म्हणजे निमेसिमे ऐवज पावावयाचा तो पावल *रा छ २२ रबिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

* येथून हस्ताक्षर खाशांचें.


REFBK-0000782